लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या
विनियोजन लेखे यावरील

सातवा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक , २०१६ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
२०१६

लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे यावरील

सातवा अहवाल

लोकलेखा समिती

२०१५-२०१६

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.
(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.
(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.
(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.
(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.
(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.
(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.
(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.
(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.
(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.
(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे, २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे, २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. उत्तमसिंग चव्हाण, सचिव.
(३) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(५) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.
(६) श्री. सो.न.सानप, अवर सचिव.
(७) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.
(८) श्री. रविंद्र म.मेस्त्री, कक्ष अधिकारी

लोकलेखा समिती

२०१२-२०१३

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.
(५) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
(६) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.
क-(७) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. (दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)
(७अ) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स. (दिनांक ११ जुलै, २०१३ रोजीपासून)
(८) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.
ख-(९) श्री. संजय सावकारे, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)
ग-(१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)
घ-(११) श्री. ए.टी.पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)
११अ) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजीपासून ते दिनांक २२ मार्च, २०१४ पर्यंत)
(१२) श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
(१३) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
(१४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(१५) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
च-(१६) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. (दिनांक २३ मे, २०१४ रोजीपर्यंत)
(१७) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(१८) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१९) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(२०) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
छ(२१) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स. (दिनांक २४ एप्रिल, २०१४ रोजीपर्यंत)
(२१अ श्री. संजय दत्त, वि.प.स. (दिनांक १४ जुलै, २०१४ रोजीपासून)
ज-(२२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स. (दिनांक १२ मार्च, २०१४ रोजीपर्यंत)
(२२अ) प्रा.जनार्दन चांदूरकर, वि.प.स. (दिनांक १४ जुलै, २०१४ रोजीपासून)
(२३) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
झ-(२४) श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. (दिनांक ६ फेब्रुवारी, २०१४ रोजीपर्यंत)
(२४अ) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. (दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४ रोजीपासून)
ट- (२) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. (दिनांक २४ एप्रिल, २०१४ रोजीपर्यंत)
(२६) **निमंत्रित**
ठ-(२६) श्री. दिवाकर रावते, वि.प.स. (दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजीपर्यंत)
(२६अ) श्री. विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून ते २७ मे, २०१४ रोजीपर्यंत)
ड-(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स. (दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजीपर्यंत)
(२७अ) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. (दिनांक १४ जुलै, २०१४ रोजीपासून)

सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. उ.की.चव्हाण, अतिरिक्त सचिव.

(३) श्री. सु.सा.गायकवाड,वित्तीय सल्लागार.

(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(५) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

(६) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती).

(७) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

(८) श्री. कैलास पाझारे, कक्ष अधिकारी.

(क) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजी निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. राहुल बोंद्रे , वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ११ जुलै, २०१३ रोजी नामनियुक्ती केली आहे.

(ख) श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.

(ग) श्री. दिलीप सोपल, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.

(घ) श्री. ए.टी.पवार, वि.स.स. यांचे जागी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजी नामनियुक्ती केली व दिनांक २२ मार्च, २०१४ रोजी आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने सदर जागा रिक्त आहे.

(च) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. हे लोकसभा सदस्य म्हणून निवडून आल्याने त्यांनी दिनांक २३ मे, २०१४ रोजी आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने सदर जागा रिक्त आहे.

(छ) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स. यांची दिनांक २४ एप्रिल, २०१४ रोजीपासून सदस्यत्वाची मुदत संपल्याने सदर जागा रिक्त आहे.

(ज) श्री. सुरेश नवले, वि.प.स. यांची दिनांक १२ मार्च, २०१४ रोजीपासून सदस्यत्वाची मुदत संपल्याने सदर जागा रिक्त आहे.

(झ) श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ६ फेब्रुवारी, २०१४ रोजी नामनियुक्ती केली.

(ट) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांची दिनांक २४ एप्रिल, २०१४ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने सदर जागा रिक्त आहे.

(ठ) श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री. विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ नामनियुक्ती केली व श्री. विनायक राऊत, वि.प.स. हे लोकसभा सदस्य म्हणून निवडून आल्याने त्यांनी दिनांक २७ मे, २०१४ रोजी आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

(ड) श्री. मनिष जैन, वि.प.स. यांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने सदर जागा रिक्त आहे.

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या विनियोजन लेख्यांवरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी लोकलेखा समितीचा सातवा अहवाल सादर करीत आहे.

समितीने सन २००९-२०१० या वर्षाच्या महाराष्ट्र शासनाच्या विनियोजन लेख्यांमध्ये नमूद केलला इतर बाबींवरील खर्चाच्या नियंत्रणाबाबत विचार केला असून त्यानुसार समितीचा हा सातवा अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात येत आहे.

समितीने दिनांक ८,९,१५,२२ ऑक्टोबर, २०१३, दिनांक २२ जानेवारी, २०१४, दिनांक २५ जून, २०१४ रोजी अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, प्रधान सचिव, गृह (परिवहन), महसूल व वन (मदत व पुर्नवसन), जलसंपदा, ग्रामविकास व जलसंधारण, ऊर्जा, सार्वजनिक आरोग्य, गृहनिर्माण, नियोजन तसेच सचिव, सार्वजनिक बांधकाम, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, सहकार विभाग यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेतली तसेच दिनांक २१ व २२ नोव्हेंबर, २०१३ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय (कौन्सिल हॉल) पुणे येथे सचिव, सामाजिक न्याय यांची साक्ष घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीच्या उप समिती (१) ने दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी प्रारुप अहवाल तयार करून विचारात घेतला.

समितीने दिनांक ३१ मार्च २०१६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर
दिनांक : ३१ मार्च, २०१६.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ. क्र.	विभाग व तपशील				पृष्ठ क्रमांक
(१)	(२)				(३)
(१)	अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे-अतिरिक्त खर्च सन २००९-२०१०		..	..	१
(२)	सामान्य प्रशासन विभाग	..	..	..	४
(३)	गृह (परिवहन) विभाग	..	..	..	१३
(४)	महसूल व वन (मदत व पुर्नवसन) विभाग	..	..	..	२७
(५)	सार्वजनिक प्रांधकाम विभाग	..	..	..	४८
(६)	जलसंपदा विभाग	..	..	..	६६
(७)	उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग	..	..	..	१३२
(८)	ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग	..	..	..	.....
(९)	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	..	..	..	१५२
(१०)	नियोजन विभाग	..	..	..	२७६
(११)	गृहनिर्माण विभाग	..	..	..	२८६
(१२)	सार्वजनिक आरोग्य विभाग	..	..	..	३०५
(१३)	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग	..	..	..	३२८
(१४)	सहकार विभाग	..	..	..	३५६

अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे
सन २००९-२०१०

या अहवालामध्ये समितीने इतरत्र व्यक्त केलेल्या अभिप्रायास अधीन राहून खाली दर्शविण्यात आलेला जादा खर्च नियमानुकूल करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्यात यावेत.

खालील प्रकरणामध्ये दत्तमत वा भारित अनुदान/ विनियोजनाच्या रक्कमेपेक्षा महसूली / भांडवली लेख्यावरील खर्चाची रक्कम अधिक असल्याचे सन २००९-२०१० च्या लेख्यावरुन दिसून येते.:-

(रूपये हजारात)

अ.क्र.	अनुदान/विनियोजनाचे नांव	एकूण अनुदान/ विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (दत्तमत)	एकूण अनुदान /विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (भारित)
(१)	(२)	(३)	(४)
	ए-महसूल लेख्यांवरील खर्च	(रुपये)	(रुपये)
	गृह विभाग		
१.	बी-१ पोलीस प्रशासन	७७,३०,७९	
	महसूल व वन विभाग		
२.	सी-२ मुद्रांक व नोंदणी	१०,६९,७८	
३.	सी-५ इतर सामाजिक सेवा	१,३१,४५	
४.	सी-६ नैसर्गिक आपत्ती		१,८१,७७,६५
	सार्वजनिक बांधकाम विभाग		
५.	एच-३ गृहनिर्माण	६८,२२,८९	
६.	एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारती		१,२०,९०
	जलसंपदा विभाग		
७.	आय-४सेक्रेटरिएट -आर्थिक सेवा	४५,२९	
	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग		
८.	के-५ सामाजिकसुरक्षा व कल्याण	२८,९४	
९.	के-६ ऊर्जा	१,००,२३,४२	
	ग्रामविकास व जलसंधारण विभाग		
१०.	एल-१ व्याज प्रदान		३६,३९,७२
	नियोजन विभाग		
११.	ओ-३ ग्रामीण रोजगार		३,१४
१२.	ओ-१६ जिल्हा योजना, रत्नागिरी	१,२५,१८	
१३.	ओ-१७ जिल्हा योजना, रायगड	४,२४	
१४.	ओ-२२ जिल्हा योजना, सोलापुर	४,९०,०५	
१५.	ओ-२४ जिल्हा योजना, नाशिक	३,५१,८८	

१६.	ओ-२५ जिल्हा योजना, धुळे	१,५५,९६	
१७.	ओ-२६ जिल्हा योजना, जळगाव	१,३६,९४	
१८.	ओ-३४ जिल्हा योजना, लातूर	९०,८०	
१९.	ओ-४४ जिल्हा योजना अकोला	२,८१,००	
	पर्यावरण विभाग		
२०.	यू-१ व्याज प्रदान		८३,१८
	महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय		
२१.	झेडसी-२ सामाजिकसुरक्षा व कल्याण	-	-
	एकूण (ए) महसूल लेख्यावरील खर्च	**२,७४,८८,६१**	**२,२०,२४,५९**
	बी- भांडवली लेख्यावरील खर्च		
	कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग व मत्स्यव्यवसाय विभाग		
१.	डी-८ कृषिविषयक सेवांवरील भांडवली खर्च	१८	
	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग		
२.	के-११ए राज्य कर्मचारी इत्यादीं नाकर्जे		१,०१,८५,९३
	अन्न नागरी पुरवठा व ग्राहकसंरक्षण विभाग		
३.	एम-४ अन्नावरील भांडवली खर्च	-	
	नियोजन विभाग		
४.	ओ-१३ जिल्हा योजना, मुंबई शहर	४८,२२	
५.	ओ-१४ जिल्हा योजना, मुंबई उपनगर	३,२६,०८	
६.	ओ-१५ जिल्हा योजना, ठाणे	५२,७४	
७.	ओ-१८ जिल्हा योजना, सिंधुदूर्ग	१,७५,२८	
८.	ओ-१९ जिल्हा योजना, पुणे	४,१३,७१	
९.	ओ-२१जिल्हा योजना, सांगली	१,७६,०१	
१०.	ओ-२२ जिल्हा योजना, सोलापूर	१,४२,४७	
११.	ओ-२३ जिल्हा योजना, कोल्हापुर	३९,४८	
१२.	ओ-२६ जिल्हा योजना, जळगाव	७३,४६	
१३.	ओ-२८ जिल्हा योजना, नंदुरबार	८,१६	
१४.	ओ-२९ जिल्हा योजना, औरंगाबाद	१,५०,३७	
१५.	ओ-३० जिल्हा योजना, जालना	२,०४,६७	
१६.	ओ-३१ जिल्हा योजना, परभणी	२,६३,९१	
१७.	ओ-३२ जिल्हा योजना, नांदेड	६,७५,८३	
१८.	ओ-३३ जिल्हा योजना, बीड	८,७४,९३	
१९.	ओ-३४ जिल्हा योजना, लातुर	६६,४१	
२०.	ओ-३५ जिल्हा योजना, उस्मानाबाद	६,१५,३४	
२१.	ओ-३६ जिल्हा योजना, हिंगोली	८१,२८	

२२.	ओ-३८ जिल्हा योजना, वर्धा	८७,७२	
२३.	ओ-३९ जिल्हा योजना, भंडारा	१५,३४	
२४.	ओ-४० जिल्हा योजना, चंद्रपूर	१,२६,६७	
२५.	ओ-४१ जिल्हा योजना, गडचिरोली	१२,२१	
२६.	ओ-४२ जिल्हा योजना, गोंदिया	२,२४,३५	
२७.	ओ-४३ जिल्हा योजना, अमरावती	६३,०१	
२८.	ओ-४५ जिल्हा योजना, यवतमाळ	२९,३३	
२९.	ओ-४६ जिल्हा योजना, बुलढाणा	८३,६०	
३०.	ओ-४७ जिल्हा योजना, वाशिम	१,१८,२१	
	एकूण(बी) महसूल लेख्यांवरील खर्च	**५१,४८,९७**	**१,०१,८५,९३**
	एकूण (ए) + (बी)	**३,२६,३७,५८**	**३,२२, १०,५२**

तळटीप : - समितीने जेव्हा जादा खर्च नियमानुकूल करण्याविषयी शिफारस केलेली असते, अशा वेळी समितीने यापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार (सन १९५३-५४ च्या विनियोजन लेख्यावरील अहवालांचा परिच्छेद १० पहा.) ज्यामुळे कोणताही जादा खर्च नियमानुकूल करणे आवश्यक ठरते किंवा टाळता येते अशा प्रकारचे लेख्यांवरील कोणतेही प्रस्थापित गैरवर्गीकरण हिशेबात घेणे आवश्यक आहे. म्हणून अशा प्रकारे गैरवर्गीकरणाच्या रकमा हिशेबात घेऊनच वर दर्शविण्यात आलेल्या रकमा काढण्यात आलेल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभाग

१.१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्रमांक ए-७ '**नागरी विमानचालन** ' या मधील प्रधान शीर्ष ३०५३ "नागरी विमानचालन" शीर्षाअंतर्गत बचत व आर्थिक खर्च झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्रमांक ए-७-नागरी विमानचालन

(रुपये लाखांत)

प्रधान शीर्ष व योजना	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
३०५३- नागरी विमानचालन **दत्तमत-** मुळ ३०,९४,२० पुनर्विनियोजन २,३२,९१,०१ वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१०) **टिपा व भाष्ये :-** अनुदानातील बचत खालील शीर्षाखाली झाली :-	२,६३,८५,२१	२,०९,२७,०१	(-) ५४,५८,२० ५४,५८,२०
प्रधान शीर्ष व योजना	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०२ विमानतळे **१०२ छोटे विमानतळ** **१०२ (००) (०१) विमानतळांचा /धावपट्टयांचा विकास** मुळ ..... ५,००.०० पुनर्विनियोजन ..... (-) ३,००.००	२,००.००	२,००.००	----

वित्त विभागाने मान्य केलेल्या सुधारित अंदाजानुसार (२०० लाख) आणि योजनेखाली कमी खर्च झाल्याने (१०० लाख), यामुळे ३०० लाखांची अपेक्षित बचत परत करण्यात आली, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१०)

टीपा व भाष्ये :-

१.२ वित्त विभागाने मान्य केलेल्या सुधारित अंदाजानुसार (रु.२०० लाख) आणि योजनेखाली कमी खर्च झाल्याने (रु.१०० लाख) यामुळे रु.३०० लाखांची अपेक्षित बचत करण्यात आली. त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :

१.३. महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

रु.५००.०० लाख इतका निधी या लेखाशीर्षाखाली सन २००९-२०१० या वर्षाकरिता अर्थसंकल्पित होता. सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे रु.४००.०० लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. त्यामुळे रु.१००.०० लाख इतका निधी शासन ज्ञापन सामान्य प्रशासन विभाग क्र. आरईएस १०१०/प्र.क्र.९३/२०१०/२५, दिनांक ३०/१०/२०१० अन्वये समर्पित करण्यात आला. तद्नंतर एकूण उर्वरित निधीपैकी रु.२००.०० लाख खर्ची पडले व उर्वरित रु.२००.०० लाख इतका निधी शासन ज्ञापन सामान्य प्रशासन विभाग क्र. आरईएस १०१०/प्र.क्र.९३/२०१०/२५, दिनांक ३१/१०/२०१० अन्वये समर्पित करण्यात आला. अशा रीतीने एकूण रु.३००.०० लाख समर्पित करण्यात आले.

दिनांक २१.६.२०१२ रोजीच्या मंत्रालयीन आग दुर्घटनेत विषयांकित नस्ती नष्ट झाल्यामुळे निधी समर्पित करण्याची नेमकी कारणे आज रोजी सांगता येणार नाहीत. तथापि, विमानतळांच्या दुरुस्तीची व धावपट्टीच्या दुरुस्त्यांची कामे अपेक्षेपेक्षा कमी झाली असल्याने निधी समर्पित करावा लागला असण्याची शक्यता आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
३०५३- नागरी विमानचालन **०२ विमानतळे** **१९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य** **१०२ (००) (०२) विमानतळाच्या विकासाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीतस सहायक अनुदान.**				
मुळ	२५,००.००	२,०६,३२.८१	२,०६,३२.८१	----
पूरक	२,३२,९१.०१			
पुनर्विनियोजन	(-)५१,५८.२०			

टीपा व भाष्ये :-

वित्त विभागाने मान्य केलेल्या सुधारित अंदाजाच्या आधारे रु.५१५८.२० लाखांची अपेक्षित बचत करण्यात आली.

ज्ञापन :

१.४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखाली सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता रु.२,०६,३२.८१ लाख इतका निधी मंजूर करण्यात आला असून हा निधी संपूर्णत: खर्च करण्यात आला आहे.

साक्ष :

१.५ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. सदर बैठकीत राज्यात एकूण किती छोटे व मोठे विमानतळ आहेत व ते कोठे आहेत याबाबत माहिती विषद करताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, राज्यात एकूण २२ विमानतळ आहेत. त्याठिकाणी धावपट्टी असून तिथे विमान उड्डाण आणि लँन्डीग करु शकतो. याशिवाय चार नवीन ग्रीनफिल्ड विमानतळ प्रस्तावित आहेत. नवी मुंबई येथील विमानतळ सिडको उभारणार आहे. सिंधुदुर्ग येथील विमानतळ एम.आय.डी.सी.उभारणार आहे. शिर्डी येथील विमानतळाचे काम सुरु आहे. ते विमानतळ एम.ए.डी.सी.करणार आहे. खेड येथे एस.ई.झेड ची जागा निवडलेली आहे. चाकण येथील विमानतळासाठी बागायती जमीन जात असल्यामुळे तेथे विरोध आहे. त्या संदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री यांनी बैठक घेतली होती. चाकण येथील विमानतळासाठी एस.ई.झेड आणि शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्याचे निश्चित केलेले असून त्यासाठी एकूण १२६० हेक्टर जागेची आवश्यकता आहे. याकरिता एस.ई.झेड खालील निम्मी जमिन आणि शेतकऱ्यांकडून निम्मी जमिन घेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांची पडीक जमिन घेण्यात येणार आहे. सहा विभागीय भागात विमानतळ आहेत. त्या ठिकाणी बोंईग व एअर बस यासारखी मोठी विमाने उतरु शकतात. मुंबई, औरंगाबाद, नागपूर आणि पुणे या ठिकाणी नाईट लँन्डीगची सुविधा आहे. अमरावती येथे नाईट लॅन्डींगची सुविधा नाही. गोंदिया आणि नांदेड या ठिकाणी नाईट लँन्डीग सुविधा आहे.

१.६ कोल्हापूर आणि सोलापूर येथे दोन विमानतळ होणार आहेत. कोल्हापूर येथील विमानतळ एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाकडे हस्तांतरीत केलेला आहे आणि ते पुढील विकास करणार आहेत. त्यासाठी त्यांना २२३.०० हेक्टर जमीन संपादित करुन दिलेली आहे. आता ही धावपट्टी २५०० मीटर करणार असून तेथे नाईट लॅन्डींगची सुविधा तसेच मोठी विमाने उतरु शकतील असे अद्ययावत विमानतळ करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी फायर फायटींगची सुविधा असणार आहे. तसेच नवीन टर्मिनल बिल्डींग उभारणार आहोत.

१.७ सोलापूर येथील विमानतळासाठी ५५० हेक्टर जमीन संपादित केलेली आहे जुने विमानतळ हे शहरामध्ये असल्यामुळे त्याचा विस्तार करता येत नाही, त्याऐवजी बोरामणी गाव येथे जमिन संपादित केलेली आहे. जुनी विमानतळाची जमिन विकून नवीन विमानतळ करायचे आहे. जमिन संपादित केली असून त्यासाठी ७०-७५ कोटी रुपये खर्च केले आहेत. एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाचा ५१ टक्के शेअर तर

एम.ए.डी.सी.चे ४९ टक्के शेअर आहे. एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाचे शेअर कॅपिटल १२५ कोटी रुपये ठरले आहे. त्या ठिकाणी धावपट्टी आणि एअरपोर्ट करण्यात येणार आहे. सदरहू विमानतळ विकसित करण्यासाठी एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाला ऑगस्ट २०१३ पासून पुढील तीन वर्षाची कालमर्यादा दिलेली आहे. तसेच अमरावती येथे २८० हेक्टर जमिन संपादित केलेली आहे. जुनी धावपट्टी १४०० मीटर आहे.

१.८ परंतु अमरावती येथील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिन संपादनाचे पैसे मिळाले नसल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, काही शेतकऱ्यांच्या जमिनीचे पैसे द्यायचे आहेत त्यांसदर्भात बैठक देखील घेतली होती. १२ हेक्टर जमिनीचा मोबदला दिलेला नाही. उर्वरीत संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला दिलेला आहे. बडनेरा-अकोला या मार्गावरील ही जागा आहे. यवतमाळकडे जाणारा रोड डायव्हर्ट करावयाचा आहे. त्यासाठी होणारा बांधकाम खर्च आणि जमिनीचा मोबदला शासनाच्या माध्यमातून अदा करण्यात येणार आहे.

१.९ अकोला येथील विमानतळ एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या ताब्यात असून तेथील विमानतळाची धावपट्टी १४०० मीटर आहे. ही धावपट्टी वाढविण्याचा विचार आहे. कृषी विद्यापीठाचा जमिन देण्यास विरोध आहे. विमानतळाच्या एका बाजूला महामार्ग असल्यामुळे तेथे विस्तार करु शकत नाही. दुसऱ्या बाजूला विद्यापीठ आहे आणि विद्यापीठ जमिन देण्यास विरोध करीत आहे. त्या स्थळाची पाहणी विभागाने केली आहे. तेथे दोन बिल्डींग्ज आहेत एक ४ हजार स्वे.फूटाची लॅब आहे तर ५००-६०० स्वे.फुटाचे गोडावून आहे. विभागास ३२ हेक्टर खाजगी जमिन घ्यावयाची आहे तर ६१ हेक्टर जमिन विद्यापीठाची घ्यावयाची आहे. कृषी विद्यापीठाचा जमिन देण्यास विरोध आहे. कृषी विद्यापीठ जमीन देत नसेल तर शासनाने अधिकार वापरुन कार्यवाही करावी अशी सूचना सामान्य प्रशासन विभागाने केली असून त्यासंदर्भातील नस्ती कृषी विभागाला पाठविण्यात आली असून त्यांनी ती नस्ती मान्य केलेली आहे. त्या ठिकाणी असलेल्या सरोवराचे आणि जमिनीचे मूल्यांकन करुन मोबदला द्यावा असे सूचविण्यात आले असून शासन मान्य झाले आहे. यानंतर आवश्यक ती औपचारिकता पूर्ण करण्यात येईल.

१.१० मागील तीन वर्षात विमानतळाच्या विकासासाठी किती तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी किती रक्कम खर्च झाली ? याबाबतची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००९-२०१० या वर्षी २०६ कोटी रुपयांची तरतूद होती. ही सर्व रक्कम खर्च झालेली आहे. सन २०१०-२०११ मध्ये ७६ कोटी रुपयांची तरतूद होती. जमीन संपादनासाठी तरतूद करण्यात आली होती. अमरावती येथे मोठ्या प्रमाणावर जमीन भूसंपादीत करण्यात आली होती त्याचे पैसे द्यायचे होते यासाठी ही मागणी केली होती.

१.११ सन २००९-२०१० मध्ये २०६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आणि ती रक्कम खर्च करण्यात आली. मग विभागाने अन्य विमानतळाच्या विकासासाठी तरतूद का मागितली नाही ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जळगांव, शिर्डी, वेलोरा, राजगुरु नगर, बोरामणी, मिहान या विमानतळासाठी २०६ कोटी खर्च केले. त्यापैकी देखभालीसाठी २ कोटी रुपये दिले. पुर्नवसन आणि जमीन संपादनासाठी निधीची मागणी करण्यात येत आहे. जोपर्यंत धावपट्टीचे काम सुरु करीत नाही तोपर्यंत पैसा खर्च करता येत नाही. तसेच पुनर्वसनासाठी आणि जमीन संपादनासाठी निधी लागतो. जळगाव विमानतळाचे काम पूर्ण झालेले आहे. शिर्डी विमानतळाचे काम सुरु आहे. याकरिता एमएमडीसीला मेन्टेनन्ससाठी धावपट्टीसाठी अनुदान देण्यात येते.

१.१२ मास्टर प्लान कार्यक्रम किती वर्षाचा आहे याबाबत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, विभागाने यासंदर्भात पाच वर्षाच्या कामाचे नियोजन केलेले आहे. प्रत्येक डिव्हीजन लेव्हलवर नाईट लॅन्डीग फॅसिलिटी व तेथे मोठे विमान उतरु शकतील या दृष्टीकोनातून कार्यक्रम आहे. नाशिक येथे विमानतळ आहे. त्या ठिकाणी मोठे विमान उतरु शकते शासनाचे धोरण आहे की, ज्या जिल्ह्यामध्ये धावपट्टी नाही त्या ठिकाणी धावपट्टी करायची आहे. जसे की, नंदूरबार, बीड, परभणी, गडचिरोली, बुलढाणा, औरंगाबाद, चंद्रपूर येथे जुने विमानतळ आहे. परंतु त्याचे विस्तारीकरण होऊ शकत नाही. तेथील धावपट्टी १४०० मीटर आहे. तेथे लहान विमाने उतरु शकतात. शिर्डी येथील विमानतळाचे काम सुरु आहे. हे विमानतळ पूर्ण झाल्यावर अहमदनगरचा भाग कव्हर करता येईल. रत्नागिरी येथे विमानतळ असून तेथे डोनिअरचे २२ सीटर विमान उतरु शकते. हे विमानतळ कोस्ट गार्ड ऑफ इंडियाचे आहे.

१.१३ एकूण विमानतळांच्या संदर्भात मास्टर प्लान काय आहे ? टाईम बाऊन्ड कार्यक्रम काय आहे ? मागील तीन वर्षात यावर किती निधी खर्च झाला ? याची देखील माहिती समितीला द्यावी. व काही जिल्ह्यांचे कम्युनिकेशन होत नाही. त्या संदर्भात काय कार्यवाही केली आहे याबाबतची लेखी माहिती समितीस सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले. तथापि विभागाकडून माहिती अद्याप अप्राप्त आहे.

१.१४ सन २०११-२०१२ मध्ये किती तरतूद केली आहे व आतापर्यंत किती निधी खर्च झाला अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सन २०११-२०१२ मध्ये १८१.५३ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सन २०१२-२०१३ मध्ये ४०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आतापर्यंत २०० कोटी रुपये दिलेले आहेत. मिहानसाठी १०० कोटी रुपये दिले आहेत. मिळालेला निधी हा या वर्षात खर्च करण्यात येणार आहे.

१.१५ सर्व जिल्ह्यांमध्ये विमानतळ नाही. एखाद्या जिल्ह्यांमध्ये आपदग्रस्त परिस्थिती निर्माण झाली तर त्या ठिकाणी तातडीने जाणार कसे ? उदाहरण द्यायचे झाल्यास रत्नागिरी येथे विमानतळ आहे. रत्नागिरी ते मंडणगड, दापोली आणि खेड हे अंतर २५० ते ३०० आहे. जर मंडणगड, दापोली, खेड या भागात एखादी आपदग्रस्त परिस्थिती निर्माण झाली तर आपण तेथे तातडीने कसे पोहोचणार ? याबाबत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, तेथे हेलिपोर्ट करण्यात येणार आहेत. जे जिल्हे विमानतळापासून दूर आहेत त्या जिल्ह्यांच्या ठिकाणी हेलिपोर्ट केल्यास तीन हेलिकॉप्टर्स उतरु शकतील. त्या ठिकाणी नाईट लॅन्डींगची सुविधा करणार असून जमीन संपादनाचा प्रश्न आहे तसेच दोन विमानतळांमधील अंतर ११०-१२० कि.मी.पेक्षा जास्त असले पाहीजे.

१.१६ लोटे-परशुराम येथे एम.आय.डी.सी.साठी मोठ्या प्रमाणावर जमीन संपादित केलेली आहे. त्यातील हजारो हेक्टर जमीन पडून आहे. रत्नागिरीपासून मंडणगड २०० कि.मी. वर आहे. महाड २०० कि.मी. वर आहे ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता हेलिपोर्ट रायगड किंवा महाड येथे करता येईल परंतु जागेची अडचण आहे. जागा उपलब्ध होत असेल तर प्रयत्न करता करुन मंडणगड, महाड या ठिकाणी हेलिपोर्ट करता येईल. यासंदर्भात एम.आय.डी.सी.बरोबर चर्चा करावी लागेल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

१.१७ शासनाने एम.आय.डी.सी.साठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. त्यावर कारखाने उभे राहिले. आता कारखानदार जमिनी विकून जात आहेत. परंतु त्या जमिनी ताब्यात घेण्याची तरतूद नाही. कारखानदारांनी अत्यंत कमी दरात जमीनी घेतल्या आणि आता त्या करोडो रुपयांना विकत आहेत आणि आता शासनाला योजना राबविण्यासाठी जमीन उपलब्ध होत नाही अशी परिस्थिती आहे. अशी खंत समितीने व्यक्त केली व विचारणा केली की, या जमिनी आता शासन ताब्यात घेऊ शकतात काय ? यावर माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्वप्रथम अशा जागेचा सर्व्हे करावा लागतो. विमान कोणत्या बाजूने उड्डाण करणार आहे, कोणत्या बाजूने लॅन्डीग करणार आहे या सर्व गोष्टी पहाव्या लागतात.

१.१८ मध्य प्रदेश, बिहार, राजस्थान, गुजरात या मोठ्या राज्यांमध्ये विमान प्रवासी, विमानांची संख्या आणि टर्न ओव्हर किती आहे इत्यादी बाबींचा अभ्यास केला काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जर धावपट्टीचा अभ्यास केला तर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात धावपट्टया जास्त आहेत. आता राज्यात एव्हीएशन पॉलिसी आणणार आहे. समितीने आता बैठकीत जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याचा पॉलिसीमध्ये विचार करता येईल. सध्या शासनाकडे एक विमान आणि एक हेलिकॉप्टर चालू

स्थितीतच आहे. तर एक जुने विमान आणि एक हेलिकॉप्टर आहे. ही विमाने अपग्रेड करायची की विकायची याबाबत शासनाने निर्णय घेतलेला नाही.

१.१९ जर धावपट्टी विकसित करुन दिल्या तर कमर्शियल पोटेन्शियल वाढेल. पूर्वी कोल्हापूरला विमान सेवा सुरु होती परंतु नंतर ही सेवा बंद पडली. आजच्या घडीला कोल्हापूर-मुंबई हवाई प्रवास करावयाचा झाल्यास कराड किंवा बेळगांवला जावे लागते. पश्चिम महाराष्ट्रात पुणे वगळता सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर इत्यादी ठिकाणी जाण्याची तातडी उद्‌भवल्यास विमान सेवा उपलब्ध नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, कोल्हापूर व सोलापूरच्या धावपट्टयांची कामे सुरु आहेत. कोल्हापूर येथील विमानतळाचा विकास करण्याचे काम एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाला दिले आहे. त्या कामासाठी तीन वर्षाची मुदत दिली आहे. सध्या तेथील धावपट्टीची लांबी १४०० मीटर आहे. लहान विमान त्या विमानतळावर उतरु शकते.

१.२० आजच्या घडीला विमान कंपन्यांमध्ये स्पर्धा सुरु आहे. लोकांना पैसा नव्हे तर वेळ महत्वाचा आहे. पैसे गेले तरी चालतील परंतु वेळ वाचला पाहिजे ही लोकांची भूमिका आहे. विमान कंपन्यांचे पॅकेज लोकांनी जास्त प्रमाणात वापरले तर प्रवाशांना ते इकॉनॉमिकली व्हायबल आहे. काही विमान कंपन्याचे तिकीट दर रेल्वेच्या तिकिट दराइतकेच असतात. लोकांना जलद सुविधा हव्या असतात. या सर्व बाबींचा विचार करुन शासनाने काही अभ्यास केला आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, अशा प्रकारच्या अभ्यास केला नाही. परंतु ज्या कंपन्यांची १० ते ३२ सीटर विमाने आहेत त्या कंपन्यांनी या बाबतचा अभ्यास केला आहे व राज्य शासन या संदर्भातील धोरण आखत आहे. त्यामध्ये समितीच्या सूचनांचा जरुर विचार करण्यात येईल असे समितीस आश्वासित करण्यात आले.

१.२१ एकाउंट का रिकंसीलिएशन हर साल होना चाहिए. सामान्य प्रशासन विभाग के १९४ यूटिलाईजेशन सर्टिफिकेट एवं ४५८ एसी बिल प्रलंबित है. आपको इन्हे तुरन्त क्लियर करवाना चाहीए. ही बाब प्रधान महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता समितीने विभागास सांगितले की, महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या विनियोजन लेख्यांचे खर्चमेळाचे काम करण्यासाठी विभागाने प्राधान्य दिले पाहिजे. सामान्य प्रशासन विभागाचे २००९-१०, २०१०-११, २०११-१२ या वर्षातील एकूण २३ विनियोजन लेख्यांचे खर्चमेळाचे काम प्रलंबित आहे. अद्यापपर्यंत विभागाने खर्चमेळाचे काम केलेले नाही. यावर विभागाकडे प्रलंबित असलेल्या २३ लेख्यांचे खर्चमेळाचे काम करण्यात येईल. असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले असता विभागाने अंतर्गत बैठका घेऊन विनियोजन लेखे निकाली काढावेत तसेच महालेखाकार यांच्याशी समन्वय

साधून ते निकाली काढण्याच्या कामामध्ये जास्तीत जास्त लक्ष विभागीय सचिवांनी घालावे अशी सूचना समितीने विभागास केली.

१.२२ प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी किमान एक हेलिपोर्ट झाले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, विमानतळाच्या बाबतीत एमएडीसी ही मुख्य यंत्रणा आहे.

१.२३ नक्षली भागात टेहळणी करण्यासाठी गृह विभाग विमान खरेदी करणार होते. त्यानुसार कार्यवाही झाली आहे काय यासंदर्भात विभागीय सचिवांनी "नाही" असे उत्तर दिले तथापि, गृह विभागाने टेहळणीसाठी पवनहंस कंपनीकडून हेलीकॉप्टर भाड्याने घेतले आहे ते गोंदियाला आहे. सामान्य प्रशासन विभागाने गृह विभागाला ऑफर दिली होती की, त्यांनी विभागाकडे असलेले जुने हेलीकॉप्टर अपग्रेड करुन वापरावे. कारण सामान्य प्रशासन विभागाकडे उपलब्ध असलेले हेलीकॉप्टर केवळ २५००-३००० तास वापरले होते. मुळात त्याची क्षमता १० हजार तासांची होती. त्यामुळे जुने हेलीकॉप्टर गृह विभागाने वापरावे यासाठी सामान्य प्रशासन विभागाने प्रयत्न केला. परंतु गृह विभागाने सामान्य प्रशासन विभागाने दिलेली ऑफर नाकारली. तसेच दुसरी बाब अशी की, नवीन सिक्युरिटी नॉर्म्सनुसार ज्या विमानांमधून व्हीआयपी प्रवास करणार आहेत अशा विमानांमध्ये सेफ्टी इक्युपमेंट असणे आवश्यक आहे. सामान्य प्रशासन विभागाकडे असलेले विमान १० वर्षे जुने होते. नवीन विमान २०१०-११ मध्ये खरेदी केले आहे. आंध्र प्रदेश राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे हवाई दुर्घटनेत निधन झाल्यानंतर सिक्युरिटी निकष निश्चित करण्यात आले. त्यानंतर सिक्युरिटी निकषांनुसार नवीन विमान खरेदी केले. ६ ते ८ सीटर नवीन विमानांची किंमत ५० कोटी रुपये आहे.

समितीचे अभिप्राय :-

१.२४ राज्यात एकूण २२ विमानतळ आहेत. त्या ठिकाणी धावपट्टी असून तिथे विमान उड्डाण आणि लॅन्डींग करु शकते. याशिवाय चार नवीन ग्रीनफिल्ड विमानतळ प्रस्तावित आहेत. नवी मुंबई येथील विमानतळ सिडको करित असून सिंधुदुर्ग येथील विमानतळ एम.आय.डी.सी.उभारणार आहे. शिर्डी येथील विमानतळाचे काम सुरु आहे. ते विमानतळ एम.ए.डी.सी.करणार आहे. खेड येथे एस.ई.झेड ची जागा निवडलेली आहे. चाकण येथील विमानतळासाठी बागायती जमीन जात असल्यामुळे तेथे विरोध आहे. सहा विभागीय भागात विमानतळ आहेत त्या ठिकाणी बोंईग व एअर बस यासारखी मोठी विमाने उतरु शकतात. मुंबई, औरंगाबाद, नागपूर आणि पुणे या ठिकाणी नाईट लँन्डीगची सुविधा आहे. अमरावती येथे नाईट लॅन्डींगची सुविधा नाही. गोंदिया आणि नांदेड या ठिकाणी नाईट लँन्डीग सुविधा आहे. कोल्हापूर आणि सोलापूर येथे दोन विमानतळ होणार आहेत. कोल्हापूर येथील विमानतळ एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाकडे हॅन्ड ओव्हर केलेले आहे आणि ते पुढील विकास करणार आहेत. त्यासाठी त्यांना २२३.०० हेक्टर जमीन संपादित करुन दिलेली आहे. आता ही

धावपट्टी २५०० मीटर करणार असून तेथे नाईट लॅन्डींगची सुविधा तसेच मोठी विमाने उतरु शकतील असे अद्ययावत विमानतळ करण्यात येणार आहे. सोलापूर येथील विमानतळासाठी ५५० हेक्टर जमीन संपादित केलेली आहे. बोरामणी गाव येथे जमीन संपादित केलेली आहे. जुनी विमानतळाची जमिन विकून नवीन विमानतळ करायचे आहे. अमरावती येथील वमानतळाकरिता बडनेरा-अकोला मार्गावर जागा आहे. अकोला येथील विमानतळ एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या ताब्यात असून तेथील विमानतळाची धावपट्टी १४०० मीटर आहे. व ही धावपट्टी वाढविण्याचा विचार आहे. जळगाव विमानतळाचे काम पूर्ण झालेले आहे. नंदूरबार, बीड, परभणी, गडचिरोली, बुलढाणा, औरंगाबाद, चंद्रपूर येथे जुने विमानतळ आहे परंतु त्याचे विस्तारीकरण होऊ शकत नाही. तेथील धावपट्टी १४०० मीटर आहे. तेथे लहान विमाने उतरु शकतात. शिर्डी येथील विमानतळाचे काम सुरु असून हे विमानतळ पूर्ण झाल्यावर अहमदनगरचा भाग कव्हर करता येईल. रत्नागिरी येथे विमानतळ असून तेथे डोनिअरचे २२ सीटर विमान उतरु शकते हे विमानतळ कोस्ट गार्ड ऑफ इंडियाचे आहे.

समितीच्या शिफारशी :-

१.२५ शिफारस क्र. (१) राज्यातील विमानतळांच्या संदर्भात विभागाने मास्टर प्लान तयार करुन राज्यातील सर्व जिल्हे विमानसेवेने जोडण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व त्यासाठी विमानतळ निर्मितीचा एक कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात यावा तसेच महाराष्ट्र राज्याची एव्हीएशन पॉलिसी तयार करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२६ शिफारस क्र. (२) सामान्य प्रशासन विभागाने ताळमेळाचे काम दरमहा नियमित पूर्ण करणे बंधनकारक असतांनाही ही कामे करण्यात आली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. विभागाने ही कामे यापुढे तातडीने पूर्ण करावी व विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांची चौकशी करुन चौकशीत दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२७ शिफारस क्र. (३) नांदेड व गोंदिया येथे नाईट लँडींगची व्यवस्था आहे. अशा विमानतळावर प्रवाशांसाठी वाणिज्यिक विमान सेवा सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने पुढाकार घ्यावा. मराठवाडा व विदर्भाचा विकास करण्याचा ध्यास जर शासनाने घेतला आहे तर त्या दोन्ही ठिकाणी विमानसेवा देणे विमान कंपन्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसेल. तर या ठिकाणी देण्यात येणाऱ्या इंधनावर शासनाने करामध्ये सुट देण्याचा विचार करावा अशीही समितीची शिफारस आहे.

गृह (परिवहन व बंदरे) विभाग

आर्थिक सेवा

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील प्रलंबित परिच्छेद मागणी क्र.बी-७ "आर्थिक सेवा" या शीर्षाखाली बचत व अधिक झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्रमांक बी-७ आर्थिक सेवा

(रुपये हजारात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
३००१, भारतीय रेल्वे धोरण निश्चिती, संचालन, संशोधन व इतर संकिर्ण संघटना ३०५१- बंदरे व दिपगृहे दत्तमत- मूळ ९,१८,४६ पूरक २,५५,१२,७८	२,६४,३१,२४	४८,०२,४३	-२,१६,२८,८१
वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च, २०१०)			१,८३,०३,८०

टिपा व भाष्ये :-

२.२ रु. २१६२८.८१ लाखांची अंतिम बचत (विचारात घेता) वर्षभरात फक्त रु. १८३०३.८० लाखांची अपेक्षित बचत परत करण्यात आली.

२. अनुदानाखालील भरीव बचत पुढील शीर्षाखाली झाली :-

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
३००१, भारतीय रेल्वे धोरण निश्चिती, संचालन, संशोधन व संकीर्ण संघटना ८०० इतर खर्च ८००(००) (०२) रेल्वे प्रकल्पात राज्य शासनाचा सहभाग पूरक १,९६,०१.०० पुनर्विनियोजन -१,३७,७६.०० ५८,२५.००		२५,००.००	-३३,२५.००

टिपा व भाष्ये :-

नियोजन विभागाने फक्त रु. २५०० लाखांचा निधी दिल्याने, रु.१३७७६ लाखांचा निधी परत करण्यात आला.

रु. ३३२५ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१०)

२.३ ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह (परिवहन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासन निर्णय क्र. आरएलवाय-०४९/४१६/प्र.क्र.७७/ परिवहन-५ दिनांक ११/०२/२०१० अन्वये एकूण मंजूर रु.१,९६,०१ लाख मधुन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला सन २००९-१० या आर्थिक वर्षात खाडीतील गाळ काढण्यासाठी, एक ड्रेजर खरेदीसाठी रु. २०.०० कोटी व प्रवासी जेटी/शेड बांधण्यासाठी रु.१३.२५ कोटी उपलब्ध करुन देण्यात आले होते. तथापि पुर्नविनियोजनाचे आवश्यक ते आदेश काढण्यात आले नसल्यामुळे सदरची रक्कम संबंधित लेखाशिर्षास वर्ग झाली नाही. सबब रु.३३.२५ कोटीची बचत झालेली आहे.

अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली देखील झाली :-

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
३००१, भारतीय रेल्वे धोरण निश्चिती, संचालन, संशोधन व संकिर्ण संघटना ८०० इतर खर्च ८०० (००) (०१) वर्धा-नांदेड-मार्गे यवतमाळ पुसद नवीन रेल्वे मार्ग मूळ ८,३३.३३ पुनर्विनियोजन -८,३३.३३	---	---	---

टिपा व भाष्ये :-

नियोजन विभागाने निधी न दिल्याने, रु ८३३.३३ लाखांची संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद परत करण्यात आली.

ज्ञापन :-

२.४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन व बंदरे) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये "निरंक" असे नमूद केले आहे.

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
३०५१ बंदरे व दिपगृहे ०२ लहान बंदरे १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य १९० (०१) (०२) अन्वेषण, जल आलेखन सर्वेक्षण व इतर (राज्य योजना) मुळ २.६७ पूरक ५०.०० पुनर्विनियोजन -१७.६७	३५.००	३५.००	---

टिपा व भाष्ये :-

नियोजन विभागाने रु.३५ लाखांचे अनुदान दिल्याने रु. १७.६७ लाखांचा निधी परत करण्यात आला.

२.५ ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मंजूर अनुदानापैकी शासनाने रु. ३५ लाख एवढेच अनुदान वितरीत केले. मंजूर अनुदानापैकी रु.३५ लाख वजा करता, शिल्लक अनुदान रु. १७.६७ लाख, शासन निर्णय गृह विभाग क्र. आरईटी ०२०९/३०५१/२००९-१०/प्र.क्र. ९८/बीयुडी-१, दिनांक ३१.३.२०१० अन्वये प्रत्यर्पित करण्यात आले.

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
३०५१ बंदरे व दिपगृहे ०२ लहान बंदरे १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य १९० (०१) (०५) बंदरात मोठ्या प्रमाणात गाळ उपसणी (राज्य योजना) मुळ १.६७ पूरक १०,००.०० पुनर्विनियोजन -३.६१.३०	६,४०.३७	६,४०.३७	---

२.६ ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रस्तुत योजनोअंतर्गत गाळ उपसणीच्या कामाची ठिकाणे निश्चित न झाल्याने व कोकण पॅकेज अंतर्गत गाळ उपसणीसाठी जिल्हावार ड्रेजर खरेदी करण्याचे प्रस्तावित असल्याने मंजूर अनुदानापैकी रु. ६,४०,३७,०००/- एवढा खर्च वजा करता शिल्लक अनुदान रु. ३६१.३० लाख शासन निर्णय, गृह विभाग क्र. आरईटी ०२९०/ ३०५१/ २००९-१०/ प्र.क्र.९८/बीयुडी-१, दिनांक ३१.३.२०१० अन्वये प्रत्यर्पित करण्यात आले.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
३०५१ बंदरे व दिपगृहे ०२ लहान बंदरे १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य १९० (०१) (०६) नौका-समुहाची खरेदी (राज्य योजना) मुळ १६.६७ पूरक २६,००.०० पुनर्विनियोजन - ९,९६.६७	१६,२०.००	१६,२०.००	---

टिपा व भाष्ये :-

प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे, वरील उपशीर्षाखाली रु. १३५७.९७ लाखांचा निधी परत करण्यात आला.

२.७ ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या योजनेखाली मंजूर अनुदानापैकी रु. १६.२० कोटी अनुदान खर्च झाला असून उर्वरित अनुदान रु.९,९६,६७,०००/- शासन निर्णय, गृह विभागक्र. आरईटी ०२९०/३०५१/२००९ १०/प्र.क्र.९८/बीयुडी-१, दिनांक ३१.३.२०१० अन्वये प्रत्यर्पित करण्यात आले.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
३०५१ बंदरे व दिपगृहे ०२ लहान बंदरे १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य १९० (०१) (०८) बंदरापर्यत रस्ते/रेल्वे मार्ग बांधणे आणि मश्चजल विकास (योजना) मुळ ५८.२५ पूरक २२,६१.७८ पुनर्विनियोजन -२३,२०.०३	---	---	---

टिपा व भाष्ये :-

नियोजन विभागाकडून प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे रु. २३२०.०३ लाखांची अपेक्षित बचत परत करण्यात आली.

२.८ ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर योजनेखालील कामांना प्रशासकीय मंजूरी न मिळाल्याने रु. २३,२०,०३,०००/- अनुदान शासन निर्णय, गृह विभाग क्र. आरईटी ०२०९/३०५१/२००९-१०/प्र.क्र.९८/बीयुडी-१, दिनांक ३१.३.२०१० अन्वये प्रत्यर्पित करण्यात आले.

साक्ष :-

२.९ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. सदर बैठकीत केंद्र सरकारने सुरु केलेल्या दीपगृहाची योजना याबाबतची सद्य:स्थितीची माहिती देताना मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई मेरीटाईम बोर्ड यांनी समितीस सांगितले की, केंद्र सरकार मार्फत ४० दीपगृहांचे काम करण्यात येणार आहे. राज्य सरकारचा त्यामध्ये आजच्या घडीला काहीही सहभाग नाही. बंदरे विभागाकडून ज्या तांत्रिक परवानग्या देण्याची आवश्यकता होती त्या विभागाने दिल्या आहेत. दीपगृहांचे काम मिनिस्ट्री ऑफ शिपींग मार्फत सुरु होणार आहे.

सन २००९-१० मध्ये बंदरातील गाळ उपसण्यासाठी ड्रेजर खरेदी केला होता काय, ड्रेजर खरेदीसाठी किती निधी प्राप्त झाला, प्रत्यक्षात किती निधी खर्च झाला, तसेच त्या ड्रेजरच्या माध्यमातून किती गाळ उपसण्यात आला. याबाबत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, कोकण पॅकेजबाबत दि. २५/०८/२००९

रोजी शासन निर्णय निर्गमित झाला होता. या अंतर्गत तीन योजना होत्या. पहिली योजना धुपप्रतिबंधक बांधकामाची होती. त्यासाठी ५० कोटी रुपये खर्च अपेक्षित धरला होता. त्यानुसार २००९-१० मध्ये २५ कोटी रुपये आणि २०१०-११ मध्ये २५ कोटी रुपये मिळणे अपेक्षित होते. परंतु सन २०१०-२०११ या वर्षात पैसा आला नाही. दुसरी योजना खाडीतील गाळ काढण्याची होती त्यासाठी ड्रेजर उपलब्ध करुन द्यावयाचे होते. गाळ काढण्याच्या कामासाठी ६० कोटी रुपये तरतूद करावयाची होती. त्यानुसार २००९-१० मध्ये २० कोटी रुपये, २०१०-११ मध्ये २० कोटी रुपये आणि २०११-१२ मध्ये २० कोटी रुपये मिळणे अपेक्षित होते.

२.१० सन २००९-१० ला २० कोटी रुपये तरतूद उपलब्ध होती. त्यापैकी १६ कोटी २० लाख रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला. तद्नंतर शासनाने असा आदेश काढला की, ड्रेजर खरेदी केल्यानंतर व त्याची उपयोगिता बघितल्यानंतर पुढील वर्षाची तरतूद करण्यात यावी. ड्रेजर खरेदी करण्यास विलंब झाला. कारण ड्रेजर मागील वर्षी म्हणजे सन २०१२ मध्ये प्राप्त झाले. १ ड्रेजर आणि २ कटर यांच्या खरेदीवर १६ कोटी २० लाख रुपये खर्च करण्यात आला. नंतरच्या वर्षात त्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले. मेरीटाईम बोर्डाने तारकर्ली व वर्सोवा येथे मार्च-२०१२ मध्ये ड्रेजर पुरविले. तारकर्ली येथील बंदरातून २५ हजार क्यूबीक मीटर आणि वर्सोवा बंदरातून ३० हजार क्यूबीक मीटर गाळ काढण्यात आला. बंदरांतून जो गाळ उपसण्यात येतो. तो गाळ १०-१२ नॉटीकल माईल्स पुढे जाऊन समुद्रात टाकला जातो. ही पध्दत केवळ महाराष्ट्र राज्यात आहे असे नाही इतर राज्यात सुध्दा हीच पध्दत आहे.

२.११ बंदरातून जो गाळ उपसण्यात आला तो कोणत्या क्वॉलिटीचा होता ? कारण बऱ्याच वेळा गाळाच्या नावाखाली बंदरातून रेती उपसली जाते. जो गाळ उपसण्यात आला तो रेती मिश्रित होता काय, जो गाळ उपसण्यात आला त्याला किंमत होती काय, उपसण्यात आलेल्या गाळाचे व्हॅल्यू ॲडीशन करण्यात येते काय याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही मात्र बंदरातून उपसल्या जाण्याऱ्या रेतीसंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई मेरीटाईम बोर्ड यांनी समितीस सांगितले की बंदरातील रेती ज्या ठिकाणी बांधकामासाठी रेतीची कमतरता आहे त्या ठिकाणी किंवा बीच नरीशमेंटसाठी वापरावी काय, याबाबत विभागाअंतर्गत चर्चा सुरु आहे याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येणार आहे.

२.१२ इसमें एक इश्यू है कि पोर्ट तक रोड एवं रेल मार्ग कंस्ट्रक्ट करने तथा पश्चजल विकास (योजना) के काम के लिए सप्लीमेंट्री डिमांड के अंतर्गत विभाग को निधि मिली है परन्तु वह पूरी निधि सरेंडर हुई है ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई मेरीटाईम बोर्ड यांनी समितीस सांगितले की, मूळ तरतूद ५८ लाख २५ हजार रुपये करण्यात आली होती. शिवाय २२ कोटी २१ लाख रुपये पूरक मागणी करण्यात आली. यातील २३ कोटी २० लाख रुपये खर्च करण्यात आले. पीपीपीमध्ये

हे काम करण्यात येणार होते व तशा प्रकारचा करार सुध्दा झाला. करारामध्ये अशी तरतूद होती की, सदरहू काम बीओटी तत्त्वावर करावे. बीओटीचे तत्त्व यशस्वी झाले नाही तर राज्य सरकारने ५० टक्के आणि विकासकाने ५० टक्के रक्कम खर्च करून विकास करावा. त्यानुसार ही तरतूद ५०:५० या प्रमाणात करण्यात आली. त्या वर्षात बीओटीचे तत्त्व यशस्वी होईल की नाही हे सांगू शकत नव्हतो. म्हणून ५०:५० या प्रमाणात खर्च करुन राज्य सरकार आणि विकासकाने पुढे जायचे होते. नेमकी कोणती पध्दत अवलंबवावी हे निश्चित झ ाले नाही म्हणून पैशाची गरज भासली नाही. या योजनेसाठी कॅबिनेट सब कमिटीने रस्त्यांच्या कामांसाठी मंजूरी दिलेली आहे, त्यानंतरची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

२.१३ जयगड व दाभोळ या बंदरांच्या कामासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, चोघले, जयगड, दिघी येथे बंदरे करण्यासाठी मंजूरी मिळालेली आहे. इतर बंदरांच्या कामांसाठी केंद्र शासनाकडून एनओसी मिळालेली नाही, ज्या बंदरांच्या कामांना केंद्र शासनाकडून एनओसी मिळाली नाही त्यांची कामे सुरु करण्यात आली नसून फक्त जयगड, चोघले व दिघी या तीन बंदरांची कामे सुरु करण्यात आली आहेत.

२.१४ नौका समुहाची खरेदी (राज्य योजना) याबाबतची सद्य:स्थिती समितीला अवगत करण्यास समितीने सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले की, नौका खरेदी करण्यासाठी १६.२० कोटी रुपये अनुदान खर्च झाले आहे. व उर्वरित ९ कोटी ९६ लाख रुपये प्रत्यर्पित करण्यात आले आहेत. सन २०११ मध्ये तारकर्ली बंदरासाठी ड्रेजर खरेदीवर खर्च करण्यात आला आहे. तसेच २ कटर सक्शन ड्रेजर आणि ५०० मीटर लांबीचे पाईप लाईन खरेदी करण्यात आला असून आणखी ४ स्वयंचलित हॉपर बार्जेस, २ ग्रब ड्रेजर, ३ सर्व्हे लॉचेस खरेदी करण्यात येणार आहेत असे विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात नमुद केले आहे.

२.१५ नौका खरेदी करतांना संपूर्ण युनिट खरेदी करण्याची आवश्यकता आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते काय अशी विचारणा समितीने केली असता मुकाअ, मुंबई मेरीटाईम बोर्ड यांनी समितीस सांगितले की, ड्रेजरची खरेदी करतांना त्यासाठी लागणारे संपूर्ण युनिट खरेदी करण्यात येते.

२.१६ ड्रेजर खरेदी करुन रेती काढतांना त्याचे विकेंद्रीकरण करण्यात येते ड्रेजरद्वारे रेती व इतर जो गाळ काढला जातो त्यामध्ये मौल्यवान धातू मिळत असेल तर त्या धातूची विक्री करुन शासनाला पैसा मिळू शकतो. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचा फायदा होऊ शकतो. यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करणे आवश्यक आहे अशी सुचना समितीने विभागास केली.

२.१७ अर्नाळा बंदराचे काम प्रस्तावित होते त्यासंदर्भात कामाची वर्क ऑर्डर देण्यात आली त्याअनुषंगाने या बंदराची सद्य:स्थिती काय आहे. अशी विचारणा समितीने केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई

मेरीटाईम बोर्ड यांनी सांगितले की, ॲटोमिक एनर्जी विभागाने एनओसी दिलेली नाही. अर्नाळा बंदरासाठी मागील काळात एक बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीत या बंदरांच्या उभारणीबाबत चर्चा झाली होती. या बंदरासाठी केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. केंद्र सरकार पुरस्कृत योजनेतून ही कामे करायची असून ७५:२५ ची ही योजना आहे. यामध्ये राज्य शासनाचा वाटा २५ टक्के आहे. राज्य शासनाने २५ टक्के रक्कम उपलब्ध करुन दिली आहे. परंतु हे काम काही कारणास्तव सुरु करण्यात आले नाही. तथापि मागील चार-पाच महिन्यात काय प्रगती झाली याबाबतची माहिती विभागाकडे उपलब्ध नव्हती.

२.१८ लेखाशीर्ष ३०५१ बंदरे व दीपगृहे अन्वेषण, जल आलेखन सर्वेक्षण व इतर कामांसाठी मूळ मागणी २.६७ लाख रुपये आहे तर पुरवणी मागणी ५० लाख रुपयांची करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या ठिकाणी बंदरातील मोठ्या प्रमाणात गाळ उपसणी योजनेची मूळ मागणी १.६७ लाख रुपयांची असून पूरक मागणी १० कोटी रुपयांची करण्यात आली आहे. त्यानंतर नौका समुहाची खरेदी करण्यासाठी मूळ मागणी १६.६७ लाख रुपये असून पुरक मागणी २६ कोटी रुपयांची करण्यात आली आहे. यानंतर बंदरापर्यंत रस्ते/रेल्वे मार्ग बांधणे आणि पश्चजल विकास योजनेची मूळ मागणी ५८.२५ लाख रुपयांची असून पुरवणी मागणी २२ कोटी रुपयांची करण्यात आली आहे. ज्या प्रमाणात मूळ व पुरवणी मागणी करण्यात आली त्या प्रमाणात रक्कम खर्च झालेली नाही. म्हणजेच प्रत्येक बाबींमध्ये पुरवणी मागणी जास्त रकमेची करण्यात आली आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता यासंदर्भात खूलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मूळ तरतूद २ लाख ६६ हजार रुपयांची असून पुरवणी मागणी ५० लाख रुपयांची आहे. वित्त विभागाकडे ६३ लाख रुपयांची मागणी केली असता वित्त विभागाने ३५ लाख रुपये मुक्त केले आहेत, त्यामुळे मागणी जास्त रकमेची करण्यात येते व इतर निधी समर्पित करण्यात आला आहे. मूळ मागणी कमी रकमेची असून पुरवणी मागणी जास्त रकमेची करण्यात येते हे योग्य नाही. कारण प्रत्येक ठिकाणी मूळ मागणी दोन लाख रुपयांची असेल तर पुरवणी मागणी २ कोटी रुपयाची करण्यात येते, यामध्ये बदल करणे गरजेचे आहे. अशी सुचना समितीने विभागास केली.

२.१९ दोन लाख रुपये अर्थसंकल्प मध्ये मंजूर झाले तर लगेच तीन महिन्यांनी पुरवणी मागणीद्वारे दोन कोटी रुपये मंजूर केले जातात. पुरवणी मागणीच्या माध्यमातून निधी दिला जातो, यासंदर्भात वित्त सचिवांनी समितीस सांगितले की, सन २०१०-२०११ पासून ७५ टक्के रक्कम वितरीत केली जाते. त्यामुळे आता तशी अडचण येत नाही.

२.२० सन २००८-२००९ व २००९-२०१० या अहवाल वर्षात विभागाने बजेटची मागणी केल्यामुळे त्यांना कोणता तरी प्रकल्प पूर्ण करावयाचा असेल. परंतु अर्थसंकल्पाप्रमाणे निधीचे वितरण न केल्यामुळे संबंधित

विभागाला प्रकल्प पूर्ण करता आला नाही. असे असताना काही ठिकाणी ठोक रकमेची तरतूद केली जाते, हे बरोबर नाही. आता पुरवणी मागणी म्हणजे मूळ अर्थसंकल्प झाला असून मूळ अर्थसंकल्पाची रक्कम म्हणजे पुरवणी मागणी झालेली आहे, असे का होत आहे. वित्त विभाग याकडे पाहिजे तेवढे लक्ष देत नाही काय ? कॅश फ्लो उशिरा होत असल्यामुळे अडचणी निर्माण होतात का असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता याबाबत खुलासा करताना वित्त सचिवांनी समितीस अवगत केले की, काही वेळा एकूण कामाच्या तीन ते चार पट रकमेची मागणी विभागाकडून केली जाते. तसेच काही योजनांसाठी केंद्र सरकारचा निधी येत असतो व तो पुरवणी मागणीत दर्शविल्यामुळे पुरवणी मागणीची रक्कम जास्त फुगली असल्याचे दिसून येते.

२.२१ केंद्र सरकारकडून, जागतिक बॅकेकडून मिळणाऱ्या रकमेचे शिर्ष वेगळे असते. व ही रक्कम अर्थसंकल्पात वेगळी दर्शविण्यात येते. व्हाईट बुकमध्ये राज्य सरकारचा व केंद्र सरकारचा हिस्सा वेगवेगळा दर्शविला जातो. यामध्ये या निधीचा ब्रेकअप दिलेला असतो त्यामुळे राज्याचे बजेट फुगविण्याची आवश्यकता नाही असे मत समितीने व्यक्त केले.

२.२२ दीपगृहासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळतो. यामध्ये राज्य सरकारचा हिस्सा नाही ही दीपगृहे केंद्र सरकारची आहेत काय याचा दीपगृहासंदर्भात केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने निर्णय घेतला आहे. जीपीएस सिस्टिम बसविण्यात आल्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने ती अत्यंत फायदेशीर ठरते. दीपगृहे हा केंद्र सरकारचा विषय आहे.

२.२३ केंद्र शासनाकडून राज्य सरकारला १३ व्या वित्त आयोगातून निधी मिळाला आहे. ५१ कोटी २५ लाख रुपये तीन वर्षात मिळणार आहेत. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली असता समितीने केंद्र शासनाकडून राज्य सरकारला अनेक योजनांच्या माध्यमातून किती पैसा मिळाला याची माहिती सादर करण्याचे निदेश दिले.

२.२४ महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३ या पुस्तकामध्ये असे नमूद केले आहे की, भारतीय रेल्वे वाहतुकीचा कणा आहे. संपूर्ण भारतात ३१ मार्च २०१२ पर्यंत ६५ हजार किलोमीटर रेल्वेचे जाळे आहे. त्यापैकी ५९८४ किलोमीटर म्हणजे एकूण रेल्वे मार्गापैकी ९.२ टक्के रेल्वे मार्ग महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. सार्वजनिक वाहतुकीकडे लोकांनी वळावे अशी केंद्र सरकारची इच्छा आहे.

२.२५ महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पासंदर्भात समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, एमयुटीपी अंतर्गत ५२ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सन २०३१ पर्यत पूर्ण करण्यात येणार आहेत. यामध्ये अनेक रेल्वे मार्गांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. अमरावती-नरखेड रेल्वे मार्ग, अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ रेल्वे मार्ग, बारामती-लोणंद (नविन मार्ग) रेल्वे मार्ग. बेलापूर-सीवूड (नवीन मार्ग) रेल्वे मार्ग. वर्धा-नांदेड (नवीन

मार्ग) रेल्वे मार्ग, पनवेल-पेण, पेण-रोहा व पनवेल-रोहा या रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण करायचे आहे. तसेच महाराष्ट्रात आता ५९८४ किलोमीटरचे रेल्वे मार्ग आहेत. तथापि महाराष्ट्रात रस्ता वाहतुकीचे प्रमाण खूप जास्त आहे ते कमी करण्यासाठी रेल्वे मार्ग वाढविणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील शहरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. लोकसंख्येने मोठी असलेली अनेक गावे रस्त्यांनी जोडली जात आहेत. परंतु त्या ठिकाणी रेल्वे मार्ग नाहीत. रेल्वे मार्गाने प्रवास करणे रस्ते मार्गाच्या तुलनेत अत्यंत कमी खर्चिक आहे. अनेक लोक खाजगी वाहने घेत असल्यामुळे रस्त्यांवर वाहनांची गर्दी वाढलेली आहे. एका बसमध्ये ५० ते ६० प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे तर एका रेल्वे गाडीमध्ये हजारो प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे. लोकसंख्येनी मोठी असलेली सर्व शहरे रेल्वेने जोडली पाहिजेत. पुणे व नाशिक शहराचे उदाहरण घेतले तर या दोन शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असून २४ तास तेथील रस्ता वाहतूक सुरु असते. ही दोन्ही शहरे रेल्वेने जोडली पाहिजेत.

२.२६ याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, मागील तीन ते पाच वर्षात महाराष्ट्रात रेल्वेकरिता केंद्र सरकारकडून किती कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. रेल्वेच्या कामांसाठी राज्याच्या किती टक्के हिस्सा आहे. मागील पाच वर्षात महाराष्ट्रात किती प्रोजेक्ट तयार झाले आहेत. यामध्ये ऑन गोईंग प्रोजेक्ट किती आहेत, किती प्रोजेक्ट पूर्ण झाले व किती प्रोजेक्ट अपूर्ण आहेत. याअनुषंगाने महाराष्ट्रात पुढील २५ ते ३० वर्षात किती रेल्वे मार्ग तयार करण्यात येणार आहेत. तसेच विदर्भातील नरखेड-अमरावती, मराडवाड्यातील अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ व वर्धा-यवतमाळ या रेल्वे मार्गाची सद्यः स्थिती काय आहे. याबाबत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, नागरी भागातील आणि महानगरपालिका क्षेत्रातील कामे नगर विकास विभागाकडे आहेत. रेल्वे ओव्हर ब्रिजची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत. तसेच, नवीन रेल्वे लाईनच्या ट्रान्सपोर्टेशनची कामे परिवहन विभागाकडेकडे आहेत. सन २०१२ मध्ये परिवहन विभागात रेल्वे सेक्शन सुरु करण्यात आलेला आहे. या सेक्शनमध्ये एक उप सचिव, कक्ष अधिकारी, क्लार्क असा स्टाफ आहे. पूर्वी रेल्वे बोर्ड, रेल्वे मंत्रालय यांच्या बरोबर समन्वय साधण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या सेक्शनमध्ये प्रतिनियुक्तीवर रेल्वे बोर्डातील एका अधिकाऱ्याची जॉईंट सेक्रेटरी कम ऑफिसर ऑन स्पेशल डयुटी या पदावर नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार या सेक्शनमध्ये प्रतिनियुक्तीवर रेल्वे बोर्डातील एका अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांच्या मार्फत रेल्वे बोर्ड, रेल्वे मंत्रालय यांच्या बरोबर समन्वय साधतो.

२.२७ राज्य शासनाने राज्यातील ८ रेल्वे प्रकल्पांसाठी ५० टक्के हिस्सा देण्याचा निर्णय घेतलेला आहे. एखाद्या रेल्वे प्रकल्पामध्ये इंटरनल रेट ऑफ रिटर्न १४ टक्क्यापेक्षा कमी असेल तर रेल्वे विभाग तो प्रकल्प

घेत नाही, याबाबतीत रेल्वेचे असे म्हणणे आहे की, असे प्रकल्प इकॉनॉमिकली फिजिबल नसतात. परंतु राज्यातील मागासलेल्या भागाचा आर्थिक व सामाजिक दृष्टया विकास करण्यासाठी राज्य शासन त्या ठिकाणी रेल्वे प्रकल्प करण्याकरिता ५० टक्के हिस्सा देते. राज्य शासनाने अशा प्रकारचे ८ प्रकल्प घेतलेले आहेत.

२.२८ राज्य शासनाने ५० टक्के हिस्सा दिलेल्या रेल्वे प्रकल्पामध्ये अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ २६१ किलो मीटर, वर्धा-नांदेड व्हाया यवतमाळ-पुसद २७० किलो मीटर, मनमाड-इंदौर व्हाया मालेगाव-धुळे-नरढाणा-शिरपूर ३५० किलो मीटर, वडसा-देसाईगंज-आरमोरी-गडचिरोली ४९.५ किलो मीटर, गडचांदूर ते आदिलाबाद ५९ किलो मीटर, पुणे-नाशिक २६५ किलो मीटर, कराड-चिपळूण १११.५ किलो मीटर, नागपूर-नागभिड १०६ किलो मीटर या रेल्वे मार्गांच्या समावेश आहे. कोकण रेल्वे मध्य रेल्वेला जोडण्यासाठी कराड-चिपळूण हा १११.५ किलो मीटर अंतराचा रेल्वे प्रकल्प घेण्यात आलेला आहे. नागपूर-नागभिड हा १०६ किलो मीटरचा नॅरोगेज रेल्वे मार्ग असून या रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रुपांतर करावयाचे आहे. रेल्वे विभागाने यावर्षी पुणे-नाशिक रेल्वे मार्गाच्या सर्व्हेक्षणाचे काम हाती घेतले आहे. वडसा-देसाईगंज-आरमोरी-गडचिरोली रेल्वे प्रकल्पाच्या बाबतीत राज्य शासनाने ५० टक्के हिस्सा देण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु सदर प्रकल्पास अद्याप रेल्वे बोर्डाकडून मान्यता प्राप्त झालेली नाही. अहमदनगर-बीड-परळी-बैजनाथ रेल्वे प्रकल्पाच्या सुधारीत अंदाजित किंमतीला मान्यता देण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन आहे. अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ या रेल्वे मार्गाच्या कामावर आता पर्यंत २२७ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. त्यापैकी १५८ कोटी रुपये राज्य शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहेत. वर्धा-नांदेड व्हाया यवतमाळ-पुसद रेल्वे मार्गाच्या कामावर आता पर्यंत ५३ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. त्यापैकी ३५ कोटी रुपये राज्य शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहेत. राज्य शासनाने यावर्षी रेल्वे मार्गाच्या कामासाठी ६४ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. इतर रेल्वे लाईनच्या सर्व्हेक्षणाचे काम सुरु आहे. परंतु रेल्वे बोर्डाने अद्याप मंजुरी दिलेली नाही. रेल्वे लाईनच्या भुसंपादनाचे जे प्रश्न निर्माण होतात ते विभाग सोडवितो. रेल्वे मार्गाच्या संदर्भात लोकप्रतिनिधींकडून जी पत्रे येतात ती रेल्वे बोर्डाकडे पाठविली जातात.

२.२९ तसेच, राज्य शासनाने रेल्वे प्रकल्पांसाठी हिस्सा दिलेला नाही अशा काही रेल्वे प्रकल्पांची कामे सुरु आहेत. बारामती-लोणंद-पंढरपूर रेल्वे मार्गाचे लोणंद ते फलटण पर्यंतचे २७ किलो मीटरचे काम पूर्ण झालेले आहे. अमरावती-नरखेड रेल्वे मार्गाचे काम जवळ जवळ पूर्ण झालेले आहे. डहाणू-नाशिक रेल्वे मार्गाच्या सर्व्हेक्षणाचे काम सुरु आहे. सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद रेल्वे प्रकल्पात राज्य शासनाचा हिस्सा नाही. जालना-खामगाव-मलकापूर-चिखली, कल्याण-माळशेज-अहमदनगर, कोल्हापूर-कणकवली, सोलापूर-उस्मानाबाद-बीड-जालना-बुलढाणा, सोलापूर-उस्मानाबाद-औरंगाबाद-जळगाव, धुळघाट-खांडवा-अकोला-पुर्णा,

नांदेड-वर्धा-मुसलादेह-हदगाव, मालेगाव-सटाणा-साक्री-नवापूर-सुरत, शिर्डी-शहापूर, लोहा-नांदेड-लातूर, कोल्हापूर-वैभववाडी या रेल्वे प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मंजुरी मिळावी यासाठी विभाग प्रयत्नशिल आहे.

२.३० तसेच, रेल्वे मार्गाच्या रुंदीकरणाची म्हणजे नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेज रेल्वे मार्गात रुपांतर करण्याची तीन कामे आहेत. मिरज-लातूर, यवतमाळ-मुर्तिजापूर-अचलपूर, पाचोरा-जामनेर या नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेज रेल्वे मार्गात रुपांतर करावयाचे आहे. पनवेल-पेण आणि पेण-रोहा या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम सुरु आहे. छिंदवाडा-नागपूर, कळमना-नागपूर, जळगाव-उधना-सुरत, पुणे-मिरज-कोल्हापूर, दौंड ते मनमाड, मुदखेड-नांदेड-मनमाड हे दुहेरीकरणाचे रेल्वे प्रकल्प प्रलंबित आहेत. मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, दक्षिण पूर्व आणि दक्षिण मध्य असे चार रेल्वे मार्ग आहेत. परिवहन विभागातील रेल्वे सेक्शनमध्ये ज्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांना रेल्वे बोर्ड, रेल्वे मंत्रालय आणि रेल्वेचे मॅनेजर यांच्या बरोबर समन्वय साधण्यास सांगितले आहे. परिवहन विभागातील रेल्वे सेक्शनमध्ये रेल्वे ओव्हर ब्रिजची माहिती, राज्यात रेल्वेची कोणती कामे सुरु आहेत याबाबतची सर्व माहिती उपलब्ध असली पाहिजे यासाठी आपण परिवहन विभागात रेल्वे सेक्शन सुरु केलेला आहे.

२.३१ मागील ५ वर्षात राज्यात किती किलो मिटरचे रेल्वे मार्ग झालेले आहेत याबाबतची माहिती राज्य शासनाने ज्या रेल्वे प्रकल्पांसाठी हिस्सा दिलेला आहे आणि ज्या रेल्वे प्रकल्पांसाठी हिस्सा दिलेला नाही याबाबतची माहिती समितीला उपलब्ध करुन द्यावी असे निदेश समितीने दिले असता राज्य शासनाने ज्या रेल्वे प्रकल्पांसाठी हिस्सा दिलेला आहे आणि ज्या रेल्वे प्रकल्पांसाठी हिस्सा दिलेला नाही याबाबतची माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात आली आहे. (विवरण पृष्ठ क्र.७ ते १७ विभागाकडून आलेल्या माहितीतील)

२.३२ नवीन भागात रेल्वेचा विकास हा राज्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. त्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, इंटरनल रेट ऑफ रिटर्न १४ टक्क्यापेक्षा जास्त असले पाहिजे. इंटरनल रेट ऑफ रिटर्न १४ टक्क्यापेक्षा कमी असेल तर रेल्वे बोर्ड त्या प्रकल्पासाठी मान्यता देत नाही.

२.३३ ऑटोमोबाईल इंडस्ट्रीजमध्ये पेट्रोल, डिझेलवर मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे. त्यामुळे खाजगी वाहतुकीचा प्रवास दिवसेंदिवस महाग होत आहे. अमुक एका ठिकाणी रेल्वेने जावयाचे असेल तर २८० रुपये तिकिट लागत असेल आणि त्याच ठिकाणी लक्झरी बसने जावयाचे असेल तर त्यासाठी १२०० रुपये तिकिट लागते. दिवसेंदिवस पेट्रोल, डिझेलचे भाव वाढत आहेत. पेट्रोल, डिझेलच्या खरेदीसाठी जास्त पैसे खर्च करावे लागतात. जपान, चीन सारख्या देशांमध्ये बुलेट ट्रेन सुरु झालेल्या आहेत. त्याचा वेग ताशी ३५० किलोमीटर इतका आहे. आपल्याला मुंबई येथून नागपूरला जायचे असेल तर १५-१६ तास रेल्वेचा प्रवास

करावा लागतो. देशाची लोकसंख्या वाढत आहे. खाजगी वाहतुकीपेक्षा रेल्वे सेवा परवडणारी आहे व रेल्वेचा प्रवास स्वस्त व सुरक्षित असल्यामुळे विभागाने हा विषय राज्यात हायलाईट केला पाहिजे असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासन रेल्वे प्रकल्पांसाठी आपला हिस्सा देण्यास तयार आहे. परंतु रेल्वे मंत्रालयाकडून त्यांचा हिस्सा मिळत नाही. राज्य शासनाने मागील वर्षी रेल्वे प्रकल्पांसाठी १०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. परंतु रेल्वे मंत्रालयाकडून फक्त ४० ते ४२ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. राज्य शासनामार्फत आपल्या हिश्शाचे पैसे उपलब्ध करुन दिले जातात. राज्य सरकार रेल्वे प्रकल्पांसाठी मॅचिंग ग्रँट देते. परंतु रेल्वेकडून मॅचिंग ग्रँट मिळत नसल्यामुळे रेल्वे प्रकल्प पूर्ण होत नाहीत व प्रकल्पाच्या किंमती देखील वाढतात. त्यामुळे रेल्वे विभागाकडून मॅचिंग ग्रँट मिळाली नाही तर राज्य सरकारची स्वत: पूर्ण भार उचलण्याची तयारी असली पाहिजे.

२.३४ राज्यातील रेल्वे लाईनचा मास्टर प्लॅन तयार केलेला आहे काय आणि जर तयार केला असेल तर त्यासंबंधीची माहिती समितीस सादर करावी असे निदेश समितीने दिले. परिवहन विभागाकडे राज्यातील रेल्वे ओव्हर ब्रिजची कामे आहेत. राज्यात शंभर वर्षा पूर्वीचे रेल्वे ओव्हर ब्रिज किती आहेत ? ब्रिटीश काळात काही रेल्वे ओव्हर ब्रिज बांधलेले आहेत. त्यासंदर्भात आजही आपल्या विभागाला पत्र येते की, अमुक रेल्वे ओव्हर ब्रिजची पुनर्रचना झाली पाहिजे. भायखळा, परळ येथील आरओबी संदर्भात आपण काय करणार आहात ?तसेच, कोकण रेल्वे मार्गावर दुसरी रेल्वे लाईन टाकण्याबाबत काय प्रगती आहे यावर कोकण रेल्वे मार्गावर दुसरी लाईन टाकण्यासंदर्भात फक्त चर्चा सुरु आहे. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. परंतु रेल्वे ओव्हर ब्रीज संदर्भातील माहिती विभागाकडून प्राप्त झाली नाही.

समितीचे अभिप्राय :-

२.३५ ऑटोमोबाईल इंडस्ट्रीजमध्ये पेट्रोल, डिझेलवर मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे. त्यामुळे खाजगी वाहतुकीचा प्रवास दिवसेंदिवस महाग होत आहे. दिवसेंदिवस पेट्रोल, डिझेलचे भाव वाढत आहेत. पेट्रोल, डिझेलच्या खरेदीसाठी जास्त पैसे खर्च करावे असून देशाची लोकसंख्या वाढते आहे. खाजगी वाहतुकीपेक्षा रेल्वे सेवा परवडणारी आहे व रेल्वेचा प्रवास स्वस्त व सुरक्षित असल्यामुळे विभागाने हा विषय राज्यात हायलाईट केला पाहिजे. शासन रेल्वे प्रकल्पांसाठी आपला हिस्सा देतो परंतु रेल्वे मंत्रालयाकडून त्यांचा हिस्सा मिळत नाही. राज्य शासनाने मागील वर्षी रेल्वे प्रकल्पांसाठी १०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. परंतु रेल्वे मंत्रालयाकडून फक्त ४० ते ४२ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. राज्य शासनामार्फत आपल्या हिश्शाचे पैसे उपलब्ध करुन दिले जातात. राज्य सरकार रेल्वे प्रकल्पांसाठी मॅचिंग ग्रँट देते. परंतु रेल्वेकडून मॅचिंग ग्रँट मिळत नसल्यामुळे रेल्वे प्रकल्प पूर्ण होत नाहीत व प्रकल्पाच्या

किंमती देखील वाढतात. त्यामुळे रेल्वे विभागाकडून मॅचिंग ग्रँट मिळाली नाही तर राज्य सरकारची स्वत: ची पूर्ण भार उचलण्याची तयारी असली पाहिजे.

समितीची शिफारस :-

२.३६ शिफारस क्र. १) राज्यातील रेल्वे लाईनचा मास्टर प्लॅन तयार करण्यात यावा व केंद्र शासनाकडून प्रस्ताव मंजूरीकरिता आवश्यक इंटरनल रेट ऑफ रिटर्नची १४ टक्यांची मर्यादा कमी करणेबाबत पाठपुरावा करुन जास्तीत जास्त रेल्वे प्रस्ताव मंजूरीबाबत विभागाने कार्यवाही करावी तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त करावयाच्या मॅचिंग ग्रँट करीता विभागाने पाठपुरावा करावा व निधी प्राप्त करुन मंजूर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करावयाच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.३७ शिफारस क्र. २) विदर्भ व मराठवाडयामध्ये दळणवळणाची साधने उपलब्ध नसल्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते अशी बाब समितीच्या निदर्शनास आली. केंद्र शासनाने यापूर्वीच मान्यता दिलेल्या वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वेमार्गाचे काम प्राधान्य क्र. (१) वर हाती घेण्यात यावे व सदर मार्गासाठी केंद्र व राज्य शासनाने कालबध्द कार्यक्रम ठरवून उपलब्ध करुन घ्यावा, अशी समितीची शिफारस आहे.

महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभाग

आर्थिक सेवा.

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात अनुदान क्र. सी-६ "नैसर्गिक आपत्ती" या खाली प्रधानशीर्ष २२४५ "नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य" या शीर्षाखाली बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

(रुपये हजारात)

लेखाशीर्ष	**एकूण अनुदान किंवा विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष - **२२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य** **दत्तमत-** मुळ ५,४३,१६,१९ पूरक ८,०३,८७,३४ वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च, २०१०)	१३,४७,०३,६३	११,१६,०६,४७	(-) २,३०,९७,१६
भारित- मुळ ७०,०० पूरक ---- वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च, २०१०)	..... ७०,००	.... १,८२,४७,६५	७,६२,४६,४१ (+)१,८१,७७,६५ ३२,३५

टीपा व भाष्ये :-

अनुदानातील रुपये २३०९७.१६ लाख एवढी अंतिम बचत लक्षात घेता रुपये ७६२४६.४१ लाख रक्कम निधीचे प्रत्यर्पण अधिक असल्याचे सिध्द झाले.

३.२ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मागणी क्रमांक सी-६ "नैसर्गिक आपत्ती " निवारणासाठी सहाय्य या शीर्षाखाली रुपये ८८३.९० कोटी इतकी रक्कम दत्तमत खाली तरतुदीत करण्यात आली होती. तर रुपये ३७.६५ कोटी इतकी तरतूद भारीत शीर्षाखाली करण्यात आली होती. यापैकी रुपये ३५७.१४ कोटी एवढी बचत दत्तमत खाली तर रुपये ४.६० कोटी इतकी बचत भारीत खाली झालेली आहे.

२. अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली :-

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०१ अवर्षण **१०१ अनुग्रह सहाय्य,** **१०१ (००) (०७) वैरण पुरवठा** मूळ ५,००.०० पुनर्विनियोजन ९७.४६	५,९७.४६	४,९७.४६	(-)१,००.००

३.३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षाखाली मूळ तरतूद रुपये ५.०० कोटी इतकी होती. त्यामधून रुपये १.०० कोटी इतकी रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे काढून घेण्यात आली, तर रुपये ९७.४६ लाख इतकी रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली. अशा प्रकारे एकूण अंतिम उपलब्ध तरतूद रुपये ४.९७ कोटी एवढी होती. ती पूर्ण खर्च झालेली आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **१०१ अनुग्रह सहाय्य** **१०१ (०३) (०४) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, पाणीपुरवठा, शाळा, चावडी, विद्युत पुरवठा, इत्यादी नागरी सुविधांवरील खर्च.** मुळ ३०,००.०० पुनर्विनियोजन (-)१०,३४.९८	४०,३४.९८	२१,१६.६६	(-)१९,१८.३२

कोणतीही विशिष्ट कारणे न देता वरील उप-शीर्षाखाली मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रुपये ११३२.४४ लाख एवढया निधीची तरतूद करण्यात आली.

वर नमूद करण्यात आलेल्या उप-शीर्षाखाली रुपये २०१८.३२ लाख एवढया अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

३.४ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षाखाली मूळ तरतूद रुपये ३०.०० कोटी इतकी होती. त्यामधून पुनर्विनियोजनाद्वारे रुपये १८.६१ कोटी इतकी रक्कम अन्य आवश्यक शीर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आली, तर रुपये १०.३५ कोटी इतकी सदर शीर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आली. अशा प्रकारे एकूण रुपये २१.७४ कोटी इतकी तरतूद अंतिमत: उपलब्ध होती. त्यापैकी रुपये २१.६९ कोटी इतका खर्च झाला आहे. सदर शीर्ष नैसर्गिक आपत्तींशी निगडीत असल्याने १०० टक्के अचूकरित्या अर्थसंकल्पित करणे शक्य होत नाही. अशा प्रकारे उपरोक्त शीर्षाखाली बचत केवळ ५.०० लाख इतकी आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२२४५- नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य **०१ अवर्षण,** **१०१ अनुग्रह सहाय्य,** **१०१ (००) (०८) इतर बाबी.** मुळ ५,००.०० पुनर्विनियोजन (-)०.०३	४,९९.९७	३,७०.६८	(-)१,२९.२९

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०१ अवर्षण, ८०० इतर खर्च ८०० (००) (०२) संचालन व प्रशासन - इतर खर्च मुळ ४४.४० पुनर्विनियोजन (-)४.१७	४०.२३	६.२१	(-)३४.०२

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **१०१ अनुग्रह सहाय्य** **१०१ (०४) (०३) बियाणे, रासायनिक खते व शेतीची अवजारे यांचा पुरवठा** मुळ २,००.००	२,००.००	-----	-२,००.००

०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **११८ हानी पोचलेल्या होड्या व मासेमारी साधनसामुग्री यांची दुरुस्ती/ ती नव्याने पुरविणे यासाठी सहाय्य** **११८ (००) (०१) हानी पोचलेल्या होडया व मासेमारी साधनसामुग्री यांची दुरुस्ती/ ती नव्याने पुरविणे यासाठी सहाय्य** मुळ १०.०० पुनर्विनियोजन (-)१.५०	८.५०	----	(-)८.५०
०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **११९ हानी पोहोचलेली हत्यारे व साधनसामुग्रीच्या दुरुस्ती/बदलून घेण्यासाठी कारागीरांना सहाय्य** **११९ (००) (०१) हानी पोहोचलेली हत्यारे व साधनसामुग्रीच्या दुरुस्ती/बदलून घेण्यासाठी कारागीरांना सहाय्य** मुळ १०.००	१०.००	-----	(-)१०.००

वर नमूद करण्यात आलेल्या उप-शीर्षाखालील रु.३८१.८१ लाख एवढा अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाही. (ऑगस्ट, २०१०)

३.५ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

संबंधित लेखाशीर्षाखाली सदर वर्षी फारशी आपत्तीजनक परिस्थिती उद्‌भवली नाही. त्यामुळे मूळ तरतुदीतून ज्या ठिकाणी अधिक आवश्यकता होती, त्याप्रमाणे निधी पुनर्विनियोजनाद्वारे वर्ग करण्यात आला व उर्वरित निधी शिल्लक राहिला. वर नमूद करण्यात आलेल्या उप शीर्षाखाली एकूण बचत रुपये ३८१.८१ लाख नसून ती रुपये १५२.२५ लाख एवढी आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **१०१ अनुग्रह सहाय्य** **१०१ (०१) (०१) रोख बेकारी भत्ता** मुळ ५,००.०० पुनर्विनियोजन (-)४,०२.५८	९७.४२	३,८०.७१	२,८३.२९

रूपये २८३.२९ लाख एवढी अंतिम आधिक्य लक्षात घेता, मार्च, २०१० मध्ये कोणतेही विनिर्दिष्ट कारण नमूद न करता, पुनर्विनियोजनाव्दारा काढण्यात आलेला रुपये ४०२.५८ लाख एवढया निधीचे आधिक्य सिध्द होते. त्याबाबतची कारणे नमूद करण्यात आली नाहीत.

३.६ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखाली मूळ तरतूद रुपये ५.०० कोटी इतकी होती. पुनर्विनियोजनाद्वारे रुपये ५५.०० लाख इतकी तरतूद उपलब्ध करुन दिली होती. त्यामुळे एकूण तरतुदीतून, रुपये ५.५५ कोटीमधून रुपये १.८६ कोटी इतकी अंतिम बचत झालेल

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **१०१ अनुग्रह सहाय्य** **१०१ (०४) (०५) इतर बाबी** मुळ ६१,००.०० पूरक २,४६,००.०० पुनर्विनियोजन (-)१७,६०.६२	२,८९,३९.३८	२,८६,१९.४०	(-) ३,१९.९८

३.७ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रत्यक्ष अधिकचा खर्च रुपये ३८८.०० लाख इतका आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **१०१ अनुग्रह सहाय्य** **१०१ (०३) (०२) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता रस्ते व घरे इत्यादी बांधण्यासाठी संपादन केलेल्या/अधिगृहीत केलेल्या जमिनीबद्दल नुकसान भरपाई देणे.** मुळ १०,००.०० पुनर्विनियोजन (-)१,४५.८०	८,५४.२०	८४.५५	(-) ७,६९.६५

ज्ञापन :

३.८ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रत्यक्ष अधिकचा खर्च रुपये ८७५.०० लाख इतका आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **१०१ अनुग्रह सहाय्य** **१०१ (०३) (०३) पुरामुळे नुकसान पोहोचलेल्या व्यक्तींना घरे बांधून देण्यासाठी जमिनीचा विकास करण्यावरील खर्च** मुळ १०,००.०० पुनर्विनियोजन (-) ४,६१.७१	५,३८.२९	२३.४३	(-) ५,१४.८६

ज्ञापन :

३.९ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रत्यक्ष रुपये ५१४.८६ लाख इतकी बचत झाली नसून, रुपये ८४.८२ लाख इतकी बचत झाली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **११३ घरांची दुरुस्ती/पुनर्बांधणी याकरिता सहाय्य** **११३ (००) (०१) घरांची दुरुस्ती/पुनर्बांधणी याकरिता सहाय्य** मुळ ४०,०९.०० पुनर्विनियोजन (-) १३,९३.८४	२६,१५.१६	२४,११.०४	(-) २,०४.१२

ज्ञापन :

३.१० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रत्यक्ष रूपये ७६.०० लाखांची बचत झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०२ पूर, चक्रीवादळे, इत्यादी- **८००, इतर खर्च** **८०० (००) (०१) इतर खर्च** मुळ २,३४.०० पुनर्विनियोजन (-) १४.९३	२,१९.०७	६७.४४	(-) १,५१.६३

ज्ञापन :

३.११ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल मदत व पुनर्वसन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रत्यक्ष रूपये १.०० लाखांची बचत झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०५ आपत्ती निवारण निधी **१०१ राखीव निधी व ठेव खात्यामध्ये हस्तांतरण आपत्ती निवारण निधी** **(००)(०४) आपत्ती निवारण निधीमध्ये (२५ टक्के राज्य हिस्सा) इतर बाबी** मुळ ६७,७३.०० पूरक ८६,१९.५४ पुनर्विनियोजन (-)१,५३,५६.०८	३६.४६	६७,७४.००	(+) ६७,३७.५४

ज्ञापन :

३.१२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्ष हे राज्य आपत्ती वितरण निधीमधील राज्याचा हिस्सा (२५ टक्के) दर्शविण्याचे लेखाशीर्ष आहे. त्याखाली प्रत्यक्ष देयक सादर करुन खर्च केला जात नाही. या शीर्षाखाली करण्यात आलेली तरतूद ही अन्य विविध शीर्षामध्ये दर्शवून ती प्रत्यक्ष खर्च करण्यात येते. त्यानुसार सदर निधी खर्च झालेला आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
८० सर्वसाधारण **००१, संचालन व प्रशासन** **(०२) (०१) ३३ जिल्ह्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापन, प्राधिकरण उभारणे** मुळ १६,७२.०० पूरक २५,९९.८० पुनर्विनियोजन (-) ८,६७.१३	३४,०४.६७	३३,७५.४०	(-)२९.२७

३.१३ कोणतेही विशिष्ट कारण न देता वर नमूद करण्यात आलेल्या उपशीर्षाखाली पुनर्विनियोजन/ प्रत्यर्पण याद्वारे रुपये २०,०००.११ लाख एवढा निधी काढण्यात आला.

वर नमूद करण्यात आलेल्या उपशीर्षाखाली अंतिम बचत/अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

३.१४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

उपरोक्त लेखाशीर्षाखाली प्रत्यक्ष खर्च व बचत नोंदविण्यात आलेली आहे. त्यानुसार एकूण रुपये २०५.९३ लाख इतका अधिकचा खर्च झाला आहे. सदर शीर्षे ही नैसर्गिक आपत्तींशी संबंधित असल्याने निधी १०० टक्के अचूकरित्या अर्थसंकल्पित करणे शक्य होत नाही. उद्‌भवलेल्या आपत्तींवर प्रतिसाद म्हणून मागणी करण्यात आलेल्या शीर्षामध्ये मागणी नसलेल्या शीर्षामधून उपलब्ध करुन देण्यात येते.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०२ पूर, चक्रीवादळे इत्यादी **८०० इतर खर्च** **८०० (०८) (०१) सागरी नाल्या व प्रमुख बांध यांचे बांधकाम/नवीकरण करणे** पूरक ३०,००.०० पुनर्विनियोजन (-) ३०,००.००	.....	.....	.....

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०२ पूर, चक्रीवादळे इत्यादी **८०० इतर खर्च** **८०० (१४) (०१) प्रशिक्षण** पूरक ९,९९.९४ पुनर्विनियोजन (-) ९,९९.९४	.....	.....	.....

कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता वर नमूद करण्यात आलेल्या उपशीर्षाखाली डिसेंबर, २००९ मध्ये प्राप्त केलेली रुपये ३,९९९.९४ लाख एवढी संपूर्ण पूरक तरतूद मार्च, २०१० मध्ये प्रत्यर्पित करण्यात आली.

ज्ञापन :

३.१५ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पाला सदर वर्षांमध्ये मान्यता मिळण्याची शक्यता असल्याने या शीर्षांखाली तरतूद करण्यात आली. तथापि, अद्यापी जागतिक बँकेकडून सदर प्रस्तावास मान्यता न मिळाल्याने, सदर निधी अन्यत्र वर्ग करण्यात आला.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
०२ पूर, चक्रीवादळे इत्यादी **८०० इतर खर्च** **८०० (०२) (०२) घरांचे बांधकाम** मुळ ..... ०.०१ पूरक ..... ४०,००.०० पुनर्विनियोजन ..... (-) ४०,००.०१	---	--	--

सन २००६-०७ मधील मुसळधार पाऊस /पुर यांमुळे बाधित झालेल्या गावांच्या पुनर्वसनाकरिता जून, २००९ मध्ये प्राप्त केलेली रुपये ४००० लाख एवढी संपूर्ण पुरक तरतुद कोणतेही विशिष्ट कारण न देता मार्च, २०१० मध्ये परत करण्यात आली.

ज्ञापन :

३.१६ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००६-०७ च्या पूरग्रस्तांचे पुनर्वसन करणे हाती घ्यावयाचे असल्याने सदर शीर्षाखाली तरतूद करण्यात आली. तथापि, यासाठी प्रचंड निधी आवश्यक असल्याने वित्त विभागाकडून सदर प्रस्ताव अव्यवहार्य असल्याचे अभिप्राय आले. यास्तव, पुनर्वसन हाती घेता आले नसल्यामुळे निधी अखर्चित राहिला.

(रुपये लाखात)

शीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
८० सर्वसाधारण **१०२ नैसर्गिक आपत्तींचे व्यवस्थापन** **आपत्ती प्रवण क्षेत्रातील आकस्मिक योजना** **(०१) (०३) पोलनेट (POLNET), निकेटर (NICNETR) व इतर नेटवर्क यांच्याशी ऐक्य**				
मूळ	१०.००	.....	.....	.....
पुनर्विनियोजन	(-) १०.००			

कोणतेही विशिष्ट कारण न देता, मार्च, २०१० मध्ये रुपये १० लाख एवढी संपूर्ण अर्थसंकल्पिय तरतूद प्रत्यर्पित करण्यात आली.

ज्ञापन :

३.१७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी यावर्षी करावयाची नसल्याने हा निधी अन्य अत्यावश्यक ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

३. वरील टीप २ मध्ये नमूद केलेली बचत पुढील शीर्षाखालील अधिक खर्चाद्वारे अंशत: प्रतिसंतुलित करण्यात आली

(रुपये लाखात)

शीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०१ अवर्षण **१०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा** **१०२ (००) (००१) आकस्मिक पाणीपुरवठा योजना**				
मुळ	८१,००.००	१,५९,२८.४७	१,७५,९६.९४	(+)१६,६८.४७
पूरक	८०,००.००			
पुनर्विनियोजन	(-)१,७१.५३			

ज्ञापन :

३.१८ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखाली मूळ तरतूद रुपये ८१.०० कोटी इतकी होती. अंतिम सुधारित अनुदानाप्रमाणे एकूण अनुदान रुपये १७६.९३ कोटी इतकी उपलब्ध होते. यापैकी केवळ रुपये ७५.०० लाख एवढी रक्कम शिल्लक आहे. आकस्मिक पाणीपुरवठा ही तातडीची व आकस्मिकपणे उद्भवणारी बाब असल्यामुळे, पूर्णपणे अचूक तरतूद अर्थसंकल्पित करणे शक्य होत नाही.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०५ आपत्ती निवारण निधी **१०१ राखीव निधीकडे व आपत्ती निवारण ठेव लेख्यांकडे हस्तांतरण** **१०१ (०१) (०१) आपत्ती निवारण निधीस अंशदान** मुळ २,०३,२१.०० पूरक २,८५,६८.०० पुनर्विनियोजन (-)४,८८,५०.४७	३८.५३	४,८८,८९.५०	(+)४,८८,५०.९७

वर नमूद करण्यात आलेल्या उपशीर्षाखाली पुनर्विनियोजन/प्रत्यर्पण याद्वारे रुपये ४९०२२ लाख एवढा निधी काढण्यात आला.

वर नमूद करण्यात आलेल्या उपशीर्षाखाली रुपये ५०५१९.४४ लाख एवढया अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

३.१९ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-२०१० मध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचा केंद्र सरकारचा हिस्सा (७५ टक्के) रुपये २०३.२१ कोटी इतका होता, तर राज्य सरकारचा हिस्सा (२५ टक्के) रुपये ६७.७३ कोटी इतका होता. त्याची तरतूद ०५ आपत्ती निवारण फंड अंतर्गत करण्यात आली होती, तर समायोजनाने त्याची वसूली (७०) वजा वसुली याखाली दर्शविण्यात आली आहे. हे समायोजनाचे लेखाशीर्ष असल्याने येथे अधिक खर्च अथवा बचतीचा प्रश्न उद्भवत नाही.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०२, पूर, चक्रीवादळे इत्यादी- **११७, पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना सहाय्य** **११७ (००) (०१) पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना सहाय्य** पूरक ..... ३,००.०० पुनर्विनियोजन ८६.९२	३,८६.९२	३,८७.०७	(+) ०.१५

कोणतेही विशिष्ट कारणे न देता मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रुपये ८६.९२ लाख एवढया अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

३.२० ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मूळ तरतूद रुपये ३.०० कोटी होती. त्यापैकी रुपये १३.४८ लाख इतक्या रक्कमेची बचत झाली आहे. नैसर्गिक आपत्तीशी निगडित लेखाशीर्ष असल्याने १०० टक्के अचूकरित्या निधी अर्थसंकल्पित करणे शक्य होत नाही. अशा प्रकारे उपरोक्त लेखाशीर्षाखाली केवळ रुपये ७५.०० लाख इतकी बचत झाली आहे.

४. विनियोजनामधील रुपये १८१७७.६५ लाख एवढा अतिरिक्त खर्च (प्रत्यक्ष खर्च रुपये १,८१,७७,६४,६१३) नियंत्रित करणे आवश्यक आहे.

५. विनियोजनामधील वाढ पुढील शीर्षाखाली झाली :-

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
०५ आपत्ती निवारण निधी **१०१ राखीव निधीकडे/हस्तांतरण आपत्ती निवारण निधी ठेव खाते** **१०१ (०१) (०३) आपत्ती आकस्मिकता निधीस अंशदान** मुळ ..... ----	-----	१,८२,१०.००	(+)१,८२,१०.००

अर्थसंकल्पात तरतूद नसताना करण्यात आलेल्या रुपये १८२१० एवढया खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाही. (ऑगस्ट, २०१०)

टीप ५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या विनियोजनातील वाढ बचतीद्वारे अंशत: प्रतिसंतुलित करण्यात आली :-

३.२१ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर अनुदान केंद्र सरकारकडून सन २००९-१० मध्ये राज्यास प्राप्त झाले असून, त्याचे लेखांकन केंद्र सरकारकडून प्राप्त १०० टक्के निधी ०५, आपत्ती निवारण फंड, १०१, राखीव निधीकडे हस्तांतरण व आपत्ती निवारण निधी ठेव खाते (०१) (०३) राष्ट्रीय आपत्ती आकस्मिकतता निधीस अंशदान (१०० टक्के केंद्र शासनाचे अनुदान) योजनेत्तर (२२४५१६८१), ६३, आंतर लेखा हस्तांतरण याखाली करणे आवश्यक होते. तथापि, ते तसे अनावधानाने न झाल्याने सदर बाब उद्‌भवली आहे. तथापि, हे लेखाशीर्ष केवळ समायोजनाचे लेखाशीर्ष असून, याखाली प्रत्यक्ष खर्च देयकाद्वारे केला जात नाही. हा निधी अन्य लेखाशीर्षामध्ये आवश्यकतेप्रमाणे विभागून खर्च केला जातो. यास्तव, सदर निधी या लेखाशीर्षाखाली अधिकचा खर्च म्हणून झालेला नाही.

(रुपये लाखात)

शीर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०१ अवर्षण **८०० इतर खर्च** **८०० (००) (०२) संचालन व प्रशासन इतर खर्च**				
मूळ	३०.००			
पुनर्विनियोजन	(-) २५.४०	४.६०	४.६०	--

कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता मार्च, २०१० मध्ये रुपये २५.४० लाख इतका निधी परत करण्यात आला.

३.२२ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात महसूल (मदत व पुनर्वसन) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षाखाली मूळ तरतूद रु.३०.०० कोटी इतकी होती. तथापि, अन्यत्र तातडीच्या बाबींकरिता निधी आवश्यक असल्याने तो पुनर्विनियोजित निधी वर्ग करण्यात आला.

७. आपत्ती निवारण निधी :-

३.२३ वर्षभरात भारत सरकारने मागील वर्षाच्या अनुशेषासह द्यावयाचे रुपये ६७१ कोटी इतके अंशदान दिले. महाराष्ट्र शासनाने या वर्षात राज्याचा हिस्सा म्हणून रुपये ६७.७४ कोटी एवढया रक्कमेचे अंशदान दिले आहे.

सन २००९-१० या वर्षात निधीमध्ये एकूण रुपये ७३८.७४ कोटी इतक्या खर्चाची रक्कम हस्तांतरित करण्यात आली.

दिनांक ३१ मार्च, २०१० रोजी निधीमध्ये कोणतीही जमा शिल्लक नव्हती. सन २००९-१० वर्षासाठीचा निधीच्या तपशीलवार लेखा सन २००९-१० यांच्या विवरणपत्र क्रमांक १८ मध्ये अंतर्भूत करण्यात आला आहे.

साक्ष :-

३.२४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. सदर बैठकीत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात महालेखापरिक्षकांनी विभागाच्या निदर्शनास आणले की, इसमें बहुत सारे फिगर ऐसे है जिनको आपका विभाग एग्री नही कर रहा रै. कुछ फिगर्स को चेंज भी किये गया है. एकाउंट में रिकंसीलिएशन का सिस्टम है परन्तू आपके यहां ६० प्रतिशत एकाउंट का रिकंसीलिएशन का सिस्टम फॉलो नही कर रहा है. आपके विभाग ने नोट ऑफ एरर नही दिया है. उन विभाग को प्रिलिमिनरी एकाउंट भेजते है. इस सिस्टम में हर काम की एक स्टेज होती है. आपके विभाग ने एकाउंट का रिकंसीलिएशन करके अभी तक यह नही बताया था कि यह सही है या नही है और यही सही है. पिछले साल मंत्रालय में आग लग गई थी, हमने वित्त विभाग से भी इस बारे में चर्चा की है. हमारा ऐसा कहना है कि अगर विभाग एक्सपेंडीचर का डिटेल नही देता तो हम इस बारे में चर्चा की है. हमारा ऐसा कहना है कि अगर विभाग एक्स्पेंडीचर का डिटेल नही देगा तो हम इस बारे में चर्चा कैसे कर पायेंगे ?

३.२५ महालेखाकारांनी विदित केलेली उपरोक्त वस्तुस्थिती पहाता असे दिसून येते की, मदत व पुनर्वसन विभाग हा महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात गांभिर्याने विचार करीत नाही. विभागाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग व वेगवेगळे उप विभाग असतानासुध्दा विभागाकडून समितीच्या बैठकीच्या आदल्या दिवशी महालेखाकार कार्यालयाशी संपर्क साधतात याचा अर्थ असा होतो की, विभाग समितीला गृहित धरीत आहे. We are not satisfied with your performance on the Audit Paras. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात स्पष्टीकरण देताना सांगितले की, विभागामध्ये २२४५ या प्रधान लेखाशिर्षाखाली वेगवेगळे २४ उपशीर्ष आहेत त्या अंतर्गत ६ विभागीय महसूल आयुक्त, ३३ जिल्हाधिकारी, ३०० तहसिलदारांपर्यंत निधीचे वाटप केले जाते. मंत्रालय स्तरावर ४ महत्वाच्या विभागांमध्ये निधी वितरीत केला जातो. त्यात कृषी, पाणी पुरवठा विभागाचा समावेश होतो.

३.२६ महसूल विभागाचे स्वरुप असे आहे की, सुरुवातीचे अनुदान आणि अंतिम अनुदान यामध्ये नेहमी फरक पडतो. मागील वर्षी मूळ तरतूद २४० कोटी रुपये होती. परंतु पडलेल्या दुष्काळाचे तीव्र स्वरुप पाहता विभागाचा खर्च २६०० कोटी रुपयांपर्यंत गेला. प्रत्येक वेळी पुनर्विनियोजन करावे लागते. यावर्षी विभागाने मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद केली. सुदैवाने दुष्काळाची तीव्रता कमी झाली. पंरतु विदर्भामध्ये फार मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. त्यामुळे दुष्काळाच्या संदर्भाने पाणी पुरवठा, चारा व पाणी टंचाईवर मात करण्यासाठी राखीव ठेवलेला निधी पुनर्विनियोजनाव्दारे विदर्भातील अतिवृष्टी झालेल्या भागामध्ये अत्यावश्यक मदतीकरिता वळविण्यात आला.

३.२७ विभागीय सचिवांनी सांगितलेल्या उपरोक्त वस्तुस्थितीशी समितीने सहमती दर्शविली. परंतु नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावेच लागते. त्याकरिता शासन वेगवेगळ्या माध्यमातून आर्थिक मदत उपलब्ध करुन देते. नैसर्गिक आपत्तीचे स्वरुप कसे असणार आहे याचा अंदाज अगोदर येणे शक्य नाही. परंतु अतिवृष्टी झाली, गारपीट झाली, दुष्काळ पडला तर शासनाला आर्थिक मदत करावीच लागते.

३.२८ असे जरी असले तरी महालेखापालांनी उपस्थित केलेल्या आक्षेप व त्यासंबंधात विभागाने केलेली पुर्तता याबाबत विभागाने ठरवून दिलेल्या पध्दतीचा अवलंब केलेला नाही. महसूल विभागाला उपलब्ध झालेला निधी वेगवेगळ्या एजन्सीमार्फत वितरीत केला जातो. परंतु याकरिता जी कार्यपध्दती आखून दिली आहे, जे निकष ठरवून दिले आहेत, महालेखापालांची बंधने आहेत, लोकलेखा समितीची बंधने आहेत, त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. खर्चमेळाचे काम करण्यामध्ये अडचण का येते ? विभागाचे प्रमुख याबाबत गंभीर नसतील तर खालच्या स्तरावर त्याचा योग्य तो परिणाम दिसून येणार नाही ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, लेखा आक्षेपांबाबत विभाग गंभीर आहे. पुनर्विनियोजनाची विहित पध्दत अशी होती की, २४ शीर्षापैकी सुधारित तरतूद दिली जात असेल किंवा शेतीकरिता असलेला निधी पाणी टंचाईसाठी वळविला जात असेल तर त्या आदेशाची एक प्रत महालेखापालांना पाठविली जात असे. आता नवीन पध्दत सुरु केली आहे, त्यानुसार पुनर्विनियोजन झ ाल्याबरोबर तातडीने महालेखापाल कार्यालयाशी संपर्क साधून ताळमेळ घातला जातो. महसूल विभागांतर्गत पुनर्विनियोजनाचे प्रमाण खूप मोठे असते. त्यामुळे विभागाने वेगळी मोहिम हाती घेतली होती. पुनर्विनियोजनाबाबत ताळमेळ डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करायचे ठरविले आहे. त्यामुळे डिसेंबरपर्यंत चित्र स्पष्ट होईल. तसे केल्यानंतर हा प्रश्न उद्‌भवणार नाही.

३.२९ महालेखापाल कार्यालयाकडे वेळेवर आदेशाची प्रत पोहोचत नाही. याचाच अर्थ असा होतो की, विभागांच्या अंतर्गत ज्यांनी वेळेवर काम करणे अपेक्षित असते त्यांनी ते केले नाही, त्याबद्दल त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई झाली नाही. लोकलेखा समितीने आपल्या अहवालांमध्ये महसूल विभागाकरिता ६२ शिफारशी केलेल्या आहेत, त्या अद्याप प्रलंबित आहेत ? या शिफारशींबाबत विभागाने कार्यवाही करुन त्याची माहिती समितीला ठराविक मुदतीत प्राप्त होणे अपेक्षित असते. शिफारशीच्या अनुषंगाने शिस्तभंगविषयक कारवाई असेल, अनियमितता असेल त्या अनुषंगाने विभागाकडून ठोस पाऊल उचलले गेल्यास समितीने जी काही शिफारस केली होती त्याबाबत विभागाने कार्यवाही केली आहे हे समितीला दिसून येईल. याअनुषंगाने मदत व पुनर्वसन विभागाशी संबंधित शिफारशीसंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस प्रतिपादन केले की, लोकलेखा समितीने ११ व्या विधानसभेला

सादर केलेल्या अहवालामध्ये २२ शिफारशी केल्या होत्या. त्यापैकी मदत व पुनर्वसन विभागाशी संबंधित ७ शिफारशी आहेत. १२ व्या विधानसभेला सादर केलेल्या अहवालामध्ये ४० शिफारशी केलेल्या आहेत. त्यापैकी मदत व पुनर्वसन विभागाशी संबंधित १२ शिफारशी आहेत. या शिफारशींच्या अनुषंगाने विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

३.३० सन २०१३ मध्ये आलेले फायलीन वादळाच्या अनुषंगाने जी आपत्कालीन व्यवस्था करण्यात आली त्यामुळे जीवित व वित्त हानीचे प्रमाण फार कमी असल्याचे दिसून येते. या अनुषंगाने जर महाराष्ट्रात अशी एखादी नैसर्गिक आपत्ती किंवा वादळ आले तर मदत व पुनर्वसन विभागाने कोणती यंत्रणा उभी केली आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यात आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष आहे. त्याकरिता स्वतंत्र सचिव दर्जाचे आयएएस अधिकारी नेमण्यात आले आहेत. प्रत्येक जिल्ह्यामध्ये नियंत्रण कक्षाची स्थापन केली असून त्याच्याकडे आपत्कालीन व्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक ती यंत्रसामग्री, उपकरणे उपलब्ध आहेत. या वर्षी पावसाळ्यात अमरावती आणि यवतमाळ जिल्हयात २-३ गावे पूर्णपणे पुराच्या पाण्याने वेढली गेली होती. लोकांचे स्थलांतर करण्याची वेळ आली तर वेळ लागू नये म्हणून सहा तासामध्ये नागपूर येथे पाच हेलिकॉप्टर तयार ठेवली होती. आपत्कालीन यंत्रणा सुसज्ज आहे. कोणत्याही परिस्थितीत कमीत कमी वेळेत प्रतिसाद मिळू शकतो. तसेच जिल्हा पातळीवर सुध्दा आपत्कालीन यंत्रणा उभी केली आहे.

३.३१ राज्यात २३ महानगरपालिका आहेत. केंद्र सरकारने त्यांच्यावर आपत्कालीन व्यवस्थेबाबत बंधन घातलेले आहे. त्या संदर्भात आपत्कालीन यंत्रणेकरिता अभ्यासक्रम आहे, प्रशिक्षण द्यायचे आहे. आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष हा कायमस्वरुपी विभाग नाही. परंतु तेथे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपत्कालीन व्यवस्थेबाबत प्रशिक्षण देऊन त्याचा उपयोग करुन घेतला जातो. राज्यातील महानगरपालिकांमध्ये आपत्कालीन यंत्रणा उभी केली आहे का ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्याची आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध आहे. मुंबईतील अंधेरी येथे ६५ लोकांचा कक्ष आहे. तो कक्ष आपत्कालीन परिस्थितीमध्ये शहरामध्ये कुठेही एक ते दोन तासात पोहोचू शकतो. आपत्कालीन व्यवस्थापनाकरिता राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी अंतर्गत राज्याला केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध होतो. यावर्षी ५१२ कोटी रुपये मिळाले आहेत. यासंदर्भात केंद्र सरकारच्या स्तरावर मंत्री गट नेमला असून त्याचे केंद्रीय कृषी मंत्री हे अध्यक्ष आहेत. ५१२ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला तर त्या संदर्भात केंद्र सरकारला ज्ञापन पाठविले जाते. त्याचा मध्यवर्ती गट राज्यात येतो. मागील दुष्काळाच्या काळात पाच वेळा मध्यवर्ती गट राज्यात आला होता. दुष्काळाच्या राज्यात राज्य सरकारने २००० कोटी रुपये खर्च केले. त्या संपूर्ण खर्चाचा क्लेम केंद्र सरकारकडे

केला होता. त्यापैकी बहुतेक निधी राज्याला मिळाला आहे. हा निधी बहुतेक योजनांतर्गत असतो. नवीन कंट्रोल रुम स्थापन करणे, साधनसामुग्री खरेदी करणे इत्यादी बाबी असतात.

३.३२ विभागीय सचिवांनी विदीत केलेली उपरोक्त माहिती लेखी स्वरुपात समितीला सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले परंतु सदर माहिती समितीस अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.

३.३३ समितीने पुढे अशी विचारणा केली की, एखाद्या सार्वजनिक ठिकाणी जनतेच्या दृष्टीने सीसीटीव्ही बसविण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापनेवर अंतर्गत निधी दिला जाईल का ? यावर हे काम गृह विभागाचे आहे. सॅटेलाईट फोन, पुराच्या संदर्भाने सामुग्री खरेदी करणे, फायबर बोटी या कामाकरिता आपत्कालीन व्यवस्थापनेवर अंतर्गत खर्च करता येतो. असे विभागाकडून सांगण्यात आले.

३.३४ मदत व पुनर्वसन विभागाच्या लेखा आक्षेपांच्या संदर्भात समितीने तयार केलेली प्रश्नावलीची लेखी स्वरुपात समितीला उत्तरे व 'पशुधन खरेदीकरिता शेतकऱ्यांना सहाय्य' या अंतर्गत जिल्हानिहाय किती निधी खर्च केला याची यादी समितीला सादर करावी तसेच प्रलंबित मुद्यांबाबत महालेखापाल कार्यालयाशी विभागाने त्वरीत संपर्क साधून तातडीने पुनर्विनियोजन करुन घ्यावे असे निदेश समितीने विभागास दिले. (माहिती अप्राप्त आहे.)

३.३५ तसेच महालेखाकारांनी विभागीय सचिवांना सुचित केले की, इस तरह के जो प्रलंबित मामले है उनका आप नोट ऑफ एरर बना लीजिए. महालेखाकार कार्यालय इसको मान्य तो नही कर पायेगा लेकिन आपके एकाउंट के लिए वह ठीक रहेगा. इसमें अगर आपको कोई दिक्कत है तो आप वित्त विभाग की मदद ले सकते हे.

समितीचे अभिप्राय

३.३६ महसूल विभागाचे सुरुवातीचे अनुदान आणि अंतिम अनुदान यामध्ये नेहमी तफावत असते. सन २००८-२००९ मध्ये मूळ तरतुद २४० कोटी रुपये होती परंतु पडलेल्या तीव्र दुष्काळामुळे विभागाचा अंतिम खर्च २६०० कोटीपर्यंत झाला. यामुळे प्रत्येक वेळी पुनर्वियोजन करावे लागले. सन २००९-२०१० मध्ये विभागाने मोठया प्रमाणात आर्थिक तरतुद केली. परंतु दुष्काळाची तीव्रता कमी झाली परंतु विदर्भामध्ये मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाली त्यामुळे दुष्काळांच्या संदर्भात पाणीपुरवठा, चारा व पाणी टंचाईवर मात करण्यासाठी राखीव असलेला निधी पुनर्विनियोजनाद्वारे विदर्भातील अतिवृष्टी झालेल्या आवश्यक मदतीसाठी वळता केला. महसूल विभागाला उपलब्ध निधी वेगवेगळया एजन्सी मार्फत वितरीत केला जातो. परंतु या निधीचे खर्च मेळाचे काम विभागाकडून वेळीच केले जात नाही.

समितीच्या शिफारसी

३.३७ शिफारस क्र. (१) मदत व पुनर्वसन विभागाकडून ताळमेळाचे काम नियमित पुर्ण करण्यात यावे तसेच विभागाने चुकीच्या नोंदीबाबतही कार्यवाही वेळेत करावी. सदर दोन्ही मुद्यांबाबत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती एक महिन्यात समितीस सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३८ शिफारस क्र.(२) समितीने साक्षीदरम्यान काही महत्वाच्या मुद्यांबाबत माहिती लेखी स्वरुपात मागितली होती. साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी आश्वासित केलेली माहिती अद्यापपर्यत अप्राप्त राहणे ही बाब समितीचा अवमान करणारी ठरते. साक्षीदरम्यान केवळ वेळ मारुन नेण्यासाठी अशा प्रकारची आश्वासने समितीसमोर देण्यात येतात असे आता समितीचे स्पष्ट मत आहे. अशाप्रकारे आश्वासित माहिती समितीला लेखी स्वरुपात न देण्याऱ्या संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची प्रत समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्रमांक एच-८ " सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च " यासंदर्भात खालील अभिप्राय दिले आहेत.

प्रधानशिर्ष-४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च,
४२०२ शिक्षण, क्रिडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च,
४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च,
४२११ कुटुंब कल्याणवरील भांडवली खर्च,
४२१७ नगर विकासावरील भांडवली खर्च,
४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च,
४२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च,
४२५० इतर सामाजिक व सामूहिक सेवांवरील भांडवली खर्च,
४४०१ पीक संवर्धनावरील भांडवली खर्च,
४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च,
४४०३ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च,
४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च,
४४०३ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च,
४४०४ दुग्धव्यवसाय विकासावरील भांडवली खर्च,
४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च

(रु.हजारात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
मूळ १,५४,१७,९२ पूरक ४,९७,३६,६० वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१०)	६,५२,०८,५२	४,७०,६३,२९	(-)१,८१,४५,२३ १,७७,२१,६१

टिपा व भाष्ये :-

अनुदानाखालील रु.१,८१,४५.२३ लाख एवढी अंतिम बचत असताना मार्च, २०१० मध्ये केवळ रु.१,७७,२१.६१ लाख इतका निधी परत करणे अपेक्षित होते.

४.२ ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी विनियोजन लेखा २००९-२०१० ची पृ.क्र. १९३ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, ४०५८ लेखनसामुग्री व मुद्रण यावरील भांडवली खर्च, ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ४२०२ शिक्षण, क्रिडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च, ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च, ४२११, कुटुंब कल्याणावरील भांडवली खर्च, ४२१७, नगर विकासावरील भांडवली खर्च, ४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, ४२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च, ४२५० इतर सामाजिक व सामूहिक सेवांवरील भांडवली खर्च, ४४०१ पीक संवर्धनावरील भांडवली खर्च, ४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च, ४४०३ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च, ४४०४ दुग्धव्यवसाय विकासावरील भांडवली खर्च, ४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्चा संबंधी आहे.

४.३ या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सन २००९-२०१० मध्ये एकूण रु.६,५२,०८,५२ हजार (रुपये सहाशे बावन्न कोटी आठ लाख बावन्न हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती तर त्या तुलनेत खर्च रु.४,७०,६३,२९ हजार (रुपये चारशे सत्तर कोटी त्रेसष्ठ लाख एकोणतीस हजार फक्त) झाला. परिणामी रु.१,८१,४५,२३ हजार (रुपये एकशे एक्याऐंशी कोटी पंचेचाळीस लाख तेवीस हजार फक्त) बचत झाल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात रु.४,२३,६२ हजार (रुपये चार कोटी तेवीस लाख बासष्ट हजार फक्त) (रु.१,८१,४५,२३-रु.१,७७,२१,६१) इतकी बचत झाली. झालेली बचत अल्प असून एकूण अनुदानाच्या ०.६५ टक्के इतकी आहे.

४.४ वस्तुस्थितीचा विचार करता बचत क्षमापित करण्याची विनंती आहे. गौणशीर्षानिहाय स्पष्टीकरणे पृ.१२६ ते १५५ प.वि.वर स्वतंत्रपणे ठेवली आहेत.

(रु.हजारात)

दत्तमत	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
मूळ १,५६ पूरक ५,३७,७३ वर्षभरात परत केलेली रक्कम	५,३९,२९	३,६८,०१	(-)१,७१,२८ १,७१,२९

(मार्च २०१०)			

टिपा व भाष्ये :-

४.५ अनुदानाखालील रु.१,८१,४५.२३ लाख एवढी अंतिम बचत असताना मार्च २०१० मध्ये केवळ रु.१,७७,२१.६१ लाख इतका निधी परत करणे अपेक्षित होते.

ज्ञापन :-

४.६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

तसेच भारीत अनुदानाखाली रु.५,३९,२९ हजार (रुपये पाच कोटी एकोणचाळीस लाख एकोणत्तीस हजार फक्त) त्या तुलनेत रु.३,६८,०१ हजार (रुपये तीन कोटी अडुसष्ट लाख एक हजार फक्त) एवढा प्रत्यक्ष खर्च झाला. परिणामी रु.१,७१,२८ हजार (रुपये एक कोटी एकाहत्तर लाख अठ्ठावीस हजार) एवढी बचत झाली असल्याचे दिसून येते. तथापि, प्रत्यक्षात रु.०.०१ लाख (रु.१,७१,२९ हजार-१,७१२८ हजार) एवढीच बचत झाली आहे. वस्तुस्थितीचा विचार करता बचत क्षमापित करण्याची विनंती आहे.

(रु.हजारात)

दत्तमत	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती ०५१ बांधकाम ०३ न्यायदान केंद्र पुरस्कृत योजना राज्य हिस्सा (योजनांतर्गत) (०३) (०१) मोठी बांधकामे (०३) (०२) आस्थापना खर्च (०३) (०३) हत्यारे व संयंत्र खर्च मूळ १६,०७.२४ पूरक ६९,६७.६४	८५,७४.८८	८५,०६.४७	(-) ६८.४१

टिपा व भाष्ये :-

वरील उपशीर्षाखाली रु.६८.४१ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :-

४.७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी विनियोजन लेखा २००९-२०१० ची पृ.क्र. १९३ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्रमांक-एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष-४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती ०५१ बांधकाम, ०३ न्यायदान केंद्र पुरस्कृत योजना राज्य हिस्सा (योजनांतर्गत) (०३) (०१) मोठी बांधकामे (०३) (०२) आस्थापना खर्च (०३) (०३) हत्यारे व संयंत्र खर्च संबंधी आहे.

४.८ या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सन २००९-२०१० मध्ये एकूण रु.८५,७४.८८ लाख (रुपये पंचाऐंशी कोटी चौऱ्याहत्तर लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती तर त्या तुलनेत खर्च रु.८५,०६.४७ लाख (रुपये पंचाऐंशी कोटी सहा लाख सत्तेचाळीस हजार फक्त) झ ाला. परिणामी रु.६८.४१ लाख (रुपये अडुसष्ट लाख एकेचाळीस हजार फक्त) बचत झाली. सदर बचत राज्य हिस्सा अंतर्गत योजनेतील न्यायालयांच्या कार्यालयीन इमारतींच्या बांधकामावरील आहे. झालेली बचत एकूण अनुदानाच्या ०.८० टक्के इतकी अल्प आहे. वस्तुस्थितीचा विचार करता बचत क्षमापित करण्याची विनंती आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०५९ सार्वजनिक बांधकामा वरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती ०५१ बांधकाम (०७) जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत) (०७) (०१) मोठी बांधकामे (०७) (०२) आस्थापना खर्च (०७) (०३) हत्यारे व संयंत्र खर्च मूळ ९,४०.८० पूरक ५९,०९.२९ पुनर्विनियोजन (-) २४,४३.९९	४४,०६.१०	४३,९७.२१	(-) ८.८९

ज्ञापन :-

४.९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या झ ापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी विनियोजन लेखा २००९-२०१० ची पृ.१९३ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-८-सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्याचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम (०७), जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत), (०७) (०१) मोठी बांधकामे, (०७) (०२) आस्थापना खर्च, (०७) (०३) हत्यारे व संयंत्र खर्च संबंधी आहे.

या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सन २००९-२०१० मध्ये एकूण रु.४४,०६.१० लाख (रुपये चव्वेचाळीस कोटी सहा लाख दहा हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती तर त्या तुलनेत खर्च रु.४३,९७.२१ लाख (रुपये त्रेचाळीस कोटी सत्याण्णव लाख एकवीस हजार फक्त) झाला. परिणामी रु.८.८९ लाख (रुपये आठ लाख एकोणनव्वद हजार फक्त) बचत झाली. झालेली बचत महसूल व वन विभागाच्या इमारतींच्या बांधकामावरील असून एकूण अनुदानाच्या ०.२० टक्के आहे. संपूर्ण वर्षामध्ये रु.६८५०.०९ लक्ष एवढी तरतूद होती. सुधारित अंदाज रु.५४९५.०९ लक्ष इतके अंतिम करण्यात आले होते. परंतु वित्त विभागाने अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर रु.४७७८.३४ लक्ष एवढीच तरतूद उपलब्ध करुन दिलेली होती. त्यामुळे सदर तरतूदीच्या मर्यादेतच खर्च करणे आवश्यक असल्याने, रु.४४०६.१० लक्ष एवढे अंतिम सुधारित अनुदान कायम करुन उर्वरीत रु.२४४३.९९ एवढी तरतूद वर्ष अखेरीस समर्पित करण्यात आली आहे. वस्तुस्थितीचा विचार करता बचत क्षमापित करण्याची विनंती आहे.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती १०१ बांधकाम (२१) न्यायदान केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा) (२१) (०१) मोठी बांधकामे (२१) (०२) आस्थापना खर्च (२१) (०३) हत्यारे व सयंत्र खर्च मूळ २,५९.१५ पूरक २०,४२.२५ पुनर्विनियोजन (-) ४.११	२२,७९.२९	२२,७९.२८	(-) १८.०१

ज्ञापन :-

४.१० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी विनियोजन लेखा २००९-२०१० ची पृ.१९३ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-८, सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, (०७) जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत), (२१) (०१) मोठी बांधकामे, (२१) (०२) आस्थापना खर्च, (२१) (०३) हत्यारे व संयंत्र खर्च संबंधी आहे.

४.११ या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सन २००९-२०१० मध्ये एकूण रु. २२,९७.२९ लाख (रुपये बावीस कोटी सत्याण्णव लाख एकोणतीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती तर त्या तुलनेत खर्च रु.२२,७९.२८ लाख (रुपये बावीस कोटी एकोणऐंशी लाख अठ्ठावीस हजार फक्त) झाला. परिणामी रु.१८.०१ लाख (रुपये अठरा लाख एक हजार फक्त) बचत झाली. सदर बचत केंद्र हिस्सा योजनेअंतर्गत न्यायालयीन कार्यालयीन इमारतींच्या बांधकामावरील आहे. बचत एकूण अनुदानाच्या ०.७८ टक्के आहे. वस्तुस्थितीचा विचार करता बचत समर्पित करण्याची विनंती आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती ०५१ बांधकाम (१२) निरीक्षण बंगले, विश्रामगृहे (योजनांतर्गत) (१२) (०१) मोठी बांधकामे (१२) (०२) आस्थापना खर्च (१२) (०३) हत्यारे व संयंत्र खर्च, मूळ ३,२३.२१ पूरक २,३०.३० पुनर्विनियोजन (-) १,१०.५०	४,४३.०१	४,४३.००	(-)०.०१

ज्ञापन :-

४.१२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सन २००९-२०१० मध्ये एकूण रु.४,४३.०१ लाख (रुपये चार कोटी त्रेचाळीस लाख एक हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती तर त्या तुलनेत खर्च रु.४,४३.०० लाख (रुपये चार कोटी त्रेचाळीस लाख फक्त) झाला. परिणामी रु.०.०१ लाख (रुपये एक हजार फक्त) बचत झाली. सदर बचत निरीक्षण बंगले, विश्रामगृहे यांच्या बांधकामावरील असून एकूण अनुदानाच्या तुलनेत अल्प आहे. संपूर्ण वर्षामध्ये रु.५५३.५१ लक्ष एवढी

तरतूद उपलब्ध होती. परंतु वित्त विभागाने रु.४४३.०१ लक्ष एवढे सुधारित अंदाज मान्य केल्याने, उर्वरीत रु.११०.५० लक्ष एवढी तरतूद समर्पित करण्यात आली आहे.

वस्तुस्थितीचा विचार करता बचत क्षमापित करण्याची विनंती आहे.

(रु.हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२०२, शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च, ०४ कला व संस्कृती १०१ ललितकला शिक्षण इमारती (००)(०१) मोठी बांधकामे (००)(०२) आस्थापना खर्च (००) (०३) हत्यारे व संयंत्र खर्च मूळ १६.६७ पूरक ८,१३.९१ पुनर्विनियोजन (-) १,६६.१२	६,६४.४६	३,०२.८४	(-) ३,६१.६२

ज्ञापन :-

४.१३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी विनियोजन लेखा २००९-२०१० ची पृ.क्र.१९४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशिर्ष-४२०२, शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च, ०४ कला व संस्कृती, १०१, ललितकला शिक्षण इमारती (००) (०१) मोठी बांधकामे (००)(०२) आस्थापना खर्च (००) (०३) हत्यारे व संयंत्र खर्च संबंधी आहे.

४.१४ या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सन २००९-२०१० मध्ये एकूण रु.६,६४.४६ लाख (रुपये सहा कोटी चौसष्ठ लाख सेहेचाळीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती तर त्या तुलनेत खर्च रु.३,२.८४ लाख (रुपये तीन कोटी दोन लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) झाला. परिणामी रु.३,६१.६२ लाख (रुपये तीन कोटी एकसष्ठ लाख बासष्ट हजार फक्त) बचत झाली. सदर बचत ललितकला शिक्षण (चित्रकला महाविद्यालय) विभागाच्या बांधकामावरील आहे. अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वर्षअखेरीस अनुदान प्राप्त झाल्याने प्राप्त अनुदान खर्च करणे शक्य झाले नाही. परिणामी बचत दिसून येते. वित्त विभागाने

सुधारित अंदाज रु.६६४.४६ लक्ष अंतिम केल्याने उर्वरीत रु.१६६.१२ लक्ष एवढी तरतूद समर्पित करण्यात आली आहे. वर्षअखेरीस रु.३१४.४२ लक्ष एवढी तरतूद प्राप्त झाल्याने सदर तरतूद खर्च करणे शक्य झाले नाही. परिणामी रु.३६१.६२ लक्ष इतकी बचत झाली.

वस्तुस्थितीचा विचार करता बचत क्षमापित करण्याची विनंती आहे.

साक्ष :-

४.१५ उपरोक्त परिच्छेदांसंदर्भात समितीने दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी सचिव, सार्वजनिक बांधकाम व अन्य विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. सदर परिच्छेदातला आक्षेप हा न्यायालयाच्या कार्यालयीन इमारतीच्या बांधकामावरील झालेल्या खर्चाबाबत असून सदर अनुदानात झालेली बचत राज्य हिस्सा अंतर्गत झालेली असली तरी बचतीची कारणे महालेखापालांना विहित मुदतीत कळविण्यात आली नसल्यामुळे महालेखाकारांनी सदरहु आक्षेप काढला आहे.

४.१६ शासकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी जे काम करीत असतात त्याचे कोणीतरी लेखापरिक्षण करीत असते, ठराविक कामे एका विशिष्ट कालमर्यादेमध्येच विहित पध्दतीत पूर्ण करावयाची असतात, याकडे शासकीय कर्मचाऱ्यांकडून पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्यामुळे लोकलेखा समितीकडे अशा प्रकारचे आक्षेप परिच्छेदाच्या स्वरुपात येतात. एखादे वेळेस ठराविक कालमर्यादेनंतर काही दिवसांनी संबंधित कामे पूर्ण झालेली असतात. परंतु ती कामे विहित मुदतीत न झाल्यामुळे ती महालेखापालांच्या अभिलेख्यामध्ये येत नाहीत त्यामुळे लोकलेखा समितीपुढे आक्षेपांचे परिच्छेद येतात. नियोजित कामे विहित मुदतीत न करण्याच्या वृत्तीमुळे लोकलेखा समितीला जूनी प्रकरणे हाताळावी लागतात तसेच जर एखादे अपूर्ण काम विहित मुदतीनंतर पूर्ण केले तर त्यासंबंधीचा परिच्छेद महालेखाकारांकडून तपासून घ्यावा. परंतु असेही न केल्यामुळे सदरहू प्रकरणे लोकलेखा समितीस हाताळावी लागतात. त्यामुळे ज्या कोणाकडून विलंब होत असेल त्याच्यावर कामाची जबाबदारी निश्चित करुन यांना "कारणे दाखवा नोटीस" देऊन नियमाप्रमाणे त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी असे मत समितीने बैठकीच्या सुरुवातीलाच समितीने नाराजीने व्यक्त केले.

४.१७ न्यायालयाच्या कार्यालयीन इमारतीच्या बांधकामावरील खर्च असून बचत राज्य हिस्सा अंतर्गत झालेली असली तरी बचतीची कारणे महालेखापालांना विहित मुदतीत कळविण्यात आली नाहीत यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, न्यायालयीन इमारतीच्या बांधकामामध्ये एकूण ६८.४१ लाख रुपये बचत झालेली आहे. यवतमाळ येथील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामामध्ये २८.५२ लक्ष रुपयांची बचत झालेली आहे. त्यामुळे मार्च २०१३ मध्ये उपरोल्लिखित रक्कम व्यपगत झालेली आहे. या बचतीची रक्कम समर्पित करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प, यवतमाळ यांच्यावर सोपविण्यात आली होती.

४.१८ बचतीची रक्कम समर्पित करण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली होती त्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागाने कोणत्या स्वरुपाची कारवाई प्रस्तावित केलेली आहे ? कारण. शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना या संदर्भात कठोर शिस्त लावणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याकरिता माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून "कारणे दाखवा नोटीस" देण्याचा प्रस्ताव आलेला आहे त्या अनुषंगाने विभागांतर्गत कार्यवाही चालू आहे.

४.१९ संबंधित बेजबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याकरिता विभाग माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेची वाट बघत होते का ? या बाबीला एकूण दोन वर्ष पूर्ण झालेली असताना आतापर्यंत विभागाने संबंधितांना "कारणे दाखवा नोटीस" का दिलेली नाही अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, यापूर्वी संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून अशा सूचना आलेल्या आहेत की, ज्या कार्यकारी अभियंत्यांनी बचतीची रक्कम वेळेवर प्रत्यावर्तित केलेली नाही, त्यांच्याविरुध्द "कारणे दाखवा नोटीस" देऊन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई ताबडतोब करण्यात यावी. या सुचनेनुसार विभागामध्ये कार्यवाही सुरु आहे. यवतमाळ येथील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामातून एकूण २८.५२ लक्ष रुपयांची बचत झालेली आहे. तसेच नागपूर येथील न्यायालयीन इमारतींच्या बांधकामामध्ये ३९.२६ लक्ष रुपयांची बचत झालेली आहे. केंद्र शासनाकडून या योजनेअंतर्गत एकूण ८५.७४ कोटी रुपयांचे अनुदान आले होते. यामध्ये राज्य शासनाचाही हिस्सा होता. यापैकी ६८.४१ लक्ष रुपयांची बचत झाल्यामुळे ते अखर्चित राहिलेले आहेत. ही रक्कम अखर्चित राहिल्यामुळे ती आता व्यपगत झालेली आहे. सन २००९-२०१० मध्ये एकूण रुपये ८५,७४,८८ लाख एवढी तरतूद या लेखाशीर्षाअंतर्गत उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत रु.८५,०६,४७ लाख रुपये खर्च झाला. परिणामी रु.६८.४१ लाख रुपये बचत झाली. सदर बचत राज्य हिस्सा अंतर्गत योजनेतील न्यायालयांच्या कार्यालयीन इमारतींच्या बांधकामावरील आहे. झालेली बचत एकूण अनुदानाच्या ०.८० टक्के इतकी अल्प आहे. त्यामुळे वस्तुस्थितीचा विचार करता सदर बचत क्षमापित करण्याची विनंती विभागीय सचिवांनी समितीस केली.

४.२० यवतमाळ येथील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाच्या कामाची जबाबदारी निश्चित करुन संबंधित अधिकारी यांना "कारणे दाखवा नोटीस" देऊन नियमाप्रमाणे कारवाई करावी याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये कळंब व आर्णी, जि. यवतमाळ येथील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामासाठी लेखाशिर्ष ४०४९ व ५०५४ करिता रु.३९.४० लक्ष एवढी रक्कम दि.२०.११.२००९ रोजी अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आली होती. त्यापैकी

रु.१४.१६ लक्ष एवढा निधी खर्च झाला असून रु.२४.८० लक्ष एवढी बचत झालेली आहे. सदर रक्कम अखर्चित ठेवल्याबद्दल श्री.यु.जे.डांबे, तत्कालीन कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, यवतमाळ यांचा खुलासा शासनाच्या दि.१८ जुलै, २०११ च्या पत्रान्वये मागविण्यात आला होता. त्यानुसार श्री.डांबे यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई/विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

४.२१ न्यायालयीन इमारतींच्या बांधकामामध्ये प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात हलगर्जीपणा झालेला आहे. केंद्र पुरस्कृत योजनांकरिता राज्य शासनाकडून वेळेवर मॅचिंग ग्रांट न मिळाल्यामुळे या योजनांचा निधी अखर्चित राहतो, असे विभागाचे म्हणणे आहे काय ? आज मुंबई व इतर शहरांमधील न्यायालयीन इमारतींची दुर्दशा पाहून असे वाटते की, या इमारतींवर अधिक खर्च करण्याची नितांत आवश्यकता आहे. न्यायालयीन इमारतींमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करुन त्या अधिकाधिक अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे असे समितीने सुचित केले.

४.२२ मुंबई व इतर शहरांमध्ये ब्रिटीशकालीन अनेक इमारती आहेत. या इमारतींमध्ये अनेक कार्यालये, महाविद्यालये, इस्पितळे स्थित आहेत. परंतु आजमितीला या इमारतींमधील कार्यालये व इस्पितळे पाहिली तर असे वाटते की, याकरिता अधिक खर्च करुन ते अद्यायावत करणे जरुरी आहे. वर्षानुवर्षे या अशा प्रकारे केंद्र पुरस्कृत राज्य शासनाचा हिस्सा असलेल्या योजनांचा निधी प्राप्त झाला तरीही सर्व शासकीय यंत्रणा सुस्तच पडलेली असते. प्राप्त अनुदानाचा योग्य विनियोग करुन उद्देश साध्य करणे हे अपेक्षित असते. परंतु तसे काहीही होत नाही. मुंबई शहरात भोईवाड्यातील न्यायालयीन कामकाज तर दहा बाय दहाच्या खोलीमध्ये चालते. आरोपींना रस्त्यावर उभे रहावे लागते. राज्यातील एकूण सर्व शहरातील न्यायालयीन इमारतींमध्ये बार रुमची व्यवस्था अपवादाने आढळून येते. काही ठिकाणी अतिशय दाटीवाटीने बार रुम बांधण्यात आलेल्या आहेत ही वस्तुस्थिती समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली.

४.२३ प्रधानशिर्ष ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च या अंतर्गत सन २००९-२०१० या वित्तीय वर्षामध्ये कोणत्या न्यायालयीन इमारतींचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित होते व ते बांधकाम करण्यात आले का नाही ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती दिली की, न्यायालयीन इमारतीच्या बांधकामामध्ये न्यायाधिशांची निवासस्थानाचे बांधकामही अपेक्षित होते. तसेच यवतमाळ येथील न्यायालयीन बांधकामाची संख्या एकूण ११२ होती. त्यापैकी २२ कामे अजून सुरु झालेली नाहीत. इतर सर्व कामे सुरु झालेली आहेत. दहा कामे अंदाजपत्रक पातळीपर्यंत आलेली आहेत. निविदा पातळीपर्यंत ०९ कामे आलेली आहेत. ११२ कामामध्ये १०५ कामे निवासस्थानांची आहेत उच्च न्यायालयीन समिती न्यायालयीन इमारतींचे नकाशे

मंजूर करुन देते. राज्यातील इतर शहारांमध्ये मंजूर, प्रस्तावित व पूर्व नियोजित न्यायालयीन इमारतीचे बांधकाम केंद्र पुरस्कृत राज्य शासनाचा हिस्सा असलेल्या योजनेअंतर्गत करण्यात येत आहे. न्यायाधीश व इतर संबंधित निवासस्थाने यांचेही बांधकाम या प्रकल्पातर्गत करण्यात येत आहे.

४.२४ ललित कला शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यासंदर्भात शासनाचे धोरण याबाबत विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले की, चित्रकला महाविद्यालय, नागपूर याकरिता एकूण ६.६४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या एकूण रकमेपैकी ३.०२ कोटी रुपये खर्च झाला. उर्वरीत अखर्चित रक्कम लवकरात लवकर प्रत्यावर्तित करणे आवश्यक होते. तसेच या अनुषंगिक कामाकरिता दिनांक ३१ मार्च रोजी ३१४.४२ लक्ष रुपये देण्यात आले होते. यामध्ये चित्रकला महाविद्यालय फेज तीनचे विस्तार त्यामध्ये डीन, रेक्टर, हॉस्टेल वॉचमन यांची निवासस्थाने बांधण्याचे प्रस्तावित होते. यामध्ये ५१९ व २७७ लक्ष रुपयांचे कामे अशा प्रकारे एकूण ७८० लक्ष रुपयांची कामे कार्यादेश (वर्क ऑर्डर) देऊन पूर्ण करण्यात आले. या कामांमध्ये काही तांत्रिक अडचणी निर्माण होऊन दोन वर्षामध्ये या कामाचे अंदाजपत्रक काढून निविदा काढल्या जातील.

४.२५ राज्यात एकूण किती शासकीय व अशासकीय चित्रकला महाविद्यालये आहेत व ती मुलभूत सोयी सुविधा युक्त आहेत की नाहीत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यात मुंबई येथे दोन औरंगाबाद व नागपूर येथे प्रत्येकी एक याप्रमाणे चार शासकीय चित्रकला महाविद्यालये सुरु आहेत. अमरावती, पुणे व नाशिक येथे शासकीय चित्रकला महाविद्यालये प्रस्तावित आहेत. सन २००९-२०१० मध्ये एकूण ६,६४.४६ लाख एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती तर त्या तुलनेत खर्च रु.३,०२.८४ लाख झाला परिणामी रुपये ३६१.६२ लक्ष इतकी बचत झाली. सदर बचत ललित कला शिक्षण (चित्रकला महाविद्यालय) विभागाच्या इमारतीच्या बांधकामावरील आहे. अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वर्ष अखेरीस अनुदान प्राप्त झाल्याने प्राप्त अनुदान खर्च करणे शक्य झाले नसल्याने बचत झाली. वित्त विभागाने सुधारीत अंदाज रुपये ६६४ लक्ष अंतिम केल्याने उर्वरीत रुपये १६६.१२ लक्ष एवढी तरतूद समर्पित करण्यात आली आहे. वर्ष अखेरीस रु.३१४.४२ लक्ष एवढी तरतूद प्राप्त झाल्याने, सदर तरतूद खर्च करणे शक्य झाले नाही.

४.२६ वर्ष अखेरीस एवढी बचत असताना मग ती वेळेवर का समर्पित केली गेली नाही ? कारण यामध्ये एक विसंगती अशी आहे की, जे पैसे दिनांक ३१ मार्च रोजी आले ते पैसे खर्च झाले नाही. परंतु जे पैसे दिनांक २९ जानेवारी ते २१ मार्च रोजी आले ते पैसे खर्च झाले ही बाब विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता याबाबत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, २९ जानेवारी रोजी आलेल्या पैशाच्या संबंधित कामाची सुरुवात पूर्वीच्या वर्षातील नोव्हेंबर महिन्यात झाली होती.

४.२७ परंतू ३१ मार्च या एकाच दिवशी करोडो रुपयांच्या फाईल्सवर सह्या करुन कामांना मान्यता मिळते मग यावेळी असे का झाले ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, २९ जानेवारीला १३८ लाख रुपये प्राप्त झाले, २९ मार्चला ३१ लाख रुपये प्राप्त झाले, ३१ मार्चला ३१४.४२ लाख रुपये प्राप्त झाले अशा प्रकारे निधी प्राप्त झाला. त्यापैकी ३६१.६२ लाख रुपये बचत झाली. ते प्रत्यार्पित केले पाहिजे होते. त्यातील १२२.६७ लाख रुपये खर्च केले आहेत. नवीन कामे त्याच वर्षी समाविष्ट झाली होती.

४.२८ प्रधानशिर्ष ४२५०, इतर सामाजिक व सामुहीक सेवांवरील भांडवली खर्च या अंतर्गत मुळ अनुदान रु.१५१५.१९ लाख असून समर्पित केलेली रक्कम रु.२४८१.८५ लाख आहे. त्यामुळे मूळ अनुदानापेक्षा जास्त रक्कम समर्पित करण्याचे कारण काय आहे, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मूळ तरतूद १५ कोटी १५ लाख रुपये आहे. पुरवणी मागणी ४९ कोटी ८४ लाख रुपये आहे. दोन्ही मिळून ६५ कोटी रुपये आहे. २४ कोटी ८१ लाख रुपये समर्पित केलेले आहेत. निव्वळ तरतूद ४० कोटी १८ लाख रुपये झालेली आहे. त्यापैकी ४० कोटी १४ लाख रुपये खर्च झालेले आहेत. फक्त ४ लाख रुपये बचत झाली आहे. सदर निधी प्रत्यावर्तित केला आहे.

४.२९ प्रधानशीर्ष ४२०२ शिक्षण, क्रिडा व कला यावरील भांडवली खर्च या अंतर्गत पुरवणी मागणी रु.११३५.०० लाख असून समर्पित रक्कम रु.९९०.१५ आहे. विभागाने रक्कम खर्च केली नाही तर मग पुरवणी मागणी का करण्यात आली ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मूळ मागणी ४ कोटी ६ लाख रुपये आहे. पुरवणी मागणी ११ कोटी ३५ लाख रुपये आहे. रु.९९०.१५ लाख रुपये इतकी रक्कम समर्पित करण्यात आली आहे. यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागाने कामे समाविष्ट केली होती. यास प्रशासकीय मान्यता उच्च व तंत्रशिक्षण विभागाची होती. आयआयटीची १३ बांधकामावरील तरतूद ९९० लाख रुपये दाखविली आहे. १३ कामे कामनिहाय वाटप करुन देखील अर्थसंकल्प पुस्तिकेमध्ये आली नाहीत. सदर कामांसाठीच्या प्रशासकीय मान्यतेसाठी सचिव समितीकडून मान्यता घ्यावी लागते. सदर बाबतीत सचिव समितीची बैठक झाली. परंतु त्याचे कार्यवृत्त ३१ मार्चनंतर अंतिमत: मान्य झाले. त्यामुळे निधी वितरीत झाला नाही व ते पैसे शेवटच्या क्षणाला समर्पित केले आहेत. ते महालेखाकारांनी देखील मान्य केले.

४.३० विभागाने दिलेल्या या खुलाशावर समितीने नाराजी व्यक्त केली, विभागाला मिळालेला निधी हा विकासाची कामे करण्यासाठी असतो. सचिव समितीच्या बैठकीत कार्यवृत्त मंजूर झाले नाही म्हणून विकासाच्या कामासाठी मिळालेला निधी प्रत्यार्पित करणे हे कारण विभागास भूषणावह नाही. याबाबत विभागीय सचिवांनी लक्ष दिले पाहिजे. कारण या समितीचे प्रमुख म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव असतात. विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सचिव स्तरावर बैठक घेऊन त्या प्रस्तावास मान्यता द्यायची

असते. कारण अर्थसंकल्पामध्ये मंजूर झालेला निधी हा वर्षभरात कामावर खर्च करण्याची जबाबदारी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची असल्याने त्यांनी या संदर्भात संबंधित विभागाच्या सचिवांना पत्र लिहून बैठक लावली पाहिजे होती. लोकप्रतिनिधी सुध्दा त्याच्या मतदार संघात औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करावी अशी मागणी सतत करीत असतात व त्याचा पाठपुरावा पण करीत असतात. विभागाकडे निधी सुध्दा उपलब्ध असतो तसेच कामाची मागणीसुध्दा असते. परंतु केवळ सचिव पातळीवर निर्णय होत नसल्याने विभागास मिळालेला निधी परत केला जातो हे योग्य नाही याबाबत विभागीय सचिवांनी समितीने व्यक्त केलेल्या मतांशी सहमती दर्शवली तसेच विभागीय प्रतिनिधींनी आय आय टीची १३ कामे पूढील वर्षी पूर्ण झाली असे सांगितले व खुलासा केला की, सचिव समितीची मान्यता पुरेशी अगोदर झाली पाहिजे होती. १ कोटी रुपयांच्या कामासाठीची प्रशासकीय मान्यता सचिव समितीकडून देण्यात येत होती. आता त्याबाबतची मर्यादा ५ कोटी रुपये करण्यात आली आहे. तसेच विभागीय सचिवांनी समितीने व्यक्त केलेल्या मतांशी सहमती दर्शविली.

४.३१ जामखेड येथील वसतिगृहासंदर्भात समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की, ते वसतिगृह ३ वर्षापूर्वी बांधून झाले आहे. त्याचे पैसे सुध्दा ठेकेदारांने घेतले आहेत. परंतु तेथे अद्यापपर्यंत विद्यार्थ्यांना राहाण्यास मिळत नाही. लोकांनी तेथील काचा फोडल्या, खिडकीचे गज सुध्दा पळवून नेले आहेत. ते वसतिगृह दीड कोटी रुपयाचे आहे. पण शासनाला अद्यापपर्यंत हस्तांतर झाले आहे की नाही याचीसुध्दा कल्पना नाही. त्यामुळे वसतिगृह ज्या उद्देशासाठी बांधले आहे त्याचा उद्देश सफल झाला नाही. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, जामखेड येथील वसतिगृहांसंदर्भात मुख्य अभियंता, नाशिक यांच्या दि. १९/११/२०१३ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे. (सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.) जामखेड, जिल्हा अहमदनगर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था वसतिगृहाचे बांधकाम डिसेंबर, २०१२ मध्ये पूर्ण झाले आहे. सदरची इमारत एकतर्फी हस्तांतर केली असून ताबा पावती अद्याप मिळालेली नाही. पिण्याच्या पाण्याची मुख्य अडचण असल्यामुळे सध्या तेथे विद्यार्थी राहत नाहीत. पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जामखेड यांच्यामार्फत अपेक्षित आहे.

४.३२ वाई येथील शासकीय मुद्रणालयाच्या इमारतीच्या पुनर्बांधकामाकरिता निधी उपलब्ध होऊनही तो का खर्च करण्यात आला नाही? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर ठिकाणाची जमीन मराठी भाषा विभागाची आहे. विश्वकोषाचे काम सुरु आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व मराठी भाषा विभाग या दोन्ही विभागांनी आवश्यक बांधकाम करुन इमारत उभी करावयाची आहे. मराठी भाषा विभाग कुठे करायचा, या संदर्भातील निश्चिती अजून पूर्णपणे झालेली नाही. नियोजन झालेले नाही.

४.३३ याचसंदर्भात संचालक, शासन मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय यांनी समितीस सांगितले की, वाई येथील विश्वकोष महामंडळाकडून विश्वकोष मुद्रणाचे काम चालते. मुद्रणालयासाठी जागा लागते. त्या जागेसाठी शासन मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालयाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्याला कळविले आहे. परंतु सदर जागेची मालकी मराठी भाषा विभागाची आहे. मराठी भाषा विभागाला किती जागा हवी आहे, याचा निर्णय होत नाही. ग्रंथालयासाठी जुनी पुस्तके जतन करावयाची असल्यामुळे मुद्रणालय तळ मजल्यावरुन पहिल्या मजल्यावर स्थलांतरीत करावे असे मराठी भाषा विभागाला कळविण्यात आले आहे. परंतु मुद्रणालयाची यंत्रसामुग्री तळ मजल्यावरुन वरच्या मजल्यावर नेता येत नाही ही अडचण आहे. ही जागा मराठी भाषा विभागाची आहे. वाई येथे विश्वकोष मुद्रणाचे काम चालते. मराठी भाषा विभागाकडून यासंदर्भात निर्णय झाला पाहिजे कारण मुद्रणालयाला किती जागा पाहिजे हे शासकीय मुद्रणालयाकडून मराठी भाषा विभागाला कळविले आहे तेथे शासन मुद्रणालयाचे जास्त काम चालत नाही यासाठी ५० लाख रुपये मिळाले होते. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात बैठक घेतली होती. सदर बैठकीत शासन मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय व विश्वकोष महामंडळाने ५० टक्के याप्रमाणे खर्च करावा असा निर्णय घेण्यात आला. सन २००७ पासून हे काम सुरु आहे.

४.३४ मुद्रणालय पहिला मजल्यावर स्थलांतरित करण्यासंदर्भात शासन, मुद्रण व लेखा सामुग्री संचालनालयाचे सार्वजनिक बांधकाम विभागासमवेत लोड फॅक्टर क्लीअर करुन स्थलांतर व्हावे अशी सूचना समितीने केली व दोन्ही खात्यामध्ये समन्वय नसल्यामुळे असे होत आहे. यासाठी दिलेले पैसे वाया गेले आहेत असे मत समितीने व्यक्त केले.

४.३५ प्रधानशीर्ष ४२०२, शिक्षण, क्रिडा व संस्कृती यावरील भांडवली खर्च याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या शिर्षाच्या खर्चमेळाची महालेखापाल कार्यालयाशी पडताळणी मे महिन्यात केली असून महालेखाकार कार्यालयास आवश्यक ती सर्व माहिती दिलेली आहे. परंतु ५३.८७ लाख रुपये अधिक खर्च झाला आहे. हा खर्च नियमित केलेला नाही असे महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, २००९-२०१० या आर्थिक वर्षात मागणी क्र.एच-८ अंतर्गत ४२०२०७०२ या लेखाशिर्षाखाली रु.२५५०.८१, तसेच ४२०२०७११ अंतर्गत रु.३५४.५६ लक्ष व ४२०२०७२२ अंतर्गत रु.२८.०६ लक्ष अशी एकूण २९३३.४३ लक्ष एवढी रक्कम वितरीत करण्यात आली होती. त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), पुणे या विभागास खालीलप्रमाणे तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली होती.

लेखाशिर्ष	तरतूद	महालेखापाल यांच्याकडे नोंदविण्यात आलेला खर्च
४२०२०७०२	२१६०.३० लाख	२१६०.३० लाख
४२०२०७११	३००.२८ लाख	३५०.२० लाख
४२०२०७२२	२३.७६ लाख	२७.७१ लाख
एकूण	२४८४.३४ लाख	२५३८.२१ लाख

४.३६ ४२०२०७०२ या लेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आलेली तरतूद प्रत्यक्ष बांधकामासाठी खर्च केली जाते. तर ४२०२०७११ व ४२०२०७२२ या लेखाशिर्षाखाली दाखविलेल्या तरतूदी या प्रत्यक्ष खर्च न करता त्या आस्थापना खर्च (सेंटेज चार्जेस) म्हणून दाखविल्या जातात व या रकमा पुस्तकी समायोजनाने शासनाच्या २०५९ या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात येतात म्हणजेच प्रत्यक्षात या रकमा खर्च केल्या जात नाहीत.

४.३७ पुस्तकी समायोजनाची कार्यवाही करताना महालेखापाल कार्यालयाच्या स्तरावरुन ४२०२०७११ या लेखाशिर्षाखाली रु.४९.९२ लक्ष एवढ्या रकमेची व ४२०२०७२२ या लेखाशिर्षाखाली रु.३.९५ लाख एवढ्या रकमांच्या नोंदी या दोन वेळेस घेतल्यामुळे रु.५३.८७ लाख इतका खर्च अधिक असल्याचे दिसून येत आहे. या संदर्भात महालेखापाल कार्यालयाशी संपर्क साधला असता त्यांनीही या लेखाशिर्षाखाली प्रत्यक्षात अधिकचा खर्च झाला नसल्याचे त्यांच्या दिनांक १३.११.२०१३ च्या पत्रान्वये कळविले आहे. (सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.) यावरुन उपरोक्त लेखाशिर्षाखाली अधिक खर्च झाला नसल्याचे स्पष्ट होते.

४.३८ प्रत्येक वर्षी ऑगस्टपर्यंत अकाऊंट सेटल होते. परंतु सदर वर्षी ऑगस्ट, २०१० पर्यंत अकाऊंट सेटल करण्यात आलेले नाही याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, खर्चमेळाचे काम आहरण व संवितरण अधिकारी यांच्या स्तरावरुन केले जाते. राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित एकूण १५७ विभाग कार्यरत आहेत. या विभागाचे प्रमुख म्हणून कार्यकारी अभियंता काम करतात तर त्यांना सहाय्य करण्यासाठी महालेखापालांच्या कार्यालयामार्फत विभागीय लेखापालाची नेमणूक केली जाते.

४.३९ या एकूण १५७ विभागाच्या अंतर्गत ८३७ आहरण व संवितरण अधिकारी काम करतात. ३१ मार्च अखेरपर्यंत झालेल्या खर्चाचा ताळमेळ ३० जूनपर्यंत सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी पूर्ण करणे अपेक्षित आहे. ते त्यांच्याकडून बहुतांशी पार पाडले जाते. या अधिकाऱ्यांनी खर्चमेळाचे काम पूर्ण केले किंवा नाही या बाबींचा आढावा घेण्यासाठी नागपूर येथे महालेखापाल कार्यालयाच्या प्रतिनिधीसोबत बैठक घेतली जाते. या बैठकीस महालेखापालांचे प्रतिनिधी तसेच मंत्रालय स्तरावरील अधिकारी उपस्थित असतात. तथापि,

या विभागाच्या कामाचा प्रचंड व्याप पाहता एखाद्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून ताळमेळाचे काम अपूर्ण राहू नये यासाठी अधिक दक्ष राहण्याच्या सूचना शासन स्तरावरुन नियमितपणे देण्यात येतात.

४.४० प्रधानशिर्ष ७६१०- शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे याअंतर्गत जी रक्कम उपलब्ध करुन दिली होती, तेवढी रक्कम खर्च झाली नाही म्हणून त्यातील काही रक्कम प्रत्यावर्तित करावी लागली. सन २००९-२०१० मध्ये एकूण रक्कम रुपये बत्तीस कोटी अठ्ठेचाळीस लाख ऐंशी हजार एवढी तरतूद शासनाकडून उपलब्ध झाली होती. यापैकी एकवीस कोटी चाळीस लाख सोळा हजार रुपये खर्च झाले आहेत. शासकीय कर्मचारी मोटार सायकल व इतर बाबींसाठी कर्जे घेत नाहीत का ? अशी विचारणा समितीने केली असता यावर विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, शासकीय कर्मचाऱ्यांकडून कर्जाची मागणी आली नाही म्हणून निधी शिल्लक राहिला आहे.

४.४१ सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात किती कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या अग्रिमासंदर्भातील विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

४.४२ सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात लेखाशिर्ष ७६१० अंतर्गत घरबांधणी/मोटार वाहन/इतर वाहन व वैयक्तिक संगणक खरेदी याकरिता कर्मचाऱ्यांना वितरीत करण्यात आलेल्या अग्रिमांसंदर्भातील माहिती खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	**अग्रिमाचा प्रकार**	**रुपये (लाखात)**	**अग्रिम मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या**
१	घरबांधणी अग्रिमे (७६१० ०३६३)	१८६४.६३	८५६
२	मोटार वाहन खरेदी अग्रिमे (७६१० ०३७२)	२०४.६	३९८
३	इतर वाहन खरेदी अग्रिमे (७६१० ०३८१)	०.८२	३४

४.४३ समितीचे अभिप्राय :-

शासकीय विभागाकडून लेखापरिक्षणाबाबत ठराविक कामे (उदा. चुकीच्या दुरुस्तीच्या प्रस्ताव (Note of error), खर्चमेळ) विहित कालमर्यादेत पूर्ण करावयाची असतात तथापि काही विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून ही कामे विहित वेळेत पूर्ण होत नाहीत त्यामुळे महालेखापाल कार्यालयाकडून अशा कामांबाबत लेखापरिच्छेदाव्दारे आक्षेप घेतले जातात. व ते लोकलेखा समिती समोर छाननीसाठी येतात. नियोजित लेखापरिक्षणाची कामे विहित वेळेत न करण्याच्या वृत्तीमुळे तसेच महालेखापरिक्षकांनी लेखापरिक्षणाच्या वेळी घेतलेल्या आक्षेपांचे समाधान करु न शकल्यामुळे आणि Note of error ला देखील

अभ्यासपुर्ण व समाधानकारक उत्तरे न देऊ शकल्यामुळे लोकलेखा समिती समोर ही प्रकरणे येतात. सक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास येते की,ज्या परिच्छेदामध्ये नियमानुसार काम झालेले असतांनाही केवळ प्रकरणाची वस्तुस्थिती लेखापरिक्षणाच्या वेळेस महालेखाकारांच्या निदर्शनास न आणल्यामुळे आक्षेपांचे परिच्छेद निवडण्यात आले आहेत. यात महालेखाकारांचा व पर्यायाने समितीच्या वेळेचा देखील अपव्यय होतो.

४.४४ मुंबई व इतर शहारांमध्ये ब्रिटीशकालीन अनेक इमारती आहेत या इमारतींच्या देखभाल दुरुस्तीअभावी अनेक गैरसोयी उद्‌भवतात. या इमारतींच्या दुरुस्तीसाठी केंद्र पुरस्कृत राज्य शासनाच्या हिस्सा असलेल्या योजनांना निधी प्राप्त झाला तरीही शासकीय यंत्रणेच्या अनास्थेमुळे निधी अखर्चित राहतो अथवा निधीचा पुरेपूर उपयोग करुन आवश्यक ती कामे केली जात नाहीत. शासकीय इमारती जागा उपलब्ध असून देखील दाटीवाटीने बांधण्यात येतात. राज्यातील सर्व शहरातील न्यायालयात बार रुमची व्यवस्था नियोजनपुर्वक व सुटसुटीत केल्याचे अपवादाने आढळते काही ठिकाणी अतिशय दाटीवाटीने बाररुम बांधण्यात आलेल्या आहेत.

४.४५ जामखेड अहमदनगर येथील वसतिगृह बांधून ३ वर्षे झाली तरीही ते विद्यार्थ्यांना रहाण्यासाठी उपलब्ध करुन दिलेले नाही. सदर वसतिगृहासाठी दिड कोटी एवढा खर्च झाला तथापि इमारत विना वापर पडून राहिल्यामुळे तेथील समाजकंटकांनी इमारतीच्या काचा फोडल्या, खिडक्यांचे गज पळवून नेले.सदर वसतिगृहाचे बांधकाम डिसेंबर २०१२ मध्ये पूर्ण झाले आहे. इमारत एकतर्फी हस्तांतरीत केली असून ताबा पावती मिळालेली नव्हती. पिण्याच्या पाण्याची अडचण असल्यामुळे विद्यार्थी या वसतिगृहात रहात नाहीत. पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जामखेड यांच्याकडून कार्यवाही अपेक्षित होती परंतु तसे केल्याचे समितीच्या निदर्शनास आले नाही.

समितीच्या शिफारशी

४.४६ शिफारस क्र. (१) शासनाच्या विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या लेखापरिक्षणाशी संबंधित विविध टप्प्यातील कामे विहित वेळेत नियमानुसार पूर्ण करावीत. या कामांकडे अधिकारी/कर्मचारी यांनी दुर्लक्ष करु नये. काही वेळा विभागाकडून लेख्यांशी संबंधित कामे पूर्ण केली जातात परंतु ही कामे विहित वेळेत न केल्यामुळे महालेखापालांकडून लेखापरिच्छेद आक्षेप काढण्यात येतात व त्यानंतर लेखापरिच्छेदांची छाननी करण्याचे काम लोकलेखा समितीकडे येते. अपूर्ण काम विहित मूदतीनंतर पूर्ण केले तर त्यासंबधीचा परिच्छेद महालेखापालांकडून तपासून घ्यावा व अशा प्रकारे कामात कोणाकडून विलंब होत असेल तर त्यास कारणे दाखवा नोटीस बजावून नियमाप्रमाणे त्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच प्रत्येक महिन्याला ताळमेळाचे काम अचूकपणे व नियमानुसार पार पाडणे बंधनकारक असतानाही त्याची अंमलबजावणी होत नाही. अत: नियमित मासिक ताळमेळाचे काम पार पाडण्यात यावे जेणेकरुन दरमहा या

बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल व महालेखाकारांकडून घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची संख्यादेखील कमी होईल. तसेच महालेखाकारांकडून विभागाचे लेखापरिक्षण करतेवेळीच समोर आलेल्या त्रुटींचे निराकरण संबंधिताकडून करण्यात यावे जेणेकरुन परिच्छेद कमी होतील अशीही समितीची शिफारस आहे.

४.४७ शिफारस क्र. (२) यवतमाळ येथील न्यायालयीन इमारतींच्या बांधकामामध्ये २८.५२ लक्ष रुपयांची बचत झाली असून ती रक्कम मार्च २०१३ मध्ये व्यपगत झालेली आहे. ही रक्कम शासनास समर्पित न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीची विस्तृत माहिती व यासंदर्भात विभागाने केलेल्या कारवाईची माहिती समितीस १ महिन्यांत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

४.४८ शिफारस क्र. (३) न्यायालयीन इमारतींच्या बांधकामासंदर्भात केंद्र पुरस्कृत योजनांकरिता राज्य शासनाकडून त्याचा हिस्सा वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे योजनांचा निधी अखर्चित रहातो. मुंबई व इतर शहरातील न्यायालयीन इमारतींच्या देखभाल दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन घेऊन त्याव्दारे या इमारतींमध्ये सोयीसुविधा अद्ययावत करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

४.४९ शिफारस क्र. (४) प्रधानशीर्ष ४२०२ "शिक्षण,क्रिडा व कला यावरील भांडवली खर्च" या अंतर्गत मूळ रक्कम ४.६ लक्ष होती. रु. ११३५.०० लाख एवढया रकमेची पूरवणी मागणी असून रु.९९०.१५ लाख एवढी रक्कम प्रत्यार्पित केली यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागाची कामे समाविष्ट असून त्यास प्रशासकीय मान्यता देखील उच्च व तंत्रशिक्षण विभागाची होती. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या १३ बांधकामावरील तरतूद ९९०.०० लाख प्रस्तावित होती. परंतु या कामांच्या प्रशासकीय मान्यतेबाबतचे कार्यवृत्तास सचिव समितीची मान्यता न मिळाल्याने निधी वितरित करण्यात आला नाही. व पूरक मागणीव्दारे उपलब्ध झालेला निधी विभागाकडून प्रत्यार्पित करण्यात आला. या प्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. या कारणाकरिता मिळालेला निधी प्रत्यार्पित करणे हे कारण विभागास भुषणावह नाही अशा प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करावी व भविष्यात अशा क्षुल्लक कारणाकरिता निधी व्यपगत होणार नाही याबाबत कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

४.५० शिफारस क्र. (५) जामखेड जिल्हा अहमदनगर येथील वसतिगृहाकरिता दिड कोटी एवढा खर्च झाला तथापि पिण्याच्या पाण्याअभावी वसतिगृह मागील तीन वर्ष वापरात नाही, राज्यात अन्य ठिकाणीही अशा बांधकाम पुर्ण झालेल्या इमारती किरकोळ कारणाकरिता विनावापर पडून आहेत अशा सर्व इमारतींचा आढावा घेऊन संबंधित विभागांशी समन्वय साधून सर्व इमारती तात्काळ उपयोगात आणण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

जलसंपदा विभाग

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्रमांक आय-५ "पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च" याशीर्षाखाली बचत व अधिक खर्च इ ाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष ४४०२ - मृद व जलसंधारण यांवरील भांडवली खर्च ४७०१ - मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ४७०२ - लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च ४७११ - पूर नियंत्रण प्रकल्पावरील भांडवली खर्च ४८०१ - वीज प्रकल्पांवरील भांडवली खर्च ५४०२ - अवकाश संशोधनावरील भांडवली खर्च दत्तमत मूळ ३१,११,७०,५१ पुरक . ६१,६७,५६,०४	९२,७९,२६,५५	८२,४६,३०,८०	(-)१०,३२,९५,७५
वर्षभरात परत केलेली रक्कम(मार्च २०१०)			१०,१७,३५,७३
भारित मूळ ४,०० पूरक ६४,८८	६८,८८	५९,३१	-९,५७
वर्षभरात परत केलेली रक्कम(मार्च २०१०)			१०,९२

टिपा व भाष्ये :-

५.२ अनुदानातील बचत रु १०,३२,९५,७५ लाख असताना वर्षभरात केवळ रु. १०,१७,३५.७३ लाखांचा निधी परत करणे अपेक्षित होते.

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

ज्ञापन :

५.३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मागणी क्रमांक आय-५ अंतर्गत (महालेखापाल यांच्या अभिप्रायात दर्शविलेली मुख्य लेखाशीर्ष) एकूण अनुदान रुपये ९२७९२६.५५ लक्ष (रुपये नऊ हजार दोनशे एकोणऐंशी कोटी सव्वीस लक्ष पंच्चावन हजार फक्त) दर्शविण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने खर्च रुपये ८२४६३०.८० लक्ष(रुपये आठ हजार दोनशे सेहेचाळीस कोटी तीस लक्ष ऐंशी हजार फक्त) इतका नोंदविलेला असून रुपये १०३२९५.७५ लक्ष (रुपये एक हजार बत्तीस कोटी पंच्याण्णव हजार फक्त) इतकी बचत दर्शविलेली आहे.

एकूण रुपये ९२७९२६.५५ लक्ष (रुपये नऊ हजार दोनशे एकोणऐंशी कोटी सव्वीस लक्ष पंचावन्न हजार फक्त) अनुदानानातून रुपये १०१६८६.८५ लक्ष (रुपये एक हजार सोळा कोटी शहाऐंशी लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त) इतकी बचत समर्पित करुन विशेष गौणशीर्ष राखीव दत्तमत खाली वर्ग करण्यात आली आहे. त्यामुळे रुपये ८२६१९०.८२ लक्ष (रुपये आठ हजार दोनशे एकसष्ठ कोटी नव्वद लक्ष ब्याऐंशी हजार फक्त) इतके अंतिम सुधारीत अनुदान प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ८२५१४३.९८ लक्ष (रुपये आठ हजार दोनशे एकावन्न कोटी त्रेचाळीस लक्ष अठ्ठ्याण्णव हजार फक्त) इतका झालेला आहे. परिणामी रुपये १०४६.८४ लक्ष (रुपये दहा कोटी सेहेचाळीस लक्ष चौऱ्याऐंशी हजार फक्त) इतकी प्रत्यक्ष बचत झाली आहे. परंतू, महालेखापाल कार्यालयाने एकूण अनुदानाच्या अनुषंगाने रुपये १०३२९५.७५ लक्षची बचत दर्शविली आहे. त्याबाबतची कारणे मुख्य लेखाशीर्षनिहाय स्पष्टीकरण ज्ञापनात नमूद करण्यात आली आहेत.

५.४ महालेखापालांनी रुपये ८२४६३०.८० लक्ष (रुपये आठ हजार दोनशे सेहेचाळीस कोटी तीस लक्ष ऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये. ८२५१४३.९८ लक्ष (रुपये आठ हजार दोनशे एकावन्न कोटी त्रेचाळीस लक्ष अठ्ठ्याण्णव हजार फक्त) इतका झालेला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रुपये ५१३.१८ लक्ष (रुपये पाच कोटी तेरा लक्ष अठरा हजार फक्त) इतकी तफावत असून त्याबाबतची कारणे मुख्य लेखाशीर्षनिहाय स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आली आहे.

५.५ महालेखापालांनी मागणी क्र.आय-५ अंतर्गत एकूण भारीत अनुदान रुपये ६८.८८ लक्ष (रुपये अडुसष्ट लक्ष अठठयाऐंशी हजार फक्त) दर्शविण्यात आले आहे. त्यानुषंगाने रुपये ५९.३१ लक्ष (रुपये एकोणसाठ लक्ष एकतीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला असून रुपये ९.५७ लक्ष(रुपये नऊ लक्ष सत्तावन्न हजार फक्त) इतकी बचत दर्शविली आहे.

५.६ एकूण भारीत रुपये ६८.८८ लक्ष (रुपये अडुसष्ट लक्ष अठठयाऐंशी हजार फक्त) अनुदानातून रुपये १०.९२ लक्ष (रुपये दहा लक्ष ब्याण्णव हजार फक्त) इतकी बचत समर्पित करुन विशेष गौण शीर्ष भारीत खाली वर्ग करण्यात आली. त्यामुळे रुपये ५७.९६ लक्ष (रुपये सत्तावन्न लक्ष शहाण्णव हजार फक्त) इतके भारीत अंतिम सुधारीत अनुदान प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ५९.५५ लक्ष (रुपये एकोणसाठ लक्ष पंचावन्न हजार फक्त) इतका झालेला आहे. परिणामी रुपये १.५९ लक्ष (रुपये एक लक्ष एकोणसाठ हजार फक्त) इतके अधिक्य झाले आहे. परंतू महालेखापाल कार्यालयाने एकूण भारीत अनुदानाच्या अनुषंगाने रुपये ९.५७ लक्षची बचत दर्शविलेली आहे. त्याबाबतची कारणे मुख्यलेखाशीर्ष निहाय स्पष्टीकरण ज्ञापनात नमुद करण्यात आली आहे.

५.७ महालेखापाल कार्यालयाने रुपये ५९.३१ लक्ष (रुपये एकोणसाठ लक्ष एकतीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविलेला आहे आणि विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ५९.५५ लक्ष (रुपये एकोणसाठ लक्ष पंच्चावन्न हजार फक्त) इतका झाला आहे त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रुपये ०.२४ लक्ष इतकी तफावत असून त्याबाबतची कारणे मुख्यलेखाशीर्ष निहाय स्पष्टीकरण ज्ञापनात नमुद करण्यात आली आहे.

५.८ अनुदानातील बचत खालील शीर्षाखाली झाली :-

(रुपये हजारांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष ४४०२ - मृद व जलसंधारण यांवरील भांडवली खर्च ४७०१ - मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ४७०२ - लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च ४७११ - पूर नियंत्रण प्रकल्पावरील भांडवली खर्च ४८०१ - वीज प्रकल्पांवरील भांडवली खर्च			

५४०२ - अवकाश संशोधनावरील भांडवली खर्च दत्तमत मूळ ३१,११,७०,५१ पुरक ६१,६७,५६,०४ वर्षभरात परत केलेली रक्कम(मार्च २०१०) भारित मूळ .. ४,००. पूरक .. ६४,८८ वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१०)	९२,७९,२६,५५ ६८,८८	८२,४६,३०,८०	(-१) ०,३२,९५,७५ १०,१७,३५,७३ (-) ९,५७ १०,९२

टिपा व भाष्ये :

५.९ अनुदानातील बचत रु.१०,३२,९५,७५ लाख एवढी असताना वर्षभरात केवळ रु.१०,१७,३५,७३ लाखांचा निधी परत करणे अपेक्षित होते.

ज्ञापन :

५.१० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मागणी क्रमांक आय -५ अंतर्गत (महालेखापाल यांच्या अभिप्रायात दर्शविलेली मुख्य लेखाशीर्ष) एकूण दत्तमत अनुदान रुपये ९२७९२६.५५ लाख (रुपये नऊ हजार दोनशे एकोणऐंशी कोटी सव्वीस लाख पंचावन्न हजार फक्त) च्या अनुषंगाने महालेखापालांनी दत्तमत खर्च रुपये ८२४६३०.८० लाख (रुपये आठ हजार दोनशे सेहेचाळीस कोटी तीस लाख ऐंशी हजार फक्त) इतका नोंदविला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रुपये १०३२९५.७५ लाख (रुपये एक हजार बत्तीस कोटी पंच्याण्णव लाख व पंच्याहत्तर हजार फक्त) इतकी बचत असून त्याबाबातची कारणे लेखाशिर्षनिहाय स्पष्टीकरण ज्ञापनात नमूद करण्यात आली आहेत.

५.११ यापैकी मुख्य लेखाशीर्ष "४४०१" मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च खाली एकूण अनुदान रू. ५८६.८८ लाख (रुपये पाच कोटी शहाऐंशी लाख आणि अठ्याऐंशी हजार फक्त) मधून रू.७७.१० लाख (रुपये सत्याहत्तर लाख दहा हजार फक्त) इतकी रक्कम शासन निर्णय क्र.बीजीएम-१०.१०/(२०२/१०) अर्थ-२, दिनांक ३१.३.२०१० अन्वये विशेष गौणशीर्ष राखीव दत्तमतकडे वर्ग करण्यात आली आहे. परिणामी रू.५०९.७२ लाख (रुपये पाच कोटी नऊ लाख व अठ्यात्तर हजार फक्त) इतके अंतिम सुधारीत अनुदान मंजूर करण्यात आले.

त्याअनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रू.५०९.७२ लाख (रुपये पाच कोटी नऊ लाख बहात्तर फक्त) इतका झाला आहे.

५.१२ महालेखापालांनी प्रारूप विनियोजन लेखा अहवालात सदर मुख्य लेखाशीर्षाखाली रु.५१६.६६ लाख (रुपये पाच कोटी सोळा लाख आणि सहासष्ठ हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु. ५०९.७२ लाख इतका प्रत्यक्ष खर्च केला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रू. ६.९४ लाख इतकी तफावत दिसून येते. सदर तफावतही गैरवर्गीकरण व विहित मुदतीत शोध लागू शकला नसल्यामूळे आहे.

५.१३ यापैकी मुख्य लेखाशीर्ष "४७०१- मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च याखाली दत्तमत रु. ८०८६०७.९४ लक्ष (रुपये आठ हजार शहाऐशी कोटी सात लाख चौऱ्याण्णव हजार फक्त) च्या अनुषंगाने रु. ९७७०३.५० लाख (रुपये नऊशे सत्याहत्तर कोटी तीन लाख चार हजार फक्त) इतकी बचत दिसून येते. सदर बचत शासन निर्णय क्र. बीजीएम-१०.१०/(१६६/२०१०)/अर्थ-१, दि.३१.०३.२०१० अन्वये राखीव दत्तमतकडे वर्ग करण्यात आली आहे. परिणामी रु.७१०९०४.४४ लाख (रुपये सात हजार एकशे नऊ कोटी चार लाख चव्वेचाळीस हजार फक्त) इतके अंतिम सुधारीत अनुदान मंजूर करण्यात आले. त्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.७०९८६२.२० लाख (रु सात हजार अठठयाण्णव कोटी बासष्ट लाख वीस हजार फक्त) इतका खर्च झाला आहे. परिणामी रु.१०४२.२३ लाख (रु दहा कोटी बेचाळीस लाख तेवीस हजार फक्त) इतकी बचत झाली, सदर बचतीबाबतची कारणे उपशीर्षनिहाय स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आली आहेत.

५.१४ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर मुख्य लेखाशीर्षखाली रु. ७०९५२२.४५ लक्ष (रुपये सत्तर हजार पंच्याण्णव कोटी बावीस लाख पंचेचाळीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.७०९८६२.२० लाख इतका दत्तमत खर्च नोंदविला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रु. ३३९.७५ लक्ष (रु तीन कोटी एकोणचाळीस लाख पंच्याहत्तर हजार फक्त) इतकी तफावत दिसून येते, सदर तफावतीबाबतची कारणे उपशीर्षनिहाय स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आली आहेत.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे- वाणिज्यिक (०२) लाभ क्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प राज्य योजनांतर्गत योजना (०२)(११) कृष्णा प्रकल्प मूळ १,२७.८६ पूरक ६२.२६ पुनर्विनियोजन (-) ७७.००	१,१३.१२	१,१०.८९	(-) २.२३

ज्ञापन :

५.१६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

५.१७ या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु. ११३.१२ लक्ष (रुपये एक कोटी तेरा लाख बारा हजार फक्त) च्य अनुषंगाने विभगाचा प्रत्यक्ष खर्च रु. ११०.८९ लक्ष (रुपये एक कोटी दहा लाख एकोणनव्वद हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.२.२३ लक्ष रुपये दोन लाख तेवीस हजार फक्त) इतकी बचत झाली आहे. सदर बचत प्रामुख्याने स्थानिक शेतकऱ्यांच्या विरोधामुळे प्रगतीपथावरील भाग -१ काम चे पूर्ण न झाल्याने बचत दिसून येत आहे.

५.१८ महोलेखापालानी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सादर उपशीर्षाखाली रु. ११०.८९ लक्ष रुपये एक कोटी दहा लोख एकोणनव्वद हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु. ११०.८९ लक्ष इतका खर्च केलेला आहे.परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या तफावत नाही.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक (०२) लाभ क्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प राज्य योजनेतंर्गत योजना (०२)(१३) अप्पर पेनगंगा प्रकल्प मूळ १,०६.६३ पुरक ३,१३.९७ पुनर्वियोजन (-) १,१२.८२	३,०७,.७८	३,०७.५७	(-) ०.२१

ज्ञापन :

५.१९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

५.२० या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.३०७.७८ लक्षच्या (रुपये तीन कोटी सात लाख अठयाहत्तर हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ३०७.५७ लक्ष (रुपये तीन कोटी सात लाख सत्तावन्न हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.०.२१ लक्ष (रुपये एकवीस हजार फक्त) इतकी बचत झाली आहे. सदर बचत अत्यल्प आहे. कृपया क्षमपित करावी.

५.२१ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.३०७.५७ लक्ष (रुपये तीन कोटी सात लाख सत्तावन्न हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु. ३०७.५७ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही. (रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक (०२) लाभ क्षेत्रविकासाखाली मोठे प्रकल्प केंद्र पुरस्कृत (०२)(१७) कुकडी प्रकल्प मूळ २,१०.०० पूरक ४,४३,०० पुनर्विनियोजन (-) ६८.००	५,८५.००	५,८४.९७	(-)०.०३

ज्ञापन :-

५.२२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु. ५८५.०० लक्ष (रुपये पाच कोटी पंच्याऐ ंशी लाख फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.५८४.९७ लक्ष (रुपये पाच कोटी चौऱ्याऐंशी लाख सत्याण्णव हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु ०.०३ लक्ष(रुपये तीन हजार फक्त) इतकी अत्यल्प बचत झाली आहे.

५.२३ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. ५८४.९७ लक्ष (रुपये पाच कोटी चौऱ्याऐशी लाख सत्याण्णव हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.५८४.९७ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक (०२) लाभ क्षेत्रविकासाखाली मोठे प्रकल्प केंद्र पुरस्कृत (०२)(२०) कृष्णा प्रकल्प मूळ १,००.०० पूरक १,२५.०० पुनर्विनियोजन (-) १.११.८७	१,१३.१३	१,१२.५३	(-) ०.६०

ज्ञापन :-

५.२४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.११३.१३ लक्ष (रुपये एक कोटी तेरा लाख तेरा हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.११२.५३ लक्ष (रुपये एक कोटी बारा लाख त्रेपन्न हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.०.६० लक्ष (रुपये साठ हजार फक्त) इतकी बचत झाली आहे.

सदत बचत प्रामुख्याने स्थानिक शेतकऱ्यांच्या विरोधामुळे प्रगतीपथावरील भाग-१ चे काम पूर्ण न झाल्याने बचत दिसून येत आहे.

५.२५ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. ११२.५३ लक्ष (रुपये एक कोटी बारा लाख त्रेपन्न हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.११२.५३ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक (०२)लाभ क्षेत्रविकासाखाली मोठे प्रकल्प केंद्र पुरस्कृत (०२)(२२) अप्पर पेनगंगा प्रकल्प मूळ १,१२.०० पूरक ३,५३.०० पुनर्विनियोजन (-) ४,०६.७२	५८.२८	५८.१७	(-) ०.११

५.२६ रु. ३.१८ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता अपूरा असल्याचे सिध्द झाले. प्रकल्पावरील अपेक्षित खर्चाच्या आधारे बचत झाल्यामुळे पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे मार्च २०१० मध्ये वरील वरील उपशीर्षाखाली रु.७,७६.४१ लाख एवढया रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली. त्याबाबतची कारणे प्रतीक्षित आहेत (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :

५.२७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु ५८.२८ लक्षच्या (रुपये अठठवन्न लाख अठावीस हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामूळे रु. ०.११ लक्ष (रुपये अकरा हजार फक्त) इतकी अत्यल्प बचत झाली आहे.

५.२८ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. ५८.१७ लक्ष (रुपये अठठावन्न लाख सतरा हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.५८.१७ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ०१ संचालन व प्रशासन मूळ ७०,९४.८६ पूरक १,४१,१४.०७ पुनर्विनियोजन (-) १६,४२.४७	१,९५,६६.४६	१,९५,०७.८२	(-) ५८.६४

५.२९ प्रत्यक्ष आवश्यकतेचा आधार घेतल्याचे नमूद करुन मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनव्दारे/ प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु.१६,४२.४७ लाख एवढया रकमेने तरतुदीत कपात करण्यात आली ती रु. ५८.६४ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता अपुरी असल्याचे सिध्द झाले. त्याबाबतची कारणे प्रतिक्षित आहे (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.३० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु. १९५६६.४६ लक्षच्या (रुपये एकशे पंच्याण्णव कोटी सहासष्ठ लाख सेहेचाळीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. १९४६९.६४ लक्ष (रुपये एकशे चौऱ्याण्णव कोटी एकोणसत्तर लाख चौसष्ठ हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु. ९६.८२ लक्ष (रुपये शहाण्णव लाख ब्याऐंशी हजार फक्त) इतकी बचत झाली आहे. सदरहू बचत प्रामुख्याने बीडीएस वरील तांत्रिक अडचणीमुळे व काही देयंकांना कोषागार कार्यालयाने आक्षेप घेतल्याने दिसून येत आहे.

५.३१ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.१९५०७.८२ लक्ष (रुपये एकशे पंच्याण्णव कोटी सात लाख ब्याऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने

रु. १९४६९.६४ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये रु. ३८.१८ (रुपये अडोतीस लाख अठरा हजार फक्त) इतकी तफावत आहे.

५.३२ सदर तफावतीच्या अनुषंगाने महालेखापाल कार्यालयास पत्र क्र. विनियो.४७०१/२००९-१०/(४८/१०)/लेखा, दि.१८/०३/२०११ अन्वये चुकीची दुरुस्ती नोंद प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ०५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री (०१) हत्यारे व संयत्रे मूळ १,८४.०७ पूरक ३,५१.४६ पुनर्विनियोजन (-) ४५.७५	४,८९.७८	४,७९.६८	(-) १०.१०

नियंत्रण अधिकाऱ्याच्या मागणीच्या आधारावर मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे/ प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु. ४५.७५ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता अपुरी असल्याचे सिध्द झाले. त्याची कारणे प्रतिक्षित आहेत(ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.३३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.४८९.७८लक्ष (रुपये चार कोटी एकोणनव्वद लाख अठयाहत्तर हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.४७९.२७ लक्ष (रुपये चार कोटी एकोणऐंशी लाख सत्तावीस हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु. १०.५१ लक्ष् (रुपये दहा लाख एक्कावन्न हजार फक्त) बचत झाली आहे. सदर बचत प्रामुख्याने बीडीएस वरील तांत्रिक अडचणीमुळे झाली आहे..

५.३४ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. ४७९.६८ लक्ष (रुपये चार कोटी एकोणऐंशी लाख अडुसष्ठ हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु. ४७९.२७ लक्ष

इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या रु. ०.४१ लक्ष तफावत आहे.

५.३५ सदर तफावतींच्या अनुषंगाने महालेखापाल कार्यालयास पत्र क्र.विनियो-४७०१/२००९-१०-(४८/१०)/लेखा, दि.२९/०३/२०११ अन्वये चुकीची दुरुस्ती नोंद प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च (०४) गुण नियंत्रण मूळ ७७.०० पूरक १,१४.६७ पुनर्विनियोजन (-) ३८.३३	१,५३.३४	१,५२.५६	(-) ०.७८

ज्ञापन :-

५.३६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु. १५३.३४ लक्षच्या (रुपये एक कोटी त्रेपन्न लाख चौतीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१५२.५६ लक्ष (रुपये एक कोटी बावन्न लाख छपन्न हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.०.७८ लक्ष (रुपये अठयाहत्तर हजार फक्त) इतकी बचत झाली आहे. सदर बचत प्रामुख्याने बीडीएस वरील तांत्रिक अडचणीमुळे
झाली आहे.

५.३७ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.१५२.५६ लक्ष (रुपये एक कोटी बावन्न लाख छपन्न हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु. १५२.५६ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणमी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च (०८)(०१) महाराष्ट जलक्षेत्र सुधार प्रकल्प मूळ २,८७.८६ पूरक ५,७५.७३ पुनर्विनियोजन (-)५,४४.३३	३,१९.२६	१,१८.१२	(-) १.१४

५.३८ प्रत्यक्ष आवश्यकतेच्या आधारे असल्याने नमूद करुन मार्च २०१० मध्ये प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु.५,८२.६६ लाखाच्या रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली. ती रु.१.९२ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता अपुरी असल्याचे सिध्द झाले. त्याची कारणे प्रतिक्षित आहेत(ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.३९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.३१९.२६ लक्षच्या (रुपये तीन कोटी एकोणीस लाख सव्वीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.३१७.२२ लक्ष (रुपये तीनेश सतरा लाख बावीस हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.२.०४ लाख (रुपये दोन लाख चार हजार फक्त) बचत झाली आहे. प्रामुख्याने सदरहू बचत पारीत न झाल्याने दिसून येत आहे.

५.४० महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.३१८.१२ लक्ष (रुपये तीन कोटी अठरा लाख बारा हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.३१७.२२ लक्ष इतका खर्च केलेला आहे.

परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये रु ०.९० लक्ष तफावत आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च (०७)(०१) जलविज्ञान प्रकल्प टप्पा-२ मूळ १,००.०० पूरक २,९०.०० पुनर्विनियोजन (-) १,२१.५१	२,६८.४९	२,५०.०६	(-) १८.४३

आंतरराष्टीय व राष्टीय दौरा रद्द झाल्यामुळे आणि बीडीएस नियोजन आणि बीडीएस यांच्या संगणकारीता कलेल्या खर्चामध्ये बचत झाल्यामुळे मार्च २०१० मध्य पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु.१,२१.५१ लक्ष एवढया रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली. रु.१८.४३ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता अपूरी असल्याने सिध्द झाले. त्याची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.४१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.२६८.४९ लक्षच्या (रुपये दोन कोटी अडूसष्ठ लाख एकोणपन्नास हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२५०.०६ लक्ष (रुपये दोन कोटी पन्नास लाख सहा हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.१८.४३ लक्ष(रुपये अठरा लाख त्रेचाळीस सहा हजार फक्त) इतकी बचत झाली आहे. सदर बचत प्रामुख्याने बीडीएसवरील तांत्रिक अडचणीमुळे बीडीएस स्लीप न निघाल्यामुळे दिसून येत आहे.

५.४२ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. २५०.०६ लक्ष(रुपये दोन कोटी पन्नास हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.२५०.०६ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालानी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०२ लहान पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (०१)(०१) अधीक्षक अभियंता व प्रशासक ला.क्षे.वि.प्रा., पुणे मूळ ५१.८९ पूरक १,०३.७९ पुनर्विनियोजन (-)२५.३४	१,३०.३४	१,३०.३१	(-) ०.०३

प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे असल्याने नमूद करुन प्रत्यार्पणाव्दारे मार्च २०१० मध्ये वरील उपशीर्षाखाली रु.२५.३४ लक्ष एवढया रकमेने तरतुदीत कपात करण्यात आली. ती रु.०.०३ लाख एवढया रकमेची अंतिम बचत लक्षात घेता अपुरी असल्याचे सिध्द झाले. त्याबाबतची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.४३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.१३०.३४ लक्षच्या (रुपये एक कोटी तीस लक्ष चौतीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. १३०.३१ लक्ष (रुपये एक कोटी तीस लक्ष एकतीस हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.०.०३ लक्ष (रुपये तीन हजार फक्त) इतकी अत्यल्प बचत झाली आहे.

५.४४ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. १३०.३१ लक्ष (रुपये एक कोटी तीस लक्ष एकतीस हजार फक्त) इतका खर्च नोदविला आहे. परिणामी महालेखापालांनी नोदविलेल्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमातील गुंतवणूका (०७) योजना(राष्टीय कृषी व ग्रामीण विकास बँक अंतर्गत भाग भांडवली अंशदान) (०७)(०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ९६,८९.०० पूरक १,४०,९९.०० पुनर्विनियोजन (-) २६,२५.५७	२,११,६२.४३	२,११,६२.४२	(-)०.०१

ज्ञापन :-

५.४५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु. २११६२.४३ लक्षच्या (रुपये दानशे अकरा कोटी बासष्ट लाख त्रेचाळीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. २११६२.४२ लक्ष (रुपये दोनशे अकरा कोटी बासष्ट लाख बेचाळीस हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.०.०१ लक्ष (रुपये एक हजार फक्त) इतकी अत्यल्प बचत झाली आहे.

५.४६ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२११६२.४२ (रुपये दानशे अकरा कोटी बासष्ट लाख त्रेचाळीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.२११६२.४२ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महोलेखापालांनी नोंदविलेला खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०२ लहान पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमातील गुंतवणुका (००)(०५) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ६,४५.५० पूरक २,२३,६९.०२ पुनर्विनियोजन . (-) ९,७८.६२	२,२०,३५.९०	२,२०,३२.९०	(-) ३.००

ज्ञापन :-

५.४७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु. २२०३५.९० लक्षच्या (रुपये दोनशे वीस कोटी पस्तीस लक्ष नव्वद हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२२०३२.९० लक्ष (रुपये दोनशे वीस कोटी बत्तीस लक्ष नव्वद हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.३.०० लक्ष (रुपये तीन लक्ष फक्त) इतकी बचत झाली आहे.शासन ज्ञापन क्र.बीजीएम-४३.१०/१०१/२०१०/अर्थ-२ अन्वये अंतिम सुधारीत अनुदानाच्या आदेशानुसार रु.२२०३५.९० लक्ष इतके अनुदान वाटप झाले. परुतु प्रत्यक्षात नियंत्रक अधिकारी, अ.अ.व प्रशासक, कडा, नागपूर,यांना बीडीएस संगणक प्रणालीवर रु.२२०३२.९० लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले. यामुळे रु.३.०० लक्षची बचत दिसून येत आहे.

४.४८ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२२०३२.९० लक्षच्या (रुपये दोनशे वीस कोटी बत्तीस लक्ष नव्वद हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०२ लहान पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमातील गुंतवणुका (००)(०४) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ५,२६.६७ पूरक ३,२८,९०.३३ पुनर्विनियोजन (-)७१,००.०४	,६३,१६.९६	२,६३,१६.९५	(-) ०.०१

५.४९ वित्त विभागाने आठमाही सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये कमी तरतूदीची रक्कम मंजूरी केल्यामुळे मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यर्पण याव्दारे उपशीर्षाखाली रु.१,०७,०४.२३ लाख एवढया रकमेने कपात करण्यात आली. ती रु.३.०२ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता अपुरी असल्याचे सिध्द झाले. त्याबाबतची कारणे प्रतिक्षित आहेत (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.५० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु. २६३१६.९६ लक्षच्या (रुपये दानशे त्रेसष्ठ कोटी सोळा लाख शहाण्णव हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२६३१६.९५ लक्ष (रुपये दोनशे त्रेसष्ठ कोटी सोळा लाख पंच्याण्णव हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.०.०१ लक्ष (रुपये एक हजार फक्त) इतकी अत्यल्प बचत झाली आहे.

५.५१ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२६३१६.९५(रुपये दानशे त्रेसष्ठ कोटी सोळा लाख पंच्याण्णव हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. परिणामी महोलेखापालांनी नोंदविलेला खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ०५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री (०२) इतर शीर्षाकडून हस्तांतरीत केलेला खर्च मूळ ८३.२६ पूरक १०,६७.६१ पुनर्विनियोजन (-)२,३०.१७	९,२०.७०	१,३५,५९	(-)७,८५.११

ज्ञापन :-

५.५२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.१३७.७५ लक्ष (रुपये एक कोटी सदोतीस लाख पंचाहत्तर हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१३७.७५ लक्ष (रुपये एक कोटी सदोतीस लाख पंचाहत्तर हजार फक्त) इतका झाला आहे. परिणामी अधिक्य अथवा बचत झालेली नाही.

५.५३ या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.७८२.९५ लक्ष (रुपये सात कोटी ब्याऐंशी लाख पंच्याण्णव हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.७८२.९५ लक्ष (रुपये सात कोटी ब्याऐंशी लाख पंच्याण्णव हजार फक्त) इतका झाला आहे. परिणामी अधिक्य अथवा बचत झालेली नाही.

५.५४ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली एकत्रित रु.९२०.७० (रुपये नऊ कोटी वीस लाख सत्तर हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे.आणि विभागाने प्रत्यक्ष रु.९२०.७०लक्ष (रु.७८२.९५ लक्ष + रु.१३७.७५ लक्ष = ९२०.७० लक्ष) इतका खर्च केलेला आहे. परिणामी महोलेखापालांनी नोंदविलेला खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०२ लहान पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमातील गुंतवणुका (००)(०२) कोकण पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ५,११.८० पूरक ९३,११.१९ पुनर्विनियोजन (-)३५,००.००	६२,२३.७९	३,२३.७८	(-)०.०१

ज्ञापन :-

५.५५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.६३२३.७९ लक्षच्या (रुपये त्रेसष्ठ कोटी तेवीस लक्ष एकोणऐशी हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.६३२३.७८ लक्ष (रुपये त्रेसष्ठ कोटी तेवीस लक्ष अठयाहत्तर हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे रु.०.०१ लक्ष (रुपये एक हजार फक्त) इतकी अत्यल्प बचत झाली आहे.

५.५६ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.६३२३.७८(रुपये त्रेसष्ठ कोटी तेवीस लक्ष अठयाहत्तर हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. परिणामी महोलेखापालांनी नोंदविलेला खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७११ पूर नियंत्रण प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ पूरनियंत्रण प्रकल्प १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमातील गुंतवणुका (०१)(०१) महाराष्ट कृष्णा खारे विकास			

महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ २,१०.४४ पूरक ९,२७.६७ पुनर्विनियोजन (-)२,८४.५३	८,५३.५८	८,५३.५०	(-)०.०८

ज्ञापन :-

५.५७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु. ८५३.५८ लक्षच्या (रुपये आठ कोटी त्रेपन्न लाख अठावण्ण हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.८५३.५० लक्ष (रुपये आठ कोटी त्रेपन्न लाख पन्नास हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे रु.०.०८ लक्ष (रुपये आठ हजार फक्त) इतकी अत्यल्प बचत झाली आहे.

५.५८ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.८५३.५० लक्ष (रुपये आठ कोटी त्रेपन्न लाख पन्नास हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. परिणामी महोलेखापालांनी नोंदविलेला खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७११ लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च ०३ जलनिस्सारण् प्रकल्प १०३ स्थापत्य बांधकामे (०१) इतर आकार मूळ ९.३६ पूरक ४६.८० पुनर्विनियोजन (-)६.१७	४९.९९	७.३५	(-)४२.६४

ज्ञापन :-

५.५९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.४९.९९ लक्षच्या (रुपये एकोणपन्नास लाख नव्याण्णव हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.४९.९९ लक्ष (रुपये एकोणपन्नास लाख नव्याण्णव हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे अधिक्य अथवा बचत दिसून येत नाही.

५.६० महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.७.३५ लक्ष (रुपये सात लाख पस्तीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. परिणामी महोलेखापालांनी नोंदविलेला खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये रु.४२.६४ लक्ष (रुपये बेचाळीस लाख चौसष्ठ हजार फक्त) इतकी तफावत आहे. सदर तफावत महालेखापालांचा व विभागाचा ईटीपी च्या गणनेतील भिन्नतेमुळे दिसून येत आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती ००१ संचालन व प्रशासन मूळ २२,१९.२३ पूरक ४४,३८.५० पुनर्विनियोजन (-)१५,५२.९२	५१,०४.८१	४९,३६.९६	(-)१,६७.८५

ज्ञापन :-

५.६१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.५१०४.८१ लक्षच्या (रुपये एकावन्न कोटी चार लाख एक्याऐशी हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.५१०२.९८ लक्ष (रुपये एकावन्न कोटी दोन लाख अठयाण्णव हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे रु.१.८३ लक्ष (रुपये एक लाख त्रयाऐशी हजार फक्त) इतक बचत झाली आहे. प्रामुख्याने वेतन व कर्मचाऱ्यांच्या भत्यावरील खर्च असल्याने सदर बचत दिसून येते.

५.६२ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.५०३६.५५ लक्ष (रुपये पन्नास कोटी छत्तीस लाख पंचावन्न हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे.तथापि , महालेखापालांनी विनियोजन लेखा अहवालात रु.४९३६.९६(रुपये एकोणपन्नास कोटी छत्तीस लाख शहाण्णव हजार फक्त) खर्च नोंदविला आहे. विभागाने रु.५१०२.९८ लक्ष प्रत्यक्ष खर्च केलेला आहे. परिणामी रु. १६७.८५ लक्ष (रुपये एक कोटी सदुसष्ठ लाख पंच्याऐंशी हजार फक्त) बचत दिसून येते. प्रामुख्याने महालेखापालांनी त्याच्या लेख्यात या उपशीर्षाखाली (-) खर्च (recovery) रु. ९९.५८ लक्ष { रु.(-) ४६.३८ लक्ष (संगणक संकेतांक ४८०११०१३) आणि रु.(-) ५३.२० लक्ष (संगणक संकेतांक ४८०१ १०३१)

= रु.(-) ९९.५८ लक्ष } जमा शीर्षाची रक्कम दशविली आहे, त्यामुळे विनियोजन लेख्यात रु. ४९३६.९६ लक्ष { रु.५०३६.५५ लक्ष (-) रु.९९.५८ लक्ष = रु. ४९३६.९६ लक्ष } दर्शविल्यामुळे रु. १६७.८५ लक्षाची बचत दिसून येते तथापि विभागाची प्रत्यक्ष बचत रु.१.८३ लक्ष आहे.

५.६३ महालेखापालांनी विनियोजन लेखा अहवालात खर्च रु.४९३६.९६ लक्ष (रुपये एकोणपन्नास कोटी छत्तीस लाख शहाण्णव हजार फक्त) इतकाच नोंदविला आहे व विभागाच्या प्रत्यक्ष खर्च रु.५१०२.९८ लक्ष (रुपये एकावन्न कोटी दोन लाख अठयाण्णव हजार फक्त) त्यामुळे रु.१६६.०२ लक्षाची तफावत दिसत आहे. सदर तफावत प्रामुख्याने महालेखापालांनी या उपशीर्षाखाली जमा वसूली (-) खर्च रु.९९.५८ लक्ष दर्शविला आहे. (रु.१६६.०२ लक्ष (-) रु.९९.५८ लक्ष = रु.६६.४४ लक्ष) परंतु प्रत्यक्षात महालेखापालांनी नोंदविलेला खर्च व विभागाने केलेला प्रत्यक्ष खर्च यामध्ये रु.१६६.४४ इतकी तफावत आहे. संचालन व प्रशासन अंतर्गत असलेल्या उपशीर्षाखाली (संगणक संकेतांक ४८०१०९५७ मधून मुख्य लेखाशीर्ष २८०१ अंतर्गत उपशीर्ष २८०१०१८५ कडे वर्ग करण्याकरीता रु.११५.२२ लक्ष बदली नोंद प्रस्तावाव्दारे करण्यात आले होते. परंतु महालेखापालांनी सदरच्या बदली नोंद प्रस्तावाबाबत संबंधीत नियंत्रक अधिकारी अ.अ. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (वीजगृह) नाशिक यांनी त्यांच्या दि. ७.६.२०१० च्या पत्रान्वे महालेखापाल कार्यालय, नागपूर यांना कळविण्यात आले होते महालेखापालांनी सदरची रक्कम रु.११५.२२ लक्ष ऐवजी नजर चुकीने रु.११.५२ लक्ष अशी नोंदविली होती. महालेखापालांनी तदनंतर त्यांचे पत्र क्र.डीसी-७/५०%/टीआऐ ४८०१ ते २८०१/०६ दि.३१.५.२०११ अन्वये रुपये ११५.२२ लक्ष रक्कम सुधारीत केल्याचे कळविले आहे.

५.६४ उर्वरित तफावत रु.५४.९२ लक्ष (रु.६६.४४ लक्ष (-) रु.११.५२ लक्ष = रु.५४.९२ लक्ष) इतक्या रकमेचा विहित मुदतीत शोध लागू शकला नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती , जलविद्युत योजना-मोठी बांधकामे (०६) भंडारदरा जलविद्युत प्रकल्प मूळ ५.०० पूरक ४३.५६ पुनर्विनियोजन (-)३२.७१	१५.८५	१५.८४	(-)०.०१

ज्ञापन :-

५.६५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.१५.८५ लक्षच्या (रुपये पंधरा लाख पंच्याऐंशी हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१५.८५ लक्षच्या (रुपये पंधरा लाख पंच्याऐंशी हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे अधिक्य अथवा बचत दिसून येत नाही.

५.६६ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.१५.८४ लक्ष (रुपये पंधरा लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.१५.८५ लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये रु.०.०१ लक्ष (रुपये एक हजार फक्त) अत्यल्प तफावत आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती , जलविद्युत योजना-मोठी बांधकामे (०६) पंप बसवलेली घाटघर जलाशय योजना मूळ १६,९५.१८ पूरक २५,३२.८२ पुनर्विनियोजन (-)२०,३२.७६	२१,९५.२४	२१,९५.१७	(-)०.०७

ज्ञापन :-

५.६७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.२१९५.२४ लक्षच्या (रुपये एकवीस कोटी पंच्याण्णव लाख चोवीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२१९५.१७ लक्षच्या (रुपये एकवीस कोटी पंच्याण्णव लाख सतरा हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे रु.०.०७ लक्षाची अत्यल्प बचत झाली.

५.६८ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२१९५.१७ लक्षच्या (रुपये एकवीस कोटी पंच्याण्णव लाख सतरा हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.२१९५.१७

लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती , जलविद्युत योजना-मोठी बांधकामे (०६) कोयना धरण पायथा वीजगृह मूळ २०,५३.३३ पूरक ४४,१८.२७ पुनर्विनियोजन (-) ३९,२७.४७	२५,४४.१३	२५,४३.६१	(-) ०.५२

५.६९ कोणतेही कारण न देता, मार्च २०१० पुनर्विनियोजनाव्दारे/ प्रत्यापर्णाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु.१,१५,६६.७३ लाख एवढया रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली ती रु.९,९६.२९ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता अपुरी असल्याचे सिध्द झाले. त्याबाबतची कारणे प्रतिक्षित आहेत (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.७० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.२५४४.१३ लक्ष (रुपये पंचवीस कोटी चव्वेचाळीस लाख तेरा हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२५४३.६१लक्षच्या (रुपये पंचवीस कोटी हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे रु.०.५२ लक्षाची (बावन्न हजार फक्त) बचत झाली आहे. प्रामुख्याने कामाचे अंदाजित मुल्य रु.७.०० लक्ष होते तथापि अंदाजापेक्षा खर्च कमी झाल्याने बचत दिसून येते.

५.७१ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२५४३.६१लक्षच्या (रुपये पंचवीस कोटी त्रेचाळीस लाख एकसष्ठ हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.२५४३.६१

लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक (०१) लाभक्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प राज्य योजनांतर्गत योजना (०२)(१०) चासकमान प्रकल्प मूळ १,३०.६३ पूरक १,२२.८७ पुनर्विनियोजन -१,१३.११	१,४०.३९	१,४०.६३	+०.२४

५.७२ प्रकल्पावरील अपेक्षित खर्चाच्या आधारे बचत झाल्यामुळे मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे रु.१,१३.११ लाखाची तरतूद केलेली रक्कम काढण्यात आली ती रु.०.२४ लाखाचा अंतिम खर्च लक्षात घेता अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

रु.०.२४ लाख एवढया अंतिम खर्चाची कारणे प्रतीक्षित आहेत.

ज्ञापन :-

५.७३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.१४०.३९ लक्षच्या (रुपये एक कोटी चाळीस लाख एकोणचाळीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१४०.६३ लक्षच्या (रुपये एक कोटी चाळीस लाख त्रेसष्ठ हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे रु.०.२४(रुपये चोवीस हजार फक्त) अत्यल्प बचत झाली.

५.७४ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.१४०.६३ लक्षच्या (रुपये एक कोटी चाळीस लाख त्रेसष्ठ हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.१४०.६३ लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च (०१) विस्तार व सुधारणा मूळ १६,९२.३६ पूरक १,१०,६२.३२ पुनर्विनियोजन -३९,८५.५९	८७,६९.०९	८८,४२.४४	+७३.३५

५.७५ आठमाही सुधारीत अर्थसंकल्पित अंदाजात केलेल्या तरतूदीत कपात केल्याचे नमूद करुन मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यार्पणाव्दारे वरील उपशीर्षातून रु.३९,८५.५९ लाख एवढी तरतूदीची रक्कम काढण्यात आली ती रु.७३.३५ लाख एवढया रकमेचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.रु. ७३.३५ लाख एवढया अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.७६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी या उपशीर्षाखाली एकूण अनुदान रु.८७६९.०९ लक्षच्या (रुपये सत्याऐंशी कोटी एकोणसत्तर लाख नऊ हजार फक्त) दर्शविले आहे. तथापि, रु.७२.०० लक्ष् आकस्मिकता निधी अग्रिम (contigeny fund advace) मंजूर करण्यात आले. परिणामी उपलब्ध एकूण अनुदान रु.८८४१.०९लक्षच्या (रुपये अठयाऐंशी कोटी एकेचाळीस लाख नऊ हजार फक्त) च्या अनुषंगाने विभगाचा प्रत्यक्ष खर्च रु.८८४१.०७ लक्ष इतका झाला आहे. त्यामुळे रु.०.०२ लक्ष (दोन हजार फक्त) इतकी अत्यल्प बचत झाली आहे.

५.७७ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. ८८४२.४४ लक्ष (रुपये ब्याऐंशी कोटी बेचाळीस लाख चौवेचाळीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.८८४१.०७ लक्ष इतका खर्च कलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये रु.१.३७ लक्ष (रुपये एक लाख सदोतीस हजार फक्त) तफावत दिसून येते. सदर तफावतीबाबत शासन पत्र क्र. विनियो-४७०१/२००९-१०(४८७/१०)लेखा, दि. १८.३.२०११ अन्वये चुकीची दुरुस्ती नोंद प्रस्ताव

महालेखापालांनी सादर करण्यात आला. तथापि सदर उपरोक्त परिच्छेदातील सद्य:स्थिती लक्षात घेता महालेखापालांना नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च (०६) इतर शीर्षाकडून हस्तांतरित कलेला खर्च मूळ ५,३८.८२ पूरक २३,५३.०२ पुनर्विनियोजन -७,६५.३४	२१,२६.५०	२१,४४.२९	+१७.७९

५.७८ प्रत्यक्ष कामावरील खर्च विचारात घेऊन एफ एम जी मध्ये केलेल्या सुधारण केल्याचे नमूद करुन मार्च २०१० मध्ये प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षातून रु.७,६५.३४ लाख एवढी तरतूद केलेली रक्कम कापण्यात आली ती रु.१७.७९ लाख एवढया रकमेचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.रु.१७.७९ लाख एवढया अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षीत आहेत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.७९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.२१२६.५. लक्षच्या (रुपये एकवीस कोटी सव्वीस लाख पन्नास हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२१२६.५० लक्षच्या (रुपये एकवीस कोटी सव्वीस लाख पन्नास हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

५.८० महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२१४४.२९ लक्षच्या (रुपये एकवीस कोटी चौव्वेचाळीस लाख एकोणतीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.२१२६.५० लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये रु.१७.७९ लक्ष(रुपये सतरा लाख एकोणऐंशी हजार फक्त) इतकी तफावत दिसून येते. सदर तफावत महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्च व विभागाच्या खर्च यांच्या विभिन्न पध्दतीने इटीपीच्या गणनेमुळे दिसून येत आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती , ०५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री मूळ ८५.३४ पूरक १,७०.६७ पुनर्विनियोजन . -२,०९.९८	४६.०३	४७.१२	+१.०९

ज्ञापन :-

५.८१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.४६.०३ लक्षच्या (रुपये शेहेचाळीस लाख तीन हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.४७.१२ लक्षच्या (रुपये सतेचाळीस लाख बारा हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे रु. १.०९ (रुपये एक लाख नऊ हजार फक्त) अधिक्य झाली आहे. नियंत्रक अधिकाऱ्यांच्या अंदाजित रु.०.३३ लक्ष मागणी केली होती परंतु सदरचे अधिक्य अर्थसंकल्पीय अंदाजाच्या मर्यादेत झालेले आहे.

५.८२ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.४७.१२ लक्षच्या (रुपये सतेचाळीस लाख बारा हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.४७.१२ लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०६) योजना गतिमान सिंचन लाभ कार्यक्रमाच्या ठेव्यावरील भाग भांडवली अंशदान (०६)(०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ २,११,६६.३७ पूरक २१,८५,९०.१३ पुनर्विनियोजन -८,१०,१७.०४	१५,८७,३९.७६	१५,८७,६९.६६	+२९.९०

कोणतेही कारण न देता मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यार्पण याव्दारे वरील उपशीर्षातून रु.८,१२,२७.०२ लाख एवढी तरतूदीची रक्कम काढण्यात आली ती रु.३०.९९ लाख एवढया रकमेचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

रु.३०.९९ लाख एवढया अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.८३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.१५८७६९.७६ लक्षच्या (रुपये एक हजार पाचशे सत्याऐंशी कोटी एकोणचाळीस लाख् शहाहत्तर हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. १५८७६९.६६लक्षच्या(रुपये एक हजार पाचशे सत्याऐंशी कोटी एकोणसत्तर लाख् सहासष्ठ हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे रु.२९.९० (रुपये एकोणतीस लाख नव्व्द हजार फक्त) इतके अधिक्य झाले आहे. प्रामुख्याने बीडीएसवरील उपलब्ध अनुदानामुळे अधिक्य दिसून येत आहे.

५.८४ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. १५८७६९.६६ लक्ष (रुपये एक हजार पाचशे सत्याऐंशी कोटी एकोणसत्तर लाख् सहासष्ठ हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.१५८७६९.६६ लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे- वाणिज्यिक ०२ लाभ क्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प केंद्र पुरस्कृत योजना (०२)(१४) लोअर उन्ना प्रकल्प मूळ ३०.०० पूरक ५७.०० 	८७.००	४९.६२	(-)३७.३८

रु. ३७.३८ लाख एवढया रकमेच्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.८५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान (अ.सु.अ.) रु.२५०.७९ लक्षच्या (रुपये दोन कोटी पन्नास लाख एकोणऐंशी हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. २५०.७९लक्ष (रुपये दोन कोटी पन्नास लाख एकोणऐंशी हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

५.८६ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२५०.७९ लक्षच्या (रुपये दोन कोटी पन्नास लाख एकोणऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.२५०.७९ लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे- वाणिज्यिक (०२)लाभ क्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प राज्य योजनांतर्गत योजना (०२)(१२) मिमा प्रकल्प मूळ १,०५.६३ पूरक २,८१.१३ पुनर्विनियोजन (-)१,३५.९७	२,५०.७९	२,५०.७९	--

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

५.८७ या उपशीर्षाखाली एकूण अनुदान (अं.सु.अ.) रु.२५०.७९ लक्षच्या (रुपये दोन कोटी पन्नास लाख एकोणऐंशी हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२५०.७९ लक्षच्या (रुपये दोन कोटी पन्नास लाख एकोणऐंशी हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२५०.७९ लक्षच्या (रुपये दोन कोटी पन्नास लाख एकोणऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.२५०.७९ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चाममध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे- वाणिज्यिक (०२) लाभ क्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प केंद्र पुरस्कृत योजना (०२)(१९) चासकमान प्रकल्प मूळ १,००.०० पूरक २,००.०० पुनर्विनियोजन -१,२९.००	१,७१.००	१,७१.००	------

प्रकल्पावरील अपेक्षित खर्चाच्या आधारे बचत झाल्यामुळे मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु.२,६४.९७ लाखाच्या रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली.

ज्ञापन :-

५.८८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान (अ.सु.अ.) रु.१७१.०० लक्षच्या (रुपये एक कोटी एकाहत्तर लाख फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. १७१.०० लक्ष (रुपये कोटी एकाहत्तर लाख फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

५.८९ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. १७१.०० लक्ष (रुपये कोटी एकाहत्तर लाख फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. आणि विभागाने रु.१७१.०० लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०१) योजनेत्तर (वेतनाच्या लेख्यावरील भाग भांडवल) (०४)(०३) कोकण पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ .. ५९,५७.९२ पुनर्विनियोजन .. (-)५,८१.२३	५३,६७.६९	५३,६७.६९	---------

ज्ञापन :-

५.९० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०४) योजनेत्तर (वेतनाच्या लेख्यावरील भाग भांडवल) (०४)(०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ .. ३७,८७.७० पुनर्विनियोजन .. -८६.७०	३७,०१.००	३७,०१.००	---------

वेतनासाठी तरतूद केल्यानंतरही बचत अपेक्षित झाल्यामुळे मार्च २०१० मध्ये प्रत्यार्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु.६,६७,.९३ लाख एवढया रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली.

ज्ञापन :-

५.९१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०७) योजना (राष्ट्रीय कृषी व ग्रामीण बँक यांच्या लेख्यावरील भाग भांडवली अंशदान) (०७)(०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ १,६६.६७ पूरक २,७३.३३ पुनर्विनियोजन (-)८७.९९	३,५२.०१	३,५२.०१	---------

ज्ञापन :-

५.९२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०७) योजना(राष्ट्रीय कृषी व ग्रामीण बँक यांच्या लेख्यावरील भाग भांडवल) (०७)(०५) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ३३,११.०० पूरक ५४,७९.०० पुनर्विनियोजन (-) ११,३५.८३	७६,५३.१७	७६,५३.१७	----------

आठमाही अंदाजित वित्त विभागाने अनुदानात कपात केल्यामुळे मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु .१२,२४.८२लाखाच्या रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली.

ज्ञापन :-

५.९३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०६) योजना(गतिमान सिंचन लाभ कार्यक्रमाच्या लेख्यावरील भाग भांडवल) (०६)(०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ३०,००.०० पूरक ३,३५,००.०० पुनर्विनियोजन -३९,९०.३१	३,२५,०९.६९	३,२५,०९.६९	----------

ज्ञापन :-

५.९४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०६) योजना(गतिमान सिंचन लाभ कार्यक्रमाच्या लेख्यावरील भाग भांडवल) (०६)(०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ६,६६.६७ पूरक २,४७,७९.३३ पुनर्विनियोजन -७८,६६.९४	१,७५,७९.०६	१,७५,७९.०६	----------

ज्ञापन :-

५.९५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०६) योजना(गतिमान सिंचन लाभ कार्यक्रमाच्या लेख्यावरील भाग भांडवल) (०६)(०४) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ३०,००.०० पूरक २,४६,५९.०० पुनर्विनियोजन -८२,९२.९०	१,९३,६६.१०	१,९३,६६.१०	-----------

मुख्यत्वेकरुन केंद्रीय सहाय्यातून कमी निधी प्राप्त झाल्यामुळे मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु .२,०१,५०.१५ लाख रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली.

ज्ञापन :-

५.९६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०७) योजना(राष्ट्रीय कृषी व ग्रामीण बँक यांच्या लेख्यावरील भाग भांडवल) (०७)(०१) कृष्णा खोरे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ १६,६६.६७ पूरक ५१,७५.३३ पुनर्विनियोजन -१८,५९.२६	४९,८२.७४	४९,८२.७४	----------

ज्ञापन :-

५.९७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०२ लहान पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (००)(०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ७५.३७ पूरक ३४,२०.८५ पुनर्विनियोजन -३,१९.२९	३१,७६.९३	३१,७६.९३	----------

ज्ञापन :-

५.९८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.३१७६.९३ लक्षच्या (रुपये एकतीस कोटी शहात्तर लक्ष त्र्याण्णव हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.३१७६.९३ लक्ष (रुपये एकतीस कोटी शहात्तर लक्ष त्र्याण्णव हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.३१७६.९३ लक्षच्या (रुपये एकतीस कोटी शहात्तर लक्ष त्रयाण्णव हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०२ लहान पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (००)(०३) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ ९२.३४ पूरक २९,३५.६६ पुनर्विनियोजन -६,०५.५२	२४,२२.४८	२४,२२.४८	----------

वित्त विभागाने आठमाही अंदाजामध्ये अर्थसंकल्पीय तरतूदीत कपात केल्यामुळे मार्च २०१० मध्ये प्रत्यार्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु.२७,८४.०७ लाख एवढी तरतुदीची रक्कम काढण्यात आली.

ज्ञापन :-

५.९९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.२४२२.४८ लक्षच्या (रुपये चोवीस कोटी बावीस लक्ष अठेचाळीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२४२२.४८ लक्ष (रुपये चोवीस कोटी बावीस लक्ष अठेचाळीस हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२४२२.४८ लक्षच्या (रुपये एकतीस कोटी शहात्तर लक्ष त्रयाण्णव हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७११ पूर नियंत्रण प्रकल्प या वरील भांडवली खर्च ०१ पूरनियंत्रण प्रकल्प १०३ स्थापत्य बांधकामे (०२) पूर नियंत्रण प्रकल्प मूळ ४३.८० पूरक २,४१.९० पुनर्विनियोजन -५७.१४	२,२८.५६	२,२८.५६	------

५.१०० **ज्ञापन :-**

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.२२८.५६ लक्षच्या (रुपये दोन कोटी अठ्ठावीस लाख छपन्न हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२२८.५६ लक्ष (रुपये दोन कोटी अठ्ठावीस लाख छपन्न हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु .२२८.५६लक्षच्या (रुपये दोन कोटी अठ्ठावीस लाख छपन्न हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७११ पूर नियंत्रण प्रकल्प यांवरील भांडवली खर्च ०३ जलनिस्सारण प्रकल्प १०२ नागरी बांधकामे (०२) जल:निस्सारण कामे (०२)(०२) जल निस्सारण प्रकल्प (केंद्र हिस्सा) मूळ २०.०० पूरक ३०.०० पुनर्विनियोजन -४६.९४	३.०६	३.०६	------

ज्ञापन :-

५.१०१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.३.०६ लक्षच्या (रुपये तीन लाख सहा हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.३.०६ लक्ष (रुपये तीन लाख सहा हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

५.१०२ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.३.०६ लक्ष (रुपये तीन लाख सहा हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७११ पूर नियंत्रण प्रकल्पावरील भांडवली खर्च ०३ जलनिस्सारण प्रकल्प १०३ नागरी कामे (०२) जलनिस्सारण कामे (०२)(०३) लाभक्षेत्र विकास प्राधिकरणांतर्गत नसलेले जलनिस्सारण प्रकल्प मूळ २,१९.४४ पुनर्विनियोजन -४३.८९	१,७५.५५	१,७५.५५	--------

ज्ञापन :-

५.१०३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.१७५.५५ लक्षच्या (रुपये एका कोटी पंच्याहत्तर लाख पंचावन्न हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१७५.५५ लक्ष (रुपये एका कोटी पंच्याहत्तर लाख पंचावन्न हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

५.१०४ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.१७५.५५ लक्षच्या (रुपये एका कोटी पंच्याहत्तर लाख पंचावन्न हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती जलविद्युत योजना- मोठी बांधकामे (२७) माजलगांव जलविद्युत प्रकल्प मूळ .. ३६.०० पुनर्विनियोजन .. -१४.२१	२१.७९	२१.७९	------

ज्ञापन :-

५.१०५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.२१.७९ लक्षच्या (रुपये एकवीस लाख एकोणऐंशी हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२१.७९ लक्षच्या (रुपये एकवीस लाख एकोणऐंशी हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२१.७९ लक्षच्या (रुपये एकवीस लाख एकोणऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु. २१.७९ लक्ष इतका खर्च केलेल आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती जलविद्युत योजना- मोठी बांधकामे (१०) सरदार सरोवर प्रकल्प मूळ १०,००.०० पूरक १२,००.०० पुनर्विनियोजन -१९,९६.३०	२,०३.७०	२,०३.७०	------

ज्ञापन :-

५.१०६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.२०३.७० लक्षच्या (रुपये दोन कोटी तीन लाख सत्तर हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२०३.७० लक्षच्या (रुपये दोन कोटी तीन लाख सत्तर हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.२०३.७० लक्ष (रुपये दोन कोटी तीन लाख सत्तर हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.२०३.७० लक्ष इतका खर्च केलेल आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती जलविद्युत योजना- मोठी बांधकामे (३६) यवतेश्वर जलविद्युत प्रकल्प मूळ १.३३ पूरक १०.९१ पुनर्विनियोजन -१०.९१	१.३३	१.३३	------

ज्ञापन :-

५.१०७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.१.३३ लक्षच्या (रुपये एक लाख तेहतीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१.३३ लक्ष (रुपये एक लाख तेहतीस हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.१.३३ लक्षच्या (रुपये एक लाख तेहतीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.१.३३ लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत योजना- मोठी बांधकामे (३७) वान जलविद्युत प्रकल्प मूळ .. ८५.२७ पुनर्विनियोजन .. -३०.०४	५५.२३	५५.२३	-------

ज्ञापन :-

५.१०८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.५५.२३लक्षच्या (रुपये पंचावन्न लाख तेवीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ५५.२३ लक्ष (रुपये पंचावन्न लाख तेवीस हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.५५.२३ लक्ष (रुपये पंचावन्न लाख तेवीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.५५.२३ लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती जलविद्युत योजना- मोठी बांधकामे (३८) कुंभे जलविद्युत प्रकल्प मूळ .. ५,५३.३४ पूरक .. ११,१७.१७ पुनर्विनियोजन .. -११,७४.१७	४,९६.३४	४,९६.३४	-------

ज्ञापन :-

५.१०९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.४९६.३४ लक्षच्या (रुपये चार कोटी शहाण्णव लाख चौतीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.४९६.३४ लक्षच्या (रुपये चार कोटी शहाण्णव लाख चौतीस हजार फक्त)इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.४९६.३४ लक्षच्या (रुपये चार कोटी शहाण्णव लाख चौतीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.४९६.३४ लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती जलविद्युत योजना- मोठी बांधकामे (३८) गुजरात शासनास देय भाग मूळ .. ३७,०७.४७ पूरक .. १,४७,७१.३७ पुनर्विनियोजन .. -१,४७,७१.३७	३७,०७.४७	३७,०७.४७	-------

कोणतेही कारण न देता मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु .१,८१,४४.९७ लाख एवढया रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली.

ज्ञापन :-

५.११० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.३७०७.४७ लक्षच्या (रुपये सदोतीस कोटी सात लाख सतेचाळीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.३७०७.४७ लक्षच्या (रुपये सदोतीस कोटी सात लाख सतेचाळीस हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

५.१११ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.३७०७.४७ लक्षच्या (रुपये सदोतीस कोटी सात लाख सतेचाळीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.३७०७.४७ लक्ष इतका खर्च केलेला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक (०२) लाभक्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प राज्य योजनांतर्गत योजना (०२)(०९) खडकवासला प्रकल्प पूरक .. २५.३५ पुनर्विनियोजन .. -२५.३५			

ज्ञापन :-

५.११२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक (०२) लाभक्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प केंद्र पुरस्कृत योजना (०२)(१८) खडकवासला प्रकल्प मूळ ३०.०० पुनर्विनियोजन -३०.०० -----	-----	------	--------

ज्ञापन :-

५.११३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक (०२) लाभक्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प केंद्र पुरस्कृत योजना (०२)(२१) भीमा प्रकल्प मूळ . १,२५.०० पूरक १,१०.०० पुनर्विनियोजन . -२,३५.०० ----	----	------	--------

प्रकल्पावरील अपेक्षित खर्चाच्या आधारे झालेल्या बचतीमुळे मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु. २९०.३५ लाख एवढया रकमेने तरतूदीत कपात करण्यात आली.

ज्ञापन :-

५.११४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक (०१) मध्यम प्रकल्प (०१)(१०) सचिव, जलसंपदा मूळ .. ६,६६,६६.६७ पूरक .. २,४५.५५ पुनर्विनियोजन .. -६,६९,११.२२ -----	-----	------	--------

विविध पाटबंधारे निधिच्या वितरणाबाबत माननीय राज्यपालांकडून निदेश प्राप्त न झाल्यामुळे मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु.६,६९,११.२२ लाख एवढया रकमेने तरतूद काढण्यात आली. या शीर्षखाली केलेली ठोक रकमेची तरतूद पुनर्विनियोजनाव्दारे त्यानंतर वितरीत करण्यात आली.

ज्ञापन :-

५.११५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती जलविद्युत योजना- मोठी बांधकामे (२५) डिंभे जलविद्युत प्रकल्प मूळ .. १५.५१ पुनर्विनियोजन .. -१५.५०	०.०१	------	०.०१

कोणतेही कारण न देता, पुनर्विनियोजनाव्दारे/प्रत्यर्पणाव्दारे मार्च २०१० मध्ये वरील उपशीर्षाखाली रु. १५.५० लाख एवढया रकमेचा निधी काढण्यात आला.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४४०२ मृद व संधारण यावरील भांडवली खर्च १०२ मृद संधारण (०१) खार जमिन योजना मूळ .. २,५०.६१ पूरक .. १,३१.८८ पुनर्विनियोजन .. -१,२३.५०	५,०५.९९	५,१२.८२	+६.८३

ज्ञापन :-

५.११६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर उपशिर्षाखाली एकूण अनुदान रु.५०५.९९ लाख (रुपये पाच कोटी लाख नव्याण्णव हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ५०५.९३ लाख (रुपये पाच कोटी पाच लाख त्रयाण्ण हजार फक्त) इतका झाला आहे. परिणामी रु. ०.०६ लाख (रुपये सहा हजार फक्त) इतकी बचत झाली, ती अत्यल्प आहे.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशिर्षाखाली रु. ५१२.८२ लाख (रुपये पाच कोटी बारा लाख आणि ब्याऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.५०५.९३ लाख इतका खर्च केला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रु.६.८९ लाख(रुपये सहा लाख एकोणनव्व्द हजार फक्त) तफावत दिसून येते. सदर तफावत (तफावत रु.६.८९ लाख (-) बचत रु.०.०६ लाख कोषागार कार्यालयांतर्गत उ रु.६.८३ लाख) संगणक संकेतांक क्र. ४४०२ ०३८४ खाली अनवधनाने तालुका कृषी अधिकारी, सानगांव,यांच्या नावे हिंगोली ट्रेझरी गैरवर्गीकरण झाल्याने दिसून येत आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष			एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च					
०१ मोठे पाटबंधारे - वाणिज्यिक					
(०२) लाभक्षेत्र विकासाखाली मोठे प्रकल्प राज्य योजनांतर्गत योजना					
(०२)(०८) कुकडी प्रकल्प					
मूळ	..	२,१४.३५	६,०१.७८	६,०२.८३	+१.०५
पूरक	..	३,३७,४३			
पुनर्विनियोजन	..	-५०.००			

रु.७.८८ लाख एवढया रकमेचा अंतिम खर्च लक्षात घेता, कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे तरतूद करण्यात आलेला रु. १,७३.५० लाखाचा अतिरिक्त निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले. रु.७.८८ लाख एवढया रकमेच्या अंतिम खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.११७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.६०१.७८ लक्ष (रुपये सहा कोटी एक लाख अठयाहत्तर हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.६०१.७७ लक्षच्या (रुपये सहा कोटी एक लाख सत्याहत्तर हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे रु.०.०१ (रुपये एक हजार फक्त) इतकी अत्यल्प बचत झाली आहे.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.६०२.८३ लक्ष (रुपये सहा कोटी दोन लाख त्रयाऐंशी हजार फक्त) इतका खर्च झालेला आहे आणि विभागाने रु. ६०१.७७ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये रु.१.०६ लाख (रुपय एक लाख सहा हजार फक्त) इतकी बचत दिसून येते. सदर तफावतीचा शोध विहित मुदतीत लागू शकला नाही. तथापि अ.अ कडा पुणे यांच्या पत्र क्रमांक लाक्षेविप्रा १-ब-१/४१४२/सन २०११ दिनांक ३१/०५/२०११ अन्वये प्राप्त झालेला चुकीचा नोंदीचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयाकडून (सदर प्रस्ताव विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने) स्वीकारला गेला नाही. (या प्रकरणी दि.३१/०३/२०११ या विहित मुदतीत)

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ०१ संचालन व प्रशासन (०३) इतर शीर्षाकडून हस्तांतरीत केलेला खर्च मूळ .. १,३४.८२ पूरक .. २,९८.४२ पुनर्विनियोजन .. -५१.१७	३,८२.०७	७,३४.१६	+३,५२.०९

ज्ञापन :-

५.११८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

५.११९ या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.३८२.०७ लक्षच्या(रुपये तीन कोटी ब्याऐंशी लाख सात हजार फक्त) (संगणक संकेतांक ४७०१-९१११ + ४७०१-९१२२) (इतर शीर्षाकडून हस्तांतरित केलेला खर्च + (४७०१-९१०२ + ४७०१-९१११ + ४७०१-९१२२) (इतर खर्च ईटीपी) या अनषंगाने विभागाचा प्रत्यख खर्च रु.३८२.०७ लक्षच्या (रुपये तीन कोटी ब्याऐंशी लाख सात हजार फक्त) इतका झाला आहे त्यामुळे बचत अथवा अधिक्य झाले नाही.

महालेखापांलानी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु. ७३४.१६ लक्ष (रुपये सात कोटी चौतीस लाख सोळा हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु. ३८२.०७ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये रु. ३५२.०९ लक्ष (रुपये तीन कोटी बावन्न लाख नऊ हजार फक्त) इतकी तफावत आहे. सदर तफावत महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्च व विभागाचा खर्च यांच्या पध्दतीत विभिन्न गणनेमुळे दिसून येत आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७११ लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च ०१ पूर नियंत्रण १०३ नागरी कामे (०१) इतर खर्च मूळ .. ५.२० पूरक .. २८.७१ पुनर्विनियोजन .. -६.७८	२७.१३	५५.४३	+२८.३०

रु. ३,८०.३९ लाख एवढया रकमेचा अंतिम खर्च लक्षात घेता, कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता पुनर्विनियोजन/प्रत्यर्पण याव्दारे मार्च २०१० वरील उपशीर्षाखाली रु ५७.९५ लाखाचा निधी काढण्यात आला, ती अधिक असल्याचे सिध्द झाले.

रु.३,८०.३९ लाख एवढया रकमेच्या अंतिम खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

५.१२० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.२७.१३ लक्ष (रुपये सत्तावीस लाख तेरा हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२७.१३ लक्ष (रुपये सत्तावीस लाख तेरा हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

५.१२१ महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.५५.४३ लक्षच्या (रुपये पंचावन्न लाख त्रेचाळीस हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये रु.२८.३० लक्ष (रुपये अठ्ठावीस लाख तीस हजार फक्त) इतकी तफावत आहे सदर तफावत महालेखापालांचा व विभागाचा ईटीपी चया गणनेतील भिन्नतेमुळे दिसून येत आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०२) योजना(भाग भांडवली अंशदान) (०२)(०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ .. ५,८०,३८.५२ पूरक .. ०.०३ पुनर्विनियोजन .. ३,३७,४३.१२	९,५३,८१.६७	९,४४,५९.५९	-९,२२.०८

ज्ञापन:-

५.१२२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.९५३८१.६७ लक्षच्या (रुपये नऊशे त्रेपन्न कोटी एक्याऐंशी लाख सदुसष्ठ हजार फक्त) (संगणक संकेतांक ४७०१-एच६६५ + ४७०१ -एच ६६१ म्हणजेच योजनातर्गंत+ योजनेत्तर) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ९४४५९.५९ लक्षच्या (रुपये नऊशे चव्वेचाळीस कोटी एकोणसाठ लाख एकोणसाठ हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु. ९२२.०८ लक्ष (एक हजार फक्त) इतकी बचत झाली आहे. प्रामुख्याने बीडीएसवरील तांत्रिक अडचणीमुळे सदर बचत दिसून येत आहे.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.९४४५९.५९ लक्षच्या (रुपये नऊशे चव्वेचाळीस कोटी एकोणसाठ लाख हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु. ९४४५९.५९ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठया व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च (०३) इतर खर्च मूळ .. २३,०६.३२ पूरक .. २१,९३.६८ पुनर्विनियोजन .. ७१.०९	४५,७१.०९	४५,५५.७९	-१५.३०

ज्ञापन:-

५.१२३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु. ४५७१.०९ लक्षच्या (रुपये पंचेचाळीस कोटी एकाहत्तर लाख नऊ हजार फक्त) या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ४५५६.११ लक्षच्या (रुपये पंचेचाळीस कोटी छपन्न लाख अकरा हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु. १४.९८ लक्ष इतकी बचत झाली आहे. प्रामुख्याने बीडीएसवरील तांत्रिक अडचणी तसेच वाहनांवरील विम्याच्या खर्च न केल्यामुळे सदर बचत दिसून येत आहे.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.४५५५.७९ लक्ष (रुपये पंचेचाळीस कोटी पंचावन्न लाख एकोणऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु. ४५५६.११ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये जवळपास रु.०.३३ लक्ष (रुपये तेहतीस हजार फक्त) इतकी तफावत आहे.

सदर तफावतीबाबत शासन पत्र क्र. विनियो-/४७०१/२००९-१०/(४८/१०)/लेखा, दि. २९.३.२०११ अन्वये चुकीची दुरुस्ती नोंद प्रस्ताव महालेखापालांनी सादर करण्यात आला आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठया व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०२)योजना (भाग भांडवली अंशदान) (०२) (०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ २४.९८ पूरक ६८,२७.३४ पुनर्विनियोजन ६४,५२.००	१,३३,०४.३२	१,३३,०३.८१	(-)०.५१

ज्ञापन :-

५.१२४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारित अनुदान रु.१३३३०४.३२ लक्ष (रुपये एकशे तेहतीस कोटी चार लाख बत्तीस हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१३३०३.८१ (रुपये एकशे तेहतीस कोटी तीन लाख एक्याऐंशी हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.०.५१ लक्ष (रुपये एकावन्न हजार फक्त) इतकी अल्प बचत झाली आहे. जी प्रामुख्याने वितरणाचे आदेश वेळेवर प्राप्त न झाल्याने झाली आहे.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.१३३०३.८१ लक्षच्या (रुपये एकशे तेहतीस कोटी तीन लाख एक्याऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदिवला आहे आणि विभागाने रु.१३३०३.८१ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती जलविद्युत योजना-मोठी बांधकामे (३९) कोयना जलविद्युत प्रकल्पाला बळकटी आणणे मूळ ११.८३ पूरक २२.६७ पुनर्विनियोजन १६,७६.३३	१७,११.८३	१७,११.६१	(-)०.२२

ज्ञापन :-

५.१२५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारित अनुदान रु.१७११.८३ लक्ष (रुपये सतरा कोटी अकरा लाख त्र्याऐंशी हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१७११.६१ लक्ष (रुपये सतरा कोटी अकरा लाख एकसष्ट हजार फक्त) इतका झाला आहे. त्यामुळे रु.०.२२ लक्ष (रुपये बावीस हजार फक्त) ची अत्यल्प बचत झाली आहे.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.१७११.६१ लक्ष (रुपये सतरा कोटी अकरा लाख एकसष्ट हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.१७११.६१ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४७०१ मोठया व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०२) योजना(भाग भांडवली अंशदान) (०२)(०२) विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ .. ४६,२०.४१ पूरक .. ८,९५,४९.१६ पुनर्विनियोजन .. १,१५,३०.५९	१०,५७,००.१६	१०,५७,००.१६	-

ज्ञापन :-

५.१२६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०२) योजना(भाग भांडवली अंशदान) (०२)(०३) कोकण पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ .. ३,८९.४० पूरक .. ६९,३६.६४ पुनर्विनियोजन .. ८२,६५.६०	१,५५,९१.६४	१,५५,९१.६४	----------

ज्ञापन :-

५.१२७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठया व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०२) योजना(भाग भांडवली अंशदान) (०२)(०५) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ २,०६,०१.४० पूरक २,३५,३७.६९ पुनर्विनियोजन २,१३,३२.४९	६,५४,७१.५८	६,५४,७१.५८	----------

ज्ञापन :-

५.१२८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४७०१ मोठया व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०५) योजना(गतिमान सचिंनलाभ कार्यक्रमांच्या लेख्यावरील भाग्रिभांडवली अंशदान्न) (०६)(०३) कोकण पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान मूळ .. ८,३३.३३ पूरक .. १,३५,३३.२७ पुनर्विनियोजन .. ६८८६.४६	२,१२,५३.०६	२,१२,५३.०६	----------

ज्ञापन :-

५.१२९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परीक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०१ जलविद्युत निर्मिती जलविद्युत योजना - मोठी बांधकामे ०५२ कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा चार मूळ .. ६,७३.४१ पूरक .. १७,६२.३४ पुनर्विनियोजन .. ६०,४६.१०	८४,८१.८५	८४,८१.८५	--------

५.१३० कोणतेही कारण न देता, मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे वरील उपशीर्षाखाली रु. ५,४०,९१.२४ लाख एवढया रकमेची अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

४. पुनर्विनियोजनातील रु.९.५७ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता, मार्च २०१० मध्ये रु.१०.९२ लाखाचा परत केलेला निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

ज्ञापन :-

५.१३१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या उपशीर्षाखाली एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.८४८१.८५ लक्ष (रुपये चौऱ्याऐंशी कोटी एक्याऐंशी लाख पंच्याऐंशी हजार फक्त) च्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.८४८१.८५ लक्ष (रुपये चौऱ्याऐंशी कोटी एक्याऐंशी लाख पंच्याऐंशी हजार फक्त) इतका झाला आहे.त्यामुळे बचत अथवा अधिक्य दिसून येत नाही.

महालेखापालांनी प्रारुप विनियोजन लेखा अहवालात सदर उपशीर्षाखाली रु.८४८१.८५ लक्ष (रुपये चौऱ्याऐंशी कोटी एक्याऐंशी लाख पंच्याऐंशी हजार फक्त) इतका खर्च नोंदविला आहे आणि विभागाने रु.८४८१.८५ लक्ष इतका खर्च केलेला आहे. परिणामी महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत नाही.

५.१३२ निलंबन व्यवहारः- अनुदानातील एकूण खर्चात रु. १.७४ लाखांचा (४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च या प्रधान शीर्षाखाली रु. १.७४ लाख) समावेश आहे. निलंबन व्यवहाराचे स्वरुप अनुदान क्रमांक "एच ०६ सार्वजनिक बांधकाम आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारती" या विनियोजन लेख्यावरील टिप्पणीमध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे. सन २००९-२०१० या वर्षामधील अनुदानाच्या निलंबन व्यवहाराचे विश्लेषण खाली दिले आहेः-

निलंबन शीर्ष	**प्रारंभिक शिल्लक (+ खर्च - जमा)**	**खर्च (रु.लाखांत)**	**जमा**	**अखेरची शिल्लक (+ खर्च - जमा)**
प्रधान शीर्ष ४७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे यांवरील भांडवली खर्च				
संग्रह खरेदी	(+)१,५४,३३.१८	--------	८७.५०	+१,५३,४५.६८
संकीर्ण सार्वजनिक	(-)१,०५,१६.८५	--------	--------	-१,०५,१६.८५
बांधकाम विषयक आगाऊ रकमा	(+)९१,१७.९६	+५.०१	२.९०	+९१,१०.०५
कार्यशाळा निलंबन	(+)८२,६१.४२	२.२२	१,६७.४७	+८०,९६.१७
रोकड मेळ निलंबन लेखा	(+)७,०२.२७	१.०५	-७०.७४	(+)७,७४.०६
एकूण	**(+)२,२९,९७.९८**	**(-)१.७४**	**१,८७.१३**	**(+)२,२८,०९.११**

ज्ञापन :-

५.१३३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परिक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

प्रधान शीर्ष ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च				
संग्रह	(+) ३,९९.४८	--------	-----	(+)३,९९.४८
खरेदी	(-) ६,०४.६६	--------	--------	(-) ६,०४.६६
संकीर्ण सार्वजनिक बांधकाम विषयक	(+) २,०३.४७	----	१.२६	(+)२,०२.२१
आगाऊ रकमा	(+) १.८१	-----	-----	
कार्यशाळा				+१.८१
निलंबन	+८८.०४	----	-----	
रोकड मेळ निलंबन लेखा				+८८.०४
एकूण	**+८८.१४**	**-----**	**१.२६**	**+८६.८८**

ज्ञापन :-

५.१३४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखापरिक्षणात नमूद केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

साक्ष :-

५.१३५ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वित्तीय वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात लोकलेखा समितीने दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी परिच्छेद क्रमांक आय-५ संदर्भात जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी अनुदान क्रमांक आय-५ "" अंतर्गत महालेखाकारांच्या परिच्छेदासंदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००९-२०१० मध्ये ३१११ कोटी रुपयांची मागणी होती आणि पुरवणी मागण्यांव्दारे ६१६७ कोटी रुपये मिळाले. त्यातील १०१७ कोटी रुपये समर्पित केले. त्या वर्षीच्या ३१ मार्चच्या चार दिवस अगोदर ही रक्कम समर्पित केली आहे. ही रक्कम राज्य शासनाच्या तिजोरीत अगोदर आली असती तर त्या पैशांचा विनियोग दुसऱ्या विभागाकरिता करता आला असता. जलसंपदा विभागाचे ३१११ कोटी रुपयांचे मूळ बजेट आहे. तीन वेळा पुरवणी मागण्यांव्दारे रक्कम मागितली आहे. पहिली रक्कम दिनांक १२ जून त्यानंतर ९ डिसेंबर आणि १८ मार्च रोजी पुरवणी मागण्यांव्दारे वेगवेगळ्या वेळी विभागाने रकमेचे पुनर्विनियोजन केले आहेत, ते कसे झाले, याचा खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००९-२०१० मध्ये पहिल्यांदा लेखानुदान मंजूर झाले. त्यानंतर पुढील

अधिवेशनात अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. मूळ अनुदान कमी दिसते आणि पुरवणी मागण्यांमध्ये जास्त तरतूद दिसते. याबाबत महालेखापाल यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. समर्पित रकमेच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर जलसंपदा विभागात निधीचे चार टप्प्यांमध्ये वितरण केले जाते. पहिल्या टप्यात २५ टक्के रकमेचे वाटप केले जाते. दुसऱ्या टप्प्यात १५ टक्के रक्कम, तिसऱ्या टप्प्यात ३० टक्के आणि शेवटच्या टप्प्यात उर्वरीत रकमेचे वाटप केले जाते. शेवटच्या टप्प्यामध्ये जो निधी मुक्त केला जातो तो निधी मुक्त न झाल्यामुळे किंवा त्या रकमेला कपात न केल्यामुळे ती रक्कम समर्पित केल्याचा आदेश काढले जातो, यालाच रक्कम समर्पित करणे असे म्हटले जाते.

५.१३६ ३१ मार्चपूर्वी आपण अमुक एवढी रक्कम समर्पित करणार आहात, याची परिगणना विभागातर्फे केली जात नाही का ? आणि समर्पित रक्कम आणि कपात या दोन्ही बाबी एकच आहेत का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, चौथ्या टप्प्यामध्ये वित्त विभागाकडून निधी मुक्त झाला नाही, याचा अर्थ त्या रकमेत कपात केली असा होतो. तीन टप्प्यानंतर वेगवेगळे विभाग अर्थसंकल्पात निधी मुक्त करण्याची विनंती करतात. जलसंपदा विभाग यांच्या अखत्यारित असलेल्या महामंडळाच्या माध्यमातून निधी खर्च करतो. ही महामंडळे विविध कामांवर पैसे खर्च करतात आणि निधी मुक्त झाला नाही तर ती रक्कम समर्पित केली जाते.

५.१३७ जलसंपदा विभागाची शेवटची पुरवणी मागणी दिनांक १८ मार्च, २०१० ला मंजूर झाली. जेवढे पैसे बजेटमध्ये खर्च करणार आहात, ते अंतिम सुधारित तरतूदीमध्ये दिले नाही तर त्याला अंतिम कपात म्हणतात. दिनांक १८ मार्चला रक्कम मंजूर करण्यात आली आणि ३१ मार्चला यातील १०१७ कोटी रुपये समर्पित केले. वित्त विभागाने रक्कम मुक्त न केल्यामुळे १०१७ कोटी रुपये समर्पित करावे लागते. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, केंद्र शासनाकडून एआयबीपीचा निधी येतो. या निधीमध्ये राज्य सरकारचा हिस्सा टाकून ती योजना राबविण्यात येते. केंद्र शासनाकडून आलेला निधी राज्याच्या हिस्स्यासह ती रक्कम महामंडळासाठी मुक्त केली जाते. केंद्र सरकारकडून वेगवर्ती सिंचन लाभ कार्यक्रमाचा (Actimary Irrigation based Programme) निधी मिळाला नाही तर राज्य सरकार एआयबीपीसाठी निधीची तरतूद करते, तो निधी मुक्त होत नाही तसेच याबाबत महालेखापाल यांच्याशी सहमती दर्शवून सांगितले आहे की जलसंपदा विभागाला मंजूर करण्यात आलेला निधी मुक्त न झाल्यामुळे रक्कम समर्पित झाली असेही सचिवांनी सांगितले.

५.१३८ वित्त विभाग अंतिम सुधारित तरतूदीमध्ये कपात करतो विभागीय सचिवांनी सांगितल्याप्रमाणे एआयबीपीसाठी रक्कम नमूद केली आहे. सन २००९-२०१० मध्ये एआयबीपीसाठी येणाऱ्या निधीसाठी पैशांची

तरतूद केली होती. ही तरतूद पुनर्विनियोजनाच्या माध्यमातून केलेली आहे असे महालेखाकारांनी समितीस सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, अंतिम सुधारित तरतूदीनुसार दिनांक ३१/३/२०१० ला आदेश काढले आणि दत्तमत या शीर्षाखाली ७७५ कोटी रुपये वर्ग केले.

५.१३९ सन २००९-२०१० या वर्षी केंद्र शासनाचे किती पैसे आले व केंद्र शासनाकडून यावर्षी एआयबीपी साठी किती निधी प्राप्त झाला ? केंद्र सरकारकडून सन २००९-२०१० मध्ये एआयबीपीसाठी जुने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पैसे मागितले होते त्या आर्थिक वर्षात दिनांक ३१ मार्चपर्यंत किती रक्कम समर्पित केली ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सन २००९-२०१० मध्ये ३२६९ कोटी रुपयांची तरतूद होती. २४९४.४७ कोटी रुपयांचा निधी मुक्त झाला. यापैकी ७७५ कोटी रुपये एआयबीपी साठी मुक्त होऊ शकले नाहीत, अर्थसंकल्पामध्ये ७७५ कोटी रुपये एआयबीपीसाठी दाखविले होते. परंतु केंद्र सरकारकडून निधी मिळाला नाही. सन २००९-२०१० मध्ये राज्य सरकारचे जलसंपदा विभागातील महामंडळासाठी ७३५३ कोटी रुपयांची तरतूद होती व केंद्र शासनाकडून किती निधी आला याची माहिती समितीला लिखित स्वरुपात नंतर दिली जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले, परंतु विभागाकडून अद्याप माहिती अप्राप्त आहे.

५.१४० कोणतेही काम करताना त्यासाठी एक ठराविक तरतूद असते. वर्ल्ड बँक, नाबार्ड बँक किंवा परदेशातील काही उद्योगपती भारतामध्ये प्रोजेक्ट करण्यास उत्सुक असतात. भारतामध्ये नवीन प्रोजेक्ट करण्यासाठी जर्मन आणि जपान येथील वित्तीय संस्थांकडून कित्येक कोटी रुपयांचे अनुदान मिळालेले आहे. हा बाहेरुन येणारा पैसा असतो आणि तो ठराविक प्रकल्पांकरिता असतो. आपण ऑन पेपर क्लिअर असतो. अर्थसंकल्पात निधी आहे. विभागाने मागणी केल्यानुसार केंद्र शासनाकडून किती निधी प्राप्त झाला आणि तो कोणत्या टप्प्यात मिळाला व शेवटचा हप्ता केव्हा मिळाला तसेच ए.आय.बी.पी कडून ३२६९ कोटी रुपयांची मागणी केली होती. ही मॅचिंग ग्रॅन्ट नाही. एआयबीपीच्या प्रकल्पांसाठी सन २००९-२०१० च्या बजेटमधील तरतूदीसाठी सी.ए. आणि स्टेट शेअरचा अंतर्भाव आहे.

५.१४१ या ठिकाणी विभागाकडे शेवटचा हप्ता आलेला नसल्यामुळे त्याचा परिणाम अर्थसंकल्पीय तरतूदीवर होणार आहे की नाही ? असे समितीने विचारले असता ए.आय.बी.पी.च्या प्रकल्पासाठी सन २००९-२०१० मध्ये केंद्र शासनाकडून १३९५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. सी.ए. १३९५ कोटी रुपये आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. त्यावर समितीने विचारणा केली की, उर्वरीत रक्कम ही राज्य अर्थसंकल्पामधून खर्च झालेली आहे असा त्याचा अर्थ होतो काय ? ए.आय.बी.पी देखील कामाची प्रगती पाहिल्याशिवाय निधी देत नाही. गोसीखुर्द प्रकल्पाचे काम पूर्ण न केल्यामुळे एआयबीपीने पैसा दिलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे असे

मत समितीने व्यक्त केले असता ए.आय.बी.पी. अंतर्गत बजेटमध्ये तरतूद केली होती. यासंदर्भात विभागाने प्रस्ताव पाठविलेला होता. विभागाने १३९५ कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविलेला होता. केंद्र शासनाकडून प्रत्येक राज्यांना आर्थिक वर्षात निधी वितरीत केला जातो. इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्र राज्याला जास्त निधी मिळाला, ही गोष्ट खरी आहे. परंतु यासंदर्भातील अचूक आकडेवारी समितीला लिखित स्वरुपात नंतर सादर केली जाईल असे विभागीय सचिवांनी आश्वासीत केले. विभागाकडून प्राप्त झालेली माहिती सोबत जोडली आहे. **(विवरण पत्र क्र. १)**

५.१४२ या वर्षीपासून अंतिम सुधारित तरतुदीमध्ये सी.ए.वेगळा दाखवून खर्चमेळाचे काम करायला हवे काय ? १०१७ करोड ही काही कमी रक्कम नाही. ही रक्कम दिनांक ३१ मार्च रोजी समर्पित केलेली आहे. विभाग त्यांच्या कार्यपध्दतीमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा का करीत नाहीत असे महालेखाकारांनी समितीस सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, ए.आय.बी.पी.अंतर्गत सी.ए. आणि स्टेट शेअरसाठी वेगळा सी.आय.एस. कोड घेतलेला आहे. पूर्वी विभागाकडून हा निधी ए.आय.बी.पी.च्या शीर्षांतर्गत दाखविला जात होता. आता विभागाने सी.ए.आणि राज्य हिस्सा वेगळा केलेला आहे.

५.१४३ विभागाने १०१७ कोटी रुपयांची रक्कम कोणत्या कारणास्तव समर्पित केलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, महामंडळामधील ९४३ कोटी रुपये मुक्त होऊ शकत नाहीत. त्यामुळे ती रक्कम समर्पित झालेली होती. असे एकूण ९४३ कोटी रुपये महामंडळाला द्यावयाचे होते. परंतु ते पैसे आपण देऊ शकलो नाही, ही वस्तुस्थिती आहे.

५.१४४ जलसंपदा विभागाची अर्थसंकल्पीय तरतूद ही ४ टप्प्यात असते याची माहिती आपण समितीला दिलेली आहे. वित्त विभागाने एखाद्या कामासाठी कपात केलेली असेल तर व निधी मिळत नसेल तर त्याला काय म्हणायचे ? त्याला बचत म्हणावयाची की रक्कम समर्पित केली असे म्हणावयाचे ? असे समितीन विचारले असता यासंदर्भात वित्त विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले की, १०१७ कोटी रुपये खर्च झाले नाहीत, म्हणून विभागाने ती रक्कम दिनांक ३१ मार्चपूर्वी समर्पित केलेली आहे.

५.१४५ यासंदर्भात वित्तीय सल्लागार यांनी समितीस सांगितले की, केंद्र आणि राज्य शासनाकडून अर्थसंकल्पीय तरतूदीसाठी पैसा मंजूर केला जातो. केंद्र व राज्य शासनाकडून आपापल्या हिश्याप्रमाणे पैसा मुक्त केला जातो. परंतु जर केंद्र शासनाकडून निधी आला नाही आणि संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये समर्पित, पुनर्विनियोजन किंवा समर्पित हा प्रकार अर्थसंकल्पाशी संबंधित आहे. त्यानंतर आपण सुधारित अंदाज करतो. काही वेळेस राज्य शासनाकडून अर्थसंकल्पात तरतूदीमध्ये केली जाते. म्हणून तर सुधारित अंदाज हा त्यामधील एक भाग असतो. एकूण तरतूदीमध्ये कपात वित्त विभाग किंवा नियोजन विभागाने कपात विचारात

घेऊनच सुधारित अंदाज केलेला असतो. सुधारित अंदाज आणि अर्थसंकल्पीय तरतूदीमधील फरक एवढी रक्कम विभागाने समर्पित केलेली असते. सुधारित अंदाज मान्य केल्यानंतर जर ती रक्कम खर्च होऊ शकली नाही तर उर्वरित रक्कम ही प्रत्यार्पित केली जाते.

५.१४६ विभागाने निधी खर्च केला नाही असा आक्षेप महालेखाकार यांनी नोंदविलेला आहे. यासंदर्भात महालेखाकारांनी समितीला थोडक्यात माहिती द्यावी असे समितीने महालेखाकारांना सांगितले असता महालेखाकार यांनी समितीस सांगितले की, विभागाने तरतूद केलेली होती म्हणजे वित्त विभागाने जेवढा निधी देणे अपेक्षित आहे. १०१७ करोड ही रक्कम काही कमी रक्कम नाही. ही रक्कम दिनांक ३१ मार्च रोजी समर्पित केलेली आहे.

५.१४७ वित्त विभागाने कपात केलेली असेल तर १०१७ कोटी रुपयांची रक्कम ही कमी झाली पाहिजे. असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, विभागाने दिलेल्या बुकलेटमध्ये ऋण रक्कम दर्शविलेली आहे. राखीव दत्तमतकडे वर्ग असे आपण म्हणत असतो.

५.१४८ शासन सुधारित अंदाज मान्य करते, योजनांतर्गत आणि योजनेत्तर एकत्रित करुन योजनांतर्गत बचत झालेली असेल तर ती योजनेत्तर मध्ये जाते आणि ती करुन एकत्रित जमा केली जाते. असे समितीने मत व्यक्त केले यावर महालेखापालांनी सांगितले की, म्हणजे पैसा उपलब्ध असतानादेखील तो पैसा मार्चपर्यंत खर्च झालेला नाही. १०१७ करोड ही रक्कम काही कमी रक्कम नाही. ही रक्कम दिनांक ३१ मार्च रोजी समर्पित केलेली असल्यामुळे निधीचा विनियोग दुसरीकडे होऊ शकलेला नाही. यासंदर्भात सुधारित अंदाजामध्ये रक्कम समर्पित केली तर ती कशी केली ? अर्थसंकल्पात तरतूद आणि सुधारित अंदाजामध्ये फरक आहे असे समितीने विचारले असता या मुद्यांच्या संदर्भात उदाहरण देताना सांगितले की, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास नाबार्ड बँकेच्या अंतर्गत ९६.८९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. पूरक मागणी १४०.९९ कोटी रुपयांची होती. परंतु या ठिकाणी २६.२५ कोटी रुपयांचा निधी मुक्त झाला नाही. २११.६१ कोटी रुपये खर्च झाले. याचा अर्थ त्या ठिकाणची बचत ही नसल्यासारखी आहे.

५.१४९ ४७०१ या शिर्षाखाली मोठ्या व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्चासाठी मूळ तरतूद ८३ लाख २६ हजार रुपयांची आहे. पुरवणी मागणी १० कोटी ६७ लाख ६१ हजार रुपयांची आहे. ११ कोटी ५० लाख ८७ हजार रुपयांपैकी पुनर्विनियोजन केलेली रक्कम २ कोटी ३० लाख १७ हजार इतकी असून त्यापैकी ९ कोटी २० लाख ७० हजार एवढी रक्कम शिल्लक आहे. अशा परिस्थितीत फक्त ७ कोटी ८५ लाख रुपयांची रक्कम प्रत्यार्पित केलेली आहे असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ९ कोटी २०

लाख ७० हजार रुपये हे दोन भागात आहेत. १ कोटी ३७ लाख ७५ हजार रुपये एकाच शीर्षाखाली आहेत. खर्च एकाच शीर्षाखाली झालेला आहे.

५.१५० वित्त विभाग अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये कधी कपात करते तसेच वर्षाच्या शेवटी किती कपात केली याबाबत वित्त विभागाने घोषित केले तर महालेखाकारांनी लेखापरिक्षण करताना निश्चितपणे मदत होईल. या संबंधातील परिपत्रक वित्त विभागातर्फे काढले जाते. वित्त विभागातर्फे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये उपलब्ध साधनसंपत्तीचा आढावा घेण्यात येतो. एकूण मिळणारे उत्पन्न आणि खर्च यांचा हिशोब करुन मूळ अंदाजित उत्पन्न मिळाले आहे किंवा नाही हे पाहिले जाते. आकस्मिक प्रयोजनासाठी जसे दुष्काळ, भूकंप अशा कारणांसाठी रुपये २००० कोटी खर्च आला असेल व त्या पैकी केंद्र शासनाने रुपये १००० कोटी आर्थिक मदत केली असेल तर उर्वरित रुपये १००० कोटी राज्य शासनाला स्वत:च्या निधीतून उपलब्ध करुन द्यावे लागतात. या वेळी जर उपलब्ध साधन संपत्तीमध्ये त्या प्रमाणात वाढ झाली असेल व तो खर्च उपलब्ध साधनसंपत्तीच्या मर्यादेत असेल तर प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, जर उपलब्ध साधनसंपत्तीत रुपये १००० कोटी खर्च करणे शक्य नाही असे दिसल्यास योजनेत्तर किंवा योजनेअंतर्गत खर्चाच्या बाबीमध्ये, ज्याच्यामध्ये कपात करणे शक्य असते अशा बाबींवर कपात केली जाते. जेणेकरुन त्यातून एक हजार कोटी रुपये उपरोक्त प्रयोजनासाठी खर्च होऊ शकतात. महालेखाकारांची आकडेवारी दत्तमत तरतूदीवर आधारित असते व त्याप्रमाणे ते आपले अभिप्राय नोंदवित असतात. त्यामुळे यामध्ये जर स्पष्टता नसेल तर काहीच निष्पन्न होणार नाही. वित्त विभागाच्या विरोधात बोलण्याची हिंमत कुठल्याही विभागाची नाही. शेवटी काही गोष्टी स्पष्ट करणे सरकारला देखील अवघड असते. त्यामुळे लोकलेखा समितीपुढे येणारी आकडेवारी योग्य असली पाहिजे. कोणतीही आकडेवारी काल्पनिक असता कामा नये असे मत समितीने व्यक्त केले.

५.१५१ कोणत्या तरतूदीमध्ये सरकारने कपात केली आहे, ती योग्य आहे की नाही हे महालेखाकार कार्यालयाकडून लेखापरिक्षणाच्यावेळी पाहिले जाते. ही सर्व कामे मे महिन्यांमध्ये होतात. तेव्हा राज्याची वित्तीय स्थिती लक्षात आलेली असते. त्यावेळी एवढी कपात करण्यात आली आहे अशा प्रकारची सूचना वित्त विभाग किंवा संबंधित विभाग देऊ शकते. या संबंधातील चर्चा साक्षीच्या वेळी कशा काय होऊ शकते ? असे मत महालेखापालांनी व्यक्त केले. तसेच पाटबंधारे क्षेत्रात सुधारणा करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत, त्याची सद्य:स्थिती काय आहे ? राज्यातील मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प किती आहेत ? पूर्ण प्रकल्पांची संख्या किती असून त्यांची जिल्हानिहाय माहिती द्यावी. प्रगतीपथावर असलेल्या पाटबंधारे प्रकल्पांची संख्या किती आहे, त्यांची जिल्हानिहाय माहिती द्यावी. या प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे, प्रकल्पांवर अद्याप पर्यंत किती निधी खर्च झाला आहे, सन २०१३-१४ या वर्षामध्ये या

प्रकल्पांकरिता किती तरतूद करण्यात आली आहे ? सिंचन व बिगर सिंचन प्रकल्पात पाणीपट्टी आकारणी वसुली व थकबाकीची सद्य:स्थिती काय आहे, वसुलीची थकबाकी असल्यास, त्याची कारणे काय आहे, विभागाकडून वसुलीकरिता पाठपुरावा करण्यात येत आहे काय ? याबाबतची सविस्तर माहिती जलसंपदा विभागाने द्यावी असे समितीने सांगितले. सिंचनासंबंधातील श्वेतपत्रिका काढण्यात आली आहे. ज्या सिंचन प्रकल्पाचे काम १५ ते २० टक्के झालेले नाही त्या संदर्भातील माहिती देखील विभागाने द्यावी असे समितीने सांगितले. माहिती अप्राप्त आहे.

समितीचे अभिप्राय :-

५.१५२ सन २००९-२०१० मध्ये ३१११ कोटी रुपयांची मागणी होती आणि पुरवणी मागण्यांव्दारे ६१६७ कोटी रुपये मिळाले. त्यातील १०१७ कोटी रुपये समर्पित केले. त्या वर्षीच्या ३१ मार्चच्या चार दिवस अगोदर ही रक्कम समर्पित केली. ही रक्कम राज्य शासनाच्या तिजोरीत अगोदर आली असती तर त्या पैशांचा विनियोग दुसऱ्या विभागाकरिता करता आला असता.

५.१५३ प्रधान शिर्ष ४७०१ "मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च" या अंतर्गत मोठ्या व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्चासाठी मूळ तरतूद ८३ लाख २६ हजार रुपयांची आहे. पुरवणी मागणी १० कोटी ६७ लाख ६१ हजार रुपयांची आहे. ११ कोटी ५० लाख ८७ हजार रुपयांपैकी पुनर्विनियोजन केलेली रक्कम २ कोटी ३० लाख १७ हजार इतकी असून त्यापैकी ९ कोटी २० लाख ७० हजार एवढी रक्कम शिल्लक आहे. अशा परिस्थितीत फक्त ७ कोटी ८५ लाख रुपयांची रक्कम प्रत्यार्पित केली.

५.१५४ वित्त विभाग अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये कधी कपात करतो तसेच वर्षाच्या शेवटी किती कपात केली याबाबत वित्त विभागाने घोषित केले तर महालेखाकारांना लेखापरिक्षण करताना निश्चितपणे मदत होईल. या संबंधातील परिपत्रक वित्त विभागातर्फे काढले जाते. वित्त विभागातर्फे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये उपलब्ध साधनसंपत्तीचा आढावा घेण्यात येतो. एकूण मिळणारे उत्पन्न आणि खर्च यांचा हिशोब करुन मूळ अंदाजित उत्पन्न मिळाले आहे किंवा नाही हे पाहिले जाते.

समितीच्या शिफारशी :-

५.१५५ शिफारस क्र. (१) जलसंपदा विभागाकरिता सन २००९-२०१० या वर्षाच्या मुळ अर्थसंकल्पात मंजूर रक्कम व पुरवणी मागणीव्दारे मंजूर रक्कमेपैकी रु. १०१७ कोटी एवढी रक्कम समर्पित करण्यात आली. विभागाने याबाबत निधीचे योग्य नियोजन व विभाजन करणे आवश्यक होते ते न केल्यामुळे जनतेची विकासाची कामे होऊ शकली

नाहीत. त्यामुळे याप्रकरणी जे जबाबदार आहेत त्यांची चौकशी करण्यात यावी व चौकशीत दोषी आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.१५६ शिफारस क्र. (२) अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेल्या निधीचा वापर विहीत बाबींसाठी होणे अत्यावश्यक आहे. परंतु समितीच्या असे वारंवार निदर्शनास येते की विभागाकडून अंदाजपत्रकात व पुरवणी मागण्यांव्दारे मोठया प्रमाणात निधीची मागणी होते व त्याप्रमाणे तरतूदही करण्यात येते परंतु वर्षाअखेर हा निधी अखर्चित राहतो. व त्या वर्षी तरतूद केलेला निधी अन्य दुसऱ्या कोणत्याही कामाकरिता देखील उपयोगी पडत नाही. विभागाला आर्थिक शिस्त लावायची असल्यास प्रथम निधीचे योग्य नियोजन करणे अत्यावश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. अशा प्रकरणांमध्ये वित्त विभागाने अशा विभागांना निधीचे वाटप करताना विभागांचा वार्षिक आर्थिक नियोजनाचा आढावा घ्यावा व नंतर निधीचे वाटप करावे अशी समितीची शिफारस आहे.

५.१५७ शिफारस क्र. (३) विभागाच्या साक्षीदरम्यान विभागीय सचिव, प्रतिनिधींकडून अनेक महत्वाच्या मुद्यांबाबत लेखी स्वरुपात माहिती देण्याबाबत समितीने सुचविले व ती देण्याबाबत विभागाने आश्वासित केले होते. परंतु सदर माहिती विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येत नाही. ही बाब समितीचा अवमान करणारी ठरते. साक्षीदरम्यान केवळ वेळ मारुन घेण्यासाठी अशा प्रकारे माहिती देण्याबाबत समितीस आश्वासित करण्यात येते असे समितीचे स्पष्ट मत आहे. समितीच्या साक्षीदरम्यान लेखी स्वरुपात माहिती देण्याचे आश्वासित करुनही माहिती विहित मुदतीत न देणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र.के-६ "ऊर्जा" या खाली प्रधानशीर्ष २८०१- वीज, २८१०-अपारंपारिक ऊर्जा साधने, ३६०६ साह्यकारी साहित्य व साधनसामुग्री या शीर्षाखाली अधिक खर्च व बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक (+) बचत (-)**
२८०१- वीज २८१०- अपारंपारिक ऊर्जा साधने, ३६०६- साह्यकारी साहित्य व साधनसामुग्री			
मूळ २३,५१,८६,९९ पूरक १८,३०,५२,७८ वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१०)	४१,८२,३९,७७	४२,८२,६३,१९	(+) १,००,२३,४२ १,४३,८०,८०

टिपा व भाष्ये :-

रुपये १००२३.४२ लाखांचा अधिक खर्च (रु.१,००,२३,४१,७०८ एवढा प्रत्यक्ष अधिक खर्च) नियमाधीन करणे आवश्यक आहे.

रुपये १००२३.४२ लाख एवढा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता मार्च २०१० मध्ये रुपये १४३८०.८० लाख एवढा परत केलेला निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले. अनुदानातील अधिक खर्च पुढील शीर्षाखाली झाला.

ज्ञापन :-

६.२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. महालेखापरिक्षकांच्या उपलेखाशिर्षनिहाय स्पष्टीकरण सोबत जोडले आहेत.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक (+) बचत (-)**
२८०१-वीज ०५ पारेषण व वितरण ८०० इतर खर्च ८०० (००) (०१) कृषीविषयक व यंत्रमागविषय प्रशुल्क कमी करण्यासाठी वीज वितरण/पारेषण लायसनधारकांना अर्थसहाय्य मूळ तरतूद २०,८२,००.०० पूरक ११,४८,९३.२० पुनर्विनियोजन १,००,१५.००	३३,३१,०८.२०	३३,५४,२९.२५	(+) २३,२१.०५

टिपा व भाष्ये :-

रु.२३१५.०५ लाख एवढा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे तरतूद केलेला रु.१००१५ लाख एवढा अतिरिक्त निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले. त्याबाबतची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :-

६.३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

वित्तीय वर्ष सन २००९-२०१० साठी मागणी के-६, मुख्य लेखाशिर्ष "२८०१" वीज, ०५-पारेषण व वितरण, ८००-इतर खर्च (००) (०१) कृषीविषयक व यंत्रमागविषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी वीज वितरण परवानाधारकांना अर्थसहाय्य (योजनेत्तर) (२८०१२६१५) खाली रु.३३५६.७४ कोटी इतकी सुधारित तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी रु.३३५४.२९२५ कोटी इतकी रक्कम वित्त विभागाच्या मंजूरीने खर्च करण्यात आली होती. त्यामुळे प्रत्यक्षात कोणताही अतिरिक्त खर्च झालेला नाही.

६.४ वित्त विभागाने सन २००९-१० मध्ये मुख्य लेखाशीर्ष "२८०१" वीज, (००) (०१), कृषीविषयक व यंत्रमागविषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी वीज वितरण परवानाधारकांना अर्थसहाय्य (योजनेत्तर) (२८०१२६१५) खाली रु.३३५६.७४ कोटी इतक्या सुधारित अंदाजास मान्यता दिलेली आहे. रु.३३५६.७४ कोटी या सुधारित तरतूदच्या अधिन राहून वित्त विभागाने माहे मार्च २०१० मध्ये निधी वितरणास मान्यता दिलेली आहे. वित्त विभागाच्या मंजूरीची कागदपत्रे सोबत ठेवण्यात येत आहे. त्यानुसार विभागाने वित्त विभागाच्या मान्यतेने रु.३३५४.२९२४ कोटी इतका खर्च केलेला आहे. त्यामुळे विभागाने कोणताही अतिरिक्त खर्च केला नाही.

६.५ तथापि, अंतिम खर्चमेळाच्या बैठकीच्या वेळी महालेखापाल कार्यालयाने असे निदर्शनास आणून दिले की वित्त विभागाने जरी सुधारित अंदाजात रु.३३५६.७४ कोटी इतकी सुधारित तरतूद मान्य केली असली तरी सुधारित अंदाजात वाढविण्यात आलेली रक्कम रु.१२३ कोटीबाबत वित्त विभागाने अतिरिक्त पुरवणी मागणी घेतलेली नाही. त्यामुळे विभागाने वित्त विभागाच्या मान्यतेने केलेला खर्च हा रु.१२३ कोटीने अतिरिक्त आहे. तसेच अतिरिक्त खर्च कमी करण्यासाठी महालेखापाल कार्यालयाने असेही मागदर्शन केले की, मुख्य लेखाशिर्ष "२८०१" खालील उपलेखाशिर्ष "२८०१२६५१" खालील शिल्लक असलेली रक्कम उपलेखाशिर्ष "२८०१२६१५" खाली वळती करुन अतिरिक्त खर्च कमी करुन घ्यावा, त्यानुसार उपलेखाशिर्ष "२८०१२६१५" खालील शिल्लक असलेली रक्कम रु.१००.१५ कोटी पुनर्विनियोजनाव्दारे उपलेखाशिर्ष "२८०१२६१५" खाली वळती करुन घेतली होती. तथापि तरीसुध्दा रु.२३.२१ कोटी इतका अतिरिक्त खर्च झालेला दिसतो. सदर अतिरिक्त खर्च हा

एकूण तरतूदीच्या १% पेक्षा कमी असल्यामुळे कृपया क्षमापित करण्यात यावा. आणि सदरहू आक्षेप विनियोजन लेखे

२००९-२०१० च्या पुस्तकातून काढून टाकण्यात यावा.

(रुपये हजारात)

एकूण अनुदान	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक (+) बचत (-)**
३६०६- सहाय्यकारी साहित्य व साधनसामुग्री ५०२ अन्य शीर्षाकडे/विभागाकडे हस्तांतरीत प्रतिक्षित असलेला खर्च ५०२-महाराष्ट्र पारेषण यंत्रणा प्रकल्प		
मूळ तरतूद- --- पुनर्विनियोन- --- पूरक- ---	२,२०,८३.१७	(+)२,२०,८३.१७

टिपा व भाष्ये :-

मागील वर्षात वस्तूच्या रुपात मिळालेल्या मदतीच्या व साहित्याच्या बाबतीत निलंबन लेख्याखाली थकीत रकमा चुकत्या केल्यामुळे रु.२२०८३.१७ लाख एवढा अधिक खर्च झाला.

ज्ञापन :-

६.६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ऊर्जा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष सन २००९-२०१० मधील विनियोजन लेखे, मागणी के-६, मुख्य लेखाशिर्ष "३६०६" सहाय्यकारी साहित्य व साधनसामुग्री, ५०२ अन्य शिर्षाकडे/विभागाकडे हस्तांतरीत करणे प्रतीक्षित असलेला खर्च, ५०२ महाराष्ट्र पारेषण यंत्रणा प्रकल्प या खाली कोणतीही तरतूद नसताना रु.२,२०,८३.१७ लाख इतका अतिरिक्त खर्च मागील वर्षात वस्तूच्या रुपात मिळालेल्या मदतीच्या व साहित्याच्या बाबतीत निलंबन लेख्याखाली थकीत खर्ची रकमा चुकत्या केल्यामुळे रु.२२०८३.१७ लाख एवढा अधिक खर्च झाला आहे असा आक्षेप घेण्यात आला.

६.७ उपरोक्त बाबत असे नमूद करण्यात येते की, ऊर्जा विभागाने/राज्य शासनाने पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी (Transmission System Project) प्रत्यक्ष कोणतीही रक्कम वितरीत केलेली नाही. तथापि केंद्र शासनाने पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी रु.२,२०,८३.१७ लाख इतकी रक्कम परस्पर महापारेषण कंपनीस उपलब्ध करुन दिली होती. सदर रक्कम महालेखापाल कार्यालयाने प्रथम "८६८५" या निलंबन लेखाशिर्षाखाली दाखविली होती. मात्र निलंबन लेखाशिर्ष खाली सदर रक्कम अधिक काळ दाखविणे शक्य

नसल्याने महालेखापाल कार्यालयाने सदर रक्कम "३६०६" या लेखाशिर्षाखाली अतिरिक्त खर्च म्हणून दाखविलेलीआहे व राज्य शासनास याबाबत योग्य लेखाशीर्ष उघडण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

६.८ केंद्र शासनाने पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी रु.२,२०,८३.१७ लाख इतकी रक्कम परस्पर महापारेषण कंपनीस उपलब्ध करुन दिली होती. मात्र पारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २००९-१० संपेपर्यंत विभागास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा याबाबत विभागास अवगत देखील केले नसल्यामुळे सदर प्रकल्पासाठी नवीन लेखाशीर्ष उघडून योग्य ती तरतूद करणे शक्य झालेले नाही.

६.९ तसेच सदर बाब महालेखापाल कार्यालयाने वित्तीय वर्ष २००९-१० संपल्यानंतर पत्र क्र.Noo.Loan/६००४/Misc/१२६दिनांक १४/०५/२०१० व D.O.No.AC II/CAORB/१८९ दिनाक २८/६/२०१० नुसार विभागाच्या निदर्शनास आणून दिली आहे. तथापि वित्तीय वर्ष संपलेले असल्यामुळे विभागास प्रकल्पासाठी नविन लेखाशीर्ष उघडून योग्य ती तरतूद करणे शक्य झालेले नाही.

६.१० महालेखापाल कार्यालयाच्या उपरोक्त दिनांक २८/०६/२०१० च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी ऊर्जा विभागाने महालेखापाल कार्यालयाच्या मंजूरीने नवीन लेखाशीर्ष "६८०१०६५६" उघडले आहे. तसेच "३६०६" या लेखाशीर्ष खालील अतिरिक्त खर्च समायोजनाने निर्लेखित करण्यासाठी रु.२,२०,८३.१७ लाख रक्कम पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्याबाबत वित्त विभागास विनंती केली आहे. वित्त विभागाने सदर प्रस्ताव काही आक्षेप घेऊन परत केलेला आहे. वित्त विभागाने पुरवणी मागणीच्या प्रस्तावास मंजूरी दिल्यानंतर उपरोक्त लेखाशीर्षाखाली अतिरिक्त झालेला खर्च निर्लेखित करण्यात येईल.

६.११ तरी महालेखापाल, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरहू आक्षेप सन २००९-२०१० च्या विनियोजन लेखे अहवालातून काढून टाकण्यात यावा.

(रु.हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक (+) बचत (-)**
२८०१- वीज ०२ औष्णिक विद्युत निर्मिती ८०० इतर खर्च ८०० (००) (०५) कृषीपंप संचाच्या विद्युतीकरणाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी/ग्रामीण विद्युतीकरणासाठी महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी, मर्यादीत यांस सहाय्यक अनुदान मूळ ३०,००.०० पुनर्विनियोजन (-) ३०,००.००	००	००	००

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+) बचत (-)
०५ पारेषण व वितरण ८०० इतर खर्च ८०० (००) (०६) कृषिपंप संचाच्या विद्युतीकरणाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी/ग्रामीण विद्युतीकरणासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, मर्यादीत यांस सहाय्यक अनुदान मूळ ९४,१५.०० पुनर्विनियोजन (-) ९४,१५.००	--	--	--

६.१२ नियोजन विभागाकडून योजनांतर्गत नियतव्ययाला मान्यता न मिळाल्यामुळे मार्च २०१० मध्ये उपरोक्त लिखित शीर्षाखाली रु.१२४१५ एवढा निधी परत करण्यात आला.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+) बचत (-)
०५ पारेषण व वितरण ८०० इतर खर्च ८०० (००) (०४) गतिमान विद्युत विकास व सुधारणा कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, मर्यादीत यांस सहाय्यक अनुदान (केंद्र पुरस्कृत योजना) मूळ ३४,०१.३३ पुनर्विनियोजन (-) १७,८५.३३	१६,१६.००	१६,१६.००	--

(रुपये हजारात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+) बचत (-)
८० सर्वसाधारण १०१ विद्युत मंडळाला सहाय्य १०१ (००) (०६) गतिमान विद्युत विकास व सुधारणा कार्यक्रमांतर्गत मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाला सहाय्यक अनुदान मूळ १,६०.०० पुनर्विनियोजन (-) १४.००	१,४६.००	१,४६.००	--

टिपा व भाष्ये :-

६.१३ संबंधित कंपन्यांना राज्य शासनामार्फत निधीचा पुरवठा करण्याऐवजी थेट निधी पुरविण्याचा धोरणात्मक निर्णय केंद्र सरकारने घेतल्यामुळे उपरोल्लिखित शीर्षाखाली मार्च २०१० मध्ये रु.१७९९.३३ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक (+) बचत (-)**
२८०१ वीज ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च ८०० (००) (०४) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ होल्डिंग कंपनी, मर्यादित यांस सहाय्यक अनुदान मूळ ८८,५३.०० पूरक ६,०४,८३.०० पुनर्विनियोजन (-) १,००,१५.०० ५,९३,२१.००	५,९३,२१.००	५,९३,२१.००	--

टिपा व भाष्ये :-

६.१४ कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता, मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रुपये १००१५ लाख एवढा निधी काढण्यात आला.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक (+) बचत (-)**
२८१०- अपारंपारिक ऊर्जा साधने ६० इतर ८०० इतर खर्च ८०० (००) (०१) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण मूळ ३,३३.३३ पूरक ४,९५.६७ पुनर्विनियोजन (-) १,६५.८० ६,६३.२०	६,६३.२०	६,६३.२०	--

टिपा व भाष्ये :-

सुधारित अंदाजावरुन मार्च २०१० मध्ये रु.१६५.८० लाख एवढा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

६.१५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रयासंदर्भात ऊर्जा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, अनुक्रमांक १ व २ करीता नियोजन विभागाने या अनुशेषांच्या योजनांकरिता नियतव्यय उपलब्ध न करुन दिल्याने सदर रक्कम समर्पित करण्यात आली. अनुक्रमांक ३ व ४ मधील रक्कम केंद्र शासनाने परस्पर निधी संबंधित कंपनीला वितरीत केल्याने समर्पित करण्यात आली. तसेच अनुक्रमांक ६ ची रक्कम वित्त विभागाने सुधारित अंदाजात कपात केल्याने समर्पित करण्यात आली.

साक्ष :-

६.१६ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. सदर बैठकीत कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.१०,०१५ लाख एवढा निधी का काढण्यात आला ? केंद्र सरकारकडून निधी देण्याबाबतची पध्दत काय आहे ? १०० कोटी रुपयांचा निधी पुनर्विनियोजन न करता घेण्यात आला का ? याबाबत महालेखाकारांनी समितीस सांगितले की, इसमें रिएप्रोप्रिएशन का कारण नही दिया है इसलिए यह एकाउंट में रिप्लेक्ट नही हुआ है, याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, यंत्रमाग आणि शेतीकरिता जी सबसिडी दिली जाते त्याची ही रक्कम आहे. एकूण बील किती असणार आहे हे शेवटी कळून येते. जो अतिरिक्त खर्च झाला, त्याची कारणे महालेखापाल यांना कळविली आहेत. त्यानीच सुचविल्याप्रमाणे या शीर्षाखाली १०० कोटी रुपये खर्च दर्शविण्यात आला आहे. विभागीय सचिवांनी केलेल्या उपरोक्त खुलाशासंदर्भात महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले की,पुनर्विनियोजन किंवा प्रत्यर्पण करण्याच्या आदेशासंबंधी महालेखाकारांबरोबर चर्चा केली जाते व खर्चाची स्थिती काय आहे यासंबंधी विचारणा केली जाते. या निधीसंबंधी जेव्हा चर्चा झाली त्यावेळी १०० कोटी रुपयाच्या आसपास अधिक खर्च होता. तसेच दुसऱ्या शीर्षाखाली १०० कोटी रुपयाच्या आसपास बचत होती. त्यामुळे पूरक मागणी करण्याची आवश्यकता नाही. विभागाकडे १०० कोटी बचत असल्यामुळे ती रक्कम वित्त विभागाच्या संमतीने पुनर्विनियोजीत करु शकता असे महालेखाकार कार्यालयाकडून सांगण्यात आले होते. तसेच महालेखाकारांनी सांगितले की, विभाग की ओर से बताया गया की महालेखाकार की सलाह पर यह रक्कम एकाउंट में बुक हुई है परन्तु आपने इस रकम के खर्च का कारण नही बताया है, वह कारण आपको बताना चाहिए था.

६.१७ याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.
"कृषी पंप ग्राहक व यंत्रमागधारक यांना अर्थसहाय देण्यासाठी सन २००९-२०१० मध्ये मागणी के-६, मुख्य लेखाशिर्ष" २८०१ १२१६ १५" खाली रुपये २०८२.०० कोटी इतकी मूळ तरतूद करण्यात आली होती. सदर

कारणासाठी सन २००९-२०१० मध्ये रु.११४८.९३२० कोटीची पूरवणी मागणी देखील मंजूर करण्यात आली होती व सुधारित अंदाजात मागणीप्रमाणे वित्त विभागाने रु.१२५.०८ कोटी इतकी रक्कम वाढवून दिली होती म्हणजेच या अर्थसहायासाठी एकूण रु.३३५६.७४ कोटी इतकी सुधारित तरतूद वित्त विभागाने मंजूर केली होती.

६.१८ कृषी पंप ग्राहक व यंत्रमागधारक यांना अर्थसहाय्य देण्यासाठी रु.३३५६ कोटी या सुधारित अंदाजाच्या मर्यादेत ऊर्जा विभागाने वित्त विभागाची मान्यता घेऊन रु.३३५४.२९ कोटी इतका खर्च केला आहे.

६.१९ तथापि अंतिम खर्चमेळाच्या बैठकीच्या वेळी महालेखापाल कार्यालयाने असे कळविले की, सुधारित अंदाजात जरी वित्त विभागाने रु.१२५.०८ कोटीची वाढ केली असली तरी त्याची अतिरिक्त पुरवणी मागणी वित्त विभागाने घेतली नाही. त्यामुळे १२३.०० कोटी इतका अतिरिक्त खर्च झालेला आहे. अतिरिक्त खर्च कमी करण्यासाठी महालेखापाल कार्यालयाने असे सुचविले की, मागणी के-६ "२८०१२६५१" या लेखाशीर्षाखाली असलेली रु.१००.१५ कोटीची बचत पुनर्विनियोजनाव्दारे लेखाशिर्ष "२८०१२६५१" खाली वळती करुन सदर अतिरिक्त खर्च कमी करता येऊ शकतो. महालेखाकार कार्यालयाने सुचविल्याप्रमाणे विभागाने लेखाशिर्ष "२८०१२६५१" खालील रु.१००.१५ कोटी इतकी रक्कम पुनर्विनियोजनाव्दारे लेखाशीर्ष "२८०१२६५१" खाली वळती केली आहे व सदर पुनर्विनियोजनाव्दारे नोंद महालेखाकार कार्यालयाने घेतलेली आहे.

६.२० मागणी क्र.के-६, मुख्य लेखाशीर्ष २८०१-महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ होल्डिंग कंपनी मर्यादित यास सहाय्यक अनुदान या शीर्षाखाली बजेटमध्ये ८८५३.०० लाख रुपयाची मूळ मागणी केलेली आहे आणि ६,०४,८४.०० लाख रुपयाची पूरक मागणी केलेली आहे. एकूण खर्च ५,९३,२१.०० लाख रुपये झालेला आहे. १०० कोटी रुपयाची बचत झालेली आहे. या शीर्षाखाली वर्षानुवर्षे खर्च होत असताना ८८५३.०० लाख रुपयाचीच मूळ मागणी कशी काय करण्यात आली ? अर्थसंकल्पाच्या निकषाप्रमाणे मूळ मागणी ही एकूण खर्चाच्या ७५ टक्के इतकी असली पाहिजे. शेतकऱ्यांसाठी किती वीज लागेल, यंत्रमागासाठी किती वीज लागेल याचा अंदाज आपणास असताना केवळ ८८ कोटी रुपयांचीच मूळ मागणी कशी काय करण्यात आली ? कारण जरी निवडणुका असल्या तरी जो खर्च बंधनकारक आहे तो करावाच लागतो. जी नेहमीची कामे आहेत त्यासाठी अंदाजित खर्च माहित असावयास पाहिजे. या शीर्षाखाली ८८५३.०० लाख रुपयाची मूळ मागणी करण्यात आली आणि जवळपास ७०० कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आली. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी अधिकचा खर्च का झाला याबाबत सांगितले की, एकूण तरतूद ३ हजार कोटी इतकी होती. मागील वर्षाची आकडेवारी पाहून वीज निर्मिती किती होईल याचा अंदाज बांधला जातो. मधून मधून विजेचे दर वाढत असतात. एकूण वीज वापरामध्ये फरक पडत असतो ही सततची प्रक्रिया

असते. अंतिम आकडेवारी नंतर समजते. अंतिम आकडेवारी साडेतीन हजार कोटी रुपये होती त्यामध्ये १०० कोटी रुपयाचा फरक पडलेला आहे. हे कारण विभागाने महालेखाकारांना सांगितले होते परंतु ते त्यांनी अमान्य केले.

६.२१ बचत होण्याची कारणे अशी आहेत की, ईएमसी, आरईसी या केंद्र शासनाच्या कंपन्या मार्फत कर्ज पुरवठा करण्यात येतो. हे कर्ज जेव्हा राज्य शासनामार्फत येत होते त्यावेळी त्या रकमेची बजेटमध्ये तरतूद केली जात होती. परंतु यावेळी ईएमजी, आरईसी यांच्यामार्फत वीज कंपन्यांना थेट कर्ज पुरवठा करण्यात आला. त्यामुळे राज्य शासनामार्फत तरतूद करण्यात आलेल्या निधीमधील १०० कोटी रुपयांची बचत दिसत होती. केंद्र शासनाच्या कंपन्यामार्फत थेट कर्ज पुरवठा करण्यात आल्यामुळे ही बचतीची १०० कोटी रुपयांची रक्कम महालेखाकार कार्यालयाच्या सल्ल्याने विभागाने रिॲप्रोप्रिएट करुन खर्च केली. यामध्ये कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा केलेला नाही किंवा प्लॅनिंग चुकले अशातला भाग नाही.

६.२२ याअनुषंगाने महालेखाकारांनी समितीस सांगितले की, १०० कोटी रुपयांचे पुनर्विनियोजन झालेले आहे. त्याबद्दल हरकत नाही. एकूण निधी पेक्षाही खर्च कमी झालेला आहे त्या बद्दलही महालेखाकारांची हरकत नाही. मूळ मागणी ८८ कोटी रुपयाची असताना ६०४ कोटी रुपयांची पूरक मागणी का करण्यात आली ?

६.२३ यासंदर्भात समितीने विचारणा केला की, मागील अनेक वर्षाचा खर्च विचारात घेऊन पुढील वर्षात किती खर्च करावा लागेल याचे नियोजन केले होते. आपण ८८ कोटी रुपयांची मूळ मागणी करीत असताना हा अंदाज बांधला नव्हता काय ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सुरुवातीला कंपन्या स्थापन झाल्यानंतर कर्जाचे व्यवहार कंपन्यांकडे हस्तांतरीत करण्यात आले. या अगोदर सर्व कर्ज राज्य शासन घेत होते आणि नंतर ते कंपनीला देते. तसेच केंद्र शासनाकडून राज्य शासनाला योग्य त्या प्रमाणात कोळशाचा पुरवठा करण्यात न आल्यामुळे राज्य शासनाचे पैसे केंद्र शासनाकडे पडून होते. त्यामुळे मध्यंतरी मॉण्टेकसिंग अहलुवालिया यांनी बॉण्ड काढले होते त्यांनी पैसे दिले नव्हते परतफेडीमध्ये निश्चितता नव्हती. त्यामुळे पतपुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी राज्य शासनामार्फत कर्जाची रक्कम न देता थेट वीज कंपन्यांना देण्याचे ठरविले तो संक्रमण काळ होता. निधी खर्च करण्याच्या बाबतीत परिस्थितीनुरुप विभागाला थोडेसे स्वातंत्र्य दिले पाहिजे.

६.२४ निधीची निकड अनेक मार्गानी भागविता येते. आकस्मिकता निधीतून देखील निधी घेता येतो. मागील अनुभव लक्षात घेऊन मूळ मागणी करावयास पाहिजे होती. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी यापुढे काळजी घेण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले.

६.२५ रु. २३.२१ कोटी इतका अतिरिक्त खर्च कोणत्या कामासाठी केलेला आहे ? नियोजन विभागाकडून योजनांतर्गत नियतव्ययाला मान्यता का दिली नाही ? यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, रु.२३.३१ कोटी इतका अतिरिक्त खर्च कृषी पंप ग्राहक व यंत्रमागधारक यांना वीज दरात देण्यात येणाऱ्या सवलतीसाठी अर्थसहाय्य म्हणून देण्यात आला आहे.

६.२६ वीज कंपन्यांना केंद्र शासनाकडून थेट निधी मिळतो. हा निधी राज्य शासनाच्या निधीचा भाग म्हणून मिळतो काय ? याबाबत खुलासा करताना व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी यांनी सांगितले की, केंद्र शासनाने महापारेषण कंपनीस पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन दिला होता. केंद्र शासनाचा जपान मधील JBIC या संस्थेशी झालेल्या कराराप्रमाणे महाराष्ट्रामध्ये ट्रान्समिशन प्रोजेक्ट घेण्यात आला होता. तत्कालीन ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री.सुबोध कुमार यांनी केंद्रीय वित्त विभागाच्या सहसचिवांना दिनांक ७ सप्टेंबर, २००६ रोजी पत्र लिहिले होते. ते खालीलप्रमाणे आहे.

"The Government of Maharashtra has also decided that the loans from JBIC be disbursed directly to MSETCL on the same lines as has been arranged in case of Andhra Pradesh without impacting the fiscal deficit and debt position of Maharashtra Government.

If necessary the Government of Maharashtra shall provide guarantee for this loan."

६.२७ त्यानंतर श्री. सुबोध कुमार यांनी दिनांक १२ फेब्रुवारी, २००७ रोजी लिहिलेले पत्र पुढील प्रमाणे आहे.

In view of this, it is requested to consider our proposal for funding of transmission projects in Maharashtra through J.B.I.C and communicate approval of the same at the earliest so that MSETCL would be informed to initiate further necessary action in this regard. "The loan from JBIC be disbursed directly to MSETCL on the same lines as has been arranged in case of Andhra Pradesh without impacting the fiscal deficit and debt position of Govt.of Maharashtra." त्यानंतर दिनांक २५ जून, २००७ रोजी सर्व अटी व शर्थींना तत्वतः मान्यता देण्यात आली आणि त्यानंतर थेट निधी एमएसईबीला प्राप्त झाला.

केंद्र सरकारने जो मंजूरी दी है उसकी एक कॉपी महाराष्ट्र सरकार के पास आयी है, प्लानिंग, फायनेस और अर्बन डिपाटमेंट के अधिकारियों को अगर इसकी जानकारी थी तो इसका उल्लेख बजट में हो सकता था. असे महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले.

६.२८ अनुदान क्र.के-६ संदर्भात समितीने विभागास पाठविलेल्या प्रश्नावली संदर्भातील विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे :-

	अ.क्र.	प्रश्नावली	स्पष्टीकरण
	१.	वित्त विभागाने जरी सुधारित अंदाजात रु.३३५६.७४ कोटी इतकी सुधारित तरतूद मान्य केली असली तरी सुधारीत अंदाजात वाढविण्यात आलेली रक्कम रु.१२३ कोटीची अतिरिक्त पुरवणी मागणी वित्त विभागाने का घेतली नाही ?	कृषी पंप ग्राहक व यंत्रमागधारक यांना अर्थसहाय्य देण्यासाठी सन २००९-१० मध्ये मागणी क्र.के-६, मुख्य लेखाशिर्ष- "२८०१२६१५" खाली रु.२०८२.०० कोटी इतकी मूळ तरतूद करण्यात आली होती. सदर कारणासाठी सन २००९-२०१० मध्ये रु.११४८.९३२० कोटीची पुरवणी मागणी देखील मंजूर करण्यात आली होती व सुधारित मागणीप्रमाणे वित्त विभागाने रु.१२५.८०८ कोटी इतकी रक्कम वाढवून दिली होती. म्हणजेच या अर्थसहाय्यासाठी एकूण रु.३३५६.७४ कोटी इतकी सुधारित तरतूद वित्त विभागाने मंजूर केली होती. सुधारित अंदाजात वाढ झाल्यामुळे वित्त विभागाने ऊर्जा विभागास मागणीनुसार रु.३३५४.२९ कोटी इतक्या निधी वितरणास मंजूरी दिली आहे.
	२.	रु.२३.१९ कोटी इतका अतिरिक्त खर्च कोणत्या कारणासाठी करण्यात आला आहे ?	रु.२३.१९ कोटी इतका अतिरिक्त खर्च कृषी ग्राहक व यंत्रमागधारक यांना वीजदरात देण्यात येणाऱ्या सवलतीसाठी अर्थसहाय्य म्हणून देण्यात आला आहे.
६.२९	३.	केंद्र शासनाने पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी (ट्रान्समिशन सिस्टिम प्रोजेक्ट) रु. २,२०,८३.१७ लाख इतकी रक्कम परस्पर महापारेषण	केंद्र शासनाने पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी रु.२२०.२३१७ कोटी इतकी रक्कम परस्पर महापारेषण कंपनीस उपलब्ध करुन दिली होती. मात्र पारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २००९-२०१० संपेपर्यंत विभागास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही ही वस्तुस्थिती आहे.

		कंपनीस उपलब्ध करुन दिली होती. मात्र पारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २००९-२०१० संपेपर्यंत विभागास कोणतीही माहिती का उपलब्ध करुन दिली नाही ?	मात्र महालेखापाल कार्यालयाने आदेशित केल्याप्रमाणे ऊर्जा विभागाने पारेषण प्रकल्पासाठी नवीन लेखाशिर्ष "६८०१०६५६" उघडले असून सदर प्रकल्पाचा खर्च नियमित करण्यासाठी फेब्रुवारी २०११ ते डिसेंबर, २०१२ पर्यंत ऊर्जा विभागाने सतत नियोजन विभाग व वित्त विभागाकडे पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर केला होता. तथापि वित्त विभागाकडून मान्यता प्राप्त झालेली नाही. सन २०१३-२०१४ मध्ये ऊर्जा विभागाने पारेषण प्रकल्पासाठी रु.३००.०० कोटीची तरतूद केली असून सन २००९-२०१० मध्ये झालेला रु.२२०.८३१७ कोटी इतका खर्च शासन निर्णय निधीवि-२०१२/२२८/प्र.क्र.५१/ऊर्जा-३, दिनांक ७.११.२०१३ अन्वये पुस्तकी समायोजनाव्दारे नियमित करण्याबाबत आला आहे.
६.३०	४.	पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी ऊर्जा विभागाने महालेखापाल कार्यालयाच्या मंजूरीने नवीन लेखाशिर्ष "६८०१०६५६" उघडले आहे. तसेच ३६०६ या लेखाशिर्षाखाली अतिरिक्त खर्च समायोजनाचे निर्लेखित करण्यासाठी रु.२,२०,८३१७ लाख पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्याबाबत वित्त विभागास विनंती केली आहे. वित्त विभागाने सदर प्रस्ताव काही आक्षेप घेऊन केव्हा परत केलेला आहे त्याची सद्य:स्थिती काय आहे ?	सन २००९-२०१० मध्ये पारेषण कंपनीच्या पारेषण प्रकल्पासाठी कंपनीस परस्पर मिळालेली रक्कम नियमित करण्यासाठी फेब्रुवारी २०११ ते डिसेंबर, २०१२ पर्यंत ऊर्जा विभागाने सतत नियोजन विभाग व वित्त विभागाकडे पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर केला होता. तथापि वित्त विभागाकडून मान्यता प्राप्त झाली नाही. सन २०१३-२०१४ मध्ये ऊर्जा विभागाने पारेषण प्रकल्पासाठी रु.३००.०० कोटीची तरतूद केली असून सन २००९-२०१० मध्ये झालेला रु.२२०.८३१७ कोटी इतका खर्च शासन निर्णय निधीवि-२०१२/२२८/प्र.क्र.५१/ऊर्जा-३, दिनांक ७.११.२०१३ अन्वये पुस्तकी समायोजनाव्दारे नियमित करण्यात आला आहे.

६.३१	५.	नियोजन विभागाकडून योजनांतर्गत नियतव्ययाला मान्यता दिली नाही ?	नियोजन विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव यांनी वार्षिक योजना सन २००९-१० साठी नियतव्यय निश्चित करण्यासंदर्भातील बैठकीत कृषीपंपाचा अनुशेष दूर करण्याबाबतची योजना बंद करण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार त्यांनी सन २००९-१० व सन २०१०-२०११ मध्ये महावितरण व महापारेषण यांच्या अनुशेषाच्या योजनांना नियतव्यय उपलब्ध करुन दिला नाही. (महावितरण रु.९४.१५ कोटी व महापारेषण रु.३०.०० कोटी)
	६.	संबंधित कंपन्यांना थेट निधी पुरविण्याचा धोरणात्मक निर्णय केंद्र शासनाने केव्हा घेतला आहे ?	केंद्र सरकार, ऊर्जा विभाग यांच्या मेमोरंडम ॲग्रीमेंटनुसार दिनांक २०.९.२००९ पासून संबंधित कंपन्यांना थेट निधी पुरविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे.
६.३२	७.	कोणतेही विनिर्दिष्ट कारण देता मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.१०,०१५ लाख एवढा निधी का काढण्यात आला ?	कृषी पंप व यंत्रमागधारक यांना अर्थसहाय्य देण्यासाठी सन २००९-१० मध्ये मागणी क्र.के-६ मुख्य लेखाशीर्ष "२८०१२६१५" खाली रु.२०८२.०० कोटी इतकी मूळ तरतूद करण्यात आली होती. सदर कारणासाठी सन २००९-२०१० मध्ये रु.११४८.९३२० कोटीची पुरवणी मागणी देखील मंजूर करण्यात आली होती व सुधारित अंदाजात मागणीप्रमाणे वित्त विभागाने रु.१२५.८०८ कोटी इतकी रक्कम वाढवून दिली होती. म्हणजेच या अर्थसहाय्यासाठी एकूण रु.३३५६.७४ कोटी इतकी सुधारित तरतूद वित्त विभागाने मंजूर केली होती. कृषी पंप ग्राहक व यंत्रमागधारक यांना अर्थसहाय्य देण्यासाठी रु.३३५६.७४ कोटी या सुधारित अंदाजाच्या मर्यादेत ऊर्जा विभागाने वित्त विभागाची मान्यता घेऊन रु.३३५४.२९ कोटी इतका खर्च केला आहे. तथापि अंतिम खर्चमेळाच्या बैठकीच्या वेळी महालेखापाल कार्यालयाने असे कळविले की, सुधारित अंदाजात जरी वित्त विभागाने रु.१२५.०८ कोटीची वाढ केलेली असली तरी त्याची

			अतिरिक्त पुरवणी मागणी वित्त विभागाने घेतलेली नाही. त्यामुळे रु.१२३.०० कोटी इतका अतिरिक्त खर्च झालेला आहे. अतिरिक्त खर्च कमी करण्यासाठी महालेखापाल कार्यालयाने असेही सुचविले की, मागणी के-६ "२८०१२६५१" या लेखाशिर्षाखाली असलेली रु.१००.१५ कोटीची बचत पुनर्विनियोजनाव्दारे लेखाशिर्ष व २८०१२६१५" खाली वळती करुन सदर अतिरिक्त खर्च कमी करता येऊ शकतो. महालेखापाल कार्यालयाने सुचविल्याप्रमाणे विभागाने लेखाशिर्ष "२८०१२६५१" खालील रु.१००.१५ कोटी इतकी रक्कम पुनर्विनियोजनाव्दारे लेखाशिर्ष "२८०१२६१५" खाली वळती केली आहे व सदर पुनर्विनियोजनाची नोंद महालेखापाल कार्यालयाने घेतलेली आहे.

समितीचे अभिप्राय :-

६.३३ वित्तीय वर्ष सन २००९-२०१० मधील विनियोजन लेख्यातील अनुदान क्रमांक के-६, मुख्य लेखाशिर्ष- "३६०६" व सहाय्यकारी साहित्य व साधनसामुग्री, ५०२ अन्य शिर्षाकडे/विभागाकडे हस्तांतरीत करणे प्रतीक्षित असलेला खर्च, ५०२ महाराष्ट्र पारेषण यंत्रणा प्रकल्प या शीर्षाखाली कोणतीही तरतूद नसताना रु.२,२०,८३.१७ लाख इतका अतिरिक्त खर्च मागील वर्षात वस्तूच्या रुपात मिळालेल्या मदतीच्या व साहित्याच्या बाबतीत निलंबन लेख्याखाली थकीत खर्ची रक्कमा चुकत्या केल्यामुळे खर्च झाला आहे.

६.३४ ऊर्जा विभागाने/राज्य शासनाने पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी (Transmission System Project) प्रत्यक्ष कोणतीही रक्कम वितरीत केलेली नाही. तथापि केंद्र शासनाने पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी रु.२,२०,८३.१७ लाख इतकी रक्कम परस्पर महापारेषण कंपनीस उपलब्ध करुन दिली होती. सदर रक्कम महालेखापाल कार्यालयाने प्रथम "८६८५" या निलंबन लेखाशिर्षाखाली दाखविली होती. मात्र निलंबन लेखाशिर्षखाली सदर रक्कम अधिक काळ दाखविणे शक्य नसल्याने महालेखापाल कार्यालयाने सदर रक्कम "३६०६" या लेखाशिर्षाखाली अतिरिक्त खर्च म्हणून दाखविलेली आहे व राज्य शासनास याबाबत योग्य लेखाशीर्ष उघडण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

६.३५ केंद्र शासनाने पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी रु.२,२०,८३.१७ लाख इतकी रक्कम परस्पर महापारेषण कंपनीस उपलब्ध करुन दिली होती. मात्र पारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २००९-१० संपेपर्यंत ऊर्जा विभागास

कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा याबाबत विभागास अवगत केले नाही. त्यामुळे विभागाकडून सदर प्रकल्पासाठी नवीन लेखाशीर्ष उघडून योग्य ती तरतूद करणे शक्य झाले नाही.

समितीची शिफारस :-

६.३६ केंद्र शासनाने सन २००९-१० मध्ये पारेषण यंत्रणा प्रकल्पासाठी (Transmission System Project) रु.२,२०,८३.१७ कोटी एवढा निधी परस्पर महापारेषण कंपनीस उपलब्ध करुन दिला. तथापि पारेषण कंपनीने त्याच वित्तीय वर्षात ऊर्जा विभागास ही बाब कळवून प्राप्त निधी अर्थसंकल्पीत करणे आवश्यक होते. पारेषण कंपनीकडून वेळीच कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीला सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण विभाग)

७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र.एल-८ "प्रादेशिक असमतोल दूर करणे" अंतर्गत प्रधान शिर्ष ४४०२, "मृद व जलसंधारण यांवरील भांडवली खर्च" या शिर्षांतर्गत बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अनुदान क्र.एल-८ "मृद व जलसंधारण यांवरील भांडवली खर्च"

(रुपये लाखात)

शिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४४०२ मृद व जलसंधारण यांवरील भांडवली खर्च, १०२-मृद संधारण, १०२ (००) (०१) व्यापक पाणलोट क्षेत्र विकासाकरिता एकात्मीकृत जमीन सुधार कार्यक्रम (प्रादेशिक असमतोल दूर करणे) राज्य योजना मूळ ४३, ८६.६७ पुनर्विनियोजन (-) ४३,८६.६७	----	१४.२५	(+) १४.२५

७.२ नियोजन विभागाने २००९-२०१० च्या योजनांतर्गत नियतव्ययास मान्यता न दिल्यामुळे जून, २००९ मध्ये रु.४३८६.६७ लाख एवढा निधी परत करण्यात आला. रु.१४.२५ लाख एवढ्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

७.३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सदर लेखाशीर्षांतर्गत मूळ तरतूद रु.४३८६.६७ लक्ष असून रु.४३८६.६७ लक्ष प्रत्यार्पित करण्यात आल्यामुळे विभागास प्रत्यक्षात निरंक अनुदान प्राप्त झाले. त्यामुळे विभागाचा प्रत्यख खर्च निरंक झाला.

महालेखापाल कार्यालयाने या योजनेंतर्गत रु.१४.२५ लक्ष इतका खर्च नोंदविलेला आहे.

यास्तव या लेखाशिर्षातर्गत विभागाचा प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल कार्यालयाने नोंदविलेला खर्च यातील तफावत रु.१४.२५ लक्ष वजा खर्चाच्या निधीचा चुकीच्या नोंदीचा दुरुस्ती प्रस्ताव महालेखापाल

कार्यालयास दिनांक १३/४/२०११ अन्वये सादर करण्यात आला होता. तथापि, महालेखापाल कार्यालयाने त्यांच्या दिनांक ८/११/२०११ च्या पत्रान्वये काढलेल्या त्रुटीची पूर्तता करुन सुधारित प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास दिनांक २८/१२/२०११ अन्वये पुन्हा सादर करण्यात आला आहे.

साक्ष :-

७.४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ८ व २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

समितीच्या दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या बैठकीत जलसंधारण विभागाचे तत्कालीन सचिव हे प्रशिक्षणासाठी बाहेरील राज्यात गेल्यामुळे प्रभारी प्रधान सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी समितीच्या बैठकीस उपस्थित होते.

७.५ सदर बैठकीत समितीने नियोजन विभागाने सन २००९-१० च्या योजनांतर्गत नियतव्ययास मान्यता का दिली नाही अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, अनुशेष पूर्ण झाला असल्याचे नियोजन विभागाने जलसंधारण विभागाला कळविले. नियोजन विभागाकडून दिनांक २७.०५.२००९ ला पत्र आले. या शीर्षाखाली कोणताही अनुशेष नव्हता. म्हणून नियतव्यय दिलेला नव्हता. त्यावर्षी लेखानुदान असल्यामुळे वित्त विभागाने काही तरतूद दिली होती. त्या शीर्षाखाली कोणताही अनुशेष नसल्यामुळे तरतूद समर्पित करण्यात आली नव्हती. त्यामुळे नियोजन विभागाने सन २००९-१० च्या योजनांतर्गत नियतव्ययास मान्यता दिली नाही. त्या शीर्षाखाली नियतव्यय नसल्यामुळे काहीही काम झाले नाही. १४.२५ लाख रुपयांचा खर्च झाला आहे. तो खर्च चुकीने या शीर्षाखाली दाखविला आहे. मुळात खर्च दुसऱ्या शीर्षाखाली झालेला आहे.

७.६ विभागाला बजेटचे, खर्चाचे हेड माहीत असतात. असे असताना २५ लाख रुपयांची चुकीची नोंद झाली कशी ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, चलन भरताना शीर्ष चुकून कळविले असेल तर असे होऊ शकते. कधी कधी महालेखाकार कार्यालयाकडूनही काही ठिकाणी चूकून नोंद होते. सदर विषयाच्या बाबतीत चुकांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव (Note of error) दिनांक २ ऑक्टोबर, २०११ ला महालेखाकारांना दिला आहे. तो मंजूर झाला आहे. महालेखाकारांनी तो मान्य केला आहे. मान्यतेचे पत्र दिनांक ६.३.२०१२ चे आहे. स्पष्टीकरण मान्य झाल्याबाबत त्यावेळी विभागास सांगण्यात आले होते.

७.७ परंतु, यासंदर्भात महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, एप्रिल २०११ मध्ये इनिशिअल देण्यात आले. परंतु ते मार्चच्या अगोदर दिले पाहिजे होते. या अनुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, विभागाने चुकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव (Note of error) दिला परंतु तो कधी देणे अपेक्षित असते

आणि तो विभागाने कधी दिला ? फक्त नोट ऑफ एरर दिली, ते व्हेग राहते. नोट ऑफ एरर मार्चच्या अगोदर दिली पाहिजे. परंतु तसे केलेले नाही. ही बाब विभागाने सुध्दा मान्य केली की, नोट ऑफ एरर मार्चमध्ये दिली पाहिजे होती. परंतु ती एप्रिलमध्ये दिली. मग याला कोण जबाबदार आहे ? या संदर्भात विभागाने जबाबदारी निश्चित केली आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सदर प्रकरण झाले तेव्हा कोण अधिकारी होते हे पाहून चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे सांगितले.

७.८ महालेखाकारांनी काढलेले आक्षेप हे सन २००९-२०१० या वर्षातले आहेत. आता सन २०१३ चालू आहे. त्यामुळे या अगोदर विभागाकडून कारवाई का करण्यात आली नाही. या संदर्भात विभागाचे अंतर्गत नियंत्रण नाही, अंतर्गत कार्यपध्दती नाही याचा अर्थ असा होतो की, अधिकारी चुका करतात, त्यांना कोणतीही शिक्षा नाही. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत समितीने विभागास सूचित केले असता विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले की, या घटनेच्या व्यतिरिक्त सन २०१०-११, सन २०११-१२ मध्ये अशाच प्रकरणात एका अधिकाऱ्याला नोटीस पाठविली आहे. यापुढे असे काहीही होऊ नये म्हणून कार्यपध्दती ठरविण्यात येईल. तसेच सदरहू प्रकरण हे सन २००९-१० चे आहे. नोट ऑफ एरर ३१ मार्च पर्यंत दिली पाहिजे होती. परंतु १३ दिवसांचा विलंब झाला आहे.

७.९ विलंब हा १३ सेकंदाचा असो किंवा २३ दिवसांचा असो. ३१ मार्चला रात्रीचे १२ वाजल्यानंतर १ तास विलंब असो किंवा १० वर्षे विलंब असो, तो विलंबच असतो. मात्र ही चूक करणाऱ्या व्यक्तीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संदर्भात काहीही केलेले नाही. विभागाकडून ३१ मार्चपर्यंत २ ओळींचे पत्र पाठविता आले नाही. त्यामुळे येत्या १५ दिवसांत या संदर्भात चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी आणि तत्संदर्भात समितीला कळवावे असे मत समितीने व्यक्त केले.

७.१० जलसंधारण विभाग राज्यात जलसंधारणाचे काम करतो. परंतु जलसंधारणासाठी असलेला निधी खऱ्या अर्थाने त्याच कामासाठी कारणी लावला तर महाराष्ट्रात दुष्काळ राहणार नाही. परंतु, दुर्देवाने तसे होत नाही. राज्यात अनेक बोगस योजना आहेत. एनजीओ, लाभधारक बोगस असतात. जलसंधारणाचे पैसे जमिनीत जिरले, योजना चांगल्यारितीने कार्यान्वित झाल्या तर राज्यात २ वर्षे पाऊस पडला नाही तरी दुष्काळ राहणार नाही, कारण शासनाकडून योजनांसाठी पैसा मिळतो. परंतु, तो या योजनांवर खर्च केला जात नाही. त्यामुळे विभागाने यातील गंभीरता समजून काम करावे, अशी सूचना समितीने विभागास दिली.

७.११ उक्त बैठकीत समितीचे समाधान न झाल्यामुळे यासंदर्भात दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत नोट ऑफ एरर उशिरा सादर केल्यासंदर्भात

विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये शीर्ष चुकले होते. नंतर ते दुरुस्त करण्यात आले आणि महालेखाकारांनी ते स्वीकारले आहे. त्यांना ३१ मार्चच्या आधी कळवावयास पाहिजे होते परंतु १३ एप्रिलपर्यंत विलंब झाला होता. यापुढे असे होऊ नये याबाबत काळजी घेण्यात येईल.

७.१२ समितीच्या मागील बैठकीमध्ये लेखाशीर्ष ४४०२, मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च या अनुषंगाने चर्चा झाली होती. एका लेखाशीर्षावरील खर्च दुसऱ्या लेखाशीर्षावर करण्यात आला होता याबाबतचा मुद्दा होता. त्या अनुषंगाने समितीने असे सांगितले होते की, १५ दिवसामध्ये या बाबतीत चौकशी करावी आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी.त्यानंतर समितीने सचिवांना पत्र लिहिले की, समितीसमोर जे आश्वासन दिले आहे त्याची पूर्तता करावी या अनुषंगाने विभागाकडे पत्र गेल्यानंतर प्रधान सचिव स्वत:हून समितीसमोर खुलासा करण्यासाठी उपस्थित झाले. त्यांनी सांगितले की, यामध्ये लेखाशीर्ष चुकलेले आहे. ज्या लेखाशीर्षावर खर्च व्हावयास पाहिजे त्यावर खर्च न होता दुसऱ्या लेखाशीर्षावर खर्च झालेला आहे.

७.१३ यामध्ये महालेखाकार यांच्या कार्यालयाकडून सुध्दा विलंब झाला असे दिसते. महालेखाकार यांच्या कार्यालयाकडून त्यांना पत्र मार्च अखेर प्राप्त झाले आणि ३१ मार्चच्या आत शेवटी सादर केले तर त्यावर कार्यवाही होत नाही असे समितीने मत व्यक्त केले यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, क्षेत्रीय कार्यालयाकडून विभागाकडे १६ मार्चला प्राप्त झाले. त्यानंतर एप्रिल महिन्यामध्ये त्यांच्याकडे खुलासा पाठविलेला आहे. समितीने पत्र दिल्यानंतर प्रधान सचिव स्वत: खुलासा करण्यासाठी समितीसमोर उपस्थित झाले आणि त्यांनी केलेला खुलासा आपण रेकॉर्डवर घेतलेला आहे असे समितीने मत व्यक्त केले यावर दिनांक २९ मार्चला महालेखापालांकडे आले असते तर त्याचा काही उपयोग होत नाही असे महालेखापालांनी सागितले. विभाग दोन तीन महिने आधी पाठवितो. महालेखापाल कार्यालयाकडून १६ मार्चला का कळविले गेले ? जलसंधारण खाते स्वतंत्र होऊन या खात्यासाठी स्वतंत्र केडर केलेली आहे. यामुळे भविष्य काळात चांगल्या प्रकारे कार्यक्रम राबविता येईल या संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, पूर्वी सिंचन विभागाचे एकच खाते होते आता जलसंधारण विभागाचा वेगळा संवर्ग केलेला आहे. स्थानिक क्षेत्र आणि नरेगा यासाठी स्वतंत्र संवर्ग केलेला आहे. यासंदर्भात विभागांसाठी जो कर्मचारी वर्ग भरावयाचा आहे त्याची परीक्षा झालेली आहे. ६० कनिष्ठ अभियंते आणि ८० सहायक अभियंते भरण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. जलसंधारण विभागाने स्वतंत्र कर्मचारी आकृतीबंध केलेला आहे. आधी कर्मचारी मिळत नव्हते पण आता या खात्यासाठी स्वतंत्र संवर्ग झाल्यामुळे कर्मचारी मिळेल. यासाठी आपल्या खात्यामध्ये वेगळी मागणी किंवा तरतूद केलेली आहे का ? ज्या मागणी क्रमांकाने प्रकल्प प्रस्तुत केले जात होते तेच क्रमांक कायम राहणार आहेत का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आधी सुध्दा विभागाची वेगळी तरतूद होती पण प्रशासकीय संवर्ग एकच होते. त्याचे विभाजन झालेले आहे. आधी लहान पाटबंधाऱ्यांवरील भांडवली खर्च यासाठी एकच लेखाशीर्ष होते ते तसेच राहणार आहे का ? लहान पाटबंधाऱ्यांवरील भांडवली खर्च यासाठी ४७०२ असे लेखाशीर्ष होते त्याऐवजी आता वेगळे लेखाशीर्ष झाले

आहे का ? या संदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जलसंपदा आणि जलसंधारण यांच्या मागण्या वेगवेगळ्याच आहेत परंतु जलसंधारण विभाग जलसंपदा विभागाचा कर्मचारी वर्ग वापरत होतो त्याचे विभाजन झाले आहे. जलसंपदा विभागाची स्वतंत्र तरतूद आहे आम्ही त्यांची तरतूद वापरत नाही.

समितीचे अभिप्राय :

७.१४ जलसंधारण विभाग राज्यात जलसंधारणाचे काम करतो. परंतु जलसंधारणासाठी असलेला निधी खऱ्या अर्थाने त्याच कामासाठी वापरला तर महाराष्ट्रात दुष्काळ राहणार नाही. परंतु, दुर्देवाने तसे होत नाही. राज्यात अनेक बोगस योजना असून अनेक एनजीओ, लाभधारक बोगस असतात. जलसंधारणासाठी असलेली तरतूद योग्यरित्या वापरली. योजना चांगल्यारितीने कार्यान्वित झाल्या तर राज्यात २ वर्षे पाऊस पडला नाही तरी दुष्काळ राहणार नाही, कारण शासनाकडून योजनांसाठी पैसा मिळतो. परंतु, तो या योजनांवर खर्च केला जात नाही. त्यामुळे विभागाने यातील गंभीरता समजून काम करावे, असे अभिप्राय समितीने व्यक्त केले.

समितीची शिफारस :-

७.१५ सन २००९-२०१० च्या विनियोजन लेख्यातील अनुदान क्रमांक एल-८ मधील प्रधान शीर्ष ४४०२, मृदु व जलसंधारण यांवरील भांडवली खर्च अंतर्गत १०२ (००) (०१) व्यापक पाणलोट क्षेत्र विकासाकरिता एकात्मीकृत जमीन सुधारणा कार्यक्रम "प्रादेशिक असमतोल दूर करणे" या योजनेअंतर्गत अनुशेष शिल्लक आहे किंवा कसे याची नियोजन विभागाकडून खात्री न करता जलसंधारण विभागाने रु.४३,८६.६७ लाख एवढ्या रकमेची तरतूद अर्थसंकल्पीत केली व नियोजन विभागाने दिनांक २७/५/२००९ च्या पत्रान्वये या शीर्षाखाली कोणताही अनुशेष नाही असे कळविल्यानंतर अर्थसंकल्पित तरतूद रु.४३,८६.६७ लाख समर्पित करण्यात आली. आवश्यकता नसताना निधी अर्थसंकल्पीत करण्यास जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी. सन २००९-२०१० मध्ये संपूर्ण रक्कम समर्पित केल्यानंतर दुसऱ्या शिर्षाखाली रु.१४.२५ लक्ष एवढा खर्च चुकीने उपरोक्त शीर्षाखाली नोंदविला गेला. याबाबत चुकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव (Note of error) विलंबाने दिनांक १३.४.२०११ रोजी महालेखाकार कार्यालयास सादर करण्यात आला. चुकीचा दुरुस्तीचा प्रस्ताव (Note of error) विलंबाने पाठविणाऱ्या अधिकाऱ्यावर १५ दिवसात कारवाईचे निर्देश साक्षीच्या वेळी समितीने दिले होते. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती एक महिन्यात समितीस सादर करावी तसेच सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ मध्ये अशा या चुकीबाबत ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना नोटीस दिली त्याचीही चौकशी करुन कारवाई करावी केलेल्या कार्यवाहीची माहिती एका महिन्यात समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

८.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्रमांक एन-२ "सेक्रेटरिएट आणि इतर सामाजिक सेवा " व एन-४ "सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च" या शीर्षांतर्गत बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अनुदान क्र. "सेक्रेटरिएट आणि इतर सामाजिक सेवा सर्व दत्तमत"

(रुपये लाखांत)

शीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
२०५३- जिल्हा प्रशासन				
२२१६- जिल्हा प्रशासन				
२२५१- गृहनिर्माण				
२२५१- सेक्रेटरिएट सामाजिक सेवा				
दत्तमत		६,७७,८७,२९	५,४९,१९,९८	(-)१,२८,६७,३१
मूळ	१,३९,७८,१४			
पूरक	५,३८,०९,१५			१,२७,४५,५९
(वर्षभरात परत केलेली रक्कम मार्च २०१०)				

टीपा व भाष्ये :

रु.१२८६७.३१ लाख एवढ्या रकमेची अंतिम बचत असताना मार्च, २०१० मध्ये रु.१२७४५.५९ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :

८.२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

बचतीची रक्कम ही घरकूल योजनेची असून शासनाने मंजूरी प्रदान केलेल्या आदेशाच्या अधिन राहून खर्च केल्याने बचत झाली आहे. बचतीची रक्कम रु.१,२७,२१,३२ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र.बीजीटी-२०१०/प्र.क्र.२०७/अर्थसंकल्प, दि.३१.३.२०१० अन्वये दत्तमताकडे वर्ग करण्यास मंजूरी दिली असल्याने बचत निरंक आहे. तरी कृपया बचतीचा मुद्दा क्षमापित करण्यात यावा.

शासनाचे अभिप्राय :-

आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

(रुपये लाखांत)

	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
प्रधान शीर्ष २०५३- जिल्हा प्रशासन ०९३- जिल्हा आस्थापना ०९३-(०१) (०१) आयुक्त पुणे (२०५३ १११३) मूळ तरतूद रु ३९९.९७ पूरक रुपये ६५.१३ पुनर्विनियोजन(-)१३.४०	४,७८.५०	४,५०.१४	(-) २८.३६

टिपा व भाष्ये :-

सहाव्या वेतन आयोगाची शिफारस लागू केल्यामुळे मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे तरतूद करण्यात आलेला रु.१३.४० लाख एवढा अतिरिक्त निधी रु.२८.३६ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, अनावश्यक असल्याचे सिध्द झाले. त्याबाबतची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

८.३ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या लेखाशीर्षाखाली प्रत्यक्षात रु.४६५.१० लक्ष एवढे सुधारित अंदाज वित्त विभागाने मंजूर केले होते. मंजूर निधीपैकी रु.४५०.१४ लक्ष एवढा प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. त्यामुळे रु.२८.३६ लक्ष एवढी बचत झालेली नसून प्रत्यक्षात रु.१४.९६ लक्ष एवढी बचत झालेली आहे.

तथापि पुणे विभागात संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत रिक्त पदे तसेच कार्यालयीन खर्च, दूरध्वनी, वीज कमी झाल्यामुळे बचत झाली आहे. त्यामुळे रु.१४.९६ लक्ष एवढा निधी समर्पित केला आहे.

(रुपये लाखांत)

	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
शीर्ष २०५३- जिल्हा प्रशासन ०९३- जिल्हा आस्थापना ०९३-(०१) (०२) आयुक्त कोकण मूळ रु ४,८७.५१ पुनर्विनियोजन- (-) ५५.१२	४,३२.३९	४,२१.८९	(-) १०.५०

ज्ञापन :-

८.४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्यामुळे अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली होती.

तथापि कोकण विभागात संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत पदे रिक्त असल्यामुळे तसेच कार्यालयीन खर्च, दूरध्वनी, वीज या वरील खर्च कमी झाल्यामुळे बचत झाली आहे. त्यामुळे रु.१०.५० लक्ष एवढा निधी समर्पित केला आहे.

		एकूण अनुदान	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
०९४-(०१) (०१) भूमिहीन वृध्द शेतमजूरांना अर्थसहाय्य-आस्थापना खर्च मूळ तरतूद रु ११,५०.१४ पुनर्विनयोजन-	(-) ९२.४७	१०,५७.६७	१०,१८.१८	(-)३९.४९

टिपा व भाष्ये :-

पदे रिक्त असल्यामुळे वर नमूद केलेल्या शिर्षाखाली मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यर्पण याव्दारे रु.१४७.५९ लाख एवढा निधी काढण्यात आला. उपरोल्लिखित शीर्षाखाली रु.४९.९९ लाख एवढ्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :-

८.५ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्यामुळे अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली होती. तथापि भूमिहीन वृध्द शेतमजूरांना अर्थसहाय्य योजनेअंतर्गत पदे रिक्त असल्यामुळे मार्च मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे निधी प्रत्यार्पित करण्यात आला. तसेच कार्यालयीन खर्च, दूरध्वनी, वीज कमी झाल्यामुळे बचत झाली आहे. त्यामुळे निधी समर्पित केला आहे.

(रुपये लाखांत)

	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
२२१६ गृहनिर्माण ०२- नागरी गृहनिर्माण ८००- इतर खर्च ८०० (००) (०१) अनुसूचित जातीतील व नवबौध्द व्यक्तींसाठी घरकुल योजना (ग्रामीण) (विशेष घटक योजना) मूळ तरतूद रु ३९,१२.०० पूरक रुपये २,१३,४३.७० पुनर्विनयोजन- (-) ५०,५१.१४	२,०२,०४.५६	२,०२,०४.५६	---

ज्ञापन :-

८.६ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मूळ तरतूद	३९,१२.००
पूरक मागणी	२,१३,४३.७०
एकूण	२,५२,५५.७०
अंतिम सुधारित तरतूद	२,०२,०४.५६
खर्च	२,०२,०४.५६
पुनर्विनियोजन	५०,५१.१४

वित्त विभागाने मूळ तरतूदीच्या ८०% रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे वितरीत केल्यानंतर खर्च केला असून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.बीजीटी-२०१०/प्र.क्र.२०७/अर्थसंकल्प, दि.३१.३.२०१० अन्वये रक्कम ५०,५१.१४ लक्ष दत्तमतकडे वर्ग करण्यास मंजूरी दिली असल्याने निव्वळ बचत निरंक आहे. तरी कृपया बचतीचा मुद्दा क्षमापित करण्यात यावा.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
२२१६गृहनिर्माण ०३ ग्रामीण गृहनिर्माण ८०० इतर खर्च ८०० (००) (०१) अनुसूचित जातीतील व नवबौध्द व्यक्तींसाठी घरकुल योजना (नागरी)			
(विशेष घटक योजना) मूळ तरतूद रु ५८,५३.३३ पूरक रुपये ३,२३,७३.०० पुनर्विनयोजन- -७६,४५.२७	३,०५,८१.०६	३,०५,८१.०६	---

टिपा व भाष्ये :-

वित्त विभागाने अर्थसंकल्प वितरण प्रणालीमार्फत मूळ तरतूदीच्या ८० टक्के रकमेपर्यंत निधी दिल्यामुळे उपरोल्लिखित शीर्षाखाली मार्च २०१० मध्ये रु.१२६९६.४१ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

८.७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मूळ तरतूद ५८,५३.३३
पूरक मागणी ३,२३,७३.००
एकूण ३,८२,२६.३३
अंतिम सुधारित तरतूद ३,०५,८१.०६
खर्च ३,०५,८१.०६
पुनर्विनियोजन ७६,४५.२७

शासनाने मंजूरी प्रदान केल्यानंतर व वित्त विभागाने मूळ तरतूदीच्या ८०% एवढीच रक्कम वितरण प्रणालीव्दारे वितरीत केल्यानंतर खर्च केला. व या योजनेची बचत रक्कम रु.७६,४५.२७ लक्ष सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक बीजीटी-२०१०/प्र.क्र.२०७/अर्थसंकल्प, दिनांक ३१ मार्च, २०१० अन्वये पुनर्विनियोजनाने रक्कम ७६,४५.२७ लक्ष दत्तमतकडे वर्ग केली असल्याने निव्वळ बचत निरंक आहे. तरी कृपया बचतीचा मुद्दा क्षमापित करण्यात यावा.

वित्त विभागाने अर्थसंकल्प वितरण प्रणाली मार्फत मूळ तरतुदीच्या ८०% रकमेपर्यत निधी दिल्यामुळे, उपरोल्लिखित शीर्षाखाली मार्च २०१० मध्ये रु.१२६९६.४१ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

(रुपये लाखांत)

	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
२२१६- गृहनिर्माण ०३- ग्रामीण गृहनिर्माण ११४- सरकारी गृहनिर्माण ११४ (०१) (०२) निरधीसुचीत व भटक्या जमातीतील व्यक्तीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वित्तीय सहाय्य मूळ ६६.६७ पुनर्विनियोजन (-) ४०.००	२६.६७	२०.००	-६.६७

टीपा व भाष्ये :-

प्रत्यक्ष आवश्यकतेनुसार मार्च २०१० मध्ये रु.४० लाख एवढा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :-

८.८ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० साठी गृहनिर्माण २२१६-२५२१ ग्रामीण यामध्ये रु.६६.६७ लक्ष एवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्या नंतर दिनांक ३१ मार्च, २०१० च्या शासन आदेश अन्वये रु.८.६४ लक्ष एवढी सुधारित तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली. व या संचालनालयाचा खर्च ही रु.८.६४ लक्ष इतक्याच झालेला असल्याने या योजनेअंतर्गत बचत किंवा अधिक्य नाही. सबब सदरचा परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणास सहमती आहे.,

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
२०५३-जिल्हा प्रशासन ०९३- जिल्हा आस्थापना ०९३-(०१) (०४) आयुक्त नागपूर मूळ रु.४०६.९१ पुनर्विनियोजन- ५१.८६	४,५८.७७	४,४४.९१	-१३.८६

ज्ञापन :-

८.९ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्यामुळे अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी मार्चमध्ये पुनर्विनियोजनाव्दारे अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली होती.

तथापि, नागपूर विभागात संजय गांधी निराधर अनुदान योजनेअंतर्गत रिक्त पदे तसेच कार्यालयीन खर्च, दूरध्वनी, वीज कमी झाल्यामुळे बचत झाली आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
२०५३- जिल्हा प्रशासन,				
०९३- जिल्हा आस्थापना				
०९३ (०१) (०५) आयुक्त अमरावती				
मूळ तरतूद-	४०१.९४			
पुरक रुपये	२५.७५			
पुनर्विनियोजन	२७.२७	४५४.९६	४६२.६७	(+) ७.७१

ज्ञापन :-

८.१० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्यामुळे अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी मार्चमध्ये पुनर्विनियोजनाव्दारे अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली होती.

सदर अधिक खर्च वेतनावर झाला आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०५३- जिल्हा प्रशासन				
०९३- जिल्हा आस्थापना				
०९३- (०१) (०६) आयुक्त औरंगाबाद				
मूळ तरतूद रु	३,२०.२४			
पुनर्विनियोजन	३८.२९	३,५८.५३	३,४५.५२	-१३.०१

सहाव्या वित्त आयोगाच्या शिफारशी लागू केल्यामुळे अतिरिक्त खर्च मागविण्याठी उपरोल्लिखित शीर्षाखाली मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.११७.४२ लाख एवढा अतिरिक्त निधीची तरतुद करण्यात आली. उपरोक्त शीर्षाखाली अंतिम अधिक खर्चाची /बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

८.११ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्यामुळे अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी मार्चमध्ये पुनर्विनियोजनाव्दारे अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली होती.

तथापि औरंगाबाद विभागात संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत रिक्त पदे तसेच कार्यालयीन खर्च, दुरध्वनी, वीज कमी झाल्यामुळे बचत झाली आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२२५१- सेक्रेटरिएट-सामाजिक सेवा ०९०-सेक्रेटरिएट ०९० (०५) (०१) राष्ट्रीय एकात्मता व विश्वबंधुत्व वाढीसाठी विकास योजना				
मूळ	७.०५	१२.६९	१२.७०	+०.०१
पुनर्विनियोजन	५.६४			

टीपा व भाष्ये :-

वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारित अंदाजावरुन मार्च २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.५.६४ लाख एवढ्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

ज्ञापन :-

८.१२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू योजनेवर प्रत्यक्ष खर्च रु.१२,६९,५१४ इतका झालेला असून तो लाखात नोंदविताना पूर्णांकात रु.१२.७० असा नोंदविलेला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष रु.५१४ इतका अधिकचा खर्च झालेला आहे. सदरचा खर्च वेतनावर असल्याने तसेच तो कमी असल्याने परिच्छेद क्षमापित करण्यात यावा, ही विनंती.

शासनाचे अभिप्राय:- अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

अनुदान क्रमांक एन-४ "सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च"

(रुपये हजारांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
४२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च ४२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च			
६२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणासाठी कर्जे दत्तमत	६,०४,१४,९९	३,८१,४३,४५	-२,२२,७१,५४
मूळ २,१७,४३,१३ पुरक ३,८६,७१,८६ वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१०)			२,२३,५१,१८

टिपा व भाष्ये :-

अनुदानातील रु.२२२७१.५४ लाख एवढी अंतिम बचत लक्षात घेता रु.२२३५१.१८ लाख एवढा परत केलेला निधी अत्यधिक ठरल्याचे सिध्द झाले.

ज्ञापन :-

८.१३ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

विनियोजन लेख्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षापैकी लेखाशीर्ष क्रमांक ४२२५ व ६२२५ आयुक्तालयाशी संबंधित असून सदर लेखाशीर्षा अंतर्गत खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

१. **लेखाशिर्ष ४२२५ अंतर्गत** सन २००९-१० या आर्थिक वर्षात शासकीय संस्थांची बांधकामे व औद्योगिक सहकारी संस्थासाठी खालीलप्रमाणे प्राप्त तरतूद, अंतिम सुधारित तरतूद व खर्च झाला आहे.

१. एकूण मुळ तरतूद	३,४२,२६,६६
२. अंतिम सुधारित तरतूद	१,३०,८७,३४
३. अंतिम खर्च	१,३०,८७,३४
४. बचत	२,११,३९,३२

२. लेखाशिर्ष ६२२५ अंतर्गत

१. मुळ तरतूद	१,७५,५४.००
२. अंतिम सुधारित तरतूद	१,६८,०२,१४
३. अंतिम खर्च	१,६८,०२,१४
४. बचत	७,५१,८६

लेखाशिर्ष ४२२५ अंतर्गत मूळ तरतूदीवर होणारी बचत पुनर्विनियोजनाने महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीजीटी-२००९/प्र.क्र.२१०/अर्थसंकल्प मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/०३/२०१० अन्वये इंदिरा आवास योजनेकडे प्रत्यार्पित केलेली आहे व लेखाशिर्ष ६२२५ अंतर्गत मूळ तरतूदीवर होणारी बचत पुनर्विनियोजनाने महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीजीटी २०१०/प्र.क्र.२१२/अर्थसंकल्प मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/०३/२०१० अन्वये प्रत्यार्पित केलेली आहे. तसेच इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ व वसंतराव नाईक, विजाभज विकास महामंडळावरील बचत शासनस्तरावर पुनर्विनियोजन केली आहे. अंतिम सुधारित तरतूदी एवढाच खर्च झालेला आहे. कृपया अनुपालन मान्य होऊन मुद्दा क्षमापित व्हावा.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च ०१-अनुसूचित जातींचे कल्याण १९०- सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूक १९० (०१) (०४) अनुसूचित जातीतील व्यक्तींच्या सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान मूळ १६,६६,६७ पूरक १,०८,३३,३३ पुनर्विनियोजन -६७,१२	१,२४,३२.८८	१,२४,३२.८८	

ज्ञापन :-

८.१४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० या आर्थिक वर्षात अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करणे योजनेंतर्गत लेखाशिर्ष (४२२५-०४५२)३२- ऐवजी (भाग भांडवली अंशदान) या बाबीखाली रुपये १२५००.०० लक्ष तरतूद अर्थसंकल्पीय करुन उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सदर प्राप्त तरतूदीमधून रुपये १२४३२.८८ लक्ष रकमेचे शासनस्तरावरुन संस्थांना भाग भांडवली अंशदान मंजूरी आदेश प्राप्त झाले त्याप्रमाणे सदरहू रक्कम आहरीत करण्यात आलेली आहे. व उर्वरीत रक्कम रुपये ६७.१२ लक्ष शासन आदेश क्रमांक बीजीटी-२०१०/प्र.क्र२१०/अर्थसंकल्प दिनांक ३१/०३/२०१० अन्वये प्रत्यार्पित करण्यात आलेली आहे एकूण अनुदानाएवढा खर्च झाल्यामुळे सदरचा मुद्दा क्षमापित करण्यात यावा ही विनंती.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

(रुपये लाखात)

		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
	०३- मागासवर्गीयांचे कल्याण, १९०- सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूक १९० (००) (०२) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळास भागभांडवली अंशदान मूळ तरतूद रु.१,३३.३३ पुरक रु. २६६.६७ पुनर्विनियोजन रु. (-) ८०.००	३,२०.००	३,२०.००	(-)८०.००

सुधारित अंदाजानुसार उपरोल्लिखित शीर्षाखाली मार्च २०१० मध्ये रु.१४७.१२ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

८.१५ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

८.१६ या महामंडळास शासनाने सन २००९-२०१० मध्ये रु.१३३.३३ लक्ष इतकी मुळ तरतूद केली होती व पुरक मागणी अन्वये रु.२६६.६७ लक्ष इतकी रक्कम मंजूर केली होती. अशाप्रकारे सन २००९-१० मध्ये रु.४००.०० लक्ष इतकी रक्कम शासनाने या महामंडळास मंजूर केली होती.

परंतु सुधारित अंदाजानुसार शासनाने एकूण रु.३२०.०० लक्ष इतकी तरतूद महामंडळास वितरीत केली. प्राप्त झालेली रक्कम त्याच प्रयोजनार्थ खर्च करण्यात आली.

८.१७ त्यामुळे रु.८०.०० लक्ष इतकी खर्चात बचत झाली. (शा. नि.ओबीसी-२०१०/प्र.क्र.११/विधयो-२, दिनांक ३१/०३/२०१० सोबत जोडला आहे.)

शासनाचे अभिप्राय:- महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळासाठी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात रु.१३३.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित होती व पूरक मागणीव्दारे रु.२६६.६७ लक्ष इतका निधी महामंडळास मंजूर करण्यात आला होता. अशाप्रकारे सन २००९-२०१० मध्ये महामंडळास एकूण रु.४००.०० लक्ष इतकी रक्कम मंजूर करण्यात आली होती.

८.१८ तथापि सुधारित अंदाजामध्ये शासनाने क्र.ओबीसी २०१०/प्र.क्र११/विधयो-२ दिनांक ३१/३/२०१० च्या शासन निर्णयान्वये रु.३२०.०० लक्ष इतकी तरतूद महामंडळास वितरीत केली आहे. सदर प्राप्त रक्कम त्याच प्रयोजनार्थ खर्च केली आहे.

८.१९ सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात शासनाकडून संबंधित महामंडळास जेवढा निधी सुधारित अंदाजात प्राप्त झाला त्या मर्यादेत महांडळाना निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीत केलेली रक्कम ही पुर्णत महामंडळाना प्राप्त झाली नाही. हे विचारात घेतल्यास शासनाची (-) ८०.०० लक्ष इतकी रक्कम बचत झाली आहे असे म्हणता येणार नाही. आक्षेपात दर्शविण्यात आलेली ही बचत ही शासनास समर्पित होत असते. वस्तुस्थिती लक्षात घेऊन महालेखापाल यांच्या अहवालामधून आक्षेप वगळण्यात यावा ही विनंती.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च ०१-अनुसूचित जातीचे कल्याण १९०- सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक १९० (०१) (०५) प्रत्येक जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधणे	३,८९,०८	३,८९.०८	--

मूळ १६,९४.८१ पूरक ५४,३१.८५ पुनर्विनियोजन -६७,३७.५८			

ज्ञापन :-

८.२० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मुळ तरतूद+पुरक मागणी ७१,२६.६६
अंतिम सुधारित तरतूद ३,८९.०८
बचत ६७,३७.५८

८.२१ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक बीजीटी-२००७/प्र.क्र.३२३/अर्थसंकल्प, दिनांक २०.११.२००९ अन्वये बचतीची तरतूद रु. ६७,३७.५८ इंदिरा आवास योजनेकडे वर्ग केल्याने उर्वरीत तरतूद रु.३,८९.०८ संपूर्ण खर्च झाली असून निव्वळ बचत निरंक असल्याने आक्षेप क्षमापित करण्यात यावा ही विनंती.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च ०१-अनुसूचित जातीचे कल्याण २७७-शिक्षण २७७ (०१) (०२) अनुसूचित जातीच्या मूला-मुलींकरिता असलेल्या शासकीय वसतीगृहांची दर्जावाढ करणे मूळ ३३.३३ पूरक ६६.६७ पुनर्विनियोजन (-) ५४.५३	४५.४७	४५.४७	--

ज्ञापन :-

८.२२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

८.२३ सदर योजनेसाठी सन २००९-१० करिता रु.१.०० कोटी तरतूद प्राप्त झाली होती. तथापि शासनाने शासन निर्णय दिनांक २०/११/२००९ अन्वये या योजनेची तरतूद इंदिरा निवास योजनेकडे वर्ग केली. परंतु उपरोक्त दिनांक २०/११/२००९ चा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी या योजनेवर रु.४५.४७०००/- एवढा खर्च या कार्यालयाकडून झालेला होता. एकूण अनुदानाएवढा खर्च झाल्यामुळे सदरचा मुद्दा रद्द करण्यात यावा ही विनंती.

शासनाचे अभिप्राय :- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
४२२५-अनुसूचित जाती,जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण २७७ (०१) (०२) मागासवर्गीय मुलामुलींकरिता शासकीय वसतीगृहे बांधणे, मूळ ४०,३२.१४ पूरक २४,६७.८६ पुनर्विनियोजन (-) ६२,८०.०९	२,१९.९१	२,९९.९१	(+) ८०.००

ज्ञापन :-

८.२४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर योजनेवर मूळ तरतूद रु.६५००.०० लक्ष प्राप्त झाली होती. सदर योजनेवर रक्कम २९९.९१ लक्ष एवढा खर्च दिनांक २०/११/२००९ पूर्वी झाला होता. शासन निर्णय दिनांक २०/११/०९ अन्वये या योजनेची उर्वरीत तरतूद रक्कम ६२८०.०९ लक्ष एवढी तरतूद महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीजीटी २००९/प्र.क्र.२१०/अर्थसंकल्प, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/०३/२०१० अन्वये इंदिरा आवास योजनेकडे पुनर्विनियोजनाने वर्ग केली आहे. पुनर्विनियोजनाचे आदेश प्राप्त होण्यापूर्वीच (दिनांक २०/११/२००९ पूर्वी) मूळ तरतूद लक्षात घेऊन खर्च झाल्याने रक्कम रु.८०.०० लक्ष जास्त खर्च झाला आहे. कृपया सदर ज्यादा झालेला खर्च क्षमापित करावा.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण २७७ (०१) (०४) अनुसूचित जातीतील व नवबौध्द मुला-मुलींकरिता शासकीय निवासी शाळा बांधणे मूळ ३७,३७.४१ पूरक ३२,६२.५९ पुनर्विनियोजन (-) ७०,००.००	--	--	--

टिपा व भाष्ये :-

शासन निर्णय क्रमांक बीजीटी-२००७/ सीआर-३२३/अर्थसंकल्प, दिनांक २०.११.२००९ याव्दारे इंदिरा आवास योजनेखाली निधी वळविण्यात आल्यामुळे, उपरोल्लिखीत शीर्षाखाली मार्च २०१० मध्ये रु.२००७२.२० लाख एवढा निधी परत करण्यात आला.

रु.८० लाख एवढ्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

८.२५ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर योजनेवर रुपये ७०००.०० लक्ष एवढी मूळ तरतूद प्राप्त झाली होती. त्यापैकी प्रत्यक्षात बीडीएसवर रु.५३,६८.७० लक्ष एवढी रक्कम प्राप्त झाली. शासन निर्णय दिनांक २०.११.२००९ अन्वये या योजनेची तरतूद इंदिरा आवास योजनेकडे वर्ग केल्याने बीडीएसवर प्राप्त झालेली तरतूद रक्कम रुपये ५३,६८.७० लक्ष दिनांक ३१.३.२०१० रोजी शसनास समर्पित करण्यात आली. शासन आदेश क्रमांक बीजीटी-२०१०/प्र.क्र.२१०/अर्थसंकल्प दिनांक ३१/०३/२०१० अन्वये शासनाने सदरची रक्कम प्रत्यार्पित केलेली आहे. त्यामुळे योजनेवर खर्च निरंक झालेला आहे.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च ०१-अनुसूचित जातीचे कल्याण	--	--	--

२७७-शिक्षण २७७ (०१) (०१) अनुसूचित जातीच्या मुला-मुलींकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधणे मूळ ४,४१.४० पूरक ५,५८.६० पुनर्विनियोजन (-) १०,००.००			

टिपा व भाष्ये :-

(एक) मुंबई विभागामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे बांधकाम करण्यासाठी जमीन उपलब्ध न झाल्याने आणि (दोन) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संस्थात्मक इमारतीचे अंदाज व रेखांकन न मिळाल्यामुळे मार्च २०१० मध्ये रु.१००० लक्ष लाख एवढा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

८.२६ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर योजनेवर रुपये १०००.०० लक्ष एवढी मूळ तरतूद होती. त्यापैकी बीडीएसवर रु.७,२०.७० लक्ष इतकी रक्कम प्राप्त झाली. परंतु (१) बांधकामासाठी जमिन उपलब्ध झाली नाही (मुंबई विभाग) आणि (२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतींचे नकाशे, आराखडा व अंदाजपत्रक इ.प्राप्त झालेले नाही. त्यामुळे रु.७,२०.७० लक्ष इतकी रक्कम दिनांक ३१/०३/२०१० रोजी बीडीएसवर समर्पित केली. त्यामुळे या योजनेवर खर्च निरंक झालेला आहे.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च ०१-अनुसूचित जातीचे कल्याण ०३-मागासवर्गाचे कल्याण १९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक १९० (००) (०१) वसंतराव नाईक विमुक्त जाती / भटक्या जमाती विकास महामंडळाला भाग भांडवली अंशदान (आणि विशेष मागास प्रवर्गासाठी योजना)	१२,८०.००	१२,८०.००	निरंक

मूळ १०,६६.६७ पूरक ५,३३.३३ पुनर्विनियोजन ३,२०.००			

ज्ञापन :-

८.२७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

एकूण तरतूदी इतकाच खर्च झाल्याने अधिक खर्च (+) बचत (-) नाही.

शासनाचे अभिप्राय :-

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळास सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात रु.१०,६६.६७ इतकी तरतूद करण्यात आली होती. या आर्थिक वर्षात पूरक मागणीव्दारे रु.५,३३.३३ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला होता. असा एकूण रु.१६००.०० लक्ष इतका निधी महामंडळास मंजूर करण्यात आला होता. तसेच पुनर्विनियोजनाव्दारे (-) रु.३,२०.०० लक्ष इतका निधी महामंडळास मंजूर करण्यात आला होता. तथापि वित्त विभागाने फक्त ८० टक्के अनुदान वितरीत करण्यास मान्यता दिल्यामुळे (-) रु.३२०.०० लक्ष एवढा निधी परत करण्यात आला आहे. यास्तव शासन निर्णय क्रमांक २००९/प्र.क्र.२००/विधयो-२, दिनांक ३१ मार्च, २०१० अन्वये महामंडळास रु.१२,८०.०० इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. महामंडळास वितरीत करण्यात आलेला निधी पूर्णपणे योजनेंतर्गत खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे एकूण तरतूदी इतकाच खर्च झाल्यामुळे आक्षेपात दर्शविण्यात आलेली ही बचत निरंक आहे. वस्तुस्थिती लक्षात घेऊन महालेखापाल यांच्या अहवालामधून सदर आक्षेप वगळण्यात यावा, ही विनंती.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
४२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च ०२-समाज कल्याण १९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका १९ (०१)(०१) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाला भाग भांडवली अंशदान (४२३५ ०१८२) मुळ तरतूद रु.५०.०० पूरक रु.२,५०.०० पुनर्विनियोजन -६०.००	२,४०.००	२,४०.००	निरंक

वित्त विभागाने केवळ ८० टक्के अनुदान दिल्यामुळे, उपरोल्लिखित शीर्षाखाली मार्च २०१० मध्ये रु.३८० लाख एवढा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

८.२८ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या मंडळास शासनाने सन २००९-१० मध्ये रु.५०.०० लक्ष इतके अनुदानासाठी तरतूद करण्यात आली होती. तसेच पुरक अनुदानाव्दारे रु.२५०.०० लक्ष इतके अनुदान मंजूर केले होते. त्यापैकी पुनर्विनियोजनाचे रुपये ६० लक्ष इतकी तरतूद वळविण्यात आली आहे असे दिसून येते आणि रुपये २४० लक्ष इतके अनुदान शासनाने वितरीत केले आहे.

शासनाचे अभिप्राय:- महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळासाठी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात रु.५०.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पीत होती व पूरक मागणीव्दारे रु.२५०.०० लक्ष इतका निधी महामंडळास मंजूर करण्यात आला होता. अशाप्रकारे सन २००९-२०१० मध्ये महामंडळास एकूण रु.३००.०० लक्ष इतकी रक्कम मंजूर करण्यात आली होती. तसेच पुनर्विनियोजनासाठी (-) रु.६०.०० लक्ष इतका निधी महामंडळास मंजूर करण्यात आला होता. तथापि वित्त विभागाने एकूण रकमेच्या फक्त ८० टक्के अनुदान वितरीत करण्यास मान्यता दिल्यामुळे (-) रु.६०.०० लक्ष एवढा निधी परत करण्यात आला आहे व शासन निर्णय क्र.अपंग २०१०/प्रक्र ५९/सुधार-३, दिनांक ३१ मार्च, २०१० अन्वये रु.२४०.०० लक्ष एवढा निधी महामंडळास वितरीत करण्यात होते. हे विचारात घेतल्यास शासनाची (-०) ८०.०० लक्ष इतकी रक्कम बचत झाली आहे असे म्हणता येणार नाही. आक्षेपात दर्शविण्यात आलेली ही बचत ही शासनास समर्पित होत असते. वस्तुस्थिती लक्षात घेऊन महालेखापाल यांच्या अहवालामधून सदर आक्षेप वगळण्यात यावा, ही विनंती.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
६२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणासाठी कर्जे ०१-अनुसूचित जातीचे कल्याण १९५-सहकारी संस्थांना कर्जे १९५ (०१) (०१) अनुसूचित जातीच्या सहकारी सूत गिरण्यांना कर्जे मूळ ४,९४.०० पूरक १५,०६.०० पुनर्विनियोजन (-) ५,०१.४५	१४,९८.५५	१४,९८.५५	--

ज्ञापन :-

८.२९ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात अनुसूचित जातीच्या सहकारी सूतगिरण्यांना दिर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करणे योजनेंतर्गत लेखाशिर्ष- (६२२५-०२२२) ५५-आगाऊ कर्जे या बाबीखाली रु.२०००.०० लक्ष तरतूद अर्थसंकल्पीय करुन उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सदर प्राप्त तरतूदीमधून रु.१४९८.५५ लक्ष रकमेचे शासनस्तरावरुन सुतगिरण्यांना कर्ज मंजूरीचे आदेश प्राप्त झाले त्याप्रमाणे सदरहू रक्कम आहरीत करण्यात आलेली आहे व उर्वरीत रक्कम रु.५०१.४५ लक्ष शासनास समर्पित करण्यात आली. एकूण अनुदानाएवढा खर्च झाल्यामुळे सदरचा मुद्दा रद्द करण्यात यावा, ही विनंती.

शासनाचे अभिप्राय :- आयुक्तालयाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणास सहमती आहे.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+)बचत (-)**
०१-अनुसूचित जातीचे कल्याण १९५-सहकारी संस्थांना कर्जे १९५ (०१) (०२) अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना कर्जे मूळ १६,६६.६७ पूरक १,२८,३३.३३ पुनर्विनियोजन (-) १६.३१	१,४४,८३.६९	१,४४,८४.६९	(+) १.००

टिपा व भाष्ये :-

वित्त विभागाने अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे निधी दिल्यामुळे उपरोक्तलिखीत शीर्षाखाली रु.५१७.७६ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

८.३० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-२०१० मध्ये अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करणे योजनेंतर्गत लेखाशीर्ष (६२२५-०२५१) ५५-आगाऊ कर्जे या बाबीखाली रुपये १४५००.०० लक्ष एवढी तरतूद प्राप्त झालेली होती. त्यापैकी रुपये १४४८३.६९ लक्ष रकमेचे शासनस्तरावरुन संस्थांना कर्जे मंजूरी आदेश प्राप्त झाले त्याप्रमाणे सदरहू रक्कम आहरीत करण्यात आलेली आहे व उर्वरीत रक्कम रुपये १६.३१ लक्ष शासन आदेश क्रमांक

बीजीटी-२०१०/प्रक्र२१२/अर्थसंकल्प दिनांक ३१/०३/२०१० नुसार शासनाने प्रत्यार्पित केलेली आहे. तरी कृपया बचतीचा मुद्दा क्षमापित करण्यात यावा.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+)बचत (-)
०१-अनुसूचित जातीचे कल्याण ८००-इतर कर्जे ८०० (०१) (०४) जमिनीच्या वाटपासाठी अनुसूचित जातीतील व नवबौध्द भूमिहिन मजूरांना कर्जे मूळ ३,९३.३७ पूरक ६,६०.६३ पुनर्विनियोजन (-) २,३४.१०	८,१९.९०	१,१९.८६	-०.०४

टिपा व भाष्ये

अपेक्षापेक्षा कमी अर्ज मिळाल्यामुळे मार्च २०१० मध्ये रु.२३४.१० लाख एवढा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

८.३१ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत लेखाशिर्ष (६२२५-०२६९) कर्ज या बाबीखाली रुपये १०५४.०० लक्ष तरतूद अर्थसंकल्पीय करण्यात आलेली होती. प्राप्त तरतूदीमधून रुपये ८१९.८६ लक्ष खर्च झालेला आहे. जमीनीचे शासकीय दरापेक्षा खाजगी बाजारभाव जास्ती असल्याने शासकीय दराने जमीन विक्रीस शेतकरी तयार होत नाही. त्यामुळे जमीन विक्रीचे शेतकऱ्यांकडून अपेक्षेप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे रु.२३४.१० लक्ष एवढी तरतूद शासन आदेश क्रमांक बीजीटी-२०१०/प्रक्र.२१२/अर्थसंकल्प मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/०३/२०१० अन्वये शासनाने प्रत्यार्पित केले आहे. बचतीची रक्कम अत्यल्प असल्याने मुद्दा क्षमापित करण्यात यावा.

शासनाचे अभिप्राय:- आयुक्तालयाच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येते.

साक्ष :-

८.३२ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील सामाजिक न्याय विभागाच्या मागणी क्रमांक एन-२ व एन-४ संदर्भात समितीने दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३, २१ व २२ नोव्हेंबर, २०१३ व २२ जानेवारी, २०१४ तसेच २५ जून, २०१४ रोजी लोकलेखा

समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी अनुदान क्र.एन-२ अंतर्गत घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणात झालेल्या बचतीचे मुख्य कारण सांगताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, घरकुल योजनेला २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीत गती मिळाली होती. या योजनेच्या प्रत्यक्ष कामास २०१० पासून सुरुवात झाली. ते वर्ष घरकुल योजनेचे पहिलेच वर्ष होते. योजनेचे पहिलेच वर्ष असल्यामुळे त्या वर्षात लाभार्थी निश्चित करणे, योजनेची जाहिरात देणे, लाभार्थ्यांची पात्रता तपासणे इत्यादी प्रक्रिया पार पाडाव्या लागल्यामुळे त्या वर्षात तरतूद केलेली रक्कम पुरेशा प्रमाणात खर्च झाली नाही.

८.३३ घरकुल योजनेसाठी दोन-तीन वर्षे निधी प्राप्त झाला. त्या निधीचा वापर करण्यासाठी नियोजन करण्यात विभागाचा काही वेळ गेला असेल. पण जी तरतूद घरकुल योजनेसाठी केली होती त्यातून खरोखरच घरकुलांचे काम होणार आहे का, प्राप्त झालेला निधी व्यपगत होणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, घरकुलांचे काम करण्यासाठी काही कालावधी निश्चित लागणार आहे. या योजनेसाठी प्राप्त झालेला निधी व्यपगत होणार नाही तो निधी घरकुलांवरच खर्च होईल. ३.५ लाख घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे त्यापैकी १.५ लाख घरकुले पूर्ण झाली असून, ८५ हजार घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. घरकुल योजना केवळ ग्रामीण भागात राबविली जाते. शहरी भागात ही योजना न राबविण्याची कारणे काय आहेत ? घरकुल योजना शहरी आणि ग्रामीण अशा प्रकारे दोन्ही भागात राबविली जाते. शहरी भागात २००९-१० मध्ये ३०६७ घरकुले पूर्ण करण्यात आली असून ग्रामीण भागात ७३०० घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत. शहरी भागात घरकुलांची कामे करण्यात अडचणी येतात कारण शहरी भागात काही जमिनींवर आरक्षणे असतात. त्या ठिकाणी बांधकाम करण्यासाठी परवानगी घ्यावी लागते. घरकुल योजनेचा फायदा द्यावयाचा असल्यास प्रमुख अट अशी आहे की, लाभार्थी हा दारिद्र्यरेषेखालील असावयास पाहिजे. शहरी भागात घरकुलाच्या एकूण किंमतीच्या १० टक्के हिस्सा लाभार्थ्यांनी जमा करणे आवश्यक आहे ग्रामीण भागातील घरकुलांसाठी ही अट नाही.

८.३४ एस.सी., एस.टी., एन.टी. किंवा ज्या दुर्बल घटकातील लोकांना म्हाडाच्या सोडतीमध्ये सदनिका लागली असेल त्यांना सदनिकेच्या किंमतीच्या काही रक्कम घरकुल योजनेतून दिली जाते. आतापर्यंत म्हाडाने मागासवर्गीय किंवा दुर्बल घटकातील लोकांच्या सदनिकांपोटी म्हाडाकडे किती रक्कम वर्ग केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, या विषयी म्हाडा सोबत चर्चा सुरु आहे. सद्यःस्थितीत म्हाडाने काढलेल्या सोडतीमध्ये अल्प उत्पन्न गटातील एस.सी., एस.टी. प्रवर्गातून

सदनिका लागलेल्या लाभार्थ्यांची यादी म्हाडाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे पाठविलेली आहे त्या यादीची तपासणी सुरु आहे.

८.३५ पण जर म्हाडाने अनुसूचित जाती वा जमाती प्रवर्गातून सदनिका दिली असेल तर सामाजिक न्याय विभागास आणखी तपासणी करण्याचे कारण काय आहे ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, घरकुल योजनेतून मागासवर्गीय किंवा दुर्बल घटकातील लोकांना सवलत द्यावयाची झाल्यास उमेदवार हा दारिद्र्यरेषेखालील असणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांना म्हाडाच्या सोडतीत सदनिका लागल्या असतील आणि त्यांच्या नावाची यादी म्हाडाने पाठविली असली तरी ते दारिद्र्यरेषेखालील असतीलच असे नाही.

८.३६ अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्तीला घरकुल योजनेतून काही तरी रक्कम मदत म्हणून दिलीच पाहिजे. परंतु गेल्या १० वर्षभरात शहरी भागातील पात्र लाभार्थ्यांना घरकुलांसाठी निधीचा पुरवठा झालेला नाही. आर्थिक दुर्बल घटक किंवा दारिद्र्यरेषेखालील लोकांना सदनिकेच्या किंमतीएवढे कर्ज मिळत नाही. म्हणूनच त्यांना सरकारच्या माध्यमातून मदत करणे गरजेचे आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, गृहनिर्माण विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव यांच्यासोबत या विषयावर चर्चा झाली असून म्हाडाने सुरुवातीला एस.टी. प्रवर्गाच्या सदनिकाधारकांची यादी पाठविली होती. ती सामाजिक न्याय विभागाने तपासून दिली आहे. आता एस.सी. प्रवर्गाची यादी पाठविली आहे. अल्प उत्पन्न गटामध्ये ज्यांना म्हाडाच्या सोडतीत सदनिका मिळाली आहे त्यांची पात्रता तपासून त्यांना घरकुल योजनेतून किती पैसे देता येतील तसेच नगरपालिका क्षेत्रात घरकुल योजनेला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळतो. परंतु महापालिका क्षेत्रात जागेची अडचण असते. म्हाडाकडून मागासवर्गीय सदनिकाधारकांची यादी विभागाला प्राप्त झाली असून त्याची स्क्रुटीनी करुन पात्र उमेदवारांना घरकुल योजनेतून निधी देण्यात येईल.

८.३७ घरकुल योजनेसाठी मूळ तरतूद १३९ कोटी ७८ लाख १४ हजार रुपयांची केली व नंतर पूरक मागणी ५३८ कोटी ०९ लाख १५ हजार रुपयांची करण्यात आली. मूळ तरतुदीच्या पाच पट पूरक मागणी करण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता १३९ कोटी रुपये मूळ तरतूद होती आणि ५३८ कोटी रुपये पुरवणी मागणी द्वारे मागितले होते अशा प्रकारे ६७७ कोटी रुपयांची तरतूद प्राप्त झाली होती. घरकुल योजना २००८ ला नव्याने प्रस्तावित केली व योजनेचा शासन निर्णय नोव्हेंबर-२००८ मध्ये निर्गमित केला. २०५३-जिल्हा प्रशासन, २२१६-गृहनिर्माण व २२५१-सेक्रेटरिएट सामाजिक सेवा अशा तीन लेखा शीर्षाखाली योजनेंतर्गत आणि योजनेत्तरची रक्कम समाविष्ट असल्यामुळेच ही रक्कम जास्त असल्याचे दिसून येते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले.

८.३८ मूळ तरतुदीच्या पाच पट पूरक मागणी केल्यामुळे ती जास्त वाटते. इतक्या पटीत पूरक मागणी करणे योग्य आहे काय ? या समितीच्या प्रश्नावर सचिव, वित्त विभाग यांनी असे विदित केले की, एखाद्या योजनेच्या मूळ तरतुदीच्या आधारे कितीही रकमेची पूरक मागणी केली असेल आणि त्यास वित्त व नियोजन विभागाने मान्यता दिली असेल तर ती पूरक मागणी होऊ शकते.

८.३९ अंदाजपत्रकात घरकुल योजनेसाठी मूळ तरतूद १३९ कोटी रुपये दाखविली आहे. जेव्हा अंदाजपत्रक तयार झाले तेव्हा ही योजना अस्तित्वात होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, रमाई घरकुल योजना ही अनुसूचित जाती व नवबौध्द समाजासाठी होती. ही योजना त्या वर्षी नव्याने सुरु केली होती. योजनेचे उद्दिष्ट ठरविणे, जाहिरात देऊन योजनेची प्रसिध्दी करणे, लाभार्थ्याचे निकष ठरविणे व लाभार्थी ठरविणे इत्यादी कामांसाठी ठराविक रक्कम राखून ठेवली होती. एकूण तीन लेखा शीर्षांतर्गत ही रक्कम राखून ठेवली होती.

८.४० एकूण अनुदान ६७७ कोटी ८७ लाख २९ हजार रुपये प्राप्त झाले होते व प्रत्यक्षात ५४९ कोटी १९ लाख ९८ हजार रुपये खर्च करण्यात आला. त्यापैकी १२८ कोटी ६७ लाख ३१ हजार रुपये शिल्लक राहिले. मूळ मागणी आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये फरक का पडला ? अशी समितीने विचारणा केली. यासंदर्भात उत्तर प्राप्त झाले नाही.

८.४१ घरकुल योजनेमध्ये विविध प्रकारचे प्रवर्ग होते. नवबौध्द, अनुसूचित जाती, मागासवर्गीय, आदिवासी इत्यादी विविध प्रवर्गासाठी घरकुल योजना होती. त्या सर्वांचे वेगवेगळे लेखा शीर्ष आहे. विशिष्ट रकमेसाठी वित्त व नियोजन विभागाची मान्यता घेतली असेल तर ती पुरवणी मागणी होऊ शकते असे असताना मूळ तरतुदीपेक्षा पूरक मागणी पाच पटीने वाढण्यामागची पार्श्वभूमी विषद करताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, योजना सुरु करण्यापूर्वी त्या योजनेला प्रतिसाद म्हणून अमुक इतके अर्ज येतील असे गृहीत धरुन मूळ तरतूद करण्यात आली होती. प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने पुरवणी मागणी करण्यात आली. यामध्ये ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील घरकुलांसाठी जास्त तरतूद करण्यात आली. शहरी भागातील घरकुलांवर २५२ कोटी रुपये आणि ग्रामीण भागातील घरकुलांवर ३८२ कोटी रुपये खर्च केले असून सदर रक्कम खर्च झाली आहे.

८.४२ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवबौध्दांसाठी कायम स्वरुपी योजना आहेत असे असताना पूरक मागणीची आवश्यकता का पडली ? या समितीच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यापूर्वी मागासवर्ग आणि सर्वसाधारण वर्गासाठी योजना राबविली जात होती. परंतु शासनाने मागासवर्गीयांसाठी वेगळी योजना राबविण्याचे ठरविले त्याप्रमाणे रमाई घरकुल योजना सुरु झाली त्यानुसार

तरतूद करण्यात आली. शहरी भागासाठी २५२ कोटी रुपये आणि ग्रामीण भागासाठी ३८३ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

८.४३ विभागास जेवढ्या घरांचे उद्दिष्ट दिले होते ते पूर्ण झालेले नसून खालच्या यंत्रणेने व्यवस्थित काम केले असते तर निम्म्यापेक्षा जास्त रक्कम खर्च झाली असती. असे समितीने मत व्यक्त केले असता या ठिकाणी निम्म्यापेक्षा जास्त रक्कम खर्च झालेली आहे साडेतीन लाख घरांचे उद्दिष्ट आहे त्यापैकी दीड लाख घरे पूर्ण झालेली आहेत तर ८५ हजार घरांची कामे प्रगतीपथावर असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.४४ विभागास सन २०१३-२०१४ पर्यंत साडेतीन लाख घरांचे टार्गेट पूर्ण करायचे असल्यामुळे ही तरतूद केली. साडेतीन लाख घरांपैकी दीड लाख घरे पूर्ण झाली आहेत. तथापि, उपेक्षित लोकांच्या घरकुलांचा हा प्रश्न आहे. या घरकुलाच्या कामामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे तेव्हा या प्रकरणाची चौकशी केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

८.४५ ही योजना जिल्हापरिषदेमार्फत राबविण्यात येत असून ही पूर्णत:राज्य शासनाची योजना आहे. विशेष घटक योजनेंतर्गत ही योजना राबविण्यात येते असे ही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

मूळ अंदाजपत्रकात मागणी केली त्यापेक्षा पूरक मागणी जास्त आहे नवीन योजना आहे. ती एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे आली आहे. सन २००९-२०१० ते २०१३ पर्यंत किती घरे पूर्ण झाली आणि किती शिल्लक आहेत त्याची जिल्हानिहाय माहिती समितीस द्यावी. असे निदेश समितीने दिले असता विभागाकडून माहिती प्राप्त झाली आहे ती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

८.४६ महाराष्ट्रात भूकंप झालेल्या भागातील कुटुंबांचे वीस वर्षापूर्वी पुनर्वसन करण्यात आलेले आहे. आता कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढल्यामुळे अडचणी निर्माण झालेल्या आहेत. तेव्हा शासनाने निर्णय घेतला की, या पुनर्वसन गावामध्ये या नवीन योजना लागू करुन त्यांना देखील घरे द्यावीत. त्याप्रमाणे आपण त्यांना घरे देण्याची व्यवस्था करावी अशी सूचना समितीने विभागास केली.

८.४७ "भूमीहीन वृध्द शेतमजुरांना अर्थसहाय्य योजना" या विभागातील पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत ? याबाबत समितीने विचारणा केली असता भूमीहीन वृध्द शेतमजूर अर्थसहाय्य योजनेसाठी एकूण २२०० पदे निर्माण करण्यात आली. त्यापैकी जवळपास ३०० पदे रिक्त आहेत. १८३० पदे कार्यरत आहेत. या योजनेचा व्याप वाढला म्हणून मागील तीन-चार वर्षापासून ६०० पदांची मागणी विभागामार्फत करीत आहोत. त्या संदर्भातील नस्ती मुख्य सचिवांकडे पाठविली असून वर्ग-२ आणि वर्ग-३ सवंर्गातील ही पदे आहेत. पाच

विभागीय कार्यालयातील आस्थापनाचा खर्च १७.२८ लाख आहे. ६५ लाख रुपये इतकी रक्कम शिल्लक आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

८.४८ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गाच्या कल्याणासाठी कर्जे असताना ती इंदिरा आवास योजनेकडे प्रत्यार्पित करता येते काय ? अशी समितीने विचारणा केली असता ही रक्कम बांधकाम विभागाकडून वर्ग झालेली आहे ही रक्कम वसतिगृहाचे बांधकाम, सामाजिक न्याय भवनाचे बांधकाम, निवासी शाळांचे बांधकाम या कामांतून ही बचत झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

८.४९ मागासवर्गीय मुलांमुलींकरिता शासकीय वसतिगृहे बांधणे ही मागासवर्गीय विद्यार्थ्यांची महत्वाची गरज असतानाही एकूण रुपये ६५००.०० लक्ष अनुदानापैकी रुपये ६२८०.०० लक्ष रुपये शासनास समर्पित करण्याचे कारण काय ? याबाबत समितीस माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस असे विदित केले की, वसतिगृहांचे बांधकाम, निवासी शाळा, आंबेडकर भवन, आय.आय.टी.संस्थांचे बांधकाम अशी कामे होती. ही सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येतात त्या विभागाकडे निधी दिला होता, परंतु तो खर्च झाला नाही.

८.५० वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ यांना भागभांडवली अंशदान (आणि विशेष मागास प्रवर्गासाठी योजना) या अंतर्गत वित्त विभागाने ८० टक्के अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्याचे कारण काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता आर्थिक स्थितीनुसार वित्त विभागाने असा निर्णय घेतला होता वित्त विभागाने विभागांच्या खर्चाला कट लावली होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.५१ अनुसूचित जातीच्या एकूण १३ सूत गिरण्यांना २२७ कोटी रुपये कर्ज दिलेले आहे. वस्त्रोद्योग विभागाने २५५ कोटी रुपयांचे भाग भांडवल दिलेले आहे. लाभार्थ्याने पाच टक्के रक्कम स्वत: उभारावयाची आहे. ४५ टक्के रक्कम वस्त्रोद्योग विभागाने द्यायची आहे तर ५० टक्के कर्ज सूतगिरण्यांसाठी मिळणार आहे. १३ सूत गिरण्यांना २२७ कोटी ५१ लाख रुपये दिलेले आहेत तसेच नवीन सूत गिरण्यांना मान्यता दिलेली नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, विभागाने सूत गिरण्यांना अनुदान दिलेले नाही तर कर्ज दिलेले आहे. आपली कर्ज वसुल करण्याची काय पध्दत आहे ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, विभाग ९० टक्के कर्ज देतो सूत गिरण्यांना जम बसण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी देण्यात येतो व तीन वर्षानंतर वसुली सुरु होते.

८.५२ ४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च यामध्ये मूळ मागणी १,६६,६६७/- रुपयांची असून पुरक मागणी १०,८३,३३३/- इतक्या रुपयांची करण्यात

आली आहे. म्हणजे मूळ मागणीच्या ही रक्कम १० पट असून ही १०० टक्के रक्कम खर्च झालेली आहे. या संस्थांची सद्य:स्थिती काय आहे त्याबाबत समितीला माहिती देण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

८.५३ अनेक संस्थांकडून रकमेची मागणी करण्यात आली होती, यामध्ये औद्योगिक सहकारी संस्थांसाठी काही योजना होत्या, सन २००४ पासून या योजना कार्यरत आहेत. अनुदानासाठी या संस्थांकडून दरवर्षी अर्ज करण्यात येतो. संस्थांचे अर्ज आल्यानंतर योजनेसाठी तरतूद करण्यात येते संस्थेला सुरुवातीला ५ टक्के निधी देण्यात येतो २१२ संस्थांचे अर्ज प्रलंबित होते त्यामुळे त्यांना सन २००४ मध्ये अनुदान देण्यात आले आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

८.५४ ज्या अधिकाऱ्यांनी या सहकारी संस्थांचे अर्ज प्रलंबित ठेवले होते त्या अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात आली नाही. २१२ संस्थांना एकाच दिवशी अनुदान देण्यात आले आहे. इतक्या संस्थांना एकाच दिवशी अनुदानाची रक्कम कशी काय देण्यात आली आहे. ज्या संस्थांच्या नावाने अनुदान वाटप करण्यात आले त्यापैकी आठ-आठ संस्थांची तीच नावे आहेत. तरी देखील त्यांना अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. अनेक अपंग संस्थांचे अर्ज नसतांना त्यांना बोगस अनुदान देण्यात आले आहे. २००२ पूर्वीच्या अपंग संस्थांना अनुदान मिळत होते. एखाद्या संस्थेने जर सन २०१० मध्ये अर्ज केला तर त्या संस्थेला सहा महिन्यात अनुदान दिले जाणे अपेक्षित आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी या प्रकरणाबाबत बीएआरटीआय या संस्थेकडून चौकशी करण्यात आली असल्याचे सांगितले. तसेच दुसरा हप्ता वाटपाची नस्ती विभागाकडे आल्यानंतर त्या नस्तीवर मी समान पध्दतीने वाटप व्हावे असा शेरा लिहिलेला असून दुसऱ्या हप्त्याची रक्कम ५० टक्के देण्यात आली आहे. तिसऱ्या हप्त्याची रक्कम दिल्यानंतर या योजनेची कार्यवाही पूर्ण होणार आहे. तसेच अनुदानाचे वाटप समन्यायी पध्दतीने व्हावे असा शेरा नस्तीवर लिहिलेला असून ती नस्ती मा. मंत्री महोदयांकडे पाठविण्यात आलेली आहे.

८.५५ सन २००९-२०१० मध्ये एवढे अनुदान वाटप कसे काय झाले. अनुदान वाटपाचे काही निकष आहेत किंवा नाहीत ? निकषानुसार वाटप का करण्यात आले नाही. या योजनेचे अनुदान वाटप करतांना एक रुपयांची देखील बचत करण्यात आलेली नसल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता शासन निर्णयानुसार या रकमेचे वाटप एकाच वेळी करण्यात आले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.५६ एकाच वेळी एवढे अनुदान कसे काय देण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यातून अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांसाठी अर्ज येतात. त्यावेळी फक्त २१२ अर्ज आले होते की, त्यापेक्षा जास्त अर्ज आले होते. अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना नियम व निकषानुसार निधीचे वाटप केले तर आरोप होत नाहीत. कारण या संस्था जनहिताची कामे करीत असतात. यामध्ये औद्योगिक सहकारी संस्था, शेत मालावर प्रक्रिया

करणाऱ्या सहकारी संस्था आहेत. अशा प्रकारे कोणकोणत्या संस्था आहेत तसेच अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांबाबत अशी तरतूद आहे की, सहकारी संस्था सुरु झाल्यानंतर ७५ टक्के निधीचे वाटप करण्यात येते. परंतु यातील अनेक सहकारी संस्था सुरु झालेल्या नाहीत. अशा सुरु न झालेल्या सहकारी संस्था कोणत्या आहेत, त्या संस्थांची सद्य:स्थिती काय आहे, याची माहिती समितीला देण्यात यावी. त्याचप्रमाणे किती संस्था सुरु आहेत व किती संस्था बंद आहेत, याची देखील अद्ययावत माहिती देण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला.एकूण ३७२ संस्था आहेत, जिल्हा निहाय संस्थांची यादी खालीलप्रमाणे आहे :-

८.५७ मुंबई विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात १० संस्था आहेत, रत्नागिरी येथे ५ संस्था आहेत. नाशिक विभागात नाशिक येथे तीन संस्था आहेत, अहमदनगर येथे ८ संस्था आहेत. जळगांव येथे २ संस्था आहेत, धुळे येथे २ संस्था आहेत. पुणे विभागात पुणे येथे ५ संस्था आहेत, सातारा येथे १९ संस्था आहेत, सांगली येथे ८४ संस्था आहेत, सोलापूर येथे १८ संस्था आहेत, कोल्हापूर येथे ९५ संस्था आहेत. औरंगाबाद विभागात औरंगाबाद येथे २४ संस्था आहेत, जालना येथे ८ संस्था आहेत, परभणी येथे १६ संस्था आहेत, बीड येथे २१ संस्था आहेत, नांदेड येथे १६ संस्था आहेत, उस्मानाबाद येथे २१ संस्था आहेत, हिंगोली येथे ७ संस्था आहेत, लातूर येथे १४ संस्था आहेत. अमरावती विभागात अमरावती येथे ५ संस्था आहेत, यवतमाळ येथे ४ संस्था आहेत, वाशिम येथे ५ संस्था आहेत, अकोला येथे १ संस्था आहे, बुलढाणा येथे ५ संस्था आहेत. नागपूर विभागात भंडारा येथे ४ संस्था आहेत, नागपूर येथे ६ संस्था आहेत तर गडचिरोली येथे २ सहकारी संस्था आहेत, अशा प्रकारे संपूर्ण राज्यात अनुसूचित जमातीच्या ३७२ सहकारी संस्था आहेत. काही संस्थांना दुसऱ्या हप्त्याचे वाटप झाले आहे. त्यांनी पायाभूत सुविधा व बांधकामाची कामे सुरु केली आहेत ७० सोई त्यांनी केलेल्या आहेत. ३७२ संस्था पैकी ५८ संस्थाची उभारणी झाली आहे. २६५ संस्थाची कार्यवाही सुरु आहे. ४९ संस्थांबाबत कोर्टात केस दाखल आहे. ११२ संस्था अशा आहेत की, त्यांनी पहिला हप्ता घेतल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र दिले नाही. त्यामुळे त्यांना दुसऱ्या हप्त्याचे अनुदान वाटप करण्यात आले नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय दुसऱ्या हप्त्याच्या अनुदानास त्या संस्था पात्र होत नाहीत. या संस्थांची चौकशी करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या असून या सहकारी संस्थांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. कारणे दाखवा नोटीसा देऊन वसुलीच्या नोटीसा देण्यात येत असून त्या संस्थांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ११२ सहकारी संस्थांवर कारवाई करण्यासंदर्भात संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात आले आहे.

८.५८ बीड जिल्हा बँकेत घोटाळा झाला असून काही कोटी रुपये बुडाले आहेत. त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे या संस्थांमध्ये करोडो रुपयांचा घोटाळा झाला असल्यामुळे संबंधित सहकारी संस्थांवर तातडीने गुन्हा दाखल केला पाहिजे. असा गुन्हा दाखल का करण्यात आला नाही ? तसेच सन २००९-२०१० मध्ये या संस्थांना अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. अनुदान दिल्यानंतर त्यांनी किती दिवसात कामे करावीत याचे निकष काय आहेत अशी विचारणा समितीने केली. या अनुषंगाने विभागीय सचिव यांनी अशी माहिती दिली की, संबंधित सहकारी संस्थांवर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे तसेच या सहकारी संस्थांच्या कार्यपध्दतीचे निकष, नियम व अटी ठरविण्यात आले आहेत. सन २००९-१० मध्ये २१२ सहकारी संस्थांना अनुदान दिल्यानंतर काही संस्थांच्या बाबतीत तक्रारी आल्या होत्या. या संस्थांमध्ये बोगस प्रकार झाले आहेत, अशा तक्रारी आल्यामुळे या संस्थांची चौकशी बीएआरटीआयकडून करण्यात आली आहे. या संस्थांच्या नावे सातबारा चा उतारा नव्हता अनेक संस्थांना तांत्रिक मान्यता नव्हती. त्यामुळे काही संस्थांना बँकेकडून कर्ज मिळत नव्हते. अनेक संस्थांनी दुसऱ्या संस्थेच्या नावावर बँकेकडून कर्ज घेतले आहे. सन २००९-१० मध्ये ज्या संस्थांना पहिल्या हप्त्याचे अनुदान दिले त्या संस्थांकडे कागदपत्र नव्हती. काही संस्थांनी त्यांच्याकडील दुसऱ्या संस्थांच्या नावावर अनुदान घेतले आहे. अशा प्रकारे ११२ संस्था त्यामध्ये आहेत.

८.५९ बीड जिल्ह्यातील काही संस्थांनी अनुदान घेतले आहे. त्या संस्थेने फक्त शेड बांधले आहे. अनेक योजनांचा लाभ ही संस्था घेत असून तेच शेड नेहमी दाखविण्यात येते. त्यामुळे या संस्थेवर गुन्हा दाखल केला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता बीड जिल्ह्यातील नेकलूर येथील संस्थेची चौकशी सुरु असून सदर संस्थेची चौकशी करतांना लेखा परीक्षकांचा अहवाल तपासण्यात आला आहे. या संस्थेची चौकशी आयुक्तांमार्फत करण्यात येत असून अहवाल येण्यास उशीर झाला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.६० शासनाने ज्या योजना तयार केल्या आहेत त्या योजनांच्या माध्यमातून मागासवर्गीय लोकांचा विकास झाला पाहिजे. त्यांना प्रत्यक्षात लाभ मिळाला पाहिजे. समितीने सांगितल्याप्रमाणे एक संस्था खोटी कागदपत्रे देऊन ५,१० कोटी रुपये जर बोगस रित्या मिळवित असेल तर अशा सहकारी संस्थेची हिम्मत वाढत असून त्या संस्थेने आता १०० कोटी रुपये अनुदान मिळावे म्हणून अर्ज केला आहे. अशा प्रकारामुळे दिवसेंदिवस अशा सहकारी संस्थांची हिंमत वाढत जाते. एका बाजूला शासनाचा १०० टक्के पैसा खर्च होत असून मागासवर्गीय लोकांना त्यांचा शून्य फायदा होत आहे याबाबत विचार करणे गरजेचे आहे असे मत समितीने व्यक्त केले.

८.६१ सदर संस्थेवर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले असून पुन्हा स्मरणपत्र देण्यात आले आहे. समितीच्या भावना लक्षात घेऊन ही बाब मुख्य सचिवांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

८.६२ अपंग लोकांना मदत करावी, त्यांना तीन टक्के आरक्षण द्यावे असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिलेला आहे. आजपर्यंत अपंगांना किती निधीचे वाटप झाले, त्यांना किती टक्के आरक्षण देण्यात आले, यासंदर्भात जिल्हानिहाय माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले असता विभागाने माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

८.६३ सहकारी संस्थांना दुसरा हप्ता केव्हा द्यावयास हवा होता ? सन २००४-०५ ते २०१२-१३ पर्यंत अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अनुदानाचा हप्ता दिला होता. ज्या संस्थांनी निकषांची पूर्तता केली होती त्यांना दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ ला दुसरा हप्ता दिला असून अनुसूचित जातीच्या सर्व सहकारी संस्थांना एकाच वेळी मान्यता वा अनुदान दिलेले नाही. सन २००४-०५ मध्ये ९, २००५-०६ मध्ये ९, २००६-०७ मध्ये २२, २००७-०८ मध्ये ३६, २००८-०९ मध्ये २४, २००९-१० मध्ये २१२, २०१०-११ मध्ये ८४, २०११-१२ मध्ये २५ आणि २०१२-१३ मध्ये ३५ सहकारी संस्थांना अनुदान दिले. काही संस्थांना २००६-०७ पासून अनुदानाचा दुसरा हप्ता देण्यास सुरुवात केली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.६४ ज्या संस्थांना २००९-१० मध्ये अनुदानाचे वाटप केले त्या संस्थांना अनुदानाचा दुसरा हप्ता दिला आहे काय ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, २००९ पूर्वीच्या ज्या संस्था होत्या त्या संस्थांना अनुदानाचा दुसरा हप्ता दिला असून, तिसरा हप्ता दिलेला नाही. २००९-१० मध्ये एकूण ११ संस्थांना ११ कोटी ७४ लाख रुपये दिले आहेत तसेच सन २०१०-११ मध्ये या योजनेच्या शीर्षाखाली एकूण ८४ संस्थांना पहिल्या हप्त्यापोटी ६४ कोटी रुपये दिले आहेत ४ संस्थांना अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्यापोटी ५ कोटी ९० लाख रुपये दिले आहेत असेही सागितले.

८.६५ सन २०१०-११ या वर्षातील विनियोजन लेख्यामध्ये ४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च नावाचे लेखाशीर्ष आहे. यामध्ये "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च "शून्य" नमूद केला आहे याबाबत समितीने विचारणा केली असता मूळ तरतूद आणि पूरक मागणी धरुन तेवढाच खर्च झाला तर त्यामध्ये बचत झाली असे म्हणता येत नाही असा खुलासा महालेखाकार यांनी केला. समितीने अनुसूचित जाती प्रवर्गातील ज्या सहकारी संस्थांना अनुदान मंजूर केले किंवा अनुदानाचे हप्ते वितरित केले त्या बाबतची जिल्हानिहाय

माहिती समितीला द्यावी असे निदेश विभागास त्यानुसार विभागाकडून माहिती प्राप्त झाली असून ती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

८.६६ २००४-०५ पासून या योजनेंतर्गत सहकारी संस्थांना अनुदान देण्यास सुरुवात केली. या योजनेंतर्गत अनुदानाची रक्कम किती टप्प्यांत द्यावयाची होती ? सन २००४-०५ पासून आतापर्यंत १०० टक्के अनुदान दिलेल्या संस्था किती आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता उपलब्ध निधीनुसार अनुदानाची रक्कम दिली जाते तसेच ३७२ पैकी १३५ संस्थांना पूर्ण म्हणजेच एकूण भाग भांडवलाच्या ७० टक्के अनुदान दिले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

<u>अनुदान क्रमांक एन-४</u>

८.६७ अनुसूचित जातीच्या मुला-मुलींकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. या संस्था सुरु करण्यासाठी ४ कोटी ४१ लाख ४० हजार रुपये तरतूद केली होती आणि ५ कोटी ५८ लाख .६० हजार रुपये पूरक मागणी केली. अशा प्रकारे या योजनेवर एकूण १० कोटी रुपये एवढी मूळ तरतूद होती. त्यापैकी ७ कोटी २० लाख रुपये बीडीएसवर प्राप्त झाले. परंतु ती रक्कम अखर्चित राहिली व सर्व रक्कम समर्पित करावी लागली याचाच अर्थ या योजनेवरील खर्च 'शून्य' आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी हे खरे असून विभागीय स्तरावर अनुसूचित जातीच्या मुलां-मुलींकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधण्याचे ठरविले होते. परंतु त्यासाठी २००९-१० मध्ये जमीन उपलब्ध न झाल्यामुळे या योजनेवरील रक्कम खर्च होऊ शकली नाही. २००९-१० या वर्षात आय.टी.आय.च्या बांधकामासाठी तरतूद केलेले १० कोटी रुपये खर्च होऊ शकले नाही ही वस्तुस्थिती आहे. जमीन उपलब्ध झाल्यानंतर इमारतीचा आराखडा व रेखांकन सार्वजनिक बांधकाम विभागाने करायचे होते परंतु जमीनच उपलब्ध न झाल्यामुळे ते काम करता आले नाही.

८.६८ आय.टी.आय. उभारण्यासाठी जमीनच ताब्यात नव्हती तर त्या कामी पूरक मागणी करण्याचे कारण काय होते ? तसेच शासनाच्या मालकीच्या अनेक जागा असून पुणे येथील कोरेगाव पार्क येथे सुध्दा जागा आहे. समितीच्या सांगण्याचा हेतू एवढाच आहे की, शासनाकडे पुरेशी जागा उपलब्ध आहे परंतु त्यावर बांधकाम करण्याची अधिकाऱ्यांची इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे असल्याचे स्पष्ट मत समितीने व्यक्त केले. या अनुषंगाने खुलासा करताना विभागीय सचिव यांनी असे विदित केले की, विभागीय सचिव आता जे सांगत आहेत ती २००९-१० सालातील परिस्थिती होती. परंतु नंतरच्या कालावधीत त्या परिस्थितीत बदल झाला. ६ आय.टी.आय. पैकी ४ आय.टी.आय. ची बांधकामे पूर्ण केली आहेत. उर्वरित दोन आय.टी.आय. च्या

बांधकामासाठी पुण्यामध्ये जागा मिळू शकली नाही. आय.टी.आय. साठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेला विनंती केली आहे. मुंबई विभागात भिक्षेकरी गृहाच्या जागेवर बी.ओ.टी. तत्त्वावर आय.टी.आय. बांधण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विचाराधीन आहे. राज्य सरकारच्या अंदाजपत्रकात राज्य व केंद्र सरकारचे अनुदान धरुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्क आणि अन्य शुल्कापोटी किती रक्कम मिळते, ती कोणत्या प्रवर्गासाठी मिळते, आतापर्यंत किती रक्कम मिळाली, अद्याप किती रक्कम प्रलंबित आहे या बाबतची सविस्तर माहिती समितीला द्यावी असे निदेश समितीने विभागास दिले असता माहिती प्राप्त झाली असून ती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे. तसेच काही शैक्षणिक संस्थांनी बोगस मागासवर्गीय विद्यार्थी दाखवून शिष्यवृत्तीची रक्कम उचलल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. राज्यात बोगस मागासवर्गीय विद्यार्थी दाखवून शिष्यवृत्तीच्या नावाखाली लाखो रुपये उचलण्याचे प्रकार झालेले आहेत. ज्या शैक्षणिक संस्थांनी बोगस मागासवर्गीय विद्यार्थी दाखवून रक्कम उचलली आहे त्या संस्थांच्या बाबतीत करण्यात आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने काय कारवाई केली ? बीड जिल्ह्यातील एका शैक्षणिक संस्थेने बोगस विद्यार्थी दाखवून रक्कम उचलली आहे. त्या संस्थेविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यानंतर विभागाने त्या संस्थेची चौकशी करण्याचे मान्य केले होते. याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधी यांनी समितीस असे अवगत केले की, हे प्रकरण प्रादेशिक उपायुक्त, नाशिक यांच्याकडे चौकशीसाठी दिलेले आहे. त्यांच्याकडून चौकशीचा अहवाल आलेला नाही. एक महिन्यापूर्वी प्रादेशिक उपायुक्त चौकशी करण्यास गेले होते असे अशी माहिती आहे अहवाल अजून अप्राप्त आहे.

८.६९ वर्धा तसेच अन्य जिल्ह्यांतून देखील तक्रारी आलेल्या आहेत. अपंगाच्या १००३ शाळांपैकी १९२ शाळांना कोणत्या निकषानुसार परवानगी दिली ? १९२ शाळांना कोणत्या निकषानुसार परवानगी दिली तसेच अलीकडच्या काळात आश्रमशाळा बंद करुन त्या दुसऱ्यांना विकायच्या असे प्रकार सुरु आहेत यामध्ये विभागातील अधिकाऱ्यांचे संगनमत आहे. आतापर्यंत किती आश्रमशाळा बंद झाल्या आणि त्या कोणत्या संस्थांकडे हस्तांतरित करण्यात आल्या याची जिल्हानिहाय व संस्थानिहाय माहिती द्यावी असे समितीने विभागास निदेश दिले असता विभागीय सचिवांनी समितीस माहिती देण्याचे आश्वासित केले होते त्या अनुषंगाने माहिती प्राप्त झाली आहे ती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

८.७० समितीने अधिक माहिती घेण्याच्या दृष्टिने दिनांक २१ व २२ नोव्हेंबर, २०१३ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, नविन इमारत (कौन्सिल हॉल) पुणे येथे विभागीय सचिव/प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

८.७१ साक्षीच्या वेळी राज्याच्या अर्थसंकल्पात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागासाठी एकूण किती रकमेची तरतूद करण्यात आली आहे ? सदर तरतूद पुरेशी आहे काय ? या रकमेची एकूण टक्केवारी किती आहे अशी विचारणा समितीने केली. राज्याच्या अर्थसंकल्पात योजनेअंतर्गत ५०२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून योजनेत्तर तरतूद ३४०८ कोटी रुपयांची आहे. अशा प्रकारे एकूण ८४३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच या रकमेची टक्केवारी १०.२ इतकी येते. विशेष घटक योजनेअंतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात ही तरतूद करण्यात येते. सन २०११ च्या लोकसंख्येचा विचार करुन येणाऱ्या बजेटमध्ये तरतूद करण्यात येणार आहे. त्यामुळे या बजेटमध्ये या रकमेची टक्केवारी वाढणार आहे. विशेष घटक योजनेअंतर्गत जो निधी मिळतो तो विविध योजनांसाठी खर्च करण्यात येतो. इतर बजेटची रक्कम खर्च करण्याबाबत नियोजन विभागाच्या गाईडलाईन्स आहेत. या रकमेत १० टक्के वाढ सुचविण्यात यावी असे अभिप्रेत आहे. त्यामुळे मागील रकमेचा अनुशेष भरुन निघेल. मागील अनुशेष भरुन काढण्यासाठी पुरवणी मागणीव्दारे रकमेची मागणी करण्यात येते. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रमशाळांसाठी ११५४ कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर केली आहे असे ही समितीस अवगत केले.

८.७२ ८४३० कोटी रुपयांमध्ये केंद्र शासनाचा हिस्सा किती टक्के आहे या समितीच्या प्रश्नाला शिष्यवृत्तीच्या रकमेत केंद्र शासनाचा हिस्सा ४० टक्के आहे. विविध योजनांमध्ये केंद्र शासनाचा जो हिस्सा आहे, त्यामध्ये शिष्यवृत्तीच्या रकमेचा सर्वात जास्त हिस्सा आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

८४३० कोटी रुपयांचे विभागाचे बजेट आहे यामध्ये ५०:६०, ७०:३०, ८०:२० अशा योजना आहेत यातून देखील केंद्र शासनाचा निधी येतो परंतु शिष्यवृत्तीसाठी सर्वात जास्त निधी राज्य शासनाला मिळतो. ४३१ कोटी रुपयापेक्षा अधिक रक्कम शिष्यवृत्तीसाठी राज्य सरकारला मिळणार आहे तसेच राज्य शासनाला केंद्र शासनाकडून ६०० कोटी रुपये येणे अपेक्षित आहे असेही समितीस अवगत केले.

८.७३ शिष्यवृत्तीच्या रकमेची मागणी करण्यात आली ती पुरेशी आहे काय ? तसेच ओबीसी शिष्यवृत्तीचा विषय सभागृहात अनेक वेळा उपस्थित करण्यात आला आहे. गेल्या ११ वर्षापासून ओबीसीच्या शिष्यवृत्तीचा अनुशेष आहे यासाठी कोण जबाबदार आहे केंद्र सरकारकडून निधी आला नाही तर राज्य सरकार तो निधी देणार किंवा नाही ? याबाबत समितीने विचारणा केली असता ओबीसी शिष्यवृत्तीची ११५० कोटी रुपयांची तूट सन २००१ पासून आहे. केंद्र शासनाकडे या रकमेसाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच सन २००१-२००२ पासून ओबीसी शिष्यवृत्तीचा अनुशेष वेगळा करण्यात आला आहे. सन २००१-२००२ मध्ये केंद्र शासनाने शिष्यवृत्तीवर ७ कोटी १८ लाख रुपये खर्च केले आहेत. सन २००१-२००२ मध्ये राज्य शासनाकडून ४ कोटी ७५ लाख रुपये खर्च झाले आहेत. केंद्र शासनाकडून २ कोटी ४२ लाख रुपये ही रक्कम येणे होती.

२००१ मध्ये केंद्र शासनाकडून ४ कोटी ५२ लाख रुपये आल्यामुळे त्या वर्षातील २ कोटी १० लाख रुपये शिल्लक होते. त्यानंतर सन २००२-२००३ मध्ये ३ कोटी ७ लाख रुपये शिष्यवृत्तीवर खर्च करण्यात आले. राज्य शासनाची ४ कोटी ७५ लाख रुपयांची रक्कम व केंद्र शासनाकडील २ कोटी १० लाख रुपयांची शिल्लक रक्कम असल्यामुळे त्या वर्षात केंद्र शासनाकडून रक्कम येणे अपेक्षित नव्हते असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

८.७४ सन २००१-२००२ मध्ये ७ कोटी १८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली असून केंद्र शासनाचा हिस्सा त्यामध्ये होता. सन २००२-२००३ मध्ये ही रक्कम फक्त ३ कोटी इतकी कमी कशी काय झाली आहे ? त्या वर्षात विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली होती काय ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, या योजनेची सुरुवात झाली त्यावेळी ओबीसीसाठी केंद्र शासनाकडून शिष्यवृत्ती देण्यात सुरुवात झाली. त्या वर्षात राज्य शासनाचा भांडवली खर्च ४ कोटी ७५ लाख रुपये होता. त्या वर्षात केंद्र शासनाकडून येणे रक्कम अपेक्षित नव्हती. त्यानंतर सन २००३-२००४ मध्ये शिष्यवृत्तीसाठी ९२ कोटी १६ लाख रुपये खर्च झाले आहेत.

८.७५ ओबीसीसाठी शिष्यवृत्तीची योजना सुरु झाल्यानंतर त्या योजनेवर ३ ते ४ कोटी रुपये खर्च होतात आणि लगेच दुसऱ्याच वर्षी या योजनेवर ९२ कोटी रुपये खर्च करण्यात आले ही रक्कम एकदम वाढण्याची कारणे काय आहेत ? ९२ कोटी रुपये ज्या वर्षात खर्च केले त्या पूर्वी शिष्यवृत्तीचे एकूण किती विद्यार्थी होते. त्यानंतर किती विद्यार्थी वाढले आहेत. लाभार्थी विद्यार्थ्यांची एकूण संख्या सांगण्यात यावी. शिष्यवृत्तीची रक्कम एकदम ९२ कोटी रुपये होण्याची कारणे काय आहेत ? जिल्हा वाईज माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले असता विभागाने सीडीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

८.७६ या अनुषंगाने समितीने जिल्हानिहाय किती रक्कम खर्च करण्यात आली आहे. तीन कोटी रुपयांवरुन ९२ कोटी रुपये खर्च होण्याची कारणे काय आहेत. शिष्यवृत्तीच्या एकूण किती योजना आहेत. सामाजिक न्याय विभागाने ५० ते ६० योजना चांगल्या राबविल्या तर ५ हजार कोटी रुपये खर्च होतात. या विभागाचा प्लॅन आराखडा ३४०० कोटी रुपयांचा असताना २०० कोटी रुपये देखील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे एकूण केंद्र शासनाचा हिस्सा किती आहे. त्यामध्ये सामाजिक न्याय विभाग किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देते. वित्त विभागाने एकदम एवढी रक्कम कशी काय मंजूर केली आहे. एका वर्षात तीन कोटी व लगतच्या वर्षात ९२ कोटी रुपये कसे काय खर्च केले याबाबत वित्त विभागाने माहिती द्यावी असे निदेश

समितीने यावेळी वित्त विभागाला दिले असता सचिव, वित्त विभाग यांनी सामाजिक न्याय विभागाच्या मागणी प्रमाणे निधी वितरीत करण्यात आला आहे असे समितीस अवगत केले.

८.७७ तसेच सन २००४-२००५ ते सन २००८-२००९ मध्ये शिष्यवृत्तीवर अनुक्रमे १३५ कोटी, १८६ कोटी, १७१ कोटी, १३३ कोटी व २२४ कोटी रुपये खर्च झाला असल्याचे समितीस विदित केले. दुसऱ्या वर्षी या योजनेवर ९२ कोटी खर्च करण्यात आले, इतका खर्च वाढण्याची कारणे काय? या समितीने विचारलेल्या प्रश्नाला विभागाने पुढील प्रमाणे माहिती दिली.

८.७८ केंद्र शासनाचे सन २००१-२००२ या वर्षापासून इतर मागासवर्गीयांसाठी केंद्र पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची योजना लागु केलेली आहे. सन २००१-२००२ व २००२-२००३ या वर्षी राज्यामध्ये फक्त विजाभज व विशेष मागासप्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर केली जात होती. राज्यातील विजाभज, विमाप्र प्रवर्गाचा केंद्र सरकारच्या इमाव प्रवर्गात समावेश असल्याने सदर विजाभज, विमाप्र विद्यार्थ्यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडे करण्यात आलेली होती म्हणून त्या वर्षात लाभार्थी संख्या मर्यादित होती. शासन निर्णय दि.२९ मे २००३ अन्वये राज्यशासनाने इतर मागासवर्ग प्रवर्गासाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची योजना तसेच शासन निर्णय दि.६ ऑक्टोबर २००३ अन्वये शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजना सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून नव्याने लागू केलेली असल्यापासून सदर वर्षापासून विद्यार्थ्याच्या संख्येत मोठया प्रमाणावर वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे सन २००२-०३ या वर्षी खर्चापेक्षा सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील खर्चामध्ये लक्षणीय वाढ होऊन रु.९२१६.०० लक्ष इतका खर्च सदर योजनेवर करण्यात आलेला आहे. सन २००२-२००३ या वर्षी रु.३.०७ कोटी इतका खर्च झाला असून ८७९६ विद्यार्थ्याना व सन २००३-०४ या वर्षी रु.९२.१६ कोटी इतका खर्च झाला असून २६११०८ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला. लाभार्थी विद्यार्थ्यांच्या एकूण खर्चापोटी राज्याचा बांधील खर्च वजा जाता उर्वरित सर्व रक्कम केंद्राकडून मागणी करण्यात आलेली आहे. राज्याने दरवर्षी केलेला खर्च विचारात घेता केंद्राकडून प्राप्त होणारा निधी हा अत्यंत अपुरा मिळत असल्याकारणाने राज्य सरकारने राज्याचा बांधील खर्च करुनही दरवर्षी राज्याच्या निधीतून सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी ची रक्कम अतिरिक्त स्वरुपात खर्च केलेली आहे.

८.७९ दरवर्षी विद्यार्थ्यांची संख्या कमी न होता ती वाढत असते. विद्यार्थी संख्या दरवर्षी वाढत असताना काही वर्षात खर्च कमी कसा झाला ? सन २००४ पासून पुढील प्रत्येक वर्षात विद्यार्थी संख्या किती होती ? सन २००४ पासून सन २०१३ पर्यंत प्रत्येक वर्षाची लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या व शिष्यवृत्तीसाठी खर्च करण्यात आलेली रक्कम याबाबतची माहिती समितीला सादर करावी असे निदेश समितीने दिले असता विभागाने खालीलप्रमाणे माहिती दिली.

सन २००४-२००५ ते २०१२-२०१३ या कालावधीतील शिष्यवृत्ती वर केलेला खर्च व लाभार्थी संख्या

अ.क्र.	वर्ष	राज्य सरकार उत्पन्न मर्यादा रु.६५,२९०/- सन २००७-०८ पर्यंत, त्यानंतर सन २००८-०९ पासून रु.१.०० (लक्ष) नुसार		केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी असलेल्या रु.४४५००/- मर्यादेतील	
		मंजूर विद्यार्थी संख्या	खर्च	मंजूर विद्यार्थी संख्या	खर्च
१	२	३	४	५	६
१	२००४-०५	१८०८२.००	५१६६२९	३८७४७१	१३५६१
२	२००५-०६	२४९१८.०२	७११९४३	५३३९५७	१८६८८
३	२००६-०७	२२९०७.२९	६५४४९४	४९०८७०	१७१८०
४	२००७-०८	२६६६०.५३	७६१७२९	३८०८६४	१३३३०
५	२००८-०९	४४८८७.७६	१२८२५०७	६४१२५४	२२४४३
६	२००९-१०	५४९८६.३०	१५७१०३७	७८५५१९	२७४९३
७	२०१०-११	०.००	०	०	०
८	२०११-१२	२७५४४.२१	४०८२२०	११७४९६	१३७७२
९	२०१२-१३	३५४०३.९८	३३३२५३	१६६६२६	१७७०१
	एकूण	२५५३९०.०९	६२३९८१२	३५०४०५७	१४४१७२

८.८० सन २०१२-१३ या वर्षी या योजनेसाठी एकूण किती आर्थिक तरतूद होती याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला. सन २०१०-२०११ या वर्षी राज्य सरकारकडून निधी मिळाला नव्हता. सन २०११-२०१२ मध्ये १३७ कोटी रुपये आणि सन २०१२-२०१३ मध्ये १७७ कोटी रुपये मिळाले होते. या योजनेसाठी केंद्र सरकारच्या हिश्श्यासंबंधी केंद्र सरकारचे धोरण स्पष्ट करणाऱ्या परिच्छेदामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की,

"Funds-Limited" nature of the revised Scheme & Procedure for Capping.

Even under the existing PMS-OBC Scheme, due to budgetary constraint, in practice, it has not been possible for the Central Government to provide assistance for giving scholarship to all eligible students." हे त्यांनी मान्य केले आहे. म्हणजेच सर्व पात्र विद्यार्थ्यांना स्कॉलरिशप मिळेलच असे नाही.

८.८१ यामध्ये पुढे असे नमूद केले आहे की, "Therefore a notional allocation (NA) under the Scheme was being conveyed at the beginning of the financial year since२००८-०९ to States/UTs having OBC population," म्हणजेच त्यांच्याकडून नॅशनल ॲलॉकेशन केले जाते. उपलब्ध निधी प्रत्येक राज्याला वाटला जातो. त्यामुळे राज्याची गरज हा त्यांचा निकष नाही. पुढे असे नमूद केले आहे की, "in proportion to their total population as per census and they were being requested to send proposal within the National Allocation." म्हणजेच, नॅशनल ॲलॉकेशनशी स्टिकअप रहावे, असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. सन २००२-२००३ पासून सन २००५-२००६ पर्यंत केंद्र सरकारकडून निधी मिळालेला नाही. या अनुषंगाने समितीने पुढे विचारणा केली की, केंद्र शासनाच्या धोरणावरुन हे स्पष्ट होते की, या योजनेसाठी केंद्राकडे उपलब्ध होणारा निधी केंद्र सरकारकडून सर्व राज्यांना वाटला जातो. कोणतीही निश्चित टक्केवारी केंद्र सरकारने ठरविलेली नाही असे असेल तर या योजनेचे ११५० कोटी रुपये केंद्र सरकारकडून येणे आहेत, हे विभागाने कशाच्या आधारावर काढले आहे? यावर विभागाने कमिटेड लायबिलिटी काढली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.८२ या योजनेसाठी केंद्र सरकाने राज्य सरकारला निश्चित टक्केवारीनुसार निधी दिला पाहिजे असे केंद्राच्या धोरणात कोठेही अभिप्रेत नाही. कारण केंद्र सरकारने अशी टक्केवारी ठरवून दिलेली नाही. जर सुरुवातीलाच केंद्र सरकारने अशी काही कमिटमेंट केली नसेल तर कमिटेड लायबिलिटीचा प्रश्न उद्‌भवत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता केंद्र सरकारने या योजनेसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, असा राज्य सरकारचा आग्रह असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

८.८३ या चर्चेतून हे स्पष्ट होते की, केंद्र सरकारकडून ११५० कोटी रुपये येणे आहेत, हे विभागाचे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही. विभागाने त्यांच्या अपेक्षेनुसार काढलेल्या रकमेची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे, असे फारतर आपल्याला म्हणता येईल. परंतु विभागाने मागणी केलेली रक्कम देणे केंद्र सरकारवर बंधनकारक नाही. म्हणजेच केंद्र सरकारकडून निधी मिळाला नाही किंवा केंद्र सरकारकडून अमूक एवढ्या निधीचा अनुशेष आहे, असे विभागाने यापुढे म्हणू नये. केंद्र सरकारने निधी द्यावा,म्हणू शकतो. १८५० कोटी रुपये रकमेचा केंद्र सरकारकडे अनुशेष आहे, असे न म्हणता विभागाने तेवढ्या रकमेची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे, असे म्हणावे असे मत समितीने व्यक्त केले.

८.८४ सन २००४ पासूनची सर्व माहिती विभागाने समितीला सादर करावी. जेणेकरुन विद्यार्थी संख्या, खर्च करण्यात आलेली रक्कम व शिष्यवृत्तीपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या समितीच्या निदर्शनास येईल. या अनुषंगाने विभागाने पुढील माहिती समितीस सादर केली.

सन २०११-१२ व २०१२-१३ या कालावधीतील शिष्यवृत्तीपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	वर्ष	विद्यार्थी संख्या
१	२०१०-११ पर्यंत	१७८८०
२	२०११-१२	६५०६४
३	२०१२-१३	१६७८३०

८.८५ विभागाने सन २०११-१२ व २०१२-१३ ची दिलेली जिल्हानिहाय/प्रवर्गनिहाय माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

अनेक जिल्ह्यात इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांना गेल्या ३ वर्षाची शिष्यवृत्ती मिळालेली नाही. काही महाविद्यालयांना सन २०१२ पर्यंतची शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात आली आहे तर काही महाविद्यालयांना गेल्या ३ वर्षापासून रक्कम दिलेली नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे विभागाने माहिती देत असताना संपूर्ण राज्याची, जिल्हानिहाय व महाविद्यालय निहाय माहिती समितीला सादर करावी असे समितीने सांगितले असता विभागाने माहिती सीडी स्वरुपात उपलब्ध करून दिली आहे ती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

८.८६ शासनाने राज्यातील सर्व इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे जाहीर केले आहे. केंद्र सरकारकडे जेवढा निधी या योजनेसाठी उपलब्ध असतो, तेवढा सर्व राज्यांना वाटण्यात येतो. केंद्राचा हिस्सा म्हणून प्रत्येक वर्षी ठराविक रक्कम गृहित धरुन केंद्र सरकारकडून ती मिळणार आहे व त्या रकमेचा अनुशेष अमूक एवढा आहे, अशी माहिती विभागाने समितीस दिली आहे. वास्तविक पाहता, केंद्र सरकारच्या रकमेबाबत काहीही निश्चित आश्वासन दिलेले नाही, हे सचिवांनीच वाचून दाखविलेल्या केंद्र सरकारच्या धोरणावरुन स्पष्ट झाले आहे. असे असताना विभागाने केंद्राचा हिस्सा निश्चित करणे चुकीचे आहे. विभागाकडून दाखविण्यात येणारी अनुशेषातील रक्कम केंद्र सरकारकडून कधीही मिळणार नाही. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाकडून शिष्यवृत्तीची आकडेवारी फुगवून दाखविण्यात येत आहे असे समितीने मत व्यक्त केले तसेच सन २०१२-२०१३ या वर्षी किती विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीची मागणी केली आहे व उपलब्ध निधीनुसार किती विद्यार्थ्यांना विभाग शिष्यवृत्ती देऊ शकतो याबाबतची विचारणा केली असता या वर्षी ७,१५,३९२ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी नोंदणी केली आहे. अजूनही नोंदणीची प्रक्रिया सुरु असून ही संख्या ११ लाखापर्यंत जाईल, अशी अपेक्षा आहे. त्यानुसार विभागाने मागणी सादर केली आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम वेगवेगळी आहे. त्यासाठी राज्य सरकारने अभ्यासक्रमनिहाय 'A', 'B', 'C', 'D' असे ग्रुप तयार

केले असून वसतीगृहातील विद्यार्थी व वसतीगृहबाह्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम निश्चित केली आहे. 'A' ग्रुपमध्ये मेडिकल व इंजिनिअरिंगच्या ५ वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा समावेश असून त्यांना १९० ते ४२५ रुपये, 'B' ग्रुपमध्ये डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा समावेश असून त्यांना १९० ते २९० रुपये 'C' ग्रुपमध्ये डिग्री व पोस्टल ग्रॅज्युएशन, नर्सिंग व फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा समावेश असून त्यांना १९० ते २९० रुपये 'D' ग्रुपमध्ये आर्टस, कॉमर्स व सायन्स अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा समावेश असून त्यांना १९० ते २९० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

८.८७ शिष्यवृत्ती वाटपासाठी राज्य सरकारने निकष तयार केले आहेत. परंतु काही महाविद्यालयांना करोडो रुपये आणि काही महाविद्यालयांना लाखांच्या घरात शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यात आली आहे. त्यामुळे निश्चित केलेले निकष काय आहेत, याबाबतची माहिती समितीला अवगत करताना विभागीय प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, शिष्यवृत्तीसाठी साधारणपणे २४०० कोटी रुपये वार्षिक खर्च येतो. सुरुवातीला १२५ कोटी रुपये प्राप्त झाले होते. ८०० कोटी रुपये कमी पडत असल्यामुळे त्या रकमेची पुरवणी मागणी सादर केली आहे. दरवर्षी या योजनेसाठी पूर्ण तरतूद होत नाही. सुरुवातीला सन २००१-२००२ पासून केंद्र सरकारने ही योजना लागू केली होती व त्या वर्षी ७ कोटी रुपये राज्य सरकारला दिले होते. त्यानंतर केंद्र सरकारकडून आवश्यक तेवढा निधी मिळाला नाही. ही केंद्र पुरस्कृत योजना असली तरी त्यांच्या उत्पन्नाला मर्यादा आहेत. ही योजना सुरु करीत असताना केंद्र सरकारने लाभधारक विद्यार्थ्यांच्या पालकाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा प्रति वर्ष ४४ हजार रुपये निश्चित केली होती. मात्र नंतर राज्य सरकारने ही उत्पन्नाची मर्यादा वाढवून प्रति वर्ष १ लाख रुपये केली आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून निधीची गरजही वाढली आहे.

८.८८ उत्पन्नाची मर्यादा वाढविताना राज्य सरकारने केंद्र सरकारची अनुमती घेतली होती का ? राज्याने परस्पर मर्यादा वाढविल्यामुळे केंद्र सरकारने निधी दिला नसावा. पात्र विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे अनुशेष दिसून येत आहे असे मत समितीने व्यक्त केले.

८.८९ विभागाकडे उपलब्ध होणाऱ्या निधीतून ज्या महाविद्यालयांचा अनुशेष आहे, त्या महाविद्यालयांना अगोदर निधी वितरीत करावा, असे राज्य सरकारचे धोरण आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला तसेच शिष्यवृत्तीसाठी नोंदणी केल्यापासून ७० टक्के उपस्थिती असली पाहिजे असे शिष्यवृत्ती वितरीत करण्याचे निकष असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी सर्व निकष पूर्ण केलेले असताना महाविद्यालयांना निधी वितरीत केलेला नाही, याबाबतची तपासणी करण्यात येईल, तफावत असेल तर निधी देण्याचा विभागाकडून प्रयत्न केला जाईल असे आश्वासनही विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले. काही महाविद्यालयांना प्रत्येक वर्षी

कोट्यवधी रुपयांचा निधी देण्यात आला तर काही महाविद्यालयांना गेल्या ३ वर्षापासून निधी देण्यात आलेला नाही याबाबात समितीने विचारणा केली असता माहिती प्राप्त करुन घेऊ व तपासणी करु असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

८.९० राज्य सरकारकडे प्रत्येक जिल्ह्याची व महाविद्यालयाची शिष्यवृत्तीसाठी मागणी प्राप्त होत असते. उपलब्ध निधी प्रत्येक जिल्ह्याला व महाविद्यालयांना समान पध्दतीने वाटला गेला पाहिजे, अशी अपेक्षा आहे. त्याऐवजी जिल्हा, माणसांची नावे, चेहरे, जात, पक्ष बघून निधी वितरीत केला जाते का ? यासंदर्भात निधी वितरीत करण्याबाबतचे धोरण ठरविले नसावे किंवा ठरविले असेल तर त्या पध्दतीने निधी वितरीत केला जात नाही असे समितीचे म्हणणे आहे. समितीचे म्हणणे बरोबर आहे का, असेल तर तसे सांगावे किंवा नसेल तर त्याबाबतचा स्पष्ट खुलासा विभागाने करावा असे निदेश समितीने विभागास दिले असता शासनाकडून विभागाला निधी प्राप्त झाल्यानंतर विभागाकडून आयुक्तांना निधी वितरीत केला जातो. आयुक्तांकडून विभागीय स्तरावर निधी वितरीत केला जातो व तेथून तो वाटप केला जातो. याबाबत शासन स्तरावर धोरण ठरविलेले नाही. मात्र निधीची उपलब्धता कमी आहे, ही वस्तुस्थिती आहे. आयुक्तांच्या स्तरावर निधी ठेवला जातो व नोंदणी झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना निधी वितरीत केला जातो अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

८.९१ संपूर्ण राज्याची सन २०१२-२०१३ पर्यंतची जिल्हानिहाय व महाविद्यालयनिहाय पात्र विद्यार्थ्यांची संख्या व वाटप केलेला निधी, याबाबतची सविस्तर माहिती उद्यापर्यंत विभागाने समितीला सादर करावी. संपूर्ण राज्याची माहिती देणे शक्य नसेल तर बुलढाणा, पुणे, बीड, औरंगाबाद व अमरावती या जिल्ह्यांची माहिती सादर करावी व संपूर्ण राज्याची माहिती नंतर सादर करावी असे विभागाला निदेश दिले असता विभागाने खालीलप्रमाणे माहिती समितीस दिली.

८.९२ सन २००४-२००५ पासून सन २०१२-१३ या कालावधीत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती या योजनेची वर्षनिहाय व लेखाशिर्षानिहाय खर्च व लाभार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	**वर्ष**	**भासशि-लेखाशिर्ष खर्च (२२२५०४९५)**		**भासशि-लेखाशिर्ष खर्च (२२५०३५२) योजनेत्तर**		**एकूण खर्च २२२५०४९५+२२२५०३५२**	
		खर्च	**लाभार्थी**	**खर्च**	**लाभर्थी**	**खर्च**	**लाभार्थी**
१	२००४-२००५	८३५७.४५	२०७३०५	५४६१.४७	१११२१०	१३८१८.९२	३१८१५
२	२००५-०६	६८०४.०२	२१४६२४	५६६८.०६	११९८१४	१२४७२.०६	३३४४४१
३	२००६-०७	७८२५.६३	१३५०१६	५९३४.६०	११०८१६	१३७६०.२३	२४५८३२

४	२००७-०८	९१९४.७४	१९०५९८	६५५०.३५	१२९४५०	१५७४५.०९	३२००४८
५	२००८-०९	११०११.१५	१८५०११	१२१६२.००	२०२७२२	२३१७३.१५	३७७७२९
६	२००९-१०	४२५८७.७१	४८०००५	११४२७.६७	१६५२४०	५४०१५.३८	६४५२४५
७	२०१०-११	२६२३१.१४	१९९९७९	१९२९०.३५	२३२०९४	४५५२१.४९	४३२०७३
८	२०११-१२	४९६०१.११	३४२४८०	११८१५.७४	७४००५	६१४१६.८५	४१६४८५
९	२०१२-१३	६२९६८.६२	३८८७४५	१३२७९.६९	९४६४२	७६२४८.३१	४८३३८७

८.९३ सदर माहिती जिल्हानिहाय व महाविद्यालयनिहाय लाभार्थ्यांची संख्या व खर्चाची माहिती आयुक्तालयाचे पत्र क्र.७५ दिनांक ८/१/२०१४ नुसार प्रादेशिक उपायुक्त व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडून मागविण्यात आलेली आहे.

८.९४ सन २००९-२०१० व सन २०१०-२०११ मध्ये एकूण किती रकमेचे वाटप करण्यात आले आहे ? अशी समितीने विचारणा केली असता ओबीसी विद्यार्थ्यांना सन २०११-२०१२ मध्ये ४१५ कोटी १९ लाख रुपये वाटप करण्यात आले आहे. त्या वर्षात ३,४५,९९४ विद्यार्थी संख्या होती असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. जिल्हानिहाय माहिती उपलब्ध असायला पाहिजे होती. कारण काही जिल्ह्यामध्ये ४० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले असून काही ठिकाणी फक्त ५० लाख रुपये देण्यात आले आहेत. ही तफावत कशामुळे झाली आहे. सन २०१० मध्ये १४ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहेत. ही रक्कम कोणाकडून वाटप करण्यात आली आहे. समितीच्या माहितीप्रमाणे ही सर्व रक्कम कंत्राटदाराकडे जाते ही रक्कम विद्यार्थ्यांना मिळत नाही अशा तक्रारी आल्या आहेत. सन २०११-१२ मध्ये ३ लाख ७५ हजार रुपये वाटप करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सन २०१२-१३ मध्ये ११ लाख ४४ हजार विद्यार्थी संख्या होती. हे सर्व आकडे बरोबर आहेत काय ? अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आश्वासित केले तथापि माहिती अप्राप्त आहे. तसेच सामाजिक न्याय विभागाकडून आता ई-स्कॉलरशीप सुरु करण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागाने आता सर्व कामांसाठी ८०० कोटी रुपयांची पुरवणी मागणी वित्त विभागाकडे सादर केली असल्याचेही समितीस विदित केले.

८.९५ सामाजिक न्याय विभागाकडे १० विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळावी अशी मागणी केली आणि त्यातील फक्त ५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावयाची असेल तर त्यावेळी त्या ५ विद्यार्थ्यांची निवड कोणत्या पध्दतीने केली जाते यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करुन

नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केली आहे अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. अर्ज करण्यासाठी तारीख ठरवून देण्यात येते. मागील वर्षात ५ लाख २३ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिलेला आहे. मागील वर्षी जो अनुशेष शिल्लक आहे त्या विद्यार्थ्यांना प्रथम शिष्यवृत्ती देण्यात येते त्यानंतर इतर विद्यार्थ्यांचा विचार केला जातो.

८.९६ सर्व प्रक्रिया पूर्ण केलेली असताना देखील एका महाविद्यालयाला २५ लाख रुपये देण्यात येतात व दुसऱ्या महाविद्यालयासाठी फक्त ५० हजार रुपये देण्यात येतात. असे होत असल्यामुळे शिष्यवृत्तीच्या निधी वाटपाचे निकष काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली. या अनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस असे अवगत केले की, भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती ही योजना सन २०११-१२ पासून ऑनलाईन करण्यात आलेली आहे. सदरहू योजना केंद्र पुरस्कृत असून त्यामध्ये शिष्यवृत्ती वाटपाबाबत कोणतेही निकष नमूद नाहीत तथापि मागील वर्षाचे प्रलंबित अर्ज पुढील वर्षी प्रथम प्राधान्याने निकाली काढावेत असे अपेक्षित आहे. लोकलेखा समितीने उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने शिष्यवृत्तीच्या निधी वाटपाच्या निकषाबाबतच्या प्रस्तावावर शासनामार्फत कार्यवाही चालू आहे.

८.९७ सन २००९ पासून २०१३ या वर्षात कोणत्या जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना किती निधीचे वाटप करण्यात आले व किती निधी अद्याप द्यावयाचा शिल्लक आहे याबाबत बीड, अमरावती, नागपूर, पुणे व बुलढाणा या पाच जिल्ह्याची माहिती जिल्हानिहाय उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच विभागनिहाय कोणत्या योजना राबविण्यात आल्या त्याची माहिती देखील उपलब्ध करुन देण्यात यावी असे निदेश समितीने दिले. त्याअनुषंगाने सामाजिक न्याय विभागाच्या एकूण १५५ योजना आहेत त्या योजनांची माहिती पुस्तकात देण्यात आली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले. तसेच १५५ योजना चालू आहेत अनुसूचित जमातीसाठी ट्रेलर देण्याची योजना होती ती रिव्हाईज करण्यात आली आहे त्यामुळे बचत गटांना आता मिनी ट्रॅक्टर देण्यात येतो. अडचणीच्या काही योजना बंद करण्यात आल्या आहेत असेही समितीस अवगत केले.

८.९८ मागासवर्गीय मुलांसाठी सामाजिक न्याय विभागाच्या अनेक योजना आहेत. राज्याची लोकसंख्या व लाभार्थ्यांची संख्या, वैयक्तीक लाभाच्या योजना अशा अनेक योजना आहेत या योजनांवर ५० कोटी रुपये खर्च होतो असे गृहित धरले तर यातील ५० टक्के रकमेची तरतूद केंद्र शासन करीत असते. अशा सर्व योजनांची माहिती विभागाने खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

८.९९ मागासवर्गीय मुलांसाठी विविध लाभाच्या योजनांपैकी काही योजनांवर केंद्र शासनाकडून १००% व ५०% प्रमाणे रक्कमेची तरतूद शासन करीत आहे. त्या योजना खालीलप्रमाणे.

१	(०४) (१६) भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्या-अनुसूचित जाती	१००% (२२२५-०४९-५)
२	(०४) (१६) भारत सरकारच्या मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्या-इतर मागासवर्ग	१००% (२२२५-३१४-४)
३	(०१)(१२)अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या मुलांसाठी शालांत पूर्व परिक्षा शिष्यवृत्तीसाठी केंद्रीय अनुदान	५०% (२२२५-३०३-७)
४	(०३)(०३) नागरी हक्क अधिनियम अंमलबजावणी करीता यंत्रणा	५०% (२२२५-०१७-२)
५	(०२)(०४) अत्याचाराचे बळी ठरणाऱ्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या कुटूंबातील सदस्यांना आर्थिक सहाय्य देण्याची योजना	५०% (२२२५-२४५-१)
६	(०१)(१५) मागासवर्गीय मुलामुलीसाठी वसतिगृह बांधकामासाठी केंद्रीय अनुदान	५० % (२२२५-३७९-९)
७	(०१)(१२) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण केंपुयो १०० टक्के (विशेष केंद्र सहाय्य योजना)	१००% (२२२५-सी-६५८)

८.१०० सामाजिक न्याय विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मूल्यमापन करण्यात येते काय ? या समितीचा प्रश्नाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था या संस्थेमार्फत चार योजनांचे मूल्यमापन करण्यात येत आहे. यामध्ये रमाई आवास योजना, विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क शिष्यवृत्ती योजना, औद्योगिक सहकारी संस्थांना कर्ज वाटप करणे. या योजनांचे मूल्यमापन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे यशदा संस्थेमार्फत १२ योजनांचे मूल्यमापन करण्यात येत आहे. यामध्ये "Assistamce to BPL families to bring them above BPL level", इंदिरा आवास योजना, संजय गांधी निराधार योजना या योजनांचे मूल्यमापन करण्याचे काम गेल्यावर्षी देण्यात आले आहे. त्यामुळे या योजनांचे मूल्यमापन करण्याचे काम सुरु आहे. १७ योजनांमध्ये शिष्यवृत्ती योजनेचे मूल्यमापन करण्याचे काम पहिल्यांदा देण्यात आले असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

८.१०१ लाभार्थ्यांच्या निवडीसाठी केंद्र सरकारने उत्पन्नाची मर्यादा ४४ हजार रुपये केली होती. राज्य सरकारने उत्पन्नाची मर्यादा १ लाख रुपये केल्यामुळे लाभार्थ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांना फायदा मिळत नाही. उत्पन्नाची मर्यादा वाढविताना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या बाबी शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयास पाहिजेत. कारण प्रत्येक लाभार्थ्याला त्याचा वाटा मिळाला पाहिजे. उत्पन्नाची मर्यादा ४४ हजार रुपयांवरुन एक लाख रुपये केल्यामुळे लाभार्थ्यांची संख्या वाढली त्यामुळे शिष्यवृत्तीचे पैसे देण्यास सरकारकडे निधी नाही, त्यामुळे शिष्यवृत्तीचे वाटप वेळेवर होत नाही. निधी उपलब्ध होत नसल्यामुळे अंमलबजावणी होत नाही. योजनांची अंमलबजावणी कशी होते याचे मूल्यमापन करण्यासाठी डॉ.बाबासाहेब

आंबडेकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेला ते काम देण्यात आले आहे. या संस्थेतील मुख्य वन संरक्षक येथे माहिती देण्यासाठी उपस्थित आहेत. याबाबत समितीला ते माहिती देतील. या अगोदर त्यांनी जात पडताळणी समितीवर अत्यंत उत्कृष्ठ काम केले आहे. ग्रामपंचायती निवडणूका असतील किंवा कोणत्याही निवडणूकांच्या अगोदर त्यांनी जात प्रमाणपत्राची वैधता तपासून दिलेली आहे. खूप मोठ्या संख्येने त्यांनी हे काम केले आहे अशी माहिती समितीने विभागास दिली.

८.१०२ जात पडताळणी संदर्भात समितीस माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, जात पडताळणी समितीकडे अर्ज केल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र उमेदवारांना लवकर मिळत नव्हते. यामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करुन समितीकडे अर्ज केल्यानंतर १५ दिवसात जात वैधता प्रमाणपत्र उमेदवारांना घरपोच दिले आहेत. शासनाचे काम सीआर आणि जीआर नुसार चालते जात पडताळणी बाबत एक विशेष मोहिम राबविली होती. विशेष मोहिमेअंतर्गत ६ लाख ६० हजार ते ७ लाख ५० हजार जात पडताळणीची प्रकरणे निकाली काढली आहेत. यापूर्वी फक्त १५ समित्यांच्या माध्यमातून महिन्यामध्ये २५० प्रकरणांचा निपटारा होत होता. आता १५ समित्यांमधून ७ लाख हजार प्रकरणांचा निपटारा होतो. आता एका आठवड्यात जात वैधता प्रमाणपत्राचा निपटारा केला जातो. यासाठी अत्यंत सुरळीत प्रक्रिया करण्यात आली आहे. ६ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र मिळावे अशी शासनाची भुमिका आहे.

८.१०३ सामाजिक न्याय विभागाचा अखत्यारित १५५ विविधा योजना आहेत. या योजनांचे मूल्यमापन व्हावयास पाहिजे. समितीला असे वाटते की, विविध योजना असून त्यांचा फायदा लाभार्थ्यांना होत नाही. यातील काही योजनांचे मूल्यमापन करण्याचे काम आपण ज्या संस्थेत कार्यरत आहे त्या संस्थेकडे दिले आहे. यासंदर्भातील अहवाल तयार झाला नसेल तरी देखील त्या संदर्भातील काही माहिती समितीला द्यावी असे समितीने सांगितले असता या योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची गरज भासणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले.

८.१०४ संजय गांधी निराधार योजनेच्या अर्जदारास हयात असल्याबाबतचे आमदारांनी दिलेले प्रमाणपत्र पूर्वी ग्राह्य धरले जात होते. आता शासनाने अशा सूचना काढल्या आहेत की, स्थानिक मुख्याध्यापक किंवा तलाठी यांचे प्रमाणपत्र ग्राह्य धरावे. तलाठी व मुख्याध्यापक यांचे असे म्हणणे आहे की, हे आमचे काम नाही. आमदारांना त्यांच्या भागातील माहिती असते. लाभार्थी सक्षम त्यांच्याकडे येतात व प्रमाणपत्र घेऊन जातात. यामध्ये कोणतीही अडचण नव्हती. त्यामुळे अशा प्रकारच्या सूचना विभागाने कोणत्या आधारावर काढल्या, पूर्वीच्या निकषात बदल का करण्यात आला, याबाबतची माहिती समितीला सादर करण्याबाबत सांगितले असता विभागाने पुढील खुलासा केला.

लाभार्थ्याने शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एसएलएस १०८०/७२५४/आयएनडी-२, दिनांक २० सप्टेंबर, १९८० यामध्ये नमूद केल्याप्रमाणे एखाद्या सक्षम अधिकाऱ्यांकडून म्हणजे लोकसभा/राज्यसभा संस्था, विधानसभा/विधानपरिषद सदस्य, जिल्हापरिषदेचे पदाधिकारी सदस्य, पंचायत समितीचे अध्यक्ष व सदस्य, महानगरपालिका/नगरपालिका यांचे पदाधिकारी यांच्याकडून घेतलेले हयातीचे प्रमाणपत्र वर्षातून एकदा सादर करावे लागेल.

८.१०५ निराधारांच्या मासिक लाभांच्या योजनेच्या शासन निर्णयाचे निरिक्षण केले असता २००४ च्या शासन निर्णयानुसार पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमीत झाले आहेत असे नमूद केले आहे.

वरील शासन निर्णयानंतर दिनांक ३० सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयामध्ये १ एप्रिल, २००९ पासून लाभार्थ्याचे मासिक वेतन बँकेच्या किंवा पोष्टाच्या खात्यामधूनच देण्यात यावे, असे केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सक्तीचे करण्यात आले.

८.१०६ सद्यस्थितीत शासन निर्णय दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० च्या पृ.२५ वरील विवरणपत्र ९ मध्ये लाभार्थ्यांनी तहसिलदार/नायब तहसिलदार यांच्यासमोर उपस्थित राहून हयातीचे प्रमाणपत्र घ्यावे असे नमूद केले आहे. लाभार्थ्यांची तपासणी करण्याच्या हेतूने असे नमूद केल्याचे दिसते.

८.१०७ राज्य सरकारच्या अनेक योजनांबाबत स्थानिक नगरसेवकांचे प्रमाणपत्र आणण्याविषयीची अट घालण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी आमदारांचे ओळखपत्र चालत नाही. यामध्ये सुधारणा करुन आमदार व खासदार यांचाही समावेश केला पाहिजे अशी सूचना समितीने केली असता या संबंधात धारिका सादर करण्यात आली असल्याचे समितीस अवगत केले.

८.१०८ सामाजिक न्याय विभागाच्या आयुक्त कार्यालयांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांची किती पदे मंजूर आहेत, मंजूर पदांपैकी किती पदे भरण्यात आली आहेत व रिक्त पदे किती आहेत ? यासंदर्भात माहिती मागितली असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, सरळसेवेची ३७०४ व पदोन्नतीची १०६४ मिळून एकूण ४७६८ पदे मंजूर आहेत. यापैकी सरळसेवेची २८३३ व पदोन्नतीची ६९५ मिळून ३५२८ पदे भरली आहेत. सरळसेवेच्या ८७२ व पदोन्नतीच्या ३६८ अशा १२४० पदांचा अनुशेष आहे. 'अ' गटाच्या पदांची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून केली जाते. आयोगाने भरती प्रक्रिया पूर्ण केली होती. तथापि, सर्व्हर नादुरुस्त झाल्यामुळे सर्व माहिती नष्ट झाली. आता आयोगाला पुन्हा प्रक्रिया करावी लागणार आहे. यामध्ये सरळसेवेतील 'अ' गटाची १७ 'ब' गटाची ४६ पदे आहेत. 'क' गटातील ४६४ व 'ड' गटातील ३४५ पदांची भरती प्रक्रिया सुरु आहे. आयुक्त, सामाजिक न्याय यांच्या अंतर्गत कार्यालयामध्ये रिक्त असलेल्या १२४० पदे भरण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती पुढील प्रमाणे सादर केली.

८.१०९ दिनांक २१ नोव्हेंबर, २०१३ नंतर गट क व ड या गटातील सरळसेवेने उमेदवारांची नियुक्तीचे आदेश खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात आलेले आहेत.

१)	गृहपाल	-	३७
२)	वरिष्ठ लिपिक	-	६
३)	सहा.ग्रथपाल	-	४४
४)	कनिष्ठ लिपिक	-	१
५)	स.क.नि.	-	२
६)	सहाय्यक शिक्षक	-	१२६
७)	मुख्याध्यापक	-	२७
८)	शिपाई	-	४
९)	व.स.क.नि. (पदोन्नतीने नियुक्ती)	-	२
१०)	जनसंपर्क अधिकारी	-	४
	एकूण	-	**२५३**

८.११० वरीलप्रमाणे पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच प्रयोगशाळा सहाय्यक या पदासाठी दिनांक ५/१/२०१४ रोजी १०० पदांसाठी ऑनलाईन लेखापरिक्षा घेण्यात आल्या आहेत. उर्वरित रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २८/२/२०१३ अन्वये मंजूर पदाच्या प्रतिवर्ष कमाल ३% इतक्या मर्यादेपर्यंतच रिक्त पदे भरता येत असल्याने, ३% प्रमाणे सरळसेवेने पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. ज्या संवर्गात मंजूर पदसंख्येनुसार सरळसेवा कोट्यात येणारी पदे ३५ व त्यापेक्षा कमी आहेत. त्या संवर्गातील सर्व रिक्त पदे भरण्यासाठीची प्रक्रिया सुरु आहे.

८.१११ अत्यावश्यक पदे (गृहपाल व समाज कल्याण निरिक्षक) यांची रिक्त असलेली सर्व पदे भरण्यासाठी मा.प्रधान सचिव, सेवा यांची मंजूरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. सर्व संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे त्या-त्या संवर्गातील पात्र कर्मचाऱ्यांमधून भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सन २००८ ला नव्याने प्रस्तावित केलेल्या घरकुल योजनेचा शासन निर्णय शासनाने नोव्हेंबर, २००८ मध्ये निर्गमित केला आहे. ही योजना नवीन असताना त्यासाठी मूळ तरतूद का करण्यात आली, या योजनेवर मागील दोन वर्ष प्रत्येक वर्षात तरतूद किती केली व किती खर्च झाला ? अशी विचारणा समितीने केली

असता घरकुल योजनेमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द यांचा समावेश आहे. ही योजना सामाजिक न्याय विभागाकडून राबविली जाते. रमाई आवास योजना दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ रोजी मंजूर झाली. मार्च, २०१० पासून शासनाने या संदर्भातील सर्व निर्णय घेतले. पूर्वी घरांची किंमत ७० हजार निश्चित केली होती, आता ती ग्रामीण भागात १ लाख रुपये, नगरपालिका क्षेत्रात १ लाख ५० हजार रुपये आणि महानगरपालिका क्षेत्रात २ लाख रुपये करण्यात आली आहे. सन २००८-२००९ पासून आजपर्यंत या योजनेतून १ लाख ५० हजार घरे पूर्ण झाली असून १ लाख ७ हजार घरे प्रगतीपथावर आहेत. या योजनेसाठी ४ लाख ५० हजारपर्यंत अर्ज प्राप्त झाले होते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

८.११२ शासनाने १,१७,०८५ उद्दिष्ट ठेवले होते व १ लाख साध्य झाले आहे. उद्दिष्ट पूर्ण का झाले नाही ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, लक्षांक ठरविला असला तरी उपलब्ध निधीनुसार वाटप केले जाते. शहरी भागामध्ये ही योजना राबविण्यामध्ये काही अडचणी आहेत. या संदर्भातील निकष निश्चित केलेले आहेत. लाभार्थी बीपीएल यादीमधील व अनुसूचित जमाती किंवा नवबौध्द प्रवर्गातील असला पाहिजे, अशी अट आहे. पुणे विभागात सन २००८-०९ ते २०१०-२०११ व सन २०१२-२०१३ मध्ये उद्दिष्ट शून्य ठेवले आहे. उद्दिष्ट ठरविल्यानंतर काही अडचणी आल्या आणि उद्दिष्ट साध्य झाले नाही तर आपण समजू शकतो. पण या ठिकाणी उद्दिष्टच शून्य ठरविले आहे याचे कारण काय आहे ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी पुढील माहिती समितीस दिली.

८.११३ पुणे विभागत सन २००८-०९ ते २०१२-१३ मध्ये खालीलप्रमाणे जिल्हानिहाय उद्दिष्टे देण्यात आलेली आहेत.

अ.क्र.	**जिल्हा**	**वर्ष**	**उद्दिष्टे**		**शेरा**
			ग्रामीण	**शहरी**	
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**
१	**पुणे**	२००८-०९ ते २०१०-११	२४५३	२३४१	
		२०११-१२	४३१	७०००	
		२०१२-१३	०	७००	
२	**सातारा**	२००८-०९ ते २०१०-११	२६५९	६५७	
		२०११-१२	२५५	३२५	
		२०१२-१३	३०००	१५०	

३	**सांगली**	२००८-०९ ते २०१०-११	२३६३	११४८	
		२०११-१२	३५०	११७४	
		२०१२-१३	९००	१०००	
४	**कोल्हापूर**	२००८-०९ ते २०१०-११	१९५७	५३९	
		२०११-१२	१४००	९५९	
		२०१२-१३	१३००	५००	
५	**सोलापूर**	२००८-०९ ते २०१०-११	६८९९	३१८५	
		२०११-१२	४१५०	६३५०	
		२०१२-१३	०	६०५०	
		एकूण पुणे विभाग	**२८१४७**	**३२०७८**	

टिप :-

८.११४ ग्रामीण भागासाठी सन २०१०-११ व २०११-१२ या वर्षासाठी पुणे जिल्हा अंतर्गत २४५३ व ४३१ घरकुलाचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले होते. परंतु दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी शिल्लक नसल्याने प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्रमांक ४१५९, दिनांक १/१२/२००९ अन्वये खालीलप्रमाणे धनादेश परत करण्यात आले आहेत.

अ.क्र.	**धनादेश क्रमांक**	**दिनांक**	**रक्कम रुपये**
१	**२**	**३**	**४**
१	९६९२७६	६/८/२०११	१,५०,५०,०००/-
२	९२००३३	११/७/२०११	४,२९,२८,०००/-
३	०६६९४०	२०/९/२०११	१,५१,२०,०००/-
	एकूण रक्कम रुपये		**७,३०,९८,०००/-**

८.११५ प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे यांचे आदेश क्रमांक ४७५, दिनांक २८/०२/२०११ नुसार अखर्चित रक्कम रुपये ८,४१,२३,०००/- धनादेश क्रमांक ३१५१८६, दिनांक २८/०२/२०११ अन्वये धनादेश परत करण्यात आले आहेत.

८.११६ सबब, केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी केंद्र शासन व ग्रामविकास जलसंधारण यांचेकडून होत असल्याने त्यांच्याकडील प्रतिक्षा यादीमधील स्वत:ची जागा असलेल्या पात्र लाभार्थी शिल्लक नसल्याने उद्दिष्ट पूर्ण करण्यास अडचणी असून दारिद्र्यरेषेखालील बेघर प्रतिक्षा यादीतील लाभार्थी शिल्लक नसल्याने वरीलप्रमाणे रक्कमा आयुक्तालयास परत करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे पुणे जिल्ह्यासाठी सन २०१२-१३ साठी उद्दिष्ट शून्य ठेवण्यात आलेले आहे.

८.११७ उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने अशी पृच्छा केली की, बीपीएलची अट या योजनेसाठी नाही एपीएलमधील अर्जदारदेखील पात्र ठरू शकतात फक्त ते अनुसूचित जाती व नवबौध्द या प्रवर्गातील असले पाहिजेत, अशी अट आहे. रत्नागिरी जिल्ह्याची माहिती पुढीलप्रमाणे दिलेली आहे. सन २००८-२००९ ते सन २०१०-२०११ या वर्षासाठी उद्दिष्ट ९५४, साध्य ९५४, तरतूद ५००.८५ लक्ष, खर्च ००.००, शिल्लक ००.००, पूर्ण घरे ०, अपूर्ण घरे ०. ही माहिती पूर्णपणे विसंगत आहे. जर खर्च ००.०० असेल तर शिल्लक रक्कम ५००.८५ एवढी असावयास हवी. त्याचप्रमाणे पूर्ण घरे ० असतील तर अपूर्ण घरे ० येऊच शकत नाहीत. याबाबत खुलासा करावा असे निदेश समितीने विभागास दिले. यासंदर्भात विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सुरुवातीला बीपीएल ची अट नव्हती नंतर ही अट घालण्यात आली. तसेच रत्नागिरी जिल्ह्याची माहिती खालीलप्रमाणे नमूद केली.

अ.क्र.	**जिल्हा**	**वर्ष**	**उद्दिष्टे**		**पूर्ण घरे**	**अपूर्ण घरे**
			ग्रामीण	**शहरी**		
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**०**
१	रत्नागिरी	२००८-०९ ते २०१०-११	९५४	१४७	०	०

टिप :-

८.११८ घरकुल योजनेची अंमलबजावणी करणेसाठी रक्कम रुपये ५००.८५ लक्ष उपलब्ध करुन देण्यात आली होती. परंतु इंदिरा आवास योजनेंतर्गत १०९५ प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांना लाभ देणार असल्यामुळे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील दारिद्र्य रेषेखालील पात्र लाभार्थी मिळत नसल्याने प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रत्नागिरी यांचे पत्र क्रमांक २६९, दिनांक २/०२/२०११ अन्वये रक्कम

रुपये ५००.८५ लक्ष इतक्या रक्कमेचा धनादेश आयुक्तालयास परत पाठविण्यात आलेला आहे. त्यामुळे पूर्ण घरे शून्य व अपूर्ण घरे शुन्य दर्शविण्यात आली आहेत.

८.११९ योजना सुरु झाल्यानंतर बीपीएलची अट नव्हती. ती नंतर घालण्यात आली आहे, अशी माहिती विभागीय अधिकाऱ्यांनी दिली. याबाबत शासनाने काही परिपत्रक, शासन निर्णय काढला आहे का, असल्यास, त्याची माहिती समितीला द्यावी असे समितीने सांगितले असता या योजनेची अंमलबजावणी प्रत्यक्षात सन २००९-१० मध्ये झाली व त्यावेळी बीपीएलची अट घालण्यात आली तसेच यासंदर्भात सन २००९-२०१० मध्ये परिपत्रक काढण्यात आले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.१२० रमाई आवास योजना ही पंचायत समितीच्या माध्यमातून राबविली जाते. पंचायत समिती स्तरावर वारंवार विचारणा करुन देखील निकषांबाबतची माहिती मिळत नाही. प्रत्यक्षात लाभार्थ्यांची निवड करीत असताना कोणतेही निकष पाळले जात नाहीत. या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला आहे. अंमलबजावणी यंत्रणा पंचायत समिती असल्यामुळे त्याचा संबंध ग्रामविकास विभागाशी येतो. सामाजिक न्याय विभागाने निधी वितरीत केला की, त्या विभागाचा या योजनेशी असलेला संबंध संपतो का ? अशी विचारणा समितीने केली तसेच ही योजना राबवित असताना पंचायत समिती स्तरावर अनेक गैरप्रकार झाले आहेत. केवळ निधी वितरणापर्यंत सामाजिक न्याय विभागाचा संबंध असतो. लाभार्थ्यांची निवड पंचायत समितीमार्फत करण्यात येते. परंतु, त्या ठिकाणी कोणतेही निकष पाळले जात नाहीत. जर सामाजिक न्याय विभागाचा संबंध नसेल तर या ठिकाणी जी लेखी विवरणपत्रे या विभागाने सादर केली आहेत, ती कोणत्या आधारावर सादर केली आहेत ? अशी ही समितीने विचारणा केली असता डीआरडीए कडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विवरणपत्रे तयार केली आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. काही जिल्ह्यात एक रुपया देखील खर्च झालेला नाही. तर काही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रक्कम खर्च झाली आहे. ज्या जिल्ह्यात रक्कम खर्च झाली नाही ती अखर्चित रक्कम डीआडीएकडे जमा आहे असेही विभागीय सचिवांनी सांगितले.

८.१२१ सामाजिक न्याय विभागाने केवळ निधी वितरीत करुन चालणार नाही तर निकषाप्रमाणे लाभार्थ्यांची निवड पंचायत समिती स्तरावर केली जाते आहे किंवा नाही, वितरीत केलेली रक्कम जिल्ह्याकडून खर्च केली जात आहे किंवा नाही, अखर्चित रकमेबाबतची कारणे काय आहेत ? याबाबतची माहिती विभागीय सचिवांनी पुढीलप्रमाणे नमूद केली .

८.१२२ घरकुल योजनेअंतर्गत ग्रामीण क्षेत्रासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नगरपरिषद/नगरपालिकासाठी जिल्हाधिकारी तथा मुख्य

अधिकारी, नगरपरिषद/नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रासाठी आयुक्त महानगरपालिका/मुख्य अभियंता, मनपा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीमार्फत सदरहू योजना राबविण्यात येत आहे.

८.१२३ शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१० मधील अ.क्र.१८ लाभार्थ्यांची निवड करणे यामध्ये इंदिरा आवास योजना या धर्तीवर घरकुल योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या ठिकाणावरील सदर शासन निर्णयातील अ.क्र.३ मध्ये लाभार्थ्यास शासनाचा एकाच योजनेचा लाभ देवून सदर लाभार्थ्यांसाठी त्याच गावी/नगरपरिषद आणि महानगरपालिका येथे योजना राबवावी. तसेच लाभार्थ्यांची निवड करताना मुद्दा क्र.९ मधील व्यक्तींना प्राधान्य देण्यात यावे. तसेच अटी बंधनकारक राहील.

अ) ज्या व्यक्तीकडे स्वतःची जमीन/भूखंड आहे अशा व्यक्तींना प्रथम टप्यात लाभ देण्यात यावा. लाभ देताना सदर शासननिर्णयातील परिच्छेद ९ प्रमाणे प्राधान्य क्षेत्रातील व्यक्तींचा प्रथम विचार करण्यात यावा.

ब) ज्या व्यक्तींकडे स्वतःची जमीन/भूखंड नाही अशा ग्रामीण भागातील व्यक्तींसाठी ग्रामपंचायत यांनी जमीन उपलब्ध करुन द्यावी अशी जमिन उपलब्ध झाल्यानंतर घर बांधण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

क) नगरपरिषद/महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षीत जागेवर वसलेल्या झोपडपट्टयांमधील व्यक्तींची नावे दिनांक १/१/१९९५ च्या मतदार यादीत आहेत. अशा व्यक्ती संरक्षण पात्र समजून आहे. त्याच जागेवर घर बांधण्यास मंजूरी देण्यात यावी. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पू.) अधिनियम १९७१ मधील कलम ३ झेड पाच नुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सक्षम प्राधिकाऱ्याकडून घोषित करण्यात आलेल्या झोपडपट्टीमधील संरक्षण पात्र व्यक्तींना घरे बांधण्यास परवानगी देण्यात यावी.

८.१२४ शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१० मधील अ.क्र.१३ केंद्रस्थ अधिकारी सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना आपले दैनंदिन काम सांभाळून योजना राबविण्यासाठी "केंद्रस्थ अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच केंद्रस्थ अधिकारी यांना मार्गदर्शन करणे व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे काम प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांनी पर्यवेक्षकीय केंद्रस्थ म्हणून घोषित करण्यात आले आहे.

शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१० मधील अ.क्र.१४ घरकूल निर्माण समिती

अ.क्र.	क्षेत्र	घरकूल निर्माण समिती	पद
अ	**ग्रामीण**	मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.	अध्यक्ष
		प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए	सदस्य
		कार्यकारी अभियंता, जि.प. (सा.बा.वि.)	सदस्य

		प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास वि.	सदस्य
		सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण	सदस्य सचिव
ब	**नगर परिषद**	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
		अतिरिक्त जिल्हाधिकारी	सदस्य
		तहसिलदार, वर्ग-१	सदस्य
		संबंधित रचनाकार	सदस्य
		मुख्याधिकारी, नगरपरिषद	सदस्य
		प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास वि.	सदस्य
		सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण	सदस्य सचिव
क	**महानगरपालिका**	आयुक्त, महानगरपानिका/मु.अ.मनपा	अध्यक्ष
		उपसंचालक, नगररचना	सदस्य
		प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग	सदस्य
		प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास वि.	सदस्य
		सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण	सदस्य सचिव

८.१२५ शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१० मधील अ.क्र.१५ घरकूल निर्माण समितीचे अधिकार

१) समिती दर महिन्याला किमान एकदा घरकूल योजनेचा आढावा घेवून योजनेची अंमलबजावणी सुलभ रितीने होण्याच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन करेल.

२) सदस्य सचिवांकडून घरकूल योजनेच्या अनुषंगाने सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावांवर/अहवालांवर निर्णय घेईल व त्या अनुषंगाने निकषानुसार लाभार्थ्यांची निवड करेल.

३) लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर द्यावयाचे अनुदान घरकूल निर्माण समितीचे सदस्य सचिव यांच्या मान्यतेने व स्वाक्षरीने वितरीत करण्यात येईल.

४) घरकूल निर्माण समिती महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.) व पुर्नविकास अधिनियम १९७१ मधील कलम ३ झेड ७ व ३ व ४) मधील तरतूदीचा वापर करुन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सहमतीने वेळोवेळी योग्य तो निर्णय घेईल.

ग्रामीण क्षेत्रामध्ये सदरहू योजना प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेकडून राबविली जात आहे. परंतु शहरी भागात लाभार्थ्याकडे स्वतःची जागा नसणे, शासकीय जागेवर अतिक्रमण

करणे, दारिद्र्य रेषेखालील कार्ड नसणे, इंदिरा आवास योजनेमधून लाभ घेतलेला असल्यामुळे तसेच शासन निर्णयातील अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्यामुळे शहरी क्षेत्रामध्ये अखर्चीत रक्कम शिल्लक आहे.

८.१२६ जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांना रमाई आवास योजनेंतर्गत पंचायत समितीनिहाय दरमहा खर्चाचा व घरकुल प्रगती अहवाल याचा आढावा घेवून दरमहा आयुक्तालयास अहवाल सादर करणेबाबत आयुक्तालयाचे परिपत्रक जा.क्र.१६ दि.२/०१/२०१४ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

८.१२७ विभागाने बीड जिल्ह्याची माहिती दिली आहे त्यानुसार सन २००८-२००९ ते सन २०१०-२०११ या कालावधी मंजूर झालेली सर्वच्या सर्व ३३६६ घरे अपूर्ण आहेत व रक्कम पूर्णपणे खर्च झाली आहे.सन २०१२-१३ मध्ये बीड जिल्हा ग्रामीण भागासाठी रमाई आवास (घरकूल) योजनेचे उद्दिष्ट ४००० घरांचे होते. निवड केलेले लाभार्थी शून्य दर्शविण्यात आले आहेत. मंजूर तरतूद १७५० लाख रुपये असून झालेला खर्च १७५० लाख रुपेय दर्शविण्यात आला आहे. शिल्लक रक्कम शून्य असून पूर्ण घरे ८९० झाली आहेत. अपूर्ण घरांची संख्या १५५५ दर्शविण्यात आली आहे. लाभार्थी शून्य असताना हा पैसा कोठे खर्च केला आहे ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी पुढील माहिती दिली.

८.१२८ सन २०१२-१३ मध्ये बीड जिल्ह्यासाठी ग्रामीण क्षेत्रासाठी उद्दिष्ट ४००० होते. निवड केलेले लाभार्थी ४००० होते. त्यापैकी २३२१ घरकुले पूर्ण झाली आहेत आणि १६७९ घरकूले प्रगतीपथावर आहेत. बीड जिल्ह्यास रक्कम रुपये १७५०.०० लक्ष वितरीत करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	**जिल्हा**	**वर्ष**	**घरकुले बांधकाम सद्यस्थिती**	
			पूर्ण घरकुले	**प्रगतीपथावरील घरकुले**
१	**२**	**३**	**४**	**५**
१	**बीड**	२०१२-१३	२३२१	१६७९

रमाई आवास (घरकूल) योजना-**भौतिक प्रगती** (माहे ऑक्टोबर, २०१३)

अ.क्र.	प्रकार	ग्रामीण	शहरी	एकूण
	वर्ष	२०१० ते २०१३	२०१०-२०१३	
१	मंजूर घरकूले	१९९२०२	२१००५	२२०२०७
२	पूर्ण घरकूले	१३४९७४	५३७२	१४०३४६
३	प्रगतीपथावरील घरकूले	५४३८२	८५२९	६२९११

रमाई आवास (घरकूल) योजना-**आर्थिक प्रगती** (माहे ऑक्टोबर, २०१३) (रु.लाखात)

अ.क्र.	प्रकार	ग्रामीण	शहरी	एकूण
	वर्ष	२०१० ते २०१३	२०१०-२०१३	
१	मंजूर तरतूद	१६२८४६.८४	६९०४०.५३	२३१८८७.३७
२	झालेला खर्च	१२५७४९.१७	१५१७९.००	१४०९२८.१७
३	शिल्लक निधी	२६६४३.२९	४७८४०.२६	७४४८३.५५

८.१२९ समितीने पुढे अशी विचारणा केली की, सामाजिक न्याय विभागामार्फत ग्रामीण भागातील रायगड, बीड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथे शून्य लाभार्थी दर्शविण्यात आले आहेत. सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी निधीची तरतूद भरपूर आहे. ती तरतूद खर्च करण्यात आली नाही तर तो पैसा विभागाकडे ठेवता येतो काय ? या समितीच्या प्रश्नाला विभागीय प्रतिनिधींनी त्या वर्षातील तरतूद त्याच वर्षात खर्च केली पाहिजे असा नियम असल्याचे सांगितले व खाली नमूद केल्याप्रमाणे विवरणपत्र सादर केले.

अ.क्र.	जिल्हा	वर्ष	उद्दिष्टे			
			ग्रामीण	पूर्ण घरकुले	प्रगती पथावरील घरकूले	अखर्चीत निधी
१	२	३	४	५	६	७
१	**रायगड**	२००८-०९ ते २०१०-११	३६	३६	०	०
		२०११-१२	३६	१८	१८	०
		२०१२-१३	५००	०	५००	०

२	**बीड**	२००८-०९ ते २०१०-११	३३६६	३३६६	०	०
		२०११-१२	१२८१२	४४६६	५१३४	
		२०१२-१३	४०००	२३२१	१६७९	
३	**रत्नागिरी**	२००८-०९ ते २०१०-११	९५४	०	०	०
		२०११-१२	९५४	०	०	०
		२०१२-१३	०	०	०	०
४	**सिंधुदुर्ग**	२००८-०९ ते २०१०-११	१५२	०	०	०
		२०११-१२	१५२	०	०	०
		२०१२-१३	१०००	२२७	२७२	

८.१३०	**रायगड**	जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रायगड यांचे पत्र क्र.८९२, दिनांक ३१/३/२०१३ अन्वये रककम १,७५,००,०००/- व पत्र क्र.९१२, दिनांक ३०/३/२०१३ रक्कम रु.७,००,०००/- असे एकूण मिळून रुपये १,८२,००,०००/- आयुक्तालयास परत करण्यात आले.
	बीड	निरंक
	रत्नागिरी	घरकूल योजनेची अंमलबजावणी करणेसाठी रक्कम रुपये ५००.८५ लक्ष उपलब्ध करुन देण्यात आली होती. पंरतु इंदिरा आवास योजनेंतर्गत १०९५ प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांना लाभ देणार असल्यामुळे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील दारिद्र्यरेषेखालील पात्र लाभार्थी मिळत नसल्याने प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रत्नागिरी यांचे पत्र क्रमांक २६९, दिनांक २/२/२०११ अन्वये रक्कम रुपये ५००.८५ लक्ष इतक्या रकमेचा धनादेश आयुक्तालयास परत पाठविण्यात आलेला आहे. त्यामुळे पूर्ण घरे शून्य व अपुर्ण घरे शून्य दर्शविण्यात आली आहेत.
	सिंधुदुर्ग	जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांचे पत्र क्र.२६५७, दिनांक २/१२/२०१० अन्वये सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने त्यांना लाभ देता आलेला नाही.

८.१३१ सबब, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१०/प्र.क्र.१८३/मावक-२, दिनांक ३१ मार्च, २०१० अन्वये आयुक्तालय स्तरावर घरकूल योजनेसाठी स्वीय प्रपंची लेखा (पी.एल.ए.) खात्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार सदरहू योजनेअंतर्गत प्राप्त झालेली

तरतूद/निधी जमा करण्यास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार सदरची तरतूद खात्याकडे न ठेवता स्वीय प्रपंची लेखा खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे. शासन निर्णय दिनांक १४ मार्च, २०११ अन्वये आयुक्त समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांना असलेल्या अधिकारानुसार सदर शिल्लक निधी इतर जिल्ह्यातील उर्वरीत पात्र लाभार्थ्यांसाठी वळता करुन देण्याचे तसेच लाभार्थी उद्दिष्ट निश्चित करुन इतरत्र जिल्ह्यात त्यांच्या मागणी नुसार निधी वर्ग केला जातो.

८.१३२ रमाई आवास योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यासाठी सन २०१२-१३ मध्ये मंजूर तरतूद १७५० लाख रुपये असून तेवढीच रक्कम खर्च झालेली आहे. यामध्ये ८९० घरे पूर्ण झाली असून १५५५ घरे अपूर्ण दर्शविण्यात आली आहेत. ही आकडेवारी बरोबर आहे काय ? तसेच सन २००८-२००९ मध्ये बीड जिल्ह्यासाठी रमाई आवास योजनेचे उद्दिष्टे ३६३६ दर्शविण्यात आले असून निवड केलेले लाभार्थी ३६३६, यासाठी मंजूर तरतूद २३५६ लाख रुपये व खर्च झालेली तरतूद २३५६ लाख रुपये यामध्ये पूर्ण घरे शून्य दर्शविण्यात आली असून ३६३६ घरे अपूर्ण दर्शविण्यात आली आहेत. बीड जिल्ह्यात सन २००८-०९, २०१०-११, २०११-१२ व २०१२-१३ या सर्व वर्षामध्ये अशाच प्रकारची आकडेवारी दर्शविण्यात आली आहे. या तीन वर्षातील एकूण घरांचे उद्दिष्टे १८८७८, साध्य केलेले उद्दिष्ट १८८७८, मंजूर तरतूद १०७८९ लाख रुपये, झालेला खर्च ६६५४ लाख रुपये, शिल्लक तरतूद ४१३४ लाख रुपये एकूण पूर्ण घरे ६८५२ व अपूर्ण घरे ८५३१ अशी आकडेवारी दर्शविण्यात आली आहे. ही आकडेवारी बरोबर आहे काय ? या संदर्भातील सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी पुढील माहिती दिली.

अ.क्र.	**प्रकार**	**ग्रामीण**	**शहरी**	**एकूण**
	वर्ष	**२०१०-२०१३**	**२०१०-२०१३**	
१	मंजूर घरकूले	१९९२०२	२१००५	**२२०२०७**
२	मंजूर तरतूद (लाखात)	१६२८४६.८४	६९०४०.५३	२३१८८७.३७
३	झालेला खर्च (लाखात)	१२५७४९.१७	१५१७९.००	१४०९२८.१७
४	पूर्ण घरे	१३४९७४	५३७२	१४०३४६
५	प्रगतीपथावरील घरकूले	५४३८२	८५२९	६२९११

८.१३३ विभागाने दिलेल्या स्पष्टिकरण ज्ञापनात शहरी भागासाठी रमाई आवास योजनेचा तक्ता दिलेला आहे. त्यामध्ये पुणे विभागातील पुणे महानगरपालिकेसाठी २९६२ लाख रुपये खर्च करण्यात आले

आहेत. एका घरासाठी दोन लाख रुपये देण्यात येतात. त्यानुसार १४८१ घरे बांधून पूर्ण व्हावयास पाहिजेत. यामध्ये पूर्ण घरांची संख्या ९३ दर्शविण्यात आली असून ६६६ घरे अपूर्ण आहेत. २९ कोटी ६२ लाख रुपये खर्च झाले आहेत. याबाबत समितीस माहिती द्यावी असे सांगितले.

८.१३४ रमाई आवास योजनेअंतर्गत प्रत्येक घरासाठी दोन लाख रुपये देण्यात येत असून त्यापेक्षा अधिक खर्च करायचा असेल तर तो लाभार्थ्याला करावा लागतो. तसेच हा खर्च ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात झालेला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले. तसेच पुणे विभागातील सर्व महानगरपालिकांमध्ये रमाई आवास योजना लागू असल्याचेही समितीस अवगत केले. घरकुल योजनेनुसार राज्यामध्ये एकूण किती घरे पूर्ण करण्यात आली आहेत. यामध्ये जनतेचा सहभाग किती आहे. २०१२-१३ व २०१३-१४ ची माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांना पुढील खुलासा केला :

८.१३५ रमाई आवास योजनेनुसार राज्यामध्ये ऑक्टोबर, २०१३ अखेरपर्यंत १,५०,८०७ घरे पूर्ण झाली आहेत. यामध्ये ग्रामीण भागात १,३९,०९४ घरे असून शहरी भागात फक्त ११,७१३ घरे पूर्ण झाली आहेत. त्याचप्रमाणे अपूर्ण व प्रगती पथावरील घरांची संख्या ग्रामीण भागात ८४,६५६ असून शहरी भागात २३,००९ इतकी आहे.

८.१३६ या घरांसाठी २ लाख रुपये खर्च होतात किंवा नाही याची तपासणी करण्याची यंत्रणा विभागाकडे आहे काय ? तसेच रमाई आवास योजनेच्या संदर्भात जी आकडेवारी दिली आहे त्यामध्ये तफावत आहे, या योजनेचे ऑडिट करण्यात येते किंवा नाही ? सन २०१३-१४ मध्ये या योजनेसाठी किती तरतूद करण्यात आली आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता घरांसाठी २ लाख रुपये खर्च होतात किंवा नाही याची ग्रामीण भागात जिल्हापरिषद व पंचायत समितीमार्फत घरांची पाहणी करण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच सन २०१३-१४ मध्ये ३०० कोटी रुपयांची तरतूद ग्रामीण भागासाठी असून २० कोटी रुपयांची तरतूद शहरी भागातील रमाई आवास योजनेसाठी करण्यात आली आहे. यामध्ये २४० कोटी रुपये ग्रामीण भागासाठी प्राप्त झाले असून शहरी भागासाठी १६ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. रमाई आवास योजनेला शहरी भागात प्रतिसाद नाही ही वस्तुस्थिती आहे. याचे कारण असे की, लाभार्थ्याच्या नावे जागा नसल्यामुळे अडचण निर्माण होते. त्याचप्रमाणे शहरी भागासाठी केंद्र सरकारच्या विविध योजना आहेत, जेएनएनयुआरएम व बीएसयुपी या योजनांमुळे जवळपास सर्वच महानगरपालिकांमध्ये घरकुलांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निकाली निघाला आहे. नगरपालिका परिसरात आयएचडीपी योजना आहे. या योजना आकर्षित आहेत त्यामुळे रमाई आवास योजनेला शहरी भागात प्रतिसाद नाही. मुंबई शहराचा विचार केला तर तेथे एसआरए योजना आहे. मुंबईतील एका झोपडीची किंमत एक कोटी रुपये आहे. त्यामुळे विकासकाकडून झोपड्यांची

खरेदी केली जाते व त्या बदल्यात त्यांना घरे दिली जातात. त्यामुळे रमाई आवास योजनेच्या दोन लाख रुपयांकडे शहरी भागातील लोक आकर्षित होत नाहीत असेही समितीस अवगत केले.

८.१३७ शहरी भागात जागा उपलब्ध होत नसल्यामुळे अडचणी आहेत, मुंबई व पुणे अशा मोठ्या शहरात म्हाडाची घरे आहेत. शहरी भागात वेगवेगळ्या गृहनिर्माण योजना आहेत. लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात आल्यानंतर त्या सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळाला किंवा नाही याकडे विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे तसेच पात्र लाभार्थ्यांची निवड केल्यानंतर त्यांना दोन लाख रुपये मंजूर केले जातात. परंतु या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित होते किंवा नाही याकडे विभाग लक्ष देत नाही. बऱ्याच वेळा निधी नसल्यामुळे ही योजना वेळेत पूर्ण केली जात नाही असे मत समितीने व्यक्त केले असता रमाई आवास योजनेची घरे पूर्ण करण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. नगरपालिकेमध्ये आयएचडीपी योजनेतून घरे दिली जातात. शहरी भागातील घरांच्या योजना म्हाडाकडे आहेत. यानुसार ही कामे करण्यात येत आहेत. आयएचएसडीपी हा शब्द वगळून सुरुवातीला एसआरपी झाला व त्यानंतर एसआरए झाला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.१३८ सन १९९० मध्ये वाल्मीकी योजना होती. शहरातील झोपडपट्टीची उंची वाढवून ती १४ फुट करण्यात आल्यामुळे अनेक लाभार्थ्यांनी घरे बांधली आहेत. शहरी भागात दोन लाख रुपयांत घर बांधून होत नाही. शहरातील झोपडपट्टयांना अशा योजनांमध्ये समाविष्ट करुन घेतले पाहिजे तसेच एसआरए योजना शहरात राबविली जाते. खाजगी विकासक झोपडपट्टीची जागा घेतात व तेथे एसआरएची इमारत तयार करतात. शासनाने एसआरए योजनेसाठी वेगळी जमीन उपलब्ध करुन दिली पाहिजे, याबाबत शासनाने काळजी घेणे आवश्यक आहे व एमएमआरडीए मार्फत मुंबई शहरात भाडेपट्टयावर घरे उपलब्ध करुन दिली जात आहेत. पुणे, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सोलापूर या शहरातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून त्या ठिकाणीही झोपडपट्टया झाल्या आहेत. याच योजनेतून सांगली येथे ५० हजार झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले असून मिरज-इचलकरंजी नगरपालिका झोपडीमुक्त झाली आहे. याच पध्दतीने अन्य शहरात देखील या योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव विभागाने केला पाहिजे असे मत यावेळी समितीने व्यक्त केले.

८.१३९ या योजनेच्या एका निकषानुसार लाभधारकाची स्वतःची जागा असली पाहिजे. शासकीय अथवा खाजगी जमिनींवर झोपड्या बांधल्या जात असतात. त्यामुळे या योजनेचा लाभ झोपडीधारकास देता येत नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. स्वतःची जागा असणे, हा पात्रतेचा निकष आहे घोषित

झोपडपट्टीचा उल्लेख यामध्ये नाही या योजनेतून ज्यांना घरे बांधावयाची आहेत, त्यांनी जागा स्वतःची असल्याबाबतचा पुरावा दिला पाहिजे अशी माहितीही विभागीय सचिवांनी समितीस दिली.

८.१४० या योजनेचे निकष काय आहेत, याबाबतची लेखी माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना वितरीत करावी. तसेच तोंडी माहिती देखील सांगावी असे निदेश समितीने विभागीय सचिवांनी दिले. या अनुषंगाने विभागीय सचिवांनी पुढील असा खुलासा केला की,लाभार्थी अनुसूचित जातीचा असावा, त्याचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य १५ वर्षे असावे, अर्जदाराचे कौटुंबीक वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागात १ लाख, नगरपालिका क्षेत्रात १ लाख ५० हजार आणि महानरगपालिका क्षेत्रात २ लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे, शक्यतो लाभार्थ्यांची स्वतःची जागा असावी, असे निकष आहेत. या ठिकाणी 'शक्यतो' असा शब्दप्रयोग असला तरी पात्रतेमध्ये स्वतःची जागा आवश्यक आहे. यामध्ये असेही नमूद केले आहे की, " स्वतःचे कच्चे घर असलेल्या ठिकाणी घर बांधून देण्यात यावे, सदर योजनेचा लाभ कुटूंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल, जमीन कमी उपलब्ध असेल तर सर्व पात्र इच्छुक मिळून ग्रुप हाऊसिंग करता येणे शक्य आहे, शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा."

८.१४१ विभागीय सचिवांनी उपरोक्त जे निकष वाचून दाखविले आहेत, त्याचा सकारात्मक दृष्टीने अर्थ लावला तर घोषित झोपडपट्टीत व्यक्तीस या योजनेचा लाभ आपल्याला देता येईल. कारण, यामध्ये शक्यतो असा शब्दप्रयोग केला आहे. पुढे स्वतःचे कच्चे घर असलेल्या ठिकाणी घर बांधून देण्यात यावे, जमीन कमी उपलब्ध असेल तर सर्व पात्र इच्छुक मिळून ग्रुप हाऊसिंग करता येणे शक्य आहे, असेही नमूद केले आहे. याचाच अर्थ, घोषित झोपडपट्टीमध्ये संबंधित झोपडी त्या व्यक्तीची असते व तो लाभधारक असतो. झोपडीची जागा कमी असल्यामुळे त्या ठिकाणी आपल्याला ग्रुप हाऊसिंग करुन देता येऊ शकेल असे मत समितीने व्यक्त केले. त्यावर विभागीय सचिवांनी विदित केले की,महानगरपालिका क्षेत्रात इतर पॅरलल आवास योजना असल्यामुळे या योजनेला कमी प्रतिसाद मिळतो.

८.१४२ शासन निर्णय, शासनाचे आदेश, परिपत्रक, निकष निश्चित करीत असताना त्याची वाक्यरचना अचूक असणे गरजेचे आहे. एका शब्दातून अनेक अर्थ निघणारी वाक्यरचना टाळली गेली पाहिजे अशी सूचना समितीने केली तसेच या निकषात वापरण्यात आलेला 'शक्यतो' हा शब्द व्हेग आहे. त्यामुळे निर्णय घेण्याचे अधिकार स्थानिक अधिकाऱ्यांना मिळतात असे ही समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले. ही योजना शहरातील झोपडीधारकांसाठी देखील लागू करावी, अशा प्रकारची शिफारस शासनाला करावी असे समितीने सुचित केले असता रमाई आवास योजनेमध्ये शहरी भागातील झोपडपट्टी धारकांनाही सामिल करण्यासंदर्भात शासनाची पुढीलप्रमाणे भुमिका असल्याचे विशद केले.

८.१४३ सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२, दिनांक ९ मार्च, २०१० मधील मुद्दा क्र.१८ (क) व (ड) नुसार नगरपरिषद/महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षीत जागेवर वसलेल्या झोपडपट्टया मधील व्यक्तींची नावे दिनांक १-१-१९९५ च्या मतदार यादीत आहेत अशा व्यक्ती संरक्षण पात्र समजून आहे. त्याच जागेवर घर बांधण्यास मंजूरी तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पु.) अधिनियम १९७५ मधील कलम ३ झेड ५ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याकडून घोषित करण्यात आलेल्या झोपडपट्टीमधील संरक्षण पात्र व्यक्तींना घरे बांधण्यास परवानगी देण्यात येते. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात, पुणे महानगरपालिका क्षेत्रात १२ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे असेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

८.१४४ घरकुल योजनेमध्ये काही गृहोपयोगी सामान खरेदी करण्यात आले आहे का या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, घरकुल योजनेमध्ये काही गृहोपयोगी सामान खरेदी करण्यात आले असून ब्लँकेट आणि सतरंज्या खरेदी केल्या आहेत. एका घरकूलास २ ब्लँकेट व २ सतरंज्या देय आहेत. काम पूर्ण झालेल्या घरकुलांसाठी निकषानुसार लागणाऱ्या ब्लँकेट व सतरंज्यांची खरेदी करण्यात आली आहे का, त्यापेक्षा जास्त संख्येने ही खरेदी झाली आहे का, सर्व घरकुलांना पुरवठा करण्यात आला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाकडून पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

८.१४५ रमाई आवास घरकूल योजनेंतर्गत ग्रामीण क्षेत्रासाठी मूळ उद्दिष्ट १९०१०९ व नगरपालिका नगरपरिषदेसाठी मूळ उद्दिष्ट ५८७५३ असे एकूण मिळून २४८८६२ या मूळ उद्दिष्टानुसार ९,९५,४४८ इतके ब्लँकेट व सतरंजी (लोकरी चादर) पुरवठा करणे आवश्यक होते. पूर्ण झालेल्या घरकुलांसाठी व प्रगतीपथावरील म्हणजेच बांधकाम सुरु असलेल्या घरकुलासाठी ब्लँकेट व सतरंजी (लोकरी चादर) ९,०४,६६८ चा संबंधित जिल्ह्यांना पुरवठा करण्यात आला असून माहे ऑक्टोबर, २०१३ अखेर त्यापैकी लाभार्थ्यांना ५,१२,९१० ब्लँकेट व सतरंजी (लोकरी चादर) वाटप करण्यात आलेले आहे. जस-जसे लाभार्थी निवड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नगरपरिषद/नगरपालिका, महानगरपालिका करतील त्यानुसार वाटप केले जाईल.

८.१४६ समितीने पुढे अशी विचारणा केली की, १,५०,८०७ घरकुले पूर्ण झाली आहेत. त्याचप्रमाणे घरकुलांच्या उद्दिष्टापेक्षा किती तरी पटीत ही खरेदी करण्यात आली आहे. तसेच, खरेदी झाली असली तरी अनेक ठिकाणी त्याचे वाटप करण्यात न आल्यामुळे ब्लँकेट व सतरंज्यांची बंडले पडून आहेत.

८.१४७ ब्लँकेट व सतरंज्यांचे वाटप करण्याचे काम डीआरडीओला देण्यात आले होते. त्यामुळे ही सर्व सामुग्री डीआरडीओकडे देण्यात आली होती. त्यांनी वाटप करावे, असे अपेक्षित होते. तथापि, त्यांनी अशी भुमिका घेतली की, वाटपासाठी खर्च येणार आहे. प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत वाटप करावयाचे झाले तर त्यासाठी वेगळ्या खर्चाची तरतूद करावी लागेल. याबाबत मंत्री महोदयांच्या स्तरावर बैठक घेण्यात आली व असा निर्णय झाला की, ५ टक्के प्रशासकीय खर्चामधून वाटपाचा खर्च करण्यात यावा. काही जिल्ह्यातील डीआरडीओच्या अधिकाऱ्यांनी वाटपाचे काम केले आहे तर काही जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी अशी भुमिका घेतली की, घरे बांधण्याचे काम आमच्या विभागाचे असून वाटपाचे काम समाज कल्याण अधिकारी किंवा त्यांच्या विभागाने करावे, त्या विभागाच्या सचिवांनी देखील अशीच भुमिका घेतली आहे. ब्लँकेट आणि सतरंजी वाटपाबाबत विभागाने समितीस पुढील माहिती दिली :

८.१४८ ब्लँकेट व सतरंजीची खरेदी करण्यात आली असून शिल्लक असलेल्या ब्लँकेट व सतरंजीचे वाटपाची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे ब्लँकेट व सतरंज्याची बंडले पडून राहण्याचा प्रश्न येत नाही.

अ.क्र.	**साहित्य**	**प्रति लाभार्थी संख्या (२+२= ४)**
१	ब्लँकेट	३५५८२०
२	सतरंजी (लोकरी चादर)	५४८८४८
	एकूण	**९०४६६८**

८.१४९ राज्यात एकूण १ लाख ५० हजार घरे बांधून पूर्ण झाली आहेत, अशी माहिती याच बैठकीत सचिवांनी दिली आहे. त्यामुळे ३ लाख ब्लँकेट आणि ३ लाख सतरंज्यांची खरेदी करणे आवश्यक होते. सचिवांनी ही माहिती द्यावी की, एकूण किती नग ब्लँकेट आणि सतरंज्या खरेदी करण्यात आल्या आहेत, त्यांचा प्रति नग दर काय आहे, निविदा काढण्यात आली होती का, कोणत्या निकषानुसार निविदा अंतिम करण्यात आली, सर्व लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे का ? याबाबत माहिती देण्यास विभागास सांगितले असता पुढीलप्रमाणे माहिती समितीस अवगत केली.

८.१५० सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.इबीसी-२०११/प्र.क्र.१६५/अजाक-२, दिनांक २७ मार्च, २०१२ अन्वये घरकुल योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) लाभार्थ्यांना हिवाळयात थंडीपासून संरक्षण करण्यासाठी २ ब्लँकेट व २ सतरंजी (लोकरी चादर) देण्यासाठी शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने मे.सोलापूर जिल्हा

अहिल्यादेवी खादी ग्रामोद्योग घोंगडी उत्पादक, सहकारी संस्था मर्यादीत, पंढरपूर, जिल्हा सोलापूर यांना उपलब्ध करुन देण्यासाठी प्रायोगिक तत्वावर खालीलप्रमाणे वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

ग्रामीण				
अ.क्र.	**वस्तू**	**प्रती नग दर**	**प्रती लाथार्थी २ नग रु.**	**एकूण लाभार्थी**
१	ब्लँकेट (पांघरण्यासाठी)	५२२.१०	१०४४.२०	१९०१०९
२	सतरंजी (लोकर चादर आंथरण्यासाठी)	३६९.०३	७३८.०६	१९०१०९
नगरपालिका/नगरपरिषद				
३	ब्लँकेट (पांघरण्यासाठी)	५२२.१०	१०४४.२०	५८७५३
४	सतरंजी (लोकर चादर आंथरण्यासाठी)	३६९.०३	७३८.०६	५८७५३

मूळ उद्दिष्टानुसार ९९५४४८ इतके ब्लँकेट व सतरंजी पुरवठा करणे आवश्यक होते. त्यापैकी ९०४६६८ इतकी खरेदी केलेली आहे.

८.१५१ शासन परिपत्रक उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.भांकस-लोकरीचे सुत. लोकरीचे चादर (आसनपट्टया) दरनिश्चित/ (१२) २०११-१२/बी १६५७५, दिनांक २५ ऑगस्ट, २०११ च्या अर्टी शर्तीनुसार दरकरारान्वये मे.सोलापूर जिल्हा अहिल्यादेवी खादी ग्रामोद्योग घोंगडी उत्पादक, सहकारी संस्था मर्यादीत, पंढरपूर, जिल्हा सोलापूर यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले होते तसेच प्रगतीपथावर असलेल्या घरकुलांचा देखील समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे संख्या वाढलेली दिसते असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

८.१५२ राज्यात निवासी आश्रमशाळा आहेत. मुलींना रात्री घालाण्यासाठी गाऊन आणि मुलांना नाईट ड्रेस घेण्याचे ठरविण्यात आले व सर्व महाराष्ट्राची खरेदी करुन टाकली आहे. ही एकूण ११ कोटी रुपयांची खरेदी केली आहे. संगणक प्रशिक्षणाचा ४० कोटी रुपयांचा कार्यक्रम तयार केला आहे. या योजनेला डिसेंबर, २०१२ मध्ये एक वर्ष पूर्ण झाले आहे. केवळ उपस्थिती भरण्याचे काम करण्यात येत आहे. प्रति प्रशिक्षणार्थी ९००० हजार रुपये दिले जात आहेत. त्याचप्रमाणे कृषी पुस्तिकांची खरेदी देखील करण्यात आलेली आहे. एका संचाची किंमत ३२ हजार रुपये आहे माझी अशी सूचना आहे की, सन २०१० ते सन २०१३ या ३ वर्षात कोणकोणत्या लेखाशीर्षाखाली कोणकोणत्या योजनांतर्गत, कोणत्या वस्तूंची खरेदी करण्यात आली, याबाबतची

माहिती समितीला उपलब्ध करुन द्यावी असे समितीने निदेश दिले असता विभागाने माहिती उपलब्ध करुन दिली आहे तसेच ब्लँकेट व सतरंजी खरेदी, नाईट ड्रेसची खरेदी, संगणक प्रशिक्षण या सर्व योजनांची माहिती, खरेदी व वाटपाची माहिती विभागीय सचिवांनी समितीला सादर करावी असे निदेश समितीने दिले असता विभागाने उपरोक्त माहिती सादर केली आहे ती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

८.१५३ सन २००९-१० या वर्षात वसतिगृहांचे बांधकाम, निवासी शाळा, आंबेडकर भवन, आय.आय.टी. संस्थांचे बांधकाम अशी कामे करण्यात येणार होती. ही सर्व कामे अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत ? ही अपूर्ण कामे कोणती आहेत व या कामांची सद्य:स्थिती काय आहे ? अनुसूचित जातीच्या संस्थांकरिता १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. हा निधी खर्च का करण्यात आला नाही ? अशी समितीने विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वसतीगृहे, निवासी शाळा, आंबेडकर भवन व आय.आय.टी. या संस्थांचे बांधकाम करण्यात येते. परंतु काही संस्थांसाठी जागा उपलब्ध न झाल्यामुळे या संस्थांचे बांधकाम करता आले नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

८.१५४ आय.आय.टी. व वसतीगृहांच्या बांधकामासाठी रकमेचा अंदाज करुन वित्त व नियोजन विभागाकडे निधीची मागणी केली जाते. निधी मागण्यात आला तेव्हा या कामासाठी जागा उपलब्ध नाही हे तेव्हा लक्षात आले नाही काय ? जागेची खातरजमा न करता निधी मागितल्यामुळे हा निधी तसाच पडून राहिला आहे. सर्व बाबींचा अभ्यास करुन निधी मागितला पाहिजे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी वर्ग करुन सामाजिक न्याय विभागाचे काम संपत नाही. बांधकाम झाले किंवा नाही, सदर निधी व्यपगत झाला काय याची माहिती विभागाने घेणे आवश्यक होते. ही कामे करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

८.१५५ सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत असून सार्वजनिक बांधकाम विभागाने काही कामे बीओटी तत्वावर करावीत असा प्रस्ताव दिला होता. तो प्रस्ताव अंतिम झाल्यानंतर ही सर्व कामे मार्गी लागतील अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

८.१५६ ही कामे सन २००९-१० ची आहेत, मुंबईत बीओटी तत्वावर कामे होऊ शकतील. मुंबई वगळता इतर ठिकाणी वस्तीगृहे व आयटीआय या संस्थांची बांधकामे करण्यासाठी हा निधी खर्च करणे अपेक्षित होते असे समितीने नमूद केले.

८.१५७ १०० शासकीय वसतीगृहे बांधण्याचे नियोजन होते. त्यापैकी ६२ वसतीगृहांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. १९ वसतीगृहांची बांधकामे प्रगती पथावर आहेत, १२ वसतीगृहांसाठी जमीन मिळाली नाही. ७

वसतीगृहांची जमीन संपादन करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली तसेच सदर निधी सार्वजनिक बांधकाम विभागाने मुदत ठेवीत ठेवला आहे असे ही समितीस अवगत केले.

८.१५८ मूळ काम सामाजिक न्याय विभागाचे आहे, त्यांच्या बजेटमधून हा पैसा उपलब्ध करुन दिला जातो. तरी देखील कामे होत नाहीत हे बरोबर नसल्याचे नमूद करत समितीने नाराजी व्यक्त केली असता काही ठिकाणी जमिनीची अडचण असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्या ठिकाणी जमिनीची अडचण नाही तेथील कामे केली पाहिजेत. जेथे जमिनीची अडचण त्यासाठी निधीची मागणी का करण्यात आली, सामाजिक न्याय विभाग याबाबत अभ्यास करीत नाही काय ? जमिनीचा वाद असेल तर सामाजिक न्याय विभागांच्या जागांवर बांधकाम करण्यात यावे असे ही समितीने सुचित केले. यावर जमिन उपलब्ध करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. व्हीडीओ कॉन्फरसिंगव्दारे विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना वारंवार सूचना देण्यात येतात. सरकारची जमिन मिळत असेल तर तेथे वसतीगृहे बांधावीत असे लेखी पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. तसेच जवळपास बरीच कामे झाली असून फक्त ७ आश्रमशाळांचा प्रश्न आहे. तो देखील काही दिवसात मार्गी लागेल. बीओटीसाठी महिला व बाल कल्याण विभागाची जमिन आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग ही बांधकाम करण्याची एजन्सी आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.१५९ अनुसूचित जातीच्या मुलांसाठी व मुलींकरिता शासकीय वसतिगृहांचा दर्जा वाढविणे या योजनेत सन २००९-१० करिता शासनाकडून संगणक वितरण प्रणालीवर एकूण ४५.४७ लाख रुपये तरतूद प्राप्त झाली होती आणि तेवढीच रक्कम खर्च झाली होती. संगणक प्रणालीव्दारे वसतीगृहांच्या दर्जात कोणती वाढ झाली आहे ? या समितीच्या प्रश्नाला निधी वितरीत करण्यासाठी संगणक प्रणाली व बीडीएस पध्दत आहे. मागच्या वर्षी सर्व योजनांसाठी वित्त विभागाने २० टक्के कट लावला आहे. फक्त ८० टक्के निधी प्राप्त झाला आहे. वित्त विभागाने वेळोवेळी बीडीएस पध्दतीनुसार निधी वितरीत केला आहे वित्त विभागाने जो निधी वितरीत केला तो खर्च करण्यात आलेला असल्याचेही समितीने अवगत केले.

८.१६० अनुसूचित जातीतील व्यक्तींच्या सहकारी संस्थांना भाग भांडवल अंशदान या योजनेअंतर्गत अनेक संस्थांकडून मागणी करण्यात आली यामध्ये औद्योगिक संस्थांसाठी काही योजना होत्या. सन २००४ पासून या योजना कार्यरत आहेत. या योजनेअंतर्गज २१२ संस्थांचे अर्ज प्रलंबित होते. सदर संस्थांना एकाच दिवशी अनुदान का देण्यात आले ज्या संस्थांच्या नावाने अनुदान वाटप करण्यात आले. त्यापैकी आठ-आठ संस्थांची तीच नावे असताना त्यांना अनुदानाचे वाटप का करण्यात आले ? या २१२ संस्थांच्या संदर्भात "बार्टी" संस्थेने चौकशी करुन अहवाल दिलेला आहे. त्या संस्थेचा अहवाल समिती सदस्यांना देण्यात यावा. समितीच्या

माहितीप्रमाणे 'बार्टी' या संस्थेने या अहवालात अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या अहवालानुसार विभागाने कार्यवाही केली आहे काय ? यासंदर्भात समितीने माहिती देण्यास सांगितले असता या योजनांबाबत अनेक तक्रारी आल्या होत्या. या योजनांचे मूल्यमापन 'बार्टी' संस्थेने केले आहे. सदर अहवाल 'बार्टी' संस्थेने तयार केलेला आहे. काही संस्थांबाबत बार्टी संस्थेने त्रुटी काढल्या आहेत. काही संस्थांनी त्रुटीची पुर्तता केल्यामुळे त्यांना मंजूरी देण्यात आली आहे. त्रुटीच्या संदर्भात हा अहवाल आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली तसेच यापूर्वी सन २०१०-११ मध्ये बार्टीकडून सन २००९-१० मध्ये शासनाने मंजूरी दिलेल्या २१२ संस्थांची चौकशी करण्यात येवून शासनास अहवाल सादर केला होता. सदर अहवालातील संस्थांबाबत शासनाने त्यातील त्रुटींची पुर्तता करुन कार्यवाही करणेबाबत कळविले होते. त्यानुसार कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

८.१६१ शासन स्तरावरुन सदर योजनेचे बार्टीकडून नव्याने मूल्यमापन करण्याबाबत बार्टीस सूचना दिलेल्या असून याबाबतचा नवीन मूल्यमापन अहवाल बार्टीने अद्याप सादर केलेला नाही असा खुलासा केला. या अनुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, या अहवालात अनेक आक्षेप घेण्यात आले आहेत ते अतिशय गंभीर आहेत. या संस्थांमध्ये अनेक त्रुटी आहेत. ज्या लोकांनी चुकीची कामे केली असतील त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावयास पाहिजे.

८.१६२ या संस्थांच्या काय त्रुटी आहेत त्यासंदर्भात हा अहवाल आहे. एकूण ३७२ संस्था होत्या ज्या संस्थांनी उपयोगिता प्रमाणपत्र दिले नाही अशा एकूण १८२ संस्था आहेत. पहिला हप्ता घेतल्यानंतर ज्यांनी उपयोगितता प्रमाणपत्र दिले अशा एकूण ११० संस्था आहेत. जिल्हाधिकारी यांनी हे उपयोगिता प्रमाणपत्र घ्यावयाचे आहे. शासकीय भाग भांडवल व दीर्घ मुदत कर्ज ७० टक्के मंजूर करुन दोन वर्ष पूर्ण झालेल्या संस्थांची संख्या ५८ आहे. ज्यांनी एकही हप्ता उचलला नाही अशा २२ संस्था आहेत. उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्या संस्थांची चौकशी सुरु करण्यात आली आहे. सन २०११ पर्यंत एकूण १८२ संस्थांना पहिला हप्ता दिलेला आहे असे समितीस विदित केले तसेच ही योजना सन २००४-२००५ पासून अंमलात आली आहे. आतापर्यंत एकूण ३७२ संस्थांना पहिला हप्ता देण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत शासकीय भागभांडवल ३५ टक्के व कर्ज ३५ टक्के असे सूत्र आहे. आतापर्यंत २७१ कोटी ६८ लक्ष भागभांडवल व २६९ कोटी ९८ लक्ष कर्ज दिलेले आहे अशी माहिती समितीस दिली.

८.१६३ विभागाने दिलेल्या विवरणपत्रात १८२ संस्थांनी उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रमाणपत्र दिले नाही, याचा अर्थ, या संस्थांनी शासनाकडून उचललेली रक्कम खर्च केलेली नाही तसेच या प्रकरणाचे तीन भाग आहेत. मंजूर संस्थांपैकी काही संस्था अशा आहेत की, ज्यांनी शासकीय

नियमांचे पालन करुन खरोखरच अनुसूचित जातीच्या लोकांसाठी औद्योगिक सहकारी संस्था उभारणी केली आहे व शासनाकडून उचललेल्या निधीचा योग्य विनियोग केला आहे. दुसरा भाग असा आहे की, केवळ आपल्या कार्यकर्त्यांना उपकृत करण्यासाठी बोगस संस्थांना मंजूरी व शासकीय पैशांची उचल दिली गेली आहे. तिसरा भाग असा आहे की, काही खुल्या प्रवर्गातील नेत्यांनी मागासवर्गीय कार्यकर्त्यांना पुढे करुन विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात आणि कोकणात संस्था उभ्या केल्या आणि शासकीय निधीची उचल केली व नियमानुसार कोणतेही कामकाज केलेले नाही. अशा प्रकारे दोन-तीन पध्दतीने शासकीय निधी लुटण्याचे काम या योजनेत झाले आहे. एकाच दिवशी २१२ संस्थांना धनादेशाचे वाटप करण्यात आले, या एकाच उदाहरणावरुन मंजूरीचे अधिकार असलेले प्राधिकारी आणि संस्थाचालक यांनी या योजनेचा कसा दुरुपयोग केला आहे, हे दिसून येईल असे मत समितीने व्यक्त केले.

८.१६४ २१२ संस्थांना एकाच दिवशी मंजूरी देण्यात आली आहे. त्यांना धनादेश देण्यात आलेले नाहीत. आयुक्त, समाजकल्याण आणि संबंधित संस्थेचे अध्यक्ष, सचिव यांचे संयुक्त खाते बँकेत काढले जाते व त्यामध्ये धनादेश जमा केला जातो. संस्थेकडून निधी उचल प्रस्ताव येतो, त्यावेळी अधिकाऱ्यांकडून या योजनेच्या सर्व निकषांची तपासणी केली जाते. उदाहरणार्थ, संस्थेच्या नावे जमीन आहे किंवा नाही, संस्थेने आपला ५ टक्के हिस्सा भरला आहे किंवा नाही, या बाबींची तपासणी करुन बाबनिहाय निधी दिला जातो. एकाच वेळी सर्व रक्कम दिली जात नाही. समजा १ कोटी रुपये मंजूर केले असले तरी आवश्यक तेवढी रक्कम दिली जाते. जिल्हाधिकाऱ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दुसरा हप्ता संस्थेला दिला जातो असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

८.१६५ या ठिकाणी सचिवांनी निकषांचा उल्लेख केला आहे. समितीच्या माहितीप्रमाणे काही लोकांना व संस्थांना फायदेशीर ठरतील, अशाच प्रकारचे निकष ठरविण्यात आले आहेत. त्यामुळे निकषांची संपूर्ण माहिती सचिवांनी समितीला द्यावी, निकष अशा पध्दतीने तयार केले आहेत की, संस्थांना पहिला हप्ता म्हणून मोठी रक्कम प्राप्त होईल. त्यानंतर त्या संस्थांनी काही कामकाज केले नाही तर त्याबाबत शासन काही करु शकणार नाही. अशाच पध्दतीले १८२ संस्थांना पहिला हप्ता देण्यात आला आहे असे समितीने म्हणणे मांडले असता विभागीय सचिवांनी शासन निर्णय दिनांक २२ मे, २००० व शासन पुरक पत्र दिनांक ३० मार्च, २०१० नुसार मान्यतेचे निकष ठरविण्यात आलेले आहेत यामध्ये १ ते ३२ अटी शर्ती व पुरक अधिकच्या चार अटी शर्तीनुसार मान्यता देण्यात येते अशी माहिती समितीस दिली.

८.१६६ या योजनेअंतर्गत ३७२ संस्थांना प्रति संस्था ५० लक्ष रुपये अनुदान व ५० लक्ष रुपये कर्ज या स्वरुपात १ कोटी रुपये देण्यात आले आहेत. नियमानुसार या निधीचा विनियोग करुन उपयोगिता प्रमाणपत्र

संस्थांनी सादर करावयाचे होते. परंतु यामधील १८२ संस्थांनी उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही याबाबत समितीने विचारणा केली.

८.१६७ उपरोक्त मुद्यांसंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस पुढील माहिती दिली. ज्या १८२ औद्योगिक सहकारी संस्थांनी पहिल्या हप्त्याची उचल घेतली आहे व जिल्हाधिकाऱ्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, त्यांची प्रथम प्राधान्याने चौकशी करावी. शासनाने दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३ रोजी हे आदेश निर्गमित केले असून या १८२ संस्थांची चौकशी करण्यासाठी प्रादेशिक उपआयुक्तांची चौकशी समिती गठीत केली आहे. दिनांक ३० नोव्हेंबर, २०१३ पर्यंत या संस्थांची तपासणी करुन अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश या समित्यांना देण्यात आले आहेत. या चौकशीत ज्या संस्था दोषी आढळतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

८.१६८ सन २००४ पासून या संस्थांना पहिल्या हप्त्याचे वाटप करण्यात येत असून १८२ संस्थेतील शेवटच्या संस्थेला पहिला हप्ता सन २०१०-२०११ मध्ये देण्यात आला आहे. असे असताना २०१० पासून आतापर्यंत चौकशी का करण्यात आली नाही या समितीच्या प्रश्नाला विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, एकूण ३७२ संस्थांपैकी ११० संस्थांनी उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. पहिल्या हप्त्याच्या नियमाप्रमाणे विनीयोग केल्यानंतरच जिल्हाधिकारी उपयोगिता प्रमाणपत्र देतात. त्यामुळे ज्या संस्थांना उपयोगिता प्रमाणपत्र मिळाले आहे, त्या संस्थांची चौकशी करण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय शासनाने घेतला आहे. ज्या १८२ संस्थांना पहिला हप्ता अदा करण्यात आला आहे, त्यामधील काही संस्थांना मागील वर्षी आणि काही संस्थांना त्यापूर्वी पहिला हप्ता देण्यात आला आहे.

८.१६९ या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००४ व त्यानंतरच्या वर्षात अदा केलेल्या पहिल्या हप्त्याच्या विनियोगाबाबत संस्थांनी प्रमाणपत्र सादर केले नसताना सुध्दा मागील वर्षापर्यंत पहिला हप्ता देण्याचे काम सुरु होते. त्यावेळी ही बाब शासनाच्या निदर्शनास आली नाही का ? या अनुषंगाने विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला ज्या संस्थांना जिल्हाधिकाऱ्यांनी उपयोगिता प्रमाणपत्र दिले आहे, त्या संस्थांना पुढील रक्कम दिली जात आहे. ज्या संस्थांनी पहिला हप्त्याची उचल केली आहे, परंतु उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशा १८२ संस्थांची प्राधान्याने चौकशी करीत आहेत. उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेल्या संस्थांची संख्या ११० असून त्यांचा काही प्रश्न नाही. तथापि, शासकीय भाग भांगभांडवल व दीर्घ मुदत कर्ज मंजूर करुन २ वर्ष पूर्ण झालेल्या ५८ संस्था असून त्यांची चौकशी करण्यात येत आहे. या ५८ संस्थांना ७० टक्के रककम देऊन २ वर्ष पूर्ण झाली आहे. त्यामुळे त्यांच्याकडून वसूली करणार आहोत. त्याचप्रमाणे पहिल्या हप्त्याची उचल न केलेल्या संस्थांची संख्या २२ आहे. प्रकल्प खर्चाची मर्यादा ७ कोटी

रुपये ठरविण्यात आली आहे. यामधील प्रत्येक संस्थेची मर्यादा ७ कोटी रुपये आहे असे नाही. काही छोटे प्रकल्प देखील आहेत. या सर्व संस्थांची स्वतंत्र यादी व माहिती पुस्तिकेत देण्यात आली आहे. राज्यात एकूण ७ प्रादेशिक उप आयुक्त आहेत व प्रत्येक उपआयुक्ताच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली आहे. या समितीमध्ये सहायक आयुक्त, सह संचालक (लेखा), सहकार विभागाचे अधिकारी, तांत्रिक अधिकारी यांचा समावेश आहे. या चौकशीत ज्या संस्था दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा विभागाचा विचार आहे. या अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थांवर ७ वेगवेगळया विभागांचे नियंत्रण आहे. या संस्थांना उचल देण्यापूर्वी करारनामा केला जातो व संस्थेच्या जमिनीचे गहाणखतही केले जाते. कोणत्याही संस्थेला याबाबत स्पेअर केले जात नाही. गहाणखातानुसार संस्थेच्या जमिनीवर शासनाचा अधिकार आहे. संस्थेकडून अनियमितता झाली तर दिलेली रक्कम एकरकमी वसूल करण्याची तरतूद या करारनाम्यात आहे. हा करारनाम संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्याबरोबर केलेला आहे.

८.१७० या योजनेअंतर्गत संस्थांची पात्रता, मंजूरीचे निकष, हप्त्यांची उचल देण्याबाबतचे नियम काय आहेत व संस्थेने अनियमितता केली तर शासकीस निधीची वसूली कशा प्रकारे केली जाईल. याबाबतचे नियम काय आहेत, याची माहिती सचिवांनी समितीला द्यावी असे निर्देश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, या योजनेच्या संदर्भात दोन शासन निर्णय निर्गमित करण्यात आले असून एकूण ३२ निकष निश्चित करण्यात आले आहेत. या योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

(१) या योजनेअंतर्गत केवळ अनुसूचित जातीच्या नोंदणीकृत सहकारी संस्था अर्ज करण्यास पात्र ठरतील.

(२) विशेष घटक योजनेच्या तत्वानुसार संस्थेचे भागधारक ७० टक्के अनुसूचित जातीचे असावे. सहकारी संस्थांचे प्रकल्प उभारल्यानंतर व ते व्यवस्थितरित्या सुरु झाल्यानंतर त्यामधील कर्मचारी वर्ग व कामगार वर्गही ७० टक्के अनुसूचित जातीचा असावा.

(३) विशेष घटक योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार अर्जदार संस्था या अनुसूचित जातीच्या असाव्यात व त्यांना कर्ज आणि भाग भांडवल विशेष घटक योजनेमधून सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल.

(४) अर्जदार सहकारी संस्थांनी शासनास सादर केलेल्या प्रकल्प मुल्याच्या किमान ५ टक्के भाग भांडवल जमा केल्यानंतर त्यांना शासकीय भाग भांडवल/दीर्घ मुदतीचे कर्ज मिळण्यास पात्र समजण्यात यावे. प्रकल्पमूल्य मर्यादा (१) ॲग्रीकल्चर फायनान्स कॉर्पोरेशन, नवी दिल्ली (२) दत्ताजी टेक्निकल इन्सिटट्युट, इचलकरंजी अथवा (३) मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड, मुंबई (मिटकॉन) अथवा संबंधित वित्तीय संस्था यापैकी कोणत्याही एका संस्थेने निश्चित केल्याप्रमाणे मात्र कमाल ५ ते

७ कोटी (व्यवसायनुरुप) असावी. अर्जदार संस्थांनी यापैकी कोणत्याही एका संस्थेकडून प्रकल्प अहवाल तयार करुन घ्यावा.

८.१७१ तसेच संस्थेने अनियमितता केली तर शासकीय निधीची वसुली कशाप्रकारे केली जाईल याबाबतची अधिक माहिती विभागाने समितीला सादर केली ती पुढीलप्रमाणे आहे. दिनांक २२ मे, २००८ व शासन पुरक पत्र दिनांक ३० मार्च, २०१० मधील तरतुदीनुसार संस्थांना मंजूरी शासनस्तरावरुन देण्यात येते. प्रथम हप्त्याची उचल करताना संस्थेसोबत शासन निर्णयातील अर्टी शर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करण्यात येतो. तसेच अट क्र.२१ नुसार शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्पाच्या गहाणखत करण्यात येते कर्ज अथवा भागभांडवलाची व्याजासह परतफेड होईपर्यंत संपूर्ण प्रकल्प (जमीन, यंत्रसामुग्री व प्रकल्पाची इतर मालमत्ता इत्यादी) शासनाकडे गहाण ठेवावी, गहाणखतावर पहिला हक्क शासनाचा व दुसरा हक्क वित्तीय संस्थेचा राहिल, संस्थेच्या संचालक मंडळाला थकीत कर्जासाठी जबाबदार धरण्यात यावे अशी तरतूद आहे. त्यानंतर उचल मंजूर करण्यात येते. प्रथम उचल घेतलेल्या संस्थांनी त्यांना अदा केलेल्या उचल रकमेच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेऊन सादर केल्यानंतर त्या आधारे त्यांना दुसरा हप्ता अदा करणेबाबत आयुक्तालयाकडून शासनास कळविण्यात येते. दुसरा हप्ता मंजूर करण्याचे आदेश शासनस्तरावरुन निर्गमित होतात. संस्थेने अनियमितता केल्यास दिनांक २२ मे, २००८ च्या शासन निर्णयातील अट क्र.१५ नुसार "ज्या कामाकरिता दीर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल मंजूर केले आहे त्याच कामाकरीता सहकारी संस्थेने त्याचा वापर करावा. निधीचा गैरवापर होत असल्याचे दिसून आल्यास दंडात्मक व्याजदरासह महसूली थकबाकी म्हणून सर्व रक्कम वसूल करण्याचे अधिकार शासनास राहतील." अशी तरतूद आहे. अनियमितता झाल्यास संबंधित संस्थेचे संचालक मंडळ व्यक्तीगतरित्या जबाबदार राहिल, अशा प्रकारचा करारनामा संस्थेच्या अध्यक्षांसोबत करण्यात येतो.

८.१७२ उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर व विभागाचे समाधान झाल्यानंतर संस्थेला दुसरा हप्ता अदा केला जातो. या प्रकरणी १८२ संस्थांनी पहिला हप्ता घेतला आहे. त्यामधील अनेक संस्था अशा आहेत की, त्यांनी उपयोगिता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली नाही आणि प्रमाणपत्र मिळविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. कारण, त्यांचा हेतू स्पष्ट होता की, केवळ हप्ता प्राप्त करुन घ्यायचा, ती रक्कम ज्या कारणासाठी घेतली आहे, त्या कारणावर खर्च करायची नाही आणि पहिल्या हप्त्याची रक्कम केवळ शासनाकडून पदरात पाडून घ्यायची. कोणतीही कागदपत्रे न तपासता केवळ एका अर्जावर या विभागाने या संस्थांना पहिल्या हप्त्याची रक्कम दिली आहे व ही एकत्रित रक्कम काही कोटी रुपयांची आहे. काही संस्थांना पहिला हप्ता दिल्याने शासनाचे करोडो रुपये अडकून पडले आहेत. तसेच ज्या संस्थांना

पहिला हप्ता दिला आणि त्यांनी त्याचा उपयोग केला नाही तर ती रक्कम काढून घेण्याची तरतूद नाही काय? अशी समितीने विचारणा केली असता या संस्थांनी ३२ अटींचे पालन केले किंवा नाही याचा विचार करुन शासनाने ही रक्कम मंजूर केली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

८.१७३ या संस्थांनी ३२ अटींचे पालन केले असेल तर त्यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र मिळण्यास काय अडचण आहे. उपयोगिता प्रमाणपत्र मिळत नाही म्हणजेच त्यांनी या अटींचे पालन केले नाही. काही संस्थांनी अटी पूर्ण केल्यामुळे त्यांना पहिल्या हप्त्याची रक्कम देण्यात आली आहे. परंतु १८३ संस्थांनी या रकमेचा उपयोग न केल्यामुळे त्यांना उपयोगिता प्रमाणपत्र मिळालेले नाही. या समितीने व्यक्त केलेल्या मतांच्या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी पुढील माहिती समितीस दिली.

एकूण ३७२ संस्था आहेत. त्यापैकी ३५० संस्थांनी काही ना काही रकमेचा उचल केलेला आहे. २२ संस्थांनी पहिल्या हप्त्याची देखील रक्कम उचलली नाही. १८२ संस्थांनी पहिला हप्ता उचलला तर ११० संस्थांनी उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. ५८ संस्थांनी दोन वर्ष पूर्ण केले आहेत. १८२ संस्थांची चौकशी सुरु करण्यात आली आहे. १८२ संस्थांपैकी फक्त एकाच संस्थेचे काम सुरु आहे. १८२ संस्थांतील काही संस्थांनी पहिल्या हप्त्याची रक्कम खर्च केलेली नसल्याचे सांगितले तसेच १८२ संस्थांचा अहवाल नोव्हेंबर अखेर येणार असल्याचे नमूद करत या संपूर्ण संस्थांची माहिती समितीस अवगत केली ती पुढीलप्रमाणे आहे.

८.१७४ एकूण १८२ प्रथम हप्ता देवून उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केलेल्या व ५८ संस्थांना ७०% अर्थसहाय्य पूर्ण अदा केलेल्या अशा एकूण २४० संस्थांची तपासणी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांचे अध्यक्षतेखालील समित्यांकडून करण्यात आलेली आहे. त्यांचे अहवाल प्राप्त झाले असून सोबत प्रपत्रामध्ये गोषवारा सादर करण्यात येत आहे. एकूण २४० पैकी ७१ संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचे चौकशी समित्यांनी अहवालामध्ये नमूद केले असल्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबंधित संस्थांवर प्रत्यक्ष कार्यवाही करण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी दिनांक २०.१.२०१४ ते २८.१.२०१४ पर्यंत या संस्थांच्या सुनावण्या आयुक्त, समाज कल्याण यांच्या कार्यालयात ठेवण्यात आलेल्या आहेत. प्रत्यक्ष सुनावणी नंतर आवश्यक ती कार्यवाही करणेत येईल.

८.१७५ या संस्थांच्या संचालक मंडळातील सदस्यांबाबत असे आढळून आले आहे की, एकच व्यक्ती ६ ते ७ संस्थांवर संचालक म्हणून कार्यरत होते, हे नियमानुसार आहे काय ? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती समितीस दिली की, सदर औद्योगिक सहकारी संस्था सहकार विभागाकडील कायद्याप्रमाणे स्थापित झालेल्या असून त्यांची नोंदणी सहकार विभागाकडे होते. एक सदस्य एकापेक्षा अधिक संस्थांमध्ये

सभासद होऊ शकतो. याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने सन १९८२ मध्ये (सीटीजे-८) आनंदराव नारायणराव विरुध्द बीड जिल्हा कृषी आणि औद्योगिक सहकारी संस्था, बीड या प्रकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम-९१ (४) निर्णय दिलेला आहे. असे उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड जिल्हा यांनी कळविलेले आहे.

८.१७६ या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, कायद्याचे बंधन नसले तरी प्रश्न असा आहे की, शासनाने असे करणे योग्य आहे काय? एकाच व्यक्तीला किती कोटी रुपये द्यावे याचे काही बंधन आहे किंवा नाही? यावर विभागीय सचिवांनी वेगवेगळया चार संस्थाना हा निधी दिलेला आहे असे समितीस विदित केले. एक संचालक अपेक्षेपेक्षा जास्त संस्थावर कार्यरत आहे. अशा संस्थाना देखील पहिल्या हप्त्याची रक्कम देण्यात आली आहे. १८२ संस्थांना पहिला हप्ता शासनाकडून दिलेला असून ही रक्कम २६२ कोटी ७१ लाख रुपये होते. ही रक्कम कशी काय वसूल करता येईल या संस्थांनी उद्योग चालू केले नाहीत दुसऱ्या हप्त्याची मागणी त्यांनी केली नाही. २१२ संस्था अशा आहेत की, त्यांचे पैसे आज बँकेत जमा झाले व लगेच त्यांनी २० ते २५ लाख रुपयाचां धनादेश वटविला आहे. स्वतःचा ५ टक्के रकमेचा हिस्सा देखील त्यांनी भरलेला नाही. "बार्टी" संस्थेच्या अधिकाऱ्यांनी हा अहवाल दिला आहे अशी माहिती समितीने विभागास दिली असता १८२ संस्थाच्या चौकशीचा अहवाल या महिन्याच्या अखेरपर्यत येणे अपेक्षित आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

८.१७७ या सहकारी संस्थांचा विषय लोकलेखा समितीने उपस्थित केला म्हणून या सहकारी संस्थांची चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली आहे या संस्थाच्या संदर्भात ज्या अटी व शर्ती नमूद केल्या आहेत त्यातील अट अशी आहे की, या सहकारी संस्थांनी पहिला हप्ता घेतल्यानंतर ५२ आठवडयात कामाला सुरुवात केली पाहिजे. यातील अनेक संस्थांनी ५२ आठवडयात काम सुरु केले नाही याची पाहणी अधिकाऱ्यांनी करुन सदर संस्थावर कारवाई करणे अपेक्षित होते. ही कामे ज्या अधिकाऱ्यांनी केली नाहीत त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. २५ लाख रुपयांचा चेक संबधितांनी बँकेतून लगेच वटविला आहे अशा संबंधितावर ताबडतोब फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. मागासवर्गीय लोकांच्या ३०० कोटी रुपयांची लुबाडणूक करण्याचा हा प्रकार आहे. बार्टी संस्थेने जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये जवळपास २५ प्रकारे वेगवेगळा भ्रष्टाचार करण्यात आला आहे.या लोकांनी मोठया प्रमाणात शासनाची फसवणूक केली आहे. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. फसवणूक केल्यामुळे संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करावयास पाहिजे फौजदारी गुन्हा दाखल करण्यास काही अडचण आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता या विषयाबाबत अतिशय गंभीरपणे प्रादेशिक उपायुक्त व आयुक्त याच्या अखत्यारित चौकशी सुरु आहे. चौकशीचा

अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले तसेच फौजदारी गुन्हे दाखल करण्यामध्ये अडचण अशी आहे की, त्यांनी रकमेचा अपहार केला नसेल तर शासन अडचणीत येऊ शकेल.

८.१७८ जो अहवाल आहे त्यावरुन समितीचे स्पष्ट मत आहे की, ही दोन तीन लाख रुपयांची बाब नाही. २५० ते ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे. अधिकाऱ्यांच्या संगनमताने या बाबी घडल्या आहेत जो अहवाल आलेला आहे त्यानुसार ताबडतोब कार्यवाही करुन संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा असे निदेश समितीने विभागाला दिले.

संस्था सुरु करण्याचा ५२ आठवडयांचा निकष सांगण्यात आला आहे. ५२ आठवडयांचा निकष ज्या संस्थंनी पूर्ण केला नाही त्यांनी देखील निधी घेतला आहे. यासाठी संबंधित अधिकारी जबाबदार आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात येत नाही या समितीच्या प्रश्नाला माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, शासन निर्णय, दिनांक २२ मे, २००८ मधील अट क्र. १० च्या अनुषंगाने शासन पुरक पत्र क्रमांक मासाका-२०१०/प्र.क्र५२/विघयो-२, दिनांक ३० मार्च,२०१० नुसार ५२ आठवडयांचे मर्यादेत प्रकल्प पूर्ण करणेबाबत पुढील सुधारणा करणेत आली आहे.

८.१७९ "प्रकल्प उभारणीकरीताचा कमाल ५२ आठवडयांचा कालावधी शासनाकडून देय असलेले अर्थसहाय्य पूर्ण वितरीत केल्याच्या दिनांकापासून गणला जाईल."

त्यानुसार १८२ संस्थांना पूर्ण ७०% अर्थसहाय्य दिले गेले नसल्याने ५२ आठवडयात प्रकल्प पूर्ण करण्याची अट सदर संस्थांना लागू होत नाही. यास्तव अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सहकार विभागाकडून सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवल देण्यात येते. शासनाकडून भागभांडवल घेऊन ९० टक्के सहकारी संस्था सुरु होतात .परंतु या ठिकाणी सहकार विभागाने निधी देऊनही मागासवर्गीय सहकारी संस्था सुरु झालेल्या नाहीत. यामुळे सहकार विभागाचा यात दोष दिसून येतो असे समितीने नमूद केले असता सदर संस्था या सहकार विभागाकडे नोंदणीकृत असतात. सदर संस्थांचे नोंदणी, लेखापरीक्षण इ.जबाबदाऱ्या सहकार विभागाकडून पार पाडल्या जातात. तसेच सहकार कायदयाप्रमाणे सदर संस्थांवर कार्यवाहीचे अधिकार देखील सहकार विभागास आहेत. सहकार विभागातील अधिकाऱ्यांवर कार्यवाहीचा प्रश्न सामाजिक न्याय विभागाचे अखत्यारीत नाही असा खुलासा वि.स समितीसमोर केला.

८.१८० या घोटयाळयातील संबंधित व्यक्ती व अधिकाऱ्यांविरुध्द विभागाने येत्या दोन-तीन दिवसात फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशा प्रकारच्या सूचना समितीच्या वतीने विभागीय सचिवांना द्याव्यात. विभागाने संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द व अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करावेत असे

समितीने मत व्यक्त केले असता अशा प्रकारची कारवाई विभाग नक्की करणार आहे. परंतु, नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबंधितांना एक संधी देण्यात आली आहे. चौकशी समितीकडून तपासणी करण्यात येत आहे व त्याच्या माध्यमातून केलेले काम दाखवून देण्याची संधी संबंधितांना मिळणार आहे. त्यामध्ये ते दोषी आढळले तर विभागाकडून कारवाई करण्यात येणार आहे. तथापि, चौकशीला विलंब झाला, हे विभाग मान्य करतो असे विभागीय सचिव यांनी समितीस सांगितले.

८.१८१ समितीच्या अशा स्पष्ट सूचना आहेत की, या सर्व प्रकरणांत विभागाने संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करावेत, आवश्यक ती कारवाई करावी व समितीला ८ दिवसांच्या आत अहवाल सादर करावा असे निदेश दिले असता विभागाने खालील प्रमाणे माहिती समितीस दिली.

८.१८२ एकूण २४० पैकी ७१ संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचे चौकशी समित्यांनी अहवालामध्ये नमूद केले असल्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबंधित संस्थांवर प्रत्यक्ष कार्यवाही करण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी दिनांक २०.१.२०१४ ते १२.२.२०१४ पर्यंत या संस्थांच्या सुनावण्या आयुक्त, समाज कल्याण यांच्या कार्यालयात घेण्यात आल्या असून ७१ पैकी १६ संस्थांवर सहकार व समाज कल्याण विभागामार्फत गुन्हे दाखल करणेबाबत संबंधित जिल्ह्याचे उपनिबंधक, सहकारी संस्था व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना दिनांक १२.२.२०१४ रोजी कळविण्यात आले आहे

८.१८३ विभागाने दिलेल्या माहितीने समितीचे समाधान झाले नसल्याने समितीने पुन्हा दिनांक २२ नोव्हेंबर, २०१३ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय (कौन्सिल हॉल) पुणे, येथे विभागीय सचिव व प्रतिनिधींसमवेत साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने रमाई आवास योजनेसंदर्भात अधिक माहिती देण्याबाबत विभागास सांगितले असताना विभागीय सचिवांनी समितीस असे अवगत केले की, रमाई आवास योजनेअंतर्गत पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात किती लाभार्थ्यांची निवड करण्यात आली किती घरे बांधून पूर्ण करण्यात आली व किती घरे प्रगतीपथावर आहेत याची सद्य:स्थिती काय आहे, या विषयी माहिती देण्याबाबत सागितले असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, रमाई आवास योजनेकरिता सन २००८-२००९ ते सन २००१-२०१३ या कालावधीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे या याजनेअंतर्गत कोणतेही अनुदान प्राप्त झाले नाही. किंवा महानगरपालिकेने अनुदान घेतलेले नाही. तथापि, महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेकडून जेएनएनयुआरएम व बीएसयुपी योजनेअंतर्गत घरकुलांची योजना कार्यान्वित आहे. या माध्यमातून लाभार्थ्यांना घरे देण्याचे काम केले जात आहे.

८.१८४ रमाई आवास योजनेमधून महानगरपालिका क्षेत्रात काही घरे बांधता येतील व लाभार्थ्यांना त्याचे वाटप करता येईल, या दृष्टीने महानगरपालिकेने अनुदानाची मागणी का नोंदविली नाही, त्याची

आवश्यकता महानगरपालिकेला वाटली नाही का ? अशी विचारणा समितिने केली त्या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, जेएनएनयुआरएम व बीएसयुपी योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे अर्जदारांना घरे उपलब्ध करुन देता येत असल्यामुळे अन्य योजनेतून निधीची आवश्यकता महानगरपालिकेला वाटली नाही व त्यामुळे मागणी केलेली नाही तसेच पुणे महानगरपालिकेला रमाई आवास योजनेअंतर्गत १६.९१ लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे त्या अनुषंगाने डिसेंबर, २०१२ व ऑक्टोंबर २०१२ मध्ये अर्जदारांकडून अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी जाहिरात देण्यात आली होती. या माध्यमातून महानगरपालिकेकडे १०० अर्ज प्राप्त झाले होते. या सर्व अर्जांची नियम व निकषानुसार छाननी केल्यानंतर ३७ अर्ज पात्र ठरले होते त्यापैकी १८ अर्जदारांची कागदपत्रे अपूर्ण होती. कागदपत्रांची पूर्तता करण्याविषयी त्यांना कळविण्यात आले आहे. सामाजिक न्याय विभागाकडून ६१४३ लाभार्थ्यांची यादी महानगरपालिकेला प्राप्त झाली असून गलिच्छ वस्ती निर्मूलन योजनेअंतर्गत त्यांची तपासणी केली जात आहे.

८.१८५ या लाभार्थ्यांना विभागामार्फत रमाई आवास योजनेचा लाभ देणार आहात का ? अशी समितीने विचारणा केली असता सामाजिक न्याय विभागाकडुन जी यादी प्राप्त झाली आहे, त्यामधील अर्जाची रमाई आवास योजनेअंतर्गत विभागामार्फत तपासणी करत आहोत. बीसयुपीअंतर्गत बीपीएलमधील लाभार्थी पात्र ठरतात. विभागाकडे १२ अर्ज प्राप्त झाले होते, त्यामधील २ बीपीएलमधील व १० बीपीएलबाहेरील आहेत. ज्यांचे उत्पन्न वार्षिक २ लाख रुपयाच्या आत आहे, त्यांना बीएसयुपीअंतर्गत १५ टक्के घरे राखून ठेवली आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समिती समोर केला.

८.१८६ सामाजिक न्याय विभागाने सन २०११ मध्ये १६.९१ लक्ष रुपयांचा निधी पुणे महानगरपालिकेला दिला. महानगरपालिकेने अर्ज मागविल्यानंतर छाननी होऊन १२ अर्ज प्राप्त ठरले. जर महानगरपालिकेकडून हा निधी खर्च झाला नसेल तर तो ज्या ठिकाणी मागणी आहे, त्या ठिकाणी वर्ग करण्यात आला नाही. या योजनेचा निधी पुणे महानगरपालिकेकेडे तसाच पडून आहे. या महानगरपालिकेने योजनेवर खर्च न करता ठेव स्वरुपात हा निधी ठेवला आहे यामुळे योजनेचा मूळ उद्देश सफल होत नाही. सामाजिक न्याय विभागाकडून याबाबत संनियंत्रण केले जात नाही का ? अशी समितीने विचारणा केली असता महानगरपालिकेकडे ६१४३ लाभार्थ्यांची नवीन यादी प्राप्त झाली आहे. त्यामधून निश्चितच पात्र लाभार्थी सापडतील व निधी खर्च होईल अशी अपेक्षा आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

८.१८७ सन २००८-२००९ ते सन २०१०-२०११ या वर्षात उदिष्ट ०, निवड केलेले लाभार्थी ०, मंजूर तरतूद ०, झालेला खर्च ०,शिल्लक रक्कम ०, पूर्ण घरे ३०४ व अपूर्ण घरे ३३४, अशी माहिती

देण्यात आली आहे. सन २०१२-२०१३ मध्ये मंजूर तरतूद ० असून पूर्ण झालेली घरे २२७ दाखविण्यात आली आहेत.

८.१८८ पुणे शहराची माहितीनुसार महानगरपालिका क्षेत्रात निवड केलेले लाभार्थी १४८१ असून मंजूर तरतूद ४२७६.३४, खर्च झालेला निधी २९६२.०० शिल्लक रक्कम १३१४.३४ पूर्ण घरे ९३ व अपूर्ण घरे ६६६ दाखविली आहेत. नगरपालिका क्षेत्रात २९९ पूर्ण घरे व ९०५ अपूर्ण घरे दाखविली आहेत यासंदर्भात खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस असे अवगत केले की, ही आकडेवारी पुणे ग्रामीण भागीतील, तळेगांव,लोणावळा, इंदापूर, बारामती, सासवड, भोर, जुन्नर या नगरपालिकांची आहे. जुन्नर ६०, इंदापूर २१, जेजुरी २०, बारामती ३, शिरुर ३, लोणावळा ३ अशा एकूण १२२ घरांना मंजुरी दिलेली आहे. पुणे जिल्हयासह पाच जिल्हयांची माहिती देणे आवश्यक आहे. पुणे विभागातील माहितीची वर्गवारी करुन देण्यात यावी संपूर्ण माहिती जिल्हानिहाय देण्यात यावी असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीस असे अवगत केले की, पुणे-१२२, सातारा-२७०, सांगली-३५४, सोलापूर-१०२९, कोल्हापूर-५२८ अशा प्रकारे एकूण २३०३ घरे आहेत.

८.१८९ या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, २३०३ घरांचा आकडा पुणे विभागात दर्शविण्यात आला आहे. प्रत्येक महानगरपालिकेमध्ये किती घरे पूर्ण व किती घरे अपूर्ण आहेत याची माहिती देण्यात यावी. २३०३ घरांबाबत महालेखाकारांनी परिच्छेद काढला आहे, या विषयाबाबत महालेखाकार यांच्याशी बैठक झाली आहे काय? या प्रश्नाला यासंदर्भातील माहिती महालेखाकार कार्यालयास कळविण्यात आली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले

८.१९० पुणे विभागातील घरकुलांची माहिती आता आपण दिली आहे. पुणे विभागातील महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये किती घरकुले मंजूर झाली किती घरे पुर्ण आहेत व किती घरे अपूर्ण आहेत यासंदर्भातील माहिती देण्याबाबत सांगितले असता विभागाकडून माहिती प्राप्त झाली असून ती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

८.१९१ अनेक अपंग संस्थाचे अर्ज नसताना त्याना बोगस अनुदान का देण्यात आले आहे, अशा किती संस्था आहेत व त्यांची नावे काय आहेत, यासंदर्भात संबंधितांवर काय जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे अशी समितीने विचारणा केली असता अशा काही संस्था असतील तर त्याची विभागाकडून चौकशी केली जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

बीड जिल्हयातील नेकनूर येथील संस्थाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, सह.आयुक्त, सहायक आयुक्त आणि ३ प्रोदशिक

उपायुक्त यांनी दिनांक २८/०३/२०१३ रोजी प्रत्यक्ष दिली होती. सम्राट अशोक, शांतीदुत आणि नालंदा औद्योगिक सहकारी संस्थापैकी सम्राट अशोक मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थेची दिनांक २८/०६/२०१३ रोजी स्थळ पहाणी केली. या संस्थेचे बांधकाम पूर्ण झाले होते व जिल्हाधिकाऱ्यांनी उपयोगिता प्रमाणपत्र दिले आहे. त्यानुसार या संस्थेला दुसरा हप्ता दिलेला आहे. अन्य ३ संस्थाचे बांधकाम पूर्णत्वाच्या मार्गावर होते हा अहवाल दिनांक २ जुलै, २०१३ रोजी सादर केलेला आहे.

८.१९२ या चारही संस्थांची बांधकामे वेगवेगळया ठिकाणी आहेत व स्थळ पहाणीच्या वेळी प्रत्यक्ष जागेचे फोटो काढण्यात आले आहेत. या संदर्भात विभागाने असा आक्षेप नोंदविला आहे की, वारंवार कागदपत्रांची मागणी करुन देखील या चारही संस्थांनी चौकशी समितीस आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेली नाहीत. जे अनुदान शासनामार्फत संस्थांना दिले गेले आहे, त्याचा विनियोग कशा पध्दतीने केला, याबाबतची तपासाणी कागदपत्रांच्या आधारे करणे गरजेचे आहे आणि त्यासाठी ही कागदपत्रे आवश्यक होती. सहायक आयुक्त, बीड यांनी देखील कागदपत्रांची मागणी या संस्थेकडे केली होती. तथापि, कालपर्यत त्यांना कागदपत्रे प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष बांधकामावर किती खर्च करण्यात आला, याची तपासणी विभागाला कागदपत्रांआधारे करता आलेली नाहीत त्या ठिकाणी पक्के बांधकाम करण्यात आल्याचे प्रत्यक्ष स्थळ पहाणीच्या वेळी आढळून आले आहे. अधिकारी तपासणीसाठी येणार आहेत, याची पूर्वसूचना संबंधित संस्थांना देण्यात आली होती. ही पूर्वसूचना यासाठी देण्यात आली होती की, संस्था कागदपत्रे उपलब्ध करुन ठेऊ शकतील याच अनुषंगाने सहायक आयुक्त बीड यांनी समितीला अशी माहिती दिली की, चारही संस्थाची बांधकामे जवळपास पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सम्राट अशोक या संस्थेचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या बांधकामाचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मुल्यांकन करण्यात आले असून त्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी उपयोगिता प्रमाणपत्र दिले आहे. या संस्थेला दुसरा हप्ता अदा करण्यात आला असून संस्थेने आवश्यक यंत्रसामुग्रीची ऑर्डर दिली आहे. उर्वरित तीन संस्था नंतरच्या कालावधीतील आहेत या संस्थाचे शेडचे बांधकाम पूर्ण झाले असून ऑफिस, रंगकाम वगैरे कामे सुरु आहेत.यामधील एका संस्थेने मूल्यांकनाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केला असून अन्य दोन संस्थांनी अद्याप असा प्रस्ताव सादर केलेला नाही. या संस्थांनी कृषी व अन्य उद्योग उभारणीचे प्रकल्प सादर केले आहेत व त्यांना सन २०१०-११ व सन २०११ व २०१२ या आर्थिक वर्षात पहिला हप्ता अदा करण्यात आला आहे.

८.१९३ या संस्थांना अधिकतम अनुदान ७ कोटी रुपये मिळणार आहे. बांधकाम, यंत्रसामुग्री , कच्चा माल, आस्थापना खर्च लक्षात घेता ७ कोटी रुपयांमध्ये हे प्रकल्प उभे राहून कार्यरत होऊ शकतात का, याचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे अशा प्रकारचा अभ्यास विभागाने केला आहे का यासंदर्भात माहिती

देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, शासन निर्णयातील एका अटी नुसार संस्थेची प्रकल्पमुल्य मर्यादा ॲग्रीकल्चर फायनान्स कॉर्पोरेशन, नवी दिल्ली, दत्ताजी टेक्निकल इन्स्टिटयूशन, इचलकरंजी, मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड, मुंबई किंवा संबंधित वित्तीय संस्था यापैकी कोणत्याही एका संस्थेने निश्चित केल्याप्रमाणे ५ ते ७ कोटी रुपयांपर्यत ठरविण्यात आली आहे. तसेच यामध्ये अशीही अट आहे की, संस्थांनी यापैकी कोणत्याही एका संस्थेकडे प्रकल्प अहवाल तयार करुन घ्यावयाचा आहे. त्यामुळे प्रकल्पाची फिजिबिलिटी या तज्ज्ञ संस्थाकडून तपासली जाते. या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, जर या तज्ज्ञ संस्थांनी प्रकल्प तयार केला असेल किंवा तपासला असेल तर त्यामध्ये प्रकल्पाच्या प्रत्येक स्टेजला किती खर्च येईल, हे देखील नमूद केले असेल. उदाहरणार्थ, शेडचा खर्च एकूण प्रकल्प मूल्याच्या १५ टक्क्यांपेक्षा जास्त नसतो पण मशिनरीचा खर्च ७५ टक्क्यांपर्यत असतो. विभागाने मात्र मशिनरी खरेदी करण्यापूर्वी ४० टक्के रक्कम या संस्थांना अदा केली आहे. बांधकामासाठी येणाऱ्या खर्चाएवढीच रक्कम पहिला हप्ता म्हणून या संस्थांना द्यावयास हवी होती. तसेच, विहित मुदतीत बांधकाम झाले नाही आणि प्रकल्प ८-८ वर्षे रखडला तर एकूण प्रकल्प मूल्यामध्ये मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे, हे निश्चित आहे. त्यामुळे आता हे प्रकल्प व्हायबल होतील का, हा देखील एक प्रश्न आहे. म्हणूनच, औद्योगिक प्रकल्प उभारताना कालमर्यादा पाळणे अतिशय गरजेचे असते. शासन अनुदान देणार असल्यामुळे, शासनाचा निधी वाया जाऊ नये, संस्थांनी प्रकल्प उभारणीची कालमर्यादा पाळावी, याची दक्षता विभागाने घेणे गरजेचे होते ही कार्यवाही विभागाकडून झाल्याचे दिसून येत नाही असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

८.१९४ सम्राट अशोक शांतीदूत आणि नालंदा व अन्य एक अशा चार संस्थांना पहिला हप्ता केव्हा दिला त्याची तारीख कोणती अशी समितीने विचारणा केली असता सम्राट अशोक मागासवर्गीय संस्थेला १८ ऑगस्ट, २०१० रोजी पहिला हप्ता देण्यात आला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.१९५ या चार संस्थांना पहिला हप्ता दिल्यानंतर ५२ आठवडयात त्यांनी काम सुरु केले असा अहवाल दिला होता काय? तसा अहवाल दिला नसेल तर त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली आहे? या संदर्भात विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, बीड जिहयातील नेकनूर येथील संस्थांनबाबतचा अहवाल सहआयुक्त, समाज कल्याण यांचे अध्यक्षतेखालील समितीने यापूर्वीच दिनांक २ जुलै, २०१३ रोजी शासनास सादर केलेला आहे. श्री. सुरेश कांबळे, प्रादेशिक उपायुक्त,औरंगाबाद यांनी दिनांक २४.११.२०१३ रोजी पुन्हा संस्थेस भेट देऊन देखील संस्थेने तपासणी पथकाला आर्थिक बाबीशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

८.१९६ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बीड यांनी त्यांचे पत्र क्र. २७, दिनांक ७.१.२०१४ अन्वये असे कळविले आहे की, सदर चार संस्थांचे ऑडीट करणेसाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी श्री. एस.बी.देशमुख लेखापरिक्षक श्रेणी-२ यांची नियुक्ती केली असून या संस्थांचे ऑडीट करण्यासाठी श्री. देशमुख यांचेकडून रेकॉर्ड दिलेले आहे. ऑडीट करण्याची प्रक्रीया सुरु आहे. या संस्थांचे ऑडीट झाल्यानंतर संबंधित ऑडीटर यांच्या अहवालानुसार संस्थावर कारवाई प्रस्तावित करणे योग्य होईल.

लेखा परिक्षण अहवालात प्रतिकुलता दिसून आल्यास सदर संस्थांवर सहकार विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित करणेत येईल.

८.१९७ ज्या वेळी पहिला हप्ता देण्यात आला तेव्हा कागदपत्रांची पाहणी करण्यात आली नव्हती का ? अशी समितीने विचारणा केली असता ज्यावेळी पहिला हप्ता देण्यात आला तेव्हा कागदपत्र पूर्ण देण्यात आली होती तथापि जेव्हा पाहणी करण्यासाठी गेलो तेव्हा प्रत्यक्ष खरेदीचे रेकॉर्ड दाखविले नाही, त्यांनी अजूनही त्यासंदर्भातील रेकॉर्ड उपलब्ध करुन दिले नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले. संबंधित संस्थांनी नियमाप्रमाणे रेकॉर्ड उपलब्ध करुन दिले नाही तर त्यांना कारणे दाखवा नोटीस द्यावयास पाहिजे होती. त्यानंतर त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावयास पाहिजे होता ही कार्यवाही का करण्यात आली नाही ? या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला.

८.१९८ सदर चार संस्थाचे ऑडीट करणेसाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी श्री.एस.बी.देशमुख लेखापरिक्षक श्रेणी-२, यांची नियुक्ती केली असून या संस्थाचे ऑडीट करण्यासाठी श्री. देशमुख यांचकडे रेकॉर्ड दिलेले आहे.ऑडीट करण्याची प्रक्रिया सुरु आहे.या संस्थाचे ऑडीट झाल्यानंतर संबंधित ऑडीटर यांच्या अहवालानुसार संस्थांवर कारवाई करणे योग्य होईल.

८.१९९ लेखा परिक्षण अहवालात प्रतिकुलता दिसून आल्यास सदर संस्थांवर सहकार विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित करणेत येईल.

८.२०० या विषयाबाबत समितीचे स्पष्ट मत आहे की, संबंधित संस्थांनी वेळोवेळी कागदपत्र दिले नाहीत. काही ठिकाणी चार पाच वर्षापासून फक्त शेड बांधण्यात आले आहे. त्यांनतर त्यांनी काहीही काम केले नाही. त्यामुळे या सहकारी संस्थांनी शासनाची १०० टक्के फसवणूक केली आहे. करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे. त्यामुळे संबंधितांवर ताबडतोब फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

८.२०१ तसेच ज्यावेळी काही संस्थांनी दुसऱ्या हप्त्याची रक्कम देण्यात येईल त्यावेळी ज्या कंपनीकडून मशीनरी घेण्यात येईल, त्या कंपनीच्या नावे तो चेक देण्यात यावा, असे केले तर यात गैरव्यवहार कमी प्रमाणात होईल असे मत ही समितीने व्यक्त केले.

८.८०२ लघु उद्योग उभारण्यासाठी लेथ मशीन व इतर साहित्य लागते, त्यांचे कोटेशन मागवून त्या कंपनीच्या नावे चेक दिला पाहिजे. वैयक्तिक नावाने चेक देण्यात येऊ नये. बांधकामाच्या निधीचा चेक कंत्राटदाराच्या नावाने दिला पाहिजे अशी सूचना समितीने केली असता महापालिका आयुक्त व संस्थेचे अध्यक्ष यांच्या संयुक्त नावाने चेक दिला जातो. यासाठी एक संनियंत्रण समिती नियुक्त करण्यात आली आहे. ही समिती जिल्हा स्तरावर असून या समितीचे सदस्य सहाय्यक आयुक्त आहेत. कोणताही आर्थिक निर्णय संनियंत्रण समितीमार्फत घेतला जातो. समितीची बैठक नियमित घ्यावी अशी सूचना आहे. प्रादेशिक उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निविदा प्रक्रिया पार पाडली जाते. समितीसमोर निविदा सादर करुन ही प्रक्रिया सुरु झाली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

८.२०३ विभागाने आता सांगितल्याप्रमाणे ही बाब अतिशय गंभीर आहे. जिल्हा पातळीवर संनियंत्रण समिती आहे. त्यांच्या सल्ल्यानुसार हे कामकाज चालू आहे. त्यांच्या सल्ल्यानुसार जर की कामे होत असतील तर यामध्ये सर्वच अधिकारी दोषी आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता या समितीमध्ये सहाय्यक आयुक्त, जिल्हा उद्योग अधिकारी, सहकार विभागाचे अधिकारी व प्रादेशिक उपायुक्त आहेत तसेच निविदा काढून सर्व कार्यवाही केली जाते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

८.२०४ ज्या १८२ संस्थांना पहिला हप्ता दिला त्याची प्रगती का झाली नाही, याबाबत समितीस अहवाल देणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले होते त्यानुसार विभागाकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

८.२०५ एकूण १८२ प्रथम हप्ता देवून उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केलेल्या व ५८ संस्थांना ७०% अर्थसहाय्य पूर्ण अदा केलेल्या अशा एकूण २४० संस्थांची तपासणी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांचे अध्यक्षतेखाली समित्यांकडून करण्यात आलेली आहे. त्यांचे अहवाल प्राप्त झाले असून सोबत प्रपत्रामध्ये गोषवारा सादर करण्यात येत आहे. एकूण २४० पैकी ७१ संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचे चौकशी समित्यांनी अहवालामध्ये नमूद केले असल्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबंधित संस्थांवर प्रत्यक्ष कार्यवाही करण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी दिनांक २०.१.२०१४ ते १२.२.२०१४ पर्यंत या संस्थांच्या सुनावण्या आयुक्त, समाज कल्याण यांच्या कार्यालयात घेण्यात आल्या असून ७१ पैकी १६ संस्थांवर सहकार व समाज कल्याण विभागामार्फत गुन्हे दाखल करणेबाबत संबंधित जिल्ह्याचे उपनिबंधक, सहकारी संस्था व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना दिनांक १२.२.२०१४ रोजी कळविण्यात आले आहे.

८.२०६ सहाय्यक आयुक्त, हे संचालक मंडळातील सदस्य आहेत. तथापि, संस्था चालक त्यांना बैठकीकरिता बोलवित नसल्याची बाब सहाय्यक आयुक्तांनी निदर्शनास आणली आहे. याबाबत यापुढे सर्व बैठकांना सहाय्यक आयुक्तांना बोलविण्याबाबत कळविणेत येत आहे.

८.२०७ आतापर्यंत किती आश्रमशाळा बंद झाल्या व त्या कोणत्या संस्थेकडे हस्तांतरित करण्यात आल्या याची जिल्हानिहाय व संस्थानिहाय माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सांगितले असता सन २००९-२०१० ते २०१३-१४ मध्ये मान्यता काढलेल्या शाळांची संख्या ३२ आहे. त्यापैकी ७ आश्रमशाळा स्थलांतरीत केल्या आहेत. ७ स्थलांतरित आश्रमशाळांपैकी ६ शाळा कार्यरत असून अद्याप एक शाळा सुरु नाही. ७ पैकी ४ शाळांची न्यायालयीन प्रकरणे सुरु आहेत. ९ शाळा शासन स्तरावर अपिलामध्ये आहेत ८ शाळा न्यायप्रविष्ठ आहेत. ५ शाळांना शासनाने अपिलामध्ये सुधारणेसाठी संधी दिली आहे ३ शाळा स्थलांतरित ठिकाणी सुरु झाल्या आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

८.२०८ आश्रमशाळा स्थलांतर करण्याच्या अटी व शर्तीबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी यासंदर्भात १ ऑगस्ट, २००७ चा शासन निर्णय आहे त्यातील महत्वाचा भाग खालीलप्रमाणे असल्याचे समितीस सांगितले व तो वाचून समितीस अवगत केला.

१. शासनाने मान्य केलेल्या बृहत आराखडयाप्रमाणे संस्थेच्या आश्रमशाळेचे ठिकाण असल्यास व त्याठिकाणी संबंधित संवर्गाची लोकसंख्या निकषाप्रमाणे असून विद्यार्थी संख्या पुरेशी आहे व सर्व प्रकारच्या मुलभूत सोयी-सुविधा निवासी शाळेसाठी उपलब्ध करुन देत आहे अशा परिस्थितीत शाळेच्या स्थलांतरास मान्यता देता येणार नाही. मात्र खालील बाबी लक्षात घेऊन राज्य शासन/संचालक एखाद्या विशिष्ट परिस्थितीत स्थलांतरास परवानगी देईल.
२. आश्रमशाळा ज्या ठिकाणी कार्यान्वित आहे अशा ठिकाणी सिंचन प्रकल्प अथवा इतर सार्वजनिक उपक्रम सुरु होणार असतील व त्यासाठी सदरच्या जागेचे अधिग्रहण करणे आवश्यक असेल किंवा पूर, भूकंप इत्यादीसारख्या नैसर्गिक आपत्तीचा धोका असेल किंवा
३. सध्या निवासी शाळा ज्या ठिकाणी आहे त्या सभोवतालची अनेक गावे दुसरीकडे वसाहतीसाठी गेल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे निवासी शाळेच्या टापूत असलेली लोकसंख्या कमी झाल्यामुळे निवासी शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ५० टक्के पेक्षा कमी असल्यास किंवा
४. ज्या ठिकाणी निवासी शाळा असेल त्याठिकाणी मूलभूत सोयी उदा. जमिनीची उपलब्धता, वीज व पाण्याची उपलब्धता इत्यादीबाबत गंभीर समस्या असल्यास किंवा जातीय तणाव, गटबाजीचा संघर्ष इत्यादी ठिकाणी प्रमाणात वाढणे यासारख्या सार्वजनिक अशांततेच्या घटना वारंवार घडल्यामुळे निवासी

शाळेची विद्यमान जागा असुरक्षित असल्यास त्या जिल्हयात १० कि.मी. च्या परिसरातील अन्य ठिकाणी लोकसंख्या व शाळा सुरु करण्यास प्राथमिक व मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध असल्यास त्या ठिकाणी स्थलांतरास परवानगी शासनाच्या पूर्व परवानगीने संचालक, विजाभज संचालक, समाज कल्याण यांच्याकडून दिली जाईल.

८.२०९ या संस्थांनी शासनाकडे अर्ज केला तर त्या संस्थांना परवानगी देण्यात येते काय ? अशी विचारणा समितीने केली असता पूर्वी असा अर्ज करुन तो शासनाकडे पाठविण्यात येत होता. त्यानंतर हे धोरण बदलण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १६ ऑक्टोंबर, २०१२ रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यामुळे आता धोरणात बदल झाला आहे. बदललेल्या धोरणानुसार सर्व पत्रामध्ये आता जाहिरात देण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी समिती समोर केला.

८.२१० सन २०१२ च्या शासन निर्णयाअगोदर अर्ज करण्यात येत होते. त्यानुसार जिल्हा वर्धा, तालुका देवळी येथील संस्था जाणुनबुजून बंद करण्यात आली आहे. यवतमाळ येथील सिध्दीविनायक संस्थेचा अर्ज होता. अशा प्रकारे २५ संस्थाच्या अर्जाची यादी समितीकडे आहे. या सर्व संस्थांची यादी बाजुला ठेऊन सिध्दीविनायक बहुउद्देशीय संस्थेला परवानगी देण्यात आली आहे. या सर्व संस्थांनी सर्व कागदपत्रे सन २०१० च्या अगोदर शासनाकडे सादर केली आहेत, त्यामुळे या सर्व संस्थांना परवानगी देण्यात येईल का? त्याचप्रमाणे १ जून २०१० रोजी सहकार विभागाने आदेश काढला आहे. त्यानुसार २५ अर्ज आले आहेत. यामध्ये जय बजरंग संस्था व इतर २४ संस्था होत्या त्यांना परवानगी देण्यात आली आहे. यवतमाळ येथील सिध्दीविनायक संस्थेचा अर्ज होता त्या संस्थेला परवानगी दिलेली नाही. त्या नस्तीवर सचिवांचे काय अभिप्राय आहेत, सचिवांनी जरी हे करता येणार नाही असा शेरा मारला तरी मंत्री महोदय त्यांच्या अधिकारात सकारात्मक निर्णय घेऊ शकतात. यासंदर्भात नेमके काय झाले आहे त्याची सर्व कागदपत्रे समितीस देण्यात यावीत असे समितीने सांगितले असता विभागाने खालील माहिती समितीस दिली.

८.२११ गोंडवाना मुक्ती मिशन आनंदनगर जि.वर्धा संचलित जयभवानी प्रा.आ.शा.मौजे अंजीअंदुरी ता.देवळा जि.वर्धा या शाळेची मान्यता संचालनालयाचे आदेश क्र.विजाभजसं/ आशा/मा.र./ अंजीअंदुरी/वर्धा/२००९-१०/२९९५ दि.३०.९.२००९ अन्वये रद्द करण्यात आली. शासन निर्णय क्र.विभशा-२०१०/प्र.क्र.२७/मावक-६ दि.१ जून, २०१२ अन्वये सदर शाळा सिध्दीविनायक बहुउद्देशीय ग्रा.वि.संस्था ता.दिग्रस जि.यवतमाळ या संस्थेस मौजे सिंगद ता.दिग्रस जि.यवतमाळ येथे अनुदान तत्वावर हस्तांतरीत व स्थलांतरीत करण्यात आली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमशाळा, धानोरा आणि परभणी येथील रामाराव जाधव आश्रमशाळा यांच्या जागा बदलण्याबाबतचा या संस्थांचा प्रस्ताव पाठविलेला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

८.२१२ अमरावती विभागात ३ कोटी रुपयांची खरेदी झाली आहे आणि शासन स्तरावरही खरेदी झाली आहे याबाबत समितीने अधिक माहिती विचारली असता अमरावती विभागात ३ कोटी रुपयांची खरेदी झालेली नाही. तथापि सविस्तर माहिती अशी आहे की, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, अमरावती यांचे स्तरावर सन २०११-१२ ते २०१२-१३ मध्ये आयुक्तालयाच्या पुरवठा होण्यापूर्वी अनु.जाती मुलामुलींच्या निवासी शाळा व शासकीय वसतीगृहांना रक्कम रुपये तीन कोटीची खरेदी करण्यात आली नसून एम.एस.एस आय.डी.सी. अमरावती कडून गादी,उशी,चादर,बेडशीट, उशी कव्हर रक्कम रु. ४८२७५००/- तसेच फर्निचर खरेदी रक्कम रुपये ४०९५६८७/- ची करण्यात आली आहे. अशाप्रकारे एकुण रु. ४८२७५०० + ४०९५६८७ = ८९२३१८७ ची खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच आवश्यक तेवढी खरेदी तातडीचे आवश्यकता असल्याने साहित्य घेतले आहे व वसतीगृहे व निवासी शाळांना वाटप केले आहे. सदर खरेदी एम.एस.एस.आय.डी.सी मार्फत करण्यात आलेली आहे जादाचे साहित्य खरेदी करण्यात आले नाही तसेच शासनाने प्रत्येक वसतीगृहातील मुलांना वस्तुचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतला होता. एकाच वेळी सर्व वसतीगृहात हा पुरवठा करावयाचा होता. तथापि तो होऊ न शकल्यामुळे विभागीय स्तरावर खरेदी करण्यास परवानगी दिली होती असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

८.२१३ प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, अमरावती यांचा सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे सदर अहवाल लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

यामध्ये अनियमितता व भ्रष्टाचार झाला आहे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच महालेखापरिक्षक यांच्या अहवालात देखील हा मुद्दा आला आहे परंतु तो विस्ताराने आलेला नाही. लोकप्रतिनिधी ही माहिती मिळवितात किंवा त्यांना ती माहिती मिळते व त्या अनुषंगाने ती माहिती लक्षात आणून देण्याचा प्रयत्न ते करीत असतात. परंतु, अधिकाऱ्यांकडून या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळालेली नाहीत याबद्दल समितीने नाराजी व्यक्त केली. गत ३ वर्षातील खरेदी संदर्भातील सर्व माहिती समितीला सादर करण्याबाबत विभागीय सचिवांनी आश्वासित केले त्यानुसार विभागाने यासंदर्भातील माहिती लोकलेखा समितीकडे पाठविली असून ती कक्षात उपलब्ध आहे.

८.२१४ यापूर्वी विभागाने ३५ कोटी रुपयाची संगणक खरेदी केली होती, परंतु पुरविण्यात आलेली संगणक सामुग्री कालबाहय असल्यामुळे त्यांचा वापर झाला नाही व शासनाचा निधी बुडाला. आता या

विभागाने संगणक प्रशिक्षणाची नवीन योजना आणली आहे व त्यावर ४० कोटी रुपय खर्च केले आहेत. ज्यांनी कालबाहय सामुग्री पुरविली त्यांनाचा पुन्हा कंत्राट देण्यात आले आहे. प्रशिक्षणार्थ्यांच्या केवळ स्वाक्षऱ्या घेतल्या जात आहेत आणि कंपनीला प्रशिक्षण शुल्क दिले जात आहे या समितीने व्यक्त केलेल्या मताच्या अनुषंगाने विभागाने पुढील माहिती सादर केली.

८.२१५ शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई क्र.बीसीएच-२००२/प्र.क्र.२६८/मावक-४, दिनांक ४/७/२००३ व शासन शुध्दीपत्रक क्र.बीसीएच-२०१०/प्र.क्र.२६८/ मावक-४, दि.१८/८/२०१० अन्वये राज्यातील मागासवर्गीय मुलामुलींसाठी कार्यरत असलेल्या शासकीय वसतीगृहातील २० विद्यार्थ्यांसाठी एक संगणक संच व प्रशिक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार शासनाने आदेश क्र.बीसीएच-२०१०/प्र.क्र.१३८/मावक-४, दि.१८/८/२०१० नुसार शासनाने राज्यातील २७१ शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी संगणक कक्ष उभारुन संगणक, व्यक्तीमत्व विकास, इंग्लिश स्पीकींग, संभाषण कौशल्य व स्पर्धा परिक्षेबाबत ज्ञान, इंटरनेट बाबतचे प्रशिक्षण इ.प्रशिक्षण देण्यात आदेश काढण्यात आले होते.

८.२१६ शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१०/प्र.क्र.१३८/मावक-४, दिनांक १८/८/२०१० नुसार शासनाने सन २०१०-११ ते २०११-१२ या वर्षासाठी मे.हिंदुस्तान कॉम्प्युटर्स, मालेगांव नाशिक यांनी बीओटी/प्रायोगिक तत्वावर रक्कम रु.१४२३५३९१०/-चे प्रशिक्षणाचे काम दिले होते. दरम्यानच्या कालावधीत मे.हिंदुस्थान कॉम्प्युटर्स, मालेगांव, जि.नाशिक मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.८५४८/२०१० याचिका झाली होती. उच्च न्यायालयाचे दिनांक १३/१२/२०१० चे आदेशानुसार शासन निर्णय दिनांक १८/८/२०१० रद्द करण्यात आला होता. मे.हिंदुस्तान कॉम्प्युटर्स, मालेगांव, जि.नाशिक यांनी पुरवठा करण्यात आलेल्या संगणक व संगणक साहित्याचा दर निश्चित करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २४/१२/२०१० अन्वये समिती गठीत करण्यात आली होती.

८.२१७ शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१०/प्र.क्र.१३८/शिक्षण-२, दि.१२/३/२०१२ नुसार सदर कंपनीने संगणक ११०८ लेझर प्रिन्टर २६५, युपीएस २६५, संगणक टेबल ११०८, खुर्ची १३०७, स्टुल २२१२ असे एकूण रक्कम रु.४८८६६७५१/- चे साहित्य पुरवठा केले होते. सदर पुरवठा केलेल्या साहित्याची रक्कम रु.४८८६६७५१/- सदर कंपनीस अदा करण्यात आली आहे. सदर संगणक सद्यःस्थितीत सुरु असून वापरात आहेत. प्रशिक्षणाची कार्यवाही करण्यात आली नसल्याने जादाची रक्कम सदर कंपनीस देण्यात आलेली नाही. त्यामुळे रु.३५ कोटी संगणकावर यापूर्वी खरेदी करण्यात आलेली नाही. तसेच परत त्यांनाच प्रशिक्षणाचे काम देण्यात आलेले नाही.

८.२१८ त्यानंतर ईनिविदा काढून शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१२/प्र.क्र.१३९/शिक्षण-२, दि.१२.७.२०१२ अन्वये रु.३५४०३६४६८/- ची मान्यता देण्यात आली त्यानुसार आयुक्तालयाचे आदेश क्र.९७५ दि.३/८/२०१२, ९७६, दि.३/८/२०१२ व ९७९ दि.३/८/२०१२ अन्वये आयुक्तालयामार्फत प्रति विद्यार्थी दर रु.९५५१/- प्रमाणे संगणक प्रशिक्षणाचे पुरवठा आदेश (१) व्यवस्थापक, कोर एज्यु.टेक्नॉ. लि.मुंबई (२) व्यवस्थापक, मे.झेनिथ सॉप्ट लि.मुंबई (३) व्यवस्थापक, मे.बिर्लाश्लोका एलि.मुंबई या कंपनीला देण्यात आले आहेत. सन २०१२-१३ मध्ये रक्कम रु.२४७८२५५२६/- इतकी रक्कम आतापर्यंत अदा केलेली असून राहिलेली रक्कम रु. १०६२१०९३९/- ही प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले व त्यांची परिक्षा घेऊन प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वितरीत केल्याची खात्री केल्यावरच संबंधित कंपनीला अदा करण्यात येईल. सदर कंपन्यांकडून बँक गॅरन्टी देण्यात येत आहे. २ कंपन्याची गॅरंन्टी प्राप्त झाली आहे. तसेच हिंदुस्थान कॉम्प्युटर्स मालेगांव यांनाच परत प्रशिक्षणाचे काम देण्यात आलेले नाही.

८.२१९ सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित आश्रमशाळा आहेत तसेच विविध योजना आहेत. या योजनांचे मूल्यमापन करण्यात येत आहे. सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत समिती समाधानी नाही. या योजनांची सर्व माहिती मागविण्यात आली आहे. यासंर्भातील अहवाल तयार करतांना सर्व बाबींचा समावेश त्यामध्ये करावा लागणार आहे. आश्रमशाळांच्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत. आश्रमशाळेतील मुला-मुलींची उपस्थिती अनुदानावर होणारा खर्च यांचा विचार करावा लागणार आहे. सन १९८४ च्या शासन निर्णयानुसार मुला मुलींचे डायटेशन ठरवून देण्यात आले आहे. कित्येक आश्रमशाळामध्ये त्याचे पालन होन नाही. त्यामुळे त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होत नाही. दूध,अंडी, फळे, चिकन, मटन व भाजीपाला या सर्वाचे पैसे कंत्राटदार घेत असतो. परंतु त्या प्रमाणात पुरेसे अन्न विद्यार्थ्यांना मिळत नाही. शासनाचे यावर करोडो रुपये खर्च होतात. १०० ते १५० मुलांचं जेवण तयार करण्यात येत असून त्यामध्ये १८० ते २०० मूले जेवण करतात. कंत्राटदार ३०० मुलांचे पैसे लावत असून प्रत्यक्षात फक्त १८० मुले जेवण करतात. तेथील मुलांना पोटभर अन्न दिले जात नाही. कंत्राटदारांवर अंकुश ठेऊन त्याचा फायदा मुलांना होईल याचा विचार केला पाहिजे असे स्पष्ट मत समितीने व्यक्त केले तसेच वसतीगृहातील आठवडयाचा आहार काय असतो कारण त्या आहाराचा चार्ट सर्व समिती सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात यावा असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीत पुढील प्रमाणे माहिती अवगत केली.

१. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजनात गहू/बाजरी/ज्वारी/तांदूळ (भात)/डाळ/भाजीपाला/कंदभाजी इत्यादी वस्तुचा पुरवठा अमर्यादित (पोटभर) करण्यात यावा.

२. नास्त्यासाठी विद्यार्थ्यांना उसळ/पोहे/उपमा/शिरा यापैकी एक दूध (साखरेसह), उकडलेली २ अंडी दररोज व शाकाहारी मुलांसाठी कॉर्न प्लेक्स (सिरीयल) प्रत्येक दिवशी एक सफरचंद व ऋतुमानाप्रमाणे मिळणारे एक फळ(शासकीय वसतीगृहासाठी)

३. मटन/चिकन दर आठवडयाला५०० ग्रॅम प्रति विद्यार्थी या प्रमाणे आठवडयातून दोनदा, दरवेळी प्रति विद्यार्थी २५० ग्रॅम प्रमाण भात/पुलाव सलाड सह (शासकीय वसतीगृहासाठी)

४. शाकाहारी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक वेळी २ भाज्या, वरण व दही, भात व एक गोडपदार्थ आठवडयातून २ वेळा (शासकीय वसतीगृहासाठी)

५. दररोज प्रत्येक जेवणात आवश्यक तेवढे कांदा,लिंबू,लोणचे,पापड, सलाड व ५० ग्रॅम गावरान तूप (दर आठवडयाला) (शासकीय वसतीगृहासाठी)

६. कंत्राटदारांची निवड २ पाकीटातून लिलाव पध्दतीनुसार करावी व अनुभवी व नामांकीत कंत्राटदार असावा. (शासकीय वसतीगृहासाठी)

८.२२० या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, या प्रमाणे सर्व वसतीगृहामध्ये कारवाई होते काय? या समितीच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, या सर्व सुविधा शासकीय वसतिगृहांसाठी व शासकीय अनुदानित वसतिगृहांसाठी देण्यात येतात. जर या सुविधा मिळाल्या नाहीत तर विद्यार्थी तक्रार करु शकतील.

सिंधुदूर्ग जिल्हयातील शासकीय वसतीगृहातील दोन विद्यार्थ्यांना भोजन मिळत नसल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली यासंदर्भात विभागाने पुढील माहिती समितीस अवगत केली.

८.२२१ शासनाचे आदेश दिनांक १०/१२/२०१३ रोजी श्री. ओंगले, यांचेकडून अतिरिक्त कार्यभार काढून घेण्यात आलेला आहे. संबंधित अधिकारी, सामाजिक न्याय विभागाचा नसून वित्त व लेखा सेवेतील आहे. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सिंधुदूर्ग हे पद रिक्त असल्याने व अतिरिक्त कार्यभार देण्यास अन्य अधिकारी उपलब्ध नसल्याने, तात्पुरती व्यवस्था म्हणून श्री. ओगले, सहाय्यक संचालक(लेप) प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, याचेकडे अतिरिक्त कार्यभार सुपूर्त करण्यात आला होता.

८.२२२ वसतिगृहामध्ये प्रत्येक आठवडयाला काय आहार देण्यात येतो याचा संपूर्ण तक्ता वसतिगृहातील मुलांच्या पालकांना दिला पाहिजे. अशा प्रकारे तक्ता दिला जात नसेल तर समितीने तशी शिफारस करावी असे समितीने मत व्यक्त केले यासंदर्भात २०११ चा शासन निर्णय आहे त्यानुसार आठवडयाच्या आहाराचा तक्ता ठरलेला आहे. त्याप्रमाणे वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पोटभर जेवण दिले जाते. वसतीगृहाच्या सूचना फलकावर आहाराचा तक्ता दररोज लावला जातो. दरमहा नियमाप्रमाणे ९०० रुपये निर्वाह भत्ता दिला जातो.

८.२२३ सामाजिक न्याय विभागाची या संदर्भातील अपसेट प्राईस किती आहे? कारण, पुरवठा करावयाच्या वस्तूचे किमान व कमाल दर काढून किमान व कमाल दराच्या सरासरीनुसार येणारे दर लक्षात घेऊन अपसेट प्राईस निश्चित केली जाते. अशा प्रकारची अपसेट प्राईस सामाजिक न्याय विभागाने निश्चित केली आहे का? तसेच, निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटदारांकडून पुरवठा होतो आहे किंवा नाही, याची तपासणी केली जाते का? यासंदर्भात वेळोवेळी तपासणी केली जाते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

८.२२४ सोलापूर जिल्हयात आश्रमशाळांच्या नावाखाली ५ कोटी रुपयांचे बोगस अनुदान उचलले गेले असून ही बाब चौकशीत सिध्द झाली आहे. या अनुदानाची वसूली करण्यात आली आहे का ? तसेच विभागात रिक्त असलेल्या पदांबाबतची माहिती सादर करण्याबाबत सांगितले असता वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे एमपीएससीकडून भरली जात आहेत. त्याचप्रमाणे वर्ग-३ व वर्ग -४ ची पदे विभागाच्या स्तरावर भरण्याची प्रक्रीया सुरु असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

८.२२५ मध्यंतरीच्या काळात काही आश्रमशाळांवर अकार्यक्षमतेचा ठपका ठेऊन त्या रद्द करण्यात आल्या. नंतर याच आश्रमशाळा अन्य संस्थांना वितरीत करण्यात आल्या. अशा १२ ते १३ संस्था आहेत. याबाबतची माहिती देखील समितीला सादर करावी असे समितीने विभागास सूचित केले त्याअनुषंगाने विभागाने पुढील खुलासा केला.

८.२२६ सन २०१० पासून आजपर्यंत प्राथमिक व माध्यमिक एकूण ३२ आश्रमशाळांतील गैरकारभार/गंभीर उणीवा तसेच शासनाच्या ध्येयधोरणाप्रमाणे शाळांचे कामकाज चालवित नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे संचालनालय स्तरावरुन मान्यता रद्द करण्याची नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. मान्यता रद्द केलेल्या ३२ पैकी ९ शाळांना शासन स्तरावरुन कामकाजात सुधारणा करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. ६ संस्थांच्या सुनावणीचे काम शासन स्तरावर सुरु आहे. मान्यता रद्दचे संचालनालयाचे आदेश कायम केलेल्या शाळांपैकी ७ शाळांची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. मान्यता रद्द केल्यानंतर ७ शाळांचे हस्तांतरण/स्थलांतरण करण्यात आले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

क्र.	मान्यता रद्द केलेल्या शाळेचे नांव व ठिकाण	मान्यता रद्द केल्याचा दिनांक	सदर शाळा हस्तांतरीत केलेल्या संस्थेचे नाव	शाळा स्थलांतर करण्यात आलेले ठिकाण	हस्तांतरण आदेश दिनांक	अभिप्राय
१	जयभवानी प्राथ.आ.शा.मौ.अंजी-अंदुरी ता.देवळी जि.वर्धा	३०.९.२००९	सिध्दीविनायक बहुउद्देशीय ग्रा.वि.संस्था ता.द्रिगस, जि.यवतमाळ	मौजे सिंगद ता.दिग्रस, जि.यवतमाळ	१.६.२०१०	
२	प्राथमिक आ.शा.लालखेड जि.अमरावती	२०.२.२०१०	अष्टविनायक शि.प्र.मं.अहेरी ता.अहेरी, जि.गडचिरोली	शेगाव (बु) ता.वरोरा, जि.चंद्रपूर	१.६.२०१०	
३	संत भाकरे महाराज प्रा.आ.शा.सारवाडी ता.कारंजा, जि.वर्धा	४.८.२००९	हंस शिक्षण क्रीडा व्यायाम प्रसारक मंडळ पिंपळखुटा ता.बार्शी टाकळी, जि.अकोला	मौजे पिंपळखुटा ता.बार्शीटाकळी, जि.अकोला	३०.८.२०११	
४	श्री.तिरुपती बालाजी प्राआशा डिग्गेवाडी ता.अक्कलकोट, जि.सोलापूर	२०.८.२०१०	सत्यसाई बहुउद्देशीय ग्रा.वि.संस्था दत्तापुर, ता.घाटंजी, जि.यवतमळ	मौजे घोटी ता.घाटंजी, जि.यवतमाळ	३०.८.२०११	
५	कै.सिद्रमप्पा पाटील मा.आशा कडबगाव ता.अक्कलकोट, जि.सोलापूर	२०.८.२०१०	शिक्षण सुधार समिती चालबर्डी, ता.केळापूर, जि.यवतमाळ	उमरीरोड, ता.केळापूर, जि.यवतमाळ	२.१.२०१२	
६	प्रबोधनकार ठाकरे प्रा.आ.शा.तळेगाव ता. चाळीसगाव, जि.जळगाव	२३.८.२०१०	ज्ञानेश्वर शिक्षण संस्था इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली	चौडी, ता.जामखेड, जि.अहमदनगर	२.१.२०१२	
७	प.पू.परशिवप्पा प्रा.आ.चुंगी ता.अक्कलकोट, जि.सोलापूर	१२.३.२०१२	विद्या प्रतिष्ठाण, बारामती, जि.पुणे	बारामती, जि.पुणे	७.९.२०१२	

८.२२७ राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये डायरेक्ट ट्रान्सफर योजनेनुसार लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याचे काम सुरु झाले आहे. यासाठी आधार कार्ड आणि बँक खात्याची माहिती घेतली जाते. ५ लाख २० हजार विद्यार्थ्यांना मागील वर्षाची शिष्यवृत्ती द्यावयाची आहे. यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली असून ती मंजूर झाल्यानंतर त्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल.

८.२२८ उमेदवारांना मोटार ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण देण्याची योजना सरकारने सुरु केली आहे. या योजनेसाठी कोणत्या कंपनीला कंत्राट देण्यात आले आहे ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी पुढील माहिती दिली.

८.२२९ मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना शासनाने दिनांक ४/२/२००८ च्या शासनिर्णयान्वये सुरु केली आहे. सदर योजना सुरु करताना निविदा प्रक्रीया अवलंबलेली होती. त्यातून पात्र निविदाधारक मे. रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल, जळगांव या संस्थेला काम देण्यात आले होते. सदर शासननिर्णयाच्या विरुध्द मा. उच्च न्यायालय.औरंगाबाद यांचेकडे याचिका दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेवर रुपये १५,०००/- दंड ठोकून याचिका निकाली काढण्यात आली. व मे. रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल, जळगांव संस्थेची निवड कायम ठेवण्यात आली. तद्नंतर शासनपत्र दिनांक १५/१०/२०१३ अन्वये सदर योजनेसाठी निविदा काढण्याबाबत कळविले आहे परंतु मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांच्या दि.१८/१२/२०१३ च्या आदेशान्वये सदर निविदा प्रक्रीयेस स्थगिती देण्यात आलेली आहे सदर स्थगिती खारीज होत नाही तोपर्यत निविदा प्रक्रीया राबविता येणार नाही. सध्या सदर निविदा प्रक्रीयेच्या अनुषंगाने अटी-शर्ती अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

८.२३० समितीने दिनांक २२ नोव्हेंबर २०१३ रोजी संत ज्ञानेश्वर मुलांचे शासकीय वसतीगृह, पुणे येथे भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आलेल्या त्रुटीसंदर्भात निराकरण करण्यास समितीने सांगितले होते त्या अनुषंगाने विभागाने समितीस आढळलेल्या त्रुटींचे पुढीलप्रमाणे निराकरण केल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

समितीने संत ज्ञानेश्वर शासकीय मुलांच्या वसतीगृहाला भेट दिली. या भेटीत समितीच्या निदर्शनास आलेल्या त्रुटी	
१) निश्चित केलेले आहार वेळापत्रक पाळले जात नाही.	वसतिगृहातील विद्यार्थ्यांची भोजन समिती स्थापन करण्यात आली असून सदर भोजन समितीने आठवडयाचा मेनू व भोजन वेळ निश्चित केली आहे. त्यानुसार सकाळी नाश्ता

	७.०० ते ९.००, दुपारी जेवण ११.०० ते २.०० या वेळेत व सायंकाळी जेवण ७.०० ते ९.३० या वेळेत दिले जात आहे. या प्रमाणे भोजन ठेकेदारास नाष्टा, भोजन विहित वेळेत दिले जाते. निश्चित केलेले आहार वेळापत्रक पाळण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.
२) आहारातील चपाती कडक होत्या.	प्रवेशित विद्यार्थ्यांना आहार व्यवस्थित दिला जातो. या समितीच्या भेटीचे दिवशी चपाती कडक झाल्या होत्या. या प्रकरणी संबंधित ठेकेदारावर रु.७१३४/- एवढी दंडात्मक रक्कमेची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच यापुढे अशी घटना घडणार नाही याची काळजी घेण्याबाबत संबंधित भोजन ठेकेदारास सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या चपात्या हॉटपॉटमध्ये ठेवल्या जातात त्यामुळे मऊ असतात. याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे.
३) दुधात मोठ्या प्रमाणावर पाणी मिसळलेले असते.	प्रवेशित विद्यार्थ्यांना भोजन पुरवठादाराकडून दुधाचा पुरवठा पॅकपिशव्याव्दारे केला जातो. त्यानुसार विद्यार्थी समिती व स्वतः गृहप्रमुख याबाबत खात्री करुन घेतात. याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच चव रजिस्टर मध्ये याची नोंद घेण्यात येते.
४) अन्नपदार्थांचा दर्जा चांगला नसतो.	याबाबत विद्यार्थ्यांची भोजन समिती नेमण्यात आलेली आहे. विद्यार्थी व गृहप्रमुखांकडून रोजच्या रोज जेवणाची चव घेतली जाते. तसेच याची नोंद चव रजिस्टरला घेतली जाते. जेवणाबाबत सद्यस्थितीत कोणतीही तक्रार नाही. अन्नाचा दर्जा चांगल्या प्रकारचा आहे.
५) भात निकृष्ठ दर्जाचा आहे.	याबाबत संबंधित भोजन पुरवठादारास दंडात्मक कारवाई म्हणून रुपये ७,१३४/- दंड केला आहे. आता चांगल्या प्रतीचा भात देण्यात येत आहे. याची खात्री गृहप्रमुखांकडून केली जाते.

६) ठेकेदारांनी केलेल्या आंदोलनामुळे ८ दिवस विद्यार्थ्यांना आहार पुरविण्यात आला नाही.	सदर दिनांक ११/११/२०१३ ते १७/११/२०१३ या कालावधीत प्रलंबित देयकांबाबत ठेकेदारांनी आंदोलन केले होते. या कालावधीत वसतिगृहातील प्रवेशितांची गैरसोय होवू नये म्हणून पर्यायी भोजन व्यवस्था तात्काळ करण्यात आलेली होती. या आंदोलनाच्या आठ दिवसाच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होवू दिलेली नाही. ठेकेदारांची बीले तरतूद उपलब्धतेनुसार वेळेवर दिली जात आहेत.
७) कोठाराची तपासणी केली असता सडक्या भाज्या आढळून आल्या.	कोठारामध्ये ठेवण्यात आलेल्या भाज्या या २-३ दिवस पर्यंत पुरतील अशा असतात. दैनंदिन निवड करुन त्यातील सुकलेली पाने (कोबी, प्लॉवर या गड्डयांची छाटणी करुन) बाजूला ठेवण्यात आलेला भाजीपाला हा फेकण्यासाठी ठेवलेला होता. भोजन ठेकेदाराने फेकण्यासाठी ठेवलेला खराब भाजीपाला समितीच्या भेटीच्या निदर्शनास आला आहे याबाबत अशी पुनश्च चूक होणार नाही आणि खराब झालेल्या भाज्यांची वेळेच्या वेळी विल्हेवाट लावण्याची गांभीर्याने दक्षता घेण्याबाबत संबंधित पुरवठाधारकास सक्त सूचना देण्यात आलेल्या आहे. तरी विद्यार्थ्यांना दिला जाणारा भाजीपाला चांगल्या प्रतीचा दिला जात आहे.
८) फळे विशेषत सफरचंद अतिशय कमी प्रतीचे आहे.	विद्यार्थ्यांना वाटप होणारी फळे ही सिझनेबल असतात. दिनांक २२.११.२०१३ रोजी सन्माननीय समितीने दुपारी १.०० वाजता भेट दिली असता निदर्शनास आलेली सफरचंद ही त्या दिवशी वाटप करुन शिल्लक राहिलेली सफरचंद होती. सद्यस्थितीत फळाचा दर्जा अत्यंत चांगला आहे. याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

९) काही विद्यार्थ्यांना नाईट ड्रेस पुरविण्यात आलेले नाही.	या वसतीगृहामध्ये अकरावीच्या पुढील व्यावसायीक व बिगर व्यावसायिक इत्यादी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी प्रवेशीत आहेत. नाईट ड्रेस हे फक्त ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना देय आहे. त्यामुळे या वसतीगृहाला नाईट ड्रेस पुरवठा झालेला नाही म्हणून विद्यार्थ्यांना ते देण्यात आलेले नाहीत.
१०) दूरदर्शन संच २ दिवसापूर्वी बसवण्यात आला आहे.	या वसतीगृहामध्ये दूरदर्शन संच दिनांक १२.११.२०१३ रोजी प्राप्त झाला होता. सदरचा पुरवठा व्हीडीओकॉन या कंपनी मार्फत झालेला असल्याने कंपनीचा तंत्रज्ञ कार्यान्वीत करणार होता त्यांनी दिनांक १९.११.२०१३ रोजी वसतीगृहात येवून दूरदर्शन संच कार्यान्वीत करुन दिलेला आहे.
११) इमारतीचा रंग पूर्णपणे उडाला आहे.	सदर इमारतीची देखभाल दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून केली जाते. सदर वसतीगृहाच्या रंगरंगोटीचे रक्कम रुपये ७,६७,५६०/- अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिनांक ९.१.२०१४ रोजी प्राप्त झाले आहे. त्यास शासनाची तात्काळ मान्यता घेऊन विद्यार्थ्यांना दिर्घ सुट्टीच्या कालावधीमध्ये वसतीगृहाची रंगरंगोटी करुन घेण्यात येईल.
१२) बाथरुमची देखभाल दुरुस्ती केली जात नाही.	वसतीगृहातील सर्व बाथरुमची देखभाल दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे असून सध्या बाथरुमचे देखभाल चांगल्या प्रकारे होत आहे. विद्यार्थ्यांची बाथरुमबाबत कोणतीही अडचण नाही. त्याचप्रमाणे बाह्यस्त्रोताव्दारे प्राप्त प्लंबर व सफाईगार यांचेव्दारे दुरुस्ती व देखभाल करण्यात येत आहे. याबाबत प्रवेशित विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार नाही.

१३) इलेक्ट्रीक फिंटीग जुनाट व नादुरुस्त आहे.	सध्या वसतीगृहातील सर्व बोर्डसची दुरुस्ती करुन घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ब्राह्मस्त्रोताव्दारे प्राप्त इलेक्ट्रीशीयन व्दारे देखभाल करण्यात येत आहे.
१४) विद्यार्थ्यांना उशी व बेडशीट पुरवण्यात आलेले नाहीत.	वसतीगृहात गादया-४०, पलंग-२०, उशी-५० कमी होत्या आता गादया, बेडशीट व उशी चादर, ब्लॅकेट आहेत व त्याचे पूर्णपणे वाटप करण्यात आलेले आहे.
१५) विद्यार्थ्यांच्या खोल्या अस्वच्छ होत्या.	वसतीगृहातील खोल्या व परिसराच्या स्वच्छतेकरीता बाह्य स्त्रोताव्दारे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. आता वसतीगृहातील आतील/बाहेरील स्वच्छता चांगल्या प्रकारची आहे.
समितीच्या निदर्शनास आलेल्या वरील सर्व त्रुटींचे निराकरण आयुक्तांनी एका महिन्याच्या आत करावयाचे होते. याबाबत समितीला सद्य:स्थिती अवगत करावी.	त्यानुषंगाने संबंधित वसतीगृहातील त्रुटी दूर करण्याकरीता संपर्क अधिकारी म्हणून श्री.एम.एम.आत्राम, सह आयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. आता सदर वसतीगृहांतील सर्व सोयी-सुविधा व इतर बाबींचे निवारण करण्यात आलेले असून याबाबत प्रवेशितांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

८.२३१ समितीने संत जनाबाई मुलींच्या शासकीय वसतीगृहाला भेट दिली. या भेटीत समितीच्या निदर्शनास आलेल्या त्रुटीसंदर्भात निराकरण करण्याबाबत विभागाने योग्य ती कार्यवाही करुन निदेश दिले होते त्यानुसार विभागाने केलेली कार्यवाहीची माहिती प्राप्त झाली असून ती खालीलप्रमाणे आहे.

समितीने संत जनाबाई मुलींच्या शासकीय वसतीगृहाला भेट दिली. या भेटीत समितीच्या निदर्शनास आलेल्या त्रुटी	
१) वसतीगृहाची प्रवेश क्षमता १२० मुलींची आहे. आतापर्यंत १०५ मुलींनी प्रवेश घेतला असून १५ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु होती ती पूर्ण झाली आहे काय ?	या वसतीगृहाची मंजूर संख्या १२० आहे. इमारत क्षमता ११० आहे. प्रत्यक्ष प्रवेशित संख्या ११० झालेली आहे. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.
२) आहार व फळाचा दर्जा योग्य नसल्याची तक्रार वसतीगृहातील मुलींनी केली.	दिनांक २२.११.२०१३ रोजीच्या आहार व फळांच्या दर्जाबाबत संबंधित भोजन पुरवठादार यांना रक्कम रुपये ४०७०/- इतकी दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे. आता विद्यार्थीनींची भोजन समिती व गृहपाल यांचेव्दारे आहार व फळाचा दर्जाबाबत दक्षता घेण्यात येत आहे. चव रजिस्टरमध्ये याची नोंद ठेवण्यात येते असून आता आहार व फळांचा दर्जा चांगला आहे. याबाबत प्रवेशित विद्यार्थीनींची कोणतीही तक्रार नाही.
३) वसतीगृहात मोठ्या प्रमाणावर ढेकूण झाले असल्याचे निदर्शनास आले वसतीगृहात पेस्ट कंट्रोल केलेले नाही.	दिनांक ६.१२.२०१३ रोजी संपूर्ण वसतीगृहाचे पेस्ट कंट्रोल करुन घेण्यात आलेले आहे. वसतीगृह व परिसरात ढेकूण व तत्सम किटक होऊ नयेत याची दक्षता घेण्यात येत आहे.
४) वसतीगृहातील मुलींना दिवाळीच्या सुट्टीत दिनांक १ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर या कालावधीत भोजन मिळाले नाही ?	वसतीगृहातील मुलींना दि.१/११/२०१३ ते १४/११/२०१३ या कालावधीत कॉलेजला दिवाळीची सुट्टी होती. विद्यार्थीनींना १० दिवसापेक्षा जास्त सुट्टी असताना सदर विद्यार्थीनींनी १६ मे १९८४ च्या शासन निर्णयानुसार वसतिगृहात विद्यार्थीनींना राहत येत नाही. परंतु ५ विद्यार्थीनींनी त्यांच्या खाजगी (वैयक्तीक) क्लाससाठी वसतीगृहात थांबल्या होत्या. परंतु अधिक्षिकांना विनंती करुन भोजन व्यवस्था आमचे आम्ही करतो फक्त राहण्याची परवानगी दयावी असे सांगितल्याने त्यांना राहण्यास परवानगी देण्यात आलेली होती.

५) समितीच्या निदर्शनास आलेल्या त्रुटींचे निराकरण व्यवस्थापनाने १५ दिवसांच्या कालावधीत करावे.	त्यानुषंगाने संबंधित वसतीगृहातील त्रुटी दूर करण्याकरिता संपर्क अधिकारी म्हणून श्रीमती अमिना शेख, संशोधन अधिकारी (नाहसं), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. आता सदर वसतीगृहांतील सर्व सोयी-सुविधा व इतर बाबींचे निवारण करण्यात आलेले असून याबाबत प्रवेशितांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.
६) वसतीगृहातील मुलींची आरोग्य तपासणी योग्य कालावधीनंतर करावी. याबाबत अधिक दक्षता व्यवस्थापनाने करावी.	त्या अनुषंगाने वसतीगृहातील विद्यार्थीनींची आरोग्य समिती व गृहपाल यांचेव्दारे वसतीगृहातील प्रत्येक प्रवेशितांची काळजी घेण्यात येते. व आजारी प्रवेशितांस जिल्हा आरोग्य केंद्रात पाठविण्यात येते.प्रवेशितांची माहे जानेवारी २०१४ मध्ये ससून रुग्णालय, पुणे येथून आरोग्य तपासणी करुन घेण्यात आलेली आहे.
७) सुरक्षा रक्षक व अन्य स्त्री कर्मचारी यांनी मुलींच्या सुरक्षिततेसंदर्भात योग्य ती काळजी घ्यावी.	सदर वसतीगृहांमध्ये बाह्यस्त्रोताव्दारे ३ सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच वसतीगृहामध्ये १ गृहपाल, १ कनिष्ठ लिपिक, १ शिपाई, ३ सफाईगार असे एकूण ६ अन्य स्त्री कर्मचारी असून त्यांच्याव्दारे प्रवेशितांची सुरक्षा, स्वच्छता व सोयी-सुविधांबाबत दक्षता घेण्यात येते.
याबाबत काय कार्यवाही केली याची माहिती समितीला देण्यात यावी.	संबंधित वसतिगृहातील त्रुटी दूर करण्याकरिता संपर्क अधिकारी म्हणून श्रीमती अमिना शेख, संशोधन अधिकारी (नाहसं), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांनी वसतीगृहास भेट देवून वरील त्रुटींची पूर्तता करवून घेतली आहे. त्याचबरोबर पुणे जिल्ह्यातील इतर शासकीय वसतीगृहांतील समस्या दूर करण्यासाठी आयुक्तालयातील इतर अधिकाऱ्यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांनी ही वसतीगृहांस भेटी देवून समस्या दूर केल्या आहेत.

८.२३२ समितीने बैठकीच्या वेळी विचारलेल्या काही प्रश्नांची लेखी माहिती विभागाने सादर केली आहे ती पुढीलप्रमाणे आहे.

१) राज्यात मागील १० वर्ष अर्थसह्या करिता किती संस्था पात्र ठरल्या.

राज्यात एकूण ३७२ संस्था अर्थसहाय्याकरिता पात्र ठरल्या असून त्यांची यादी सोबत जोडली आहे. (परिशिष्ट पृष्ठ क्रमांक ६१ ते ९१)

२) किती संस्थांना वर्षनिहाय अर्थसहाय्य करण्यात आले.

सदरची योजना सन २००४-०५ या आर्थिक पासून कार्यान्वित आहे. सन २००४-०५ ते २०१०-११ पर्यंत मंजूर ३७२ संस्थांची माहिती खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	वर्ष	मंजूर संस्थांची एकूण संख्या
१	२००४-२००५	९
२	२००५-२००६	९
३	२००६-२००७	२२
४	२००७-२००८	३६
५	२००८-२००९	०
६	२००९-२०१०	२१२
७	२०१०-२०११	८४
	एकूण	३७२

३) किती संस्थांनी उत्पन्न सुरु केले.

३६ संस्थांनी उत्पादन सुरु केले असून त्यांची विभागवार संख्या खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	विभागाचे नाव	उत्पादन सुरु असलेल्या संस्थांची संख्या
१	पुणे विभाग	३०
२	नाशिक विभाग	१
३	मुंबई	०
४	अमरावती	१
५	नागपूर	१
६	औरंगाबाद	२
७	लातूर	१
	एकूण	**३६**

४) चौकशीत किती संस्था बोगस ठरविण्यात आल्या.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडील शासन पत्र क्रमांक विपप्र-४२४८३/प्र.क्र.१२६/अजाक-१, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३ अन्वये प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांचे अध्यक्षतेखाली तपासणी समित्या गठीत करण्यात आलेल्या होत्या. सदर समित्यांचे मार्फत ज्या संस्थांनी प्रथम हप्ता उचल करुन प्रकल्पावर खर्च केल्या संबंधीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेकडून उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा १८२ संस्था व ज्या संस्थांना शासन निर्णयाप्रमाणे एकूण प्रकल्प किंमतीच्या ७०% अर्थसहाय्य शासनाने मंजूर करुन संस्थांना उचल मंजूर केलेली आहे अशा ५८ संस्था एकूण २४० संस्थांच्या तपासण्या करण्यात आल्या असून सदर तपासणीमध्ये ७१ संस्थांचे तपासणी अहवाल प्रतिकूल असल्याचे आढळून आले असून त्यांना आयुक्तालय स्तरावरुन कारणे दाखवा नोटीसा पाठवून आयुक्तालयात दिनांक २०.१.२०१४ पासून ते १२.२.२०१४ पर्यंत सुनावणीसाठी बोलविण्यात येवून ७१ संस्थांच्या सुनावण्या घेण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी १६ संस्थांवी सहकार कायद्यांतर्गत नियमानुसार कारवाई करुन गुन्हे दाखल करणेबाबत संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांना कळविणेत आले आहे.

सुनावणीसाठी बोलविण्यात आलेल्या संस्थांची संख्या	दिनांक १२.२.२०१४ अखेर सुनावणी झालेल्या संस्थांची संख्या	कार्यवाही प्रस्तावती केलेल्या संस्थांची संख्या
७१	७१	१६

(परिशिष्ट पृष्ठ क्रमांक ९२) समिती कक्षात उपलब्ध आहे.

अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करणे योजनेअंतर्गत सन २००४-०५ ते २०१३-१४ (माहे डिसेंबर, २०१३) अर्थसहाय्य मंजूरीचा वर्षनिहाय तपशिल:-

(रु.लाखात)

अ.क्र.	**वर्ष**	**मंजूर संस्था संख्या**	**आतापर्यंत मंजूर करण्यात आलेले अर्थसहाय्य रक्कम**			**संस्थांना दिलेली रक्कम**
			भागभांडवल	**कर्ज**	**एकूण**	
१	२००४-०५	९	१६७२,४२	१६७२.४२	३३४४.८४	३३४४.८४
२	२००५-०६	९	१४३२.०९	१२६१.७५	२६९३.८४	२६९३.८४

५) आजपर्यंत वर्षनिहाय व संस्थानिहाय किती अर्थसहाय्य करण्यात आले.

३	२००६-०७	२२	३४४४.३१	३४४४.३१	६८८८.६२	६८८८.६२
४	२००७-०८	३६	५२३२.१२	५२३२.१२	१०४६४.२४	९७५९.६०
५	२००८-०९	२४ जुन्या संस्थांना दुसरा/अंतिम हप्ता	२९४९.१९	२९४९.१९	५८९८.३८	५७४७.३२
६	२००९-१०	२१२	१३२५२.४५	१३२५२.४५	२६५०४.९०	२३६५७.५९
७	२०१०-११	८४ नवीन +४ जुन्या संस्थांना दुसरा/अंतिम हप्ता	६४००.००	६४००.००	१२८००.००	७२९३.६३
८	२०११-१२	०	०.००	०.००	०.००	०.००
९	२०१२-१३	६२ जुन्या संस्थांना दुसरा/अंतिम हप्ता	६०००.००	६०००.००	१२०००.००	५९००.००
१०	२०१३-१४	६९ जुन्या संस्थांना दुसरा/अंतिम हप्ता	५९५६.५०	५९५६.५०	११९१३.००	०.००
	एकूण	**३७२**	**४६३३९.०८**	**४६१६८.७४**	**९२५०७.८२**	**६८२८५.४४**

६) किती संस्थांवर फौजदारी गुन्हे नोंदविण्यात आले.

मंजूर संस्थांची जिल्हानिहाय यादी सोबत जोडली आहे.

(परिशिष्ट पृष्ठ क्रमांक ६१ ते ९१) समिती कक्षात उपलब्ध आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडील शासन पत्र क्रमांक विपप्र-४२४८३/प्र.क्र.१२६/अजाक-१, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३ अन्वये प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांचे अध्यक्षतेखाली गठीत समित्यांमार्फत राज्यातील २४० संस्थांची तपासणी करण्यात आली. त्यानुसार ७१ संस्थांचे तपासणी अहवाल प्रतिकूल असल्यामुळे सदर संस्थांचे अध्यक्ष व संचालक मंडळास आयुक्तालय स्तरावरुन कारणे दाखवा नोटीसा पाठवून या आयुक्तालयात दिनांक २० जानेवारी, २०१४ ते १२ फेब्रुवारी, २०१४ पर्यंत सुनावणीस उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सुनावणी दरम्यान संस्थांचे अध्यक्ष व संचालक मंडळातील सर्व सदस्य म्हणणे ऐकून घेऊन ७१ संस्था त्यापैकी १६ संस्थांवी सहकार

	कायद्यांतर्गत नियमानुसार कारवाई करुन गुन्हे दाखल करणेबाबत संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना दिनांक १२.२.२०१४ रोजी कळविण्यात आले आहे.
कर्जत जिल्हा अहमदनगर येथे अनुसूचित मुला/मुलींच्या सामाजिक वसतिगृहामध्ये भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीमध्ये सोईसुविधा उपलब्ध नाहीत.	कर्जत जिल्हा अहमदनगर येथे दोन शासकीय वसतिगृहे मंजूर आहेत. शासकीय इमारत उपलब्ध नसल्याने सदर दोन्ही वसतिगृहे भाडयाच्या इमारतीत कार्यरत आहेत. मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह कर्जत जिल्हा अहमदनगर या वसतिगृहाची मान्य संख्या ७५ असून सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये एकुण ७५ विद्यार्थ्यींनी प्रवेशीत आहेत. हे वसतिगृह श्री. अमृत श्रीधर काळदाते यांचे मालकीच्या इमारतीत भाडेतत्वावर कार्यरत असून त्याचे दरमहा भाडे रुपये ३१,१४६/- इतके आहे त्याचप्रमाणे मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह कर्जत जिल्हा अहमदनगर या वसतिगृहाची मान्य संख्या १०० असून सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण १०० विद्यार्थी प्रवेशीत आहेत हे वसतिगृह श्रीमती इंदुबाई हरिश्चंद्र जायभाय यांचे मालकीच्या इमारतीत भाडेतत्वावर कार्यरत असून त्याचे दरमहा भाडे रुपये १८,४१०/- इतके आहे. कर्जत जिल्हा अहमदनगर येथील मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहातील प्रवेशितांना सोयी सुविधेअंतर्गत निवास व्यवस्थेत कॉट,गादया, उश्या, सतरंजी, चादर, ब्लँकेट, बेडशिट, इ. पुरविण्यात आलेले आहेत. तसेच शैक्षणिक सुविधेमध्ये प्रवेशितांना आवश्यक वहया,पुस्तके व इतर आवयक स्टेशनरी पुरविण्यात आलेली आहे. भोजन व्यवस्थेमध्ये मुलांना दिनांक २६ जुलै २०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे नाश्ता, पोटभर भोजन व इतरसर्व बाबी पुरवण्यात येतात. वसतीगृहांना अग्निशमन यंत्रणा, इनव्हर्टरची सुविधा, दूरदर्शन संच, संगणक सुविधा पुरविण्यात आलेली आहे. ड्रेसकोड नुसार प्रवेशितांना गणवेश वाटप करण्यात आलेले आहेत. वसतीगृहाच्या साफसफाई करिता बाहयस्त्रोताव्दारे नेमलेल्या कर्मचाऱ्याकंडून वसतीगृहाची नियमित स्वच्छता करण्यात येत आहे. उपलब्ध तरतुदीनुसार निर्वाह भत्या करिता तरतुद वाटप करुन प्रवेशितांच्या निर्वाह भत्ता अदा करण्यात आलेला आहे.

सदर वसतीगृह बांधण्याकरिता सन २००७-०८ मधील अर्थसंकल्पात ३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती तद्नंतर सन २०१० मध्ये ३८ गुंठे जागा सुध्दा श्री.ढोकरीकर यांनी शासनास उपलब्ध करुन देऊन सुध्दा आजपावेतो वसतीगृह इमारतीबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. याबाबत पाठपुरावा करुनही प्रश्न आजपर्यंत निकाली निघाला नसल्याने सचिवांनी तातडीने उपरोक्त प्रकरणी लक्ष घालून १५ दिवसात केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी.	१. शासकीय निवासी शाळा व मुलांचे शासकीय वसतिगृह,कर्जत जिल्हा अहमदनगर करीता इमारत बांधकामासाठी गायकरवाडी ता. कर्जत येथे ग.नं १००० मधील ५ एकर क्षेत्र जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सामाजिक न्याय विभागास दिली होती.त्याठिकाणी शासकीय शाळेचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सन २००७-०८ मध्ये मुलांचे वसतिगृहाच्या इमारत बांधकाम करण्यासाठी रक्कम रु ३,२६,९२,५००/- तरतुद सामाजिक न्याय विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन दिलेली होती. परंतू सदर ठिकाण हे कर्जत पासून ५ किमी अंतरावर असल्याने प्रवेशितांना शाळा/महाविद्यालयात येणाजाण्याकरीता गैरसोयीची असल्यामुळे सदर ठिकाणी वसतीगृहाचे बांधकाम करण्यात आलेले नाही. २. प्रसाद व प्रविण ढोकरीकर यांनी त्यांचे मालकीचे जमिन गट नं.१८१ मधील प्लॉट नं.६३ ओपनस्पेस १७६१.७५ चौ.मि. व प्लॉट ६२ मधील १७६१.७१ चौ.मी.ॲमिनीटीस्पेस दानपत्र म्हणून दिनांक १६.२.२०१० रोजी दिली. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अहमदनगर यांनी सदर जागेवर बांधकम करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास प्रस्ताव सादर केला असता उपमुख्य वास्तूशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी पत्र क्रमांक अहमदनगर (४) १०-संकीर्ण/१४७/२०११ दिनांक १.४.२०११ नुसार मोकळ्या जागेचा वापर करणे नियमांचे उल्लघंन केल्यासारखे आहे. सबब इमारतीकरिता वापरणे योग्य नाही असे कळविले. याबाबत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अहमदनगर या कार्यालयाचे पत्र क्रमांक सआसक/अन/१३-१४/शावगृह/कर्जत बांधकाम/२३० दिनांक १५ जानेवारी, २०१४ नुसार श्री.ढोकरीकर यांची जोगेश्ववाडी मधील गट नं.१८१ मधील प्लॉट न.६२ मधील १७६१.७१ चौ.मि. ॲमिनीटीस्पेस व प्लॉट न.६३ मधील १७६१.७५ चौ.मी. ओपनस्पेस मध्ये इमारतीचे बांधकाम करता येईल किंवा कसे याबाबत सहाय्यक संचालक, नगर रचना, अ.नगर यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहे. ३. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अहमदनगर या कार्यालयाने वसतीगृहाकरिता शासकीय जमिन मिळणेसाठी प्रयत्न करुनही जमिन उपलब्ध होवून शकली नाही. शासकीय जागेबाबत मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्रमांक मह/कार्या/जमिन-

	१ ब/२०६/२०११ दिनांक २९/४/२०११ अन्वये मौजे कर्जत जि.कर्जतलगत वसतीगृहासाठी सोयीस्कर शासकीय जागा उपलब्ध नसल्याने वसतीगृहासाठी जागा देता येणार नाही असे कळविले आहे. ४. सहायक आयुक्त, समाज कल्याण, अहमदनगर यांनी दिनांक ५.१२.२००७ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, कर्जत विभाग, कर्जत यांच्याकडे तहसिल कार्यालयामागील सर्व्हे नंबर ६६६ मधील १.९९ हे.आर.पैकी २ एकर जागेची मागणी नोंदविली असता महसूल विभागाकडील पत्र क्रमांक मह/कार्या/जमिन-१ ब/१३७/२००९ दिनांक २४.३.२००९ अन्वये मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी सदर जागा देता येत नसल्याचे कळवून त्याऐवजी बर्गेवाडी येथील गट नं.२४,१३७,१३८ व गायकरवाडी येथील गट नं.१००० मधील जाग मागणी करण्याचे सुचविले. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे गायकवाडी येथील जागा गैरसोयीची आहे. तसेच बर्गेवाडी येथील शासकीय जमिनीची पाहणी केली असता ५ कि.मी. अंतरावर असल्याने प्रवेशितांना शाळा महाविद्यालयात जाण्या-येण्याच्या दृष्टीने गैरसोयीची असल्याने नाकारली. गट नंबर ३६३/१ अ व ब मधील कृषी उत्पन्न बाजार समिती जवळच्या जागेची पाहणी केली. सदर जागेचे क्षेत्रफळ ०.४५ आर होते. उपमुख्य वास्तूशास्त्रज्ञ यांचे पत्र क्रमांक १४६ दिनांक १.४.२०११ च्या पत्रान्वये भूखंडालगत राज्य महामार्ग क्र.६८ आहे. सबब पथकिनारर्ती नियम २००५ अन्वये सदर भूखंड इमारत रेषा व नियंत्रण रेषेने बाधीत होत असल्याने इमारत बांधकाम करणे अडचणीचे होणार आहे असे कळविले आहे. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अहमदनगर या कार्यालयाचे पत्र क्रमांक सआसक/अन/१३-१४/शावगृह/कर्जत बांधकाम/२२९ दिनांक १५ जानेवारी, २०१४ अन्वये कर्जत शहरात स्टॅन्ड जवळ गट क्रमांक ६६२ मधील १.३१ हे.जमिन या पूर्वी ग्रामीण रुग्णालय होते सदरचे रुग्णालय हे नव्याने बांधकाम करुन स्थलांतरीत झालेले आहे. सद्यस्थितीमध्ये गट क्रमांक ६६२ मधील जागा विनावापर आहे. या जागेची मागणी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे करण्यात आलेली आहे.

	सदर वसतीगृहास शासकीय जागा मिळत नसल्याने व वसतीगृहांकरिता बांधकाम करणे आवश्यक असल्याने वसतीगृह बांधकामाकरिता खाजगी जमिन प्राप्त करणेकामी कार्यवाही सुरु आहे. माहितीस्तव सविनय सादर.
बुलढाणा जिल्ह्यात व्यवसाय शिक्षण अभ्याक्रम शिकवणाऱ्या संस्थांनी व अधिकाऱ्यांनी संगनमत करुन या अभ्यासक्रमात स्कॉलरशीप देय नसताना कोट्यवधी रुपये घेतले आहे काय ?	सदर प्रकरणी प्रादेशिक आयुक्त, समाज कल्याण, अमरावती यांचे स्तरावरुन समिती गठित केली असून सदर समितीचा अहवाल त्वरीत आयुक्तालयास सादर करणेबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र.२९७ दिनांक २८/०१/२०१४ नुसार कळविले आहे अहवाल प्राप्त होताच सादर करण्यात येईल.

८.२३३ समितीने उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, गेल्या ११ वर्षापासून ओबीसीच्या शिष्यवृत्तीचा अनुशेष असून यासाठी कोण जबाबदार आहे ? तसेच केंद्र सरकारकडून निधी प्राप्त झाला नाही तर राज्य सरकार तो निधी देणार आहे किंवा नाही ? या प्रश्नाला विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले होते की, सन २००१-०२ पासून ओबीसी शिष्यवृत्तीचा अनुशेष वेगळा करण्यात आला आहे. सन २००१-०२ मध्ये केंद्र शासनाने शिष्यवृत्तीवर ७ कोटी १८ लाख रुपये खर्च केले आहेत. सन २००१-०२मध्ये राज्य शासनाकडून ४ कोटी ७५ लाख रुपये खर्च झाले. केंद्र शासनाकडून २ कोटी ४२ लाख रुपये येणे होते. या नंतर सन २००२-०३ मध्ये ३ कोटी ७ लाख रुपये शिष्यवृत्तीवर खर्च करण्यात आले. राज्य शासनाची ४ कोटी ७५ लाख रुपयांची रक्कम व केंद्र शासनाकडील २ कोटी १० लाख रुपयांची रक्कम शिल्लक असल्याने त्या वर्षात केंद्र शासनाकडून रक्कम येणे अपेक्षित नव्हते. यानंतर समितीने असे विचारले होते की, सन २००१-०२ मध्ये ७ कोटी १८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली असून केंद्र शासनाचा हिस्सा त्यामध्ये होता. सन २००२-०३ मध्ये ही रक्कम ३ कोटी रुपये इतकी कमी कशी काय झाली, त्या वर्षात विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली होती काय ? यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले होते की, या योजनेची सुरुवात झाली

त्यावेळी ओबीसीकरिता केंद्र शासनाकडून शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात झाली. त्या वर्षात राज्य शासनाचा भांडवली खर्च ४ कोटी ७५ लाख रुपये होता. त्या वर्षात केंद्र शासनाकडून येणे रक्कम अपेक्षित नव्हती. या नंतर सन २००३-०४ मध्ये शिष्यवृत्तीसाठी ९२ कोटी १६ लाख रुपये खर्च झाले आहेत या समितीच्या विचारणेबाबत विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, राज्यातील व्हीजेएनटी हा प्रवर्ग केंद्र शासनाकरिता ओबीसी प्रवर्ग आहे. केंद्र शासनाने सर्वसाधारणपणे ओबीसी असे नमूद केले आहे. त्यांच्याकडे व्हीजेएनटी हा प्रवर्ग नाही. दि. २९ मे २००३ रोजी ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे धोरण अवलंबण्यात आले. त्यामुळे सन २००३ पासून शिष्यवृत्तीच्या खर्चाचे प्रमाण वाढले व ४ कोटी रुपयांवरुन ही रक्कम ९२ कोटी रुपयांवर गेली.

८.२३४ केंद्र शासनाने उत्पन्नाच्या संदर्भात काही नॉर्म्स ठरवले आहेत. त्यानुसार त्यांच्याकडून मॅचिंग ग्रँट दिली जाते. त्यामध्ये केंद्र शासनाने सु-मोटो बदल केलेला आहे. राज्य शासनाने ४० हजार रुपयांची उत्पन्न मर्यादा १ लाख रुपयांपर्यत वाढवली आहे मात्र केंद्र शासनाला हे मान्य नाही. राज्याने १ लाख रुपयांनुसार कॅल्क्युलेशन्स केल्याने केंद्र शासनाने सांगितले आहे की, १ लाख रुपयांच्या उत्पन्न मर्यादेनुसार केंद्र शासन निधी देऊ शकणार नाही, ४० हजार उत्पन्न मर्यादेनुसार निधी दिला जाईल. राज्य शासनाच्या प्रस्तावाला केंद्र शासनाची मान्यता नसल्याने उर्वरित निधी देण्यास केंद्र शासन बांधील नाही. मात्र राज्य शासनाने शिष्यवृत्तीच्या संदर्भात उत्पन्न मर्यादा १ लाख रुपयांपर्यत वाढवली असून तशी जाहिरात केल्याने विद्यार्थ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. अनेकांना आता शासनाकडून आशा निर्माण झालेली आहे. केंद्र शासनाकडून पूर्णपणे मान्यता घेतल्याशिवाय अशा प्रकारे वाच्यता कशाकरिता केली ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की,

८.२३५ पूर्वी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ४४ हजार रुपये होती. राज्य शासनाने ती वाढवून १ लाख रुपये केली असली तरी केंद्र शासनाकडून देखील ही उत्पन्न मर्यादा १लाख रुपयांपर्यत वाढवली जाईल याची अपेक्षा नव्हती. यामुळे सध्या राज्य शासन ४४ हजार रुपये वार्षिक उत्पन्न गृहीत धरुनच विचार करीत आहे. उर्वरित खर्च राज्य शासनाने आपल्या निधीतून करावा, असे केंद्र शासनाचे म्हणणे आहे.

८.२३६ योजना राबवण्यासाठी केंद्र शासनाकडून राज्याला काही हिस्सा द्यावा लागतो. त्यानुसार यंदा केंद्र शासन राज्याला किती वाटा देणार आहे, याचा विभागास काही अंदाज आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाकडून किती निधी प्राप्त होईल याचा अंदाज येत नाही. काही वेळा केंद्र शासनाकडून ९० कोटी रुपये दिले जातात तर काही वेळा ५०० कोटी रुपये दिले जातात. राज्य शासनाकडून केंद्र शासनाला वेळोवेळी सांगितले जाते की, कोणत्या वर्षी किती निधी दिला

जाणार आहे याची आम्हाला माहिती द्यावी, यामुळे राज्याला नियोजन करणे शक्य होईल. तथापि, किती निधी प्राप्त होईल याचा अंदाज येत नाही.

८.२३७ ११५० कोटी व्यतिरिक्त इतर रक्कम केंद्र शासनाकडून प्राप्त होण्याकरिता काही प्रयत्न केले आहेत काय ? तसेच केंद्र शासनाकडून ११५० कोटी रुपयांची मागणी केली जात आहे. मागील वर्षीचे ४०० कोटी रुपये देखील शिल्लक आहेत काय ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, राज्याने केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या रकमेच्या संदर्भात नोशनल कॅल्क्युलेशन केलेले आहे. मात्र त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांची फसवणूक होणार नाही हा भार राज्याच्या तिजोरीवर येणार आहे. केंद्र शासनाकडे निधीची मागणी केली जाते मात्र याचा अर्थ त्यांच्याकडून राज्याला निधी मिळेपर्यंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात नाही, असा होत नाही. विद्यार्थ्यांना राज्याच्या निधीतून शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाते. केंद्र शासनाकडे ११५० कोटी रुपयांची मागणी केली आहे. मात्र हा निधी मिळेपर्यंत विद्यार्थ्यांना वंचित ठेवलेले नसून आता ३९८ कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. सन २०१३-१४मध्ये अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली होती. व्हीजेएनटी, ओबीसी, मागासवर्गीय विद्यार्थी यांच्याकरिता १४०४ कोटी ७८लाख रुपयांची तरतूद केली होती. प्रलंबित असलेला निधी देण्याकरिता सुधारित अंदाज २४१२ कोटी ६२ लाख रुपयांचा करण्यात आला असून पुरवणी मागणी केल्यानंतर ३१८ कोटी ५८ लाख रुपये मंजूर झाले आहेत. या वर्षी ६७९ कोटी २४ लाख रुपये मिळाले तर या वर्षीचा व मागील वर्षीचा प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम देणे शक्य होईल सध्या ६९० कोटी रुपयांची तूट आहे.

८.२३८ यावर समितीने विचारणा केली की, विभागीय प्रतिनिधींनी मागील बैठकीच्या वेळी सांगितले होते की, ८०० कोटी रुपयांची पुरवणी मागणी वित्त विभागाकडे केली होती. त्यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की,८०० कोटी रुपयांची मागणी केली असून त्यापैकी ३९८ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. मागील बैठकीच्या वेळी समितीने सूचना केली होती, त्यानुसार काही मार्गदर्शक तत्वे तयार केली जात आहेत. मागील वर्षीची शिष्यवृत्तीच्या प्रलंबित प्रकरणांना चालू वर्षाच्या तरतुदीमधून रक्कम देण्याकरिता प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. तसेच विना अनुदानित,कायम विना अनुदानित तत्वावरील प्रोफेशनल कोर्सेसला प्राधान्य देण्याचा एक विचार होता. मात्र तसे केल्यास अधिकाधिक रक्कम प्रोफेशनल कोर्सेसकरिता खर्च होईल असे लक्षात आले आहे. एम.एड,बी.एड,बी.एड व इतर प्रोफेशनल कोर्सेसमधील विद्यार्थ्यांची संख्या बरीच अधिक आहे. यामुळे या संदर्भात सखोल चर्चा करुन धोरण ठरवावे लागणार आहे. मंत्री महोदयांशी या संदर्भात प्राथमिक चर्चा झालेली आहे.

८.२३९ सध्या थकीत शिष्यवृत्तीची रक्कम देण्यास प्राधान्य दिले जात आहे. दरवर्षी विहित कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अर्जांचा प्राधान्याने विचार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काही कॉलेजेस ऑगस्ट,सप्टेंबर महिन्यापर्यंत विभागाकडे प्रकरणे पाठवत नाहीत. यामध्ये विद्यार्थ्यांचा काहीही दोष नसतो या सर्व विषयांबाबत लवकरच शासन धोरण ठरवणार आहे असेही विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

८.२४० ३९८ कोटी रुपयांचे वाटप करताना कोणते निकष लावले जाणार आहेत ? निधीचे वाटप करताना जिल्हा स्तरावर अनियमितता व गैरप्रकार होतात. याकरिता शासनाचे निकष निश्चित व सुस्पष्ट असले पाहिजेत. निधीचे वाटप योग्य प्रकारे झाले पाहिजे. या समितीच्या सूचनेवर माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, निकष ठरविण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आलेले आहे. आता लवकरच ते पूर्ण होईल. त्याकरिता समितीच्या सूचनांचा विचार केला जाईल.

८.२४१ पुरवणी मागण्यांद्वारे तरतूद केल्या नंतर किवा केंद्र शासनाकडून देखील राज्याला कमी निधी प्राप्त होतो. अशा वेळी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्यास अडचण निर्माण होते. या करिता सुरुवातीलाच योग्य प्रकारे नियोजन करुन, निकष ठरवून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती का दिली जात नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती देण्याच्या संदर्भात अधिकारी निर्णय घेत असतात. मात्र १-२ वेळा नॉर्म्स न ठरवल्याने अडचण येते. आता समाज कल्याण विभागाकडून निकष ठरवले जात आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली तसेच आतापर्यंत लेखी निकष नव्हते मात्र कार्यरीती ठरवलेली आहे. आधीच्या वर्षीच्या शिष्यवृत्तीची रक्कम देण्यास प्राधान्य दिले पाहिजे. बहुतांश समाज कल्याण अधिकारी या कार्यरीतीनुसार आपले कार्य करतात. मात्र १-२ ठिकाणी त्यानुसार काम होत नसल्याचे दिसून आले आहे. आता निकष लवकरात लवकर निश्चित केले जाणार आहेत असेही अवगत केले.

८.२४२ समितीने पुढे निधीचे वाटप करण्यासाठी निकष ठरवणे आवश्यक आहे. एखादा अधिकारी बदलल्यावर तेथील यंत्रणा देखील बदलते, हे योग्य नाही. कोणताही अधिकारी आला तरी देखील तेथील पध्दत कार्यरीती तीच राहिली पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेमार्फत रमाई आवास योजना,विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क शिष्यवृत्ती योजना, औद्योगिक सहकारी संस्थांना कर्ज वाटप करणे इ. चार योजनांचे मूल्यमापन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे यशदा संस्थेमार्फत १२ योजनांचे मूल्यमापन करण्यात येते. या मूल्यमापनाचा अहवाल समितीला १ महिन्यात उपलब्ध करुन देण्यात येणार होता २ महिने होऊन गेले तरी अद्याप सदर अहवाल समितीला प्राप्त झालेला नाही. एकूण १७ अहवाल असून १२ अहवाल यशदा मार्फत व ५ अहवाल डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेमार्फत तयार केले जाणार आहे. हे अहवाल अतिशय महत्वाचे आहेत. काही योजनांमध्ये अनियमितता झालेली आहे. या संदर्भात

वेळीच कारवाई न झाल्यास चांगल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्याऐवजी चुकीचे काम करणाऱ्यांना पाठीशी घातले जात आहे, असा अर्थ निघू शकतो. यामुळे सदर अहवालांचे मूल्यमापन करुन त्याची माहिती समितीला देण्यात यावी असे निदेशही समितीने दिले.

८.२४३ बीड जिल्ह्यातील संस्थांची काय परिस्थिती आहे याबाबत समितीने विचारणा केली असता सदरहू संस्थांचे लेखा परीक्षण करण्यासाठी श्री.देशमुख, लेखा परिक्षक नेमले होते. ऑगस्टनंतर चार लोकांची चौकशी समिती नियुक्त झाली. सदरहू चौकशी समितीने सांगितले की, लेखी पत्रव्यवहार करुनसुध्दा संस्थांनी समितीला कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत. वारंवार माहिती मागविली परंतु ती दिली नाही. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केलेली आहे. विभागाचे प्रतिनिधी जून महिन्यात तेथे गेले होते व त्या ठिकाणाचे फोटोग्राफही समिती सदस्यांना दाखविले असून बांधकामासाठी ४ संस्थांना निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, परंतु त्यांनी त्या निधीचा कसा विनियोग केला, यासंदर्भात लेखा परिक्षकांना कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत. जिल्हाधिकारी यांचे माध्यमातून वारंवार कळवूनही चारही संस्थांचे कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. या चार संस्थांची पुढील आठवड्यात सुनावणी होणार आहे असे ही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

८.२४४ विभागाचे अधिकारी अशा लोकांना मदत करत असल्याचे समितीने विभागास सांगितले व यामुळेच त्यातील एका ठेकेदाराने आता १०० कोटी रुपयांचा प्रोजेक्ट शासनाला सादर केला आहे. या संस्थांना देण्यात येणारे पैसे थांबवावे म्हणून विधानपरिषदेत चर्चा झाली होती व सभागृह बंद पाडले होते तरी देखील त्या संस्थांचे पैसे थांबवायला विभाग तयार नाही अशी खंत समितीने व्यक्त केली.

८.४४५ यासंदर्भात विभागीय सचिवांनी असे विदित केले की, विभागाने कोणालाही पाठीशी घातलेले नाही. सदरहू प्रकरण चुकीचे झाले असेल तर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. संस्थांना दुसरा हप्ता दिलेला आहे, त्याचे फोटोग्राफही आहेत. वरील सर्व परिस्थिती पाहता एक महिन्याच्या आत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी सूचना समितीने केली असता ज्या संस्थांचे चुकीचे काम झाले असेल त्यांचेविरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल तसेच सम्राट अशोक मागासवर्गीय सहकारी संस्थेला ५० लाख रुपये भाग भांडवलासाठी मंजूर केले. त्यानंतर १९५ लाख रुपये दोन हप्त्यामध्ये देण्यात आले. असे जवळपास अडीच कोटी दिले गेले. यामध्ये एकूण सर्व कामे होणे अपेक्षित होते. तथापि तेथे केवळ यंत्रसामुग्री बसविण्याचे काम सुरु आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. संस्थेचे फक्त शेअर

आहेत. तेथे प्रत्यक्ष जाऊन विभागाने पाहणी करावी. यावर्षी त्यांना मिळालेल्या पैशातून त्यांनी स्पेअर पार्टस आणलेले आहेत असा खुलासा समितीने केला.

८.२४६ सम्राट अशोक मागासवर्गीय सहकारी संस्थेला २.४५ कोटी रुपये मिळाले आणि शांतीदूत सहकारी संस्थेला २ कोटी रुपये मिळाले आहेत. सम्राट अशोक सहकारी संस्थेला दिनांक ११ ऑगस्ट, २०१० रोजी एक कोटी रुपये दिलेले आहेत. त्यानंतर दिनांक २८ सप्टेंबर, २०११ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांनी ९० लाख रुपयांचे उपयोगिता प्रमाणपत्र दिलेले आहे त्या आधारे दुसरा हप्ता मंजूर करण्यात आला आहे. मशिनरीबद्दल अहवालात नमूद केले आहे , परंतु मशिनरी कोठून खरेदी करण्यात आली, याबाबतची कागदपत्रे चौकशी समितीला दिली नाहीत. मशिनरी खरेदी केल्याचे बिल दाखविले नाही. चौकशी समितीच्या अहवालात हे ऑब्जेक्शन नोंदविले आहे. मशिनरीसाठी तसेच इतर सर्व बांधकामासाठी त्यांनी कसा खर्च केला आहे, ही सर्व माहिती द्यायला हवी होती तथापि संस्थेनी दिली नाही.

८.२४७ शांतीदूत गौतम बुध्द सहकारी संस्थेला किती पैसे दिले ? अशी विचारणा समितीने केली असता दिनांक २४ सप्टेंबर, २०११ रोजी शांतीदूत गौतम बुध्द सहकारी संस्थेला एक कोटी रुपये आयुक्त कार्यालयाकडून मंजूर केले होते. त्यानंतर त्यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१२ रोजी जागा बदलीचा प्रस्ताव आयुक्तांकडे सादर केला होता. आयुक्तांना जागा बदली करण्याचे अधिकार आहेत. जागा बदलीची नोंदणी केल्यानंतर आम्ही त्यांना दुसरा हप्ता पूर्ण दिला नव्हता. दिनांक १५/९/२०१२ रोजी पहिल्या हप्त्यातील उर्वरीत पार्ट दिला. शांतीदूत गौतम बुध्द सहकारी संस्थेला दुसरा हप्ता दिलेला नाही. आतापर्यंत त्यांना एकूण दोन कोटी रुपये दिलेले आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच नालंदा सहकारी सोसायटीने दिनांक ७ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी यांनी विभागाला पत्र दिले आहे. काही संस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून तरतूद करुन घेतली आहे. सम्राट अशोक मागासवर्गीय सहकारी संस्था, लुंबिनी सहकारी संस्था, नालंदा सहकारी संस्था यांनी कार्यकारी अभियंता यांचे मूल्यांकन प्राप्त करुन घेऊन जिल्हाधिकारी यांचेकडे उपयोगिता प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव गेलेला आहे. शांतीदूत गौतम बुध्द सहकारी संस्थेने दुसऱ्या हप्त्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडील उपयोगिता प्रमाणपत्रासह आयुक्तांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे तसेच लुंबिनी सहकारी संस्थेला १५५ लाख रुपयांचा पहिला हप्ता दिनांक २३ जानेवारी, २०१२ रोजी दिलेला आहे. दिनांक २३ जानेवारी, २०१२ रोजी नालंदा सहकारी संस्थेला ११५ लाख रुपयांचा पहिला हप्ता मंजूर झालेला आहे. शांतीदूत गौतम बुध्द सहकारी संस्थेला दुसरा हप्ता दिलेला नाही असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

८.२४७ समितीने दिनांक २१ व २२ नोव्हेंबर, २०१३ रोजी पुणे येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी मुंबई येथे विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली होती. त्या साक्षीच्या वेळी काही मुद्दे अनुत्तरित राहिले होते, त्या अनुषंगाने अधिक माहिती मिळण्याकरिता २५ जून, २०१४ रोजी साक्ष आयोजित केली. यावेळी विभागाच्या प्रतिनिधींनी शिष्यवृत्तीच्या मुद्याबाबत समितीला थोडक्यात माहिती द्यावी अशी सूचना समितीने विभागास केली. सन २०११ ते २०१३ पर्यंत कोणकोणत्या जिल्हयामध्ये, कोणकोणत्या महाविद्यालयातील व्हीजेएनटी, ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम देणे प्रलंबित आहे याची माहिती उपलब्ध झालेली असून ती सी.डी.च्या स्वरूपात समितीस उपलब्ध करून दिली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. तथापि याचा गोषवारा संचालकांनी पुढीलप्रमाणे केला. सन २०११-२०१२ मध्ये ओबीसी प्रवर्गातील अर्जांची संख्या ३८,३२७ व खर्च रु३०.७४ कोटी अपेक्षित आहे. व्हीजेएनटी प्रवर्गातील अर्जांची संख्या २२,६५९ असून खर्च रु२३.३९ कोटी अपेक्षित असून एसबीसी प्रवर्गातील अर्जांची संख्या ४,०७८ व खर्च रु४.८३ कोटी अपेक्षित आहे.

८.२४८ सन २०१२-२०१३ मध्ये ओबीसी प्रवर्गातील अर्जांची संख्या ९८,९४८ व रक्कम रु७९.७१ कोटी अपेक्षित आहे. व्हीजेएनटी प्रवर्गातील अर्जांची संख्या ५६,५०५ असून रक्कम रु७५.६२ कोटी अपेक्षित आहे. एसबीसी प्रवर्गातील अर्जांची संख्या १२,३७७ असून रक्कम रु२०.३७ कोटी अपेक्षित आहे.

८.२४९ सन २०१२-२०१३ मध्ये ओबीसी प्रवर्गातील अर्जांची संख्या २,८४,८७२ व रक्कम रु२३९.५९ कोटी अपेक्षित आहे. व्हीजेएनटी प्रवर्गातील अर्जांची संख्या १,३५,६०५ असून रक्कम रु१८१.७० कोटी अपेक्षित आहे. एसबीसी प्रवर्गातील अर्जांची संख्या २८,८०७ असून रक्कम रु५४.२४ कोटी अपेक्षित आहे.

८.२५० सन २०१४-२०१५ या वर्षात येणारे अर्ज आणि प्रलंबित असलेले मागील अर्ज यासाठी एकूण २५३६.५७ कोटी रुपये लागणार आहेत. याकरिता बजेटमध्ये १४६५ कोटी रुपयांची तरतूद झालेली असून उर्वरित १०७१ कोटी रुपये मिळण्यासाठी शासनाला पुरवणी मागणी सादर केली असून रु.२६५ कोटीची पुरवणी मागणी मंजूर झालेली असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले. आवश्यक त्या प्रमाणात ग्रँट मिळत नसल्याने आणि दरवर्षी विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे, त्यामुळे त्या त्या वर्षात शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहिले आहेत असे समितीला अवगत केले.

८.२५१ केंद्र सरकारकडून अनुदान मिळते का? या समितीच्या प्रश्नाला ३१४४ ओबीसी या शीर्षामध्ये केंद्र सरकारकडून अनुदान मिळणे अपेक्षित होते. केंद्र सरकारच्या संबंधित विभागाकडे पुरेसा निधी उपलब्ध

नसल्यामुळे २०११-१२ पासून २०१३-१४ अखेर १३९२ कोटी रुपये येणे आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, देश पातळीवर ४०० ते ५०० कोटी रुपयांची ग्रँट उपलब्ध होते. त्यातून महाराष्ट्राच्या वाट्याला फार कमी रक्कम मिळते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

८.२५२ एवढी तफावत का निर्माण झाली? अशी विचारणा समितीने केली असता दरवर्षी ओबीसी विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली आहे. शिक्षण शुल्क समितीने नव्याने फी स्ट्रक्चर निश्चित केल्यामुळे सुध्दा रक्कम वाढत गेली आहे. ४४,५०० ची केंद्र सरकारची मर्यादा होती त्या मर्यादेत त्यांच्याकडे मागणी केली होती त्या अनुषंगाने १३९२ कोटी रुपयांची मागणी त्यांच्याकडे प्रलंबित आहे. निधीची उपलब्धता पुरेशा प्रमाणात न होणे व कॉलेजांकडून वेळेत अर्ज न पाठविणे ही सुध्दा कारणे आहेत. अर्जाचे प्राथम्य क्रम हे मागील अर्ज जे प्रलंबित आहेत त्यांना प्राधान्य दिले जाते, त्यानंतर चालू वर्षातील अर्ज विचारात घेतले जातात अशा रितीने ठरविले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

८.२५३ सन २०११ पासूनचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत. सन २०११ ते २०१४ या कालावधीत अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण पूर्ण करून महाविद्यालयातून बाहेर पडले असतील. त्यापैकी पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम विभागाकडून कशाप्रकारे वाटप होणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता आणि शिक्षण फी हे पूरक (Component) असतात. शिक्षण फी विद्यार्थ्यांकडून घेतली जात नाही. विद्यार्थी जरी कॉलेज सोडून गेले असले तरी शिष्यवृत्तीची रक्कम विभागाकडून कॉलेजच्या खात्यावर जमा होते. केंद्र सरकारकडून शिष्यवृत्तीकरिता जो निधी येतो त्यामध्ये विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता अंतर्भूत असतो. ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २ ते २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे अशा विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देय नाही त्यांना राज्य शासनाच्या निधीतून फ्री शीप म्हणून वेगळी योजना राबवितो असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

८.२५४ निधीचे वाटप करताना कोणते निकष लावले जातात व याबाबत नेमकी सद्य:स्थिती काय आहे हे समितीला सांगावे असे सूचित केले असता चालू वर्षी मंजूर निधी उपलब्ध झाल्यानंतर आयुक्त कार्यालयामार्फत सर्व जिल्हयांना कळविण्यात आलेले आहे की, प्रलंबित अर्ज अगोदर निकाली काढण्यात यावेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

८.२५५ संजय गांधी निराधार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना हयात असल्याचे प्रमाणपत्र देणे यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस असा खुलासा केला की, संजय गांधी निराधार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना हयात असल्याचे प्रमाणपत्र आमदार/खासदार महोदयांनी देणे याबाबतचा मुद्दा आहे. दिनांक २० सप्टेंबर, १९८० च्या शासन निर्णयामध्ये अशी तरतूद आहे की, लोकसभा/राज्यसभा सदस्य,

विधानसभा/विधानपरिषद सदस्य, जिल्हा परिषदेचे पदाधिकारी सदस्य, पंचायत समितीचे अध्यक्ष व सदस्य, महानगरपालिका/ नगरपालिका यांचे पदाधिकारी यांच्याकडून घेतलेले हयातीचे प्रमाणपत्र वर्षातून एकदा सादर करावे लागेल. शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी, २००४ नुसार पूर्वीचे ३१ शासन निर्णय अधिक्रमित केले आहेत. याच शासन निर्णयनुसार दरवर्षी १ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत एकदा संबंधित लाभार्थ्यांनी त्यांचे जेथे खाते आहे अशा बँक मॅनेजरकडे अथवा पोस्ट मास्टरकडे स्वत: हजर राहावे व ते हयात असल्याची नोंद बँक मॅनेजर/पोस्ट मास्टर यांनी घ्यावी.

८.२५६ कोणत्याही कारणामुळे लाभार्थी बँकेत हजर राहू शकला नाही तर त्या लाभार्थ्यांने नायब तहसीलदार/तहसीलदार/उप विभागीय अधिकारी यांचे समोर हजर राहून हयातीबाबतचे प्रमाणपत्र संबंधित तहसीलदारांकडे सादर करावयाचे आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००४ पासून २०१४ पर्यंत आमदार या नात्याने आम्ही हयातीचा दाखल देत आहेत. शासनाकडून तो स्वीकारला जात आहे. परंतु मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाने जो फॉर्म तयार केलेला आहे त्यावर आमदार/खासदार यांचा उल्लेख नसून फक्त 'नगरसेवक' हयातीचा दाखला देतील असा उल्लेख केला आहे. विभागाने तो फॉर्म मागवून घ्यावा आणि शहानिशा करावी असे स्पष्ट मत समितीने व्यक्त केले.

८.२५७ यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, याबाबत शासनाकडून निर्णय घेण्यात येतो. सन २०१० च्या शासन निर्णयामध्ये ५-६ मुद्दे नमूद केलेले आहेत. यामध्ये लाभार्थ्यांची दरवर्षी तपासणी करण्यात यावी, विशेषत: मृत किंवा स्थलांतरित झालेल्या लाभार्थ्यांना वगळावे असे नमूद केलेले आहे. विधी व न्याय विभागाने मंत्री महोदयांचे मत मागितलेले आहे. १९८३ साली जे अधिकार होते ते २००४ सालच्या शासन निर्णयानुसार अधिक्रमित केले आहेत.

८.२५८ प्रत्येक मतदार संघातील आमदार संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष असतात या संदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, आता त्या समितीवर आमदार अध्यक्ष नाहीत. पालक मंत्र्यांनी समाजसेवा करणाऱ्या व्यक्तीची शिफारस केलेली असेल ती व्यक्ती संजय गांधी निराधार योजना समितीची अध्यक्ष असते. या अनुषंगाने या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे असे समितीने विभागास सुचित केले.

८.२५९ आयुक्त, सामाजिक न्याय यांच्या अंतर्गत कार्यालयामध्ये रिक्त असलेल्या एकूण १२४० पदे भरण्या संदर्भात काय नियोजन केले आहे ? यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीस असे विदित केले की, आयुक्त कार्यालयात १२४० पदे रिक्त होती. समितीने सूचना दिल्यानंतर ५८२ पदे पदोन्नतीद्वारे व सरळ सेवेद्वारे भरलेली आहेत. पदोन्नतीने १०० व सरळ सेवेद्वारे ४८२ पदे अशी एकूण ५८२ पदे भरलेली आहेत.

१६६ पदांसाठी जाहिरात दिलेली आहे. पुढील आठवड्यामध्ये परीक्षा घेऊन ही पदे भरण्यात येतील. ही सर्व पदे फेब्रुवारी, २०१५ पर्यंत भरण्यात येतील ही पदे भरण्यासाठी एमकेसीएलमार्फत ऑन लाईनद्वारे परीक्षा घेतली जाते.

८.२६० रमाई आवास योजनेमध्ये शहरी विभागातील झोपडपट्टीधारकांनाही सामील करण्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे, यासंबंधी शासनाचे धोरण काय आहे ? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीस असे विदित केले की, याबाबत सामाजिक न्याय विभागाने दिनांक ९ मार्च, २०१० रोजी जी.आर.निर्गमित केलेला आहे. ज्या ठिकाणी मालकी हक्काची जागा आहे त्यांना घरे बांधण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. ज्यांना नगरपालिकेने फोटोपास दिलेले आहेत त्यांच्या प्रकरणांना मंजुरी दिली जाते. नगरपालिका हद्दीमध्ये १.५० लाख रुपये, महानगरपालिकेच्या हद्दीत २ लाख रुपये, लाभार्थी बीपीएलमधील असेल तर त्यांच्याकडून कॉन्ट्रिब्यूशन घेतले जात नाही, बीपीएल नसेल तर त्यांच्याकडून ५% कॉन्ट्रिब्यूशन घेण्यात येते. ही योजना सर्व ठिकाणी लागू आहे. पण नगरपालिका क्षेत्रामध्ये या योजनेला तेवढा प्रतिसाद मिळत नाही. ग्रामीण भागामध्ये ७० हजार रुपये अनुदान दिले जाते. त्याऐवजी १ लाख रुपये अनुदान करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. पुणे विभागातील नगरपालिका क्षेत्रामध्ये या योजनेला प्रतिसाद कमी मिळत आहे. त्या विभागातील १ लाख ६० हजार घरे बांधून पूर्ण झाली आहेत. ९० हजार घरांचे काम प्रगतीपथावर आहे. विभागाला २.५ लाख घरांचे उद्दिष्ट दिले होते. या घरांची कामे सुरु आहेत, ती पूर्ण झाल्यानंतर १०० टक्के वाटप होईल.

८.२६१ कर्जत, जिल्हा अहमदनगर येथे अनुसूचित जाती मुला/मुलींसाठी वसतिगृह बांधण्याकरिता सन २००७-०८ मधील अर्थसंकल्पात ३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु ठेकेदाराने या वसतिगृहाचे काम केले नाही. या संदर्भातील लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "सन २००७-०८ मध्ये मुलांचे वसतिगृहाच्या इमारत बांधकाम करण्यासाठी रक्कम रु३,२६,९२,५००/- तरतूद सामाजिक न्याय विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन दिली होती. परंतु सदर ठिकाणी हे कर्जतपासून ५ कि.मी.अंतरावर असल्याने प्रवेशितांना शाळा/महाविद्यालयात येण्याजाण्याकरिता गैरसोयीची असल्यामुळे सदर ठिकाणी वसतिगृहाचे बांधकाम करण्यात आलेले नाही." या वसतिगृहासाठी जागा निश्चित करीत असताना ही बाब अगोदर निदर्शनास आली नव्हती का ? अशी समितीने विचारणा केली यावर विभागाने ही नवीन योजना सुरु केली होती त्या योजनेंतर्गत हे वसतिगृह बांधावयाचे होते. या योजनेंतर्गत आलेल्या सर्व प्रस्तावांना शासनाने एकत्रितपणे मान्यता दिली होती असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

८.२६२ हे बांधकाम पूर्ण का झाले नाही, ५ कि.मी. अंतरावर ही जागा आहे असे निदर्शनास आल्यानंतर ते वसतिगृह ३ कि.मी.अंतरावर बांधता आले असते. सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर बांधकामाचे अंतर लांब आहे असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. वसतिगृहाचे ठिकाण लांब आहे हे संबंधितांच्या अगोदर का लक्षात आले नाही, निधीची तरतूद असतानाही काम पूर्ण झालेले नाही, त्यामुळे वेळ व पैसा वाया गेला आहे. याला जबाबदार कोण आहे, या दिरंगाईचे उत्तरदायित्व कोणावर येते ? विभागाच्या लेखी उत्तरात ही नमूद केले आहे की, "सदर जागेवर बांधकाम करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास प्रस्ताव सादर केला असता उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी ती जागा वसतिगृहासाठी योग्य नाही असे कळविले आहे". यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, या वसतिगृहासाठी शासकीय जागा मिळत नसल्यामुळे व वसतिगृहाकरिता बांधकाम करणे आवश्यक असल्याने खाजगी जमीन प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. या वसतिगृहासाठी २-३ प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून सुचविण्यात आले आहेत. एक म्हणजे या कामासाठी खुली जागा वापरता येणार नाही. दुसरे म्हणजे त्या ठिकाणचे ग्रामीण रुग्णालय बंद झालेले आहे. त्या जागेचा वसतिगृहासाठी उपयोग होऊ शकेल. तिसरे म्हणजे यासाठी खाजगी जागा खरेदी करता येते. परंतु रेडिरेक्नरच्या दुप्पट किंमतीने जागा खरेदी करावी लागेल. त्यामुळे जागेची सरळ खरेदी करता येणार नाही. त्यामुळे भूसंपादनाचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. या वसतिगृहाच्या जागेसंबंधी लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्यासोबत बैठक घेतली होती. या समितीमध्ये हा विषय उपस्थित केला होता. त्यावेळी जागा उपलब्ध करुन देतो असे उत्तर देण्यात आले होते. परंतु इतक्या वर्षाच्या दिरंगाईनंतर या कामासाठी विभागाचा सकारात्मक दृष्टीकोन दिसत नाही. या कामासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे ही वस्तुस्थिती असताना अद्याप जागेची निश्चिती होत नाही. लोकप्रतिनिधींनी संपर्क साधल्यानंतरही त्यांना प्रतिसाद दिला जात नाही याबाबत समितीने नाराजी दर्शविली असता संबंधित अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींना प्रतिसाद दिला नसेल तर ते चुकीचे आहे याबाबत चौकशी करण्यात येईल. या संदर्भात ३-४ प्रस्ताव समोर आलेले आहेत. विभागाकडून या वसतिगृहाच्या जागेच्या प्रश्नासंबंधी पाठपुरावा करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

८.२६३ लोकप्रतिनिधी विभागाला मदत करण्यास तयार आहेत. त्यांच्या मदतीने हा प्रश्न किती दिवसात निकाली काढणार आहात आणि ज्यांनी या कामाला विलंब केला आहे त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ते समितीला सांगावे. तसेच, त्या सोबत बैठकीची तारीख देखील सांगावी. आता पर्यंत माननीय पालकमंत्री, जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता अशा विविध स्तरावर हा विषय चर्चिला गेला आहे.

८.२६४ रमाई घरकुल योजनेसंदर्भात महालेखाकारांनी समितीस असे अवगत केले की, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१३ रोजी संपलेल्या वर्षाचा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र वर्ष २०१४ चा अहवाल क्रमांक ४ मध्ये पृष्ठ क्रमांक ९१ वर परिच्छेद क्रमांक २.४.१०.८ मध्ये असे नमूद केले आहे की,

८.२६५ "दारिद्रयरेषेखाली असणाऱ्या ज्या अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांची कच्ची घरे अथवा स्वतःची जमीन आहे अशांकरिता रमाई घरकुल योजने अंतर्गत घरकुले बांधावयाची होती. निधी अखर्चित राहिलेवरुन विभागाने मंत्री, सामाजिक न्याय यांच्या मंजुरीने (नोव्हेंबर, २०११) लोकरीच्या घोंगड्या आणि सतरंज्या रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना वाटप करणे करिता खरेदी केल्या. विभागाने रमाई घरकुल योजनेच्या नोव्हेंबर, २००८ च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये वित्त विभागाचे सहमती शिवाय घोंगडी आणि सतरंजी पुरवठा करणेबाबत अनियमित सुधारणा केली.

८.२६६ आयुक्त, समाज कल्याण यांनी रमाई घरकुल योजनेतील रु ४१.९० कोटींचा निधी (एप्रिल-ऑक्टोबर, २०१२) ४.६९ लाख घोंगड्या आणि ४.७१ लाख सतरंज्या खरेदी करणे कामी अनियमितरित्या वळविला होता. ज्यासाठी पुरवठा आदेश मार्च, २०१२ मध्ये दिला गेला होता. चाचणी तपासणीतील नऊ पैकी सात जिल्ह्यांत (मुंबई शहर वगळता) असे आढळले की, जून २०१२ मध्ये पुरविलेल्या रु ४.०३ कोटी किंमतीच्या ०.७७ लाख घोंगड्या आणि रु २.९३ कोटी किंमतीच्या रु ०.७९ लाख सतरंज्या ऑगस्ट, २०१३ अखेर विनावाटप पडून होत्या.

८.२६७ सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी नमूद केले (फेब्रुवारी, २०१४) की, रमाई घरकुल योजनेसाठी वित्त विभागाकडून मंजुरी घेतलेली असल्याने सदर वस्तूंचा अंतर्भाव करणे कामी वित्त विभागाच्या पुनः मंजुरीची आवश्यकता नव्हती.

८.२६८ या नवीन सेवा योजनेसाठी विधिमंडळाची परवानगी विभागाने घेतली नव्हती ना वित्त विभागाकडून मार्गदर्शन मागविले होते म्हणून उत्तर स्वीकारार्ह नव्हते." त्या करिता वेगळी स्कीम नव्हती तर घरकुलाबाबत शासनाचा जो शासन निर्णय होता त्यामध्ये घोंगडी घेण्याची तरतूद केली होती.

८.२६९ महालेखाकारांनी सांगितलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, वित्त विभाग या गोष्टींना मान्यता कशी देते ? त्यामुळे वित्त विभागाची देखील यामध्ये जबाबदारी येते यासंदर्भात वित्त सचिव, यांनी असा खुलासा केला की, वित्त विभागाकडून केवळ उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा नाही हे तपासले जाते. संबंधित विभागाने शासन निर्णयाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी करणे अपेक्षित असते. प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत योजनेचा लाभ पोहोचवायचा असल्याने खरेदी मोठी असते. मात्र असे असले तरीही टेंडर पद्धती वगैरे द्वारे पारदर्शक पद्धतीने खरेदी केलीच पाहिजे. प्रत्येक विभाग योजना कोणत्या

पद्धतीने राबविते याची तपासणी करणे वित्त विभागाला शक्य नाही. जेव्हा विभागाकडे मागणी येते तेव्हाच तुम्ही मागचा फंड खर्च झाला आहे की, नाही हे का पाहत नाही ? अशी समितीने विचारणा केली असता उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वित्त विभाग मागणी मान्य करतो असे सचिव, वित्त यांनी समितीस सांगितले.

८.२७० योजनेची अंमलबजावणी बरोबर झाली नसतानाही जर प्रमाणपत्र दिले जात असेल तर याचा अर्थ ते लोक खोटे प्रमाणपत्र देतात. यामध्ये वित्त विभाग खोटे बोलत आहे की, समाजकल्याण विभाग खोटे बोलत आहे हे पहावे लागेल. मागच्या वेळेचे पैसे खर्च झाले आहेत की, नाही हे न पाहताच पैसे का दिले जातात ? या प्रश्नावर काही काही ठिकाणी निधी व्यपगत देखील होतो असा खुलासा सचिव, वित्त विभाग यांनी केला.

८.२७१ या प्रकरणाची गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करावी अशी समितीची शिफारस आहे. समितीने सगळ्या प्रकाराबाबत नाराजी व्यक्त करत या प्रकरणांची गुन्हे अन्वेषण विभागाकडून चौकशी करण्यात यावी अशी गुन्हे अन्वेषण विभागाकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर गुन्हे नोंदविण्याची कारवाई करावी अशी शिफारस समितीने विभागाकडे केली.

८.२७२ अनुसूचित जातीतील व्यक्तींच्या सहकारी संस्थांच्या विषयावर अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने अशी विचारणा केली की, "एकूण १८२ प्रथम हप्ता देऊन उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केलेल्या व ५८ संस्थांना ७० टक्के अर्थसहाय्य पूर्ण अदा केलेल्या अशा एकूण २४० संस्थांची तपासणी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांचे अध्यक्षतेखालील समित्यांकडून करण्यात आलेली आहे. त्यांचे अहवाल प्राप्त झाले असून सोबत प्रपत्रामध्ये गोषवारा सादर करण्यात येत आहे. एकूण २४० पैकी ७१ संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचे चौकशी समित्यांनी अहवालामध्ये नमूद केले असल्यामुळे नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार संबंधित संस्थांवर प्रत्यक्ष कार्यवाही करण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी दिनांक २०.१.२०१४ ते दिनांक १२.२.२०१४ पर्यंत या संस्थांच्या सुनावण्या आयुक्त, समाज कल्याण विभाग यांच्या कार्यालयात घेण्यात आल्या असून ७१ पैकी १६ संस्थांवर सहकार व समाज कल्याण विभागामार्फत गुन्हे दाखल करण्याबाबत संबंधित जिल्ह्याचे उप निबंधक, सहकारी संस्था व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना दिनांक १२.२.२०१४ रोजी कळविण्यात आले आहे. या बाबतची सद्य:स्थिती तसेच, दोषी संस्थांवर कोणती कारवाई करणार या बाबतची माहिती आयुक्तांनी सांगावी.

८.२७३ यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, सहकार विभागाच्या विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी ७१ संस्थाबाबत क्लियर ओपिनियन दिलेले आहे. समाज कल्याण विभागाने सह आयुक्त, सहकार यांना १९ गुन्हे दाखल करण्याबाबत कळविले आहे. तसेच, ६० सहकारी संस्थांची सुनावणी घेण्यात आली आहे. त्यामध्ये १९ लोकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

८.२७४ नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता, त्याला उत्तर देतांना माननीय सहकार मंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे तसेच, त्याबाबत त्यांनी एक बैठकही घेतली आहे. या सर्व ७१ अधिक ६१ अशा एकुण १३२ सहकारी संस्थांचे स्पेशल ऑडिट सहकार विभाग करुन घेणार आहे. तसेच, त्यामध्ये जर कोणी दोषी आढळून आले तर त्यांच्यावर गुन्हे देखील दाखल करण्यात येणार आहेत. याप्रकरणी नेमका किती भ्रष्टाचार व अपहारझाला हे न समजल्याने पोलीस गुन्हे दाखल करुन घेत नव्हते. ही बाब संबंधित संस्थांचे लेखापरिक्षण करुन किती रुपयांचा अपहार व भ्रष्टाचार झाला हे सहकार विभाग सांगू शकते.

८.२७५ समाज कल्याण विभागाने दिनांक ७ जून रोजी सहकार विभागाकडे १३२ संस्थांची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये ७१ संस्थांबाबत स्पष्ट अभिप्राय आहेत व ६१ संस्थांबाबत संदिग्ध अभिप्राय अशा एकूण १३२ सहकारी संस्थांची चौकशी सहकार विभाग करणार आहे.

८.२७६ यासंदर्भात अधिक माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये ज्या संस्थांना मंजूरी देण्यात आली होती त्यांच्या बाबतीत श्री.दत्ता नारायण राणे यांनी शासनाकडे तक्रार केली होती. त्या अनुषंगाने बार्टी या संस्थेमार्फत सन २०१० मध्ये चौकशी करण्यात आली व शासनास अहवाल सादर करण्यात आला.त्यानुसार संचालक, समाज कल्याण संचनालय, पुणे यांना दिनांक ३० मार्च, २०१० रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या समाज कल्याण विभागाचे उप सचिव यांनी ७-८ मुद्दयांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते ते खालील प्रमाणे आहेत :

१. त्रुटी विरहीत असलेल्या एका संस्थेस मंजूर करण्यात आलेले अर्थसहाय्य वितरीत करण्यात यावे.

२. एक त्रुटी असलेल्या २१ संस्थांना त्रुटीची पूर्तता केल्याची खात्री केल्यानंतर मंजूर अर्थसहाय्य वितरीत करण्यात यावे.

३. एक व २ त्रुटी असलेल्या ७७ संस्थांबाबत एका त्रुटीची पुर्तता व दुसऱ्या त्रुटीबाबत शासनाने शासन निर्णयात नमूद केलेल्या वित्तीय संस्थांकडून सादर केलेले प्रकल्प तांत्रिक व आर्थिकदृष्टया योग्य असल्याचे विहित केलेल्या संस्थांकडून प्रमाणपत्र घेतल्यानंतरच अर्थसहाय्य वितरीत करण्यात यावे.

४. एक ते तीन त्रुटी असणाऱ्या ४८ संस्थांकडून तीनही अटींची पूर्तता झाल्यानंतरच यथावकाश त्यांच्याबाबत निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सादर करावा.

५. आदर्श कुक्कुटपालन सहकारी संस्था मर्यादित पथराई तालुका रामटेक जिल्हा नागपूर, या संस्थेची मान्यता संस्थेस नोटीस देऊन रद्द करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करावा.

६. जय हनुमान मागासवर्गीय शेतीमाल प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादित उदगीर, तालुका उदगीर जिल्हा लातूर या संस्थेस मंजूर केलेले अर्थसहाय्य वितरीत करण्यास स्थगिती देण्यात येत आहे.

७. कोल्हापूर जिल्हा वगळता अन्य जिल्हयातील ज्या ११ संस्था तपासणीसाठी हजर झाल्या नाहीत, अशा संस्थांना तपासणीची संधी देऊन त्यांचेबाबत यथावकाश निर्णय घेण्यात येईल.

८. कोल्हापूर जिल्ह्यातील मंजूर ४८ संस्थांपैकी ज्या ७ संस्था तपासणीसाठी हजर झाल्या नाहीत, तसेच, ज्या १६ संस्थांमध्ये संचालक मंडळाचे सदस्य एक किंवा त्यापेक्षा जास्त संस्थेमध्ये संचालक म्हणून कार्यरत आहेत, त्यांचेबाबत पुन्हा तपासणी करुन यथावकाश निर्णय घेण्यात येईल.

८.२७७ वरील पूर्तता झाल्यानंतर समाज कल्याण विभागामार्फत अर्थ सहाय्य वितरीत करण्यात आले आहे. आतापर्यंत ३७२ संस्थांना अर्थ सहाय्य दिलेले आहे.

या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यास समाज कल्याण विभागाचे अधिकारी पोलीसांकडे गेले असता या प्रकरणी भ्रष्टाचार किती झाला, अपहार किती झाला याबाबतची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी मागितल्यामुळे, समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्तांमार्फत १९ संस्थांवर गुन्हे दाखल करण्याबाबत सहकार विभागास कळविण्यात आलेले आहे. याबाबत सहकार विभागाच्या जिल्हा दुय्यम निंबंधक कार्यालयाने सदर संस्थांचे लेखापरिक्षण झाल्याशिवाय किती अपहार झाला हे सांगता येणार नाही, असे कळविले असल्याचे समितीस अवगत केले.

८.२७८ माननीय सहकार मंत्री महोदयांनी एका औद्योगिक सहकारी संस्थेच्या प्रश्नावर आश्वासन दिलेले आहे. त्यानुसार सहकार विभाग सदर संस्थांचे लेखापरिक्षण २ महिन्यात करणार आहे. सहकार विभाग लेक्षापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर सहकार कायद्यांतर्गत जप्ती किंवा वसुलीची कार्यवाही करणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

८.२७९ संस्थेने ५ टक्के भाग भांडवलाची रक्कम बँक खात्यामध्ये ठेवायची आहे ती अनेक संस्थांनी काढून घेतली आहे, याबाबत काय कार्यवाही करण्यात आली ? या समितीच्या प्रश्नाला समाज कल्याण विभागाच्या आयुक्तांनी सुनावणी घेतलेली आहे. समाज कल्याण विभागाच्या निदर्शनास आलेल्या अशा संस्थांना ५ टक्के भाग भांडवल रक्कम बँकेमध्ये भरुन त्या रकमेची एफ.डी. करावयास सांगितले आहे. तसेच,

२०१० मधील अहवालानुसार त्रुटींची पुर्तता झाल्यानंतरच सदर संस्थांना अर्थसहाय्य पुरवठा करण्यात आलेला आहे. ५ टक्के भाग भांडवलाची रक्कम काढल्याबाबतची प्रकरणे, ही योजना प्राथमिक अवस्थेत असतांनाची होती, त्यामध्ये आता सुधारणा झालेली आहे. ५३ संस्थेंमध्ये प्रत्यक्ष उत्पादन सुरू आहे. तसेच, अशी बाब निदर्शनास आली तर सदर संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल व पैसे वसुल करण्याची बाब सहकार विभागाच्या अखत्यारीमध्ये आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

८.२८० नागपूर जिल्हयातील मागासवर्गीय मातोश्री सूतगिरणी मागील १० वर्षापासून सुरु आहे. या सूतगिरणीला शासनाकडून पैसे दिले जातात. या सूतगिरणीबाबत अनेक तक्रारी झाल्या, चौकशा झाल्या परंतु पुढे कारवाई काय करण्यात आली ? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, सद्य:स्थितीत माहिती नाही, सदर माहिती समितीला कळविण्यात येईल. परंतु, या सूतगिरणीला ६ कोटी रूपये मार्च मध्ये मंजूर करण्यात आलेले असून ते संयुक्त खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहेत. या संस्थेने आतापर्यंत उद्योगाचा प्रस्ताव दिलेला नाही त्यांचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी सखोल माहिती घेण्यात येईल. अशा १४ सूतगिरण्या असल्याचे समितीस सांगितले. तसेच सदरहू १४ सूतगिरण्यांची माहिती उपलब्ध करुन दिली असून ती समिती कक्षात उपलब्ध आहे.

८.२८१ सम्राट अशोक, शांतीदूत आणि नालंदा व अन्य एक अशा चार संस्थांना पहिला हप्ता दिल्यानंतर ५२ आठवड्यात त्यांनी काम सुरु केले असा अहवाल दिला होता काय तसा अहवाल दिला नसेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे ? यावरील अनुपालन असे दिलेले आहे की, बीड जिल्ह्यातील नेकलूर येथील संस्थांबाबतचा अहवाल सह आयुक्त, समाज कल्याण यांचे अध्यक्षतेखाली समितीने यापूर्वीच दिनांक २ जुलै, २०१३ रोजी शासनास सादर केलेला आहे. श्री.सुरेश कांबळे, प्रादेशिक उपायुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१३ रोजी पुन्हा संस्थेस भेट देऊन देखील संस्थेने तपासणी पथकाला आर्थिक बाबीशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

८.२८२ सहायक आयुक्त, समाज कल्याण, बीड यांनी त्यांचे पत्र क्रमांक २७, दिनांक ७.१.२०१४ अन्वये असे कळविले आहे की, सदर चार संस्थांचे ऑडिट करणेसाठी उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी श्री.एस.बी.देशमुख, लेखापरीक्षक श्रेणी-२, यांची नियुक्ती केली असून या संस्थांचे ऑडीट करण्यासाठी श्री.देशमुख यांचेकडे रेकॉर्ड दिलेले आहे. ऑडिट करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या संस्थांचे ऑडीट झाल्यानंतर संबंधित ऑडीटर यांच्या अहवालानुसार संस्थांवर कारवाई प्रस्तावित करणे योग्य होईल.

८.२८३ तसेच संबंधित संस्थांनी नियमाप्रमाणे रेकॉर्ड उपलब्ध करुन दिले नाही तसेच त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन अद्याप समितीला माहिती का देण्यात आली नाही ? अशी विचारणा केली तसेच

विभागाचे अनुपालन असे केलेले आहे की, सदर चार संस्थांचे ऑडिट करणेसाठी उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी श्री.एस.बी.देशमुख लेखापरीक्षक श्रेणी-२, यांची नियुक्ती केली असून या संस्थांचे ऑडीट करण्यासाठी श्री.देशमुख यांचेकडे रेकॉर्ड दिलेले आहे ऑडिट करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या संस्थांचे ऑडीट झाल्यानंतर संबंधित ऑडिटर यांच्या अहवालानुसार संस्थावर कारवाई प्रस्तावित करणे योग्य होईल. लेखा परिक्षण अहवालात प्रतिकुलता दिसून आल्यास सदर संस्थांवर सहकार विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल असे विभागाने नमूद केले असल्याचेही समितीने विभागास अवगत केले. या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, फेब्रुवारी महिन्यामध्ये यासंबंधी विभागाने संबंधितांना रेकॉर्ड मागविण्याविषयी पत्र पाठविले होते. विभागीय पातळीवरुन काही ठिकाणहून रेकॉर्ड नसल्याचे पत्र विभागाला प्राप्त झालेले आहे. अशा प्रकारे योजनेबाबत शासनाने माहिती मागविली असता माहिती नाही किंवा रेकॉर्ड नाही म्हणून पत्र पाठविणा-या विभागीय पातळीवरील अधिका-याविरुध्द योग्य कारवाई करण्याची प्रक्रिया चालू आहे.

८.२८४ जानेवारी ते जून या कालावधीमध्ये शासनाच्या पत्रावर विभागीय पातळीवर काहीही कारवाई होत नाही, ही बाब निंदनीय आहे असे समितीने खेदाने व्यक्त केले. शांतिदूत या सहकारी संस्थेला कर्जाचा दुसरा हप्ता मंजूर करण्यात आला होता. ही बाब योग्य नाही. या योजनेच्या माध्यमातून फसव्या सहकारी संस्थांचे हे कौतुक चालले आहे ? असेही खेदाने नमूद केले.

८.२८५ हे प्रकरण उघडकीला आल्यानंतर संबंधितांविरुध्द योग्य कारवाई करण्याऐवजी कर्जाचा दुसरा हप्ता मंजूर केला गेला. यावर सभागृहामध्ये दोन तास चर्चा केली गेली. संबंधित संस्थांना कर्जाचे हप्ते देण्यात येणार नाहीत, तसेच, संबंधित सहकारी संस्थांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात येतील, असे संबंधित माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते. या संदर्भात समितीने विचारणा केली असता काही कर्जाचा पहिला हप्ता घेतलेल्या सहकारी संस्थांनी १५ जुलैपर्यंत प्रॉडक्शन सुरु करण्यात येईल, असे सांगितले होते. सदरहू सहकारी संस्थांमध्ये मशिनरी नसून सध्या केवळ शेड उभारण्यात आलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. यावर समितीने विदित केले की, काही संस्थांनी शासनाची फसवणूक केली असे असतांनाही शासनाने काही सहकारी संस्थांना कर्जाचा अंतिम हप्ता देण्याचे मान्य केलेले आहे, हे योग्य नसल्याचे सांगत नाराजी व्यक्त केली. या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, शासनाच्या निदेशानुसार ज्या सहकारी संस्थांनी पहिला हप्ता घेऊन विहित मुदतीत उत्पादन सुरु केलेले नाही, त्यांचा दुसरा हप्ता कोषागारातून ब्लॉक करुन पैसे व्यपगत करण्यात आलेले आहेत.

८.२८६ समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा वर्धा, तालुका देवळी येथील संस्था जाणूनबूजून बंद करण्यात आली ही संस्था घेण्यासाठी यवतमाळ येथील सिध्दिविनायक संस्थेचा अर्ज होता.

अशा प्रकारे २५ संस्थांचे अर्ज प्राप्त होते. या सर्व संस्थांची यादी बाजूला ठेवून सिध्दिविनायक बहुउद्देशीय संस्थेला परवानगी देण्यात आली आहे. या संदर्भात नेमके काय झाले आहे त्याची सर्व कागदपत्रे समितीला का देण्यात आली नाहीत ?

८.२८७ यावरील अनुपालनामध्ये पुढीलप्रमाणे शासनाने म्हटलेले आहे. गोंडवाना मुक्ती मिशन आनंदनगर, जिल्हा वर्धा संचलित जय भवानी प्रा.आ.शा. मौजे अंजीअंदुरी ता.देवळा, जि.वर्धा या शाळेची मान्यता संचलनालयाचे आदेश क्रमांक विजाभजस/आशा/मा.र./ अंजीअंदुरी/वर्धा/२००९-२०१०/२९९५ दिनांक ३०.९.२००९ अन्वये रद्द करण्यात आली. शासन निर्णय क्र.विभशा २०१०/प्र.क्र.२७/मावक ६, दिनांक १ जून, २०१२ अन्वये सदर शाळा सिध्दिविनायक बहुउद्देशीय ग्रा.वि.संस्था ता.दिग्रस, जि.यवतमाळ या संस्थेस मौजे सिंगद ता.दिग्रस , जि.यवतमाळ येथे अनुदान तत्वावर हस्तांतरीत व स्थलांतरीत करण्यात आली आहे.

दिग्रस येथील संस्थेचा अर्जही नसताना ऐनवेळ अर्ज मागवून ही शाळा त्यांना चालविण्यास देण्यात आलेली आहे, हे योग्य नाही. या शाळेकरिता इतर संस्थांचे अर्ज अगोदरच आलेले असतानाही त्यांचा विचार याकरिता का करण्यात आला नाही ? यासंदर्भात विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही.

<u>समितीचे अभिप्राय :-</u>

८.२८८ सन २००९-१० या वित्तीय वर्षात ४२२५ अनुसुचित जाती अनुसचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च या शिर्षाखाली राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधकामाकरीता मुळ तरतूद रु. १६.९५ कोटी असताना रु. ५४.३२ कोटीच्या पुरवणी मागणीव्दारे एकूण निधी रु.७१.२७ कोटी एवढा प्राप्त केला व केवळ ३.८९ कोटी खर्च तर रु. ६७.३८ कोटीची बचत झाली व सदर बचत अन्य योजनेकडे वळविण्यात आली. सबब, मुळ तरतूदीपेक्षा कमी खर्च झालेला आहे. पुरवणी मागणी करताना विभागाने खर्चाचा अंदाज न घेता मुळ तरतूदीपेक्षा ज्यादा पुरवणी मागणी केली.

८.२८९ लेखाशिर्ष ४२२५ अंतर्गत मागसवर्गीय मुलामुलींकरीता शासकीय वसतीगृहे बांधणे या शिर्षाखाली मुळ तरतूद रु. ४०.३२ कोटी मंजूर असताना रु. २४.६८ कोटीची पुरवणी मागणी केली. एकूण निधी रु.६५.०० कोटी मंजूर झाला. प्रत्यक्ष खर्च केवळ २.९९ लक्ष झाला, झालेला प्रत्यक्ष खर्च पुर्णपणे विचारात न घेता रु. ६२.८० कोटी तरतूद दि. ३०.३.२०१० रोजी पूर्नविनियोजनाव्दारे अन्य शिर्षाखाली वर्ग केली. सबब, पुनर्विनियोजनाचे आदेश शेवटच्या दिवशी निर्गमीत करुनही वर्षभरातील प्रत्यक्ष खर्च विचारात घेतलेला नाही ही गंभीर बाब समितीच्या निदर्शनास आली.

८.२९० लेखाशिर्ष ४२२५ अंतर्गत अनुसुचित जातीच्या मुलामुलींकरीता औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधणे या शिर्षाखाली मुळ तरतूद रु. ४.४१ कोटी मंजूर असताना रु. ५.५९ कोटी पुरवणी मागणी करुन रु. १०.०० कोटी तरतूद मंजूर करुन घेतली तथापि प्रत्यक्ष खर्च 'निरंक' होता. मूळ तरतूद खर्च होणार नसताना पूरवणी मागणी करणे अयोग्य होते याशिवाय समितीसमोर झालेल्या साक्षीत असे निदर्शनास आले की, अनुसुचित जातीच्या मुलामुलींकरीता औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधकामाकरीता जमीन उपलब्ध नाही, प्रशिक्षण संस्थाच्या इमारतीचे नकाशे, आराखडा व अंदाजपत्रक तयार नाही. अंदाजपत्रकात मान्यता नसताना निधीची मागणी करणे अयोग्य होते, लेखाशिर्ष २२५१ सेक्रेटरीएट सामाजिक सेवा या शिर्षाखाली मुळ तरतूद रु. १३९.७८ कोटी असतांना जवळपास रु. ५३८.०९ कोटी पूरवणी मागणी करण्यात आली व रु. १२८.६७ कोटीची बचत झाली. सबब, मुळ अंदाजपत्रक तयार करतानाचे अंदाज साफ चुकीचे होते. पुरवणी मागणी करतानाही चुकीचे अंदाज केले होते. परिणामी रु. १२८.६७ कोटीची बचत झाली.

८.२९१ रमाई घरकुल योजनेसंदर्भात महालेखाकारांनी समितीस असे अवगत केले की, "दारिद्रयरेषेखाली असणाऱ्या ज्या अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांची कच्ची घरे अथवा स्वतःची जमीन आहे अशांकरिता रमाई घरकुल योजने अंतर्गत घरकुले बांधावयाची होती. निधी अखर्चित राहिल्याने विभागाने मंत्री, सामाजिक न्याय यांच्या मंजुरीने (नोव्हेंबर, २०११) लोकरीच्या घोंगड्या आणि सतरंज्या रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना वाटप करणेकरिता खरेदी केल्या. विभागाने रमाई घरकुल योजनेच्या नोव्हेंबर, २००८ च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये वित्त विभागाचे सहमती शिवाय घोंगडी आणि सतरंजी पुरवठा करणेबाबत अनियमित सुधारणा केली.

८.२९२ आयुक्त, समाज कल्याण यांनी रमाई घरकुल योजनेतील रु ४१.९० कोटींचा निधी (एप्रिल-ऑक्टोबर, २०१२) ४.६९ लाख घोंगड्या आणि ४.७१ लाख सतरंज्या खरेदी करणे कामी अनियमितरित्या वळविला होता. ज्यासाठी पुरवठा आदेश मार्च, २०१२ मध्ये दिला गेला होता. चाचणी तपासणीतील नऊ पैकी सात जिल्ह्यांत (मुंबई शहर वगळता) असे आढळले की, जून २०१२ मध्ये पुरविलेल्या रु ४.०३ कोटी किंमतीच्या ०.७७ लाख घोंगड्या आणि रु २.९३ कोटी किंमतीच्या रु ०.७९ लाख सतरंज्या ऑगस्ट, २०१३ अखेर विनावाटप पडून होत्या.

८.२९३ रमाई घरकुल योजनेसाठी वित्त विभागाकडून मंजुरी घेतलेली असल्याने सदर वस्तूंचा अंतर्भाव करणे कामी वित्त विभागाच्या पुनः मंजुरीची आवश्यकता नव्हती. परंतु या नवीन सेवा योजनेसाठी विधिमंडळाची परवानगी विभागाने घेतली नव्हती ना वित्त विभागाकडून मार्गदर्शन मागविले होते म्हणून उत्तर स्वीकारार्ह नव्हते."

८.२९४ वित्त विभागाकडून केवळ उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा नाही हे तपासले जाते. संबंधित विभागाने शासन निर्णयाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी करणे अपेक्षित असते. प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत योजनेचा लाभ पोहोचवायचा असल्याने खरेदी मोठी असते. मात्र असे असले तरीही टेंडर पद्धती वगैरे द्वारे पारदर्शक पद्धतीने खरेदी केलीच पाहिजे. प्रत्येक विभाग योजना कोणत्या पद्धतीने राबविते याची तपासणी करणे वित्त विभागाला शक्य नाही. संबंधित विभागाने उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वित्त विभाग मागणी मान्य करतो. योजनेची अंमलबजावणी बरोबर झाली नसतानाही जर प्रमाणपत्र दिले जात असेल तर याचा अर्थ विभाग खोटे प्रमाणपत्र देतात.

८.२९५ घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणात झालेल्या बचतीचे मुख्य कारण सांगताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, घरकुल योजनेला २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीत गती मिळाली होती. या योजनेच्या प्रत्यक्ष कामास २०१० पासून सुरुवात झाली. ते वर्षे घरकुल योजनेचे पहिलेच वर्ष होते.

८.२९६ घरकुल योजनेसाठी मूळ तरतूद १३९ कोटी ७८ लाख १४ हजार रुपयांची केली व नंतर पूरक मागणी ५३८ कोटी ०९ लाख १५ हजार रुपयांची करण्यात आली. मूळ तरतुदीच्या पाच पट पूरक मागणी करण्यात आली. अशा प्रकारे ६७७ कोटी रुपयांची तरतूद प्राप्त झाली होती. घरकुल योजना २००८ ला नव्याने प्रस्तावित केली व योजनेचा शासन निर्णय नोव्हेंबर-२००८ मध्ये निर्गमित केला. एखाद्या योजनेच्या मूळ तरतुदीच्या आधारे कितीही रकमेची पूरक मागणी केली असेल आणि त्यास वित्त व नियोजन विभागाने मान्यता दिली असेल तर ती पूरक मागणी होऊ शकते.जेव्हा अंदाजपत्रक तयार झाले तेव्हा ही योजना अस्तित्वात होती. रमाई घरकुल योजना ही अनुसूचित जाती व नवबौध्द समाजासाठी होती. ही योजना त्या वर्षी नव्याने सुरु केली होती. योजनेचे उद्दिष्ट ठरविणे, जाहिरात देऊन योजनेची प्रसिध्दी करणे, लाभार्थ्याचे निकष ठरविणे व लाभार्थी ठरविणे इत्यादी कामांसाठी ठराविक रक्कम राखून ठेवली होती. एकूण तीन लेखा शीर्षांतर्गत ही रक्कम राखून ठेवली होती.

८.२९७ एकूण अनुदान ६७७ कोटी ८७ लाख २९ हजार रुपये प्राप्त झाले होते व प्रत्यक्षात ५४९ कोटी १९ लाख ९८ हजार रुपये खर्च करण्यात आला. त्यापैकी १२८ कोटी ६७ लाख ३१ हजार रुपये शिल्लक राहिले.

घरकुल योजनेमध्ये विविध प्रकारचे प्रवर्ग होते. नवबौध्द, अनुसूचित जाती, मागासवर्गीय, आदिवासी इत्यादी विविध प्रवर्गासाठी घरकुल योजना होती. त्या सर्वांचे वेगवेगळे लेखा शीर्ष आहे. विशिष्ट रकमेसाठी वित्त व नियोजन विभागाची मान्यता घेतली असेल तर ती पुरवणी मागणी होऊ शकते असे असताना मूळ तरतुदीपेक्षा पूरक मागणी पाच पटीने वाढ करण्याचे कारण विषद करताना योजना सुरु करण्यापूर्वी त्या

योजनेला प्रतिसाद म्हणून अमुक इतके अर्ज येतील असे गृहीत धरुन मूळ तरतूद करण्यात आली होती. प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने पुरवणी मागणी करण्यात आली. यामध्ये ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील घरकुलांसाठी जास्त तरतूद करण्यात आली. शहरी भागातील घरकुलांवर २५२ कोटी रुपये आणि ग्रामीण भागातील घरकुलांवर ३८२ कोटी रुपये खर्च केले असून सदर रक्कम खर्च झाली आहे.

८.२९८ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवबौध्दांसाठी कायम स्वरुपी योजना आहेत. यापूर्वी मागासवर्ग आणि सर्वसाधारण वर्गासाठी योजना राबविली जात होती. परंतु शासनाने मागासवर्गीयांसाठी वेगळी योजना राबविण्याचे ठरविले त्याप्रमाणे रमाई घरकुल योजना सुरु झाली त्यानुसार तरतूद करण्यात आली. शहरी भागासाठी २५२ कोटी रुपये आणि ग्रामीण भागासाठी ३८३ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

८.२९९ विभागास जेवढ्या घरांचे उद्दिष्ट दिले होते ते पूर्ण झालेले नसून खालच्या यंत्रणेने व्यवस्थित काम केले असते तर जास्त रक्कम खर्च झाली असती. निम्म्यापेक्षा जास्त रक्कम खर्च झालेली आहे साडेतीन लाख घरांचे उद्दिष्ट आहे त्यापैकी दीड लाख घरे पूर्ण झालेली आहेत तर ८५ हजार घरांची कामे प्रगतीपथावर असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

८.३०० अनुसूचित जातीतील व्यक्तींच्या सहकारी "एकूण १८२ संस्थांना प्रथम हप्ता देऊन उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केलेल्या व ५८ संस्थांना ७० टक्के अर्थसहाय्य पूर्ण अदा केलेल्या अशा एकूण २४० संस्थांची तपासणी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांचे अध्यक्षतेखालील समित्यांकडून करण्यात आलेली आहे. त्यांचे अहवाल प्राप्त झाले असून सोबत प्रपत्रामध्ये गोषवारा सादर करण्यात येत आहे. एकूण २४० पैकी ७१ संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचे चौकशी समित्यांनी अहवालामध्ये नमूद केले असल्यामुळे नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार संबंधित संस्थांवर प्रत्यक्ष कार्यवाही करण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी दिनांक २०.१.२०१४ ते दिनांक १२.२.२०१४ पर्यंत या संस्थांच्या सुनावण्या आयुक्त, समाज कल्याण विभाग यांच्या कार्यालयात घेण्यात आल्या असून ७१ पैकी १६ संस्थांवर सहकार व समाज कल्याण विभागामार्फत गुन्हे दाखल करण्याबाबत संबंधित जिल्ह्याचे उप निबंधक, सहकारी संस्था व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना दिनांक १२.२.२०१४ रोजी कळविण्यात आले आहे.

८.३०१ सहकार विभागाच्या विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी ७१ संस्थाबाबत क्लियर ओपिनियन दिलेले आहे. समाज कल्याण विभागाने सह आयुक्त, सहकार यांना १९ गुन्हे दाखल करण्याबाबत कळविले आहे. तसेच, ६० सहकारी संस्थांची सुनावणी घेण्यात आली आहे. त्यामध्ये १९ लोकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

समितीच्या शिफारशी :-

८.३०२ शिफारस क्र.(१) चुकीचे अंदाजपत्रक तयार करणे, आवश्यकता नसलेल्या रकमेची पुरवणी मागणी करणे, मोठया प्रमाणावर रकमा पुनर्विनियोजन कराव्या लागणे, मोठया प्रमाणावर बचत दिसून येणे प्रत्यक्ष खर्चाचा विचार न करता चुकीचे पुनर्विनियोजनाचे आदेश निर्गमीत करणे, मुळ मंजूर तरतूदीच्या पाच पट रकमेची पुरवणी मागणी करणे तथापि संपूर्ण निधी खर्च न करणे, बांधकामाकरीता जमीन, इमारतीचे नकाशे, आराखडा, अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता नसताना निधीची मागणी करणे या गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आल्या आहेत. विभागाने उपरोक्त बाबीस जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत ठोस उपाययोजना करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

८.३०३ शिफारस क्र. (२) रमाई घरकुल योजनेसंदर्भात निधी अखर्चीत राहणे, गैरव्यवहार इ. झालेल्या सगळ्या प्रकाराबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त करत या प्रकरणांची गुन्हे अन्वेषण विभागाकडून चौकशी करण्यात यावी. गुन्हे अन्वेषण विभागाकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर यात दोषी आढळणाऱ्या सर्व संबंधितांवर गुन्हे नोंदविण्याची कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

८.३०४ शिफारस क्र. (३) विभागास सन २०१३-२०१४ पर्यंत साडेतीन लाख घरांचे टार्गेट पूर्ण करायचे असल्यामुळे ही तरतूद केली. ही योजना जिल्हापरिषदेमार्फत राबविण्यात येत असून ही पूर्णत:राज्य शासनाची योजना आहे. विशेष घटक योजनेंतर्गत ही योजना राबविण्यात येते. मूळ अंदाजपत्रकात जेवढ्या रकमेची मागणी केली त्यापेक्षा पूरक मागणी जास्त आहे. नवीन योजना आहे ती एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे आली आहे. साडेतीन लाख घरांपैकी दीड लाख घरे पूर्ण झाली आहेत. तथापि, उपेक्षित लोकांच्या घरकुलांचा हा प्रश्न आहे. या घरकुलाच्या कामामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे तेव्हा या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

तसेच महाराष्ट्रात भूकंप झालेल्या भागातील कुटुंबांचे वीस वर्षापूर्वी पुनर्वसन करण्यात आलेले आहे. आता कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढल्यामुळे अडचणी निर्माण झालेल्या आहेत. तेव्हा शासनाने या पुनर्वसन गावामध्ये नवीन योजना लागू करुन उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.

८.३०५ शिफारस क्र. (४) सामाजिक न्याय विभाग राबवीत असलेल्या विविध १५५ योजनांचे तज्ञ संस्थाकडून सुरु असलेले मुल्यमापन अदयापही पूर्ण झाले नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले, योजनांच्या

मुल्यमापनाची कार्यवाही त्वरीत पूर्ण करावी त्यानुसार योजनांच्या निकषात योग्य तो बदल करावा अशी समितीची शिफारस आहे, विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी.

८.३०६ शिफारस क्र. (५) रमाई आवास योजना ग्रामीण भागात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA) व शहरी भागात नगरपालिका/महानगरपालिका मार्फत राबविण्यात येते तथापि साक्षीमध्ये असे निदर्शनास आले की, बऱ्याच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व नगरपालिका/महानगरपालिका यांनी या योजनेकडे लक्ष न दिल्यामुळे मोठया प्रमाणावर निधी अखर्चित राहीला तसेच परत करण्यात आला व अखर्चित निधी आयुक्तालयामधील PLA अकाऊन्ट मध्ये जमा करण्यात आला त्यामूळे मागासवर्गीय लाभार्थी लाभापासून वंचीत राहीले. सामाजिक न्याय विभागाने संबंधित यंत्रणांना निधी वितरीत केले तथापि घरे बांधणे व निधी खर्चाबाबत आवश्यक आढावा घेतलेला नाही, केवळ निधी वितरीत करुन विभागाची जबाबदारी संपत नाही, राज्य शासनाकडून मागासवर्गीय लाभार्थ्यांकरीता अर्थसंकल्पीत संपूर्ण निधी त्याच आर्थिक वर्षात खर्च होईल त्यानुसार घरकुलांचे बांधकाम होईल व लाभार्थ्यांना योजनेचा लाभ होईल याबाबत निश्चित उपाययोजना, निधी खर्चाची पध्द्त, जबाबदार यंत्रणा ठरवावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी.

८.३०७ शिफारस क्र. (६) सामाजिक न्याय विभागाने ३७२ औद्योगिक सहकारी संस्थांना प्रति संस्था रु. ५० लक्ष अनुदान व रु. ५० लक्ष कर्ज स्वरुपात दिले आहे यामधील १८२ संस्थांनी उपयोगीता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. २१२ संस्थांनी स्वत:चा ५ टक्के रकमेचा हिस्सा भरलेला नाही, संस्थांना निधी प्राप्त झाल्यावर ५२ आठवडयात काम सुरु करणे आवश्यक असताना प्रत्यक्ष काम सुरु केले नाही तथापि निधीचा गैरवापर केलेला दिसतो. सदर गैरव्यवहारात विभागीय अधिकारी सामील असल्याचे समितीचे मत आहे, विभागाने ज्या औद्योगिक सहकारी संस्थांना अनुदान व कर्ज दिलेले आहे तथापि संस्थांनी निधीचा गैरवापर केला आहे, उपयोगीता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा सर्व संस्थांची तातडीने चौकशी करावी, त्याची सद्य:स्थिती समितीस अवगत करावी व दोषी संस्थाकडून संपूर्ण रक्कमेची वसुली करावी व अशा बोगस संस्थांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे तसेच अशा सहकारी संस्थांमध्ये वितरीत केलेल्या अनुदानाचा नियमानुसार वापर होतो आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर होती ते त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यास अपयशी ठरले. त्यामुळे त्यांचेवर देखील जबाबदारी निश्चित करुन तातडीने कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व विभागाने समितीच्या शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत सादर करण्यात यावी.

८.३०८ शिफारस क्र. (७) सहकारी औद्योगिक संस्थांप्रकरणी सहकार मंत्र्यांनी बैठक घेऊन या सर्व ७१ अधिक ६१ अशा एकुण १३२ सहकारी संस्थांचे स्पेशल ऑडिट करण्याचे सहकार विभागास सूचना दिल्या आहेत. त्यामध्ये जर कोणी दोषी आढळून आले तर त्यांच्यावर गुन्हे देखील दाखल करण्यात यावे. याप्रकरणी नेमका किती भ्रष्टाचार व अपहार झाला हे न समजल्याने पोलीस गुन्हे दाखल करुन घेत नव्हते. ही बाब संबंधित संस्थांचे अति तातडीने लेखापरिक्षण करुन नेमका किती रुपयांचा अपहार व भ्रष्टाचार झाला आहे हे सहकार विभागाने निश्चित करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

८.३०९ शिफारस क्र. (८) लोकलेखा समितीने दि. २२ नोव्हेंबर २०१३ रोजी संत ज्ञानेश्वर मुलांचे शासकीय वसतीगृह पुणे व संत जनाबाई मुलींच्या शासकीय वसतीगृहास भेट दिली असता निश्चित केलेल्या आहार वेळापत्रकाचे पालन न करणे, आहारातील चपाती कडक असणे, दुधात मोठया प्रमाणावार पाणी मिसळलेले असणे अन्नपदार्थाचा दर्जा चांगला नसणे, भात निकृष्ट दर्जाचा असणे, ठेकेदाराच्या आंदोलन कालावधीत ८ दिवस आहार पुरवठा न करणे, कोठाराच्या तपासणीत सडक्या भाज्या निदर्शनास येणे, फळे विशेषत: सफरचंद अतिशय कमी दर्जाचे असणे समिती येणार तेंव्हाच दूरदर्शन संच बसविणे, इमारतीचा रंग पूर्णपणे उडालेला असणे, बाथरुमची देखभाल दुरुस्ती नसणे, इलेक्ट्रीक कोटींग व्यवस्थीत नसणे, विद्यार्थ्यांना उशी व बेडशीट पुरविलेली नसणे, विद्यार्थ्यांच्या खोल्या अस्वच्छ असणे, संत जनाबाई शासकीय वसतीगृहात मुलींनी आहार व फळाच्या दर्जाची तक्रार करणे, वसतीगृहात मोठया प्रमाणावर ढेकूण असल्याचे निदर्शनास आले, दिवाळीच्या सुटीत भोजन दिले नाही, अशा अनेक गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आल्या. सदर गंभीर बाबीस जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे, केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी.

८.३१० शिफारस क्र. (९) अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह बांधकामाकरीता जमीन उपलब्ध नाही, इमारतीचा आराखडा मंजूर नाही अंदाजपत्रकास मान्यता नाही तथापि सामाजिक न्याय विभागाने सन २००७-०८ मध्ये रु.३,२६,९२,५००/- एवढा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केला. निधी वर्ग करुन आठ वर्षाचा कालावधी लोटला असतानाही विभागास अद्याप मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाकरीता जागा उपलब्ध झालेली नाही असे समितीच्या निदर्शनास आले. शासन खात्यामधून निधी आहरण करुन आठ वर्षानंतरही मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृहाच्या लाभापासून वंचीत राहिले ही अतिशय गंभीर बाब आहे या सर्व बाबींसाठी जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कार्यवाही करावी व मागासवर्गीय मुलाच्या वसतीगृहाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याकरीता विभागाच्या सचिवांनी स्वत:

लक्ष द्यावे व बांधकाम विभागाकडे सन २००७ मध्ये वर्ग रक्कम निश्चित प्रयोजनासाठी तातडीने वापरावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी.

८.३११ शिफारस क्र. (१०) बुलढाणा जिल्ह्यात व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम शिकणाऱ्या संस्थांनी व अधिकाऱ्यांनी संगनमत करुन अभ्यासक्रमात स्कॉलरशीप देय नसताना कोटयावधी रुपये घेतले या प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण, अमरावती यांचे स्तरावर गठीत समितीच्या अहवालामध्ये दोषी आढळलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे, केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी.

८.३१२ शिफारस क्र. (११) सामाजिक न्याय विभागाकडून ज्या शैक्षणिक संस्था बंद झाल्या त्या शाळांचे इतर संस्थाकडे हस्तांतरण करताना व स्थलांतरीत करताना योग्य निकष वापरलेले नाही. मागणी नसलेल्या संस्थेकडे हस्तांतरण करण्यात आले याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त करुन याबाबत विभागाने सखोल चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करावी अशी शिफारस समिती करत आहे, विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी

नियोजन विभाग

९. इतर ग्रामविकास कार्यक्रम

९.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेख्याची छाननी करीत असताना अनुदान क्र.ओ-४ "इतर ग्रामविकास कार्यक्रम" मधील प्रधान शीर्ष २५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रम या शीर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अनुदान क्रमांक ओ-४-इतर ग्रामविकास कार्यक्रम (सर्व दत्तमत)

(रु.हजारात)

९.२ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष- २५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम (दत्तमत) मूळ १,४९,३५,५७,४३ पूरक १०.०० वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च-२०१०)	१,४९,३५,६७,४३	६,०५	(-)१,४९,३५,६१,३८ ७,४५

टिपा व भाष्ये :-

(१) मूळ तरतूदीइतका खर्च देखील झाला नाही. या वर्षात मिळविलेली रु.१० लाख एवढी पूरक तरतूद अनावश्यक ठरली. ही पूरक तरतूद लाक्षणिक मागणीपुरती मर्यादीत ठेवता आली असती.

(२) रु.१,४९,३५,६१.३८ लाख एवढी अंतिम बचत असताना मार्च, २०१० मध्ये केवळ ७.४५ लाख एवढा निधी परत करणे अपेक्षित होते.

(३) अनुदानातील बचत खालील शीर्षाखाली झाली :-

ज्ञापन :-

९.३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञपनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अनुदान क्रमांक ओ-४ प्रधान शीर्ष-२५१५, इतर ग्राम विकास कार्यक्रम (सर्व दत्तमत) १०२, सामूहिक विकास १०२ (००) (०३) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत (लोकोपयोगी लहान कामांचा कार्यक्रम) आकस्मिक खर्च (२५१५ ०२४२) या खाली प्रत्यक्षात (रु.१,४९,३५,६७,४३ लाख मधून ८०० इतर खर्च या

खालील तरतूद रु.१,४८,७४,०२.१९ लाख (राज्य योजना)+रु.६१,५०.२४ लाख (जिल्हा योजना) असे एकूण रु.१,४९,३५,५२,४३ लाख वजा जाता या कार्यासनास फक्त रु.१५.०० लाख कार्यालयीन खर्चासाठी प्राप्त झाले त्यामधून रु.७.५५ लाख खर्च झाला असून रु.७.४५ लाख इतकी बचत झाली आहे.

(१) कार्यालयीन खर्चाकरिता इतर लेखाशिर्षामधून पुरेसा निधी उपलब्ध झाल्याने सदर लेखाशीर्षाखालील प्राप्त निधी पूर्ण खर्च होऊ शकला नाही.

(२) खर्चात झालेली बचत ही अनुज्ञेय मर्यादेमध्ये असल्यामुळे क्षमापित करण्यात यावी.

(रुपये लाखांत)

९.४ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक बचत (+) बचत (-)**
२५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रम ८०० इतर खर्च (०१) (०१) अर्थसंकल्पात समाविष्ट न केलेल्या महसूली नियतव्य याकरिता ठोक तरतूद (राज्य योजना) मूळ १,४८,७४,०२.१९	१,४८,७४,०२.१९	-----	-१४८७४०२.१९

ज्ञापन :-

९.५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मागणी क्र.ओ-४ मुख्य लेखाशीर्ष २५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रम ८०० इतर खर्च ८०० (०१) (०१) हे लेखाशीर्ष शासनाच्या नियोजन विभागामार्फत हाताळण्यात येत नाही. वार्षिक योजना सन २००९-१० अंतिम झाल्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशनात इतर विभागांना ठरवून दिलेल्या नियतव्ययातील विना अर्थसंकल्पीत उर्वरीत नियतव्यय वित्त विभागाने मागणी क्र.ओ-४ मुख्य लेखाशीर्ष २५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रम ८०० इतर खर्च ८०० (०१) (०१) अर्थसंकल्पात समाविष्ट न केलेल्या महसूली नियतव्ययाकरीता ठोस तरतूद या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीत केलेला आहे.

वार्षिक योजनेसाठी निर्धारीत केलेला संपूर्ण नियतव्यय अर्थसंकल्पित व्हावा या उद्देशाने वित्त विभागाने अर्थसंकल्पित न झालेला नियतव्यय अर्थसंकल्पित केलेला आहे. त्यानंतरच्या विधीमंडळ अधिवेशनात

योजनांतर्गत तरतूदीच्या पूरवणी मागण्या जसजशा अर्थसंकल्पित होतील तसतसा हा नियतव्यय कमी होत जातो.

प्रशासकीय विभागांची ठोक तरतूद असल्याने विभागांनी संबंधित लेखाशीर्षाखाली निधी प्राप्त करुन घेऊन खर्च आवश्यकतेप्रमाणे केलेला आहे. प्रत्यक्षात या तरतूदीतून कोणताही खर्च करण्यात येत नाही.

सबब या लेखाशीर्षाखाली सन २००९-१० मध्ये संपूर्ण बचत तरतूद प्रत्यार्पित करण्यात आलेली आहे.

९.६ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक बचत (+) बचत (-)**
२५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रम, ८००-इतर खर्च ८०० (०१) (०२) अर्थसंकल्पात समाविष्ट न केलेल्या महसूली नियतव्ययाकरीता ठोक तरतूद (जिल्हा योजना) मूळ ६१,५०.२४	६१,५०.२४	--	(-) ६१,५०.२४

टिपा व भाष्ये :-

संपूर्ण तरतूद वापरणे किंवा परत न करणे याबद्दलची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट, २०१०).

ज्ञापन :-

९.७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० च्या जिल्हा योजनेचा मार्च, २००९ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अर्थसंकल्पीत न झालेला नियतव्यय ठोक तरतूद म्हणून सदर लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. सदर निधीपैकी जिल्ह्यासाठी मंजूर नियतव्ययानुसार त्या त्या जिल्ह्याच्या मागणी क्रमांकाखाली सदर निधी वर्षभरात पुरवणी मागणीव्दारे निधी अर्थसंकल्पीत केल्यामुळे ३१ मार्च, २०१० रोजी सदर लेखाशिर्षाखालील रु.६१५०.२४ लक्ष ठोक तरतूद शासन ज्ञापन, नियोजन विभाग, क्र.डिएपी-२०१०/ प्र.क्र.२०७/का.१४८१, दि.३१/३/२०१० अन्वये प्रत्यार्पित करण्यात आली आहे. (आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.)

साक्ष :-

९.८ उपरोक्त परिच्छेदांसदर्भात समितीने दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. सदर बैठकीत मूळ तरतुदी इतका खर्च न होण्याची कारणे विषद करताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, रुपये १४ हजार, ९३५ कोटी ६७ लाख ४३ हजार इतकी मूळ तरतूद आहे तर १० लाख रुपयांची पूरक तरतूद आहे. यातील १४ हजार ९३५ कोटी ६७ लाख ४३ हजार ही ठोक तरतूद आहे. ही रक्कम सर्व विभागांना प्राप्त झालेली असते. फक्त ती नियोजन विभागाकडे दाखविलेली असते. नियोजन विभाग ठोक रक्कम खर्च करीत नाही. तर "आकस्मिक खर्च" या शिर्षकाखाली आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाकरिता १० लाख रुपयांची तरतूद आहे.

९.९ आमदारांच्या विकास निधीची रक्कम ठरलेली असते आणि तो निधी खर्च होत असतो. त्याची तरतूद केलेली असते. फक्त आकस्मिक निधी केव्हा मिळणार हे माहित नसते. ठोक तरतूद खर्च झाली नसेल तर पूरक मागणी करता येते काय ? यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, नियोजन विभाग ठोक तरतूद खर्च करीत नाही. ही त्या त्या विभागाकरिता केलेली तरतूद असते. त्या विभागाची अर्थसंकल्पामध्ये तरतूद झाल्यावर ती रक्कम नियोजन विभागामधून वजा होते. आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आकस्मिक खर्च भागविण्यासाठी १० लाख रुपयांची तरतूद आहे. या रकमेचा आणि ठोक रकमेचा काही संबंध नाही. एकूण तरतूदीपैकी १४ हजार ९३५ कोटी ६१ लाख ३८ हजार रुपयांची बचत झालेली आहे.

९.१० प्रत्येक विभागाचा किती खर्च होतो हे नियोजन विभाग पाहत नाही काय ? नियोजन विभाग निधीचे वाटप करतो त्यावेळी कामाची मागणी, कामाचे अंदाजपत्रक, कामास प्रशासकीय मान्यता, सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली काय या सर्व बाबी पाहिल्या जातात काय ? दुसरे म्हणजे आपण या रकमेस ठोक रक्कम का म्हणता ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, नियोजन विभाग संपूर्ण नियतव्ययाचे वाटप करतो. सन २०१३ या वर्षात विभागाचा ४९ हजार कोटी रुपयांचा आराखडा आहे. त्याचे पूर्ण विभागनिहाय वाटप झाले आहे.

९.११ नियोजन हा महत्वाचा विभाग आहे. पुढच्या वर्षात कोणती कामे घ्यावयाची याचा आढावा घेण्यासाठी प्रत्येक विभागात अधिकारी/कर्मचारी आहेत. आमची कामे घ्या, अन्य कामे घेऊ नका असे आमदारांनी सांगितले म्हणून त्याप्रमाणे कामे होत नाहीत. अंदाजपत्रकामध्ये येणारी सर्व कामे पूर्ण माहितीनिशी येणे आवश्यक आहे. परंतु तसे होत नाही ही वस्तुस्थिती आहे. खरे म्हणजे खालच्या स्तरावरुन वरच्या स्तरापर्यंत नस्ती गेली पाहिजे. उदाहरण सांगायचे झाले तर ग्रामविकास विभागाकरिता अंतर्गत रस्त्याच्या

कामासाठी ५००-७०० कोटी तरतूद केलेली असते. परंतु अंतर्गत रस्ते कोणत्या विभागातील, जिल्ह्यातील, तालुक्यातील आहेत याची माहिती दिलेली नसते. ही सर्व माहिती नियोजन विभागाकडे येणे आवश्यक आहे. नियोजन विभागाने अशा बेसिक बाबी पाहणे आवश्यक आहे. विभाग जी तरतूद करतात त्यास ठोक शब्द वापरतात. सभागृहाच्या मान्यतेशिवाय वाढीव एक रुपया खर्च करता येत नाही. अंदाजपत्रकात ठोस तरतूद करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये मर्जीनुसार रक्कम खर्च करण्याची मुभा दिल्यासारखे आहे. त्यामुळे एकूण अंदाजपत्रकावर व खर्चावर नियोजन विभागाचे नियंत्रण राहत नाही असे मत समितीने व्यक्त केले.

९.१२ नियोजनाची पध्दत कशी असते याबाबत वित्तीय सल्लागार यांनी समितीस अवगत केले की, २०१५- इतर ग्राम विकास कार्यक्रम या शिर्षाखाली दाखविलेली तरतूद ही ठोक तरतूद आहे. राज्याची योजना तयार झाल्यावर आणि त्यास नियोजन आयोगाने मंजूरी दिल्यानंतर सर्व विभागांना नियतव्ययाचे वाटप करण्यात येते. त्यानंतर मार्च महिन्यात अर्थसंकल्प सादर केला जातो. हा संपूर्ण खर्च योजनांतर्गत म्हणून मंजूर झालेला असतो. महसूली आणि कॅपिटल बजेट तयार होत नाही. जो काही एकूण नियतव्यय मंजूर झालेला असतो त्याचे वित्त विभागाकडून वितरण केले जाते. त्या त्या महसूली लेखाशीर्षाखाली आणि कॅपिटल लेखाशीर्षाखाली जी तरतूद असते ते म्हणजे संपूर्ण अंदाजपत्रक नाही. ज्या विभागास रक्कम वितरीत झाली नाही, ती रक्कम आपण एका ठिकाणी लमसम अनबजेट रक्कम दाखवित होतो. महसुली लेखा आणि कॅपिटल अशी वर्गवारी करुन २५१५ आणि ४५१५ या दोन शीर्षाखाली ठोक तरतूद केली जाते.

९.१३ प्रत्येक विभागाकडे भरपूर कर्मचारी वर्ग असतो. दरवर्षी अर्थसंकल्प होतो ते सर्वांनाच समजते असे नाही. नियोजन विभागाने प्रत्येक रुपयाचे नियोजन केले पाहिजे. आपण ठोक रक्कम ऐवजी कामानिहाय नियोजन केले पाहिजे. समजा ग्रामविकास विभागाचे अर्थसंकल्प असेल तर त्यातील किमान ९० टक्के रक्कम ही निवड प्रक्रियेव्दारे झाली पहिजे. म्हणजे आपण कामानिहाय निधी दिला तर निधीची पळवापळवी होणार नाही. खालच्या स्तरातून कामे सचिव स्तरावर आल्यावर विभागाच्या सचिवांनी नियोजन विभागाच्या सचिवांबरोबर चर्चा करायची. त्यानंतर नियोजन विभागाच्या सचिवांनी वित्त विभागाच्या सचिवांबरोबर चर्चा करुन मान्यता घ्यायची. असे का होत नाही असा प्रश्न आहे. काही वेळा राजकीय दबावापोटी प्राथम्यक्रम बदलतात हे समजू शकतो. परंतु प्रत्येक कामाची टिप्पणी आली पाहिजे. विभागाने केलेले नियोजन बरोबर आहे किंवा कसे हे नियोजन विभागाने पाहणे आवश्यक आहे. ही बाब विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला समितीने सुचविल्याप्रमाणे नियोजन केले जाते. संबंधित विभागाकडून मागणी आल्यानंतर त्यावर सचिव स्तरावर चर्चा केली जाते. विभागाची किती मागणी आहे, त्यापैकी किती आवश्यकता आहे, अंदाज योग्य आहेत काय या सर्व बाबी तपासण्यात येतात त्यानंतर मंत्री स्तरावर पुन्हा बैठक होते.

९.१५ सन २००९-२०१० यावर्षी निवडणुका असल्यामुळे माहे मार्च महिन्यात लेखा अनुदान सादर करण्यात आले होते. त्यामुळे ती रक्कम जास्त दिसत आहे. त्या वर्षी चार महिन्यांकरिता एक-तृतीयांश लेखानुदान मंजूर करुन घेण्यात आले होते आणि जुलै महिन्यात अर्थसंकल्प मंजूर झाला होता. शीर्षनिहाय येते त्याचे मॅपिंग केले जाते तसेच विभागाकडून प्राथम्यक्रमात बदल करीत नाही असेही विभागाकडून सांगण्यात आले.

९.१६ नियोजन विभागाकडून अर्थसंकल्पाची कार्यवाही सप्टेंबर/ऑक्टोबर महिन्यापासून सुरु होते. सर्व विभागाची योजनानिहाय मागणी नियोजन विभागाकडे येते. एखाद्या नवीन योजनेची मागणी असेल तर नियोजन विभागासोबत सर्व विभागाची बैठक घेतली जाते. त्या मागणीचा एकत्रित विचार करुन प्लॅनचे आकडे ठरविले जातात. यानंतर उप नियोजन समितीकडे हे सर्व आकडे तपासणीसाठी जातात. त्यानंतर सचिव स्तरावरील बैठकीत यावर चर्चा होते. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली प्लॅन उप समितीकडे प्रस्ताव दिले जातात. एकूण मागणी ६० हजार कोटी रुपयांची असेल आणि शासनाचा प्लॅन ४० हजार कोटी रुपयांचा असेल तर त्यानुसार त्या बैठकीत निर्णय घेतले जातात. आमदार महोदयांनी दिलेली निवेदने शासनाकडे असतात. या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, जो प्लॅन तयार करण्यात येतो तो आयटमवाईज तयार करण्यात येतो काय ? याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

९.१७ अलीकडे ठोक रकमेची तरतूद कमी करण्यात आली असल्यामुळे केलेली प्रक्रिया बरोबर आहे. तथापि योजनांच्या रकमेचे १०० टक्के नियोजनच होत नाही असे म्हणता येणार नाही. तसेच १०० टक्के नियोजन होते असे देखील म्हणता येणार नाही.

९.१८ २५१५ या शिर्षाखाली ठोक रक्कम शहरी भागासाठी खर्च करण्यात येत नाही. ग्रामीण भागासाठी ही रक्कम देण्यात आली आहे. आता जवळपास ५० टक्के मतदारसंघ शहरी भागातील आहेत. त्यामुळे २५१५ या शिर्षाखालील रक्कम शहरी भागासाठी खर्च करता येणार नाही काय ? यासंदर्भातील सविस्तर माहिती योजनेच्या पुस्तकात नमूद करण्यात आली असून यात विभागवार योजना नमूद करण्यात आल्या आहेत. तसेच २५१५ या शिर्षाखाली रकमेचे वाटप नियोजन विभागाकडे नसून ग्रामविकास विभागाचे आहे. योजना तयार करण्याचे काम नियोजन विभागाचे आहे ही रक्कम यापूर्वीच वाटप झालेली आहे.

९.१९ सन २०१३-२०१४ या वर्षात वाटप होणाऱ्या २५१५ या शीर्षाची सविस्तर माहिती विभागाकडे उपलब्ध आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, ऑक्टोबर महिन्यापासून ही प्रक्रिया सुरु होते त्यानंतर सचिव स्तरावर बैठका होतात. तद्नंतर ती मागणी उप समितीकडे जाऊन त्यावर चर्चा होते या वर्षाची प्रक्रिया ऑक्टोबर पासून सुरु होणार आहे.

९.२० २५१५ या शिर्षाची सविस्तर माहिती व २५१५ या हेडखालील निधी वाटपाचे निकष काय आहेत, या कामाची पध्दत काय आहे याबाबतची लेखी माहिती समितीस सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले. त्याबाबतचा शासन निर्णय विभागाकडून प्राप्त झाला आहे. **(विवरण क्र.२)**

९.२१ राज्यातील नियोजनाचे काम हे अत्यंत महत्वाचे आहे. राज्यातील अर्थसंकल्पाच्या निधीचे नियोजन योग्य पध्दतीने झाले पाहिजे. हे काम करण्याची जबाबदारी नियोजन विभागाची आहे. अर्थसंकल्पाची एकूण ६३ पुस्तके आहेत. ही पुस्तके पाहून संपूर्ण बजेट कळत नाही. त्यामुळे अर्थसंकल्प समजून घेण्याची एक पध्दत असायला पाहिजे. पूर्ण अर्थसंकल्पाचा अभ्यास लोकप्रतिनिधी करीत नाहीत. लोकप्रतिनिधी फक्त आपल्या मतदारसंघातील सिंचन, रस्ते किंवा इतर दोन तीन गोष्टीची माहिती घेतात. लोकप्रतिनिधींना संपूर्ण अर्थसंकल्प समजावून सांगण्याची जबाबदारी नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांची आहे. नियोजन विभागाने यासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. त्याचप्रमाणे जी सामाजिक कामे आहेत त्यांना प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळे अर्थसंकल्पाच्या कार्यपध्दतीचे पालन केले पाहिजे. नियोजन विभागात कार्यपध्दतीचे पालन होत नसेल तर ते योग्य होणार नाही, यासाठी नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन सन्माननीय सदस्यांना बजेट समजावून सांगण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे, अशी सूचना समितीने विभागास केली.

९.२२ सदर रक्कम सन २००९-२०१० मध्ये देण्यात आली आहे. आता ठोक रक्कम कमी दर्शविण्यात येते. त्यामुळे मागील तीन वर्षात कार्यपध्दतीचे पालन करण्यात आले आहे. आता फक्त एकूण रकमेच्या एक किंवा दोन टक्के रक्कम ठोक तरतूद करण्यात येते. नागपूर व पुणे विभागात कार्यपध्दतीचे पालन केले आहे त्या ठिकाणी नियोजन व्यवस्थित झाले आहे.

९.२३ आचारसंहिता लागू झाल्यामुळे स्थानिक आमदार विकास निधी त्या कालावधीत खर्च होत नाही. त्यामुळे तो निधी व्यपगत होतो. तो निधी परत मिळाला पाहिजे. असा निधी गेल्या दोन तीन वर्षापासून मिळालेला नाही. याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, स्थानिक आमदार विकास निधी मिळावा यासाठी ६३ कोटी ६५ लाख रुपयांची पुरवणी मागणी मंजूर केली होती. हा निधी आता दोन तीन दिवसात वितरीत केला जाणार आहे. दरवर्षी ही प्रक्रिया केली जाते या कामासाठी जून महिन्यात पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती.

९.२४ स्थानिक विकास निधी मिळण्यात अडचण निर्माण होते. शहरी भागासाठी हा निधी खर्च करताना अडचणी येतात. ग्रामीण भागात नगरपालिका व ग्रामपंचायत परिसरात काम करायचे असेल तर तेथील नगरपालिका व ग्रामपंचायत ना-हरकत प्रमाणपत्र देत नाही. हा विषय सभागृहात उपस्थित करण्यात

आला होता तेव्हा वित्त व नियोजन मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, काम सूचविल्यानंतर त्या कामाला संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी ४५ दिवसात ना-हरकत प्रमाणपत्र दिले नाही तर या कामाला मंजूरी आहे असे समजून ही कामे करण्यात यावी. असे समितीने सुचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी १० जुलै, २०१२ रोजी परिपत्रक समितीसमोर वाचून दाखविले.

९.२५ पत्राचा विषय असा आहे की, "आमदार निधी अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विकास कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी विहित वेळेत हमीपत्र/ना-हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत" पुढे असे नमूद केले आहे की, जिल्हा वार्षिक योजना अथवा इतर मोठ्या योजनांजून विविध प्रकारच्या योजना राबवितांना निधी अभावी जी लहान लहान लोकोपयोगी कामे मागे राहतात, अशी कामे हाती घेता यावीत तसेच शासनाची स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण होण्याच्या उद्देशाने आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत विविध कामे अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

९.२६ आमदार निधी अंतर्गत घ्यावयाच्या कामांबाबत नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : स्थाविका २०११/प्र.क्र.४७/का.१४८२, दिनांक १३ सप्टेंबर, २०११ अन्वये सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणारी बरीचशी कामे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील विविध नागरी सुविधांशी संबंधित असल्याने त्यांच्या मालमत्तेसाठी स्थानिक स्वराज्य संस्था जबाबदार आहेत. यास्तव त्यांच्या मान्यतेशिवाय शासनाच्या विविध योजनांपासून त्यांच्या हद्दीत कामे घेतल्यानंतर अशा निर्माण होणाऱ्या मालमत्तेचा देखभाल व दुरुस्तीसाठीचाही प्रश्न उद्‌भवू शकतो. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत शासनाची स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत स्थानिक संस्थेच्या मालकीच्या जागेवर सुविधा निर्माण करणेसाठी व निर्माण झालेल्या मालमत्तेचे परिरक्षण होणे गरजेचे आहे. या उद्देशाने सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, उदा.ग्राम पंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका अथवा इतर स्थानिक संस्था, जसे म्हाडा, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ इ. यांच्या मालकीच्या जागांवर एखादे काम करावयाचे झाल्यास त्या संस्थांकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे तसेच सदर काम पूर्ण झाल्यानंतर कामाचे देखभाल व परिरक्षण करण्याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे, अशी एक अट आहे.

९.२७ आमदार निधीची विविध कामे घेताना स्थानिक संस्था अशा प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र अथवा हमीपत्र देण्यास विलंब लावतात अथवा टाळाटाळ करतात, त्यामुळे लोकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांपासून वंचित रहावे लागते. अशा आशयाची बरीच निवेदने, अतारांकित प्रश्न, कपात सूचना इ. या विभागात प्राप्त

होत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने अशा प्रकारची हमीपत्रे/ना हरकत प्रमाणपत्रे घेण्याची अट रद्द करण्यात यावी अथवा संबंधित स्थानिक संस्थांनी ४५ दिवसांत ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन द्यावे अशी अट शासन निर्णयात घालावी, अशा मागण्या सातत्याने प्राप्त होत आहेत.

९.२८ सन्माननीय लोकप्रतिनिधींकडून वर नमूद केल्याप्रमाणे ना हरकत प्रमाणपत्र/ हमीपत्राबाबतच्या मागण्या विचारात घेता, अशा प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र/हमीपत्र विहित वेळेत अर्थात लवकरात लवकर जिल्हाधिकारी कार्यालयास/कार्यान्वयीन यंत्रणांना उपलब्ध करुन देण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील स्थानिक स्वराज्य संस्थांना/प्राधिकरणांना सूचना देण्यात याव्यात, असे नियोजन विभागाच्या प्रधान सचिवांनी संबंधितांना कळविले आहे.

९.२९ तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून एनओसी मिळाल्याशिवाय कामे करता येत नाहीत. याबाबत समितीने उदाहरण देताना सांगितले की, मुंबईत बीडीडी चाळीची दुरुस्तीचे काम स्थानिक आमदार विकास निधीमधून करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळत नाही. बीडीडी चाळीची दुरुस्ती करा अशी तेथील जनतेची मागणी असते. त्यावेळी स्थानिक आमदार त्या लोकांना मदत करु शकत नाही. या बाबीचा नियोजन विभागाने विचार करावा. लोकप्रतिनिधींनी काही ठिकाणी कामाची मागणी केली तर मुंबई महानगरपालिका ना हरकत प्रमाणपत्र देत नाही. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी ४५ दिवसात ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही तर सदर काम करण्यास जिल्हाधिकारी कार्यालयांची मंजूरी आहे अशा सूचना शासनाने निर्गमित करणे आवश्यक आहे.

९.३० त्यामुळे शासनाच्या परिपत्रकामध्ये सुस्पष्टता आणणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांना दिलेला निधी प्राधान्याने खर्च करावा. कारण त्यातून निर्माण होणारी संपत्ती ही सरकारी आहे. त्यामुळे प्राप्त निधी योग्य त्या कामावर खर्च करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे हे त्यांना सांगावयास पाहिजे. मुळात महापालिकांकडे पुरेसा निधी नसतो म्हणून त्यांना निधी वितरित केला जातो. कोणतेही लोकप्रतिनिधी जी कामे सुचवितात ती खाजगी नसतात. ग्रामपंचायत, नगरपालिका व महापालिका यांनी प्राप्त झालेल्या निधीतून सहकारी संपत्ती निर्माण करण्याबाबत विभागाने त्यांना स्पष्ट सूचना द्याव्यात.

समितीचे अभिप्राय :-

९.३१ राज्यातील नियोजनाचे काम हे अत्यंत महत्वाचे आहे. राज्यातील बजेटच्या पैशाचे नियोजन योग्य पध्दतीने झाले पाहिजे. हे काम करण्याची जबाबदारी नियोजन विभागाची आहे. बजेटची एकूण ६३ पुस्तके आहेत. ही पुस्तके पाहून संपूर्ण बजेट कळत नाही. त्यामुळे बजेट समजून घेण्याची एक सिस्टम

असायला पाहिजे. लोकप्रतिनिधी फक्त आपल्या मतदारसंघातील सिंचन, रस्ते किंवा इतर दोन तीन गोष्टीची माहिती घेतात. लोकप्रतिनिधींना संपूर्ण बजेट समजावून सांगण्याची जबाबदारी नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांची आहे. तसेच बजेटचा अभ्यास करण्याची सुटसुटीत कार्यपध्दती असण्याची आवश्यकता आहे.

समितीच्या शिफारशी :-

९.३२ शिफारस क्र. (१) अर्थसंकल्प म्हणजे वार्षिक वित्तीय विवरणपत्र किंवा प्रत्येक वित्तीय वर्षाच्या संबंधात राज्याच्या अंदाजलेल्या उत्पन्नाचे व खर्चाचे विवरणपत्र असते. यात ज्या ज्या बाबीवर खर्च प्रस्तावित करण्यात येणार आहे त्या त्या खर्चाच्या बाबींचा स्पष्ट उल्लेख असणे अपेक्षित आहे व याव्यतिरिक्त काही अचानक उद्‌भवलेल्या किंवा योजना व मंजूरीसाठी प्रलंबित असलेल्या बाबींकरिता काही प्रमाणात ठोक तरतूद अंदाजपत्रकात ठेवण्यात येते. या ठोक तरतूदीचे नियोजन, या निधीचा वापर त्याची कार्यपध्दती व यात कोणत्या कामांचा व खर्चाचा समावेश राहील याबाबत कुठेही स्पष्टता व पारदर्शकता नसते व त्यामुळेच या निधीच्या वापराबाबत अधिक पारदर्शकता येणेसाठी व न्याय पध्दतीने त्याचे वाटप होणेकरिता कार्यपध्दती ठरविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

९.३३ शिफारस क्र. (२) लोकप्रतिनीधींना अर्थसंकल्प तयार करण्याच्या पध्दतीची, अर्थसंकल्पात समाविष्ट बाबी व त्याबाबतची कार्यपध्दती, लोकप्रतिनिधीच्या मतदारसंघात करावयाच्या कामाची तरतूद इत्यादी माहिती होणेकरिता तसेच लोकप्रतिनिधीना अर्थसंकल्प सोप्या पध्दतीने समजावून सांगण्याकरिता नियोजन विभागाने लोकप्रतिनिधींकरिता अर्थसंकल्पाबाबत प्रशिक्षणाचा कार्यक्रम दर पाच वर्षांनी आयोजित करावा अशी समितीची शिफारस आहे.

गृहनिर्माण विभाग

१०. गृहनिर्माण

१०.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र.क्यू-३ "गृहनिर्माण" अंतर्गत प्रधान शीर्ष २२१६-गृहनिर्माण, २२१७-नगरविकास, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण या शीर्षांतर्गत बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अनुदान क्रमांक क्यू-३- गृहनिर्माण

(रुपये हजारांत)

१०.२ शीर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष २२१६-गृहनिर्माण २२१७-नगरविकास २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण दत्तमत				
मूळ	६,८५,३०,६६	२५,४३,३२,०४	९,७८,६४,६८	(-)१५,६४,६७,३६
पूरक	१८,५८,०१,३८			
वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च, २०१०)				१३,६४,६५,९४

टिपा व भाष्ये :-

रु.१५,६४,६७.३६ लाख एवढ्या अंतिम बचतीच्या तुलनेत मार्च, २०१० मध्ये रु.१३,६४,६५.९४ लाख इतका निधी परत केला. अनुदानातील बचत खालील शीर्षाप्रमाणे झाली.

ज्ञापन :-

१०.३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद करण्यात आले आहे की, मागणी क्र.क्यू-३ मधील प्रधान शिर्ष २२१६-गृहनिर्माण, २२१७-नगर विकास, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण खालील उपशिर्षानिहाय स्पष्टीकरणे सोबत जोडली आहेत.

(रुपये लाखांत)

१०.४ प्रधान शीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२२१६-गृहनिर्माण ०२, नागरी गृहनिर्माण ८००-इतर खर्च ८०० (०२) (०५) अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमणे/निष्कासन), मुंबई शहर,				
मूळ	१,६९.७१	१,१६.३७	१,१६.१२	(-) ०.२५
पुनर्विनियोजन-	(-) ५३.३४			

टिपा व भाष्ये :-

मुख्यत्वेकरुन २६ रिक्त पदे, कर्मचाऱ्यांकडून कमी मागणी व वाहनाची दुरुस्ती नसणे यामुळे मार्च, २०१० मध्ये रु.५३.३४ लाख इतका निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

१०.५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात नमूद केले आहे की, सन २००९-१० या आर्थिक वर्षात मुख्य लेखाशिर्ष २२१६, ८०० (०३) (०५) अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का), मुंबई शहर या कार्यालयास रु.१६९.७१ लक्ष इतके मूळ अनुदान शासन निर्णय क्रमांक वाटप-२००९/प्र.क्र.५६/अर्थसं.१, दि.२३ जुलै, २००९ अन्वये मंजूर करण्यात आले होते.

सन २००९-१० या आर्थिक वर्षात, सदर कार्यालयाचा एकूण प्रत्यक्ष खर्च रु.११६.०७ लक्ष इतका झालेला आहे. तथापि, विनियोजन लेखा अहवालात सदर खर्च रु.११६.१२ लक्ष इतका नोंदविलेला दिसून येतो. याबाबत चुकीची नोंद दुरुस्त करण्याची विनंती प्रधान महालेखाकार कार्यालयास करण्यात आली होती. महालेखाकार कार्यालयाने पत्र क्रमांक DCIV/२२१६/NOE/२०१०-२०११/O.W.NO.२१० दि.२३.३.२०११ नुसार याबाबतची नोंद घेतल्याचे कळविले आहे.

प्रस्तुत वर्षात एकूण बचत रु.५३.३४ लक्ष झाल्याचे दिसून येते. सदर बचत मुख्यत्वेकरुन २६ रिक्त पदे कर्मचाऱ्यांकडून अतिकालिक भत्ता व प्रवास खर्चाची कमी मागणी व वाहन दुरुस्ती न उद्‌भवल्यामुळे दिसून येत आहे.

(रुपये लाखात)

१०.६ शीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
०२, नागरी गृहनिर्माण ८००, इतर खर्च ८०० (०३) (०६) अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमणे/निष्कासन), पश्चिम उपनगर				
मुळ अनुदान-	६,०७.०६			
पुनर्विनियोजन	(-) ३२.०८	५,७४.९८	४,५७.१२	(-) १,१७.८६

टिपा व भाष्ये :-

रु.११७.८६ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता, मुख्यत्वेकरुन कार्यालयातील ९४ पदे न भरणे तसेच ६ व्या वेतन आयोगाच्या फरकाची गणना करण्यासाठी अनेक कर्मचाऱ्यांच्या संबंधात "ना देय प्रमाणपत्र" न मिळणे, अधिदान व लेखा कार्यालयाने देयके न स्वीकारणे, बदल्यांमुळे प्रवास भत्यावर कमी खर्च होणे यांमुळे मार्च २०१० मध्ये रु.३२.०८ लाख इतका परत केलेला निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले, त्याची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट, २०१०).

ज्ञापन :-

१०.७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, सन २००९-१० या आर्थिक वर्षात मुख्य लेखाशिर्ष २२१६-८०० (०३) (०६) अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पश्चिम उपनगरे या कार्यालयास रु.६०७.०६ लक्ष इतके मूळ अनुदान शासन निर्णय क्र.वाटप-२००९/प्र.क्र.५६/अर्थसं.१, दि.२३ जुलै, २००९ अन्वये मंजूर करण्यात आले होते.

तथापि, सदर मूळ अनुदान सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाच्या आठमाही प्रत्यक्ष खर्चानुसार सुधारित करण्यात आले होते. सदर मूळ अनुदान शासन निर्णय क्रमांक वाटप-२००९/प्र.क्र.५६/अर्थसं.१, दि.३१ मार्च, २०१० अन्वये रु.५०३.१७ लाख इतके सुधारित करण्यात आले आहे.

सदर कार्यालयाच्या सन २००९-१० मध्ये प्रत्यक्ष (ताळमेळ) खर्च रु.४५७.१७ लक्ष इतका असून, विनियोजन लेखे अहवालात प्रत्यक्ष खर्च रु.४५७.१२ लक्ष इतका नोंदविलेला दिसून येतो. याबाबत चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव प्रधान महालेखाकार कार्यालयास पाठविण्यात आला होता. महालेखाकार कार्यालयाचे पत्र क्र.DCIV/२२१६/NOE/२०१०-११/O.W.NO.२१०, दिनांक २३.०३.२०११ नुसार याबाबतची नोंद घेतल्याचे कळविले आहे.

सबब सन २००९-१० या वर्षात प्रस्तुत लेखाशिर्षांतर्गत रु.४६ लक्ष इतकी बचत झालेली आहे.

सदर बचत मुख्यत्वेकरुन कार्यालयातील ९४ पदे न भरणे तसेच ६ व्या वेतन आयोगाच्या फरकाची गणना करण्यासाठी अनेक कर्मचाऱ्यांच्या संबंधात "ना देय प्रमाणपत्र" न मिळाल्यामुळे वेतन या उद्दिष्टाखाली रु.४५ लक्ष इतकी रक्कम बचत झालेली दिसून येते. तसेच कर्मचाऱ्यांची बदली व कमी मागणीमुळे "अतिकालिक भत्ता" देशातर्गंत प्रवासखर्च या उद्दिष्टाखाली बचत झालेली दिसून येते.

(रूपये लाखांत)

१०.८ शीर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०२, नागरी गृहनिर्माण ८००, इतर खर्च ८०० (०३) (०७) अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमणे /निष्कासन), पूर्व उपनगर				
मुळ	५,७९.४७			
पुनर्विनियोजन	(-)१३६.१९	४,४३.२८	४,७६.४६	(+) ३३.१८

टिपा व भाष्ये :-

मुख्यत्वेकरुन सेवानिवृत्ती, रिक्त पदे न भरणे व अधिकारी/कर्मचारी यांचे कमी दौरे यामुळे मार्च २०१० मध्ये रु.१३६.१९ लक्ष इतका निधी परत केला.

रु.३३.१८ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट २०१०).

ज्ञापन :-

१०.९ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, सन २००९-१० या आर्थिक वर्षात मुख्य लेखाशिर्ष २२१६-८०० (०३) (०७) अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे या कार्यालयास रु.५७९ लाख इतके मूळ अनुदान शासन निर्णय क्रमांक वाटप-२००९/प्र.क्र.५६/अर्थसं.१, दि.२३.०९.२००९ अन्वये मंजूर करण्यात आले होते.

तथापि, सदर मूळ अनुदान सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या आठमाही प्रत्यक्ष खर्चानुसार शासन निर्णय क्रमांक वाटप-२००९/प्र.क्र.५६/अर्थसं१, दिनांक ३१ मार्च, २०१० अन्वये रु.६११.३६ लक्ष इतके सुधारित करण्यात आले आहे.

सदर कार्यालयाचा सन २००९-१० मध्ये प्रत्यक्ष (ताळमेळ) खर्च रु.४७५.१७ लक्ष इतका आलेला आहे. त्यामुळे रु.१३६.१९ लक्ष इतकी बचत सदर आर्थिक वर्षात दिसून येते.

सदर बचत मुख्यत्वेकरुन कार्यालयांतील रिक्त पदे न भरणे तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमुळे, वेतन या उद्दिष्टाखाली रु.१३१.६६ लक्ष इतकी रक्कम बचत झालेली दिसून येते. तसेच कर्मचाऱ्याची बदली व कमी मागणीमुळे, अतिकालीक भत्ता, देशांतर्गत प्रवास खर्च या उद्दिष्टाखाली बचत झालेली दिसून येते. यास्तव सदर प्रकरणी रु.३३.१८ लक्ष अतिरिक्त निधी खर्च झालेला नसून रु. १३६.१९ लक्ष इतकी बचत झालेली आहे व ती शासनास प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये लाखांत)

१०.१० **शीर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२२१६-गृहनिर्माण ०३ ग्रामीण गृहनिर्माण ८०० इतर खर्च ८०० (०१) (०३) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्रमांक १				
पूरक अनुदान	२,३५,००.००			
पुनविर्नियोजन	(-) १,४३,८५.००	९१,१५.००	---	(-) ९१,१५.००

टिपा व भाष्ये :-

वित्त विभाग व नियोजन विभागाकडून निधी उपलब्ध न झाल्या कारणाने मार्च, २०१० मध्ये रु.१४३८५ लाख इतका निधी परत करण्यात आला. पूरक अनुदाना व्दारे मिळालेला संपूर्ण निधी उपयोगात न आणल्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :-

१०.११ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, सन २००९-१० या आर्थिक वर्षात मुख्य लेखाशिर्ष २२१६-०३-८०० (०१) (०३) राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१-३१, सहायक अनुदाने या लेखाशीर्षाखाली रु.२३५.०० कोटी इतका निधी वित्त विभागाकडून पूरक मागणीव्दारे मंजूर करण्यात आला होता. सदर योजना ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा विकास ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविली जात असल्याने सदर निधी ग्रामविकास विभागास उपलब्ध करुन द्यावयाचा होता. तथापि, वित्त विभागाकडून त्यापैकी फक्त रु.९१.१५ कोटी इतकाच निधी प्राप्त झाला. उर्वरीत रु.१४३.८५ कोटी इतका निधी प्राप्त झाला नाही. दरम्यान सदर योजनेसाठी ग्रामविकास विभागांतर्गत अन्य गृहनिर्माण योजनेतून निधी उपलब्ध झाल्याने उपरोक्त (रु.९१.१५ कोटी + रु.१४३.८५ कोटी असा एकूण) रु.२३५.०० कोटीचा संपूर्ण निधी या आर्थिक वर्षात खर्ची पडणार

नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हा निधी दिनांक ३१/३/२०१० च्या आदेशान्वये समर्पित करण्यात आला. तथापि, महालेखाकार कार्यालयाने आपल्या आक्षेपात नमूद केलेली रु.९१.१५ कोटी इतकी रक्कम स्वतंत्र आदेशान्वये समर्पित करणे आवश्यक होते. याबाबत उचित नोंद घेण्यात आली असून यापुढे अशा प्रकारचे निधी समर्पणाचे आदेश काढताना योग्य ती दक्षता घेण्यात येईल.

तरी उपरोक्त स्पष्टीकरण विचारात घेऊन सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

(रुपये लाखांत)

१०.१२ **प्रधान शीर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२२१६-गृहनिर्माण ०३ ग्रामीण गृहनिर्माण ८०० इतर खर्च ८०० (०१) (०४) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्रमांक १ (विशेष घटक योजना)				
मूळ	२,००.००			
पुनविनियोजन	(-) १,६०.००	४०.००	---	(-) ४०.००

टिपा व भाष्ये :-

योजना पूर्ण झाल्यामुळे मार्च २०१० मध्ये रु.१६० लाख इतका निधी परत करण्यात आला.

रु.४० लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत.(ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

१०.१३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, सन २००९-२०१० च्या आर्थिक वर्षाकरिता मुख्य लेखाशीर्ष २२१६ - (०४) राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्रमांक १ (विशेष घटक योजना)- ३१, सहाय्यक अनुदाने या खाली रु.२.०० कोटी इतकी रक्कम अर्थसंकल्पीय अंदाजात मंजूर करण्यात आली होती. तथापि, सुधारित अंदाजानुसार मात्र त्यापैकी रु.१.६० कोटी इतकीच तरतूद वित्त विभागाकडून प्राप्त झाली. अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिकेतील संबंधित पृष्ठावरुन ही बाब स्पष्ट होईल. उर्वरीत रु.४०.००लक्ष इतकी तरतूद प्राप्त झाली नाही. वरीलप्रमाणे प्राप्त झालेली रु.१.६० कोटी ही तरतूद देखील खर्ची पडणार नसल्याचे निदर्शनास आल्याने ती दिनांक ३१/३/२०१० च्या शासन ज्ञापनान्वये सामाजिक न्याय विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात आली. अशा प्रकारे प्राप्त झालेली रु.१.६० कोटी इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली असून

महालेखाकार कार्यालयाने नमूद केलेली रु.४०.०० लक्ष इतकी तरतूद विभागास प्राप्तच न झाल्याने त्या रकमे इतकी बचत समर्पित करण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. त्यामुळे रु.४०.०० लक्ष इतकी तरतूद समर्पित करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

तरी उपरोक्त स्पष्टीकरण विचारात घेऊन सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

(रूपये लाखांत)

१०.१४ **शीर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२२१६- गृहनिर्माण ८०, सर्वसाधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महानगरपालिका इत्यादींना सहाय्य १०३ (०४) (०१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान नागरी क्षेत्रातील गरीबांच्या योजनेसाठी मूलभूत सुविधा (राज्य हिस्सा)				
पूरक	४,५९,३५.००			
पुनविनियोजन	(-) ३,६७,४८.००	९१,८७.००	---	(-) ९१,८७.००

ज्ञापन :-

१०.१५ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, १०३ (०४) (०१) अंतर्गत निरंक इतकी मूळ तरतूद शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे या योजनेच्या राज्य हिश्शापोटी (२२१६ १४२५) दर्शविण्यात आली होती. सदर तरतूद शासनाच्या शासन निर्णय क्र.वाटप २००९/प्र.क्र.५६/अर्थ-१, दिनांक ३१.०३.२०१० नुसार सुधारित करुन रु.३६७४८.०० लक्ष इतकी दर्शविण्यात आली. परंतु वित्त विभागाव्दारे सदर योजनेकरिता केलेली तरतूद म्हाडाव्दारे उपलब्ध करुन द्यावी अशी भूमिका घेतल्याने सदर रक्कम प्रकल्पासाठी उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे शासनाच्या शासन निर्णय क्र.बचत २००९/प्र.क्र.५६/अर्थ-१, दिनांक ३१.३.२०१० नुसार सदर रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे. विभागाने दिनांक ३१.०३.२०१० रोजी सुधारित वाटपाचे आदेश शासन निर्णय क्रमांक वाटप २००९/प्र.क्र.५६/अर्थसं. १ अन्वये निर्गमित केले आहेत. सबब, या शीर्षांतर्गत बचत (-) किंवा अधिक (+) खर्चही निरंक दर्शविण्यात यावा, यापूढे अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अनुषंगाने प्रस्तावित करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(रुपये लाखांत)

१०.१६ **प्रधान शीर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२२१६- गृहनिर्माण ८०, सर्वसाधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महानगरपालिका इत्यादींना सहाय्य १०३ (०४) (०२) एकात्मीकृत गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (राज्य हिस्सा)				
पूरक	५९,३२.००	११,८१.४०	---	(-) ११,८१.४०
पुनविनियोजन	(-) ४७,५०.६०			

टिपा व भाष्ये :-

रु.१०३६.४० लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, प्रकल्पासाठीचा निधी म्हाडाकडून उपलब्ध होणार होता म्हणून वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च २०१० मध्ये परत केलेला रु.४१४९८.६० लाख इतका निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले, त्याची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट २०१०).

ज्ञापन :-

१०.१७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, १०३ (०४) (०२) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (राज्य हिस्सा) या लेखाशिर्षाअंतर्गत सुरुवातीला अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली नव्हती. तथापि, सदरहू तरतूद सुधारित वाटपानुसार रु.४७५०.६० लक्ष इतकी करण्यात आली. सदर योजनेकरिता केलेली तरतूद म्हाडाव्दारे उपलब्ध करुन दयावी, अशी वित्त विभागाने भुमिका घेतल्याने सदर रक्कम प्रकल्पासाठी उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे दिनांक २१.३.२०१० रोजीच्या शासननिर्णयान्वये सदर रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे. सबब, सदर लेखाशिर्षातंर्गत अधिक खर्च (+) किंवा बचत (-) निरंक दर्शविण्यात यावी.

(रुपये लाखांत)

१०.१८ शीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२२१६-गृहनिर्माण ८०, सर्वसाधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महानगरपालिका इत्यादींना सहाय्य १०३ (०५) (०१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान नागरी क्षेत्रातील गरीबांच्या योजनेसाठी मूलभूत सुविधा (केंद्रीय हिस्सा)				
मूळ	४,७९,००.००	४,८४,४५.६८	४,८४,४५.६८	---
पूरक	६,४३,१०.००			
पुनर्विनियोजन	(-) ६,३७,६४.३२			

ज्ञापन :-

१०.१९ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, १०३ (०५) (०१) अंतर्गत रु.४७९००.०० लक्ष इतकी मूळ तरतूद शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेच्या केंद्र हिश्शापोटी (२२१६ १४२५) दर्शविण्यात आली होती. सदर तरतूद शासन निर्णय क्र. वाटप २००९/प्र.क्र.५६/अर्थसं-१, दिनांक ३१.०३.२०१० नुसार सुधारित करुन रु.११२२१०.०० लक्ष इतकी दर्शविण्यात आली. त्यापैकी रु.४८४४५.६८ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली. परंतु केंद्र शासनाकडून सदर योजनेंतर्गत कमी निधी प्राप्त झाल्याने शासन निर्णय क्र.बचत २००९/प्र.क्र.५६/अर्थसं-१, दिनांक ३१.०३.२०११ नुसार उर्वरीत रु.६३७६४.३२ लक्ष इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे. सबब, या शीर्षांतर्गत बचत (-) किंवा अधिक (+) खर्चही निरंक दर्शविण्यात यावा.

(रूपये लाखांत)

१०.२० **शीर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२२१६-गृहनिर्माण ८०, सर्वसाधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महानगरपालिका इत्यादींना सहाय्य १०३ (०५) (०२) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम(केंद्रीय हिस्सा)		२,९३,३०.५९	२,९३,३०.५९	---
मूळ	६५,१९.००			
पूरक	३,९२,३९.००			
पुनविनियोजन	(-)१,६४,२७.४१			

टिपा व भाष्ये :-

केंद्र सरकारकडून निधी कमी मिळाल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली सन २०१० मध्ये रु.८०१९१.७३ लाख इतका निधी परत केला.

ज्ञापन :-

१०.२१ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखा ज्ञापनात नमूद केले आहे की, १०३ (०५) (०२) अंतर्गत रु.६५१९.०० लक्ष इतकी मूळ तरतूद एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम या योजनेच्या केंद्र हिश्शापोटी (२२१६ १४६१) दर्शविण्यात आली होती. सदर तरतूद शासन निर्णय क्र.वाटप २००९/प्र.क्र.५६/अर्थसं-१, दिनांक ३१.३.२०१० नुसार सुधारित करुन रु.४५७५८.०० लक्ष इतकी दर्शविण्यात आली. त्यापैकी रु.२९३३०.५९ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली. परंतु केंद्र शासनाकडून सदर योजनेंतर्गत कमी निधी प्राप्त झाल्यामुळे शासन निर्णय क्र.बचत २००९/प्र.क्र.५६/अर्थसं-१, दिनांक ३१.०३.२०११ नुसार उर्वरित रु.१६४२७.४१ लक्ष इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे. सबब, या शीर्षांतर्गत बचत (-) किंवा अधिक (+) खर्चही निरंक दर्शविण्यात यावा.

(रूपये लाखांत)

१०.२२ **शीर्ष**		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२२१६- गृहनिर्माण ८०, सर्वसाधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महामंडळे इत्यादींना सहाय्य १०३ (०३) (०८) घरांसाठी बिडी कामगारांना अर्थसहाय्य				
मूळ	४३.६२	१९,०३.००	१५,२२.४०	(-) ३,८०.६०
पूरक	१८,५९.३८			

आक्षेप :-

रु.३८०.६० लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :-

१०.२३ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता मुख्य लेखाशीर्ष २२१६-१०३ (०३) (०८) विडी कामगारांना घरांसाठी अर्थसहाय्य या खाली मूळ मंजूर अनुदान रु.४३.६२ लक्ष इतके होते. तदनंतर वित्त विभागाने या बाबीसाठी पुरक मागणीव्दारे रु.१८.५९ कोटी इतका निधी मंजूर केला. म्हणजेच, (रु.४३.६२ लक्ष +रु.१८.५९ कोटी असे एकूण) रु.१९.०३ कोटी इतके अनुदान मंजूर होते. तथापि, सुधारित अंदाजाच्या वेळी मात्र वित्त विभागाने या रु.१९.०३ कोटी अनुदानापैकी रु.१५.२२ कोटी इतकेच अनुदान उपलब्ध करुन दिले. उर्वरित रु.३.८० कोटी इतके अनुदान वित्त विभागाकडून प्राप्तच झाले नाही. वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या रु.१५.२२ कोटी इतक्या निधीचे त्या वर्षात पूर्णपणे वाटप करण्यात आले आहे. सारांश, महालेखाकार कार्यालयाने उल्लेख केलेली रु.३.८० कोटी इतकी रक्कम वित्त विभागाकडूनच प्राप्तच न झाल्याने ती प्रत्यार्पित करण्याचा व प्रत्यार्पणाचे आदेश काढण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही.

तरी उपरोक्त स्पष्टीकरण विचारात घेऊन सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

साक्ष :-

१०.२४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. सदर बैठकीत सन २००९-१० या आर्थिक वर्षात रु.११६.०७ इतका निधी विभागाने कोणकोणत्या बाबींवर खर्च केला आहे याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले

की, हा खर्च अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन), मुंबई शहर यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. सन २००९-१० मध्ये वेतनाकरिता रु.१,१३,८९,०००/-, प्रवासाकरिता रु.४,०००/-, कार्यालयाकरिता रु.२,००,०००/-, जाहिरातीकरिता रु.५,०००/- मोटारवाहनाकरिता रु.४५,०००/- अशाप्रकारे एकूण ११६ लाख ७ हजार इतका खर्च झाला आहे.

१०.२५ अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन), मुंबई शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरे यांच्या कार्यालयात, रिक्त पदांची पदनिहाय माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१०.२६ अतिक्रमण निष्कासन हे काम मुंबईत ३ अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केले जाते. मुंबई शहरात ७६ पदे आहेत. त्यापैकी ५० पदे भरली आहेत. सन २००९-२०१० मध्ये २३ पदे रिक्त होती, रिक्त पदांची संख्या ३४ टक्के आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात २४४ पदे आहेत. त्यापैकी १५० पदे भरली आहेत. ९४ पदे रिक्त आहेत. ३९ टक्के पदे रिक्त आहेत. बृहन्मुंबईमध्ये एकूण पदे ६१२ झाली, ४०० पदे भरली आहेत. सन २००९-१० मध्ये २०७ पदे रिक्त होती. सुरुवातीला ३४ टक्के पदे रिक्त होती.

१०.२६ प्रधान शीर्ष २२१६-गृहनिर्माण, २२१७-नगरविकास, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण या अंतर्गत मूळ अनुदान रु.२५,४३,३२,०४/- असून बचत रु.१५,६४,६७,३६/- आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, या लेखाशीर्षामध्ये बऱ्याचशा लेखाशीर्षाची माहिती एकत्रितरित्या दिली आहे. मूळ मागणी ६,८५,३०,६६/- असून पूरक मागणी रु.१८,५८,०१.३८/- इतकी आहे. दोन्ही मिळून मूळ अनुदान किंवा विनियोजन आहे. ते सर्व खर्ची पडले आहे. विहित मुदतीनंतर पूरक निधी देण्यात आला होता. केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून अपेक्षित निधी न मिळाल्यामुळे राज्य शासनाला पूरक निधीची तरतूद करावी लागली. मूळ अर्थसंकल्पामध्ये तरतूद करीत असताना राज्य शासनाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून अपेक्षित असलेला निधी विचारात घेऊनच तरतूद केली जाते.

१०.२७ सर्वप्रथम विभागाने मूळ तरतूद ६८५ कोटी रुपयांची केली. त्यानंतर १८५८ कोटी रुपये पूरक तरतूद केली. निधीची रक्कम एकूण २५४३ कोटी इतकी रुपये झाली. परंतु प्रत्यक्ष खर्च मात्र ९७८ कोटी रुपये इतकाच झाला. १५६४ कोटी रुपये शिल्लक राहिले. एकूण तरतूदीतून ६५ टक्के जर बचत होत असेल तर एवढ्या मोठ्या प्रमाणात विभागाने याकरिता तरतूद का केली ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बीएसयुपी, आयएचएसडीपी या दोन केंद्र पुरस्कृत योजना आहेत. या योजनांच्या माध्यमातून राज्यातील काही महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांमधील गृहनिर्माण प्रकल्पांना अर्थसहाय्य केले जाते. ते लक्षात घेता शासन अर्थसंकल्पामध्ये तरतूद करते.

१०.२८ केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून अपेक्षित असलेला निधी जर विहित मुदतीत व पुढे मिळालाच नाही तर राज्य शासनच या गृहनिर्माण प्रकल्पांना पैसे देते. राज्य शासन याची तपासणी करते का, इतर राज्यातील प्रकल्पांना केंद्र शासनाने पैसे दिले का ? आपल्या राज्यामधील महानगरपालिका क्षेत्रांना का दिले नाही ? जर दिले नसेल तर याची कारणे काय आहेत ? आपल्या राज्याच्या प्रस्तावामध्ये काही उणीव राहिली होती का ? याकरिता इतर काही कारणे आहेत ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या योजनावरील एकूण खर्चापैकी राज्य शासनाने आपला हिस्सा एकूण ६०० कोटी रुपये दिलेला आहे. सदर योजना ही झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांकरिता पक्की घरे बांधण्याची ही योजना आहे. या योजनेचा क्लस्टर बेस्ड ॲप्रोच आहे. संबंधित प्रकल्पाचा डीपीआर तयार करुन राज्य शासनामार्फत केंद्र शासनापर्यंत पाठविला जातो. बीएसयुपी योजनेअंतर्गत केंद्र शासनाचा ५० टक्के निधी, राज्य शासनाचा ३० टक्के निधी तसेच लाभार्थ्यांकडून १० टक्के निधी घेतला जातो. १० टक्के आयएचएसडीपी कडून दिले जातात. महानगरपालिका, नगरपालिका यांचा यामध्ये कोणत्याही प्रकारचा सहभाग नसतो. साधारणतः केंद्र पुरस्कृत योजनांचे हे फंडिंग पॅटर्न आहे. तसेच, गृहनिर्माणाबरोबर रहिवाशांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे हेही या योजनेचाच एक भाग आहे. तसेच काही योजनांमध्ये ८० टक्के केंद्र शासनाचा निधी, राज्य शासनाचा १० टक्के व लाभार्थ्याचा दहा टक्के निधी अशा प्रकारचा फंडिग पॅटर्न आहे.

१०.२९ गडचिरोली नगरपरिषदेचा प्रस्ताव गेल्या दोन वर्षापासून शासनाकडे पडून आहे. या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत या प्रस्तावाकरिता केंद्र शासनाकडून कोणत्या प्रकारचा निधी मिळणार आहे. याकरिता राज्य शासनाने विभागाच्यामार्फत कोणत्या प्रकारचा पाठपुरावा केलेला आहे का यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, गडचिरोली जिल्ह्याच्या बाबतीत आयएचएचडीपीचा प्रस्ताव मंजूर झाला पाहिजे, तसेच त्या प्रस्तावाची पडताळणी बीएसयुपी अंतर्गत केली होती. परंतु केंद्र शासनाच्या मताप्रमाणे या योजनांची प्रगती समाधानकारक नाही. याकरिता राज्य शासनाने राजीव आवास योजनेअंतर्गत अशा प्रकारे डी व सी प्लस नगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीवासियांना पक्की घरे बांधून देण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत तुर्तास केवळ २५ महानगरपालिका क्षेत्रातील घरे बांधण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. बीएसयुपी व आयएचएसडीपी अंतर्गत केंद्र शासनाने मान्यता दिलेले प्रकल्प साधारणतः ३१ मार्च, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचा मानस आहे. राजीव आवास योजनेची अंमलबजावणी पुढील दहा वर्षाकरिता करण्यात येणार आहे. या दहा वर्षामध्ये प्रथम वर्ष हे प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणार आहे. प्रथम वर्षात या योजनेची अंमलबजावणी समाधानकारक वाटली तरच ती उर्वरीत वर्षाकरिता कायम ठेवली जाणार आहे.

१०.३० बीएसयुपी व आयएचएसडीपी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना यशस्वीपणे व समाधानकारपणे राबविण्यात आल्या नाहीत. आतापर्यंत एकूण किती शहरामध्ये या योजना यशस्वीपणे व समाधानकारकपणे राबविण्यात आलेल्या आहेत ? तसेच याकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाने या योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या कामाकरिता ३१ मार्च, २०१५ पर्यंतची मुदतवाढ दिलेली आहे. या योजनेअंतर्गत नगरविकास योजनांच्या माध्यमातून एकूण १४ शहरांमध्ये घरे बांधण्यात आलेली आहेत. तसेच बीएसयुपी व आयएचएसडीपी अंतर्गत ९२ शहरांमध्ये घरे बांधून देण्याचे मंजूर करण्यात आलेले आहे. यामध्ये एकूण १,४०,७३७ सदनिका मंजूर करण्यात आलेल्या आहेत. यापैकी एकूण ५८,५२६ घरांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. २४,८९५ सदनिकाचे बांधकाम प्रगती पथावर आहे. एकूण ६० टक्क्यांच्या आसपास या सदनिकांचे काम पूर्ण झालेले आहे. दीड ते दोन वर्षामध्ये साधारणपणे बीएसयुपी व आयएचएसडीपी अंतर्गत २ लाख सदनिका बांधून देण्याचा मानस आहे.

१०.३१ या कामाच्या निविदा सात-आठ वर्षापूर्वी देण्यात आल्या होत्या. त्यानंतर वर्क ऑर्डर देण्याकरिता मात्र दोन ते तीन वर्षाचा विलंब झाला ? निविदा दिल्यानंतर वर्क ऑर्डर मिळण्याकरिता एवढा विलंब लागण्याची कारणे काय आहेत ? वर्क ऑर्डरला लागलेल्या विलंबामुळे मध्यंतरीच्या काळामध्ये डीएसआर रेट वाढलेले आहेत. या वाढीव डीएसआरमुळे घरांच्या बांधकामाचे अंदाजपत्रक बारगळून रिवाईज्ड एस्टीमेंट परवडेनासे झालेले आहे. विहित मुदतीत व वेळेमध्ये वर्क ऑर्डर देऊन घरांचे बांधकाम पूर्ण न झाल्यामुळे बांधकामाच्या किंमती अवास्तव वाढून बजेटच्याही बाहेर गेले. ही वस्तुस्थिती समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी यास सहमती दर्शविली व समितीस अवगत केले की, या योजनेच्या क्रॉस नॉर्मसप्रमाणे गेले जर नियोजित अंदाजपत्रकाप्रमाणे विहित मुदतीत काम करणे अवघड होऊन बसलेले आहे. या योजनेच्या नियमांमध्ये योग्य ते बदल करण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. छोट्या छोट्या महानगरपालिकांमध्ये या योजनेच्या नियमाप्रमाणे तेथील प्रकल्प मापदंडामध्ये बसवून नगरपालिकांमध्ये अर्थसंकल्पिय क्षमतेमध्ये बसविणे कठीण होऊन जाते. तसेच, राज्य शासनाचा हिस्सा व केंद्र शासनाचा हिस्सा या तुलनेमध्ये लाभार्थी आपला हिस्सा देऊ शकत नाहीत अशीही परिस्थिती निर्माण होते. यामुळे योग्य लाभार्थी बाजूला राहून दुसराच लाभार्थी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या योजनेनुसार जी रक्कम लाभार्थीकडून वसूल करावयाची असते, त्यापैकी काही भाग संबंधित महानगरपालिकेकडून निधी स्वरुपात योजनेकरिता मिळवून दिला तर बरे होईल.

१०.३२ केंद्र पुरस्कृत घरकुल योजनांच्या क्रॉस नार्मनुसार ज्यावेळी ही योजना मंजूर झाली होती. बीएसयुपीच्या मापदंडानुसार लहान नगरपालिका क्षेत्रातील लाभार्थ्यांना एकूण प्रकल्पाच्या किंमतीनुसार १० टक्के हिस्सा देणे परवडणार नाही. यामुळे केंद्र शासनाकडे वाढीव हिस्सा निधी स्वरुपात मागणी

करण्याकरिता प्रस्ताव पाठविला जाण्याचा मानस आहे. तसेच, आयएचएसडीपी या प्रकल्पांतर्गत काही निधी संबंधित महानगरपालिकेकडे उपलब्ध करुन द्यावा, अशी अपेक्षा आहे.

१०.३३ केंद्र पुरस्कृत घरकुल योजनांतर्गत छोट्या नगरपालिका क्षेत्रात वाढीव डीएसआर नुसार योजनेतील लाभार्थ्यांना त्यांच्या १० टक्के हिस्सा भरणे परवडणार नाही. अशा परिस्थितीत राज्य शासन म्हणून विभागाकडून यावर कोणती उपाययोजना राबविता अशी समितीने विचारणा केली असता यावर क व ड महानगरपालिका क्षेत्रातील लाभार्थ्यांना जर घरकूल योजनेमध्ये दहा टक्के हिस्सा देणे परवडत नसेल तर त्यांच्याकरिता केंद्र पुरस्कृत योजनेतून पूरक निधी देण्याची सोय राज्य शासनामार्फत केली जाणार आहे असे विभागाकडून सांगण्यात आले.

१०.३४ या घरकूल योजनेच्या निविदा निघाल्यानंतर वर्क ऑर्डर काढण्याकरिता तीन वर्षाचा कालावधी का लागला ? यासंदर्भात स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये राज्य शासन १० टक्के लाभार्थ्यांना १० टक्के हिस्सा निधीच्या स्वरुपात भरावा लागतो. दहा टक्के हिस्सा राज्य शासन अदा करते. ८० टक्के हिस्सा केंद्र शासन निधीच्या स्वरुपात भरते. परंतु या बांधकामामध्ये ठेकेदार मात्र संबंधित महानगरपालिकेच्या माध्यमातून नियुक्त करण्यात येतो. डीएसआर वाढल्यामुळे क व ड नगरपालिका क्षेत्रातील घरकूल योजनेमध्ये लाभार्थ्यांस दहा टक्के रक्कम भरणेही परवडत नसेल तर त्याकरिता राज्य शासन पूरक निधी पुरविण्याचा विचार करीत आहे.

१०.३५ समितीने असेही विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, राज्य व केंद्राचा निधी उपलब्ध असताना काही नगरपालिका क्षेत्रांमध्ये लोकवर्गणीची अडचण निर्माण होते. महानगरपालिकेच्या माध्यमातून ठेकेदाराची नियुक्ती होऊन त्याच्या कामाच्या दर्जावर नियंत्रण राखले जाते. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित क्षेत्रातील महानगरपालिकेच्या माध्यमातून वर्क ऑर्डर दिली जाते. काही ठिकाणी घरकूल योजनांचे काम सुरु होऊन वर्क ऑर्डर मिळाल्यानंतरही लोकांचा स्वतःचा जादा खर्च देऊन घरामध्ये बदल केले. काही ठिकाणी योजना निधी अभावी पूर्णपणे बारगळल्या. खामगाव तालुक्यामध्ये या योजनेंतर्गत बांधलेल्या घरांचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. ठेकेदार आणि लाभार्थी यांच्यातील वाद व काही संगनमत यामुळे या योजनेचा बऱ्याच ठिकाणी बोजवारा उडाल्याचे आढळून येत आहे. यावर विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, याकरिता केंद्र शासनाने थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ॲण्ड मॉनिटरींग ऑथॉरिटी प्राधिकरण पाठवून बांधकामाचा दर्जा तपासण्यास सुरुवात केली. संबंधित प्राधिकरण बांधकामाचा दर्जा तपासून जर तो निकृष्ट असेल तर संबंधितांवर योग्य त्या कारवाईची तरतूद करीत असते. तसेच खामगाव तालुक्यामध्ये व इतर ठिकाणी जर अशा प्रकारे निकृष्ट बांधकाम होत असेल तर त्याची सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द

कारवाई केली जाईल. या संदर्भातील सद्यस्थिती समितीसमोर सादर करण्यात येईल असेही आश्वासन विभागाकडून समितीस देण्यात आले. परंतु विभागाकडून यासंदर्भातील माहिती अद्याप अप्राप्त आहे.

१०.३६ केंद्र पुरस्कृत योजनांचा केंद्र शासनाकडून निधी व राज्य शासनाची मॅचिंग ग्रांट विहित वेळेत मिळते काय? यावर विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, केंद्र पुरस्कृत योजनांना केंद्र शासनाचा निधी व राज्य शासनाचा निधी विहित वेळेतच मिळालेला आहे. घरकुल योजनांच्या बांधकामाचा दर्जा ठेकेदार व लाभार्थी यांच्या वादामुळे निर्माण झालेला आहे. शासनाकडून निधी मिळण्यास झालेल्या विलंबामुळे या बांधकामामध्ये दिरंगाई व ढिसाळपणा आलेला आहे, असे नाही. यामध्ये नगरपालिकेची हलगर्जी व ठेकेदारांच्या कामावरील नियंत्रणाचा अभाव ही कारणे आहेत.

१०.३७ निविदा निघाल्यानंतर तीन वर्षाने वर्क ऑर्डर निघाल्या गेल्या आहेत. वर्कऑर्डर उशिरा निघाल्यामुळे कामाच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. अगोदर जे काम ८० हजार रुपयांमध्ये होत होते त्या कामासाठी नंतर १.२० ते १.३० लक्ष रुपये खर्च होऊ लागला. ठेकेदारांनी ही कामे १.१० ते १.२० लाखामध्ये घेतली परंतु केंद्र सरकारने ८० हजार रुपयाप्रमाणे दिले. १२०० घरांपैकी ८०० घरांचे काम पूर्ण झाले परंतु नंतरच्या घरांची कामे किंमती वाढल्यामुळे होऊ शकले नाही. त्यामुळे उर्वरीत ४०० घरांचे काम राहिलेले आहे त्याचे काय करावयाचे. त्यामुळे घराच्या खर्चाचा निधी वाढवून देण्याच्या संदर्भात केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने काही तयारी दाखविली आहे काय ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, घरांच्या योजनेच्या निधीमध्ये वाढ करण्याच्या संदर्भात केंद्र शासनास विभागाकडून विनंती करण्यात आली होती. परंतु मागच्या पंचवार्षिक योजनेमध्ये आता योजनातर्गत खर्च करु शकत नाही असे केंद्र शासनाने म्हटलेले आहे. वाढ करण्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या स्तरावर सुध्दा विचार सुरु आहे. छोट्या नगरपालिकांकडे निधी असल्यामुळे त्यांच्याकडे या कामासाठी थोडा पूरक निधी दिला तर जी कामे अर्धवट राहिलेली आहेत ती कामे पूर्ण होऊ शकतील.

१०.३८ विहीत मुदतीत कामे झाली नाहीत. केंद्र सरकारचा आणि राज्य सरकारचा निधी वेळेत न मिळणे, वर्क ऑर्डर उशिरा काढण्यात येणे, पर्यायाने घरांच्या किंमतीमध्ये वाढ होणे अशी काही कारणे या योजनेमध्ये आहेत. ठेकेदारांना दोन पैसे मिळाले तरच ठेकेदार काम करतो. परंतु ठेकेदाराचे जास्त पैसे खर्च होत असेल तर ठेकेदार काम करीत नाही. अशा कारणांमुळे या योजना अयशस्वी ठरली आहे. या योजनेसाठी केंद्राने आपल्या राज्याला पैसे दिले तर केंद्र शासनाला सर्व राज्यांनाही पैसे द्यावे लागतील. त्यामुळे केंद्र सरकार या योजनेला पैसे वाढवून देईल असे वाटत नाही. ही घरे गरिबांची असताना केंद्र शासन आणि राज्य शासनही वाढीव पैसे देण्यास तयार नाही. त्यामुळे ही योजना पूर्णत्वास नेण्यासाठी या योजनेसाठी

वाढीव निधी उपलब्ध करुन दिला जावा. डीएसआरचे रेट वाढले, केंद्र शासन पुरेसे पैसे देत नाही त्यामुळे राज्य शासनाने ही योजना पूर्ण करण्यासाठी वाढीव निधी द्यावा असे मत समितीने व्यक्त केले व या योजनेच्या संदर्भात विभागाने समितीला सविस्तर माहिती सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले. परंतु विभागाकडून अद्याप माहिती अप्राप्त आहे.

१०.३९ विडी कामगारांसाठी घरकुले याबाबत विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, केंद्र शासनाच्या कामगार विभागातर्फे विडी कामगारांच्या संस्थेला मंजूरी दिली जाते तसेच प्रत्येक घरासाठी ४० हजार रुपये दिले जातात. परंतु ४० हजार रुपयांमध्ये घराचे काम होऊ शकत नसल्यामुळे राज्य शासनाने प्रत्येक सदनिकेसाठी सन २०११-२०१२ पासून २५ हजार रुपये अनुदान देत असून ५ हजार रुपये विडी कामगाराला द्यावे लागतात.

१०.४० परंतु वित्तीय संस्थांकडून विडी कामगारांच्या घरांसाठी पैसे देण्याची काही सोय आहे काय ? कारण गरिबांच्या घराला कोणीही जामीनदार राहत नाही. सरकार साखर कारखान्यांना जामीनदार राहते परंतु गरिबांच्या घराला जामिनदार राहत नाही. यावर विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, ७० हजार रुपयांमध्ये घर बांधणे शक्य नसल्यामुळे लाभार्थी बँकमार्फत कर्ज घेऊ शकतो. काही ठिकाणी अशा पध्दतीने लाभार्थ्यांनी कर्ज घेतलेली आहेत.

१०.४१ कॉ.दोधूताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, सोलापूर येथे १० हजार घरकुले आहेत. श्रमिक विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, संगमनेर येथे ८० घरकुले असून दि विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, भिवंडी येथे ५१० घरकुले आहेत. कॉ.मिनाक्षी ताई साने महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेची ५१०० घरकुले आहेत. नरसिंह विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेची ११० घरकुले असून मॉ.सोहब विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, सोलापूर येथे ३७७० घरकुले आहेत.

१०.४२ राज्यातील कोणकोणत्या विडी कामगार गृहनिर्माण सदस्यांची मागणी आलेली आहे याबाबतची सविस्तर माहिती तसेच केंद्र सरकार व राज्य सरकारच्या योजनांच्या संदर्भातील सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी, असे निदेश समितीने विभागास दिले. तथापि, माहिती अप्राप्त आहे.

समितीचे अभिप्राय :-

१०.४३ बीएसयुपी व आयएचएसडीपी अंतर्गत सदनिका बांधण्याच्या कामाच्या निविदा सात-आठ वर्षापूर्वी देण्यात आल्या होत्या. त्यानंतर वर्क ऑर्डर देण्याकरिता मात्र दोन ते तीन वर्षाचा विलंब झाला ? निविदा दिल्यानंतर वर्क ऑर्डर मिळण्याकरिता एवढा विलंब लागण्याची कारणे काय आहेत ? वर्क ऑर्डरला

लागलेल्या विलंबामुळे मध्यंतरीच्या काळामध्ये डीएसआर रेट वाढलेले आहेत. या वाढीव डीएसआरमुळे घरांच्या बांधकामाचे अंदाजपत्रक बारगळून रिवाईज्ड एस्टीमेंट परवडेनासे झालेले आहे. विहित मुदतीत व वेळेमध्ये वर्क ऑर्डर देऊन घरांचे बांधकाम पूर्ण न झाल्यामुळे बांधकामाच्या किंमती अवास्तव वाढून बजेटच्याही बाहेर गेले.

१०.४४ राज्य व केंद्राचा निधी उपलब्ध असताना काही नगरपालिका क्षेत्रांमध्ये लोकवर्गणीची अडचण निर्माण होते. महानगरपालिकेच्या माध्यमातून ठेकेदाराची नियुक्ती होऊन त्याच्या कामाच्या दर्जावर नियंत्रण राखले जाते. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित क्षेत्रातील महानगरपालिकेच्या माध्यमातून वर्क ऑर्डर दिली जाते. असे मत समितीने व्यक्त केले.

१०.४५ विहित वेळेत कामे झाली नाहीत. केंद्र सरकारचा आणि राज्य सरकारचा निधी वेळेत न मिळणे, वर्क ऑर्डर उशिरा काढण्यात येणे, पर्यायाने घरांच्या किंमतीमध्ये वाढ होणे अशी काही कारणे या योजनेमध्ये आहेत. ठेकेदारांना दोन पैसे मिळाले तरच ठेकेदार काम करतो. परंतु ठेकेदाराचे जास्त पैसे खर्च होत असतील तर ठेकेदार काम करीत नाही. अशा कारणांमुळे या योजना अयशस्वी ठरल्या आहेत. या योजनेसाठी केंद्राने आपल्या राज्याला पैसे दिले तर केंद्र शासनाला सर्व राज्यांनाही पैसे द्यावे लागतील. त्यामुळे केंद्र सरकार या योजनेला पैसे वाढवून देईल असे वाटत नाही. ही घरे गरिबांची असताना केंद्र शासन आणि राज्य शासनही वाढीव पैसे देण्यास तयार नाही. त्यामुळे ही योजना पूर्णत्वास नेण्यासाठी या योजनेसाठी वाढीव निधी उपलब्ध करुन दिला जावा. डीएसआरचे रेट वाढले, केंद्र शासन पुरेसे पैसे देत नाही त्यामुळे राज्य शासनाने ही योजना पूर्ण करण्यासाठी वाढीव निधी द्यावा असे अभिप्राय समितीने व्यक्त केले.

समितीच्या शिफारशी :-

१०.४६ शिफारस क्र. (१) खामगांव तालुक्यामध्ये या योजनेंतर्गत बांधलेल्या घराचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे

झालेले आहे,ठेकेदार आणि लाभार्थी यांच्यातील वाद व काही संगनमत यामूळे या योजना बऱ्याच ठिकाणी असफल झाल्या असल्याचे आढळून येते. खांमगाव व इतर ठिकाणी अशाप्रकारे निकृष्ट बांधकाम झालेले आहे अशा सर्व योजनांची चौकशी करून दोषीवरील कार्यवाहीची माहिती तीन महीन्यात समीतीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

१०.४७ शिफारस क्र. (२)छोटया नगरपालिकांकडे त्यांच्या हिश्याचा पुरक निधी नसल्यामुळे ज्या ज्या ठिकाणी योजना पूर्ण होऊ शकली नाही अशा ठिकाणी राज्यशासनाने वाढीव निधी उपलब्ध करुन दयावा अशी समितीची शिफारस आहे.

१०.४८ शिफारस क्र. (३) कोणतीही योजना केंद्र शासनाची असो वा राज्य शासनाची असो त्यासाठी जे निकष अटी व शर्ती तसेच कार्यपध्दती निश्चित केल्या जातात त्या चौकटीत राहून ते काम करणे शक्य असतेच म्हणून ते निकष ठरविण्यात येतात. परंतू योजनेच्या अंमलबजावणीच्या वेळी अनेक बाबीचे तंतोतंत व समांतर पातळीवर नियोजन न केल्यामूळे तसेच स्थानिक दबाव व संगनमत,आर्थिक व वेळेच्या नियोजनाच्या अभाव अशा अनेक बाबींमुळे योजना असफल ठरते. यात योजनेचे निकष नव्हे तर अंमलबाजावणीची कार्यपध्दती चुकल्यामुळे अनेक लाभार्थी यापासून वंचित राहतात. यादृष्टीने शासनाने या संदर्भात निश्चित मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात जेणेकरून योजनेची अंमलबाजावणी प्रभावीपणे करणे शक्य होईल अशी समितीची शिफारस आहे तसेच प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त बाबी विचारात घेऊन नियोजन न केल्यामुळे ही कामे पूर्ण होऊ शकलेली नाही. या सर्व बाबींची चौकशी करुन त्याबाबत कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशीही समितीची शिफारस आहे.

१०.४९ शिफारस क्र. (४) राज्यातील कोणकोणत्या विडी कामगार गृहनिर्माण संस्थांकडून घरकुलाची मागणी आलेली आहे याबाबतची सविस्तर माहिती तसेच केंद्र सरकार व राज्य सरकारचा या योजनेमध्ये जो आर्थिक हिस्सा आहे याबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करावी असे स्पष्ट निदेश समितीने साक्षीच्या वेळी दिलेले असतानांही सदरहू माहिती अदयापपर्यत समितीला अप्राप्त आहे. ही बाब समितीचा अवमान करणारी ठरते. साक्षीच्या वेळी केवळ वेळ मारुन नेण्यासाठी आश्वासन देण्यात येते परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. अत: याबाबत जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईची माहिती समितीस एका महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग

११. वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च

११.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्रमांक आर-३ "वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च" मधील प्रधान लेखाशीर्ष ४२१०- "वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च" या शीर्षांतर्गत बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

अनुदान क्रमांक आर-३-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च

(रुपये हजारांत)

११.२ **शीर्ष**	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
प्रधानशीर्ष ४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च दत्तमत मूळ २,११,३६ पूरक २१२१.९८ वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१०)	२३,३३,३४	४,८५,२१	(-)१८,४८,१३ १८,४२,२२

टिपा व भाष्ये :-

अनुदानातील बचत खालील शीर्षाखाली झाली :-

(रुपये लाखांत)

११.३ **शीर्ष**	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०१ नागरी आरोग्य सेवा ११० (०१) (०१) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना-प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी योजना ओरोस, जिल्हा सिंधुदुर्ग येथे जिल्हा रुग्णालय व निवासी गाळयांचे बांधकाम करणे मूळ १६.६७ पुनर्विनियोजन (-) १६.६७	---	---	---

टिपा :-

वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या आधारे आणि (दोन) कंत्राटदाराने देयके सादर न केल्याने मार्च २०१० मध्ये रु. १६.६७ लाख इतकी संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद परत करण्यात आली.

ज्ञापन :-

११.४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, कंत्राटदाराने देयके सादर न केल्याने बांधकामाचा खर्च झालेला नाही त्यामुळे मार्च २०१० मध्ये रु. १६.६७ लाख संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद परत करण्यात आली.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र. लेखापरीक्षा/अेअेडब्लू/अशासकीय संदर्भ/ आर-१, ३/२२१०, ४२१०/ २००९-१०/साआवि/ यूओआर- ५७७/ ओडब्लू क्र. ११, दिनांक ११.४.१२ अन्वये तपासून देण्यात आले आहे.

(रुपये लाखांत)

११.५ **शीर्ष**	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०१ नागरी आरोग्य सेवा ११० (०१) (०३) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई मूळ ४३.३४ पूरक १,५६.६६ पुनर्विनियोजन (-) २,००.००	---	---	---

ज्ञापन :-

११.६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, यंत्रसामग्री खरेदीसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊ न शकल्याने त्यामुळे मूळ मंजूर व पूरक मागणीद्वारे प्राप्त झालेले संपूर्ण अनुदान परत करण्यांत आले.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र. लेखापरिक्षा/ अेअेडब्ल्यू/ अशासकीय संदर्भ/ आर-१,३/ २२१०, ४२१०/२००९-१०/साआवि/युओआर-५७७/ओडब्ल्यू क्र. ११, दिनांक ११.४.१२ अन्वये तपासून देण्यांत आले आहे.

(रुपये लाखांत)

११.७ शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०१ नागरी आरोग्य सेवा ११० रुग्णालये व दवाखाने ११० (०१) (०५) आरोग्य मध्यवर्ती, मनोरुग्णालये	--	--	-
मूळ १०.६७ पूरक ८९.३३ पुनर्विनियोजन (-) ४८.११	५१.८९	४९.६३	(-)२.२६

ज्ञापन :-

११.८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, सदर योजनेखाली अंतिम सुधारीत अनुदान रु. ५१.८९ लाख मंजूर असून प्रत्यक्ष खर्च रु. ४९.६३ लाख इतका झाला आहे. रु.२.२६ लाख बचत ही औषधांचा पुरवठा वेळीच प्राप्त न झाल्यामुळे झाली आहे तरी झालेली बचत क्षमापित करण्यांत यावी.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र. लेखापरिक्षा/ अेअेडब्ल्यू/ अशासकीय संदर्भ/ आर-१,३/२२१०,४२१०/ २००९-१०/साआवि/युओआर-५७७/ओडब्ल्यू क्र. ११, दिनांक ११.४.१२ अन्वये तपासून देण्यांत आले आहे.

(रुपये लाखांत)

११.९ शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०१ नागरी आरोग्य सेवा ११० - रुग्णालये व दवाखाने ११० (०१) (०६) सर्व महसूली विभागांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी प्रादेशिक संदर्भ केंद्रांची स्थापना करणे.			
मूळ ३१.६७ पूरक १५६८.३३ पुनर्विनियोजन (-) १२४३.९१	३५६.०९	३५५.४९	(-) ०.६०

ज्ञापन :-

११.१० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, साहित्य व साधनसामुग्रीच्या खरेदीसाठी या योजनेसाठी एकूण अंतिम सुधारीत अनुदान रु.३५६.०९ लाख मंजूर झाले, व रु. ३५५.४९ लाख इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे. झालेली बचत रु. ०.६० लाख अत्यंत अल्प असल्यामुळे क्षमापित करण्यांत यावी.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र. लेखापरिक्षा/ अेअेडब्ल्यू/ अशासकीय संदर्भ/ आर-१,३/२२१०,४२१०/२००९-१०/साआवि/युओआर-५७७/ओडब्ल्यू क्र. ११, दिनांक ११.४.१२ अन्वये तपासून देण्यांत आले आहे.

(रुपये लाखांत)

११.११ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**जादा खर्च (+) बचत (-)**
४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०१ नागरी आरोग्य सेवा ११० - रुग्णालये व दवाखाने ११० (०१) (०७) जीवनदायी योजना/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैद्यकीय मदत मूळ १८.०० पूरक १,८२.०० पुनर्विनियोजन (-) २,००.००	--	--	--

टीप -

(एक) खरेदीची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे आणि (दोन) वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या आधारे वर नमूद केलेल्या उपशीर्षाखाली मार्च २०१० मध्ये रु. १६९२.०२ लाख निधी परत करण्यांत आला.

ज्ञापन -

११.१२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, साहित्य व साधनसामुग्रीच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे उपलब्ध झालेला सर्व निधी मार्च २०१० मध्ये परत करण्यांत आला आहे.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र. लेखापरिक्षा/ अेअेडब्ल्यू/ अशासकीय संदर्भ/ आर १,३/ २२१०, ४२१०/२००९-१०/साआवि/युओआर-५७७/ओडब्ल्यू क्र. ११, दिनांक ११.४.१२ अन्वये तपासून देण्यांत आले आहे.

(रुपये लाखांत)

११.१३ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**जादा खर्च (+) बचत (-)**
४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०२ ग्रामीण आरोग्य सेवा १०१ (०१) (०३) साथरोगावरील नियंत्रण मूळ ६६.६७ पुनर्विनियोजन (-) ६६.६७	--	--	--

टिप :

(एक) या योजनेखाली यंत्रसामग्री खरेदी न केल्यामुळे आणि (दोन) वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या आधारे, मार्च २०१० मध्ये रु. ६६.६७ लाख निधी परत करण्यांत आला.

ज्ञापन :

११.१४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, सदर बाबीखाली रु. ६६.६७ लाख मंजूर असलेले मूळ मंजूर झालेले अनुदान खरेदीची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे निधी परत करण्यांत आला अनुदान निरंक त्यामुळे खर्च झालेला नाही.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र. लेखापरिक्षा/ अेअेडब्ल्यू/ अशासकीय संदर्भ/ आर १,३/ २२१०, ४२१०/२००९-१०/साआवि/युओआर-५७७/ओडब्ल्यू क्र. ११, दिनांक ११.४.१२ अन्वये तपासून देण्यांत आले आहे.

(रुपये लाखांत)

११.१५ शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिकआरोग्य यांवरील भांडवली खर्च ०२ ग्रामीण आरोग्य सेवा ८०० इतर खर्च ८०० (०१) (०२) आरोग्य प्रसिध्दी केंद्र (४२१० १२५३). मूळ १६.६७ पूरक ३३.३३ पुनर्विनियोजन (-) ५०.००	--	--	--

टिप :

प्रस्तावांना मंजूरी न मिळाल्यामुळे आणि तसेच वित्त विभागाने मंजुर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या आधारे मार्च २०१० मध्ये रु. ५० लाखांचा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :

११.१६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, प्रस्तावांना प्रशासकीय मंजूरी न मिळाल्याने मार्च २०१० मध्ये रु. ५० लाखांचा निधी परत करण्यात आला. त्यामुळे खर्च झालेला नाही.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र. लेखापरिक्षा/ अेअेडब्ल्यू/ अशासकीय संदर्भ/ आर १,३/ २२१०, ४२१०/२००९-१०/साआवि/युओआर-५७७/ओडब्ल्यू क्र. ११, दिनांक ११.४.१२ अन्वये तपासून देण्यांत आले आहे.

(रुपये लाखांत)

११.१७ शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च ८०० (०१) (०२) जीवनविषयक आकडेवारी केंद्राचे बळकटीकरण मूळ ५.०० पूरक ४५.०० पुनर्विनियोजन (-) १६.८६	३३.१४	३७.०८	(+) ३.९४

टिपा व भाष्ये :

प्रत्यक्ष खर्चानुसार आणि वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या आधारे मार्च २०१० मध्ये रु. १६.८६ लाख इतका निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :

११.१८ सन २००८-०९ मधील व्यपगत धनादेशांची सन २००९-१० मध्ये दुबार देयके कोषागारांत सादर करुन पारीत करण्यांत आली. त्यामुळे सन २००९-१० मध्येही सदर बाबींअंतर्गत सन २००८-०९ या देयकांची रक्कम महालेखापाल, मुंबई कार्यालयाकडे नोंदविली गेलेली आहे. त्यामुळे एकाच बाबींवर दोन आर्थिक वर्षात समान रक्कम महालेखापाल मुंबई कार्यालयात खर्ची पडलेली दिसून येते. याबाबतचे समायोजनाबाबत महालेखापाल, मुंबई कार्यालयास पाठपुरावा सुरु आहे. यास्तव सन २००९-१० या वर्षात प्रस्तूत बाबींवर रु. ३३.९४ लाख इतका खर्च झालेला असून २००८-०९ मधील दुबार नोंदीमुळे रु. ३.९४ लाख इतका जादा खर्च दिसून येत आहे.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र. लेखापरिक्षा/ अेअेडब्ल्यू/ अशासकीय संदर्भ/ आर १,३/ २२१०, ४२१०/२००९-१०/साआवि/युओआर-५७७/ओडब्ल्यू क्र. ११, दिनांक ११.४.१२ अन्वये तपासून देण्यांत आले आहे.

साक्ष -

११.१९ या संदर्भात दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांची व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली त्यावेळी राज्यातील एकूण जिल्हा रुग्णालये, रुग्णालयामध्ये असलेल्या बेड, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडीकल कर्मचाऱ्यांची पदे किती आहेत, यापैकी कार्यरत पदे किती आहेत यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, जिल्हा रुग्णालयांची संख्या २३ असून खाटांची संख्या ३२,३०७ आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या १८११ आहे. १०० खाटांच्या रुग्णालयांची संख्या २५ आहे. ५० खाटांच्या रुग्णालयांची संख्या ५६ असून ग्रामीण रुग्णालयांची ३० खाटांच्या रुग्णालयांची संख्या ३६२ आहे. ३८७ रुग्णालये मंजूर असून कार्यान्वित प्राथमिक रुग्णालयांची संख्या १८११ असून १०५८० सब सेंटर्स आहेत. बुलढाणा, अमरावती, पुणे व कोल्हापूर या ठिकाणी क्षय रुग्णालये असून ठाणे, पुणे, रत्नागिरी व नागपूर येथे मनोरुग्णालये आहेत.

११.२० वैद्यकीय अधिकाऱ्यांची अ,ब,क व ड वर्ग मिळून एकंदर पदांची संख्या ५२,०५६ असून "अ" व "ब" वर्गाची मंजूर पदे ८८४५ असून त्यापैकी ७,१०८ पदे भरण्यात आलेली असून १,७३७ पदे रिक्त आहेत. तज्ञ डॉक्टरांची मंजूर पदे ९७८ असून त्यापैकी १९८ पदे भरण्यात आलेली असून ७८० पदे रिक्त आहेत.

एकंदर ८० टक्के पदे भरण्यात आली असून २० टक्के पदे रिक्त आहेत. इतर राज्याच्या तुलनेपेक्षा महाराष्ट्र राज्यात रिक्त पदांची संख्या कमी आहे.

११.२१ करार पध्दतीने तज्ञ डॉक्टरांची मंजूर पदे भरली जातात नियुक्ती करतांना जो डॉक्टर गडचिरोलीचा असेल त्याला कोकणात किंवा धुळे, नंदूरबार येथे नियुक्त केले जाते व जो रत्नागिरीचा असेल त्याची गडचिरोलीला नियुक्ती केली जाते. त्यामुळे रुग्णालयासाठी डॉक्टर मिळत नाही. यासंदर्भात मंत्री महोदय सभागृहात आश्वासने देतात परंतु प्रत्यक्षात डॉक्टरांच्या जागा भरल्या जात नाहीत. म्हणून त्या त्या ठिकाणच्या डॉक्टरांना त्याच ठिकाणी का ठेवले जात नाही ? अशी विचारणा समितीने केली असता संचालक, आरोग्य सेवा यांनी सांगितले की, जिल्हा रुग्णालयामध्ये आतापर्यंत ५१० डॉक्टरांच्या करार पध्दतीनुसार नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. भरतीची प्रक्रिया वेळोवेळी पूर्ण करण्यात येते. विभागाकडे डॉक्टरांचे जे अर्ज येतात त्यांना त्यांच्या इच्छेनुसार जागा दिली जाते. विभागाकडे जे करार पध्दतीने तज्ञ डॉक्टर्स येतात त्यासंदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार एमडी, एमएस डॉक्टरांना जिल्हा रुग्णालयात द्यावे लागते व पदविकाधारक डॉक्टरांना जिल्हा उप रुग्णालय किंवा इतर ठिकाणी द्यावे लागते. विभागाने डॉक्टरांना त्यांच्या इच्छेनुसार जवळच्या ठिकाणी रूजू करुन घेतलेले आहे. महिला डॉक्टरांना मोठ्या शहरांमध्ये किंवा रस्त्यावरच्या दवाखान्यात रूजू केलेले आहे व पुरुष डॉक्टरांना आतील गावांमध्ये रुजू केलेले आहे. कोकण, नंदूरबार व गडचिरोली या ठिकाणांना प्राध्यान्यक्रम दिला जातो. मागच्या एक वर्षापासून म्हणजेच सन २०१२ पासून यासंदर्भात दर आठवड्याला आढावा घेण्यात येतो.

११.२२ पीपीपी प्रोजेक्टच्या संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, जागा निश्चित करुन विभागाने जागतिक निविदा काढली होती व त्यामध्ये जी कंपनी ओरिजनल इक्वीपमेंट मॅन्यूफॅक्चरर आहे त्याने या निविदेमध्ये भाग घ्यावयाचा होता. निविदेच्या माध्यमातून एजन्सी नेमण्यात आल्या होत्या. यामध्ये राज्य शासन काहीही खर्च करणार नाही. एजन्सीनेच यामध्ये सर्व सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. या कंपन्या त्यांच्या खर्चाने शासकीय रुग्णालयात सिटी स्कॅन, एमआरआय, अल्ट्रासाऊंड, एक्सरे या सुविधा उपलब्ध करुन देणार आहेत. काही रुग्णांना सवलतीच्या दराने, काही रुग्णांना मोफत तर काही रुग्णांना खाजगी दराने या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

११.२३ याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, या सुविधांचे दर कोण निश्चित करणार आहे? सिव्हिल हॉस्पिटलमध्ये गरीब रुग्ण उपचारासाठी येत असतात. जर या सुविधा खाजगी सहभागाने उपलब्ध करुन देण्यात येणार असतील तर गरीब रुग्णांना त्यांचे दर परवडतील का ? सरकार या योजनेसाठी सबसिडी देणार आहे का ? हा सर्व खर्च या कंपन्या रुग्णांकडून वसूल करणार आहेत का ? कारण, आज

परिस्थिती अशी आहे की, शासकीय रुग्णालयांमध्ये अद्ययावत यंत्रसामुग्री उपलब्ध नाही. पण त्याच शहरातील खाजगी रुग्णालयांमध्ये औषधोपचार घेणे परवडत नसल्यामुळे ते शासकीय रुग्णालयांमध्ये येतात. आता जर शासन खाजगी कंपन्यांच्या सहभागातून शासकीय रुग्णालयांमध्ये या सुविधा पुरविणार असेल आणि या सुविधांचे दर खाजगी रुग्णालयांप्रमाणे ठेवण्यात येणार असतील तर सामान्य माणसाला कोणताही पर्याय शिल्लक राहणार नाही. त्यामुळे या सर्व सुविधांचे दर सामान्य माणसाला परवडतील अशा पध्दतीने ठेवण्याबाबत विभागाने काही नियोजन केले आहे का ? याबाबत माहिती देताना संचालक, आरोग्य सेवा यांनी समितीस सांगितले की, शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांना आकारावयाच्या दराबाबत आरोग्य विभागाचा शासन निर्णय आहे. त्यामध्ये एकूण १९ कॅटेगरी आहेत. विधिमंडळाचे सन्माननीय सदस्य, शासकीय अधिकारी, कर्मचारी, बीपीएल कार्डधारक, स्वातंत्र्य सैनिक व शासन निर्णयात नमूद या वर्गातील अन्य गटांना मोफत उपचार देण्यात येतात. या सुविधांसाठी देखील या वर्गातील रुग्णांकडून फी घेतली जाणार नाही. त्यांना या सुविधा मोफत दिल्या जातील. दुसऱ्या वर्गामध्ये जे रुग्ण शासकीय रुग्णालयांमध्ये आंतररुग्ण किंवा बाह्यरुग्ण म्हणून उपचार घेण्यासाठी आले असतील व ज्यांच्याकडे दारिद्र रेषेखाली असल्याबाबतचे कार्ड नाही पण जे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे लाभार्थी आहेत. त्यांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतून जे पैसे दिले जातात. त्यामधूनच या सुविधांचा खर्च घेतला जाणार आहे. त्यांना वैयक्तिकरित्या या सुविधांवर खर्च करावा लागणार नाही. तिसऱ्या वर्गामध्ये जे रुग्ण शासकीय रुग्णालयांमध्ये आंतररुग्ण म्हणून उपचार घेत असतील व जे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे लाभार्थी नसतील त्या रूग्णांकडून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सबसिडी रेटप्रमाणे आकारणी केली जाईल. साधारणपणे आज सबसिडीमधून एक्सरेचा दर ५० रुपये आणि सिटी स्कॅनचा दर ५०० रुपये आहे. तोच दर त्यांना द्यावा लागेल. चौथा वर्ग श्रीमंत गटाचा आहे. अशा रुग्णांना आकारावयाचा दर एजन्सी स्वतः ठरवील. या वर्गासाठीचे दर ठरविण्याचे अधिकार एजन्सीला दिलेले आहेत. शासकीय रुग्णालयामध्ये ५ रुपयाचा केस पेपर काढलेल्या रुग्णाला सबसिडी रेटने सुविधा मिळेल.

११.२४ खाजगी कंपन्यांच्या सहभागातून या सुविधा पुरविण्याची योजना शासनाने २/३ वर्षापूर्वीच सुरु केली आहे का आणि ज्या एजन्सीची नेमणूक करण्यात आलेली आहे, त्यांनी फायदेशीर ठरेल, अशाच शहरात ही सुविधा देऊ केली आहे का ? याबाबत माहिती देताना संचालक, आरोग्य सेवा यांनी समितीस सांगितले की, खाजगी सहभागातून या सर्व सुविधा शासकीय रुग्णालयांमध्ये पुरविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासाठी संपूर्ण राज्याचे तीन भाग (क्लस्टर) तयार करण्यात आले आहेत. त्यापैकी मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या क्लस्टरमध्ये काम सुरु झाले आहे. या सर्व सुविधा पुरविण्यासाठी हायपॉवर इलेक्ट्रिसिटी लागते.

२२ रुग्णालयांमध्ये हायपॉवर इलेक्ट्रिसिटी घेण्याचे काम सुरु झाले आहे. ज्या ज्या ठिकाणी इलेक्ट्रिसिटीचे काम पूर्ण होईल, त्या त्या ठिकाणी यंत्र येतील व प्रत्यक्षात सुविधा देण्याचे काम सुरु होईल. विभागाने इलेक्ट्रिसिटीसाठी साधारणपणे ८.४० कोटी रूपये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे जमा केली असून यास ६ महिन्याचा कालावधी झाला आहे त्यामुळे ज्या ठिकाणी इलेक्ट्रिसिटीचे काम पूर्ण झाले आहे त्या ठिकाणी सुविधा उपलब्ध झाली आहे. सन २०१२ च्या हिवाळी अधिवेशन कालावधीत रुग्णालयात नेमणूक करावयाच्या एजन्सी निश्चित करण्यात आल्या होत्या व त्याच वेळी यासंदर्भातील प्रक्रिया सुरु झाली होती व डिसेंबर, २०१२ मध्ये एजन्सीबरोबर एमओयु करण्यात आला आहे.

११.२५ आरोग्य विभागाने डॉक्टरांचे वर्ग-अ व वर्ग-ब असे दोन गट केले आहेत. साधारणपणे असे लक्षात येते की, अनेक जिल्ह्यात डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. गडचिरोली व चंद्रपूर हे जिल्हे नक्षलग्रस्त व आदिवासीबहुल जिल्हे आहेत. त्या भागात मात्र बीएएमएस डॉक्टरांची नियुक्ती केली आहे. हे डॉक्टर त्या भागात गेल्या ७/८ वर्षापासून कार्यरत आहेत. एमबीबीएस डॉक्टर उपलब्ध होत नाहीत म्हणून शासनाने बीएएमएस डॉक्टरांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, गेल्या ८ वर्षापासून एमबीबीएस डॉक्टरांची नियुक्ती या भागात करण्यात आलेली नाही. गेल्या ७/८ वर्षापासून या विभागात सेवा देणाऱ्या बीएएमएस डॉक्टरांना नियमित केले गेलेले नाही व त्यामुळे ते आजही असुरक्षित आहेत. कालपरवा एका बीएएमएस डॉक्टरचा मृत्यू झाला. परंतु, त्यांच्या वारसास शासनाकडून एक रुपयाचाही फायदा मिळालेला नाही. सद्यस्थितीत दुर्गम, आदिवासी, नक्षलग्रस्त भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे या डॉक्टरांच्या भरवशावर चालवितो आहोत. परंतु, त्यांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत मात्र आपण उदासिन आहोत. त्यांना नियमित करण्याच्या दृष्टीकोनातून, सुरक्षा प्रदान करण्याच्या दृष्टीकोनातून आपण कोणताही निर्णय घेत नाही. तथापि समितीच्या बैठकीत विभागीय अधिकारी अशी माहिती देत आहेत की, एकूण पदांपैकी फक्त २० टक्के पदे रिक्त आहेत. परंतु, वस्तूस्थिती अशी आहे की, विदर्भातील ११ जिल्ह्यात साधारणपणे ३२ टक्के पदे रिक्त आहेत याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, गेल्या ७/८ वर्षापासून कार्यरत असलेल्या बीएएमएस डॉक्टरांना नियमित करण्याबाबत शासन स्तरावर काही कार्यवाही सुरु आहे का, याबाबतचा निर्णय घेतला जाणार आहे का व तो कधी घेतला जाणार आहे आणि रिक्त पदांच्या आकडेवारीमधील तफावतीबाबत सद्यस्थिती काय आहे याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागावर व जिल्ह्यावर सविस्तर माहिती विभागाकडे उपलब्ध आहे. आवश्यकता असेल तर ही माहिती समितीला सादर करीन. तसेच विदर्भातील डॉक्टरांच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केला आहे, तो बरोबर आहे. गडचिरोली व चंद्रपूर हे जिल्हे नक्षलग्रस्त आहेत. या जिल्ह्यातील एकूण पदांपैकी ८० टक्के जागा रेग्युलर, करार पध्दतीने नियुक्त केलेल्या डॉक्टरांच्या माध्यमातून भरण्यात आल्या आहेत. त्या भागातील डॉक्टरांची पदे भरण्याबाबत आरोग्य विभागाने

विशेष मोहिम राबविली आहे. शक्यतो करार पध्दतीने डॉक्टरांची नियुक्ती करीत असताना याच जिल्ह्यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

११.२६ विभागाकडून करार पध्दतीने डॉक्टरांची नियुक्ती एक वर्षासाठी करण्यात येते. मात्र, एक वर्षासाठी नियुक्ती असल्यामुळे या माध्यमातून आलेले बहुतांश डॉक्टर गैरहजर असतात, ते आपले कर्तव्य योग्य पध्दतीने बजावीत नाहीत. त्याच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किंवा अन्य शासकीय रुग्णालयांमध्ये बीएएमएस डॉक्टरची नियुक्तीही केलेली असते व त्यांच्याच भरवशावर ही रुग्णालये चालत असतात. त्यामुळे करार पध्दतीने नियुक्त केलेल्या डॉक्टरांच्या माध्यमातून ८० टक्के पदे भरण्यात आलेली आहेत, असे जरी असले तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात ३८ बीएएमएस डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात ८३८ बीएएमएस डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील बहुतांश प्राथमिक आरोग्य केंद्रे याच डॉक्टरांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. मात्र, या सर्व डॉक्टरांना आपण वाऱ्यावर सोडले आहे. ही वस्तुस्थिती समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता संचालक, आरोग्य सेवा यांनी समितीस सांगितले की, मेडिकल ऑफिसर या संवर्गात गट-अ आणि गट-ब असे दोन प्रकार आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रामधील एकूण पदांपैकी ७५ टक्के पदे एमबीबीएस डॉक्टरांमधून आणि २५ टक्के पदे बीएएमएस डॉक्टरांमधून भरण्यात यावीत. असा शासन निर्णय आहे. बीएएमएस यांच्यासाठी असलेली २५ टक्के पदे पूर्णपणे भरण्यात आली आहेत. त्यामुळे शासनाने असा निर्णय घेतला की, ही पदे रिक्त न ठेवता ती देखील बीएएमएस डॉक्टरांमधून भरावीत. त्यानुसार या डॉक्टरांना नियुक्ती देण्यात आली आहे. आता दोन वर्षापूर्वी ही पध्दत बंद करण्यात आली आहे. जे बीएएमएस डॉक्टर सन २००७ पर्यंत कार्यरत होते. त्यांच्या सेवा शासनाने नियमित केल्या आहेत. त्यानंतर सेवेत आलेल्या एमबीबीएस किंवा बीएएमएस डॉक्टरांना अद्याप शासनाने नियमित केलेले नाही. तसेच समितीने उपस्थित केलेल्या बीएएमएस डॉक्टरांचा प्रश्न हा जिल्हा परिषदेमार्फत वर्ग-३ मध्ये नियुक्ती केलेल्या डॉक्टरांचा आहे. त्यांना नियमित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतच्या नस्त्यांवर सकारात्मक कार्यवाही केली आहे. आता ही नस्ती शेवटच्या टप्प्यात आहे. यावर समितीने सूचित केले की, करार पध्दतीने अन्य १२०० डॉक्टरांची नियुक्ती केलेली आहे. त्यांचा समावेश यामध्ये करु नये, परंतु जे बीएएमएस डॉक्टर गेल्या ७/८ वर्षापासून सेवा देत आहेत. त्यांना नियमित करण्याबाबत शासनाने प्राधान्याने विचार केला पाहिजे. तसेच याबाबतची सविस्तर माहिती समितीस सादर करावी असेही निदेश समितीने विभागास दिले.

११.२७ राजीव गांधी जीवनदायी योजना राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये सुरु करण्यात येणार आहे काय, याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यात राजीव गांधी जीवनदायी

योजना राज्यातील ८ जिल्हयात सुरु करण्यात आली आहे. पुढील महिन्यांपासून ती उर्वरित जिल्हयात सुरु होईल. राज्य शासनाने पहिल्या टप्प्यात या योजनेवर १८० कोटी रुपये खर्च केले आहेत. यापैकी ३३ टक्के रक्कम शासकीय रुग्णालयाद्वारे खर्च होत आहे.

११.२८ तथापि ज्या ठिकाणी रुग्णाना अन्य रुग्णालयांचा पर्याय नाही. तेथील रुग्ण शासकीय रुग्णालयामध्ये जात आहेत. पुणे व अन्य शहरात मात्र अशी परिस्थिती नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पहिल्या टप्प्यात पुणे जिल्हयाचा समावेश नव्हता. परंतु ज्या जिल्हयाचा पहिल्या टप्प्यात समावेश होता. त्या जिल्हयांची आकडेवारी खूप चांगली आहे. सोलापूर, पंढरपूर येथे शासकीय रुग्णालयाचा जास्तीत जास्त वापर करण्यात आला आहे. नाशिक हा जिल्हा पहिल्या टप्प्यात नव्हता. तथापि, तेथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये अनेक रुग्णांनी उपचार घेतले आहेत. अमरावतीमध्ये सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये साधारणपणे ३०० ते ४०० रुग्णावर शस्त्रक्रिया झाली आहे.

११.२९ केंद्र शासनाने व राज्य शासनाने आरोग्यासंबंधी विविध योजना सुरु केल्या आहेत. धर्मादाय रुग्णालयांनी १० टक्के रुग्णावर मोफत उपचार करावेत. असा नियम आहे. तथापि, राज्यात अनेक धर्मादाय रुग्णालये हा नियम पाळत नाहीत. यासंदर्भात शासनाने एक राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समिती नियुक्त केली आहे. तथापि या समितीच्या बैठकाच होत नसल्यामुळे समितीचे कामकाज होत नाही. अनेक रुग्णालयामध्ये या माध्यमातून बोगस काम केले जात आहे. केवळ कागदावर रुग्ण दाखविले जात आहेत. व १० टक्के गरीब रुग्णांवर मोफत उपचार केल्याचे भासविले जात आहे. प्रत्यक्षात गरीब रुग्णांना कोणतीही सवलत दिली जात नाही. खोटी कागदपत्रे तयार करुन ही रुग्णालये शासनाची फसवणूक करीत आहेत व आर्थिक नुकसान करीत आहेत. या समितीच्या मताशी विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व याबाबत खुलासा केला की, धर्मादाय संस्थाकडून १० टक्के गरीब रुग्णांवर उपचार व्हावेत, या दृष्टीने एक प्रस्ताव सादर केला होता. सर्व धर्मादाय रुग्णालयांमध्ये नेटवर्क सुरु करुन त्या रुग्णालयामध्ये येणारे एकूण रुग्ण व १० टक्के गरीब रुग्णांवर केलेले उपचार यावर नियंत्रण ठेवण्याबाबत हा प्रस्ताव होता. तथापि, धर्मादाय रुग्णांलयाकडून या प्रस्तावाच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी निर्माण केल्या जात आहेत. त्यांची संघटना या प्रस्तावाविरुध्द न्यायालयात गेली आहे विविध मार्गाने नियंत्रण ठेवले जाऊ नये, अशी भूमिका ही रुग्णालये घेत आहेत. आरोग्य विभागाने पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर या विभागांमधील सर्व धर्मादाय रुग्णालयांची पहाणी गेल्या ४ महिन्याच्या कालावधीत केली आहे. यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली आहे. धर्मादाय आयुक्त या समितीचे अध्यक्ष आहेत. आरोग्य संचालनालयातील उपसंचालक, संबंधित महानगरपालिकेचे अधिकारी व विक्रीकर विभागाचे अधिकारी या समितीचे सदस्य आहेत. समितीने पाहणी केल्यानंतर असे लक्षात आले की, आता दस्तऐवज तयार करण्यामध्ये

प्रगती झाली आहे. या रुग्णालयांनी आता वेगळे अकाऊंट मेंटेन केले आहे. १० टक्के दारिद्रय रेषेखाली आणि १० टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या रुग्णांना मोफत उपचार देण्याच्या कामात आता प्रगती होत आहे. या समितीची दर महिन्याला एकदा बैठक होत असते, पुणे जिल्हयातही अशी समिती कार्यरत आहे

११.३० राज्य शासनाने पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर येथील धर्मादाय रुग्णालयांच्या कामकाजासंदर्भात सर्वप्रथम विधानसभेत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. व त्या अनुषंगाने विधिमंडळाची एक समिती गठीत करण्यात आली होती. धर्मादाय रुग्णालये वारंवार कायद्याच्या अडचणी उभ्या करीत आहेत. वास्तविक पाहता या रुग्णालयांना गरीब रुग्णावर उपचारच करावयाचे नाहीत. त्यामुळे ते खोटे दस्तऐवज तयार करतात. या रुग्णांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाकडे सक्षम यंत्रणा नाही. त्यामुळे बनावट दस्तऐवज तयार करणे, माहिती उपलब्ध न करणे, असे प्रकार घडत आहेत. या समितीवर लोकप्रतिनिधींची नेमणूक करण्यात आली नाही? कारण लोकप्रतिनिधीकडे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्ण शासकीय योजनेतून वैद्यकीय उपचार मिळावेत म्हणून येत असतात. सरकारी अधिकाऱ्यांकडे असे लोक येत नाहीत. म्हणजेच ज्या व्यक्ती काम करणाऱ्या नाहीत. अशांना शासनाने समितीवर घेतले आहे. अशा व्यक्तींचा या समितीवर घेऊन उपयोग काय आहे. या समितीची रचनाच मुळात चुकीची केलेली आहे. काही धर्मादाय रुग्णालये रुग्ण तपासणीसाठी शिबीरे भरवितात. त्या ठिकाणी जे रुग्ण येतात, त्यांची नावे धर्मादाय रुग्णालयांच्या रजिस्टरमध्ये नोंदविली जातात. ही धर्मादाय रुग्णालये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णाना शासकीय योजनेचा लाभ दिला असे दाखवून रजिस्टर भरतात. प्रत्यक्षात हे रुग्ण आरोग्य तपासणीच्या शिबीरामध्ये आलेले असतात. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांचे ही रुग्णालये वेगळया प्रकारच्या सवलती घेतात. अशा प्रकारच्या लबाडया या धर्मादाय रुग्णालयांकडून केल्या जात आहेत. या रुग्णालयांमध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णासाठी १० टक्के खाटा आरक्षित ठेवण्याबाबतची नियमात तरतूद केलेली आहे. परंतु शासनाच्या नियमांचे पालन सदर रुग्णालयांकडून केले जात नाही. रुग्णालयात काम करणारे कर्मचारी तसेच त्यांचे नातेवाईक यांना लाभ देण्यात येतो. या घटकातील गरीब रुग्ण उपचार करुन घेण्यासाठी जसलोक रुग्णालय, ब्रीचकँन्डी रुग्णालय, बॉम्बे रुग्णालय या ठिकाणी जात नाहीत. या रुग्णालयात काम करणारे कर्मचारी तसेच त्यांच्या नातेवाईकांना सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. परंतु आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना मात्र या सुविधापासून वंचित ठेवले जाते. ही धर्मादाय रुग्णालये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांमुळे भरलेली आहेत अशी परिस्थिती नाही. श्रीमंत कुटूंबातील रुग्णांनी ही रुग्णालये भरलेली आहेत. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना शासनाच्या कोणत्याही प्रकारच्या योजनेचा लाभ दिला जात नाही ही फार दु:खाची गोष्ट आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना लाभ देण्यात येतो आहे किंवा नाही हे पाहण्याचे काम धर्मादाय

आयुक्त कार्यालयाचे आहे. परंतु धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून सदर कामे ही ठप्प झालेली आहेत. ही कामे करण्यासाठी धर्मादाय रुग्णालयांमध्ये एक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. परंतु या घटकातील रुग्ण रुग्णालयांमध्ये जातो त्यावेळी त्या कर्मचाऱ्याचा पत्ताच नसतो. त्या कर्मचाऱ्याशी रुग्णालयातील अधिकारी संगनमत करतात. या धर्मादाय रुग्णालयांकडून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना एक टक्का देखील शासनाच्या योजनांचा फायदा मिळत नाही. ही वस्तूस्थिती आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना न्याय देण्याच्या संदर्भात कधी सुधारणा होणार आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता धर्मादाय रुग्णालयांमधून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना उपचार दिले गेले पाहिजेत असा खरा उद्देश आहे. तो. उद्देश साध्य होतो आहे किंवा नाही. याबाबतीत गेल्या सहा महिन्यात धर्मादाय रुग्णालयांच्या तपासण्या केल्या जात आहेत. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना लाभ देण्यात येतो आहे किंवा नाही याबाबतीत गेल्या सहा महिन्यापासून पाठपुरावा करण्यात येत आहे. या धर्मादाय रुग्णालयांमध्ये बरीच सुधारणा झालेली दिसून आलेली आहे. ज्या रुग्णालयांची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे आहे. याबाबतचा आढावा आयुक्तांनी घेणे आवश्यक आहे. गेल्या सहा महिन्यापासून याबाबतचा आढावा घेत असून त्यांसंबंधी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. असे विभागाकडून सांगण्यात आले.

११.३१ यांसदर्भात सात ते आठ सचिवांची एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये धर्मादाय आयुक्त सुध्दा असावेत कारण हा विषय यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. वल्लभ बेनके हे अंदाज समितीचे समिती प्रमुख होते. त्यावेळी अंदाज समितीच्या बैठकीत चर्चेला आला होता. त्यावेळी अंदाज समितीसमोर गेल्या दहा ते बारा वर्षामध्ये या सचिवांनी एकही बैठक घेतली नाही अशी माहिती समोर आली होती. याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, सचिवांच्या समितीने तीन महिन्यात एकदा तरी बैठक घ्यावी अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. या समितीत नगरविकास विभाग, आरोग्य विभाग, महसूल विभाग व अन्य संबंधित विभागांच्या सचिवांची धर्मादाय आयुक्तासह बैठका घेण्यात आल्या आहेत काय, बैठका घेण्यात आल्या असतील तर त्याचे अहवाल काय आहेत यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मुख्य सचिवांनी या विषयाच्या बाबतीत संबंधित सचिवाबरोबर एका वर्षात पाच ते सहा बैठका घेतलेल्या आहेत. या बैठकीमध्ये वेळोवेळी आढावा घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच या संदर्भात कार्यवाही होत आहे किवा नाही यासंबंध आढावा घेण्याचे अधिकार धर्मादाय आयुक्तांना आहेत. आरोग्य खात्याला ते अधिकार नाहीत.

११.३२ कायद्यानुसार सदरहू धर्मादाय रुग्णालयात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळतो आहे किंवा नाही यासंबंधी आढावा घेण्याचे अधिकार धर्मादाय आयुक्तांना आहेत. परंतु धर्मादाय रुग्णालये कायद्याचा आधार घेऊन शासनाला योग्य ती माहिती देत नाही. त्यामुळे

शासनाकडूनही धर्मादाय रुग्णालयावर कारवाई करणे गरजेचे आहे. उदा-नगरविकास विभाग या धर्मादाय रुग्णालयांचे पाणी बंद करुन शकते. अशाप्रकारे अनेक गोष्टीत सरकार धर्मादाय रुग्णालयाच्या व्यवस्थापनास अडवू शकते. मग अशा प्रकारची कारवाई शासनास करता येत नाही का ? कारण धर्मादाय आयुक्तांकडून सदरहू रुग्णालयांच्या कामकाजाचा आढावा घेण्याचे काम अतिशय मंद गतीने होत आहे. धर्मादाय आयुक्त या कामी पुढाकार घेत नाहीत. या धर्मादाय रुग्णालयांच्या परवानग्या तसेच नुतनीकरणाच्या परवानग्या देण्याचे काम शासनाच्या अखत्यारीत येते. तथापि विभाग ही जबाबदारी धर्मादाय आयुक्तांवर टाकते आणि विभाग देखील काही करीत नाही. अशी परिस्थिती आहे त्यामुळे आरोग्य विभागाकडून या बाबतीत काही तरी ठोस निर्णय घेतला गेला पाहिजे असे समितीने विभागास सूचित केले असता समितीच्या सूचनेशी विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली याबाबत समितीला अवगत केले की, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळावा यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रत्येक धर्मादाय रुग्णालयांमध्ये आरोग्य मित्रांची नेमणूक केलेली आहे. परंतु त्या विरोधात काही धर्मादाय रुग्णालयाचे व्यवस्थापन कोर्टात गेलेले आहेत. काही धर्मादाय रुग्णालयांना धर्मादाय आयुक्तांनी नोटीसा पाठविल्या आहेत. या विषयाच्या बाबतीत रुग्णालयांमध्ये थोडीशी सुधारणा झालेली आहे. धर्मादाय आयुक्तांनी काही धर्मादाय रुग्णालयांना पत्र पाठविले होते. त्यांच्या पत्राना संबंधित रुग्णालयाकडून उत्तरे आलेली आहेत. त्यानुसार रुग्णालयांमध्ये काही प्रमाणात प्रगती झालेली आहे.

११.३३ या अनुषंगाने समितीने आणखी एका बाबीकडे विभागाचे लक्ष वेधले की, सन्माननीय सदस्यांची वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके ही विधिमंडळाच्या उच्चाधिकार समितीकडे छाननीसाठी येतात. सन्माननीय सदस्यांनी कोणत्या रुग्णालयांमध्ये उपचार घ्यावेत यासंबंधी शासनाने रुग्णालये ठरवून दिलेली आहेत. सन्माननीय सदस्य ज्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय उपचार घेतात, ती रुग्णालये उपचाराच्या देयकांत अधिभार आकारणी करतात. हा अधिभार रुग्णालयातील गरीब रुग्णांवर उपचार करण्यासाठी लावला जातो. अशा प्रकारचा अधिभार लावणे योग्य आहे काय याबाबतीत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, रुग्णालयास प्राप्त होणाऱ्या एकूण उत्पन्नातून २ टक्के एवढी रक्कम आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांच्या उपचारासाठी खर्च करावी असे अपेक्षित आहे. म्हणून हा अधिभार लावण्यात येतो.

११.३४ या विषयाच्या बाबतीत विधानसभेत समिती गठीत करण्याची घोषणा झाली व त्या घोषणेनुसार तत्कालीन राज्यमंत्री विधी व न्याय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत झाली होती व या समितीवर १८ सदस्यांची नियुक्तीदेखील झाली होती. त्या समितीला धर्मादाय रुग्णालये तपासणीचे अधिकारही देण्यात आले होते. परंतु गेल्या काही वर्षात या समितीची बैठकच झालेली नाही. या समितीने धर्मादाय रुग्णालयांची तपासणी केली नाही. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना शासनाच्या योजनेचा लाभ देण्यात येतो आहे

काय याबाबतचा आढावा समितीने घेतलेला दिसून येत नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली. परंतु याबाबतीत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

११.३५ धर्मादाय रुग्णालयास परवानगी महानगरपालिका देते व महानगरपालिकांचा कारभार हा नगरविकास विभागाकडे आहे. आरोग्य विभागाचा कारभार हा स्वतंत्र आहे आणि धर्मादाय आयुक्त कार्यालयाचा कारभार हा विधी व न्याय विभागाकडे आहे. धर्मादाय रुग्णालयाचा कारभार चार-पाच विभाग एकत्र आल्यामुळे ज्या ज्या वेळी ज्या विभागाचा मुद्दा उपस्थित होतो. त्या वेळी संबंधित विभाग त्यांच्या विभागाची माहिती देतो. धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या कारभाराबाबतीत नगरविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, विधी व न्याय विभाग स्वतंत्रपणे काहीही बोलू शकत नाही. चार-पाच विभाग एकत्र आल्यामुळे हा गोंधळ सुरु आहे. त्यामुळे उक्त विभाग तसेच जिल्हयातील एकत्रितरित्या माहिती जाणून घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात कार्यक्रम ठरविला पाहिजे, असे समितीने विभागास सूचित केले.

११.३६ ज्या ठिकाणी धर्मादाय रुग्णालये आहेत त्यांचेकडून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णावर मोठया प्रमाणात अन्याय होत आहे. मुंबई, पुणे औरंगाबाद, नागपूर, नांदेड या शहरात मोठी रुग्णालये आहेत. या रुग्णालयात ग्रामीण भागातील रुग्ण उपचार घेण्यासाठी या शहरांमध्ये येतात. ते रुग्ण शहराच्या ठिकाणी आल्यानंतर लोकप्रतिनिधींकडे मदत मागण्यासाठी येतात. त्यावेळी रुग्णालयांच्या व्यवस्थापनाकडून योग्य तो प्रतिसाद लोकप्रतिनिधींना मिळत नाही. त्यामुळे इच्छा असूनही लोकप्रतिनिधींना रुग्णांना मदत करता येत नाही. तसेच शासनाच्या कोणत्याही योजना त्यांना लागू होत नाहीत. अशा प्रकारची पत्रे धर्मादाय रुग्णालयांनी लोकप्रतिनिधींना पाठविलेली आहेत. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाचे मुख्य या नात्याने आरोग्य विभागाच्या सचिवांना सर्व जिल्हयाचे अहवाल मागवून घ्यावेत व ते अहवाल समितीस सादर करावे असे निदेश समितीने दिले.

११.३७ समितीने पुढे अशी विचारणा केली की, काही हजारो कोटी रुपये खर्च करुन ॲब्युलन्स खरेदी केल्या जाणार आहेत. त्या ॲब्युलन्सचा वापर कशा पध्दतीने केला जाणार आहे यावर संचालक आरोग्य सेवा यांनी समितीस खुलासा केला की, राज्याकडे महाराष्ट्र इमर्जन्सी व्हेईकल सर्व्हीस सेंटर सुरु केलेले आहे. याबाबतीत केंद्र शासन टप्प्याटप्याने देणार आहे. ९३७ ॲब्युलन्स आहेत. या दोन प्रकारच्या ॲब्यूलन्स आहेत. यातील ७०४ ॲब्यूलन्स बेसीक सर्व्हीसच्या आहेत आणि २३३ ॲब्यूलन्स हया ॲडव्हान्स लाईफ सपोर्टच्या आहेत. या ॲब्यूलन्समध्ये हार्ट पेशंटसाठी आधुनिक उपकरणे बसविण्यात आलेली आहेत. या सर्व ॲब्यूलन्सना जी.पी.एस आणि जी.पी.आर.एस.सिस्टीम लावलेली असेल. प्रत्येक ॲब्यूलन्समध्ये एक डॉक्टर आणि एक चालक असलील. या ॲब्यूलन्समध्ये कार्यरत असलेले डॉक्टर व चालक हे प्रशिक्षित असतील. पुणे

येथील औंध येथे एक इर्मजन्सी रिस्पॉन्स सेंटर्स राहील औंध येथील रुग्णालयातील तिसरा माळा पुर्णपणे या कामासाठी दिलेला आहे. त्या ठिकाणी इमर्जन्सी रिस्पॉन्स सेंटर तयार करणार आहोत. त्या सेंटरमध्ये इमर्जन्सीसाठी स्पेशल सॉफ्टवेअर बसविण्याची प्रोसिजर चालू झालेली आहे. येत्या आठ दिवसात सॉफ्टवेअर बसविण्याचे काम पूर्ण होईल. त्या ठिकाणी सगळे ऑपरेटर्स ठेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. सर्व दूरध्वनी, सगळे मोबाईल्स यांचे स्वीचेस त्या ठिकाणी उपलब्ध असतील. १०८ नंबरवर कॉल केला तर तो कॉल कोठून आला हे सॉफ्टवेअरवर कळेल. त्या सेंटर जवळ जी ॲब्यूलन्स असेल ती सॉफ्टवेअरवर दिसेल. त्या ॲब्यूलन्स मधील चालकास सांगितले जाईल की, अशी घटना घडलेली आहे. त्या ठिकाणी ताबडतोब ॲब्यूलन्स घेऊन जावी. त्या सूचनेप्रमाणे ती ॲब्यूलन्स घटना स्थळी जाईल. जर आग लागण्याचा प्रकार झाला असेल तर फायदर ब्रिगेडला ताबडतोब कळविले जाईल. अपघात झाला असेल तर पोलिसांना त्या बाबतची लागलीच माहिती दिली जाईल. त्या सेंटरच्या ठिकाणी पोलिसांसाठी दोन खुर्च्या उपलब्ध असतील व एक खुर्ची फायर बिग्रेडच्या कर्मचाऱ्यासाठी असेल. सर्व गोष्टींबाबत समन्वयाचे काम तेथे केले जाणार आहे.

११.३८ पण एखादा इमर्जन्सी पेशंट असेल तर त्याला उपचारासाठी कोणत्या रुग्णालयात दाखल केले जाईल? एखादा गरीब पेशंट असेल तर त्याच्यावरील उपचाराचा खर्च कोण करील? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता याबाबत सांगण्यात आले की, यासाठी बी.व्ही.जी. संस्था नेमलेली आहे. ती संस्था प्रत्येक विभागानुसार आणि गावाप्रमाणे मॅपींग करीत आहे. बाळंतपणासाठी जवळचे रुग्णालय कोणते आहे, सिझेरिअन असेल तर त्यासाठी जवळचे रुग्णालय कोणते, रक्त हवे असेल तर जवळचे रुग्णालय कोणते आहे या बाबतचे मॅपींग सदर संस्था करीत आहे. एखादे इमर्जन्सी पेशंटची केस असेल. घटनेच्या ठिकाणी शासकीय रुग्णालयात इमर्जन्सी पेशंटची केस असेल, राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी ज्या रुग्णालयाचे नाव यादीत असेल, त्या रुग्णालयात इर्मजन्सी पेशंटची केस असेल. राजीव गांधी जीवनदायी योजनेमधून ९० टक्के रुग्ण कव्हरेज होणार आहेत. १० टक्के रुग्ण कव्हरेज होणार नाहीत, त्यांच्यासाठी आमचा असा प्रयत्न आहे की, पेशंट स्टॅबीलाईज होईपर्यंत खाजगी रुग्णालयामध्ये राहील. हे पेशंट ए.पी.एल. खालील असतील. म्हणून त्या पेशंटला चॉईस देण्यात येईल, त्याला त्या खाजगी रुग्णालयात रहावयाचे असेल तर तो तेथे राहील अथवा त्यास शासकीय रुग्णालयात रहावयाचे असेल तर त्यास शासकीय रुग्णालयाकडे वर्ग केले जाईल. खाजगी रुग्णालयात रहावयाचे असेल तर त्याने त्याचे देयक अदा करणे आवश्यक आहे. जर त्याची परिस्थिती देयक अदा करण्याची नसेल तर त्यास शासकीय रुग्णालयात पाठविले जाईल. दारिद्र रेषेवरील पेशंट असला तरी त्याला राजीव गांधी जीवनदायी योजनेतील रुग्णालयामध्ये उपचार केले जातील. त्याची

परिस्थिती देयक अदा करण्याची नसेल तर त्याला राजीव गांधी जीवनदायी योजनेतील रुग्णालयामध्ये उपचार केले जातील. त्याला खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावयाचे असतील तर त्यास पैसे भरावेत लागतील.

११.३९ जीवनदायी योजनेतून दीड लाख मर्यादा आपण ठरवून दिलेली आहे. परंतू इमर्जन्सी पेशंटचा उपचारावरील खर्च दीड लाखापेक्षा जास्त झाला तर अशा वेळी रुग्णाचे देयक कोण भरणार? यावर राजीव गांधी जीवनदायी योजनेची रक्कम ठरलेली असते. त्याचे देयक जास्त येणार नाही. असे विभागीय प्रतिनिधींकडून सांगण्यात आले.

११.४० समजा जळगाव येथे एखादा अपघात घडला व त्यात एखाद्या इमर्जन्सी रुग्णाला मुंबई येथे उपचारासाठी आणावे लागते. अशा प्रसंगी तुमची अँब्यूलन्स इमर्जन्सी पेशंटला मुंबई येथे आणेल काय, त्या रुग्णाला मुंबई येथे आणण्याचा खर्च कोण करील ? अशी विचारणा समितीने केली असता संचालक, आरोग्य सेवा यांनी समितीस की, ९३७ अँब्यूलन्स आहेत आणि आपल्या दवाखान्यांकडे नॉन इमर्जन्सी २२९८ अँब्यूलन्स आहेत. तसेच जर एखाद्या इमर्जन्सी रुग्णास व्हेटीलेटरची आवश्यकता असेल तर त्या रुग्णासाठी इमर्जन्सी व्हेंटीलेटरची सुविधा असलेली ॲम्ब्युलन्स पाठविली जाईल ही पूर्णपणे मोफत राहील. पेशंटला इमर्जन्सी अँब्यूलन्सने न्यावयाचे हे अँब्यूलन्समधील डॉक्टर ठरविल. आय.सी.यू. मधील पेशंट असेल अथवा अन्य इमर्जन्सी पेशंट असेल त्यास मोफतच नेले जाईल. अँम्ब्यूलन्स करिता कॉल आल्यानंतर अँम्ब्यूलन्स घटनास्थळी जाईल व तेथील जखमींना किंवा इमर्जन्सी उपचाराची आवश्यकता असलेल्या रुग्णांना हॉस्पीटलमध्ये दाखल करुन घेण्याकरिता येणारा वाहतूकीचा खर्च शासन करणार आहे.

११.४१ हे काम कधी पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ? असे समितीने विचारले असता याबाबत असे सांगण्यात आले की, इक्विपमेंटस बसविलेल्या गाड्यांचा वापर करताना काही अडचणी येऊ नये या करिता ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवडयामध्ये त्या एआरएआय, पुणे या संस्थेकडे चेकिंग पूर्ण होऊन सर्टिफिकेट मिळणे अपेक्षित आहे. ऑक्टोबर दुसऱ्या आठवडयामध्ये त्यांचे चेकिंग पूर्ण होऊन सर्टिफिकेट मिळणे अपेक्षित आहे. ते मिळाल्यानंतर संबंधित कंपनीला गाडयांचे प्रॉडक्शन करण्यास परवानगी दिली जाईल मार्च, २०१४ च्या अखेर पर्यंत या गाडयांचे प्रॉडक्शन करण्यास परवानगी दिली जाईल मार्च, २०१४ च्या अखेर पर्यंत या गाडया उपलब्ध होतील.

११.४२ तसेच ॲम्ब्युलन्स कामाची निविदा काढण्यात आली होती. याकरिता एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतू निविदा कोणाला द्यायचे हे निश्चित होत नसल्यामुळे या कामास उशीर झाला ही वस्तूस्थिती असून त्यातील काही जण प्रथम उच्च न्यायालय व नंतर सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले त्यामुळे

कालापव्यय झाला. सदरहू काम हे व्ही. के ग्रुप या कंपनीला देण्यात आले असून त्या कंपनीस अँम्ब्युलन्स सर्व्हिसेसचा अनुभव आहे.

११.४३ गाडयांच्या वाटप व राजीव गांधी जिवनदायी आरोग्य योजनेत कोणत्या रुग्णालयाचा सहभाग आहे व ही योजना कधीपासून सुरु होणार आहेत याबातची माहिती देताना विभागाकडून असे सांगण्यात आले की, शहरी भागात दोन लाख लोकसंख्येकरिता एक गाडी आणि ग्रामीण भागात एक लाख लोकसंख्येकरिता एक गाडी असे वाटप केले आहे. जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालील समिती गाडीचे ठिकाण निश्चित करेल. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना पुढच्या महिन्यात म्हणजे नोव्हेंबर, २०१३ मध्ये तर ॲम्ब्यूलन्सच्या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या रुग्णालयांनी इन्शुरन्स कंपनीकडे अर्ज केला पाहिजे. त्यांच्या निकषात बसणारी रुग्णालये या योजनेत सहभागी होऊ शकतील. आतापर्यंत ८ जिल्हयांत एक वर्षापासून ही योजना सुरु असून त्यातील फेज १ मध्ये १५० रुग्णालये आहेत.त्यापैकी ८५ हॉस्पिटल खाजगी आहेत. मोठया रुग्णालयाच्या सहभागाबाबत सांगायचे झाले तर लोकमान्य टिळक सारख्या काही रुग्णालयांनी अर्ज केलेले आहेत. सध्या ही योजना अमरावतीमध्ये सुरु आहे.

११.४४ पीएचसीच्या वेळेबाबत खूलासा करताना विभागिय प्रतिनीधींनी समितीस अवगत केले की, पीएचसीची वेळ साधारणपणे सकाळी ८.३० ते सायंकाळी ६.०० अशी असते. तसेच, इमर्जन्सी केसेस करिता २४ तास ओपीडी सुरु राहणे अपेक्षित आहे. तथापि ग्रामीण दुर्गम भागातील परिस्थिती वेगळी असते याबाबत उदाहरण देताना समितीने सांगितले की, राजगाव, ता.केज, जि.बीड येथील पीएचसी सेंटर केवळ १० ते ५ या वेळात सुरु असते. आणि या दवाखान्याचे उद्घाटन होऊन दोन वर्षे झाली तरी, तेथे वीज जोडणी मिळालेले नाही. सदर दवाखान्याचे उद्घाटन होऊन दोन वर्षे झाली तरी, येथे वीज जोडणी मिळालेली नाही. या बाबत डीएचओ/सीएस यांच्याशी बोलल्यानंतर तसेच डीपीडीसीच्या बैठकीत बोलल्यानंतरही त्यांच्या कारभारात काहीही सुधारणा होत नाही. खालच्या स्तरावरील अधिकारीही याकडे लक्ष देत नाहीत त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांची फारच हेळसांड होत आहे. आज ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी अशीच परिस्थिती दिसून येते हे फार मोठे दुर्देव आहे. यावर या बाबतची माहिती घेऊन ती समितीला सादर केली जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी सहमतीस दिले.

११.४५ समितीने डॉक्टरांच्या कट प्रॅक्टीस बाबत विभागाचे निदर्शनास आणून दिले की, अकोला येथे ग्रामीण भागातील एखाद्या व्यक्तीला डेंग्यु वगैरे सारखा ताप आला की, ग्रामीण भागातील शासकीय डॉक्टर त्याला शहरी भागात खाजगी डॉक्टरकडे पाठवितात. खाजगी रुग्णालय त्याचा मोबदला त्या डॉक्टरकडे पाठवितात. त्याचा मोबदला म्हणून त्या डॉक्टरला घरबसल्या ४० ते ५० टक्के प्रॅक्टिस मिळण्याचा नवा प्रकार

आता ग्रामीण भागात सुरु झालेला आहे. ग्रामीण भागातील डीएचएमएस झालेल्या डॉक्टरला काही येत नाही. त्याने केवळ पेशंट शोधायचे आणि शहरात खाजगी हॉस्पिटलमध्ये पाठवायचे व त्या बदल्यात ४० ते ५० टक्के कट प्रॅक्टिस मिळवायची ही अतिशय गंभीर बाब आहे. या प्रकाराबाबत 'लोकमत' व 'सकाळ' या वृत्तपत्रातून मालिका छापून येत आहे. शिवाय अशा प्रकारचे गैरव्यवहार कोणकोणत्या जिल्हा रुग्णालयात सुरु आहेत. तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कार्यवाही केली आहे व असे प्रकार होऊ नयेत यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनेची माहिती तीन महिन्याच्या आत समितीस सादर करण्यात यावी या जिल्हा रुग्णालयात एक किंवा दोन सर्जन किंवा फिजिशिअन असतात. तेथे सिटी स्कॅन, डायलिसीसचे मशिनही बंद असते. त्यामुळेही रुग्णांना उपचाराकरिता बाहेर जावे लागते. मात्र विभागाकडून डॉक्टरांच्या कट प्रॅक्टीस संदर्भात काहीही खूलासा करण्यात आला नाही.

११.४६ राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेचे सन २००२ पासून ऑडिट झालेले नाही. आरोग्य विभागाचे सचिव या संस्थेचे अध्यक्ष असतात. या संस्थेच्या नियमित बैठका होतात का, या संस्था कोणकोणते कार्यक्रम राबविण्यात, तेथे किती कर्मचारीवर्ग आहे, तेथील कर्मचारी आकृतीबंध कसा आहे, तिच्यावर राज्य शासनाचे कोणत्या पध्दतीने नियंत्रण आहे, एनजीओंची निवड कोणामार्फत केली जाते, गेल्या तीन वर्षांत या संस्थेला किती निधी मिळाला व तो कोणत्या बाबींवर खर्च झाला या बाबतची माहिती समितीला देताना विभागीय प्रतिनीधीनी सांगितले की, राज्य एड्स नियंत्रण संस्था ही एक वेगळ्या प्रकारची संस्था असून या संस्थेला केंद्राकडून निधी मिळतो. या संस्थेचे ऑडिट सी.ए. मार्फत करण्याची तरतूद आहे. सध्या हा विषय आम्ही पाहत असून या मध्ये सीएजीचा रोल काय आहे वगैरे बाबत संपूर्ण राज्यभरातील माहिती घेण्याबाबत सीएजीच्या हेडक्वॉर्टर मधून सूचना आलेल्या आहेत. या मध्ये राज्य सरकारचे भाग भांडवल नसते.

११.४७ जरी या संस्थेमध्ये राज्य शासनाचे भाग भांडवल नसले तरी, केंद्र शासनामार्फत व परदेशातून येणाऱ्या पैशांचा व्यवस्थित वापर होतो की, नाही हे पाहण्याकरिता तेथे राज्य सरकारचे अधिकारी असतात. परंतु, राज्य शासनाचे अधिकाऱ्यांच्या संगनमताने निधिचा अपव्यय करित असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळेच महालेखाकाराकडून लेखापरीक्षण करणे गरजेचे आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांची समितीस आश्वासन दिले की, समितीत उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद विभागाने घेतली असून याबाबतची तपशीलवार माहिती सादर केली जाईल.

११.४८ शासनाचे आयुर्वेदिक दवाखाना सुरु करण्याबाबत धोरणासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, ही बाब सध्या प्राथमिक स्तरावर आहे.

समितीचे अभिप्राय :-

११.४९ शासकीय रुग्णालयात करार पध्दतीने तज्ञ डॉक्टरांची मंजूर पदे भरली जातात नियुक्ती करतांना जो डॉक्टर गडचिरोलीचा असेल त्याला कोकणात किंवा धुळे, नंदूरबार येथे नियुक्त केले जाते व जो रत्नागिरीचा असेल त्याला गडचिरोलीला नियुक्त केले जाते. अशा ठिकाणी काम करण्याची डॉक्टरांची मानसिक तयारी नसते व ते सतत बदली करण्याचाच प्रयत्न करीत असतात. त्यामुळे शासकीय रुग्णालयासाठी डॉक्टर मिळत नाही. यासंदर्भात मंत्री महोदय सभागृहात आश्वासने देतात परंतु प्रत्यक्षात डॉक्टरांच्या जागा भरल्या जात नाहीत.

११.५० शासकीय रुग्णालयांमध्ये अद्ययावत यंत्रसामुग्री उपलब्ध नसते. पण खाजगी रुग्णालयांमध्ये औषधोपचार घेणे परवडत नसल्यामुळे सामान्य रुग्ण शासकीय रुग्णालयांमध्ये येतात. जर शासन खाजगी कंपन्यांच्या सहभागातून शासकीय रुग्णालयांमध्ये या सुविधा पुरविणार असेल आणि या सुविधांचे दर खाजगी रुग्णालयांप्रमाणे ठेवण्यात येणार असतील तर सामान्य माणसाला कोणताही पर्याय शिल्लक राहणार नाही. त्यामुळे शासकीय रुग्णालयातील या सर्व सुविधांचे दर सामान्य माणसाला परवडतील अशा पध्दतीने ठेवण्याबाबत विभागाने काही नियोजन करणे आवश्यक आहे.

११.५१ शासकीय रुग्णालयात विभागाकडून करार पध्दतीने डॉक्टरांची नियुक्ती एक वर्षासाठीच करण्यात येत असल्यामुळे या माध्यमातून आलेले बहुतांश डॉक्टर रुग्णालयात गैरहजर असतात, ते आपले कर्तव्य योग्य पध्दतीने बजावीत नाहीत. करार पध्दतीने डॉक्टरांच्या माध्यमातून रुग्णालयातील ८० टक्के पदे भरण्यात आलेली असून चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात ३८ बीएएमएस डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात ८३८ बीएमएस डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रामधील एकूण पदांपैकी ७५ टक्के पदे एमबीबीएस डॉक्टरामधून आणि २५ टक्के पदे बीएएमएस डॉक्टरामधून भरण्यात यावीत असा शासन निर्णय आहे तथापि राज्यातील बहुतांश प्राथमिक आरोग्य केंद्रे बीएएमएस डॉक्टरांच्या माध्यमातून कार्यरत आहेत.

११.५२ राज्य शासनाने पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर येथील धर्मादाय रुग्णालयांची पहाणी करण्याकरिता नियुक्त केलेल्या समितीमध्ये विधीमंडळ सदस्यांचा समावेश करण्यासंदर्भात सर्वप्रथम विधानसभेत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्याअनुषंगाने विधिमंडळ सदस्यांची एक समिती गठीत करण्यात आली होती. धर्मादाय रुग्णालयात येणाऱ्या पात्र रुग्णांवर मोफत अथवा सवलतीच्या दरात उपचार करण्यासंदर्भात शासनाने नियुक्त केलेल्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समितीच्या बैठकाच होत नसल्याने कामकाज होत नाही. धर्मादाय आयुक्तांचे देखील या रुग्णालयांवर नियंत्रण नसल्याने येथील अधिकाऱ्यांचे रुग्णालयातील

कर्मचाऱ्यांशी संगनमत असते व समाजातील गरीब व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना धर्मादाय रुग्णांकडून योग्य ती सेवा मिळत नाही असे समितीचे मत आहे.

११.५३ महानगरपालिका धर्मादाय रुग्णालयास परवानगी देते व महानगरपालिकांचा कारभार हा नगरविकास विभागाकडे आहे. आरोग्य विभागाचा कारभार हा स्वतंत्र आहे आणि धर्मादाय आयुक्त कार्यालयाचा कारभार हा विधी व न्याय विभागाकडे आहे. धर्मादाय रुग्णालयाचा कारभार चार-पाच विभाग एकत्र आल्यामुळे ज्या ज्या वेळी ज्या विभागाचा मुद्दा उपस्थित होतो. त्या वेळी संबंधित विभाग त्यांच्या विभागाची माहिती देतो. धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या कारभाराबाबतीत नगरविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, विधी व न्याय विभाग स्वतंत्रपणे काहीही बोलू शकत नाही. चार-पाच विभाग एकत्र आल्यामुळे जबाबदारी निश्चित होत नाही. त्यामुळे उक्त विभाग तसेच जिल्हयातील धर्मादाय रुग्णालयाबाबत एकत्रितरित्या माहिती जाणून घेऊन या रुग्णालयाच्या कारभारात सुसुत्रता आणणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

समितीच्या शिफारशी :-

११.५४ शिफारस क्र. (१) सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २००९-१० या वित्तीय वर्षात भांडवली खर्च मधील ४२१० वैदयकीय सेवा व सार्वजनीक आरोग्य या मुख्य शिर्षाखालील सिंधूदुर्ग जिल्हयातील जिल्हा रुग्णालय व निवासी गाळयाचे बांधकामाकरीता अर्थसंकल्पीत संपूर्ण रक्कम रु.१६.६७ लक्ष कंत्राटदाराने देयके सादर न केल्यामुळे परत केली. संचालनालय स्तरावर यंत्रसामुग्री खरेदी करीता मुळ अर्थसंकल्पात मंजूर रु.४३.३४ लक्ष व पुरक मागणीव्दारे मंजूर रु.१५६.६६ लक्ष अशी एकूण रु.२००.०० लक्ष तरतूद निविदा प्रक्रीया पूर्ण होऊ न शकल्याने परत केली. जीवनदायी योजनातंर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैदयकीय मदत या शिर्षाखालील मुळ अर्थसंकल्पीत तरतूद रु. १८.०० लक्ष व पुरक मागणीव्दारे मंजूर रु.१८२.०० लक्ष अशी संपूर्ण रु.२०० लक्ष ची तरतूद परत करण्यात आली याशिवाय आरोग्य नियंत्रण कार्यक्रम रु.६६.६७ लक्ष खरेदी प्रक्रीया पूर्ण न झाल्यामुळे व आरोग्य प्रसिध्दीची तरतूद रु. ५० लक्ष प्रस्तावाला मंजूरी न मिळाल्यामुळे परत केली, राज्य शासनाकडून मुळ अर्थसंकल्पात उपलब्ध तरतूदी व विभागाने पुरक मागणी केलेला निधी मंजूर केल्यानंतर उपरोक्त कारणास्तव खर्च न करता परत करणे ही गंभीर बाब आहे. विभागाने सदरचा अर्थसंकल्पीत निधीच्या खर्चाबाबत वेळीच कार्यवाही न केल्यामुळे रुग्णांना शासनाकडून मिळणाऱ्या सेवांपासून वंचीत रहावे लागले. त्यामुळे अर्थसंकल्पीत निधी खर्च न करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

११.५५ शिफारस क्र. (२) राज्यात मोठ्या प्रमाणात रिक्त असणाऱ्या डॉक्टरांच्या पदांमुळे नागरिक चांगल्या वैद्यकीय सेवेपासून वंचित राहतात व कित्येकांना परवडत नसतांनाही खाजगी रुग्णालयात जावे लागते ही बाब गंभीर असून शासनाने डॉक्टर, तंत्रज्ञ, कर्मचारी इत्यादी अनेक रिक्त पदांचा आढावा घेऊन तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

११.५६ शिफारस क्र. (३) अर्थसंकल्पात आवश्यक कामांसाठी निधीची तरतूद करुन घेण्याची प्रक्रिया फार मोठी आहे. सर्वांच्याच कामासाठी निधीची तरतूद अर्थसंकल्पात होईलच याची शाश्वती नसते. असे असतांना ज्या कामांसाठी वारंवार निधी मिळत आहे अशा कामांसाठी त्या निधीचा वापर न होता तो निधी परत जाणे ही अधिकच गंभीर बाब असून समितीच्या मते ही आर्थिक अनियमितताच आहे. परिणामी अशा निधीचा उपयोग अन्य दुसऱ्या कोणत्याही कामांसाठी देखील होऊ शकला नाही व अशी पुनर्विनियोजनाची अनेक प्रकरणे समितीसमोर विचारार्थ आहेत. अशा बाबतीत वित्त विभागाने देखील अर्थसंकल्पात तरतूद करताना अशा विभागांच्या वित्तीय नियोजनाचा सखोल आढावा घ्यावा व त्या विभागांनी त्यांना दिलेल्या निधीतून गत तीन वर्षात सतत बचत असेल अशा विभागांच्या मागण्यांवर निधी उपलब्ध करताना यथोचीत विचार करुन अर्थसंकल्पीय तरतूद करावी, अशी समितीची शिफारस आहे.

११.५७ शिफारस क्र. (४) अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधीचा वापर कल्याणकारी योजना परिणामकारकपणे राबविण्याच्या दृष्टीने विभागांतर्गत योग्य प्रकारे समन्वय साधून मंजूर केलेल्या अनुदानाची अशा प्रकारे बचत होणार नाही अथवा मंजूर अनुदानापेक्षा खर्च बाहेर जाणार नाही. याबाबतची स्पष्ट सूचना सर्व विभागाना वित्त विभागाने द्याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

१२. वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च

१२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना अनुदान क्रमांक एस-४ "वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च" यामधील प्रधान लेखा शिर्ष ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्चा संबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्रमांक एस-४ "वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च"

(रुपये हजारात)

१२.२ शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०२ ग्रामीण आरोग्य सेवा ८०० इतर खर्च ८०० (००) (०१) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबे जोगाई मूळ १८.३३ पुनर्विनियोजन (-) १२.४९	५.८४	५.८४	----

ज्ञापन :-

१२.३ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की,वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशीर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.५.८४ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.४ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०२ ग्रामीण आरोग्य सेवा ८०० इतर खर्च ८०० (००) (०२) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबे जोगाई मूळ ६.६७ पूरक ४,७५.०० पुनर्विनियोजन (-) १,९३.८२	२,८७.८५	२,८७.८५	----

ज्ञापन :-

१२.५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.२७८.८५ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मर्यादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.६ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (०१) सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई मूळ ३००.०० पुनर्विनियोजन (-) २०३.९०	९६.१०	९६.१०	(+) ०.०१

ज्ञापन :-

१२.७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.९६.१० लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व त्याव्यतिरिक्त रु.१ हजार एवढा जादाचा खर्च किरकोळ किंमत वाढीमुळे झालेला आहे.

(रुपये लाखात)

१२.८ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (०८) अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर मूळ ५०.०० पुर्नविनियोजन (-) ३३.८६	१६.१४	१६.१४	---

ज्ञापन :-

१२.९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.१६.१४ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.१० शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (१४) सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर मूळ ४२.३३ पुनर्विनियोजन (-) ३५.२३	७.१०	७.१०	--

ज्ञापन :-

१२.११ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशीर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.७.१० लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.१२ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (१५) सर्वोपचार रुग्णालय, सांगली मूळ १३.३३ पुनर्विनियोजन- (-) १३.३३	---	---	---

ज्ञापन :-

१२.१३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस अनुदान प्राप्त झालेले नाही.

(रुपये लाखात)

१२.१४ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (१६) सर्वोपचार रुग्णालय, मिरज मूळ ८३.३३ पुनर्विनियोजन (-) ५७.१४	२६.१९	२६.१९	--

ज्ञापन :-

१२.१५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.२६.१९ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.१६ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२०) ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय,मुंबई मूळ ११.०२ पूरक ३,२९.९९ पुनर्विनियोजन (-) २,५७.११	८३.९०	८३.९१	(+) ०.०१

ज्ञापन :-

१२.१७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.८३.९० लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले असून त्याव्यतिरिक्त रु.१ हजार एवढा जादाचा खर्च किरकोळ किंमत वाढीमुळे झालेला आहे.

(रुपये लाखात)

१२.१८ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२१) बैरामजी जीजीभॉय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे मूळ १६.६७ पूरक ११५.११ पुर्नर्विनियोजन (-) ८३.७०	४८.०८	४८.०८	--

ज्ञापन :-

१२.१९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.४८.०८ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.२० शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२४) वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद मूळ ४६.०० पूरक २७,४८.३४ पुर्नर्विनियोजन (-) ७,१७.७७	२०,७६.५७	२०,७६.५७	--

ज्ञापन :-

१२.२१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.२०७६.५७ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.२२ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२५) वैद्यकीय महाविद्यालय, मिरज मूळ ८.३३ पूरक १,६०.३३ पुर्नविनियोजन (-) २२.०३	१,४६.६३	१,४५.०४	(-) १.५९

ज्ञापन :-

१२.२३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.१४६.६३ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता रु.१.५९ लाख एवढया अनुदानाची बचत किंमतीतील फरकामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

१२.२४ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२६) डॉ. वैरांपायनस्मारक (मेमोरियल) वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर मूळ ३,७५.६७ पूरक १,८२.०० पुनर्विनियोजन (-) १,६१.२८	३,९६.३९	३,९६.३९	--------

ज्ञापन :-

१२.२५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.३९६.३९ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.२६ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२७) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड मूळ ४३.६७ पूरक ७,४२.३३ पुनर्विनियोजन (-) ५८३.७०	२,०२.३०	२,०२.३०	------

ज्ञापन :-

१२.२७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.२०२.३० लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.२८ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२७).शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ (कै. श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ) मूळ १६.०० पूरक ४,७०.०० पुनर्विनियोजन (-) ४,३७.५०	४८.५०		------

ज्ञापन :-

१२.२९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.४८.५० लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.३० शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२९) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे (कै.श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे) मूळ ४०.३० पूरक ४,४८.७४ पुनर्विनियोजन (-) ३,९०.२३	९८.८१	९८.८१	-----

ज्ञापन :-

१२.३१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.९८.८१ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.३२ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (३०)शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर मूळ २,२५.०० पूरक १६.३३ पुनर्विनियोजन (-) २६.४५	२,१४.८८	२,१३.७४	(-) १.१४

ज्ञापन :-

१२.३३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.२१४.८८ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता करण्यात आले व किरकोळ किंमत वाढीमुळे रु.१.१४ लाख एवढया अनुदानाची बचत झालेली आहे.

(रुपये लाखात)

१२.३४ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२०) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला मूळ १,२६.०० पूरक २,७०.०० पुनर्विनियोजन (-) १,६४.४९	२,३१.५१	२,३१.५१	----

ज्ञापन :-

१२.३५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.२३१.५१ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.३६ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (३३) दंत महाविद्यालय, रुग्णालय, मुंबई मूळ २२.०० पूरक ७८.०० पुनर्विनियोजन (-) २०.००	८०.००	८०.००	----

ज्ञापन :-

१२.३७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.८०.०० लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.३८ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (३३) दंत महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद मूळ ५३.६७ पूरक ----- पुनर्विनियोजन (-) २२.७९	३०.८८	३०.८८	-----

ज्ञापन :-

१२.३९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.३०.८८ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.४० शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा १०५ (००) (३५) दंत महाविद्यालय, नागपूर मूळ १३.३३ पूरक ६६.६७ पुनर्विनियोजन (-) २३.६१	५६.३९	५६.३९	-----

ज्ञापन :-

१२.४१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.५६.३९ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.४२ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा १०५ (००) (०२) सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई मूळ २०.०० पूरक ८०.०० पुनर्विनियोजन (-) २५.६५	७४.३५	७८.८९	(+) ४.५४

ज्ञापन :-

१२.४३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.७४.३५ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले असून, त्याव्यतिरिक्त रु. ४.५४ लाख एवढा जादाचा खर्च झालेला आहे. कारण निविदेअंती यंत्रसामुग्रीच्या अंतिम निर्धारित किंमतीमध्ये उक्त यंत्रसामुग्रीच्या मंजूर अनुदानाच्या तुलनेत वाढ झाल्याने उदा. बोन कटिंग, ड्रिलींग सिस्टिम-४६२ हजार, इलेक्ट्रॉनिक वेईंग स्केल-७ हजार इतकी वाढ झाल्याने तसेच ३ बी सायंटिफिक मॉडेल या यंत्राच्या किंमतीमध्ये १५ हजार इतकी बचत झाल्याने रु. ४५४ हजार इतकी प्रत्यक्ष वाढ दिसून येत आहे.

(रुपये लाखात)

१२.४४ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (१३) ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे मूळ १०६७.२२ पुनर्विनियोजन (-) ६७२.३७	३९४.८५	४०९.३८	(+) १४.५३

ज्ञापन :-

१२.४५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.३९४.८५ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले असून त्यांच्याव्यतिरिक्त रु. १४.५३ लाख एवढा जादाचा खर्च झालेला आहे कारण सदर संस्थेसाठी ऑक्सिजन प्रणाली खरेदी करण्यात आली होती. सदर यंत्रसामुग्रीस मंजूर अनुदानापेक्षा रु. ४०६४ इतकी रक्कम जास्त लागल्याने तसेच उर्वरित यंत्रसामुग्रीच्या खरेदीच्या रक्कमेमध्ये रु. २६११ हजार एवढी बचत झाल्याने रु. १४५३ हजार इतकी अधिकची रक्कम दिसून येत आहे.

(रुपये लाखांत)

१२.४६ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (२२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर मूळ १,७२.६३ पूरक १,७८.३३ पुनर्विनियोजन (-) २,४०.७८	१,१०.१८	१,२६.८८	(+)१६.७०

ज्ञापन :-

१२.४७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.११०.१८ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले असून त्यांव्यतिरिक्त रु. १६.७० लाख एवढा जादाचा खर्च झालेला आहे. कारण निविदेअंती यंत्रसामुग्रीच्या अंतिम निर्धारित किमंतीमध्ये उक्त यंत्रसामुग्रीच्या मंजूर अनुदानाच्या तुलनेत वाढ झाल्याने (उदा.एम्बेडिंग सिस्टिम (+ ३५३ हजार), ऑटोमेटिक स्लाईड स्टेनर (+६३९ हजार), एडव्हान्स लॅप्रेस्कोप (+१०२७ हजार) तसेच इतर यंत्रसामुग्रीच्या खरेदीअंती अंदाजित रु. ३४९ हजार इतकी बचत झाल्याने रु. १६७० हजार इतका जास्तीचा खर्च दिसून येतो.

(रुपये लाखात)

१२.४८ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा १०५ (००) (२३) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर मूळ १८.६३ पूरक २,२९.०० पुनर्विनियोजन (-) १,३७.७७	१,०९.८६	१,२७.२९	(+) १७.४३

ज्ञापन :-

१२.४९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.१०९.८६ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले असून त्यांच्याव्यतिरिक्त रु. १७.४३ लाख एवढा जादाचा खर्च झालेला आहे. कारण निविदेअंती यंत्रसामुग्रीच्या अंतिम निर्धारित किमतीमध्ये उक्त यंत्रसामुग्रीच्या मजूर अनुदानाच्या तुलनेत वाढ झाल्याने (उदा.ओ.टि. सिलींग लाईट १८४० हजार) तसेच इतर यंत्रसामुग्रीच्या खरेदीअंती अंदाजित रु. ९७ हजार इतकी बचत झाल्याने रु. १७४३ हजार इतका जास्तीचा खर्च दिसून येतो.

(रुपये लाखांत)

१२.५० शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (३२) राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर मूळ २०.०० पूरक ४,६४.५० पुनर्विनियोजन (-) २,०२.२१	२,८२.२९	२,८४.२०	(+)१.९१

ज्ञापन :-

१२.५१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.२८२.२९ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले असून त्यांच्याव्यतिरिक्त रु. १.९१ लाख एवढा जादाचा खर्च झालेला आहे. कारण निविदेअंती यंत्रसामुग्रीच्या अंतिम निर्धारित किमतीमध्ये उक्त यंत्रसामुग्रीच्या मजूर अनुदानाच्या तुलनेत वाढ झाल्याने (कॉम्पॅक्ट एअर ड्राईव व एल सी डि सी पी ॲड सी पी बेसिक इन्स्ट्रमेंट सेट या दोन यंत्राच्या किमतीमध्ये वाढ झाल्याने) वाढ दिसून येत आहे.

(रुपये लाखात)

१२.५२ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा १०५ (००) (०३) गोकुळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई मूळ १५.०० पूरक ८५.०० पुनर्विनियोजन (-) ४२.५९	५७.४१	३५.५९	(-) २१.८२

ज्ञापन :-

१२.५३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.५७.४१ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले नसून रु. ३५.५९ लाख एवढया किंमतीची यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आलेली आहे. व रु. २१ ८२ लाख एवढया अनुदानाची बचन खरेदीप्रक्रिया तांत्रिक बाबीमुळे पूर्ण होऊ न शकल्याने झालेली आहे.

(रुपये लाखात)

१२.५४ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषमचिकित्सा १०५ (००) (०९) श्री. गुरुगोविंद सिंगजी मेमोरियल रुग्णालय, नांदेड मूळ १६.६७ पुनर्विनियोजन (-) ११.१२	५.५५	४.५७	(-) ०.९८

ज्ञापन :-

१२.५५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.५.५५ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले नसून रु.४.५७ लाख एवढया किंमतीची यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आलेली आहे. व रु. २१ ८२ लाख एवढया अनुदानाची बचत खरेदी प्रक्रिया तांत्रिक बाबीमुळे पूर्ण होऊ न शकल्याने झालेली आहे. किंमंतीतील फरकामुळे रु. ९८ हजार एवढया अनुदानाची बचत झालेली आहे.

(रुपये लाखात)

१२.५६ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा १०५ (००) (०४) कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई मूळ ६.६७ पूरक ९३.३४ पुनर्विनियोजन (-) १०,१२.९७	११,१२.९८	११,१२.९८	-------

ज्ञापन :-

१२.५७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, वित्तीय वर्ष २००९-१० करीता या उपशिर्षाखाली सदर संस्थेस मूळ मंजूर अनुदान रु.१११२.९८ लाख असून सदरील अनुदान संस्थेसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीकरिता संपूर्णपणे खर्ची पडलेले आहे व व सदरील अनुदान हे मंजूर अनुदानाच्या मयादेत खर्ची पडलेले आहे.

(रुपये लाखात)

१२.५८ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३ वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा १०५ (००) (२३)शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर मूळ १००.०० पुनर्विनियोजन (-) ६९.८१	३०.१९	२५७.४४	(+) २२७.२५

ज्ञापन :-

१२.५९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सुधारीत अनुदान विहीत कालावधीत मंजूर झाले नसल्यामुळे खर्च अधिक

(रुपये लाखात)

१२.६० शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भाडवली खर्च, ०३- वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०१-आयुर्वेद राज्य योजना (०३)रामविलास आनंदीलाल पोदार महाविद्यालय, मुंबई योजनांतर्गत पूरक १,००,०० पुनर्विनियोजन (-) २०.०३	७९.९७	७९.९७	-----

ज्ञापन :-

१२.६१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सुधारित अंदाज पत्रकात अनुदानात कपात झाल्यामुळे मंजूर अनुदानाचा मर्यादित खर्च करण्यात आला आहे.

(रुपये लाखात)

१२.६२ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०३- वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०१- आयुर्वेद १०१ (००)(०४) आयुर्वेदिक महाविद्यालय नागपूर मूळ ६.६७ पूरक ४३.३३ पुनर्विनियोजन (-) १०.००	४०.००	४०.००	----

ज्ञापन :-

१२.६३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सुधारित अंदाज पत्रकात अनुदानात कपात झाल्यामुळे मंजूर अनुदानाचा मर्यादित खर्च करण्यात आला आहे.

(रुपये लाखात)

१२.६४ शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भाडवली खर्च, ०३- वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०१- आयुर्वेद १०१ (००) (०५) आयुर्वेदिक महाविद्यालय नांदेड मूळ ६.६७ पूरक ४,४३,३३ पुनर्विनियोजन (-)३०.१७	१,१९.८३	१,१९.८३	----

ज्ञापन :-

१२.६५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सुधारित अंदाज पत्रकात अनुदानात कपात झाल्यामुळे मंजूर अनुदानाचा मर्यादित खर्च करण्यात आला आहे.

विनियो-१०१२/प्र.क्र.८५/२०१२/अलेप **(रुपये लाखात)**

विनियोजन लेख्यातील पृष्ठ क्र. मागणी क्र. व लेखाशीर्ष	**विनियोजन लेख्या नमूद केलेली माहिती**				
	एकूण तरतूद			**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च बचत**
१	२	३	४	५	६
मागणी क्रमांक एस-४ ४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च ८०- सर्वसाधारण ८००-इतर खर्च राज्य योजनांतर्गत योजना (दत्तमत) ८०० (००) (०१) अन्न व औषध प्रशासनाची पुनर्रचना व अन्न व औषध चाचणीविषय प्रयोगशाळांची आस्थापना (४२१०१०८४)	मूळ पूरक पुनिर्विनियोजन एकूण	२.२९,६७ ६.२०.३३ (-)४,५०.०० ४,००.००	-- -- -- --	३६८.१६	(-)३१.८४

ज्ञापन:-

१२.६६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, शासनाकडून प्राप्त अनुदान ४००.०० त्यानुषंगाने बचत रु. -३१.८४ प्रशासनाच्या औषध नियंत्रण प्रयोगशाळेतील उपकरणे खरेदी संदर्भात पुरेशा प्रतिसादाअभावी खर्ची न पडलेला निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

साक्ष-

१२.६७ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर बैठकीत अनुदान क्रमांक एस-४, ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च या अंतर्गत मूळ अनुदान ६ लाख ६७ हजार रुपये

असून पूरक मागणी रु. ४७५ लाख आहे. त्यामुळे मूळ अनुदानापेक्षा पूरक मागणी जास्त घेण्याचे कारण काय आहे ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हा प्रश्न अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या संदर्भात आहे. त्या ठिकाणी एक युनिट स्थापन करावयाचे होते त्यासाठी विविध उपकरणे खरेदी करण्यात आल्यामुळे त्यावर्षी जास्त मागणी करण्यात आली. त्या ठिकाणचे रेडीएशन युनिट स्थापित झाले असून काही वर्षे ते युनिट चालू राहिले. परंतू तेथे डॉक्टर नव्हते. ते युनिट गावडे प्रतिष्ठान यांच्यामार्फत आऊटसोर्सींग पध्दतीने सुरु करण्यात आले होते. त्यांनी सुरुवातीला ते युनिट चालविले परंतु नंतर त्यांनी जास्त पैशाची मागणी केल्यामुळे ते युनिट चालू राहिले नाही. शासनाचे असे धोरण आहे की, ज्या ठिकाणी इक्विपमेट खरेदी करण्यात आली त्याची एएमसी आणि सीएमसी केली जाते. तज्झ डॉक्टर असल्याशिवाय आपण यंत्रसामुग्री घेत नाही. ते उपकरण बिघडलेले नाही.

१२.६९ तथापि काही दवाखान्यांमध्ये डॉक्टर नसल्यामुळे यंत्रसामग्री बंद पडून आहेत ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधीनी समितीस सांगितले की, एखादया डॉक्टरने यंत्राची मागणी केल्यानंतर त्या यंत्राचा पुरवठा केला जातो. जर त्या डॉक्टरची बदली झाली आणि तेथे आलेला दुसरा डॉक्टर ते यंत्र चालविण्यासाठी सक्षम नसेल तर त्या काळामध्ये ते यंत्र बंद राहते. काही यंत्रसामग्री ही उच्च तांत्रिक दर्जाची असते. ती हाताळण्यासाठी तज्ज्ञांची आवश्यकता असते. उदा. डायलिसीस मशीन नेफ्रॉलॉजिस्ट हाताळू शकतात तसेच अँजिओग्राफीचे मशीन कार्डीऑलॉजीस्ट हाताळू शकतात. हे तज्ज्ञ डॉक्टर नसतील तर ही यंत्रे अन्य कोणी हाताळणे कठीण असते. त्यामुळे दुसरे डॉक्टर चालवू शकत नाहीत. तसेच अंबाजोगाई,लातूर, अकोला या ठिकाणी जे नवीन डॉक्टर देण्यात येतात. ते रुजू होत नाहीत. त्यामुळे तेवढया काळापुरती यंत्रे बंद राहतात.

१२.७० यंत्रसामुग्रीची मागणी करणाऱ्या डॉक्टरची बदली झाल्यानंतर ती यंत्रसामुग्री बंद राहणे बरोबर नाही. कारण महत्त्वाची यंत्रसामुग्री लाखो रुपये खर्च करुन खरेदी केली जाते. तेथील डॉक्टर बदलल्यानंतर ती यंत्रसामुग्री बंद राहते. ज्यावेळी मशिनरी घेतो त्यावेळी ती चालविण्यासाठी लागणारी व्यक्ती सतत त्या ठिकाणी उपलब्ध असली पाहिजे. अशी सूचना समितीने विभागास केली.

१२.७१ अंबेजोगाई येथील यंत्र कोणाच्या मागणीवरुन घेतली होती अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, त्या ठिकाणी लोकांची गरज होती म्हणून निविदा काढली होती. त्या ठिकाणी कॅन्सरच्या उपचारासाठी लोक येतात.

१२.७२ शासनाकडून किडनी, कॅन्सर, हार्टच्या संदर्भात चांगली यंत्रसामुग्री घेण्यात येते. त्याची किंमत २ कोटी ते १० कोटी रुपयांपर्यंत असते. पण त्यांचा वापर आऊटसोर्सींग पध्दतीने करण्यात येते. ज्यांना मशिनरी

चालविण्यास देतात ते काही काळ यंत्रसामुग्री चालवितात आणि नंतर जास्त पैशाची मागणी करतात. कारण यंत्रसामुग्री रुग्णांना स्वस्तात उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी खरेदी करण्यात आलेली असते. खाजगीमध्ये त्या उपचारासाठी २ ते ४ हजार रुपयांचा खर्च येतो आणि येथे २०० ते ४०० रुपयेच खर्च येतो. त्यामुळे जे यंत्रसामुग्री चालवायला घेतात खाजगी रुग्णालयाप्रमाणे ते २ ते ४ हजार रुपये द्या अशी मागणी करतात. पण शासन ती मागणी मान्य करीत नाही. त्यामुळे यंत्र बंद राहते. त्यामुळे ज्या ठिकाणी कर्मचारी वर्ग असेल तेथेच यंत्रसामुग्री द्यावी अशी देखील सूचना समितीने केली.

१२.७३ जेथे यंत्रसामुग्रीचा वापर आऊटसोर्सिंग पध्दतीने करण्यात येतो तेथील काय अनुभव आहे, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, अंबेजोगाईला १० वर्षे अशाप्रकारे यंत्रे चालविली पण १० वर्षानंतर त्यांनी वाढीव पैसे मागितले व ते समर्थनीय होते. परंतु शासनाने त्यांची मागणी मान्य न केल्यामुळे सद्यस्थितीत अंबाजोगाई येथील यंत्रे बंद आहेत.

१२.७४ यांसदर्भात समितीने असे सूचित केले की, विभागाने सुध्दा व्यवहार्य विचार केला पाहिजे. कारण १० वर्षानी पैसे वाढवून मागितले असतील तर ते समर्थनीय होते.

१२.७५ महाराष्ट्रात कोणकोणत्या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाचे कार्यक्षेत्र आहे. यासंदर्भात विभागाकडून असे सांगण्यात आले की, महाराष्ट्रामध्ये वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभागातंर्गत १९ रुग्णालये आहेत. जे.जे. रुग्णालय, सेंट जॉर्जेस रुग्णालय, जी.टी. रुग्णालय, कामा रुग्णालय ही ४ रुग्णालये मुंबईमध्ये आहेत. पुण्याला ससून रुग्णालय आहे. नागपूर, अकोला, यवतमाळ धुळे, सोलापूर, मिरज, सांगली, कोल्हापूर, इत्यादी ठिकाणी रुग्णालये आहेत. प्रत्येक जिल्हयामध्ये वैद्यकीय महाविद्यालय काढण्याचे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने शासनाने नवीन जी ७ वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचे ठरविले त्यामध्ये नंदुरबार, बारामती, गोंदिया, चंद्रपूर इत्यादी ठिकाणे दिलेली आहेत. जी ७ वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याचे शासनाने ठरविले आहे, त्यामध्ये कोकणातील ३ जिल्हयाचा समावेश नाही परंतु कोणी खाजगी मेडिकल कॉलेज काढणार असेल तर त्यांना प्रोत्साहन देण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे. असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

१२.७६ राज्यातील कोणत्या रुग्णालयासाठी व कोणती यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली याबाबत विभागीय सचिवांनी त्यांनी आणलेली माहितीची प्रत समितीस सादर केली. सदर यंत्रसामुग्रीची सद्यस्थिती काय आहे. त्याचे पैसे शासन भरते का तसेच देखभाल दुरुस्तीचे पैसे शासन भरते का ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सर्व यंत्रसामुग्री घेताना एएमसी आणि सीएमसी केली जाते.

मशिनरी ते वापरतात जे दारिद्रय रेषेखालील रुग्ण नाहीत त्यांच्याकडून जे नाममात्र चार्जेस घेतो त्यातून आपण यंत्रसामुग्रीची देखभाल दुरुस्ती करतो.

१२.७७ मशीन १० वर्षे जुनी झाली ती मशीन कधी नादुरुस्त होते आणि नवीन मशीन केव्हा खरेदी केली जाते याबाबत विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, मशीनचे आयुष्य सरासरी ७ वर्ष धरतो. ७ वर्षानंतर जे अपग्रेडेट मॉडेल येईल त्याप्रमाणे संबंधितांना मशीन अपग्रेड करुन द्यावी अशी अट असते.

१२.७८ राज्यात कोटयवधी रुपये खर्च करुन कोणती यंत्रसामुग्री विकत घेण्यात आली असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मशिन निहाय माहिती लेखी स्वरुपात दिलेली आहे.

१२.७९ वित्त व लेखा सेवेतील अधिकाऱ्यांचा समावेश यंत्रसामुग्री खरेदीची प्रक्रिया पार पाडताना करण्यात येतो काय, नसल्यास त्यांची कारणे काय यावर मशिनरी खरेदी करण्याकरिता राज्य स्तरावर एक खरेदी समिती तयार केलेली आहे. विविध खात्यामधील अधिकारी या समितीचे सदस्य असतात. असे विभागीय सचिवांकडून सांगण्यात आले.

१२.८० अनेक वैद्यकीय संस्थांमध्ये यंत्रसामुग्रीमध्ये दोष असल्याचे दिसून येत असल्याने याबाबत चौकशी केली आहे काय, असे समितीने विचारले असता याबाबत शासनाने यंत्रसामुग्री खरेदी करताना करार केलेला असतो. असे विभागीय सचिवांनी सांगितले. प्रधानशिर्ष ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य या अंतर्गत रु. ३६८.१६ लाख खर्च करुन कोणती उपकरणे खरेदी करण्यात आली त्याची सद्य:स्थिती काय आहे. असे समितीने विचारले असता ? कोणते रुग्णालय तपासावे. रुग्णालय पुणे येथे २ कोटी ३ लक्ष रुपये खर्च करुन ऑक्सीजन टँक व पाईपलाईन खरेदी केली होती. त्यावेळी सर्व कार्यपध्दती पाळण्यात आली असून सध्या ही यंत्रसामुग्री कार्यरत आहे. पूर्वी प्रत्येक खाटेच्या बाजूला सिंलेडर लावून त्याद्वारे रुग्णांना ऑक्सिजनचा पुरवठा केला जात असे. या करिता अधिक खर्च येत होता. आता बाहेर ऑक्सिजन टँक तयार केली असून दोन दिवसातून एकदा ही टँक भरली जाते. या टँकची क्षमता ६ हजार लिटर आहे. रुग्णालयातील प्रत्येक खाटेजवळ पाईपलाईनचे कनेक्शन देण्यात आलेले आहे. या टँकमधून रुग्णालयातील प्रत्येक खाटेजवळ पाईपलाईनचे कनेक्शन देण्यात आलेले आहे. या टँकमधून प्रत्येक रुग्णाला पाईपद्वारे ऑक्सिजनचा पुरवठा केला जातो. ऑक्सिजन प्रणालीमुळे बचत झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

१२.८१ या प्रणालीमुळे बचत झाली असेल तर त्यासंदर्भातील आकडेवारी समितीस सादर करावी. असे निदेश समितीने विभागास दिले परंतु विभागाकडून माहिती अप्राप्त आहे.

१२.८२ अन्न व औषध प्रशासनाच्या औषध नियंत्रण प्रयोगशाळेतील उपकरणे खरेदी संदर्भात पुरेशा प्रतिसादाअभावी खर्ची न पडलेला निधी प्रत्यर्पित करण्यात आला.ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, विभागाने प्रयोगशाळेकरिता कार्यक्रम

आखलेला असून या बाबत नंतर सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले परंतु विभागाकडून माहिती अद्याप अप्राप्त आहे.

१२.८३ पुणे येथील ससून रुग्णालयात रेग्युलर कार्डीओलॉजीस्ट उपलब्ध नसल्याने ही कॅथलॅब सध्या पूर्णपणे बंद आहे. याकरिता ६ कोटी रुपयांचे बजेट आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले खर्च करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीचा निधी वापरता येऊ शकतो. जिल्हा नियोजन समिती माध्यमातून नागपूर जिल्हयामध्ये ६ ते ८ कोटी रुपयांचे काम केलेले आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

१२.८४ अन्न व औषध प्रशासन या विभागाकरिता ४ कोटी रुपयांचे बजेट देण्यात आले होते. त्यापैकी ३ कोटी ६८ लक्ष रुपये खर्च झाले असून ३१ लक्ष रुपये खर्च होऊ शकले नाहीत. मशिनरी खरेदी करण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या मात्र त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला नाही. यानंतर मुदतवाढ देण्यात आली. तरी देखील प्रतिसाद न मिळाल्यामुळे ही रक्कम खर्च होऊ शकली नाही. उर्वरित सर्व रक्कम पुर्णपणे खर्च झालेली आहे. सर्व मशीन्स लॅबमध्ये आल्या असून त्या कार्यरत आहेत. असे विभागीय प्रतिनिधीनी माहिती दिली.

१२.८५ कोणकोणती यंत्रे खरेदी करण्यात आली ? किती रकमेची यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, स्पेक्ट्रोमीटर, इनक्युबीटर इ. ४९ यंत्रे खरेदी करण्यात आली असून ती सर्व यंत्रे कार्यरत आहेत. यंत्रसामुग्री खरेदी करण्याकरिता एकूण ४ कोटी रुपयांचे बजेट होते. त्यापैकी ३ कोटी ७० लाख रुपयांची यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली.

१२.८६ शासनाने जेनेरीक औषधांच्या संदर्भात इसेन्शियल ड्रग्ज लिस्ट तयार केलेली आहे. या औषधांच्या खरेदीकरिता टेंडर काढले जाते. अनेक वर्षापासून अशा प्रकारे खरेदी करुन शासकीय रुग्णालयांमध्ये जेनेरीक औषधांचा पुरवठा केला जातो. शासकीय रुग्णालयांमध्ये जेनेरीक औषधे वापरली जातात मग सर्वसामान्य रुग्णांकरिता ही औषधे का उपलब्ध करुन दिली जात नाही. याबाबत खाजगी रुग्णालयातील डॉक्टरर्स जेनेरीक औषधाऐवजी ब्रँडेड औषधे सुचवितात. त्यांनी रुग्णांना कोणती औषधे लिहून द्यावीत, यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसते. जेनेरीक औषधे लिहून देण्याकरिता आपण त्यांना नैतिक दृष्टीने सांगू शकतो. मात्र त्यांच्यावर सक्ती करु शकत नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले

१२.८७ औषधांच्या किंमतीवर सध्या केंद्र शासनाने बरेच नियंत्रण आणले आहे. या औषधांवर अन्न व औषध प्रशासन विभागाचे काही वेगळे नियंत्रण आहे काय या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग काय कार्यवाही करीत आहे अशी समितीने विचारणा केली असता केंद्र शासनाने ३४८ अत्यावश्यक औषधांच्या किमतीवर नियंत्रण आणले असून आता ही औषधे बाजारात उपलब्ध आहेत. डॉक्टरांनी औषधांचा ब्रँड लिहून

दिल्यास त्याचे जेनेरिक औषधे दुकानदारांनी उपलब्ध करुन दिले पाहिजे. असा कायदा आहे. औषधाचा ब्रँड सोबत जेनेरीक नाव लिहिले तर चुका कमी होऊ शकतील. ही सुधारणा केल्यास अनेक रुग्णांना खूप मोठा फायदा होऊ शकतो तसेच विभागाने ॲलोपथी व आयुर्वेद या शाखामधील निरनिराळया व्यक्तींची समिती तयार केली असून त्यांनी तयार केलेला अहवाल शासनास सादर केला जाणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१२.८८ जेनेरिक सर्जिकल इन्स्टुमेंट बाबत देखील कायदा अस्तित्वात असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले, मागील वेळी अंबेजोगाई येथील कर्मचाऱ्यांनी अफरातफर केल्याचा मुद्दा महालेखाकारांनी समितीसमोर उपस्थित केला होता. त्यावर समितीने बरीच चर्चा केली. या प्रकरणास आता ७ ते ८ महिने झाले असतील. आपल्याच नातेवाईकांच्या नावाने खोटी बिले दाखवून कर्मचाऱ्यांनी पैसे घेतले होते. आता त्या कर्मचाऱ्यांकडून सर्व रक्कम वसूल झाली आहे. साधारणपणे १२ लाख रुपयांची अफरातफर झाली असून आता ही सर्व रक्कम वसूल झाली आहे. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सागितले की, हा विषय सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित असून त्या विभागाचा चार्ज देखील माझ्याकडे आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, आम्ही केवळ रकमेची वसुली करुन थांबणार नसून दोषी कर्मचाऱ्यांच्या विरुध्द चार्जशिट देखील इश्यू केली जाणार आहे. संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई देखील प्रस्तावित केलेली आहे. असे गैरप्रकार थांबण्याकरिता कर्मचाऱ्यांना योग्य ती शिक्षा झालीच पाहिजे. आता रकमेची वसुली पूर्णपणे झाली असल्याने त्यांचे निलंबन मागे घेण्यास हरकत नाही. त्यांच्यावरील विभागीय चौकशीचा अहवाल समितीसमोर सादर करावा असे निदेश समितीने दिले व ते विभागीय सचिवांनी मान्य केलेले अहवाल अद्याप समितीस अप्राप्त आहेत.

१२.८९ या पूर्वी देखील अनेक प्रकरणामध्ये लोकांनी शासनाला बोगस बिले सादर केली त्यावर पुढे काहीच कार्यवाही होत नाही. अन्न व औषध प्रशासन विभागाचे सर्व जिल्हयामध्ये कार्यालय आहे काय तसेच दिवाळी सणामध्ये मोठया प्रमाणात निकृष्ट दर्जाचा मावा राज्यात येतो. त्यासंदर्भात आपल्या विभागाकडून कोणती कारवाई केली जात आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, नवीन तयार झालेल्या जिल्हयामध्ये अद्याप कार्यालय सुरु झालेले नाही. गोंदिया जिल्हयात कार्यालय सुरु झालेले नसून इतर जिल्हयामध्ये कार्यालय आहे. साधारणपणे गुजरात राज्यामधून निकृष्ट दर्जाचा मावा आपल्या राज्यात येतो. ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचा मावा येतो. तेथून माव्याचा नमूना घेऊन त्यांची तपासणी करण्याकरिता विभागाने प्रणाली तयार केली असून सध्या हे काम सुरु आहे. तसेच पुढे विभागाने

असेही सांगितले की, विभागात २५८ पोलीस कर्मचारी असून १३० औषधिद्रव्ये तपासणीस आहेत. संपूर्ण राज्यातील लोकसंख्येच्या मानाने ही कर्मचारी संख्या अतिशय तुटपुंजी आहे.

समितीचे अभिप्राय :-

१२.९० शासकीय रुग्णालयातील डॉक्टर्सकडून अद्ययावत यंत्रसामुग्रीची मागणी करण्यात येते. तथापि यंत्रसामुग्रीची मागणी करणाऱ्या डॉक्टरची बदली झाल्यानंतर ती यंत्रसामुग्री बंद रहाते हे योग्य नाही. कारण महत्त्वाची यंत्रसामुग्री लाखो रुपये खर्च करुन खरेदी केली जाते. ज्यावेळी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात येते त्यावेळी ती चालविण्यासाठी लागणारी तज्ञ व्यक्ती सतत त्या ठिकाणी उपलब्ध असली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

१२.९१ शासनाकडून किडनी, कॅन्सर, हार्टच्या संदर्भात चांगली यंत्रसामुग्री घेण्यात येते. त्याची किंमत २ कोटी ते १० कोटी रुपयांपर्यंत असते. पण त्यांचा वापर आऊटसोर्सींग पध्दतीने करण्यात येतो. ज्यांना यंत्रसामुग्री चालविण्यास देतात ते काही काळ यंत्रसामुग्री चालवितात आणि नंतर जास्त पैशाची मागणी करतात. तथापि यंत्रसामुग्री रुग्णांना स्वस्त दरात उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी खरेदी करण्यात आलेली असते. खाजगी रुग्णालयामध्ये त्या उपचारासाठी २ ते ४ हजार रुपयांचा खर्च येतो आणि शासकीय रुग्णालयात केवळ २०० ते ४०० रुपयेच खर्च येतो. त्यामुळे यंत्रसामुग्री चालवायला घेतात ते खाजगी रुग्णालयाप्रमाणे ते २ ते ४ हजार रुपये द्यावेत अशी मागणी करतात. परंतु शासनाकडून ती मागणी मान्य न झाल्यामुळे मशीन विनावापर पडून राहते. त्यामुळे ज्या ठिकाणी कायमस्वरुपी प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असेल तेथेच यंत्रसामुग्री देण्यात यावी.

समितीच्या शिफारशी :-

१२.९२ शिफारस क्र. (१) वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग या दोन विभागांतर्गत राज्यात अनेक शासकीय रुग्णालये कार्यरत आहेत. या विभागांकडून शासनास मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त जरी होत नसला तरी राज्यातील सामान्य व गरीब जनतेला वैद्यकीय सुविधांसारख्या अत्यावश्यक सेवा पुरविण्याचे महत्वाचे काम या विभागांतर्गत हाताळले जाते. सद्य:स्थितीत खाजगी रुग्णालयांमधून वैद्यकीय उपचार घेणे हे सर्वसामान्य जनतेला अशक्य झालेली बाब आहे. अशा परिस्थितीत शासकीय वैद्यकीय यंत्रणा अधिक तत्पर, सक्षम व अद्ययावत करणे व त्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचविणे हे महत्वाचे उद्दिष्ट या विभागांचे असताना अनेक कारणांमुळे स्थानिक पातळीवर वैद्यकीय सुविधा पुरविण्यास अपयशी ठरतात. परिणामी नागरिकांची क्षमता नसतांनाही अपरिहार्यरित्या खाजगी रुग्णालयाकडे वळावे लागते

ही आजची राज्याची परिस्थिती आहे. काही ठिकाणी रुग्णालयांसाठी जागा नाही, निधी नाही, डॉक्टर्स नाही, अद्ययावत यंत्रसामुग्री नाही, यंत्रसामुग्री असेल तर ती चालविण्यास तज्ञ व्यक्ती नाही, यंत्रसामुग्री आहे पण बंद अवस्थेत आहे. अशा अनेक समस्यांमधून राज्यातील शासकीय रुग्णालये जात आहेत अशा परिस्थितीमध्ये लोकांना उत्कृष्ठ सेवा देणे हा मुळ उद्देशच बाजूला राहतो असे समितीचे स्पष्ट मत आहे. उपरोक्त सर्व बाबींचे योग्य नियोजन करुन यंत्रणा सक्षम करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे समितीला वाटते व याचे नियोजन करण्याची संपूर्ण जबाबदारी ही विभागाचीच आहे. तसेच त्यासाठी मनुष्यबळ (तांत्रिक) उपलब्ध होणे ही आवश्यक आहे. अत: राज्यातील रुग्णालयांचा पूर्ण आढावा घेऊन रुग्णालये अधिकाधिक सक्षमतेने कसे चालू शकतील याबाबत कार्यपध्दती आखण्यात यावी व त्याबाबत माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१२.९३ शिफारस क्र. (२) जेनेरिक औषधे बाजारात उपलब्ध असतांना ब्रँन्डेड औषधे डॉक्टरांकडून लिहून दिली जातात. ती अत्यंत महागडी असून सर्वसामान्य जनतेला ते घेणे न परवडणारे असते. अशा परिस्थितीत औषधे लिहून देतांना त्यांची जेनेरिक नावे देखिल लिहून देणेबाबत डॉक्टरांवर निर्बध घालता येईल किंवा कसे याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व योग्य त्या मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात अशी समितीची शिफारस आहे.

१२.९४ शिफारस क्र. (३) अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात युनिट स्थापन करण्यासाठी विविध उपकरणे खरेदी करण्यासाठी पुरक मागणीव्दारे निधी उपलब्ध करुन घेण्यात आला व युनिट स्थापन करण्यात आले. त्याची सद्य: स्थिती काय आहे समितीला अवगत करावी तसेच किडनी, कॅन्सर, हदय रोग, यासंदर्भात सुमारे २ कोटी ते १० कोटी रुपयापर्यंतची अद्ययावत यंत्रसामुग्री खरेदी करण्याचा उद्देश रुग्णांना स्वस्तात उपचार उपलब्ध व्हावेत हा असतो. तथापि प्रशिक्षित डॉक्टर/कर्मचारी यांच्याअभावी सदर यंत्रसामुग्री बंद पडून रहाते, व अशा प्रकारे शासनाचा खर्च निष्फळ होऊ नये म्हणून शासन स्तरावरुन ज्यावेळी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात येते त्यावेळी सदर यंत्र चालविण्यास लागणारे मनुष्यबळ (तांत्रिक) उपलब्ध करुन देणे आवश्यक असुन त्यासाठी तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करुन रुग्णांना सेवा उपलब्ध करुन देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

१३. सहकार

१३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र.व्ही-२ "सहकार" या खाली प्रधान शीर्ष २२३०- कामगार व सेवायोजन, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, २४२५-सहकार, २८५१-ग्रामोद्योग व लघुद्योग,३४५१ सेक्रेटरीएट आर्थिक सेवा, ३४५६ नागरी पुरवठा तसेच अनुदान क्र. व्ही-३ या खाली प्रधान शीर्ष ४४२५-सहकारावरील भांडवली खर्च, ४८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग यांवरील भांडवली खर्च, ४८६०-ग्राहपयोगी वस्तू उद्योगावरील भांडवली खर्च व ५४७५-इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च "सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च" या शीर्षाखाली अधिक खर्च व बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्र.व्ही-२ "सहकार"

(रुपये हजारांत)

१३.९ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२२३०-कामगार व सेवायोजन **२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण** **२४२५-सहकार** **२८५१-ग्रामोद्योग व लघुद्योग** **३४५१ सेक्रेटरीएट आर्थिक सेवा** **३४५६ नागरी पुरवठा** **दत्तमत-** मुळ ..... २८,२५,५६,९० पुरक ..... १,७४,९९,३० वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (डिसेंबर-२००९, रु.११,८६,२६ हजार व ७,४४,७१,०२ मार्च, २०१० : रु.७,३२,८४,७६ हजार)	३०,००,५६,२०	२२,६८,९७,२४	(-) ७,३१,५८,९६ ११,२०,५८ (-) ४,३८,६९

भारित मूळ ---- २,१४ पूरक ---- ४,३६,८० वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च, २०१०)	४,३८,९४	२५	९१

टीपा व भाष्ये :-

अनुदानातील खर्च मूळ तरतुदीएवढा देखील झाला नाही.

२. अनुदानातील रु.७३१५८.९६ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, रु.१७४९९.३० लाख इतकी पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले ती लाक्षणिक मागणीने निर्बंधित करता आली असती.

३. अनुदानातील रु.७३१५८.९६ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, रु.७४४७१.०२ लाख इतका परत करण्यात आलेला निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

सदर बाबतची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने खालीलप्रमाणे आहेत :-

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२४२५- सहकार **००१ -** संचालक व प्रशासन **००१ (०१) (०३) -**पणन संचालक मुळ १,४६.२१ पुनर्विनियोजन (-) २५.६७	१,२०.५४	१,३०.७६	(+)१०.२२

टीपा व भाष्ये :-

रु.१०.२२ लाखांचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, मार्च, २०१० मध्ये कोणतेही विशिष्ट कारण न देता, आणि सुधारित अंदाजाच्या आधारावर प्रत्यार्पण/पुनर्विनियोजन याद्वारे काढण्यात आलेला रु.२५.६४ लाख इतका निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

रु.१०.२२ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.३ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अंतिम तरतूदीपेक्षा रु.१०.२२ हजार जादा खर्च झालेला आहे. सदरचा खर्च हा वेतन आयोगाच्या फरक दरवर्षी होणारी महागाई भत्त्यातील वाढ रिक्त असलेली पदे भरल्याने व त्या अनुषंगाने मागणी करण्यात आलेली तरतूद पुरेशी नसल्याने जादाचा खर्च झाल्याचे दिसते.

(रुपये लाखांत)

१३.४ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
००१ - संचालन व प्रशासन **००१ (०१) (०४) -** हातमाग, यंत्रमाग व सहकारी वस्त्रनिर्माण संचालनालय मुळ ४,०९.४४ पुनर्विनियोजन (-) १६.३५	३,९३.०९	३.९६.७०	(+) ३.६१

ज्ञापन :

१३.५ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

संचालनालयाने दर्शविलेली प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी ही वेतन या लेखाशीर्षांतर्गत झालेल्या खर्चाची आकडेवारी आहे. तसेच संचालनालयाने रु.३.६१ इतकी रक्कम बजेटेड झाली असल्याबाबत शासनास कळविले असून सदरची रक्कम संचालनालयाचे वेतन शीर्षात दर्शविलेली आहे. परंतु प्रत्यक्षात सदरची रक्कम (रु.३.६१) ही मुख्य लेखाशीर्ष २४२५००६७ असून ती मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचे खात्यातील आहे व सदरची रक्कम सहकार आयुक्त, पुणे कार्यालयाकडे दर्शविण्याबाबत संचालनालयाचे पत्र दिनांक २४ नोव्हेंबर, २०१० अन्वये नोट ऑफ एरर द्वारे महालेखाकार कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.

(रुपये लाखांत)

१३.६ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
००१ - संचालन व प्रशासन **००१ (०१) (१३) -** रेशीम संचालनालय मुळ १३,८७.७६ पूरक १५,००.०० पुनर्विनियोजन (-) ५,४६.३१	२३,४१.४५	२३,३८.३७	(-) ३.०८

ज्ञापन :

१३.७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-२०१० या वित्तीय वर्षात मागणी क्र.व्ही.-२ मुख्य लेखाशीर्ष २४२५, सहकार, ००१ (०१) (१३) (२४२५१३४१) योजनेतर या अंतर्गत शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. अंदाज-१००९/प्र.क्र.६६/१७-स, दिनांक १३.४.२००९ अन्वये रेशीम संचालनालयास रु.१३८७.७६ लक्षची मूळ अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली. यानंतर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग पत्र क्र.पूरक-१००८/प्र.क्र.६६/१७-स, दिनांक ६ जुलै, २००९ अन्वये अर्थसंकल्पीय अधिवेशन (जून,२००९) पूरक मागणीद्वारे शेतकऱ्यांचे कोष खरेदी करण्यासाठी रु.१५००.०० लक्ष तरतूद मंजूर करण्यात आली. ८ महिन्यांच्या खर्चाचे अंदाज पडताळून सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग पत्र क्र.आरइएस-२४२५-१०/- प्र.क्र.५६/१७-स, दि.३०.३.२०१० अन्वये ०१ वेतन व अन्य उद्दिष्टांमध्ये रु.(+) ३६.८२ लक्ष वाढीव तरतूद मंजूर करुन एकूण रु.२९२४.५८ लक्षाची तरतूद मंजूर करण्यात आली. मात्र परप्रांतात कोषांचे दर वाढल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात कोषांची विक्री परप्रांतात (कर्नाटक/आंध्रप्रदेश) येथे केल्यामुळे कोष खरेदीपोटी उपलब्ध तरतूद पूर्णपणे खर्ची पडलेली नाही. त्यामुळे ५० इतर खर्च (कोष खरेदी) या उद्दिष्टामध्ये रु.५४८.२३ लक्षची तरतूद वेळीच समर्पित करण्यात आली आहे. यानुसार सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग पत्र क्र.आरइएस-२४२५-१०/प्र.क्र.५६/१७-स, दिनांक ३१.३.२०१० अन्वये तरतूदीचे अंतिम पुनर्विनियोजन तसेच प्रत्यार्पण करुन रु.२३४१.४५ लक्षची अंतिम तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे एकूण रु.२३४१.४५ लक्ष मंजूर झालेल्या तरतुदीच्या अनुषंगाने महालेखापाल कार्यालयास खर्चमेळाची कार्यवाही करुन रु.२३३८.३७ लक्ष इतक्या खर्चाची नोंद झालेली आहे. प्रत्यक्ष खर्च रु.२३३८.३७

लक्ष झाल्यानुसार उर्वरित रु.(-) ३.०८ लक्ष ०१ वेतन या उद्दिष्टमध्ये खर्च कमी झाल्यामुळे बचत झालेली आहे. सदरील बचत ही १% पेक्षाही कमी आहे.

(रुपये लाखांत)

१३.८ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०७ -सहकारी पतसंस्थांना सहाय्य **१०७ (०२) (०८) -** ग्रामीण सहकारी पतसंस्थांना वैद्यनाथन समितीच्या अहवालनानुसार अर्थसहाय्य मुळ ११,६५.३३ पुनर्विनियोजन (-) ११,६५.३३	-----	-----	-------

टीपा व भाष्ये :-

कोणतेही विशिष्ट कारण न देता वर नमूद केलेल्या शीर्षाखाली प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाद्वारे रु.१७२७.९९ लाख एवढा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :

१३.९ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० या वर्षाकरिता सदर योजनेसाठी रु.११,६५.३३ लाख एवढी अर्थसंकल्पीय तरतूद लेखा अनुदानात मंजूर होती. तथापि, सदर वर्षातील पावसाळी अधिवेशनामध्ये लेखानुदान म्हणून १/३ रक्कम खर्च करण्यास मंत्रिमंडळ नियोजन उप समितीने दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ च्या बैठकीत मान्यता दिल्याप्रमाणे सन २००८-०९ च्या मंजूर तरतूदीच्या १/३ इतकी रक्कम सन २००९-१० करिता मंजूर करुन तरतूदी मान्य केल्या. तथापि, सन २००९-१० साठी योजनानिहाय मंजूरी देताना ज्या योजनांना निधी मंजूर झाला नाही अशा योजनांना लेखानुदानाद्वारे प्राप्त झालेला निधी खर्च न करता समर्पित करण्यात यावा अशा सूचना नियोजन विभागाने त्याच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २००९ च्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत. त्यामुळे रु.११,६५.३३ लाख या मूळ तरतूदीपैकी रु.११,१५.३३ लाख एवढा निधी शासन निर्णय क्र.संकिर्ण - १००९/प्र.क्र.१२१/१७-स, दिनांक २९.१२.२००९ अन्वये प्रत्यार्पित करण्यात येऊन रु.५०.०० लाख इतकी शिल्लक तरतूद अर्थसंकल्पित होती. तथापि, सदर वर्षात वित्त विभागाकडून सुधारित अंदाज रु.९३२.२६ लाख मंजूर झाले. तथापि, केंद्र शासनाकडून आवश्यक तो निधी प्राप्त न झाल्यामुळे राज्य हिश्श्याची रक्कम खर्च

करता आली नाही. परिणामी रु.९३२.२६ लाख ही देखील शासन निर्णय क्र.आरईएस-२४२५-१०/प्र.क्र.५६/१७ स, दिनांक ३१ मार्च, २०१० अन्वये प्रत्यार्पित करण्यात आली.

(रुपये लाखांत)

१३.१० शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०१-संचालन व प्रशासन **००१ (०१) (०७)** वसुलीच्या कामाकरिता मुळ ७५.८५ पुनर्विनियोजन (-) ४६.८३		३२.३८	(+)३.३६

टीपा व भाष्ये :-

अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्याने मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यार्पणाद्वारे रु.४६.८३ लाख एवढा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :

१३.११ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जादा खर्च अगर बचतीची कारणे खालीलप्रमाणे :-

१. माहे मार्च, २०१० मध्ये सातारा कोषागारासाठी रु.२४.३०८/- लेखाशीर्ष २४२५ ००६७ मधून रक्कम वर्ग करण्यासाठी सादर केलेली T.E.Adjust न झाल्याने फरक दिसून येतो.

२. शासनास वेळोवेळी या अंतिम खर्च कळवितांना क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त अहवाल दूरध्वनीवरुन आकडे घेऊन संकलन करुन शासनास खर्च कळविण्यात आला आहे.

३. शासनाला आपण कळविलेल्या अंतिम खर्चानुसार शासनाने अंतिम सुधारीत अनुदान ठेवलेले आहे. प्रत्यक्षात खर्च अधिक झाल्याने अनुदान कमी पडलेले आहे. कळविलेला खर्च क्षेत्रीय कार्यालयाचे खर्चाची आकडेवारी चुकल्यामुळे कमी कळविला गेला आहे.

(रुपये लाखांत)

१३.१२ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
००१संचालन व प्रशासन **००१ (०१) (०९)** महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय मुळ १,४९.१९ पुनर्विनियोजन (-) २१.९९	१,२७.२०	१,१४.०३	(-) १३.१७

टीपा व भाष्ये :-

कोणतेही विशिष्ट कारण न देता मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यार्पणाद्वारे रु.२१.१९ लाख एवढा निधी काढण्यात आला.

रु.१३.१७ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.१३ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

रु.१३.०० लाखाचे पुणे खंडपीठाचे जागा भाडे देयक मार्च, २०१० अखेरीस आक्षेप लागून परत आल्याने बचत झालेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.१४ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
०१-संचालन व प्रशासन **००१ (०१) (१०)** सहकारी न्यायालयांसाठी कर्मचारी वर्ग मुळ ३,८२.१९ पुनर्विनियोजन (-) ४०.३७	३,४१.८२	३,६५.५४	(+) २३.७२

टीपा व भाष्ये :-

रु.२३.७२ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता आणि कोणतेही विशिष्ट कारण न देता, मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यार्पणाद्वारे काढण्यात आलेला रु.४०.६७ लाख इतका निधी अवास्तव असल्याचे सिध्द झाले.

रु.२३.७२ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.१५ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-१० च्या विनियोजन लेखे अहवालात उपरोक्त लेखाशीर्षाखाली रु.३,४१.८२ एवढे एकूण अनुदान दर्शविले असून रु.३,६५,५४ एवढा प्रत्यक्ष खर्च दर्शविलेला आहे. त्यानुसार रु.२३.७२ एवढा खर्च अधिक झाला असल्याचे दर्शविलेले आहे. तथापि, उपरोक्त लेखाशीर्षाखाली रु.३,५९,१० एवढे अर्थसंकल्पीय अंदाज मंजूर असून रु.३६८.६० चे सुधारित अंदाज मंजूर झालेले आहेत. तसेच उपरोक्त मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद लक्षात घेऊन रु.३,४४,६८ एवढा खर्च झालेला आहे. तसेच सदरचा खर्च सहकार न्यायालयातील न्यायाधीश व त्यांच्या आस्थापनेखालील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील असून वाढीव महागाई भत्ता, वार्षिक वेतनवाढ व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती इ.बाबी लक्षात घेऊन सुधारित अंदाजात वाढीव तरतूद मंजूर केली असून सदर तरतूदीपेक्षा रु.२३९२ इतका कमी खर्च झालेला आहे.

(रुपये लाखांत)

१३.१६ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०७-सहकारी पतसंस्थांना सहाय्य **१०७ (०२) (०४)** डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना मुळ ३२,७९.४९ पूरक ७,२०.५१ पुनर्विनियोजन (-) ८,००.००	३२,००.००	३२,८४.१८	(+) ८४.१८

टीपा व भाष्ये :-

मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे काढण्यात आलेला रु.८०० लाख इतका निधी सुधारित अंदाजावर आधारित होता.

रु.८४.१८ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.१७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१. NOTE OF ERROR दिलेली आहे.

२. CANCELLATION OF CHEQUE चा उस्मानाबाद कोषागाराने केलेल्या जमा खर्चाची दुरुस्ती महालेखापाल, नागपूर यांनी केलेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.१८ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०७-सहकारी पतसंस्थांना सहाय्ये **१०७ (०२) (०७)** विशेष घटक योजना डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना मुळ १,२५.४८ पूरक ६०.२३ पुनर्विनियोजन (-) ४१.५२	१,४४.१९	१,२१.३१	(-) २२.८८

टीपा व भाष्ये :-

सुधारित अंदाजाच्या आधारे मार्च, २०१० मध्ये रु.४१.५२ लाख इतका निधी परत करण्यात आला. रु.२२.८८ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.१९ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

३. NOTE OF ERROR दिलेली आहे.

४. CANCELLATION OF CHEQUE चा उस्मानाबाद कोषागाराने केलेल्या जमा खर्चाची दुरुस्ती महालेखापाल, नागपूर यांनी केलेली आहे.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०७-सहकारी पतसंस्थांना सहाय्य **१०७ (०१) (१०)** शेतकऱ्यांना अल्प मुदती पीक कर्ज पुरवठा करण्यासाठी १ टक्का व्याजदराने अर्थसहाय्य			
मुळ ०,००.००			----
पुनर्विनियोजन (-) ८,५०.००	५१,५०.००	५१,५०.००	

टीपा व भाष्ये :-

कोणतेही विशिष्ट कारण न देता मार्च, २०१० मध्ये रु.८५० लाख इतकी अपेक्षित बचत परत करण्यात आली.

ज्ञापन :

१३.२० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० या वर्षाकरिता सदर योजनेसाठी रु.६०००.०० लाख इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. तथापि, त्यापैकी रु.५१५०.०० लाख इतकी रक्कम अंदाजपत्रकीय वितरण प्रणालीवर उपलब्ध होऊन खर्च करण्यात आली. उर्वरित रु.८५०.०० लाख रकमेचे पुनर्विनियोजन केलेले नसून सदर निधीचे प्रत्यार्पण करण्यात आलेले आहे. तसेच यासंदर्भात विभागातील अर्थसंकल्प शाखेचे शासन निर्णय क्र.आरईएस-२४२५-१०/ प्र.क्र.५६/१७-स, दिनांक ३१.३.२०१० अन्वये तरतुदींचे अंतिम प्रत्यार्पण आदेशामध्ये सदर रक्कम बचत झाल्यामुळे प्रत्यार्पण केल्याचे कारण नमूद केले असून सदर शासन निर्णयाची प्रत महालेखापाल कार्यालयास देखील निर्गमित झाली आहे.

(रुपये लाखांत)

१३,२१ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०७-सहकारी पतसंस्थांना सहाय्ये **१०७ (०२) (०७)** पाच एकरापेक्षा कमी पाच एकरांपेक्षा जास्त कमी धारण करणारे शेतकरी मुळ २५,२५,००.०० पुनर्विनियोजन (-) ७,१६,३४.३५	१८,०८,६५.६५	१८,०८,६५.६५	----

टीपा व भाष्ये :-

मुख्यत्वेकरुन (एक) सुधारित अंदाजाच्या आधारावर (रु.६७७००लाख) व (दोन) कोणतेही विशिष्ट कारण न देता (रु.३९३४.३५ लाख) मार्च, २०१० मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाद्वारे रु.७१६३४.३५ लाख इतका निधी काढण्यात आला.

ज्ञापन :

१३.२२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अर्थ कार्यासनाकडून रु.७१६३४.३५ लाख एवढा निधीचा आदेश पुनर्विनियोजनाद्वारे काढण्यात आलेला नाही.

(रुपये लाखांत)

१३.२३ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०८-सहकारी पतसंस्थांना सहाय्ये **१०८ (०१) (०३)** प्रतवारी विकास मूळ ४,७४.३६ पुनर्विनियोजन (-) ७८.२३	३,९६.१३	३,८६.२८	(-)९.८५

टीपा व भाष्ये :-

कोणतेही विशिष्ट कारण न देता आणि तसेच सुधारित अंदाजाच्या आधारावर मार्च, २०१० मार्च पुनर्विनियोजन/प्रत्यार्पणाद्वारे रु.७८.२३ लाख इतकी निधी काढण्यात आला.

रु.९.८५ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत.(ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.२४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अंतिम तरतुदीपेक्षा रु.९.८५ लाख कमी खर्च झालेला आहे. सदरचा खर्च वेतन उद्दिष्टाखाली झालेला आहे. सदरचा कमी झालेला खर्च नगण्य असून तो ग्राहय धरण्यात यावा.

(रुपये लाखांत)

१३.२५ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२४२५-सहकार १०८-इतर सहकारी संस्थांना सहाय्य **१०८ (०३) (०८)** अनुसूचित जातीतील व्यक्तींसाठी विशेष खरेदी योजना साखर कारखान्यांचे शेअर खरेदी करण्यासाठी अनुसूचित जातींना व नवबौध्दांना अर्थसहाय्य मुळ २१.५५ पूरक ७.४५ पुनर्विनियोजन (-) १६.३१	१२.६९	१५.२०	(+)२.५१

टीपा व भाष्ये :-

मुख्यत्वेकरुन (एक) सुधारित अंदाजांच्या आधारावर (रु.५.८०लाख) आणि (दोन) कोणतेही विशिष्ट कारण न देता (रु.१०.५१ लाख) मार्च, २०१० मध्ये रु.१६.३१ लाख इतका निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :

१३.२६ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र.विजिसक अको/जा.उ.यो/पुनर्विनियोजन/०९-१०/२५२/१०, दिनांक १०.३.२०१० अन्वये अनुसूचित जाती/जमाती व नवबौध्द यांना सहकारी साखर कारखान्याचे भागभांडवल खरेदी अर्थसहाय्य या योजनेखाली अनुदान या शीर्षाखाली रु.२.५० लाख इतकी जादा मागणी मंजूर झालेली आहे. त्यामुळे रु.१२.६९ ही रक्कम मंजूर अनुदानाप्रमाणे खर्च होऊनसुध्दा अनुदान या योजनेखाली रु.१५.२० लाख इतका खर्च झाल्याचे दिसून येते. ही जादा रक्कम समाजकल्याण कार्यालयाकडून उपलब्ध करण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष मंजूर अनुदानापैकी नाही असे दिसून येते.

(रुपये लाखांत)

१३.२७ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२४२५-सहकार १०८-इतर सहकारी संस्थांना सहाय्य **१०८ (०४) (०२)** सहकारी सूत गिरण्यांचे शेअर खरेदी करण्यासाठी अनुसूचित जातीं व नवबौध्दांना अर्थसहाय्य मुळ ३३.९७ पूरक २.०३ पुनर्विनियोजन (-) ३६.००	----	----	----

टीपा व भाष्ये :-

मार्च, २०१० मध्ये प्रत्यार्पणाद्वारे रु.३६ लाख इतक्या रकमेने झालेली अपेक्षित बचत, मुख्यत्वेकरुन (एक) सुधारित अंदाजांच्या आधारावर (रु.७.२० लाख) व (दोन) कोणतेही कारण न देता, (रु.२८.८० लाख) यामुळे झाली.

ज्ञापन :

१३.२८ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० या वर्षाकरिता प्रधान लेखाशीर्ष २४२५ सहकार, १०८ इतर सहकारी संस्थांना सहाय्य (०४) (०२) सहकारी सूत गिरण्यांचे शेअर खरेदीसाठी अनुसूचित जाती व नवबौध्दांना अर्थसहाय्य या खाली मूळ तरतूद रु.३३.९७ लाख व पूरक मागणीद्वारे रु.२.०३ लाख इतकी तरतूद अशी एकूण रु. ३६.०० लाख इतकी तरतूद प्राप्त झाली होती. सुधारित अंदाजाद्वारे या रकमपैकी रु.२८.८० लाख इतकी तरतूद प्राप्त

झाली. या अनुषंगाने रु.७.२० लाख इतक्या तरतूदींच्या प्रत्यार्पणाचे आदेश क्र.आरईएस-२४२५-१०/प्र.क्र.६०/१७-स, दिनांक ३०.३.२०१० अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सुधारित अंदाजानंतर विभागाकडे असणारी तरतूद रु.२८.८० लाख इतकी होती. प्रस्तुत योजनेच्या अनुषंगाने लाभार्थ्यांची जे निकष ठरविण्यात आले होते. त्या निकषानुसार प्रस्ताव प्राप्त न झाल्याने म्हणजेच अर्थसहाय्यासाठी संस्था प्राप्त नसल्याने त्यांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले नाही. त्यामुळे तरतूद रु.२८.८० लाख दिनांक ३१.३.२०१० च्या आदेशान्वये प्रत्यार्पित करण्यात आले आहेत.

(रुपये लाखांत)

१३.२९ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२४२५-सहकार १०८-इतर सहकारी संस्थांना सहाय्य **१०८ (०५) (०२)** उपसा जलसिंचन योजनांना अर्थसहाय्य मूळ २,३३.३३ पूरक ४,६६.६७ पुनर्विनियोजन (-)१,४०.००	५,६०.००	५,६०.००	----

ज्ञापन :

१३.३० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

एकूण मंजुर अनुदान रु.५६०.०० एवढा खर्च झालेला असून या लेखाशीर्षाखाली कोणतीही बचत झालेला असून या लेखाशीर्षाखाली कोणतीही बचत वा अतिरिक्त खर्च झालेला नाही. (महालेखापाल, मुंबई यांचे पत्र क्र.लेखापरीक्षा/एएडब्ल्यू/अशासकीय संदर्भ/व्ही-२/२००९-१०/२४२५/युओआर-८३/No.१३९, दिनांक १२ ऑगस्ट, २०११ अन्वये परिच्छेदाबाबत कोणतेही आक्षेप नाहीत.

(रुपये लाखांत)

१३.३१ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग ११०-संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था **११० (०२) (४९)** रेशीम उद्योगाचा विकास मूळ ७५.०० पूरक १,७५.०० पुनर्विनियोजन (-) ३७.४७	२,१२.५३	२,१२.५३	----

टीपा व भाष्ये :-

मुख्यत्वेकरुन सुधारित अंदाजांच्या आधारावर, वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च, २०१० मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाद्वारे रु.१७७.४७ लाख इतका निधी काढण्यात आला.

ज्ञापन :

१३.३२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० या वित्तीय वर्षात मागणी क्र.व्ही-२, मुख्य लेखाशीर्ष २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, गौणशीर्ष-११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था उपशीर्ष ११०(०२) (४९) रेशीम उद्योगाचा विकास (२८५११२६९) अंतर्गत. केंद्र पुरस्कृत योजना राबविण्याबरिता शासन निर्णय क्र.सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.अंदाज-१००९/प्र.क्र.६६/१७-स, दिनांक १३.४.२००९ अन्वये रेशीम संचालनालयास रु.७५.०० लक्षची अर्थसंकल्पीय तरतूद (Token Provision) मंजूर करण्यात आली. यानंतर शासन निर्णय क्र.सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग पत्र क्र.अंदाज-१००८/प्र.क्र.६६/१७-स, दिनांक ६.७.२००९ अन्वये अर्थसंकल्पीय अधिवेशन (जून, २००९) पूरक मागणीद्वारे रु.१७५.०० लक्ष तरतूद मंजूर करुन एकूण रु.२५०.०० लक्षची अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध झाली. परंतु आठमाही सुधारित अंदाजानुसार ज्या केंद्र पुरस्कृत योजनांना मंजूरी मिळाली नाही. अशा रु.५०.०० लक्ष योजनांची तरतूद आठमाही सुधारित अंदाजानुसार शासन निर्णय क्र. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र आरईएस-२४-१०/प्र.क्र.६०/१७-स, दिनांक ३०.३.२०१० अन्वये मान्य करुन रु.५०.०० लक्षची तरतूद समर्पित करुन रु.२००.०० लक्षाची अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करण्यात आली होती. परंतु वेळेवर रु.१२.५३ लक्षाच्या केंद्र पुरस्कृत योजनांना मान्यता

मिळाल्यामुळे शासन निर्णय क्र.आरइएस-२४२५-१०/प्र.क्र.५६/१७-स, दिनांक ३१ मार्च, २०१० अन्वे पुनर्विनियोजनाद्वारे एकूण रु.२१२.५३ लक्ष ची अर्थसंकल्पीय तरतूद अंतिमत: मंजूर करण्यात आली.

यानुसार खर्चमेळाची कार्यवाहीनुसार अंतिम मंजूर झालेली एकूण तरतूद रु.२१२.५३ लक्ष अनुरुप रु.२१२.५३ लक्ष पूर्णपणे खर्च झालेला असून त्याची नोंद महालेखाकार कार्यालयास झालेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.३३ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२४२५-सहकार १०८-इतर सहकारी संस्थांना सहाय्य **१०८ (०३) (११)** गाळपविना उभ्या असलेल्या ऊसासाठी आर्थिक सहाय्य पूरक ३,३०.४८ पुनर्विनियोजन (-) ४२.३१	२,८८.१७	२,८८.१७	----

टीपा व भाष्ये :-

कोणतेही विशिष्ट कारण न देता मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रु.४२.३१ लाख इतका निधी काढण्यात आला.

ज्ञापन :

१३.३४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-२०१० मध्ये रु.३,३०,४८,००० इतकी तरतूद पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध झाली होती. गाळपविना शिल्लक राहिलेल्या ऊसाकरिता वाटप करण्यासाठी सदरची रक्कम संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्याकरिता दिनांक ३ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये रक्कम वितरीत करण्यात आली होती. सदर अनुदान जिल्हयांना वाटप करतेवेळी सन २००७-०८ मधील नांदेड व वर्धा जिल्हयांनी गाळपाअभावी शिल्लक ऊसाचे अनुदानाची रक्कम रु.५७.८ लाख अखर्चित राहिल्यामुळे परत केली होती. सदर रक्कम रु.३३०.४८ लाख वाटप करताना वापरात आणली त्यामुळे रु.३३०.४८ या रकमेतून रु.४२.३१ लाख शिल्लक राहिलेले आहे.

(रुपये लाखांत)

१३.३३ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग ११०- संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था **११० (०२) (५०)** हातमाग उद्योगाच्या विकासाकरिता सूट व इतर अर्थ सहाय्य मूळ ४६.६७ पूरक ७३.३३ पुनर्विनियोजन (-) ४८.७६	७१.२४	७१.२४	----

टीपा व भाष्ये :-

मुख्यत्वेकरुन (एक) सुधारित अंदाजांच्या आधारावर (रु.३५ लाख) व (दोन) कोणतेही विशिष्ट कारण न देता (रु.१३.७६ लाख) मार्च, २०१० मध्ये, प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाद्वारे रुपये ४८.७६ लाख एवढा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :

१३.३४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

(२६) जाहिराती व प्रसिध्दी योजनेसाठी रु.२६.६७ लाख व (०५) बक्षिसे योजनेसाठी रु.२०.०० लाख अशी एकूण रु.४६.६७ लाख मूळ तरतूद तसेच पूरक मागणी रु.७३.३३ लाख अशी एकूण रु.१२०.०० लाख तरतूद उपलब्ध झाली.

(०५) बक्षिसे योजनेसाठी फक्त रु.६.२४ लाख खर्ची पडले. रु.१३.७६ लाख पुनर्विनियोजित करण्यात आले. तसेच (२६) जाहिराती व प्रसिध्दी योजनेसाठी रु.१००.०० लाखांपैकी रु.६५.०० लाख महाराष्ट्र राज्य हातमाग व महामंडळाला वितरीत करण्यात आले व उर्वरित रु.३५.०० लाख अखर्चित रक्कम पुनर्विनियोजन करण्यात आली.

(रुपये लाखांत)

१३.३५ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग ११०- ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था **११० (०२) (४५)** रेशीम उत्पादन उद्योगाचा विकास खादी व ग्रामोद्योग मूळ २,१६.४९ पूरक ४,८३.५१ पुनर्विनियोजन (-) १,४५.४९	५,५४.५१	५,५५.२२	(+) ०.७१

टीपा व भाष्ये :-

सुधारित अंदाजाच्या आधारावर रु.१४५.४९ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :

१३.३६ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० या वित्तीय वर्षात मागणी क्र.व्ही-२ मुख्य लेखाशीर्ष २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग ११० (२) (४५) (२८५११२०४) प्लॅन अंतर्गत शासन निर्णय क्र.सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.अंदाज-१००९/प्र.क्र.६६/१७-स, दिनांक १३.४.२००९ अन्वये रेशीम संचालनालयास मूळ लेखानुदान रु.२१६.४९ लक्ष मंजूर करण्यात आले.

त्यानंतर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे शासन पत्र क्र.पूरक-१००८/प्र.क्र.६६/१७-स, दिनांक ६.७.२००९ अन्वये अर्थसंकल्पीय अधिवेशन (जून, २००९) पूरक मागणीद्वारे रु.४८३.५१ लक्ष तरतूद मंजूर करुन एकूण रु.७००.०० लक्ष अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात बिम्स प्रणालीवर रु.५६०.०० लक्षाची तरतूद उपलब्ध झाली होती. आठ महिन्याच्या सुधारित अंदाजपत्रकान्वये रु.१४०.०० लक्षची कपात केल्यामुळे शासन निर्णय क्र.आरईएस-२४२५-१०/प्र.क्र.६०/१७-स, दिनांक ३०.३.२०१० अन्वये प्रत्यार्पण करुन रु.५६०.०० लक्ष अर्थसंकल्पीय तरतूद प्रत्यक्षात मंजूर करण्यात आली. तथापि, रु. ५.४९ लक्षची तरतूद खर्च होत नसल्यामुळे शासन निर्णय क्र. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. आरईएस-२४२५-१०/प्र.क्र.५६/१७-स, दिनांक ३१.३.२०१० अन्वये प्रत्यार्पित करण्यात

आली असून दिनांक ३१ मार्च, २०१० अन्वये प्रत्यार्पित करण्यात आली असून रु.५५४.५१ लक्षाची अर्थसंकल्पीय तरतूद अंतिमत: मंजूर करण्यात आली.

संचालनालयास रु.५५४.५१ लक्षच्या अंतिमत: मंजूर झालेल्या तरतूदीमधून खर्च मेळाचे कार्यवाहीनुसार संचालनालयाचा रु.५५४.०६ लक्ष प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. तथापि, महालेखाकार कार्यालयाचे अंतिम खर्चामध्ये रु.५५५.२२ लक्ष एवढा खर्च नमूद केलेला असून यामध्ये नागपूर महालेखाकार कार्यालयाद्वारे सन २००७-०८ या वर्षातील कालबाहय धनादेशाची रक्कम रु.०.९९ लक्ष तसेच गाडी विम्याची रु.०.१७ लक्ष जादा खर्चाची नोंद करुन दर्शविलेला आहे. याकरिता रु.०.९९ व रु.०.१७ रक्कम समायोजन करण्यासाठी महालेखाकार, नागपूर कार्यालयास संचालनालयाचे महालेखाकार, नागपूर कार्यालयास संचालनालयाचे पत्र अनुक्रमे दिनांक ३.२.२०११ व दिनांक ७.१२.२०१० अन्वये कळविले आहे.

(रुपये लाखांत)

१३.३७ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग ११०- ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था **११० (०२) (५५)** प्राथमिक हातमाग विणकर सहकारी संस्थांच्या कर्जाच्या परतफेडीसाठी सहाय्यक अनुदान मूळ ४३.७४ पुनर्विनियोजन (-) ४३.७४	-----	---	---

टीपा व भाष्ये :-

रु.४३.७४ लाख इतकी संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद न वापरता तशीच राहिली आणि कोणतेही विशिष्ट कारण न देता मार्च, २०१० मध्ये परत करणे अपेक्षित होते.

(रुपये लाखांत)

शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग ११०- ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था **११० (०२) (५७)** मध्यवर्ती वित्तीय संस्थांना व्याजातून सूट मूळ १,००.०० पुनर्विनियोजन (-) ५०.००	५०.००	५०.००	---

टीपा व भाष्ये :-

कोणतेही विशिष्ट कारण न देता व सुधारित अंदाजांच्या आधारावर मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यार्पणाद्वारे रु.५० लाख इतका निधी काढण्यात आला.

ज्ञापन :

१३.३८ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासन आदेश क्र.हातमाग -२०१०/प्र.क्र.५०/टेक्स-३, दिनांक ३१.३.२०१० अन्वये वित्तीय संस्थांना व्याज अनुदान या योजनेमध्ये सन २००९-१० या आर्थिक वर्षातील सुधारित तरतूद रु.८०.०० लाखामधून रु.५०.०० लाख इतकीच रक्कम मुक्त करण्यास नियोजन व वित्त विभागाने सहमती दिलेली आहे. सबब, रु.५०.०० लाख मर्यादेतच खर्च करण्यात आला.

(रुपये लाखांत)

१३.३९ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२४२५- इतर सहकारी संस्थांना सहाय्य १०८- इतर सहकारी संस्थांना सहाय्य साखर निर्यातीसाठी आर्थिक सहाय्य **११० (०३) (१२)** सहकारी साखर कारखान्यांना साखर निर्यातीसाठी आर्थिक सहाय्य पूरक १,३०,००.०० पुनर्विनियोजन (-)७.६६	१,२९,९२.३४	१,२९,३६.१८	(-) ५६.१६

टीपा व भाष्ये :-

कोणतेही विशिष्ट कारण न देता पुनर्विनियोजनाद्वारे रु.७.६६ लाख इतका निधी परत करण्यात आला.

रु.५६.१६ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.४० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० या आर्थिक वर्षात या लेखाशीर्षाखाली रु.१३,००० लाखाची तरतूद सन २००९ च्या दुसऱ्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध झाली होती. सदरची तरतूद म्हणजेच रु.१३००० लाख पूर्णपणे खर्ची पडली असून यामध्ये कोणती बचत अथवा अधिकचा खर्च झालेला नाही.

सन २००९-१० या आर्थिक वर्षात ससाका-१००८/प्र.क्र.२६/२५-स, दिनांक २३ जून, २००९ या शासन निर्णयान्वये यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक ३१.३.२००९ च्या शासन निर्णयात बदल केल्याने समर्पित करण्यात आलेल्या रु.६३.८२ लाख या रकमेमुळे बचत दिसून येत असून सदरची बचत ही दिनांक ३१.३.२००९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात बदल केल्याने झालेली असून ती सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील तरतूदीची बचत आहे. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सन २००६-०७ या गळीत हंगामात अतिरिक्त ऊसाचे गाळप करण्याच्या दृष्टीने साखर कारखान्यांना द्यावयाच्या सवलती अंतर्गत ससाका-१००८/प्र.क्र.२६/२५-स, दिनांक ३१.३.२००९ च्या शासन निर्णयान्वये २८ साखर कारखान्यांना रु.३०.९४.२२ लाख इतके निर्यात अनुदान मंजूर करण्यात आले होते. यात वैद्यनाथन सहकारी साखर कारखाना म.जि.बीड या कारखान्यास रु.६३.७० लाख इतके अनुदान मंजूर करण्यात आले होते. तसेच ससका-१००८/प्र.क्र.२६/२५-स, दिनांक ३१.३.२००९ च्या शासन निर्णयान्वये ३ साखर कारखान्यांना रु.३४८.१३ लाख इतके मंजूर करण्यात आले होते. यात श्री.रेणुका शुगर्स, बेळगाव या कारखान्यास रु.१३५.४९ लाख इतके अनुदान मंजूर करण्यात आले होते. सदरचे अनुदान सन २००९-१० या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीतून मंजूर करण्यात आले होते. तथापि, ससाका-१००८/प्र.क्र.२६/२५-स, दिनांक २३ जून, २००९ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त शासन निर्णयात बदल करण्यात आला आहे. त्यानुसार रेणुका शुगर्स बेळगाव या कारखान्यास रु.१३५.४९ लाखऐवजी रु.७२.१९ लाख अनुदान मंजूर करण्यात आले असून उर्वरित रक्कम रु.६३.३० लाख समर्पित करण्यात आलेली आहे. तसेच बैद्यनाथन सहकारी साखर कारखाना म.जि.बीड या कारखान्यास रु.६३.७० लाखऐवजी रु.६३.१८ लाख अनुदान मंजूर करण्यात आले असून उर्वरित रक्कम रु.०.५२ लाख समर्पित करण्यात आलेली आहे. म्हणजेच रु.६३.३० लाख + रु.०.५२ लाख अशी एकूण रु.६३.८२ लाख इतकी रक्कम समर्पित करण्यात आलेली आहे. सदर रक्कम ही

सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील तरतूदीतील असून ती सन २००९-१० या आर्थिक वर्षात दिनांक २३ जून, २००९ च्या शासन निर्णयान्वये समर्पित करण्यात आलेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.४१ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२४२५- सहकार ००१-संचालन व प्रशासन **००१ (०१) (०१)** सहकारी आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पूरक ५,१४.७३ पुनर्विनियोजन ८७.०८	६,०१.८१	५,९७.१८	**(रुपये लाखांत)** (-)४.६३

टीपा व भाष्ये :-

सुधारित अंदाजाच्या आधारावर मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रु.८७.०८ लाख इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

ज्ञापन :

१३.४२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासनाकडून अंतिम खर्चाची आकडेवारी मागविण्यात आली त्यावेळेपर्यंत खर्चमेळाचे काम पूर्ण झालेले नसल्याने क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त आकडेवारीच्या आधारे खर्च कळविण्यात आला व त्या खर्चाइतके अनुदान FMG आदेशांतर्गत ठेवण्यात आले. परंतु प्रत्यक्षात खर्चमेळाचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष खर्च हा प्राप्त अनुदानापेक्षा कमी झाल्याने बचत दिसून येते.

(रुपये लाखांत)

शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२४२५-सहकार **००१-**संचालन व प्रशासन **००१ (०१) (०५)** विभागीय व जिल्हा **प्रशासन** **मूळ-** ६१,१८.९३ **पुनर्विनियोजन-** (-) ५२.०२	६०,६६.९१	७१,११.९९	(+) १०,४५.०८

टीपा व भाष्ये :-

रु.१०४५.०८ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, सुधारित अंदाजाच्या आधारावर आणि कोणतेही विशिष्ट कारण न देता, मार्च २०१० मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाव्दारे काढण्यात आलेला रु.५२.०२ लाख इतका निधी अवास्तव असल्याचे सिध्द झाले आहे. त्याबाबतची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.४३ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अनुदानापेक्षा प्रत्यक्ष जादा खर्चाबाबत कारणे खालीलप्रमाणे :-

(१) सोबतच्या तक्यात दर्शविल्यानुसार महालेखापाल, मुंबई/नागपूर यांना सादर केलेल्या १३८१०५ (-) ४६५७२ (+) च्या हस्तांतरण नोंदीबाबत महालेखापाल स्तरावर कार्यवाही झालेली नाही.

(२) महालेखापाल स्तरावरुन रु.९,०४,९६७/- इतक्या रकमेच्या obs Clearance साठी करण्यात आलेल्या नोंदी कळविण्यात न आल्याने एवढे अनुदान कमी पडलेले आहे.

(३) शासनाकडून अंतिम खर्चाची आकडेवारी मागविण्यात आली. त्यावेळेपर्यंत खर्चमेळाचे काम पूर्ण झालेले नसल्याने क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त आकडेवारीच्या आधारे खर्च कळविण्यात आला व त्या खर्चाइतके अनुदान F.M.G. आदेशांतर्गत ठेवण्यात आल्याने प्रत्यक्ष खर्चापेक्षा अनुदान कमी पडण्यात आलेले आहे.

१३.४४ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२२५-सहकार ००१ संचालन व प्रशासन ००१ (०१) (०८) साखर आयुक्तालयाचे बळकटीकरण मूळ २,३५.०० पुनर्विनियोन (-)८८.०१	१,४६.९९	२,५५.५०	(+) १,०८.५१

टीपा व भाष्ये :-

रु.१०८.५१ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, मुख्यत्वेकरुन कोणतेही विशिष्ट कारण न देता, मार्च, २०१० मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाव्दारे काढण्यात आलेला रु.८८.०१ लाख इतका निधी अवास्तव असल्याचे सिध्द झाले. रु.१०८.५१ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०).

ज्ञापन :

१३.४५ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्ष हे साखर आयुक्तालयातील वेतन व तद्नुषंगिक बाबी यांचे अस्थायी लेखाशिर्ष असून साखर आयुक्तालय व अधिनस्त प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांची एकत्रित तरतूद योजनेतर तरतूद (Non Plan) या लेखाशिर्षाखाली येते. तथापि, २००९-१० या वर्षात तरतूद मागणी करताना वाढीव महागाई भत्ता व ६ वा वेतन आयोग फरक रक्कम तसेच नव्याने भरलेली पदे विचारात घेण्यात आलेली आहेत. वेतनाचा खर्च असल्याने वजाती अनुदानाची देयके मंजूर करण्यात येतात. त्यामुळे आवश्यकतेनुसार वेतन देयके पारीत करुन घेण्यात आली. तसेच सुधारीत अंदाज येण्यापूर्वी प्रादेशिक स्तरावरुन झालेल्या आकडेवारीवरुन खर्च झाला. यामुळे १०८.५१ लाख अधिक खर्च झालेला दिसून येतो.

(रुपये लाखांत)

१३.४६ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२४२५-सहकार १०१- सहकारी संस्थांची लेखापरिक्षा १०१ (००) (०१)- लेखा परिक्षेसाठी कर्मचारी वर्ग मूळ ६६,७९.०२ पुनर्विनियोजन १,४१.०१	६८,२०.०३	६७,९२.३५	(-)२७.६८

टीपा व भाष्ये

सुधारित अंदाजांच्या आधारावर मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.१४१.०१ लाख इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

रु.२७.६८ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.४७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

(१) सोबतच्या तक्त्यात दर्शविल्यानुसार महालेखापाल मुंबई/नागपूर यांना सादर केलेल्या रु.३६४८६ (-) २५५२०६ (+) च्या हस्तांतरण नोंदीबाबत महालेखापाल स्तरावर कार्यवाही झालेली नाही.

(२) सन २००९-१० मध्ये कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने खर्चात बचत.

(३) कार्यालयीन भाडे देयक/प्रवास भत्याची बिले मार्च, २०१० अखेरीस आक्षेप लागून परत आल्याने बचत झालेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.४८ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२४२५-सहकार १०७-सहकारी पतसंस्थांना सहाय्य १०७ (०१) (०७)- शेतकऱ्यांच्या पुनर्गठीत अल्पमुदत कर्जास सहाय्य पूरक १,५६.८४ पुनर्विनियोजन ४,७६.३१	६,३३.१५	७,८९.९८	(+) १,५६.८३

टीपा व भाष्ये

रु.१५६.८३ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, मार्च २०१० मध्ये मुख्यत्वेकरुन अपेक्षित अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी पुनर्विनियोजनाव्दारे तरतूद केलेली रु.४७६.३१ लाख इतका अतिरिक्त निधी, अपुरा असल्याचे सिध्द झाले. त्याबाबतची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.४९ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या योजनेसाठी शा.नि.क्र.-सीसीआर-१४०९/प्र.क्र.६०९/२-स, दि.३१ मार्च, २०१० व आदेश क्र.अर्थ/वशे/विदर्भ पॅकेज/व्याजमाफी, दि.३१ मार्च, २०१० अन्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम रु.६,३३,१५,०० (Vr.no.६५२) एकाच देयकान्वये पुणे कोषागारात आहरित करण्यात आलेली असून

महालेखापाल यांचेकडील VLC Section कडून खर्चमेळाचेवेळी देण्यात आलेल्या स्लीपवरुन स्पष्ट होईल. त्यामुळे जादा खर्च झालेला नाही.

१३.५० शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४२२५-सहकार १०८-इतर सहकारी संस्थांना सहाय्य १०८ (०१) (२१)- महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघास रासायनिक खते खरेदी व पुरवठा यासाठी येणाऱ्या खर्चाचे प्रदान पूरक ०.०१ पुनर्विनियोजन ६,२६.९९	६,२७.००	६,२७.००	---

टीपा व भाष्ये

सुधारित अंदाजांच्या आधारावर मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.६२६.९९ लाख इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

ज्ञापन :

१३.५१ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सुधारित अंदाजाच्या आधारावर मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.६२६.९१ लाख इतका अतिरिक्त निधी प्राप्त झाला. एकूण रु.६२७.०० खर्च झाला.

(रुपये लाखांत)

१३.५२ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग ११०- संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था ११० (०१) (०४)- गटपातळीवर ग्रामीण कामगारांच्या (बलुतेदार) बहुउद्देशीय सहकारी संस्थांकरिता खादी व ग्रामोद्योग मंडळाला सहाय्यक अनुदान मूळ ६,९२.९३ पूरक ०.०१ पुनर्विनियोजन २,१७.५९	९,१०.५३	९,१०,५३	---

टीपा व भाष्ये

सुधारित अंदाजांच्या आधारावर मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.२१७.५९ लाख इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

ज्ञापन :

१३.५३ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन अदा करण्यासाठी रु.२,१७,५९,०००/- इतकी अतिरिक्त तरतूद पुरवणी मागणीव्दारे करण्यात आली व सदरहू तरतूद संपूर्णत: विहीत कारणास्तव सन २००९-१० या आर्थिक वर्षात खर्च करण्यात आलेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.५४ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
३४५१-सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा ०९०- सेक्रेटरिएट ०९० (०१) (०१)- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मूळ ६,४७.०९ पुनर्विनियोजन ९.०६	६,५६.१५	६,५६.१३	(-) ०.०२

टीपा व भाष्ये

मुख्यत्वेकरुन सुधारित अंदाजांच्या आधारावर मार्च, २०१० मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.९.०६ लाख इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

ज्ञापन :

१३.५५ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००९-१० या वित्तीय वर्षात मूळ तरतूद रु.६४७.०९ लाख व सुधारित अंदाज रु.९.०६ लाख अशी एकूण रु.६५६.१५ लाख एवढी प्रत्यक्षात तरतूद उपलब्ध झाली आहे. प्रत्यक्षात खर्च रु.६५६.१३ लाख एवढा झ ाला. रु.०.०२ हजार एवढ्या रकमेची बचत झाली.

६. विनियोजनातील खर्च मूळ तरतूदी एवढा देखील झाला नाही.

७. विनियोजनातील रु.४३८.६९ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, डिसेंबर, २००९ मध्ये मिळविण्यात आलेली रु.४३६.८० लाख इतकी पूरक तरतूद आवश्यक असल्याचे सिध्द झाले आणि ती केवळ लाक्षणिक मागणी करुन निर्बंधित करता आली असती.

८. विनियोजनातील रु.४३८.६९ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, परत करण्यात आलेला रु.००.९१ लाख इतका निधी अवास्तव असल्याचे सिध्द झाले.

९. नियोजनातील बचत पुढील शीर्षाखाली झाली.

(रुपये लाखांत)

१३.५६ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२४२५-सहकार ००१-संचालन व प्रशासन ००१ (०१) (०५)-विभागीय व जिल्हा प्रशासन पूरक- ४,३६.८०	४,३६.८०	----	(-) ४,३६.८०

टिनर व भाष्ये

डिसेंबर, २००९ मध्ये पूरक मागणीव्दारे मिळविण्यात आलेली रु.४३६.८० लाख इतकी संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद वापरण्यातही आली नाही किंवा ती परतही करण्यात आली नाही. त्याबाबतची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.५७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयामधील दाखल केलेल्या एसएलपी क्र.३१०४७/२००८ मधील सीए क्र.५८३५/२००९ मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२७.८.२००९ रोजी फेटाळल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने सीए क्र.४७/२००८ मध्ये दि.१४.१०.२००८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजेच दि.३०.६.२००३ पासून ते दि.३१.८.२००९ पर्यंतच्या ७४ महिन्याच्या कालावधीची मल्होत्रा हाऊस, मुंबई येथील मेसर्स सुपरमॅक्स इंटरनॅशनल यांच्या मालकीच्या इमारतीच्या ॲडहॉक रेन्टची (तद्र्थ भाड्याची) प्रतिमाह रु.५,४०,०००/- प्रमाणे एकूण रु.३,९९,६०,०००/- इतकी रक्कम तात्काळ मा.लघुवाद न्यायालयात जमा करणे आवश्यक होते. तसेच सदर प्रकरणांचा अंतिम निर्णय होईपर्यंत माहे सप्टेंबर, २००९ पासून प्रतिमाह रु.५,४०,०००/- इतकी रक्कम तदर्थ भाड्यापोटी नियमितपणे मा.लघुवाद न्यायालयात जमा करणे आवश्यक होते. माहे सप्टेंबर, २००९ ते मार्च, २०१० या ७ महिन्याच्या कालावधीतील तदर्थ भाड्याची प्रतिमाह रु.५,४०,०००/-प्रमाणे रक्कम नियमितपणे मा.लघुवाद न्यायालयात जमा करण्यासाठी रु.३७,८०,०००/- इतकी रक्कम आवश्यक होती. याकरिता रु.३,९९,६०,०००/- इतकी रक्कम आकस्मिकता निधीतून अग्रिमाव्दारे घेण्यात आली. तसेच रु.३७,८०,०००/- इतकी रक्कम डिसेंबर, २००९ मधील हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीव्दारे अर्थसंकल्पित करण्यात आली. याप्रमाणे डिसेंबर, २००९ मधील हिवाळी अधिवेशनात एकूण

रु.४,३७,४०,०००/- (रु.३,९९,६०,०००/-+रु.३७,८०,०००/-) इतक्या रकमेची पुरवणी मागणी मान्यतेसाठी सादर करण्यात आली. शासन निर्णय क्र.शाकाजा-२००५/प्र.क्र.७४/(भाग-३)/ २२-स, दिनांक १२.९.२००९ च्या शासन निर्णयान्वये दि.३०.६.२००३ पासून दि.३१.८.२००९ पर्यंतच्या ७४ महिन्याच्या कालावधीची तदर्थ भाड्याच्या थकबाकीची रु.३,९९,६०,०००/- इतकी रक्कम मा.लघुवाद न्यायालयामध्ये जमा करण्यासाठी शासनाची मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई-१ (शहर) या कार्यालयाने सदर रकमेचा भरणा मा.लघुवाद न्यायालयात केलेला आहे. तसेच शासन निर्णय क्र.शाकाजा-२००५/प्र.क्र.७४/(भाग-३)/ २२-स, दि.१४.१.२०१० अन्वये माहे सप्टेंबर, २००९ ते माहे डिसेंबर, २००९ या ४ महिन्याच्या कालावधीची तदर्थ भाड्याची रक्कम मा.लघुवाद न्यायालयात जमा करण्यास शासनाची मंजूर देण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई -१ (शहर) यांनी सदर रक्कम मा.लघुवाद न्यायालयात जमा केली आहे. तसेच माहे जानेवारी, २०१० ते मार्च, २०१० या ३ महिन्याच्या तदर्थ भाड्याची रक्कम नियमितपणे BDS व्दारे जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई-१ (शहर) यांनी मा.लघुवाद न्यायालयात जमा केलेली आहे. त्यामुळे माहे डिसेंबर, २००९ मध्ये पूरक मागणीव्दारे मिळविण्यात आलेले रु.४,३७,४०,०००/- इतकी संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मल्होत्रा हाऊस, मुंबई येथील इमारतीच्या तदर्थ भाड्याची रक्कम नियमितपणे मा.लघुवाद न्यायालयात जमा करण्यासाठी वापरण्यात आलेली आहे.

अनुदान क्र.व्ही-३ "सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च"

(रुपये हजारांत)

१३.५८ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४२५-सहकारावरील भांडवली खर्च **४८५१**-ग्रामोद्योग व लघुद्योग यांवरील भांडवली खर्च **४८६०**-ग्राहकोपयोगी वस्तू उद्योगावरील भांडवली खर्च **५४७५**-इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च **दत्तमत-** **मूळ**- ८७,६८,२७			

पूरक १,३७,२२,३७ वर्षभरात परत केलेली रक्कम (डिसेंबर, २००९ रु.२५,६२,८७ हजार,मार्च, २०१० रु.२१,२७,४७ हजार)	२,२४,९०,६४	१,६५,६३,२७	(-) ५९,२७,३७ ४६,९०,३४

टीपा व भाष्ये

अनुदानातील अंतिम बचत रु.५९२७.३७ लाख इतकी असताना, वर्षभरात फक्त रु.४६९०.३४ लाख इतका निधी परत करणे अपेक्षित होते.

ज्ञापन :

१३.५९ सदरबाबतची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने खालीलप्रमाणे

२. अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४२५-सहकारावरील भांडवली खर्च **१०८-**इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका १०८ (०२) (०५)-कृषि संस्करण संस्थांना भाग भांडवली अंशदान (राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ) **मूळ**- ३,६६.६७ **पूरक** ६,३३.३३ पुनर्विनियोजन (-) २,००.००	८,००.००	४,७७.७१	(-) ३,२२.२९

ज्ञापन :

१३.६० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अंतिम तरतूदीपेक्षा रु.३२२.२९ लाख कमी खर्च झालेला आहे. पात्र संस्थांचे प्रस्ताव नसल्याने खर्च कमी झालेला आहे. सदरची रक्कम समर्पित करण्यात आलेली आहे. सदरहू लेखाशिर्षाखाली खर्च शासन स्तरावर (९-स) करण्यात येतो.

योजनांतर्गत योजना असून मा.राज्यपाल महोदय यांचे निदेशानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात राज्यातील तिन्ही विभागासाठी निधीचे वितरण केले जाते. यास्तव सदर निधी अन्य विभागांकडे कळविण्यात येत नाही. सदर योजना मागणी आधारित असल्यामुळे क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांस अनुसरुन मागणीनुसार विविध लेखाशिर्षांतर्गत प्राप्त निधीचे संबंधित संस्थांना वितरण करण्यात आलेले आहे. सदर बचत संबंधित वर्षाअखेर शासनास समर्पित करण्यात आलेली आहे.

(रुपये लाखात)

१३.६१ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४२५-सहकारावरील भांडवली खर्च **१०८-**इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका १०८ (०३) (०१)-सहकारी साखर कारखाने सहकारी साखर कारखान्यांना भाग भांडवली अंशदान **मूळ**- ६,८३.३३ पुनर्विनियोजन (-) १,३६.६७	५,४६.६६	----	(-) ५,४६.६६

ज्ञापन :

१३.६२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

उभारणीखालील शिवशक्ती सहकारी साखर कारखाना मर्या., कोळसूर, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद यांना कारखान्याने जमा केलेल्या स्वभांडवलाच्या प्रमाणात (रु.१८२.७१ लाख) शासन भाग भांडवल रु.९१३.५५ लाख देय आहे. यापैकी रु.५७४.३७ लाख एवढे शासन भाग भांडवल कारखान्याला प्राप्त झाले असून उर्वरीत रु.३३९.१८ लाख मिळण्यासाठी कारखान्यास देय आहे. भाग भांडवल अंशदान १:५ प्रमाण मराठवाडा

विभागासाठी देय आहे. त्यासाठी कारखान्याकडून आवश्यक ते सभासद भाग भांडवल जमा न झाल्याने अनुदान खर्च करण्यात आले नाही. सबब, ५४६.६६ बचत झालेली दिसून येते.

(रुपये लाखांत)

१३.६३ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०८-इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका १०८ (०२) (०८)-कृषि प्रक्रिया संस्थांना भाग भांडवली अंशदान (कोल्हे समिती) **मूळ-** ३०.०८ पूरक ४,६९.९२ पुनर्विनियोजन (-) १,००.००	४,००.००	२,५२.८८	(-) १,४७.१२

ज्ञापन :

१३.६४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

खात्याचा प्रत्यक्ष खर्च रु.२८३.८८ झालेला असून महालेखापाल, मुंबई यांचेकडे रु.२५२.८८ लाख नोंदविण्यात आलेला आहे. रु.३१.०० लाखाचा फरक आहे. सदरहू फरकाच्या रकमेचे बिल व व्हाऊचर नंबर दि.७.१२.२००९ ग्रेपसिटी वायनरी सहकारी संस्था मर्यादीत सावळज, ता.तासगांव, जि.सांगली यांचे बिलाच्या कॉपीसह चूकीच्या नोंदीचा दुरुस्तीचा प्रस्ताव या कार्यालयाने जा.क्र.पणन-७/अंवनि/विलेखा/२००९-१०/चुनोंदु/२०१०, दि.१६.१२.२०१० रोजी महालेखापाल, मुंबई यांचेकडे सादर केलेला आहे. महालेखापाल, मुंबईचे पत्र दि.९.३.२०११ चे पत्रान्वये शासनास (९-स) प्रस्ताव दिनांक २९.४.२०११ रोजी सादर केलेला आहे. सदरचा प्रस्ताव शासनाने दि.३०.५.२०११ चे पत्रान्वये महालेखापल, मुंबई कार्यालयाकडे सादर केला आहे.

योजनांतर्गत योजना असून मा.राज्यपाल महोदय यांचे निदेशानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात राज्यातील तिन्ही विभागांसाठी निधीचे वितरण केले जाते. यास्तव सदर निधी अन्य विभागाकडे वळविण्यात येत नाही. सदर योजना मागणी आधारित असल्यामुळे क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांस अनुसरुन मागणीनुसार विविध लेखाशिर्षांतर्गत प्राप्त निधीचे संबंधित संस्थांना वितरण करण्यात आलेले आहे. सदर बचत संबंधित वर्षाअखेर शासनास समर्पित करण्यात आलेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.६५ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
१०८-इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका १०८ (०२) (०३)-सहकारी साखर कारखान्यांना सहवीज निर्मितीसाठी भाग भांडवली अंशदान **मूळ**- ११,६६.६७ पूरक ५६,९१.०० पुनर्विनियोजन (-) ७,२१.७९	६१,३५.८८	४७.८७.३२	(-) १३,४८.५६

ज्ञापन :

१३.६६ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

कारखान्याचेच भाग भांडवल प्रस्ताव प्राप्त झाले होते. परिपूर्ण प्रस्ताव उपलब्ध न झाल्याने बचत रक्कम समर्पित करण्यात आली.

(रुपये लाखांत)

१३.६७ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८५१-ग्रामोद्योग व लघुद्योग यावरील भांडवली खर्च **१०९-**समिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग सहकारी संस्था १०९ (०२) (०१)-औद्योगिक सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान **मूळ**- ४०.९१ पूरक २,०९.०९ पुनर्विनियोजन (-) ५०.००	२,००.००	१,१६.५३	(-) ८३.४७

ज्ञापन :

१३.६८ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

योजनांतर्गत योजना असून मा.राज्यपाल महोदय यांचे निदेशानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात राज्यातील तिन्ही विभागांसाठी निधीचे वितरण केले जाते. यास्तव सदर निधी अन्य विभागांकडे वळविण्यात येत नाही. सदर योजना मागणी आधारित असल्यामुळे क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावास अनुसरुन मागणीनुसार निधीचे वितरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे बचत झालेली आहे. सदर बचत संबंधित वर्षाअखेर शासनास समर्पित करण्यात आलेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.६९ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०९-समिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग सहकारी संस्था १०९ (०२) (०२)-गट पातळीवरील ग्रामीण कारागिरांच्या (बलुतेदार) औद्योगिक सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान पूरक ५०.०० पुनर्विनियोजन (-) १०.०० ४०.०० २८.४४ (-) ११.५६			

ज्ञापन :

१३.७० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

BDS वर तरतूद न उपलब्ध झाल्यामुळे बचत झाली आहे आणि सदर बचत सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात शासनास समर्पित करण्यात आलेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.७१ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०९-समिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग सहकारी संस्था १०९ (०२) (०६)-महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाला भाग भांडवली अंशदान मूळ ७३.३३ पूरक १,४६.६७ पुनर्विनियोजन (-) ४४.०० १,७६.०० १,७६.०० ----			

ज्ञापन :

१३.७२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास भाग भांडवली अंशदान देण्याकरिता सन २००९-१० मध्ये एकूण रु.२२०.०० लक्ष तरतूद करण्यात आली होती. मात्र यामध्ये कपात करण्यात येऊन सुधारित अर्थसंकल्पामध्ये उपलब्ध झालेली तरतूद रु.१७६.०० लक्ष वित्त विभागाने BDS प्रणालीवर उपलब्ध करुन दिली. सदर रक्कम पूर्णत: खर्च झाली आहे. त्यामुळे बचत झालेली नाही.

(रुपये लाखांत)

१३.७३ शीर्ष	**एकूण विनियोजन**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१०९-समिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग सहकारी संस्था १०९ (०२) (०८)-महाराष्ट्र राज्य सहकारी यंत्रमाग महामंडळाला भाग भांडवली अंशदान मूळ २५.०० पूरक ५०.०० पुनर्विनियोजन (-) १५.०० ६०.०० --- (-) ६०.०० (-) ६०.०० (-) ६०.००

(रुपये लाखांत)

१३.७५ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
५४७५-इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च **१०२-** नागरी पुरवठा १०२ (००) (०१)-टर्मिनल मार्केट/आधुनिक कृषि बाजार उभारणीसाठी अंशदान मूळ ०.०१ पूरक १०००.०० पुनर्विनियोजन (-) ३,५०.०१	६,५०.००	६,५०.००	----

टीपा व भाष्ये

सुधारित अंदाजाच्या आधारावर वर नमूद केलेल्या शीर्षाखाली रु.१६२७.४७ लाख इतका निधी परत करण्यात आला.

वर नमूद केलेल्या शीर्षाखाली झालेल्या रु.२५१९.६६ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २०१०)

ज्ञापन :

१३.७६ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्यामध्ये बसमतनगर, जि.हिंगोली येथे मॉडर्न मार्केट स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले होते. सदर योजनेसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर टर्मिनल मार्केटसाठी शासन वाटा म्हणून रु.१०,००,०० हजार निधीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली होती. सदर योजनेच्या नोडल एजन्सी असलेल्या पणन मंडळाने रु.६,५०,००० हजार निधीची मागणी केली होती. त्यानुषंगाने पणन मंडळास रु.६,५०,०० हजार वितरित करण्यात आला असून उर्वरीत रु.३,५०,०० हजार निधी समर्पित केलेला आहे. उर्वरीत रु.३,५०,०० हजार निधीची पणन मंडळाकडून मागणी न आल्याने सदरची रु.३,५०,०० हजार इतकी बचत दर्शविली आहे.

(रुपये लाखांत)

१३.७७ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४४२५-सहकारावरील भांडवली खर्च **१०८-** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका १०८ (०३) (०२)-सहकारी साखर कारखाने सहकारी साखर कारखान्यांना भाग भांडवली अंशदान (एन.सी.डी.सी.) मूळ ९,०५.८७ पुनर्विनियोजन (-) ९,०५.८७	----	-----	----

ज्ञापन :

१३.७८ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर योजनेंतर्गत साखर कारखाना मुदत कर्जाचे प्रस्ताव शासनाकडून मंजूर न झाल्यामुळे सदरची सुधारित तरतूद शासन स्तरावरुन समर्पित करण्यात आली.

(रुपये लाखांत)

१३.७९ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८५१ -ग्रामोद्योग व लघुउद्योग यावरील भांडवली खर्च **१०९-** संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था १०९ (०२) (०५)-शिखर हातमाग विणकाम सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान मूळ ५०.०० पुनर्विनियोजन (-) ५०.००	---	---	----

ज्ञापन :

१३.८० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

रु.५०.०० लाखाची तरतूद करण्यात आली होती. महाटेक्सचा प्रस्ताव वेळीच शासनास सादर न झाल्यामुळे सदर रक्कम परत करण्यात आली.

(रुपये लाखांत)

१३.८१ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग यांवरील भांडवली खर्च **१०९-** संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था १०९ (०२) (३३)-यंत्रमाग सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान (एन.सी.डी.सी.) मूळ ८,३३.३३ पुनर्विनियोजन (-) ३,३३.३३	५,००.००	२,७५.२५	(-) २,२४.७५

टीपा व भाष्ये

कोणतेही विशिष्ट कारण न देता वर नमूद केलेल्या शीर्षाखाली रु.१२८९.२० लाख इतका निधी परत करण्यात आला. रु.२२४.७५ लक्ष इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.८२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मार्च, २०१० ला सुधारित अंदाजानुसार वाढीव निधी मुक्त करण्यास वित्त विभागाने मंजूरी न दिल्यामुळे फक्त रु.२७५.०० लाख इतका अंतिम तरतूदीएवढा निधी खर्च झाला असून उर्वरीत रु.२२४.७५ लाख इतका निधी शासन निर्णय दि.३१.३.२०१० नुसार प्रत्यार्पित करण्यात आला आहे.

(रुपये लाखात)

१३.८३ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४४२५-सहकारावरील भांडवली खर्च **१०८-** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका १०८ (०४) (०४)-सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान (विशेष घटक योजना) मूळ ३३.३३ पुनर्विनियोजन (-) ३९,६६.६७	४०,००.००	३२,००.००	(-) ८,००.००

टिप्पा व भाष्ये

रु.८.०० लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.८४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मूळ तरतूद रु.३३.३३ लाख व पूरक मागणीव्दारे रु.३९६६.६७ लाख इतकी तरतूद अशी एकूण रु.४०००.०० लाख इतकी तरतूद प्राप्त झाली होती. सुधारित अंदाजाव्दारे या रकमेपैकी रु.३२००.०० लाख इतकी तरतूद प्राप्त झाली. या अनुषंगाने वित्त विभागाच्या सुधारित अंदाजपत्रकानुसार रु.८००.०० लाख इतक्या तरतूदीच्य पुनर्विनियोजनाचे आदेश दि.३०.३.२०१० अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. रु.४०००.०० लाख या तरतूदीतून रु.८००.०० लाख इतकी तरतूद वित्त विभागाने सुधारित अंदाजपत्रकान्वये कमी केली असल्यामुळे प्रस्तुत रु.८००.०० लाख इतकी बचत झाली असून त्याबाबतचे पुनर्विनियोजनाचे आदेश क्र.आरईएस-४४२५-१०/प्र.क्र.५८/१७-स, दि.३०.३.२०१० अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

(रुपये लाखांत)

१३.८५ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४४२५-सहकारावरील भांडवली खर्च **१०८-** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका १०८ (०४) (०१)-सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान मूळ ९,९४.३१ पूरक १५,०५.६९ पुनर्विनियोजन (-) ५,००.००	२०,००.००	२७,३३.००	(+) ७,३३.००

टिपा व भाष्ये

रु.७३३ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता मार्च, २०१० मध्ये सुधारित अंदाजाच्या आधारावर परत करण्यात आलेला रु.५०० लाख इतका निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

रु.७३३ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.८६ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मूळ तरतूद रु.९९४.३१ लाख व पूरक मागणीव्दारे रु.१५०५.६९ लाख इतकी तरतूद अशी एकूण रु.२५००.०० लाख इतकी तरतूद प्राप्त झाली होती. सुधारित अंदाजाव्दारे या रकमेपैकी रु.२०००.०० लाख इतकी तरतूद प्राप्त झाली. या अनुषंगाने वित्त विभागाच्या सुधारित अंदाजपत्रकानुसार रु.५००.०० लाख इतक्या तरतूदीच्या प्रत्यार्पणाचे आदेश दि.३०.३.२०१० अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु सदर योजनेतील प्रयोजनासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याने पुनर्विनियोजनाव्दारे एकूण रु.७३३.०० लाख इतकी तरतूद दि.३१.३.२०१० च्या आदेशान्वये प्राप्त झाली आहे.FMG नुसार रु.२७३३.०० लाख इतकी तरतूद प्राप्त झाली असून संपूर्ण रक्कम आर्थिक वर्षात खर्च झालेली आहे.

(रुपये लाखांत)

१३.८७ शीर्ष	एकूण विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४४२५-सहकारावरील भांडवली खर्च **१०८-** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका १०८ (०४) (०२)-सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान (एन.सी.डी.सी.) मूळ ३५,६२.६७ पुनर्विनियोजन (-) १२,७०.९१	२२,९१.७६	३८,६६.१४	(+) १५,७४.३८

टिपा व भाष्ये

रु.१५७४.३८ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता कोणतेही विशिष्ट कारण न देता परत करण्यात आलेला रु.१२७०.१९ लाख इतका निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

रु.१५७४.३८ इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट, २०१०)

ज्ञापन :

१३.८८ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मूळ तरतूद रु.३५६२.६७ लाख इतकी प्राप्त झाली होती. त्यापैकी रु.१२७०.९१ लाख इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली. त्यामुळे विभागाकडे रु.२२९१.७६ लाख इतकी तरतूद होती. सुधारित अंदाजाव्दारे या रकमेपैकी रु.२८५०.१४ लाख इतकी तरतूद प्राप्त झाली. या अनुषंगाने वित्त विभागाच्या सुधारित अंदाजपत्रकानुसार रु.५५८.३८ लाख इतक्या तरतूदीच्या पुनर्विनियोजनाचे आदेश दि.३०.३.२०१० अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु सदर योजनेतील प्रयोजनासाठी त्यावेळी आणखी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याने प्रस्तुत मागणी क्रमांकाखालील लेखाशीर्षामध्ये बचत होत असल्याने त्या बचतीतून सदर लेखाशिर्षाखाली रु.१०१६.०० लाख ही तरतूद दि.३१.३.२०१० च्या आदेशान्वये पुनर्विनियोजनाव्दारे प्राप्त झाली. FMG नुसार रु.३८६६.१४ लाख इतकी तरतूद प्राप्त झाली असून संपूर्ण रक्कम आर्थिक वर्षात खर्च झालेली आहे.

साक्ष :-

१३.८९ उपरोक्त परिच्छेदांसंदर्भात समितीने दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.सदर बैठकीत कृषी संस्करण संस्थांना भाग भांडवली अंशदान या अंतर्गत किती संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले व भांडवली अंशदान देण्याचे निकष याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, ही योजना दिनांक १२ ऑक्टोबर, २००७ रोजी जाहीर झाली. या योजनेमध्ये संस्थांचा स्वतःचा वाटा ४ टक्के, राज्य शासनाचा ३६ टक्के आणि ६० टक्के कर्ज अशी ही योजना आहे. वेगवेगळ्या योजना एकत्रित करुन ही योजना सुरु केली आहे. ही योजना सुरु होण्यापूर्वी सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्यात आले होते. ही योजना सुरु झाल्यानंतर २३ संस्थांना अर्थसहाय्य दिलेले आहे सध्या ही योजना सुरु आहे. या योजनेसाठी अनेक संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर मागणी असल्यामुळे आणि या योजनेत संस्थांचा स्वतः चा वाटा फक्त चार टक्के असल्यामुळे या योजनेबाबत नियोजन आणि वित्त विभाग फेरविचार करीत आहे. त्यामुळे आज प्रलंबित प्रकरणांवर निर्णय झालेला नाही. या संदर्भात मंत्रिमंडळासमोर नस्ती सादर केली होती, परंतु त्यावर एकमत झालेले नाही. संस्थाचालकांचे म्हणणे आहे की, ज्या संस्थांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत त्यांच्या बाबतीत जुन्या निकषाप्रमाणे विचार करावा. ज्या तारखेपासून शासनाच्या धोरणात बदल होईल त्या तारखेपासून नवीन प्रकरणी नवीन धोरणाप्रमाणे विचार करावा. परंतु त्याबाबत अजून एकमत झालेले नाही. जुन्या संस्थांना मंजूरी दिली आहे आणि त्यांच्या पुरती मर्यादित ही योजना सुरु आहे.

१३.९० कृषी प्रक्रिया संस्थांना भाग भांडवली अंशदान (कोल्हे समिती) या अंतर्गत मोठ्या प्रमाणात बचत झाली आहे, त्यास कोण जबाबदार आहे, या प्रकरणी संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सुरुवातीस ६७ आणि त्यानंतर २३ अशा एकूण ९० संस्थांना मदत करण्यात आली आहे. आतापर्यंत त्या संस्थांना ३१७ कोटी रुपयांची मदत करण्यात आली. जास्तीत जास्त प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रात आहेत. यात प्रमाण ठेवलेले आहे. विदर्भासाठी २४ टक्के, मराठवाड्यासाठी १८ टक्के प्रमाण आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात वाटप होते परंतु तो खर्च होऊ शकत नाही. प्रयत्न करुननही त्या भागातून प्रस्ताव प्राप्त होत नाहीत कोल्हे समिती फक्त भागभांडवल देते.

१३.९१ माननीय राज्यपालांना काही प्रकरणात हस्तक्षेप करावा लागतो. विदर्भातून प्रस्ताव प्राप्त होत नसतील तर त्यासाठी तेथे वातावरण निर्मिती केली पाहिजे. विदर्भात संत्रा आणि डाळींब मोठ्या प्रमाणावर होते. स्व.वसंतराव नाईक जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त दिनांक १ ऑक्टोबर, २०१३ रोजी अमरावती येथे परिसंवाद आणि प्रदर्शन कार्यक्रम झाला. त्या परिसंवादामध्ये वाशिम येथील एक प्रगतशील शेतकरी श्री.पाटील

यांचे भाषण झाले. ते भाषणात म्हणाले की, त्यांनी डाळीबांची लागवड करुन पहिल्या वर्षी ३५ लाख रुपये, दुसऱ्या वर्षी २ कोटी १० लाख रुपये आणि तिसऱ्या वर्षी ३ कोटी २५ लाख रुपयांचे उत्पादन केले आणि ती सर्व डाळींब रशियाला निर्यात केली. त्या भागात पोटॅन्शिअल आहे. शेतकरी पुढे येत नसतील तर त्यासाठी विभागाकडून प्रयत्न केले पाहिजेत. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली व याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत सांगितले की, विभागातर्फे एमआयडीसीमध्ये चर्चा सत्र घेण्यात येते. नागपूर येथे "विदर्भ ॲडव्हान्टेज" कार्यक्रम झाला होता. त्या भागातून छोटे उद्योग आले आहेत. वाशिम येथे फळेफुले भाजीपाला पणन संस्था आहे. त्यांचे दोन प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. बेलाटा येथे तुऱ्हाडीवर आधारित कोळसा तयार करण्याचा प्रकल्प आहे. त्याशिवाय वाघोळी आणि धामणगाव रेल्वे येथे प्रकल्प आहे. परंतु एकूण प्रकल्पांची संख्या कमी आहे. कोकणामध्ये काजू प्रकल्प जास्त आहेत आणि ते चांगले चालतात. कोल्हापूरमध्ये चंदगड आणि राधानगरी येथे प्रकल्प आहेत. हे प्रकल्प चांगले चालत असले तरी त्यांच्याकडून शासन कर्जाची परतफेड कमी आहे. या कारणामुळे प्रकल्प चांगले चालत नाहीत असा शासनाचा समज झालेला आहे. या योजनेमध्ये संस्थेचा वाटा चार टक्के आहे. कर्जाची परतफेड फक्त दोन ते तीन टक्के आहे. साखर कारखाने आणि सूत गिरण्यांच्या बाबतीत तसेच दिसत आहे.

१३.९२ बसमतनगर, हिंगोली येथे मॉर्डन मार्केट स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले होते. सदर मार्केटसाठी शासनाचा वाटा म्हणून १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. पणन मंडळास ६ कोटी ५० लाख रुपये एवढा निधी वितरीत करण्यात आला होता. हा प्रकल्प पीपीपी खाली करण्यात येणार होता. परंतु त्या ठिकाणी खाजगी उद्योजकाची निवड न झाल्यामुळे उर्वरीत हप्ता देण्यात आला नाही. वित्त विभागाचा आक्षेप आहे की, हा पीपीपीचा प्रोजेक्ट आणि त्यामध्ये खाजगी उद्योजकांची निवड झालेली नाही. वित्त विभागाचा आक्षेप बरोबर आहे. बसमतनगर सारख्या ठिकाणी तीन वेळा टेंडर काढूनही खाजगी उद्योजकांची निवड झाली नाही. या योजनेमध्ये शासनाकडून १० कोटी रुपये मिळणार आहेत तर उद्योजकाने ४० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. परंतु कोणताही उद्योजक पुढे आला नाही.

१३.९३ खानदेशामध्ये केळी मोठ्या प्रमाणावर होते. त्या ठिकाणी केळीवर प्रक्रिया करणारे उद्योग सुरु करण्यात आले काय यावर रावेर येथे एका खासदारांनी केळीवर प्रक्रिया करणारा ग्रेडींग, पॅकेजिंग आणि कोल्डस्टोअरेज सुविधा युक्त असा प्रकल्प काढलेला आहे त्यांची मागणी आहे की, या उद्योगासाठी शासनाने १०० टक्के अनुदान द्यावे. परंतु शासन फक्त २५ टक्के अनुदान देऊ शकते. केंद्र सरकारची दोन कोटी रुपयांची योजना आहे. त्यामध्ये २५ टक्के म्हणजे ५० लाख रुपयांचे अनुदान मिळते २० कोटी रुपयांच्या प्रकल्पांमध्ये व्हॅल्यू चेनच्या सोयी सुविधा असतील तर १० कोटी रुपये अनुदान मिळते. दोन डेअरी संस्थांना

अनुदान मंजूर केलेले आहे. माननीय मंत्रीमहोदयांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आहे. त्या समितीकडे ५० लाख ते १ कोटी रुपयांचे प्रकल्प मान्यतेसाठी जातात. ५३ संस्थांना अनुदान मंजूर केलेले आहे. ही योजना सद्यःस्थितीत सुरु आहे एकूण दोन योजना आहेत. एक योजना २ कोटी रुपयांची आहे. त्यामध्ये ५० लाख रुपयांचे अनुदान मिळते दुसरी २० कोटी रुपयांची योजना आहे त्या योजनेमध्ये १० कोटी रुपयांचे अनुदान मिळते या केंद्र शासनाच्या योजना आहेत.

१३.९४ पूर्वी विदर्भात कापूस जास्त पिकत होता. आता ते प्रमाण कमी झाले आहे. आता तेथे सोयाबीनचे पीक जास्त प्रमाणात घेतले जाते. आता मराठवाडा आणि खानदेशामध्ये कापूस जास्त पिकतो. वाशिम जिल्ह्यातील सोयाबीन पिकाची गुणवत्ता चांगल्या प्रतीची आहे.महाराष्ट्राला सोयाबीन पूरवून निर्यात करु शकेल इतके सोयाबीनचे उत्पादन वाशिम जिल्ह्यात होते. त्या जिल्ह्यातील अनेक शेतकरी छोटे-मोठे युनिट करण्यास तयार आहेत. तेव्हा या ठिकाणी सोयाबीन हब करुन त्या उद्योगाला सवलत देता येईल काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या योजनेमध्ये प्रक्रिया उद्योग येत नाही तरी सुध्दा शासनाने १३ कोटी रुपयांची योजना जाहीर केलेली आहे. या वर्षी प्लान फंड नसल्यामुळे अनुदान उपलब्ध झाले नाही. इतर फंडातून ६० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. ४० लाख रुपये प्रोसेसिंगसाठी आणि २० लाख रुपये गोडावूनसाठी आहेत. त्यामध्ये ५० टक्के सबसिडी देणार आहोत.

१३.९५ तथापि, शासनाने ३० युनिटला मान्यता दिली आहे, पण तरतूद नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता याबाबत शासन अर्थसंकल्पामधून तरतूद करण्याचा प्रयत्न करीत आहे. योजनेला मंत्रीमंडळाची मान्यता घेतलेली आहे. या वर्षी प्रस्ताव प्राप्त झाले तर मान्यता देणार आहोत. हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा आहे. या ठिकाणी हब तयार करायचा आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. त्यावर या कामासाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीव्दारे निधी उपलब्ध करुन देता येईल काय याबाबत विभागाने विचार करावा अशी सूचना समितीने विभागास केली.

१३.९६ केळी या फळाला फळाचा दर्जा का देण्यात येत नाही. बाजार समितीमध्ये केळी फळाला फळाचा दर्जा देऊन त्यावर नियमानुसार कराचीही आकारणी करण्यात येते. परंतु शासनातर्फे केळी फळाला फळाचा दर्जा का देण्यात येत नाही. जळगांव जिल्ह्यात केळी पिकाची लागवड जास्त आहे, केळी फळाला फळाचा दर्जा दिला तर शेतकऱ्यांचा त्याचा फायदा होईल. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, केळी फळाला फळाचा दर्जा देण्याची आवश्यकता नाही असे नॅशनल हॉल्टीकल्चर मिशनचे म्हणणे आहे. तसेच केळी पिकासाठी अनुदान देण्यात येते. पॅकेजिंग हाऊस करण्यासाठी पाच लाख रुपयांचे अनुदान देण्यात येते. हेक्टरी १५ हजार रुपये याप्रमाणे अनुदान देण्यात येते. केळी या पिकाला केंद्र सरकारकडून फळाचा दर्जा दिला जात नाही परंतु राज्य सरकारकडून केळीला फळ मानण्यात आले आहे.

१३.९७ ज्या प्रमाणे कापूस व सोयाबीन पिकांचे नुकसान झाले तर त्यांना हेक्टरी मदत मिळते तोच नियम लावून केळी पिकांचे नुकसान झाले तर हेक्टरी मदत दिली जाते. जर केळी पिकाला फळाचा दर्जा दिला तर जास्त मदत मिळू शकेल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, केळी हे पीक बहुवर्षीय नाही ते एक ते दीड वर्षात येणार आहे. केंद्र सरकारने बहुवर्षीय व एक ते दीड वर्षीय फळ पिकांमध्ये फरक केलेला आहे. बहुवर्षीय फळ पिकांसाठी हेक्टरी १२ हजार रुपये मदत दिली जाते. केळी हे पीक एक ते दीड वर्षाचे असल्यामुळे त्यांना हेक्टरी बहुवार्षिक फळ पिकांपेक्षा कमी मदत द्यावी असे केंद्र शासनाचे धोरण आहे.

१३.९८ केळी पिकासाठी कोणकोणत्या सुविधा केंद्र व राज्य सरकारकडून मिळतात याबाबत सविस्तर माहितीची टिप्पणी समितीला सादर करण्यात यावी त्याचबरोबर आतापर्यंत किती सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्यांना शासनाने भाग भांडवल दिले. तसेच किती कोटी रुपयांची कर्जे दिलीत, त्यापैकी किती कोटी रुपये वसूल झाले व किती कोटी रुपयांची कर्जे शिल्लक आहेत. यासंदर्भात लेखी माहिती समितीला सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले परंतु यासंदर्भातील माहिती अद्याप अप्राप्त आहे.

कांदा पिकासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत विभागाकडून सांगण्यात आले की, कृषी विभागामार्फत गेल्या तीन वर्षात कांदा पिकासाठी ४० कोटी रुपये अनुदान देण्यात आले आहे. आता १२ कोटी रुपयांचा निधी या वर्षासाठी मंजूर करुन घेण्यात आला आहे राष्ट्रीय कृषी विभागाची ती योजना आहे.

१३.९९ रेशीमसाठी शासनाची आधारभूत किंमत किती आहे व कर्नाटक/आंध्रप्रदेश मध्ये कोषांचे दर काय होते, दरांमध्ये तफावत असण्याची कारणे काय होती याबाबत माहिती देताना प्रधान सचिव, वस्त्रोद्योग विभाग यांनी समितीस सांगितले की, महाराष्ट्र शासनाकडून सन २००९-२०१० मध्ये १९५ ते २०० रुपये हमी भाव निश्चित करण्यात आला होता. व त्यावर्षीची रेशीमची आधारभूत किंमत १७० रुपये ठरविली होती. परंतु खुल्या बाजारात रेशीमचे दर जास्त असल्यामुळे शेतकरी खुल्या बाजारात रेशीम विकत होते. त्या वर्षात कर्नाटक राज्यात खुल्या बाजाराचा रेशीमचा दर २२१ ते २७१ रुपये असा होता. त्यामुळे शेतकरी कर्नाटक येथील खुल्या बाजारात रेशीम विकण्यासाठी नेत होते.

१३.१०० सहकारी पतसंस्थांना सहाय्य, ग्रामीण सहकारी पतसंस्थांना वैद्यनाथन समितीच्या अहवालानुसार अर्थसहाय्य या अंतर्गत केंद्र शासनाकडून आवश्यक तो निधी राज्य शासनाला का प्राप्त झाला नाही. अशी विचारणा समितीने केली असता सहकार विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले की, केंद्र सरकारने वैद्यनाथन पॅकेजची रक्कम २७९० कोटी रुपये ठरविली होती. यामध्ये केंद्र शासनाचे २२६५ कोटी रुपये असून राज्य सरकारचा हिस्सा ५६ कोटी रुपयांचा होता व सहकारी साखर कारखान्याचा हिस्सा ३६८

कोटी रुपयांचा होता. केंद्र सरकारने २३४२ कोटी रुपयांना मंजूरी दिली होती व त्यापैकी १४०६ कोटी रुपयांचा पहिला हप्ता वितरीत केला होता ९३५ कोटी रुपये त्यातील शिल्लक होते. ही रक्कम मिळविण्यासाठी राज्य सरकार दोन तीन वर्षापासून पाठपूरावा करीत आहे.

१३.१०१ ज्या योजनांमध्ये राज्य सरकारचा हिस्सा असतो मग ती योजना ६०:४० असेल, ८०:२० असेल किंवा ७५:२५ असेल अशी कोणतीही योजना असली तरी त्या योजनांचा पैसा केंद्र सरकारकडून राज्य सरकारला मिळतो. एखाद्या वेळेस काही अडचण आली तर सुरुवातीला राज्य सरकारचा हिस्सा संबंधित योजनेवर खर्च करावा. ९३५ कोटी रुपये केंद्र शासनाकडून न आल्यामुळे उर्वरीत योजनांवरील खर्च करण्यात येऊ नये असे होता कामा नये. केंद्र सरकारकडून मिळणारी रक्कम ही मदतीच्या स्वरुपात मिळत असते ती रक्कम देणे हे केंद्र सरकारवर बंधनकारक नाही. त्यामुळे राज्य सरकारने त्यांचा हिस्सा संबंधित योजनांवर खर्च केला पाहिजे. ज्या योजनांसाठी केंद्र शासनाचा पैसा काही कारणास्तव वेळेवर मिळाला नाही तर राज्य सरकारकडील मॅचिंग ग्रॅन्टची रक्कम अगोदर का खर्च करण्यात येत नाही. केंद्र सरकारचा निधी आला नाही तर त्या वर्षात सदर योजनेवर राज्य सरकारचा देखील निधी खर्च होत नाही. यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी यावर खुलासा केला की, वैद्यनाथन समितीने सहकारी संस्थांना मदत व्हावी या दृष्टीकोनातून कार्यवाही केली आहे. राज्य सरकारचा हिस्सा ५६ कोटी रुपयांचा होता त्यापैकी ३५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने २३४२ कोटी रुपयांना मंजूरी दिली असून त्यापैकी १४०६ कोटी रुपये वितरीत केले आहेत. ९३५ कोटी रुपये केंद्र शासनाकडून येणे बाकी आहेत. राज्य शासनाकडून ही रक्कम मिळविण्यासाठी तीन ते चार वर्षापासून पाठपुरावा करण्यात येत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत केद्रीय कृषी मंत्री व वित्त मंत्री महोदयांसोबत बैठका घेतल्या आहेत. माननीय पंतप्रधान यांची भेट घेऊन याबाबत मागणी केलेली आहे. केंद्रीय वित्त मंत्री महोदयांचे असे म्हणणे आहे की, वैद्यनाथन पॅकेजची मुदत पाच वर्षाची होती, त्याची कालमर्यादा २०११ मध्ये संपलेली आहे. त्यानंतर या पॅकेजसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करता येणार नाही अशी त्यांची भुमिका आहे. याबाबत केंद्रीय सचिवांची बैठक झाली होती. त्यावेळी वैद्यनाथन पॅकेजचे ४ हजार कोटी रुपये महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश व आंध्र प्रदेश या राज्याची रक्कम सर्वांत जास्त आहे ही रक्कम मिळावी अशी मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे.

१३.१०२ वैद्यनाथन समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे मदत करण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे २००० ते २५०० कोटी रुपये मिळाले असून काही निधी मिळालेला नाही. काही संस्थांना हा निधी मिळाला असून काही संस्थांना वैद्यनाथन समितीने केलेल्या शिफारशीनुसार निधी मिळालेला नाही त्या

संस्था या लाभापासून वंचित राहिल्या आहेत. या समितीने शिफारस केलेल्या पॅकेजची मुदत जरी संपली तरी आपल्या समितीने शिफारस करुन हा पैसा मिळावा यासाठी राज्य शासनाने पाठपुरावा केला पाहिजे तरच हा पैसा लवकरात लवकर मिळू शकेल. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, हा निधी मिळावा यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी माननीय पंतप्रधानांची भेट घेतली आहे. तसेच तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री यांच्या सोबत बैठक देखील झाली आहे.

१३.१०३ तथापि, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी बैठक घेऊन अनेक वेळा प्रयत्न केलेत तरी देखील ९३५ कोटी रुपये मिळत नसल्यामुळे काही संस्था या लाभापासून वंचित राहत आहेत, त्यांना देखील हा निधी मिळाला पाहिजे. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता याबाबत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की या पॅकेजचा लाभ डीसीसी बँकेला मिळाला आहे. धुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेला ७२ कोटी रुपये मिळाले आहेत केंद्र सरकारने ही रक्कम वितरीत केली आहे. उस्मानाबाद मध्यवर्ती बँकेला ४० कोटी रुपये मिळाले आहेत. ग्रामीण भागात काम करणाऱ्या विविध सहकारी संस्था मोठ्या प्रमाणात आहेत. त्या संस्थांना तफावत निधी दिल्यामुळे त्या संस्थांची आर्थिक स्थिती चांगली झालेली आहे.

१३.१०४ केंद्र सरकार विविध योजनांसाठी अनुदान देते. जेएनएनयुआरएम, एआयबीपी या योजनांचा निधी मिळतो. गत दोन ते तीन वर्षात महाराष्ट्राला पाच कोटी रुपये मिळाले आहेत. केंद्र शासनाकडून जास्त पैसा मिळविणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. जो निधी मिळतो त्याचा प्राधान्यक्रम ठरविण्यात येतो. काही वेळा राजकीय हस्तक्षेपामुळे निधीचा प्राधान्यक्रम पुढे मागे होत असेल परंतु अशी दोन तीन टक्के रक्कम सोडली तर नियमानुसार निधीचे वितरण झाले पाहिजे. सन २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ या तीन वर्षात किती निधी मिळाला त्याचे वाटप कसे झाले याची सविस्तर माहिती समितीला १५ दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी असे निदेश समितीने दिले परंतु माहिती अद्याप आहे.

१३.१०५ समितीने पुढे अशी विचारणा केली की, सहकारी साखर कारखान्याचे शेअर सर्टिफिकेट अनुसूचित जातीच्या सभासदांना देताना अनुदान देण्यात येते. अशा प्रकारे शेअर सर्टिफिकेट देण्यात आली आहेत काय? याबाबत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की अनुसूचित जातीच्या सभासदांना १० हजार रुपयांचे शेअर सर्टिफिकेट देण्यात येते. त्याचे दर्शनी मुल्य पाच हजार रुपये असते. सन २००८-२००९ मध्ये हे शेअर सर्टिफिकेट देताना ५० टक्के रक्कम अनुदान व ५० टक्के सभासदांनी भरावयाचे असतात. एका सभासदाला ५० टक्के अनुदान व ५० टक्के कर्ज दिले जाते. १७४१ शेतकरी सभासद अनुसूचित जातीचे आहेत, कोल्हापूर येथे १४२ लाभार्थी आहेत.

१३.१०६ मागासवर्गीयांसाठी योजना राबवितांना काही निकष आहेत किंवा नाही. यामध्ये सहकारी साखर कारखाने, गृहनिर्माण संस्था अशा अनेक योजना आहेत. या योजनांचा लाभ सभासदांना देताना मागासवर्गीय लोकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. या सर्व बाबींचा विचार करुन मागासवर्गीय लोकांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक फायदा झाला पाहिजे या दृष्टीने अभ्यास करुन योजना राबविण्याची आवश्यकता आहे. मागासवर्गीयांचा आर्थिक स्तर उंचावला तर त्यातून त्यांना अनेक फायदे होतील असे मत समितीने व्यक्त केले. यावर या योजनांच्या निकषासाठी अभ्यास करण्याची गरज आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी असावा अशी अट आहे. मागासर्गीय शेतकऱ्यांकडे एक एकर तरी शेती असायला पाहिजे हा निकष शिथिल करण्याची आवश्यकता आहे. या योजनेची तपासणी करुन जास्तीत जास्त लोकांना त्याचा फायदा मिळवून देता येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१३.१०७ मागासवर्गीय शेतकऱ्यांना साखर कारखान्याचे सभासद करुन घेतले तर शासनाच्या वतीने त्यांना भागभांडवल देण्यात येते काय ? या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, साखर कारखाने व सूत गिरण्यांचे शेअर सभासदांना देण्यात येतात. चालू आर्थिक वर्षात जळगांवमध्ये ३०, हिंगोलीमध्ये १००, सांगलीमध्ये ११९ लाभार्थ्यांना लाभ दिला आहे.

१३.१०८ २८५१ ग्रामोद्योग व लघुद्योग अंतर्गत "हातमाग उद्योगाच्या विकासाकरिता सूट आणि इतर अर्थसहाय्य" योजनेसाठी मूळ तरतूद ४६.६७ कोटी रुपयांची असून पूरक मागणी ७३.३३ कोटी रुपयांची केली आणि पुनर्विनियोजन ४८.७६ कोटी रुपयांचे केले आहे. मूळ तरतूदीपेक्षा जास्त निधीची पूरक मागणी करण्याची कारणे काय आहेत ? याबाबत माहिती देताना प्रधान सचिव व वस्त्रोद्योग विभाग यांनी समितीस सांगितले की यामध्ये योजनेचे दोन भाग आहेत. एक भाग बक्षीस योजना आणि दुसरा भाग जाहिरात व प्रसिध्दी योजना होती. बक्षिसाची रक्कम आणि पात्र लाभार्थ्यांची संख्या अगोदर ठरली होती. त्यानुसार बक्षिस योजनेसाठी ६ लाख २४ हजार रुपयांची गरज होती. परंतु बक्षिस योजनेसाठी २० लाख रुपये मिळाले. त्यामुळे अतिरिक्त मिळाले १३ लाख ७६ हजार रुपये पुनर्विनियोजि केले. योजनेच्या जाहिरात व प्रसिध्दीसाठी २६ लाख ६७ हजार रुपये मिळाले होते. मुळात या कामी १ कोटी रुपयाची मागणी होती. त्यामुळे ७३.३३ कोटी रुपयांची पूरक मागणी करुन करण्यात आली. अशा प्रकारे १ कोटी रुपये जाहिरात व प्रसिध्दीसाठी आणि २० लाख रुपये बक्षिसे योजनेसाठी तरतूद करण्यात आली. प्रत्यक्षात बक्षिस योजनेवर ६ लाख २४ हजार रुपये खर्च आला आणि जाहिरात व प्रसिध्दीसाठी ६५ लाख रुपये खर्च झाला. उर्वरीत अखर्चित ३५ लाख रुपये पुनर्विनियोजित करण्यात आले.

१३.१०९ जाहिराती व प्रसिध्दी तसेच बक्षिस योजनेतील निधी कोणत्या जिल्ह्यात खर्च करण्यात आला याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, बक्षिस योजना नागपूर, भंडारा,नाशिक, अमरावती, औरंगाबाद जाहिराती व प्रसिध्दी योजना नागपूर, रत्नागिरी, बारामती (पुणे), भूसावळ (जळगांव), धुळे, अहमदनगर, जालना, यवतमाळ, लातूर, नांदेड, औरंगाबाद व नाशिक येथे निधी खर्च करण्यात आला.

१३.११० विभागाकडे कोणकोणत्या साखर कारखान्यांच्या भाग भांडवलाचे प्रस्ताव प्राप्त झाले व कोणत्या कारखान्याचे प्रस्ताव परिपूर्णरित्या प्राप्त झाले नाहीत. बीडीएस वर ही तरतूद उपलब्ध का झाली नाही आणि महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळांकडून निधी मागणीचा प्रस्ताव का प्राप्त झाला नाही ? याबाबत खुलासा करताना सचिव, सहकार विभाग यांनी समितीस सांगितले की, राज्य सरकारने उभे केलेले एकूण ६ सहकारी कारखाने आहेत. त्यात सोलापूरमधील १ कारखाना असून उर्वरीत कारखाने मराठवाड्यातील आहेत. राज्य सहकार साखर कारखान्यांना भाग भांडवल देत असताना सहकारी संस्थांना सुध्दा काही प्रमाणात स्वत:चे भाग भांडवल उभे करावे लागते. त्या प्रमाणात राज्य सरकारकडून सहकारी साखर कारखान्यांना निधी दिला जातो. सरकारकडून सहकारी साखर कारखान्यांना १:५ या प्रमाणात भाग भांडवल दिले जाते. याचाच अर्थ संबंधित कारखान्याने स्वत:चे सभासद भाग भांडवल उभे करणे आवश्यक आहे. शिवशक्ती सहकारी साखर कारखाना मर्या., कोळसूर, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद या कारखान्याचा प्रस्ताव विभागाकडे आला होता. परंतु त्यांनी स्वत:चे सभासद भाग भांडवल उभे केले नाही, म्हणून त्यांना भाग भांडवलाची रक्कम वितरीत केली नाही. त्यामुळे तरतूद केलेले अनुदान खर्च करता आलेले नाही. म्हणून ५ कोटी ४४ लाख ६६ हजार रुपयांची बचत झाल्याचे दिसून येते. उर्वरित कारखान्यांनी स्वत:चे ३-४ कोटी रुपये भाग भांडवल उभे केल्यामुळे त्यांच्या भाग भांडवलाच्या प्रमाणात त्यांना राज्य सरकारकडून भाग भांडवल उपलब्ध करुन दिले आहे.

१३.१११ मराठवाड्यात काही सहकारी साखर कारखान्यांना एनटीडीसीने कर्ज दिले आहे. कारखान्यांकडून कर्जाची वसूली कोण आणि कधी करणार आहे, कर्ज वसुलीच्या बाबतीत राज्य सरकारचे धोरण काय आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, राज्य सरकारने भाग भांडवल पुरविलेल्या तीन कारखान्यांनी एनसीडीसीकडून कर्ज घेतले आहे. याशिवाय इतरही काही कारखान्यांनी कर्ज घेतले आहे. वास्तिविक पाहता राज्य सरकारने भाग भांडवल पुरविलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जाची रक्कम संबंधित कारखान्यांकडून राज्य सरकारने वसूल करुन ती एनसीडीसीला द्यावी अशी तरतूद आहे. काही कारखान्यांना राज्य सरकारने कर्ज दिले आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून एनसीडीसीला कर्जाच्या हप्त्याची परतफेड करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या कारखान्याकडे वसूली बाकी आहे त्या कारखान्याचे ठराविक नाव सांगितले तर त्याबाबत माहिती घेता येईल.

१३.११२ साखर कारखाना संदर्भात समितीने विचारणा केली की, मध्यंतरी साखर कारखाने सुरु असताना ऊसाचे दर ठरविण्यात आले आणि कमी दर दिल्यामुळे वातावरण बिघडले. समितीच्या माहितीनुसार कर्नाटक सरकारने या बाबतीत "कर्नाटक पॅटर्न" सुरु केला आहे. त्या पॅटर्नच्या धर्तीवर राज्यात नवीन धोरण राबविण्यास सुरुवात झाली आहे काय ? तत्कालिन सहकार मंत्र्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात सुध्दा कर्नाटक पॅटर्नच्या धर्तीवर कार्यवाही करण्यास सुरुवात करण्यात येईल. जर कर्नाटक पॅटर्नच्या धर्तीवर राज्य सरकारने धोरण आखले तर आज कारखाना आणि शेतकरी यांच्यामध्ये ऊसाच्या दरावरुन जो वाद निर्माण होतो तो संपुष्टात येईल. राज्यात विक्री करण्यात आलेल्या ४८ कारखान्यांची यादी वा बातमी दररोज टी.व्ही. वर प्रसारित केली जात आहे. हे कारखाने डबघाईला आल्याचे दाखवून त्यांचा लिलाव करण्यात आल्याचे बोलले जात आहे. मूळ साखर कारखान्यांचे सभासद, शेतकऱ्यांची जमीन, पिकाला दिलेला भाव आणि आताचा बाजारभाव या सर्वांची तुलना करता या व्यवहारामध्ये काही तरी गफलत आहे असे समितीला वाटते. याबाबत विभागीय सचिवांनी असे विशद केले की, महाराष्ट्रात जसे दर वाढीबाबत आंदोलन होते तसेच कर्नाटक राज्यात व्हायचे. एफआरपी पेक्षा जास्त भाव द्यावा किंवा पहिला हप्ता नेमका किती द्यावा हा वाद नेहमीच होतो. आपल्या राज्यात गेल्या ५-६ वर्षापासून हा वाद सुरु आहे. कर्नाटक राज्यात सुध्दा असाच वाद सुरु होता. कर्नाटक सरकारने मार्च-२०१३ मध्ये एक कायदा केला. त्या कायद्याचा मुख्य हेतू असा आहे की, २०-२५ सदस्यांचे शुगरकेन बोर्ड तयार करावे. त्या बोर्डामध्ये माननीय कृषी मंत्री हे अध्यक्ष आणि सहकार मंत्री हे सह अध्यक्ष राहतील. या बोर्डाला अधिकार दिले आहेत की, त्यांनी प्रत्येक वर्षी तीन बैठका घ्याव्यात. त्यातील एक बैठक गाळप हंगाम सुरु होण्यापूर्वी सरकारी वा खाजगी कारखान्यांनी सुरुवातीला किती पेमेंट करावे हे त्या बैठकीत निश्चित करावे. दुसरी बैठक हंगाम सुरु असताना घ्यावी आणि तिसरी बैठक हंगाम संपल्यानंतर घ्यावी. अशा प्रकारे बोर्डाची कार्यकक्षा निश्चित केली आहे. तीन वेळा बैठका झाल्यानंतर हंगामामध्ये जे गाळप झाले त्याची समरी सादर केल्यानंतर शेवटचा हप्ता किती द्यावा हे ठरवून द्यावे. आपल्या राज्यामध्ये सुध्दा कर्नाटक राज्यासारखीच पध्दत सुरु करावी अशी मागणी विविध सहकारी साखर कारखान्यांनी आणि राष्ट्रीय पातळीवरील साखर संघाने केली. तद्नंतर माननीय सहकार मंत्री आणि इतर मंत्री महोदयांबरोबर साखर संघाची बैठक झाली. शेतकरी संघाचे सदस्य सुध्दा त्या बैठकीस उपस्थित होते. साखर संघाने ७०:३० चा फॉर्म्यला मान्य करावा अशी बैठकीत मागणी केली. म्हणजेच साखरेची विक्री केल्यानंतर आलेल्या रकमेतील ७० टक्के रक्कम शेतकऱ्यांना आणि उर्वरीत ३० टक्के रक्कम साखर कारखान्याला द्यावी. राज्य सरकारने शेतकरी संघटनेचे नेते सन्माननीय खासदार श्री.राजू शेट्टी, श्री.रघुनाथदादा पाटील आणि माननीय श्री.शरद जोशी यांच्या बरोबर चर्चा केली. त्या बैठकीत ७०:३० च्या

फॉर्म्युल्यावर दुमत होते. हे प्रमाण ७५:२५ कसे करता येईल यावर काही जण आग्रही होते. विभागाने कर्नाटक पॅर्टनच्या धर्तीवर या संदर्भातील मसुदा तयार केला आहे. जो काही फॉर्म्यूला निश्चित होईल त्यावर एकमत झाल्यानंतर मसुद्याचे कायद्यात रुपांतर करता येईल.

१३.११३ महाराष्ट्र राज्य कर्नाटक पॅर्टनवर मसुदा तयार करीत आहे. त्याचा मसुदा सर्व लोकप्रतिनिधींना पाठविला नाही तरी शुगर केनच्या प्रतिनिधींना पाठवावा कारण ऊस उत्पादत शेतकऱ्यांना नवीन मसुदा पाठविल्यास नंतर उद्‌भवणारे वाद निर्माण होणार नाहीत या समितीने केलेल्या सूचनेनुसार सर्व साखर कारखान्यांना मसुद्याची प्रत पाठविण्यात येईल. असे आश्वासन समितीस देण्यात आले. तसेच मसुद्याची प्रत सहकार विभागाच्या वेबसाईटवर ठेवण्यात येईल आणि लोकांकडून सूचना वा हरकती मागविण्यात येतील. शिवाय लोकप्रतिनिधींना सुध्दा मसुद्याची प्रत पाठविण्यात येईल.

१३.११४ साखरेचे रियलायझेशन एस-३० च्या २७३५/- या दराने केले आहे. प्रत्येक महिन्यातील साखरेच्या विक्रीची सरासरी घ्यावी आणि त्यानुसार साखरेचे रियलायझेशन किती आहे ते पहावे. नवीन धोरण स्वीकारल्यास आताचे रेट बोर्ड अस्तित्वात राहणार नाही. साखर कारखान्यांनी कोणत्या दराने साखरेची विक्री केली ते पाहिले जाईल.

१३.११५ वर्तमानपत्रात व टी.व्ही. चॅनेल्सवर साखर कारखान्यांच्या विक्रीबाबत सुरु असलेल्या बातम्यांबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, राज्यात गेल्या चार-पाच वर्षात राज्य सरकारने एकूण ७ कारखान्यांचा लिलाव करुन विक्री केली आहे. राज्यात एमएससी बँकेसाठी केंद्र सरकारचा सेक्युटरायझेशन कायदा आहे. त्या अंतर्गत एमएससी बँकाना अधिकार आहे की, कारखान्यांकडून कर्जाची परतफेड झाली नाही तर विशिष्ट कलमाखाली कारखान्यांची विक्री करावी. त्यानुसार एमएससी बँकेने त्यांच्या अधिकारात कर्जाची परतफेड न केलेल्या २७ कारखान्यांची विक्री केली आहे. तसेच डीआरटी मध्ये जाऊन नाशिक येथील गिरणा सहकारी साखर कारखान्यांची विक्री केली आहे. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेने जगदंबा सहकारी साखर कारखान्याची विक्री केली आहे. अशा प्रकारे राज्यात एकूण ३४ साखर कारखान्यांची विक्री करण्यात आलेली आहे.

१३.११६ डीसीसी किंवा एमएससी बँकेने साखर कारखान्यांची विक्री करण्यापूर्वी सहकार विभागाची पूर्व परवानगी घेतली होती काय? खाजगी साखर कारखाना असेल तर त्याला वेगळा क्रायटेरिया लागेल. परंतु ज्या कारखान्यांना राज्य सरकार, डीसीसी बँक, एमएससी बँक किंवा अन्य बँकांनी मदत केली असेतल किंवा कर्ज दिले असेल तर त्या कारखान्यांची विक्री करण्यापूर्वी सहकार विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. सहकार विभागाची परवानगी न घेता हे कारखाने विकले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता

विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सेक्युटरायझेशन कायदा हा केंद्र सरकारचा असून त्या कायद्यातील नियम ६ व ८ मध्ये या बाबी अंतर्भूत आहेत. नियम ६ मध्ये इमोव्हेबल प्रॉपर्टीची विक्री करावयाची असेल तर कोणती पध्दत अवलंबवावी याबाबत स्पष्ट नमूद केले आहे. साखर कारखान्यांना बँकांनी कर्ज दिलेले असल्यामुळे संबंधित बँकांना त्यांच्या अधिकारात डिस्पोज ऑफ करता येते. तसेच ले डाऊन प्रोसीजर नुसार योग्य ती प्रक्रिया पार पाडावी असेही केंद्र सरकारच्या कायद्यात नमूद केले आहे.

१३.११७ साखर कारखाना आणि शेतकरी राज्यातील असताना त्यांना केंद्र सरकारचा सेक्युटरायझेशन कायदा कसा लागू होऊ शकतो ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, एका प्रकरणी बँकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्या ठिकाणी बँकांच्या बाजूने निर्णय लागला. त्यामुळे राज्य सरकारने उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात केस दाखल केली. उच्च न्यायालयाच्या निर्णयावर राज्य सरकाने स्टे मागतिला होता. परंतु तो मिळाला नाही.

१३.११८ शेतकऱ्यांचे तसेच साखर कारखान्यांचे हित जोपासणे आवश्यक आहे. साखर कारखान्यांना राज्य शासनाने जी गॅरंटी दिलेली आहे त्यासंदर्भातील रक्कम मोठ्या प्रमाणात आहे. प्रापर्टी डिस्पोज करताना राज्य शासनाशी सल्लामसलत करणे आवश्यक ती भूमिका शासनाने घेतलेली आहे. परंतु कोर्टाने यासंदर्भात त्यांच्या बाजूने निकाल दिलेला आहे.

१३.११९ राज्य शासनाने ज्या साखर कारखान्यांची गँरंटी घेतलेली नाही असे कारखाने विकल्यानंतर राज्य शासनाला गॅरंटीचे पैसे मिळाले पाहिजे. यावर २७ साखर कारखान्यांचे ७०० कोटी रुपये राज्य शासनाने द्यावेत असे एमएससी बँकेने राज्य शासनास सांगितले आहे. परंतु विक्रीचे सर्व व्यवहार झाल्यानंतर शिखर बँक आपल्याकडे ७०० कोटी रुपये मागत आहे. थोडक्यात राज्यशासनाकडून शिखर बँकेला ७०० कोटी रुपये घेणे आहे. राज्य शासनाला आता जे काही ७०० कोटी द्यावयाचे आहेत ते जनतेचे आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात आम्ही डिस्प्यूट केलेले आहे. यामध्ये अनियमितता झालेली असल्यामुळे राज्य शासन पैसे देऊ शकणार नाही असे एमएससी बँकेला स्पष्टपणे सांगण्यात आलेले आहे.

१३.१२० ज्यांनी कारखान्याला पैसे दिले, ज्या शेतकऱ्यांनी कारखान्याचे शेअर्स घेतले आहेत असे कारखाने विकल्यामुळे संबंधितांचे नुकसान होते. त्यामुळे अशा कारखान्यांवर शासनाने गुन्हे का दाखल केले नाही ? यावर साखर कारखाने चांगले चालावते, मार्केटमध्ये चांगली पत निर्माण व्हावी यासाठी राज्य शासन कारखान्यांना भाग भांडवल देत असते. एमएससी बँकेला मागच्या वर्षी राज्य शासनाने १०० कोटी रुपये दिले होते त्यावर डिव्हीडंट म्हणून एमएससी बँकेने राज्य शासनाला ७ कोटी रुपये डिव्हीडंट म्हणून दिलेले आहे.

१३.१२१ परंतु जे कारखाने चांगल्या प्रकारे सुरु आहेत त्यांना अधिकचे पैसे दिले तरी हरकत नाही. परंतु जे कारखाने मोडीत काढण्यात आलेले आहे त्यांचे काय ? राज्य शासन ७०० कोटी रुपयांना गॅरंटर राहिलेले आहे. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात गेलेले आहे. सुप्रीम कोर्टात राज्य सरकारच्या विरोधात निर्णय लागला तर राज्य शासनाला ७०० कोटी रुपये द्यावे लागतील. या विषयाच्या संदर्भात सहकार विभागाने अध्यादेश काढून बंदी का घातली नाही ? या विषयाच्या संदर्भात सहकार विभागाने योग्य पाऊल उचलले नाही असे मत समितीने खेदान व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की या संदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी हस्तक्षेप केलेले आहे. कारखान्यांची विक्री होत असताना अनियमितता झालेली आहे यासंदर्भात कळविले होते.

समितीचे अभिप्राय :-

१३.१२२ केंद्र सरकार विविध योजनांसाठी अनुदान देते. जेएनएनयुआरएम, एआयबीपी या योजनांचा निधी मिळतो. गत दोन ते तीन वर्षात महाराष्ट्राला पाच कोटी रुपये मिळाले आहेत. केंद्र शासनाकडून जास्त पैसा मिळविणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे आणि जो निधी मिळतो त्याचा प्राधान्यक्रम ठरविण्यात येतो आणि नियमानुसार निधीचे वितरण होणे अपेक्षित आहे.

१३.१२३ सहकारी साखर कारखान्याचे शेअर सर्टिफिकेट अनुसूचित जातीच्या सभासदांना देताना अनुदान देण्यात येते. अनुसूचित जातीच्या सभासदांना १० हजार रुपयांचे शेअर सर्टिफिकेट देण्यात येते त्याची फेस व्हॅल्यू पाच हजार रुपये असते. हे शेअर सर्टिफिकेट देताना ५० टक्के रक्कम अनुदान व ५० टक्के सभासदांनी भरावयाचे असतात. एका सभासदाला ५० टक्के अनुदान व ५० टक्के रकमचे कर्ज दिले जाते. मागासवर्गीयांसाठी योजना राबवितांना काही निकष आहेत किंवा नाही. यामध्ये सहकारी साखर कारखाने, गृहनिर्माण संस्था अशा अनेक योजना आहेत. या योजनांचा लाभ सभासदांना देताना मागासवर्गीय लोकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. या सर्व बाबींचा विचार करुन मागासवर्गीय लोकांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक फायदा झाला पाहिजे या दृष्टीने अभ्यास करुन योजना राबविण्याची आवश्यकता आहे. मागासवर्गीयांचा आर्थिक स्तर उंचावला तर त्यातून त्यांना अनेक फायदे होतील. यावर या योजनांच्या निकषासाठी अभ्यास करण्याची गरज आहे.

समितीच्या शिफारशी :-

१३.१२४ शिफारस क्रमांक (१) :- केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना एकत्रितरित्या राबविण्यात येतात व त्यात केंद्र व राज्य शासनाचा निधी देखील ठरलेल्या प्रमाणात येतो. अनेक योजनाबाबत समितीच्या असे निदर्शनास आले की, केंद्र व राज्य शासनाच्या निधीमध्ये केंद्राचा निधी प्राप्त झाल्यानंतरही राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम उपलब्ध करुन न दिल्यास त्याचा योजनेवर विपरीत परिणाम होत असल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे संपूर्ण योजनाच राबविण्यामध्ये अडचणी निर्माण होते व केंद्राने उपलब्ध करुन दिलेला निधी देखील अखर्चित राहतो. अशा परिस्थितीत निश्चित तोडगा काढणे अत्यंत आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. ज्या ठिकाणी केंद्र शासनाने निधी उपलब्ध करुन दिला त्या योजनांकरिता राज्य शासनाने त्यांच्या हिश्याच्या रकमेची तरतूद प्राधान्याने करावी व याबाबत संबंधित विभागाने व नियोजन विभागाने आवश्यक कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

१३.१२५ शिफारस क्रमांक (२) :- मागासवर्गीयांकरिता असलेल्या योजनाचा लाभ घेण्यासाठी तो व्यक्ती शेतकरी असावा अशी अट आहे. मागासर्गीय शेतकऱ्यांकडे एक एकर तरी शेती असायला पाहिजे या निकर्षामुळे अनेक मागासवर्गीयांना योजनापासून लाभ मिळू शकला नाही व परिणामी ज्या उद्देशाने शासनाने हे धोरण आखले त्यांच्या अमंलबजावणीमध्ये अनेक अडचणी येवू लागल्या. अत: मागासवर्गीयांना योजनाचा जास्तीतजास्त लाभ घेण्याकरिता शेतकरी असल्याचे बंधनकारक असलेल्या अटीबाबत व एंकदरितच या धोरणाबाबत शासनाने पुर्नविचार करुन या योजनाचा लाभ जास्तीतजास्त लोकांना कसा मिळू शकेल याबाबतचे सुधारीत धोरण शासनाने तयार करावे अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट - अ

विवरणपत्र क्र.१

जलसंपदा विभाग/निवसं-१

लोकलेखा समितीच्या दिनांक २२/१०/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये आश्वासित १२

दिनांक २२/१०/२०१३ रोजी प्रधान सचिव (जलसंपदा) यांच्या लोकलेखा समितीसमोर झालेल्या साक्षी दरम्यान अेआयबीपीबाबत खालील माहिती लेखी स्वरुपात देण्यात येईल, असे प्रधान सचिव (जलसंपदा) यांनी सांगितले होते.

१) सन २००९-१० मध्ये अेआयबीपी अंतर्गत किती निधीची मागणी केली होती?

२) विभागाने मागणी केल्यानुसार केंद्र शासनाकडून किती निधी प्राप्त झाला आणि तो कोणत्या टप्प्यात आला, तसेच शेवटचा हप्ता केव्हा मिळाला?

त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

सन २००९-१० मध्ये ३० मोठे-मध्यम व १०२ लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी रु.२८२२.९७ कोटी केंद्र सहाय्य मागणी करणारे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्या अनुषंगाने सन २००९-१० या आर्थिक वर्षात २२ मोठे-मध्यम व सन २००८-०९ मधील १ प्रकल्पाचा उर्वरीत १० टक्केचा निधी धरुन रु.१३९५.४० कोटी इतके केंद्रिय अर्थ सहाय्य प्राप्त झाले.

सन २००९-१० मध्ये सादर केलेल्या प्रकल्पापैकी ३ मोठे-मध्यम व १७ ल.पा. प्रकल्पासाठी रु.९५५.१३ कोटी सन २०१०-११ मध्ये दिनांक १/४/२०१० ते ८/५/२०१० पर्यंतच्या कालावधीत प्राप्त झाले आहेत असे एकूण सन २००९-१० मध्ये सादर केलेल्या प्रकल्पासाठी रु.२३५०.५३ कोटी केंद्रिय अर्थ सहाय्य प्राप्त झाले आहे.

विवरणपत्र क्र. २

महाराष्ट्र विधानमंडल सचिवालय
आवक क्रमांक : 01962
दिनांक : 25 JAN 2016
बेळ ..... स्वाक्षरी .....

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सुधारीत सर्व मार्गदर्शक सूचनांमध्ये नवीन बाबींचा समावेश करणेबाबत

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय, क्रमांक: स्थाविका- १२१५/प्र.क्र.१९५/का.१४८२,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २ जानेवारी, २०१६

संदर्भ:- १) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: स्थाविका २०११/प्र.क्र.४७/का.१४८२, दिनांक : १३ सप्टेंबर,२०११.

२) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग: क्रमांक : व्हीपीएम-२०१४/प्र.क्र.१८३/पंरा-३, दिनांक ३१ डिसेंबर, २०१४.

३) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक : आग्रायो-२०१५/प्र.क्र.३६/ योजना-५, दिनांक : २० मे, २०१५ व शुध्दीपत्रक दि. २९ मे, २०१५.

४) शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग, क्रमांक : आग्रायो-२०१५/प्र.क्र.८०/योजना-५, दि. ८ ऑक्टोबर, २०१५.

उपरोक्त संदर्भ क्र. २, ३ येथील ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय दि. ३१ डिसेंबर, २०१४ व २९ मे, २०१५ अन्वये आणि संदर्भ क्रमांक ४ येथील दि. ८ ऑक्टोबर, २०१५ च्या परिपत्रकान्वये केंद्र शासनाच्या आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यात आमदार आदर्श ग्राम योजना राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संदर्भ क्रमांक ४ येथील दि.८ऑक्टोबर,२०१५ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र.१ मधील नमूद तरतूद पुढीलप्रमाणे आहे:-

"आमदार आदर्श ग्राम योजनेत मा.विधानसभा सदस्य आपल्या मतदारसंघातील ग्रामपंचायत निवडतील. विधानसभा सदस्यांचा मतदारसंघ शहरी आणि ग्रामीण भागात विभागला गेला असेल तर ते मतदार संघाच्या ग्रामीण भागातून ग्रामपंचायतीची निवड करतील. विधानसभा सदस्यांचा मतदारसंघ जर संपूर्णपणे शहरी असेल तर त्यांच्या सोयीच्या दृष्टीने त्याच जिल्हयातील एका ग्रामपंचायतीची निवड ते करु शकतील. मुंबई परिसरातील शहरी मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारे विधानसभा सदस्य राज्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीची निवड करु शकतील. विधानपरिषद सदस्य राज्यात कोणत्याही जिल्हयातून ग्रामपंचायतीची निवड करु शकतील."

२. उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांचा संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णय, नियोजन विभाग, दि. १३ सप्टेंबर, २०११ मधील परिच्छेद क्र.५ मध्ये आवश्यक ती अनूपूरक तरतूद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांच्या शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: स्थाविका-२०११/प्र.क्र.४७/का.१४८२, दि. १३ सप्टेंबर, २०११ मधील परिच्छेद क्रमांक ५(१) नंतर खालील प्रमाणे नविन परिच्छेद क्रमांक ५(१)अ समाविष्ट करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

परिच्छेद क्र. ५(१)(अ):- आमदार आदर्श ग्राम योजनेत मा. विधानसभा सदस्य आपल्या मतदारसंघातील ग्रामपंचायत निवडतील. विधानपरिषद सदस्य राज्यात कोणत्याही जिल्हयातून ग्रामपंचायतीची निवड करु शकतील. विधानसभा सदस्यांचा मतदारसंघ शहरी आणि ग्रामीण भागात विभागला गेला असेल तर ते मतदारसंघाच्या ग्रामीण भागातून ग्रामपंचायतीची निवड करतील. विधानसभा सदस्यांचा मतदारसंघ जर संपूर्णपणे शहरी असेल तर त्यांच्या सोयीच्या दृष्टीने त्याच जिल्हातील एका ग्रामपंचायतीची निवड ते करु शकतील व या प्रयोजनासाठी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय असलेल्या निधी वितरणाची व खर्च करण्याची कार्यपध्दती ही विधानपरिषद सदस्यांकरिता अवलंबिण्यात येत असलेल्या परिच्छेद क्र.६(५) मधील सूचनांनुसार राहील.

तसेच आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत मुंबई परिसरातील शहरी मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारे विधानसभा सदस्य राज्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीची निवड करु शकतील व त्यांनी निवडलेल्या ग्रामपंचायती मध्ये सुचविलेल्या कामांसाठी यथास्थिती, जिल्हाधिकारी, मुंबई शहर / जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, हे नोडल जिल्हाधिकारी राहतील व ते काम सूचविण्यात आलेल्या संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना निधी वितरीत करतील. त्यानुसार नोडल जिल्हाधिकारी यांनी ज्या जिल्हयाला निधी वितरीत केला आहे त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे नोडल जिल्हाधिकारी यांना खर्चाची माहिती वेळोवेळी पाठवतील. नोडल जिल्हाधिकारी हे संबंधित विधानसभा सदस्यांच्या खर्चाचा एकत्रित अहवाल वेळोवेळी विभागीय आयुक्त व शासनास सादर करतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१५१२३०१४१५५९७६१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कि.व.बाहुले)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव,
३. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
५. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,

६. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. सर्व जिल्हाधिकारी,
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१०. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१२. संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य मुंबई,
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४. सर्व उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्ताची कार्यालये,
१५. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
१६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (पत्राने).
१८. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
२०. भारतीय जनता पाटी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई-२०,
२१. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४ (५ प्रती),
२२. महाराष्ट्र कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस,वरळी, मुंबई-१३,
२३. इंडीयन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५,
२४. नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१,
२५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८,
२६. निवडनस्ती, कार्यासन १४८२, नियोजन विभाग.

परिशिष्ट - ब

मंगळवार, दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.१५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीष बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.

(५) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.

(६) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स.

(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.

(८) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.

(९) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

(१०) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

(११) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव

(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार

(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

(४) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित

महालेखाकार यांचे कार्यालय

श्री. ज.र.इनामदार, वरिष्ठ उप महालेखाकार

वित्त विभाग

श्रीमती शुभांगी शेठ, उप सचिव

साक्षीदार

गृहनिर्माण विभाग

श्री. देबाशिष चक्रवर्ती, प्रधान सचिव

सार्वजनिक आरोग्य विभाग

श्रीमती मीता राजीव लोचन, सचिव
डॉ. सतीश पवार, संचालक आरोग्य सेवा

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. क्यु-३ संदर्भात प्रधान सचिव, गृहनिर्माण व अनुदान क्र. आर-३ संदर्भात सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.१५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीष बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

(५) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

(६) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

(७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(८) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.स.स.

(९) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(१०) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार

श्री.ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

श्री.दि.पु.येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.ना.भा.रिंगणे, उप सचिव

प्रधान महालेखाकार यांचे कार्यालय

श्री.ज.र.इनामदार, वरिष्ठ उप महालेखाकार

साक्षिदार :

नियोजन विभाग, मंत्रालय

श्री.यु.ल.वाघमारे, सहसचिव

सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय

श्री.आर.डी.शिंदे, सचिव,

श्री.रणजित सिंह देओल, आयुक्त

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय.

श्री.सुधार गोयल, अपर मुख्य सचिव, पणन विभाग

श्री.मनोज सौनिक, प्रधान सचिव, वस्त्रोद्योग विभाग

श्री.राजगोपाल देवरा, सचिव, सहकार विभाग

श्री.मधुकर चौधरी, आयुक्त (सहकार)

श्री.विजय सिंघल, आयुक्त (साखर)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. ओ-४ संदर्भात सचिव, नियोजन व अनुदान क्र. व्ही-२/३ संदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच अनुदान क्र. एन-२/४ संदर्भात सचिव, सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.२५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीष बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(४) श्री.विवेक पंडित, वि.स.स.

(५) श्री.जयप्रकाश छाजेड, विप.स.

निमंत्रित

६. श्री.विनायक राऊत, वि.प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार

श्री.ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

श्री.दि.पु.येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.राजेश अग्रवाल, सचिव

प्रधान महालेखाकार यांचे कार्यालय

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार.

साक्षीदार

सामान्य प्रशासन विभाग

डॉ.पी.एस.मीना, अपर मुख्य सचिव, प्र.सु.र व का. व विमानचालन

गृह विभाग (परिवहन)

श्री. शैलेशकुमार शर्मा, प्रधान सचिव, परिवहन व बंदरे

श्री. पराग जैन, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड.

महसूल (मदत व पुनर्वसन) विभाग

श्री. मिलिंद म्हैसकर, सचिव

उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग

श्री. अजय मेहता, प्रधान सचिव (ऊर्जा) व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वीज मंडळ होल्डिंग कंपनी मर्यादित.

श्री. अरविंद सिंह, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित.

श्री. आनंद लिमये, महासंचालक, महाऊर्जा

श्री. दत्तात्रय व्हावळ, संचालक (वित्त), महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. ए-७ संदर्भात अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, अनुदान क्र. बी-७ संदर्भात प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग, अनुदान क्र. सी-६ संदर्भात सचिव, महसूल (मदत व पुर्नवसन) व अनुदान क्र. के-६ संदर्भात प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.४० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) **श्री. गिरीष बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

सदस्य

(२) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स.

(३) श्री. सुनील केदार, वि. स. स.

(४) श्री. बसवराज पाटील, वि. स. स.

(५) श्री. राहुल बोंद्रे, वि. स. स.

(६) श्री. लक्ष्मण जगताप, वि. स. स.

(७) प्रा. राम शिंदे, वि. स. स.

(८) श्री. गिरीष महाजन, वि. स. स.

(९) श्री. नितीन सरदेसाई, वि. स. स.

(१०) श्री. जयप्रकाश छाजेड, वि. प. स.

(११) श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. निमंत्रित

(१२) श्री. विनायक राऊत, वि. प. स.

(१३) श्री. मनिष जैन, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. उत्तमसिंग चव्हाण, अतिरिक्त सचिव

श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार

श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित

वित्त विभाग

श्री.राजेश अग्रवाल,सचिव (लेखा व कोषागारे)

महालेखाकार यांचे कार्यालय

श्रीमती शीला जोग, महालेखाकार (लेखापरीक्षा) II, नागपूर

श्री. जहांगीर इनामदार, वरिष्ठ उप महालेखाकार, मुंबई

साक्षीदार

जलसंधारण विभाग

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

श्रीमती मीता लोचन, सचिव

सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री. श्यामलकुमार मुखर्जी, सचिव

शासन मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय

१) श्री. प.ज.गोसावी, संचालक

जलसंपदा विभाग

१) श्री. एकनाथ पाटील, प्रधान सचिव (जलसंपदा)

२) श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव (लाभक्षेत्र विकास)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. एच-८ संदर्भात सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, अनुदान क्र. एल-८ संदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग, अनुदान क्र. आय-५ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा व अनुदान क्र. एस-४ संदर्भात सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१३ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, नवीन इमारत (कौन्सिल हॉल), पुणे येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी ६. ०५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) **श्री. गिरीष बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

(४) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स.

(५) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

(६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(७) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

(८) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

(९) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१०) श्री.विवेक पंडित, वि.स.स.

(११) प्रा.सुरेश नवले, वि.स.स.

(१२) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(१३) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार

श्री.दि.पु.येवला,अवर सचिव (समिती)

निमंत्रित

महालेखाकार कार्यालय,

श्री. देसाई, महालेखापाल

वित्त विभाग

श्री. रिंगणे, उप सचिव

साक्षीदार

सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,

श्री. आर.डी.शिंदे, सचिव, मंत्रालय, मुंबई

समाज कल्याण आयुक्तालय, पुणे

श्री. रणजीत सिंह देओल, आयुक्त

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदिवासी प्रशिक्षण व संशोधन संस्था, पुणे

श्री. परिहार, कार्यकारी संचालक

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. एन-२/४ संदर्भात सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेतली.

शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१३

लोकलेखा समिती

समितीची बैठक शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१३ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, नवीन इमारत (कौन्सिल हॉल), पुणे येथे सकाळी १०.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) **श्री. गिरीष बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

(४) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स.

(५) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

(६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(७) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

(८) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

(९) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१०) श्री.विवेक पंडित, वि.स.स.

(११) प्रा.सुरेश नवले, वि.स.स.

(१२) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(१३) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

(१४) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार

श्री.दि.पु.येवला,अवर सचिव (समिती)

निमंत्रित

महालेखाकार कार्यालय,

श्री.देसाई, महालेखापाल

वित्त विभाग

श्री.रिंगणे, उप सचिव

साक्षीदार

सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,

श्री.आर.डी.शिंदे, सचिव, मंत्रालय, मुंबई

समाज कल्याण आयुक्तालय, पुणे

श्री.रणजीत सिंह देओल, आयुक्त

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदिवासी प्रशिक्षण व संशोधन संस्था, पुणे

श्री.परिहार, कार्यकारी संचालक

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. एन-२/४ संदर्भात सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २२ जानेवारी, २०१४

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) **श्री. गिरीष बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

सदस्य

(२) श्री. मधू उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनील केदार, वि.स.स.
(५) श्री. आर.एम. वाणी, वि.स.स.
(६) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
(७) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
(८) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(९) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के. चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार

निमंत्रित

महालेखाकार कार्यालय, मुंबई

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, महालेखाकार कार्यालय, मुंबई.

वित्त विभाग, मंत्रालय,

श्रीमती राधिका रस्तोगी, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार

सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय

श्री.आर.डी. शिंदे, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. एन-२/४ संदर्भात सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २५ जून, २०१४
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २५ जून, २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) **श्री. गिरीष बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

(५) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(६) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

(७) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव

श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

श्री.दि.पु.येवला,अवर सचिव (समिती)

निमंत्रित

महालेखाकार कार्यालय, नागपूर

श्री.सूर्यनारायण मूर्ती, उप महालेखापाल

महालेखाकार कार्यालय, मुंबई

श्री.जहांगीर इनामदार, उप महालेखापाल

साक्षीदार

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

श्रीमती राधिका रस्तोगी, सचिव (लेखा व कोषागारे)

सामाजिक न्याय विभाग

श्री.डी.एन.राजूरकर, आयुक्त, अपंग कल्याण

श्री.रणजितसिंह देओल, आयुक्त, समाजकल्याण

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. एन-२/४ संदर्भात सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २८ मार्च, २०१६
लोकलेखा समिती

समितीच्या उप समिती-१ ची बैठक सोमवार, दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.०० वाजता स्थगित झाली.

(१) श्री.सत्यजित पाटील-सरूडकर, वि.स.स. तथा कार्यकारी निमंत्रक

सदस्य

(२) श्री.भास्करराव जाधव, वि.स.स.
(३) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील सातवा प्रारूप अहवाल विचारात घेतला.

गुरुवार, दिनांक ३१ मार्च, २०१६
लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरूवार, दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे ३.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री.योगेश सागर, वि.स.स.
(५) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
(६) श्री.संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री.शंभुराज देसाई, वि.स.स.
(८) श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(९) श्री.वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(१०) श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स.
(११) श्री.संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.श्री.चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव
(३) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी
(४) श्री.रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-२०१० या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील सातवा प्रारूप अहवाल विचारात घेवून संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई